श्री. सौ. गं. पं. वाचनालय, ओर
दा. अं. १२७२ | Ey

20 NOV 2013
17 JUL 2020

# निवडक लेख

श्री० ना. गो. चापेकर

20 NOV 2013

1994

# निबंधक लेख

लेखक
'एडमंड बर्कचें चरित्र' व 'पैसा'
या पुस्तकांचे कर्ते
श्री. नारायण गोविंद चापेकर, बी. ए. एल्एल्. बी.
फर्स्टक्लास स. जज्ज, ठाणें.

प्रकाशक
गणेश महादेव आणि कंपनी
गिरगांवरोड–मुंबई.

ऑगस्ट १९२४

किंमत अडीच रुपये

मुद्रक व प्रकाशकः—**गणेश महादेव वीरकर**

मुद्रणालयः—

**'साहित्यसेवक छापखाना'** ९५—९७ गिरगांव बॅकरोड, मुंबई

प्रकाशनालयः—

**गणेश महादेव आणि कंपनी,** ६२१ गिरगांवरोड, मुंबई

मोरेश्वर रा. पे. पं. ग्रंथसंग्रहालय, मोरे

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | शिकवावें कसें ? ... ... ... ... | १ |
| २ | रामायण ... ... ... ... | १५ |
| ३ | चरित्रनायकाच्या गुणांबरोबर दोषांचें वर्णन करावें कीं नाहीं ? ... ... ... | ४१ |
| ४ | कोर्टसंचार ... ... ... ... | ४९ |
| ५ | वैदिकधर्म, लेखांक १ ला. ... ... ... | ७० |
| | ,, ,, २ रा. ... ... ... | ७९ |
| | ,, ,, ३ रा. ... ... ... | ८९ |
| | ,, ,, ४ था. ... ... ... | ४०३ |
| ६ | ऐतरेय ब्राह्मण ... ... ... ... | १०१ |
| ७ | ऐतरेयब्राह्मणांतील ४३ आख्यायिका ... ... | ११३ |
| ८ | फलज्योतिष ... ... ... ... | १५१ |
| ९ | संतांची कामगिरी ... ... ... ... | १५९ |
| १० | स्नेह ... ... ... ... ... | १६६ |
| ११ | मराठी मासिकें, त्यांचें स्वरूप व सुधारणेच्या दिशा ... | १७७ |
| १२ | मराठी भाषेवरील सावट ... ... ... | २०० |
| १३ | सुख आणि शांति ( पुस्तकपरीक्षा ) ... ... | २२२ |
| १४ | प्राक्कालीन अघातुरूप विनिमयसामान्यें ... ... | २५५ |
| १५ | घातुरूप विनिमयसामान्यें अथवा नाणें ... ... | २५९ |
| १६ | ब्रिटिश अमलापूर्वीच्या चलनासंबंधानें थोडी माहिती ... | २७० |
| १७ | रुपया शिरशहानेंच सुरू केला काय ? ... ... | २७६ |
| १८ | परत हुंड्या ( रिव्हर्स कौन्सिल बील ) व हिंदुस्थानच्या चलनपद्धतीचें सामान्य स्वरूप ... ... | २८३ |
| १९ | भारतीय चलनपद्धति ( पुस्तकपरीक्षा ) ... ... | ३२५ |
| २० | रुपया अर्थात आमचें चलन ( पुस्तकपरीक्षा ) ... | ३३६ |
| २१ | समाजशास्त्र व्याख्यानमाला ( परीक्षण ) ... ... | ३४९ |
| २२ | नीतिशास्त्रप्रवेश ( पुस्तकपरीक्षा ) ... ... | ३५५ |


11 JAN 1994
17 MAR 1990
मोरे

स्वस्त भावानें **मायर्स पंप्स्** मिळण्याचें ठिकाण

हमाम स्ट्रीट, **मुंबई** { **धि लिमये ब्रदर्स लिमिटेड,** } पोलाक स्ट्रीट, **कलकत्ता**

मा. ६५
९२७२

## गणेश महादेव आणि कंपनीचीं

# आजकालचींपुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | स्वराज्याचा श्रीगणेशा. | २–४–० |
| २ | स्वराज्याची घटना. | २–४–० |
| ३ | स्वराज्याची स्थापना. | २–४–० |
| ४ | स्वराज्याचा कारभार. | २–४–० |
| ५ | स्वराज्यावरील संकट. | २–४–० |
| ६ | मराठी रियासत, मध्य वि. ३ | २–४–० |
| ७ | ब्रिटिश रियासत, पूर्वार्ध. | ३–८–० |
| ८ | श्रीएकनाथ चरित्र. | ०-१२-० |
| ९ | भक्तिमणिमाला. | १–८–० |
| १० | अजिंक्य तारा. | १–८–० |
| ११ | निकोलाय लेनिन. | ०-१२-० |
| १२ | ग्रेट ब्रिटनची शासनपद्धति. | ०-१०-० |
| १३ | नवजीवन ( नाटक ) | ०-१०-० |
| १४ | जोसेफ मॅझिनी. | २–०–० |
| १५ | महात्मा गांधी. | २–४–० |
| १६ | मानवी कर्तव्यें. | १–०–० |
| १७ | माधवानुज ( कविता ) | २–०–० |
| १८ | वीर वैरागी | १–०–० |
| १९ | गोमांतक ( ऐ. काव्य. ) | २–०–० |
| २० | श्री. चापेकरांचे निवडक लेख | २–८–० |

### छापत आहे

| | | |
|---|---|---|
| २१ | सैतानी–संक्रांत. | १–०–० |

For buying or selling

**Govt. Securities**

*apply to*

**BHIDE SONS & Co.**

*57, Apollo Street, Fort, BOMBAY.*

| *Office Tel.* | *Telegrams:* | *Residence Tel.* |
|---|---|---|
| 24636 | "INVEST," Bombay. | 25564 |

# प्रस्तावना

ह्या पुस्तकांत एकंदर २२ लेखांचा संग्रह केला आहे. गेल्या पंचवीस वर्षांत वेळोवेळीं लिहिलेल्या लेखांचें संकलन करून प्रसिद्ध करण्याची कल्पना कांहीं प्रेमळ मित्रांनीं सुचविली. व ती मला पटलीही. पण महाराष्ट्रांतील लेखकांची दैना माहित असल्यामुळें हा दगदगीचा, लुप्ता-भिमानाचा व आंतवड्याचा व्यवहार करण्याकडे मनाची प्रवृत्ति होईना. नाटकें, कादंबऱ्या व शालेपयोगीं पुस्तकें ह्यांवाचून इतर मराठी पुस्तकां-कडे बहुधा कोणाची धांव जात नाहीं. तेव्हां आपणच हौसेनें लिहावें पण शिवाय छापखाना पहावा, पैसे खर्च करावे आणि ते वसूल करण्याकरतां ऐपतदार स्नेह्यांच्या दारांशीं जाऊन त्यांस पुस्तक विकत घेण्याबद्दल आळ-वावें ही नामोशीची गोष्ट करण्यास कोणाला हुरूप असणार ? पण दैव-योगानें गणेश महादेव आणि कंपनीचे उत्साही मालक रा. वीरकर ह्यांनीं पुस्तक प्रसिद्धीची जबाबदारी पतकरल्यामुळें मनांत योजिलेल्या कार्याला व्यक्त स्वरूप देतां आलें. रा. वीरकर यांनीं छपाईचें काम वक्तशीर व उत्कृष्ट करून दिल्यामुळें त्यांचे आभार मानणें हें माझें आद्य कर्तव्य आहे.

ह्या पुस्तकांतील बहुतेक लेख ग्रंथमाला, विश्ववृत्त व विविधज्ञान-विस्तार ह्या मासिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत. फलज्योतिषावरील निबंध लोकशिक्षणांत प्रसिद्ध झाला असून वैदिकधर्मावरील चार लेख धर्मजागृति मासिकांत प्रसिद्ध झाले. बाकीच्यापैकीं अनुक्रमें १ ते ४, ६–७ व १४ ते १७हे लेख ग्रन्थमाला विश्ववृत्त ह्या मासिकांत येऊन गेले आहेत. ह्याशिवाय जे राहिले ते सर्व विविधज्ञानविस्तारांत प्रसिद्ध करण्यांत आले होते.

मासिकांतील माझा पहिला लेख " शिकवावें कसें " हाच होय. ह्या लेखसमूहांत वैदिक धर्मावर ४, चलनविषयक ५, परीक्षणात्मक ५ व बाकीचे इतर विषयांवर आहेत. लेखांच्या योग्यतेविषयीं अर्थातच निःपक्षपातानें अभिप्राय देणें मला शक्य नाहीं. त्याचा निर्णय वाचकांवरच सोंपविणें जरूर आहे. तथापि चलनविषयक निबंध त्या विषयांतील विद्या-र्थ्यांना अंशतः तरी उपयुक्त होतील असा भरंवसा वाटतो. त्याचप्रमाणें, आठवर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले वैदिकधर्मावरील लेख हिंदुसमाजघटनेचा विचार करणाऱ्या धुरीणांना सध्यां बऱ्याच अंशानें उपकारक होतील अशी

माझी खात्री आहे. ह्या लेखांत निर्दिष्ट केलेलीं मतें अश्रुतपूर्व असावींत असें वाटतें. निदान बुद्धिपुरःसर तरी मी ह्या लेखांनीं निव्वळ प्रतिध्वनि काढलेला नाहीं. आमच्या आचारांना स्मृतिप्रामाण्य नसून सदाचार हाच प्रमाण आहे हें ह्या निबंधांत सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. बाकीच्या निबंधांबद्दल विशेष लिहिण्याचें कारण नाहीं.

हे निबंध प्रसिद्ध करतांना मला कै. रा. विनायक कोंडदेव ओक यांचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. विद्यार्थी म्हणून माझ्यावर त्यांचा लोभ असे व माझें लहानपणापासून त्यांच्याकडे जाणें असे. त्यामुळें लेखन व्यवसायाचें प्रोत्साहन मला त्यांच्याकडून मिळालें. ह्या गोष्टीचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें हाच एक त्यांच्या ऋणांतून अंशतः मुक्त होण्याचा अल्पसा मार्ग आहे. मनुष्य जात्या अनुकरणशील आहे. म्हणून विद्यार्थीदशेंत अनुकरणीय माणसांशीं निकट संबंध घडल्यास इष्ट परिणाम झाल्याशिवाय रहात नाहीं. असो.

मराठीमध्यें निरनिराळ्या विषयांवर स्वतंत्र मोठी ग्रंथरचना खरोखर व्हावयास पाहिजे. पण अशा ग्रंथरचनेला अवश्य अशा फुरसुतीच्या अभावीं निबंधवजा लेखच सध्यांच्या परिस्थितींत प्रसिद्ध होणें अपरिहार्य आहे. परिस्थिती झपाट्यानें बदलत चालली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. विश्वविद्यालयाचे पदवीधर मराठींत लिहूं लागले आहेत. सरकारी नोकरीचीं बंधनें ज्यांना नाहींत असेही बरेच पदवीधर ह्यांपैकीं आहेत; विश्वविद्यालयांत मराठीला ठाव मिळाला आहे तेव्हां आतां विस्तृत व भरीव ग्रंथरचना प्रसवण्याची आशा करण्यास जागा झाली आहे. प्रस्तुत पुस्तक मात्र निरनिराळ्या विषयांवरील लेखांची खिचडीच आहे. ती मराठी वाचक वर्गाला रुचकर लागो म्हणजे झालें. अठरा धान्यांच्या ह्या कडबोळ्याचा निदान एवढा तरी फायदा असतो कीं, त्याचा अव्हेर सर्वस्वीं होत नाहीं. विद्यार्थी, सामान्य वाचक, प्राचीन विद्याभ्यासक ह्यांपैकीं कोणाच्या तरी अभिरुचीला ह्या पुस्तकांतील निबंध पात्र होण्याचा संभव आहे. सारांश, तरुण होतकरू मंडळीला यत्किंचितही ह्या पुस्तकापासून फायदा झाला तरी सुध्दां छपाई व्यर्थ गेली नाहीं असें समाधान मानून घेतां येईल.

ठाणें,
ता. २२।७।१९२४

ना. गो. चापेकर.

श्रीमंत सौ. गं. बं. वाचनालय, मीरज

श्री० ना. गो. चापेकर यांचे

# निवडक लेख

ग ६५
१२०२

## १ शिकवावें कसें ?

कोणत्याही राष्ट्राच्या चिरस्थायी वैभववृद्धीस शिक्षण मुख्यतः कारणीभूत आहे, हें निर्विवाद आहे. नैतिक, शारीरिक औद्योगिक वगैरे बाबतींत प्रगति होण्यास शिक्षण हेंच उत्कृष्ट व मुख्य साधन आहे. शिक्षणप्रसार जेथें सार्वत्रिक झाला आहे, तेथें अनीति, निःसत्वता, आळस वगैरे मनुष्यास रानटी स्थितींत ठेवणाऱ्या दुर्गुणसमुच्चयाचा लोप झालाच पाहिजे. ज्याप्रमाणें सूर्योदय होतांच दृष्टिभंजक तिमिराचा नायनाट आपोआप होतो, व त्याबरोबरच प्रकाश व आनंद सर्वत्र पसरला जातो; त्याप्रमाणें शिक्षणागमाबरोबर राष्ट्राची दुःस्थिति जाऊन उन्नतिकारक गुणांचा त्या ठिकाणीं प्रादुर्भाव होतो. युरोपच्या इतिहासाकडे पाहतां स्पष्ट दिसतें कीं, शिक्षणप्रसाराबरोबर त्या खंडाचें पाऊल प्रत्येक बाबतींत पुढें पडत चाललें आहे. तेव्हां राष्ट्राच्या भरभराटीचें मूळ शिक्षणांत आहे हें उघड आहे. जलावांचून नौका चालणें जसें अशक्य-तसें शिक्षणावांचून राष्ट्राची ऊर्जितावस्था करण्याचे प्रयत्न केवळ अशक्य म्हणून निष्फळ होत. ह्याप्रमाणें, राष्ट्राचें केवळ जीवित असणाऱ्या शिक्षणाचा प्रसार सर्वत्र झाला पाहिजे. पण तेवढ्यानेंही काम भागणार नाहीं. शेतांत भरमसाट बीं टाकल्यानें जसें उत्तम धान्य पिकत नाहीं, तसेंच मूर्खपणाच्या शिक्षणपद्धतीचा अंगीकार केल्यानें शिक्षणाचे इष्ट परिणाम घडून येणार नाहींत. हल्लीं प्रचारांत असलेली आमच्या इकडील शिक्षणपद्धति इतकी दोषयुक्त आहे कीं, त्यासंबंधानें ज्यानें विचार केला असेल, त्यासच त्या सदोष पद्धतीची यथार्थ कल्पना करतां येईल.

प्राथमिक शिक्षणाचा बोजा सरकारानें म्युनिसिपालिट्यांवर टाकला आहे व इतर शिक्षणसंबंधानेंही सरकारचा कल आपल्या शिरावरील जबाबदारी संधि साधेल तशी कमी करण्याचा आहे. ह्यामुळें, त्या विषयाचा विचार करणें आपलें काम आहे. स्वतःच्या खिशांतून खर्चाकरितां पैसे काढून देणारा यजमान, त्या पैशाचें पुढें काय झालें, हें जर न पाहील, तर त्याच्या अकलेची कल्पना आपण काय करूं ? सार्वजनिक गोष्टींतही तोच नियम लागूं पडतो. सरकार परकी व परधर्मी असल्याकारणानें आपल्या मुलांच्या सुशिक्षणाविषयीं जिव्हाळ्याची कळकळ बाळगील, असें संभवत नाहीं. तशी कळकळ असणें मनुष्यस्वभावाविरुद्ध आहे. सरकारच्या हातून जेवढें होणें शक्य आहे, तेवढें सरकारानें जेमतेम केलें आहे; आपण मात्र ह्या कामांत लज्जास्पद हलगर्जीपणा दाखवीत आहों. सर्वांत जें अतिशय महत्वाचें काम त्याची आपण मुळींच परवा करीत नाहीं. गृहकृत्यांत यजमानास विशेष लक्ष देण्याचें प्रयोजन नाहीं अशा गोष्टींत मुलांचें शिक्षण मोडतें, असा आमचा समज आहे. कित्येक ईश्वराचे लाल असे असतात कीं, आपल्या चिरंजीवाचें अध्ययन कोणतें व कोठपर्यंत चाललें आहे, ह्याची त्यास चंद्रावरील मनुष्याइतकीच माहिती असते. अशा स्थितींत आमचीं मुलें सुशिक्षित निपजलीं नाहींत तर त्यांत बिलकुल आश्चर्य नाहीं. लहान अर्भकांस शाळेंत पाठविणें तें घरची गडबड टाळण्याकरितां होय, हा जेथें समज, तेथें हल्लींच्यापेक्षां निराळे परिणाम कसे अनुभवास येणार ? आम्हीं आज मितीस शाळाखात्याकडे जो पैसा खर्च करतों, तो आपल्या मुलांस ज्ञानसंपन्न करावयाच्या सुबुद्धीनें करीत नाहीं. त्याची आपणांस कल्पनाही नाहीं. तर कांहीं ठिकाणीं सरकारानें आपल्या शिरावर तें काम लादलें आहे, म्हणून करतों व कांहीं ठिकाणीं स्वोदरपोषणाचा मार्ग म्हणून करतों. इतक्या क्षुद्र हेतूनें केलेल्या कृतीचें फल आपणांस मधुर कसें लागावें ? हल्लींच्या शिक्षणपद्धतीचा अनुभव आपणांस स्पष्ट येतो आहे कीं, तिच्या योगानें मुलांची नैसर्गिक बुद्धि तीव्र न होतां, उलट मंद होते; ज्ञानतृष्णा शिथिल होऊन विचारशक्तीचा ऱ्हास होतो; निरुत्साह व नेमळेपणा आपला पगडा त्याच्यावर बसवतात; शोधक बुद्धि व चौकसपणा त्यास अजी सोडून देतात; स्वदेशप्रीति, स्वधर्मनिष्ठा, नैतिक धैर्य, सहिष्णुता इत्यादि प्रशंसनीय व देशोन्नतिकारक गुणांची त्यांस ओळखहि राहत नाहीं.

ह्या सर्वांचें कारण मागें सांगितल्याप्रमाणें आपण आपल्या मुलांना खरें शिक्षण देण्याच्या हेतूनें शिकवीत नाहीं हेंच होय. इतर गुणसमुच्चयाविषयीं राहो. अर्वाचीन शिक्षणपद्धतीपासून ज्ञानार्जनतृष्णा लुप्तप्राय होऊन ज्ञान-विकास जर होत नाहीं, तर तीस शिक्षणपद्धति म्हणण्यापेक्षां अज्ञानपद्धति म्हणणें जास्त शोभेल ह्यांत संदेह नाहीं. सूक्ष्मावलोकन करण्याची ज्याला सवय असेल, त्याच्या पाहण्यांत अशीं पुष्कळ उदाहरणें आलीं असतील कीं, शिक्षणक्रमाच्या प्रारंभीं मुलाची जी तीव्रता व बुद्धिमत्ता दिसून येते ती पुढें पुढें अगदीं नाहींशी होऊन साधारण प्रतीच्या मुलांत तो मोडूं लागतो. हा जबरदस्त विपर्यास होण्यास त्याची शिक्षणपद्धति कारण होते. असें कां व्हावें ह्या प्रश्नाचें उत्तर स्पष्ट आहे. आपल्या शाळा, शिक्षणालयें आपण मानतों ही आपली चूक आहे. ह्या शाळांतील अध्यापकवर्ग शिष्यवृंदास शिक्षण देण्याचें काम क्वचितच करीत असतो. एवढ्या मोठ्या जबाबदारीचें, महत्त्वाचें, व अति श्रेष्ठ काम घरांतील अशिक्षित, विचारहीन व ज्ञानशून्य माणसांवर पडतें आणि वारंवार तर बहुतेक प्रसंगीं गुरुशिष्यांचीं दोन्हीं कामें शिष्यालाच उरकून द्यावीं लागतात. गुरूचें काम म्हणजे नेमलेला पाठ मुलांनीं घरीं बरोबर तयार केला आहे किंवा नाहीं हें पहाण्याचें आहे, असाच सर्वत्र समज आढळतो. निदान क्रिया तरी तशी दिसते. गुरूच्या अत्युच्च पदापासून भ्रष्ट झालेल्या अर्वाचीन मास्तरांची योग्यता, काम करून घेणाऱ्या कामकऱ्यापेक्षां विशेष आहे असें मानण्यास कारण नाहीं. हें विधान करितांना व्यक्तिमात्रांस दोष येत नाहीं, हें उघड आहे; कारण, तो बऱ्याच अंशीं पद्धतीचा दोष आहे. तेव्हां सांप्रतची विद्याविभूषित मंडळी गुरुसाहाय्यावांचून पुस्तकाच्या मदतीनें स्वतःच्या कर्तबगारीवर तयार झाली आहे, हें ध्यानांत ठेविलें म्हणजे फर्लासद्धीवद्दल अगदींच वाईट वाटत नाहीं हें खरें आहे. तथापि गुरूचें साहाय्य न मिळाल्यानें जें नुकसान झालें असतें, तेंही पत्करलें असतें; पण ह्या पद्धतीचा मुलांत उपजत असलेल्या बुद्धीचा ऱ्हास करण्याकडे जो कल असतो तो मात्र शोचनीय आहे ह्यांत संशय नाहीं. ह्यावरून हल्लींच्या शाळांना शिक्षणालयें म्हणणें म्हणजे शब्दाचा दुरुपयोग करणें होय. तेव्हां अर्वाचीन गुरुवर्यांनीं प्रथम हें नीट लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आपलें काम, मुलांनीं घरीं बापाजवळून, पालकाकडून, अथवा शेजाऱ्यापाजाऱ्याकडून धडा सम-

जून घेतला आहे किंवा नाहीं, इतकेंच पाहण्याचें नसून आपण स्वतः शाळेंत त्यांस शिकविणें हें होय. मुलांस घरीं नवीन धडे तयार करावयास दिल्यास शिक्षकांची व शाळांची अपेक्षा ती काय राहिली ? घरी पालकाला जर मुलांकरितां कालक्षेप व श्रम करावे लागले, तर दर महिना मुलांकरितां आणखी फी खर्च करण्याचा मोबदला काय ? हल्लींच्या पद्धतीनें मुलांचें जें कांहीं थोडें बहुत शिक्षण होत असेल, तें घरीं होत असून शाळेंतील वेळ निव्वळ व्यर्थ जात असतो. मुलगा वाचावयास घरीं शिकणार; भाषांतर, अर्थ घरीं समजावून घेणार; इतिहास, भूगोल घोटघोटून तयार करून शाळेंत जाणार; आणि शिक्षक शाळेंत काय करणार ? तर हें सर्व मुलानें केलें आहे, किंवा नाहीं तें पाहणार ! ह्यास शिक्षणपद्धति हें नांव देण्यापेक्षां परीक्षणपद्धति हें नांव देणें विशेष यथार्थ होईल. ह्यासाठीं शिक्षकवर्गाचें ह्या दुष्ट पद्धतीकडे जितकें लवकर लक्ष जाईल तितकें बरें. कारण, शिक्षकाच्याऐवजीं बापाला किंवा पालकाला श्रम करावे लागतात, एवढेंच ह्यांत व्यंग आहे असें नव्हे तर शिक्षणाचा हेतूच त्यांत समूळ नाहींसा होत आहे. सिद्धांताचीं सर्व पुस्तक मुलाला पाठ येत आहेत, ह्यांत शिक्षणाचें पर्यवसान नाहीं तर मागल्या सिद्धांतावरून पुढला सिद्धांत कसा निष्पन्न होतो हें त्याच्या ज्ञानशक्तीनें त्यास समजणें फार महत्वाचें आहे. परंपरेनें ज्यास ज्ञान संपादन करतां येईल, एका मागून एक असे ज्ञानतंतू ज्यास अवगत होतील, त्यासच यथार्थ रीतीनें ज्ञानसंपादन करतां येईल. मुलास घरीं धडे तयार करावयास दिल्यानें ह्या परंपरेचा तो कधींच उपयोग करीत नाहीं. निर्वाहाचें साधन म्हणून लेखकांनीं लिहिलेलीं चोपडीं तयार असतात. त्यावरहुकूम उत्तर वठल्यावर आमचा शिक्षकवर्गही जास्त भानगडींत पडत नाहीं. ह्याचा परिणाम अर्थात् विचारशक्तीचा ऱ्हास होतो; शोधक बुद्धि पूर्णपणें मावळते; व स्मरणशक्तीवर जबरदस्त भार पडल्यानें, एकंदर शरीर लवकरच अशरीर होतें. ह्याशिवाय ज्ञानवृद्धीस ह्या पद्धतीपासून आणखी प्रतिबंध कसा होतो तो पहा. शिक्षकवर्ग मुलांस घरीं धडे तयार करावयास देत असल्यामुळें घरचा वेळ व शाळेंतील वेळ मिळून सर्व दिवसभर शाळेंत सुरू असलेल्या दुष्ट पद्धतीवांचून अन्य रीतीनें ज्ञान संपादन करण्यास मार्गच राहत नाहीं. वयाच्या सहाव्या वर्षापासून, अखेर अभ्यासक्रम पुरा होईपर्यंत म्हणजे जवळ जवळ तिसाव्या

औंध जनरल हॉस्पिटल, पुणे



वर्षापर्यंत अधें आयुष्य अधिकारीवर्गानें नेमलेल्या पोचपन्नास पुस्तकांचें अध्ययन अथवा पाठीकरण करण्यांत जर खर्च होतें, तर खऱ्या ज्ञानवृक्षाचीं अमृततुल्य फळें आम्हांस लाधलीं नाहींत तर त्यांत आश्चर्य नाहीं. शिक्षणक्रमांतील थोड्याशा पुस्तकांतच गढलेल्या अर्वाचीन पदवीधरांवर व्यवहारज्ञानशून्यत्वाचा आरोप येतो, त्याचेंही कारण हेंच आहे. अल्पवयापासून कंठशोष होईपर्यंत घोक घोक घोकणाऱ्या मुलाला पाहून कींव येते. त्या विचाऱ्यास पुस्तकाशिवाय इतर भोंवतालच्या गोष्टींचा विचार करण्यास एक क्षणभरही फुरसत मिळत नाहीं. शाळेंत जाण्याच्या पूर्वी मुलाला प्रत्येक गोष्ट समजून घेण्याची जी हौस असते, ती शाळेंत गेल्याबरोबर अस्तंगत होते. ज्ञानसीमा संकोच पावते. शाळेंतील धडे घोकणें ह्याशिवाय बाकीचें सर्व अनवश्यक आहे असा त्याचा समज होत जातो. तेव्हां हल्लींच्या शिक्षणपद्धतींत पहिली सुधारणा करणें म्हणजे शिक्षकांनीं मुलांकडून सर्व धडे शाळेंत तयार करून घेणें हें होय. ह्यापासून मुलांची तयारी चांगली होऊन तीं परीक्षेंत पास होणार नाहींत असें अविचारी मास्तरांस कदाचित् वाटेल. पण वास्तविक प्रकार निःसंशय तसा होणार नाहीं. समजा, मराठ्यांचा इतिहास शिक्षणक्रमांत नेमला आहे. हल्लींच्या पद्धतीनें तो इतिहास घरीं वाचण्यांत मुलाचा सकाळ संध्याकाळचा वेळ जातो; व शाळेंत दुपारीं मास्तरानें विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें देण्यांत जातो. ह्याच्या योगानें नेमलेल्या पुस्तकाशिवाय दुसऱ्या पुस्तकांचें अवलोकन करण्यास सवडच राहत नाहीं. परंतु शिक्षक शाळेंतच प्रथमतः समजून देण्याची तसदी घेतील, तर त्या इतिहासापैकीं, निरनिराळ्या राजपुरुषांचीं, व मुत्सद्यांचीं चरित्रें, युद्धाचीं वर्णनें वगैरे वेगळ्या पुस्तकांतून वाचण्यास संधि मिळेल; आणि अशा रीतीनें शाळेंत दिलेली माहिती दृढ होईल. एकच गोष्ट एकाच पुस्तकांतून वारंवार वाचण्यापेक्षां निरनिराळ्या पुस्तकांतून वाचल्यानें चांगली ध्यानांत राहते. वाचण्यास कंटाळा न येतां हौस वाटते. निरनिराळ्या भाषेशीं मुलाचा परिचय होतो; वाचनाची संवय वृद्धिंगत होते; कमजास्त महत्वाच्या गोष्टी आपोआप लक्षांत येतात; व मुलाचें मन जास्त उल्लासित होऊन विकास पावतें.

वरील विवेचनावरून असें दिसेल कीं, हल्लींच्या अध्यापकांकडून शिष्यवृंदास वास्तविक शिक्षण मुळींच दिलें जात नाहीं. तथापि त्यांतल्या त्यांत

नाइलाजास्तव जें कांहीं शिकविलें जातें, तें शिकविण्याची पद्धति किती मूर्खपणाची, बुद्धिघातक व नष्ट असते, त्याचा विचार आतां केला पाहिजे; पण त्यापूर्वी सामान्य दोषांचा उल्लेख करणें गैरशिस्त होणार नाहीं. शिक्षकाचें पहिलें कर्तव्य हें आहे कीं, त्यांनीं, शालागृहें जितकीं मनोवेधक करवतील, तितकीं करून स्वतःच्या गृहापेक्षां विद्यार्थ्यांना तीं विशेष प्रिय होतील असा प्रयत्न चालविला पाहिजे. लहान मुलांस शाळेंत जावयास जितका उत्साह वाटेल, शिकविण्यासंबंधानें त्यांच्या मनांत जितकी आस्था उत्पन्न होईल, त्या मानानें शिकविण्याची तऱ्हा स्तुत्य आहे असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाहीं. वर्गांत शिकवितांना ज्या मास्तराचा बहुतेक अध्यापनकाल आपल्या शिकण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अवधानहीन विद्यार्थ्यांला धाकदपटशा देण्यांत जातो, त्या मास्तरानें आपल्या घंट्याला कायमचा निरोप देण्यांत त्याचें व विद्यार्थिवर्गाचें हित आहे. शिकविण्याकडे मुलाचें लक्ष लावण्यास विचाऱ्या मास्तरास अंगभूत नसल्यास आगंतुक आविर्भावाची मदत घ्यावी लागते. पण त्यास असें समजत नाहीं कीं, त्यांत मुलाचा वाक नसून तो आपल्या शिकविण्याच्या पद्धतीकडेच आहे. शिकविण्याची हातोटी जर चटकदार, मनोरंजक, व ज्ञानविकासक असेल, तर शिष्यवृंदाचें लक्ष्य विषयाकडे लागलेंच पाहिजे. हें प्रमाण जर खरें असेल तर सांप्रत चालूं असलेल्या शिकवण्याच्या तऱ्हेंत मोठीच गोम आहे ह्यांत संशय नाहीं. व त्याचें कारण असें आहे कीं, शाळेंत जें कांहीं आपण शिकतों, त्याचा व्यवहारांत प्रत्यक्ष उपयोग नाहीं असा शिकणाराला भास होतो. आपल्या सभोंवतींच असलेल्या, हरघडीं आपल्या कामीं पडणाऱ्या पृथ्वीवरील नानाविध वस्तूंचा असंख्य घटनांचा खुलासा करून घेण्यास आपण शाळेंत जातों, व हेंच काय तें तेथें शिकावयाचें असा समज त्याचा कधींच केला जात नाहीं. शाळेंतील शिक्षण म्हणजे कांहीं तरी गौडबंगाल आहे. व्यवहाराशीं त्याचा अर्थाअर्थीं संबंध नाहीं, द्रव्यप्राप्तीचें साधन आणि थोडा बहुत नांवलौकिक होण्याचा मार्ग ह्याच बुद्धीनें जें शिक्षण ग्रहण केलें जातें, त्या शिक्षणाला हल्लींची पद्धतीच पूर्ण अनुकूल आहे हें स्वाभाविक आहे, अशा शिकण्यास घोकण्यास सुलभ पडेल, अशा चोपड्यांची चांगलीच मदत व्हावी व तीं वापरण्यास मास्तरांनीं मुलांस ताकीद द्यावी, ह्यांतही नवल नाहीं. वास्तविक पाहिलें असतां

श्रीमंत सौ. पं. [illegible] सयाजीराव [illegible]


शिकवणारानें मुलांच्या हातांत पुस्तकें कधींही देऊं नयेत. कोणताही नवीन विषय पुस्तकावरून तयार करण्यास त्यांस सांगूं नये. गुरुमुखांतून प्रत्येक गोष्ट समजून घेण्याची पूर्वींची पद्धति फारच प्रशंसनीय आहे. आमच्या पंतोजींनीं पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, पुस्तकावरून शिकणें हें अप्रत्यक्ष ज्ञान संपादन करणें होय. प्रत्यक्ष ज्ञानापुढें त्याची किंमत काय होय ? आमची मास्तर मंडळी तर पुस्तकांत इतकी गढून गेलेली असते कीं, डोंगराची व्याख्या अल्पवयस्क बालकापासून घोक घोकवून घेत असतां त्यांस जरा बाहेर घेऊन जवळच असलेला डोंगर प्रत्यक्ष दाखविण्याचें त्यांच्या स्वप्नींसुद्धां येत नाहीं. ह्यामुळें मुलांचा असा विलक्षण समज बनतो कीं, पुस्तकांतील डोंगर व पृथ्वीवरील डोंगर निराळे आहेत. अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. भूक लागली असतां पिठाच्या भाकरीच्या ऐवजीं तदाकृति मृत्तिका भक्षिली असतां क्षुधानिवारण न होतां उलट जसा अनिष्ट परिणाम होईल, तसा प्रकार कांहीं अंशीं अर्वाचीन शिकविण्याच्या तऱ्हेनें होत आहे. एवढ्यासाठीं सरकारानें, म्युन्सिपालिट्यांनीं, व लोकाग्रणींनीं, आपापल्या शाळांत प्रत्यक्ष ज्ञान संपादन करण्याच्या साधनांची तजवीज करणें अगत्याचें आहे. वर सांगितलेंच आहे कीं, कोणताही नवीन विषय शिकवतांना शिक्षकानें तो पुस्तकांच्या मार्फत शिकवूं नये. आकुंचित वाक्यज्ञान मुलांस करून द्यावयाचें नाहीं. तर एकंदर विषयाचें ज्ञान द्यावयाचें आहे हें शिक्षकवर्गानें पूर्णपणें लक्षांत बाळगलें पाहिजे. श्रवणलीन शिष्यवर्गास पूर्णपणें अध्ययनविषय मुखद्वारानें स्पष्ट करून सांगितल्यानें तो मनावर उत्कृष्टपणें बिंबलाच पाहिजे. त्यामुळें पुस्तकांतील गोठलेल्या कज्जलांत कुचंबत न पडतां पवित्र व स्वच्छ अशा विषयजलांत अवगाहन करण्यास सांपडतें. पुस्तकांना प्राधान्य देणें अगदीं गैर आहे, सर्व विषयाचें योग्य परिशीलन झाल्यावर स्मरणशक्तीस सहाय्यकारक म्हणून पुस्तकांचा उपयोग करणें वाजवी होईल. विश्वविद्यालयाचे विद्वान् व सुशिक्षित आंग्ल पंडितसुद्धां विषयज्ञानापेक्षां पुस्तकवाचनाला इतकें महत्व देतात कीं, पुस्तकाबाहेर आम्हीं प्रश्न विचारीत नाहीं, असा एकेकाचा बाणा असतो. त्याचप्रमाणें, मराठी अथवा इंग्रजी शाळांची परीक्षा घेणारांससुद्धां पदोपदीं ह्या गोष्टीचा अनुभव येत असेल. 'हें पुस्तकाच्या बाहेरचें आहे' 'तें मुलांस शिकविलेलें नाहीं' हीं मास्तरांचीं ठरींव वाक्यें वारंवार त्यांच्या

कर्णरंध्रावर पडत असतात. असल्या मूर्खोंद्वाराचें मुख्य कारण असें आहे कीं, आपल्यास विषय शिकवावयाचा आहे, त्यास पुस्तक केवळ अल्पसें साधन आहे, ही गोष्ट शिक्षकवर्ग सामान्यतः विसरून जातो. येथें पुस्तक हें जें म्हटलें आहे, तें अर्थात् शाळेंत नेमलेलें पुस्तक होय. अशा तऱ्हेनें विषयाची तोंडीच माहिती करून देणाऱ्या शिक्षकास घरीं जास्त श्रम करावे लागतील, हें उघड आहे; पण तें त्याचें कर्तव्यच आहे. त्याविषयीं कुरकुर करण्यांत अर्थ नाहीं. पुस्तकांचें विवेचन चाललें असतां, येथें हें सांगणें जरूर आहे कीं, शाळाक्रमांत नेमलेलीं पुस्तकें फार वाईट आहेत अशी जी ओरड आहे, त्यांत विशेषतः अर्थ नाहीं. सांप्रतच्या पुस्तकांत सुधारणा करण्यास मुबलक सवड आहे, ह्याविषयीं कांहींच वाद नाहीं; परन्तु हल्लींच्या शिक्षणाचे दुष्ट परिणाम प्राधान्यतः त्या पुस्तकांवर लादणें अगदीं रास्त नाहीं. दुर्बलाच्या हातांत पाणीदार तरवार दिली असतां तिचा त्यास उपयोग नाहीं, त्याप्रमाणें उत्कृष्ट पुस्तकें अज्ञ शिक्षकवर्गाच्या हातांत पडलीं असूनसुद्धां त्यांचा त्यांस कांहीं एक उपयोग करतां येणार नाहीं; परंतु शिकविण्याच्या कामीं पुस्तकांना सर्व महत्त्व देणाऱ्या लोकांकडून ही चूक होत आहे. शिकविण्याच्या पद्धतींत सर्व दोष आहे व त्याचेच दुष्ट परिणाम आज मितीला आपण भोगीत आहों.

पुस्तकाच्या पलीकडे नजर न फेंकणाऱ्या आकुंचित दृष्टीच्या मास्तरांच्या शिक्षणपद्धतीचा वर उल्लेख केला. आतां निरनिराळे विषय कोणत्या रीतीनें शिकवावें ह्याचें दिग्दर्शन करूं. विद्याखात्यानें निरनिराळ्या वर्गाकरतां ज्या इयत्ता ठरविल्या आहेत त्या बऱ्याच समंजसपणानें ठरविल्या आहेत ह्यांत संशय नाहीं. पण दुर्दैवानें आमचे गुरुजी व त्यांतूनच चढलेले परीक्षक त्याप्रमाणें बिलकुल चालत नाहींत असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं; पुष्कळ मुलें पास झालेलीं पाहण्याच्या अविवेकी हांवेनें प्रत्येक गोष्ट मुलाकडून तोंडपाठ करून घेण्यांत आमचा शिक्षकवर्ग निष्णात बनला आहे. मग ते तोंडपाठ करण्यासारखे विषय असोत वा नसोत. ह्याचें प्रत्यंतर पाहणें असल्यास गणिताच्या कोष्टकाप्रमाणें इतिहासाचे पॅरे घोंकतांना मुलांस पहावें म्हणजे समजेल. गणितासारख्या दुर्बोध विषयापेक्षां भाषाविषय मुलांस लवकर समजावयास लागतो. तेव्हां प्रथम गणितापेक्षां त्या विषयाकडे विशेष लक्ष देणें योग्य आहे. व क्षणोक्षणीं, विद्यालयाच्या बाहेर त्यांचें भाषाज्ञान चाललेंच

असल्यामुळें, सुशिक्षणाचा त्यांच्यावर चांगला संस्कार होण्याचा संभव आहे. पण हल्लींच्या पद्धतीनें विपरीत परिणाम होत आहे व तसें होणें स्वाभाविक आहे. भाषा शिकवणें, म्हणजे अर्थात् निरनिराळ्या वाक्यरचनेशीं व विपुल शब्दसंग्रहाशीं मुलाचा परिचय करून देणें होय. पण तसें करतांना सुबोध व परिचित शब्दांचा अर्थ दुर्बोध व अपरिचित शब्दांनीं मुलाकडून घोंकून घेणें गैर होय. वस्तुतः पाहतां, मुलांनीं कधीं न पाहिलेल्या वस्तूचा वाचक शब्द आल्यावर त्या शब्दाचा अर्थ दुसऱ्या एका कठीण शब्दानें न सांगतां वस्तुनिदर्शन करून व्यक्त केल्यानें मुलांच्या स्मरणशक्तींतून तो कधींही जात नाहीं. शब्दार्थ म्हणजे कठीण शब्दांचा अर्थ सोप्या व परिचित शब्दानें मुलांकडूनच काढून घेतला पाहिजे. त्यांस शब्दार्थांचीं पुस्तकें घोकावयास लावण्याची अवश्यकता नाहीं. रवि शब्द जोपर्यंत अवगत नाहीं, तोंपर्यंत सूर्याचा प्रतिवाचक रवि म्हणून घोकवून घेणें चुकीचें आहे. धड्यामध्यें नवीन शब्द आला असतां वस्तुज्ञान व तद्वाचक पूर्वी गेलेला शब्द ह्यांच्या साहाय्यानें तो तितकाच ध्यानांत ठेवणें एवढेंच त्यावेळेस मुलाचें काम आहे. त्याचप्रमाणें शब्दाची व्युत्पत्ति, एकाच शब्दाचे निरनिराळे अर्थ, त्याचा परस्पर संबंध वगैरे मुलांकडून काढून घेणें फार अगत्याचें आहे. उदाहरणार्थ, 'तरुस नूतन पल्लव फूटती' ह्यांत फुटणें ह्याचा अर्थ काय, मडकें फुटणें ह्या वाक्यांत तेंच क्रियापद कोणती क्रिया व्यक्त करतें, ह्या दोन क्रियांतील वरवर दिसणारा विरोध वास्तविक नसून दोनहीं ठिकाणचे शब्द एकाच क्रियेचे व्यंजक कसे आहेत, वगैरे गोष्टी आपण न सांगतां मुलांकडूनच काढून घेतल्यानें विषय किती मनोवेधक होईल हें सांगावयास नको. भाषेशीं व्याकरणाचा निकट संबंध असल्यामुळें, तेंही अशाच रीतीनें शिकविणें जरूर आहे. विशेषणनामादिकांच्या व्याख्या घोकून घेण्याच्या ऐवजीं गाय शब्द उच्चारल्याबरोबर किती व्यक्ति डोळ्यासमोर उभ्या राहतात; परंतु पाठीमागें पांढरी हें विशेषण लावल्याबरोबर गाय शब्दानें व्यक्त होत असलेल्या प्राणीवर्गातून कशी संख्या गळते हें स्पष्ट करून मुलांकडून घेतल्यावर विशेषण म्हणजे काय हें मुलांच्या मनावर दृढपणें बिंबलेंच पाहिजे. त्याचप्रमाणें, विशेषणावरून नामाची कल्पना कशी आपोआप उत्पन्न होते, ती व्यक्त करण्यास भाषेंत काय साधन आहे, नामाचीं

विशेषणें कशीं होतात, क्रियापदांचीं नामें कशीं होतात इत्यादि प्रकार पुस्तकाच्या साहाय्यावांचून मुलांना सांगतां येतील असा प्रयत्न मास्तरांनीं केला पाहिजे. दुसरी एक गोष्ट हल्लीं दुर्लक्ष्य केली जाते, ती ही कीं, नवीन शब्द आल्याबरोबर तद्वाचक वस्तूची संपूर्ण माहिती देण्याचा तादृश प्रयत्न कधीं कोणीही शिक्षक करीत नाहीं. शब्दज्ञानाबरोबर तद्व्यंजक पदार्थाचें ज्ञान मुलांस त्यांच्या शक्तीच्या मानानें करून देणें अवश्य आहे; परंतु आश्चर्य आहे कीं, वारंवार उच्चारल्या जाणाऱ्या शब्दांनीं दर्शित पदार्थाविषयीं पूर्ण अज्ञान असतां भूमितीसारखे गहन विषय मुलांवर लादले जातात. कोणताही विषय शिकवावयाचा म्हणजे त्या विषयांत थोड्याशा मदतीनें मुलाची स्वतः गति चालेल इतकी त्याची योग्यता आली पाहिजे. घराहून सिद्धांत तयार करून आणण्यास सांगण्यापेक्षां मागच्या सिद्धांताच्या आधारें पुढला सिद्धांत कसा सिद्ध होतो, हें एकामागून एक प्रश्न विचारून मुलांकडून शाळेंत तो सिद्धांत सिद्ध करून घेण्याचा प्रयत्न जर शिक्षकवर्ग करील, तर मुलांच्या बुद्धीचा विकास झाल्याशिवाय राहणार नाहीं; परंतु हल्लींच्या पद्धतीनें युक्लिडचीं पुस्तकांवर पुस्तकें तयार करणाऱ्या सिद्धांतपटु मुलांची योग्यता गुळाच्या गोणी वाहणाऱ्या भारवाहकांपेक्षां तिळभरही जास्त नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें, इतिहासाचे पॅरे मुलांकडून घोकून घेणाऱ्या मास्तरांच्या तद्विषयक अज्ञानाविषयीं फार आश्चर्य वाटतें. परंतु छात्रवर्गाच्या दुर्दैवानें असल्या मास्तरांचीच विद्यालयांत फार दाटी झाली आहे. इतिहासाचें खरें स्वरूप समजण्यास समाजशास्त्राची बरीच माहिती असणें जरूर आहे. समाज म्हणजे काय, राजा व प्रजा हा संबंध कसा अद्भूत झाला इत्यादि समाजशास्त्रांतल्या नियमांची ओळख असल्याविना इतिहासाचें रहस्य कळणें अशक्य आहे. पूर्वीच्या लोक्यांच्या रीतिभाती, त्यांचा ज्ञानसंचय, त्यांच्या उत्कर्षापकर्षाचीं कारणें वगैरे माहिती इतिहासापासूनच मिळाली पाहिजे; पण चमत्कार हा कीं, परीक्षकांच्या प्रश्नयादींत असल्या प्रश्नांना बिलकूल थारा मिळत नाहीं. तारखा आणि लढायांचीं वर्णनें हे ठराविक प्रश्न होत. जणूं काय मुलांना निष्णात शिपाई किंवा सेनाधिपति बनविण्याचा विद्याखात्याचा बेत आहे. लढायांच्या वर्णनाचा सामान्य लोकांस कांहीं उपयोग नाहीं. करितां त्यासंबंधाचीं निराळींच पुस्तकें

कृपया पुस्तके खराब करू नका


झाल्यास बरें. लढाई उद्भवण्याचीं कारणें, ती केव्हां व कोठें झाली, शेवट काय झाला, व जयापजयाचीं कारणें, इतक्याच गोष्टी इतिहासांत सांगितलेल्या असाव्या. बाकी कायदेकानू, राज्यव्यवस्था, रीतिभाती, धर्म, आचार, विद्या, लोकस्वभाव वगैरे गोष्टींनीं तो भरलेला असावा. ह्या दृष्टीनें हल्लींचे इतिहास गचाळ ठरतात. आतां कोणताहि विषय शिकवितांना शिक्षकानें प्रथम पुस्तकांचा उपयोग करूं नये, हें मागें सांगितलेंच आहे. तोच नियम इतिहासासहि लागू आहे. लहान मुलांस तर निःसंशय गोष्टीच्या रूपानें शिक्षकानें इतिहासाची माहिती करून द्यावी. त्याचप्रमाणें, नकाशावरून इतिहास शिकविणें, कसें शक्य आहे ह्याची तर कल्पनासुद्धां कोणास होत नाहीं; अथवा हल्लींच्या विशालबुद्धि मास्तरांस त्याची अवश्यकता भासत नसल्यास कोण जाणे ! ज्या गोष्टी शिकण्याची तादृश गरज नाहीं, त्यासाठीं हल्लीं उरस्फोड केली जाते, व ज्या शिकणें अत्यंत अवश्य आहे, त्या कोणी शिकवीत नाहीं, असा प्रकार सर्वत्र चालू आहे. दक्षिणेंत राहणाऱ्या बाजीराव पेशव्याचा, शिंदे, होळकर, गायकवाड ह्या सरदारांस उत्तर हिंदुस्थानांत जहागिरी देण्याचा उद्देश दिल्लीच्या पातशहाच्या स्वैरगतीस प्रतिबंध करण्याचा होता, हें आमच्या मुलांच्या लक्षांत आणून देण्याचें कोणत्याही मास्तराच्या स्वप्नीं देखील येत नाहीं. पेशव्यानें गायकवाडास गुजराथेंत मुलूख दिला इतकें घोंकून घेणें मास्तरांस पुरेसें वाटतें. मग घोकणाऱ्या मुलास गुजराथ कोठें आहे हें माहीत नसलें तरी चालतें. महमद तघलखानें एक राजधानी बदलून दुसरी केली इतका तो वेडा होता, इतकें मुलांनीं ध्यानांत ठेविलें म्हणजे त्यांस परीक्षेंत भरपूर मार्क मिळण्यास अडचण पडत नाहीं. परंतु राजधानी बदलणें हें वेडेपणाचें कृत्य कसें ठरतें हें मुलांस माहीत असलें पाहिजे. ही इच्छा मास्तरांचीही नसते व परीक्षकांचीही नसते. ध्यानांत ठेवण्याच्या गोष्टींचें कारण जर मुलास समजेल तर ती गोष्ट त्याच्या चटकन ध्यानांत राहते, बुद्धि विकासित होते, विषय मनोवेधक होतो, आणि ज्ञानतृष्णा जागृत होते. खालील लढायांच्या तारखा ल्याहा, म्हणून निर्लज्जपणें प्रश्न विचारणाऱ्या विद्वान् परीक्षकांच्या मूर्खपणाचें प्रत्यंतर आणखी काय पाहिजे? प्रत्येक गोष्टीचें महत्व आहे हें आम्ही जाणून आहों. आणि तें महत्व मुलांस समजून द्यावें हाच आमचा आग्रह आहे. असें महत्व समजून तारखा ध्यानांत

ठेवण्यास आमची हरकत नाहीं. एका कालांत दुसऱ्या कालापेक्षां लढाया विशेष झाल्या, तर त्या दोन कालांत राज्याची अन्तर्गत स्थिति कशी होती; ज्या तारखेस एक लढाई झाली त्याच तारखेस दुसरें महत्वाचें राज्यकारस्थान पाठीमागें असतां तें कसें तडीस गेलें, वगैरे गोष्टी समजण्याकरितां तारखांचाही उपयोग होईल. इतिहासासंबंधीं जें सांगितलें तेंच भूगोलाविषयीं. घरीं पुस्तकांतून पाठ करण्यास न देतांना नकाशावरून शिक्षकानें शिकविणें जरूरीचें आहे. सामुद्रधुनी, भूशिर वगैरेचा प्रथम पदशः अर्थ सांगून शिक्षकानें मुलांस नकाशावरतीं तीं ओळखण्यास सांगावें. मग नकाशावर नांवें मुलांस वाचण्यास सांगून नद्या, पर्वत, बेटें, शहरें, प्रांत, संयोगीभूमि इत्यादि सर्वांची माहिती मुलांस करून द्यावी. अशा रीतीनें शिकवलें असतां सामुद्रधुनी दाखव म्हणून विचारलें तर संयोगीभूमीकडे मुलाचा हात धांवणार नाहीं. विचार करण्याची संवय आमच्यांतून इतकी नाहींशी झाली आहे कीं, अति दूरच्याही तिबेटांतील सरोवरें घोकतांना मुलांना आम्हीं मोठ्या आनंदानें पाहतों व त्यांस उत्तेजन देतों. निरनिराळ्या देशांतील भूशिरें, संयोगीभूमी, सामुद्रधुनी, ह्यांचीं नांवें घेऊन काय नफा आहे, हें एका विद्याखात्यालाच माहीत. ज्या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत त्यांची कोणीच परवा करीत नाहीं. सनद देशांत नदीहीन देशापेक्षां उत्पन्नाची सोय, पर्वत उंच व पुष्कळ असल्यानें हवेवर होणारे परिणाम, कोणत्या देशांत कोणते पदार्थ उत्पन्न होतात, व ते तेथेंच होण्याचें कारण निरनिराळ्या देशांत जाण्यायेण्याचे मार्ग इत्यादि माहिती देण्याची कोणी तसदीही घेत नाहीं. एकंदरींत पद्धतवार शिकवण्याची आम्हांला संवयच नाहीं. इंग्रजी शिकण्यास आरंभ करतांच पहिला धडा घरीं पाठ करून येण्यास मुलांस मास्तरानें सांगितलेंच. पण अक्षराची ओळख प्रथम करून देऊन त्यांचे उच्चार सांगून मग निरनिराळीं अक्षरें एके ठिकाणीं करून त्यांच्यापासून होणाऱ्या शब्दांचे उच्चार मुलांकडून करवून घेणें ह्या कामीं जर शिक्षकांनीं पहिले ८।१५ दिवस खर्च केले, तर कोणत्याही शब्दाचा उच्चार करण्याची मुलांची अडचण बरीच नाहींशी होईल.

इंग्रजी भाषेंतून प्रत्येक विषय हायस्कुलांत शिकवला जातो, ह्यामुळें, पूर्ण ज्ञानसंपादनास चांगलाच प्रतिबंध होतो. ज्या मुलांना साधे विचारही

इंग्रजींतून प्रदर्शित करण्याची मारामार, त्यांस त्या परकी भाषेंत लिहिलेल्या राष्ट्राच्या नानाविध चळवळींचा इतिहास वाचावयास लावणें फारच वाईट आहे. इतिहास वाचतांना मुलांचा सर्व रोख इंग्रजी शब्द व वाक्यें ध्यानांत ठेवण्याकडे असतो. कोणताही विषय शिकतांना त्याच विषयाकडे एकाग्र चित्त लागलें पाहिजे, मध्यें व्यत्यय येत असेल तर एकाग्रता राहणार नाहीं. उत्तरें इंग्रेजींत लिहिणें भाग असल्यामुळें, इंग्लिश वाक्यरचना लक्षांत ठेवण्यांत प्राधान्यतः मुलाचे परिश्रम चालले असतात. परंतु वाक्यांतर्गत अर्थाकडे अथवा इतिहासाचें रहस्य जाणण्याकडे, त्याच्या हातून सर्वथा दुर्लक्ष होत असतें. एक विषय शिकत असतां मानसिक शक्तीचा व्यय दुसऱ्याकडे करणें जर अवश्य असेल तर तद्विषयज्ञानार्जनांत न्यूनता आलीच पाहिजे. एकाच वेळीं, दोन गोष्टींकडे सारख्याच परिणामानें लक्ष राखणें अशक्य आहे. म्हणून प्रत्येक विषय इंग्रेजींतून शिकाविण्याची चालू वहिवाट खऱ्या व पूर्ण ज्ञानवृद्धीस व्यत्ययकारक होत आहे. परंतु लहान मुलांच्या शिक्षणाचा पतकर घेणाऱ्या मंडळीच्या ध्यानांत ही गोष्ट येत नाहीं, हें दुर्दैव आहे. त्या कामांत सरकारावर अवलंबून राहण्याची गरज नाहीं. खासगी शाळांच्या हातून ही गोष्ट सहज होण्यासारखी आहे. पण उपजीविकेचें साधन म्हणूनच केवळ अंगीकारलेल्या व्यवसायांत सुधारणेची कल्पना कोठून येणार ? सर्व विषय मराठींत शिकविले असतां, हल्लींपेक्षां पुष्कळ वेळ कमी लागेल. प्रवेशपरीक्षेचे सर्व विषय सहावें इयत्तेंत पुरे होतील. व पुढें वर्ष किंवा दीडवर्ष अनुभवांतीं ठरेल त्याप्रमाणें तेच विषय पुनः इंग्रजींतून शिकविलें असतां प्रवेशपरीक्षेच्या प्रश्नांचीं उत्तरें इंग्रजींत देण्यास मुलांस अवघड जाणार नाहीं. ह्या प्रमाणें विश्वविद्यालयाच्या परीक्षेसंबंधीं असलेल्या अटी पाळून आपलें काम होईल. पण हें व्हावें कसें ? खासगी शाळा दर वर्षास नवीन नवीन अस्तित्वांत येत आहेत. पण जुना कित्ता—तोहि गचाळ रीतीनें—गिरविण्यापलीकडे त्यांच्या हातून कांहीं होत नाहीं. आणि ह्याचें कारण इतकेंच कीं, विद्यमान पद्धतींतील दोष काढून टाकण्याच्या सद्बुद्धीनें एकही संस्था निघालेली नाहीं. लॉन्टेनिस अथवा क्रिकेट ग्राउंडची आवश्यकता ज्या संस्थाधिपतींस जाज्वल्य भासते, त्यांस नानाविधवृक्षप्रचुर उद्यानिका शाळेसभोंवतीं करून, तत्संबंधीं मुलांस सज्ञान करणें जरूर वाटत नाहीं हें विस्मयकारक आहे. सारांश,

विद्यार्थिवर्गांत प्रत्यक्ष व अनुभविक ज्ञान प्राप्त करून देण्याची तरतूद प्रत्येक विद्यागृहांत झाली पाहिजे. सृष्टिवैचित्र्य, नैसर्गिक चमत्कार—निदान आसपासचे तरी—मुलांस दाखवून त्यांची ज्ञानतृष्णा वाढविणें हें खऱ्या शिक्षणक्रमांत कां येऊं नये? परीक्षेकरितां मुलें तयार करणें हीच आपली इतिकर्तव्यता न समजतां विस्तीर्ण ज्ञानाशयाशीं त्यांचा परिचय करून देणें हा मुख्य उद्देश जर शिक्षकांच्या मनांत ठसेल तर, मुलांच्या ज्ञानार्जनांत हल्लींपेक्षां विशेष सुधारणा दृग्गोचर झाल्याविना राहणार नाहीं. इंग्लिश धर्तीवर अलीकडे बोर्डिंगांचीही इकडे सुरवात झाली आहे. पण त्यापासून मुलांच्या खाण्यापिण्याच्या सोयीपलीकडे महत्वाचा फायदा मुलांस करून देतां येईल ह्या गोष्टीकडे आमचें लक्ष जात नाहीं. गुरुसंनिध छात्रवर्ग असतां फुरसुतींअंतीं गुरूंस निरनिराळ्या अवांतर विषयांची माहिती, साध्या व सोप्या शब्दांनीं व्याख्यानद्वारा मुलांस करून देण्यास उत्कृष्ट संधि मिळते; निरनिराळ्या पुस्तकांतून काढलेल्या निवडक कथांच्या कथनानें, मुलांची नीतिमत्ता वाढवितां येते; मनें सुसंस्कृत करतां येतात; दृढनिश्चय, स्वार्थत्याग इत्यादि उच्च गुणांचा विकास करतां येतो; व अशा रीतीनें पुढें राष्ट्रधू वाहण्यास मुलें सर्वथैव पात्र होतात. पण सांप्रतच्या पद्धतीनें ही भोजनभाऊ मंडळी, आलस्य, अनिश्चय, मतशून्यता इत्यादि दुर्गुणांनीं मात्र गुरफटून बाहेर पडतें.

सारांश, पुस्तकज्ञान मुलांस करून देण्यापेक्षां विषयज्ञान करून देणें अगत्याचें आहे, हें शिक्षकवर्गानें मनांत बाळगणें; शिकवितांना पुस्तकांचा उपयोग मुलांकडून न करविता व्याख्यान अथवा संभाषणद्वारा तो त्यांस समजविणें; मुलांची जिज्ञासा वाढेल अशा रीतीनें प्रत्यक्ष व अनुभविकज्ञान त्यांच्याकडून करविणें; पांचव्या सहाव्या इंग्रजी इयत्तेपर्यंत सर्व विषय मराठींतून शिकविणें; मुलांमध्यें सात्विक गुण येतील असा प्रयत्न करणें; इत्यादि गोष्टी वरील छोट्याशा निबंधांत आणल्या आहेत, त्यांचा जर शिक्षकवर्ग उपयोग करील, तर भावी प्रजेवर त्यांचे अनंत उपकार होणार आहेत.

# २ रामायण

## समाजस्थिति

आजकाल सर्वत्र असा समज झालेला आढळतो कीं, सांप्रतच्या अमलाखालीं हिंदुसमाज जितका सुखी, निर्भय, व्यसनपराङ्मुख, शिक्षणसंपन्न व आनंदी आहे इतका पूर्वीं कधींहि नव्हता. परंतु, मुसलमानी रियासतीच्या पूर्वीचा व प्राचीन कालचा हिंदुसमाज ह्यांची जी कांहीं माहिती उपलब्ध आहे तिच्यावरून वरील विधानांत सत्याचा अंश फारच थोडा आहे असें दिसून येईल. कवीची जर केवळ मानसिक उभारणी नसेल तर रामायणकालीन समाजाची स्थिति आमच्याहून फारच सुखावह असली पाहिजे ह्यांत संदेह नाहीं. समाजघटनेचा मुख्य उद्देश त्यांतील व्यक्तीला शक्य असेल तेवढें सुख लाधणें हा होय, आणि हें सुख ज्या समाजांत मिळत असेल तो समाज पूर्णावस्थेला पोंचला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोसल देशाची राजधानी जी अयोध्या तिचें वर्णन जें रामायणांत केलें आहे त्यावरून तत्कालीन सुधारणेची मजल किती गेली होती ह्याची कल्पना होईल. ही नगरी बारा योजने लांब आणि तीन योजने रुंद असून शहरांतील रस्ते विपुल व प्रशस्त होते. रस्त्यांवर हल्लींप्रमाणें प्रत्यहीं पाणी शिंपडीत असत व दिवे लावीत असत. आतां हे रस्ते साधे होते अथवा हल्लींप्रमाणें सडका होत्या हें रामायणावरून खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. तथापि, घोड्यांच्या गाड्या त्यावेळीं चालत होत्या ह्यावरून व राम वनवासास गेल्यावर त्याला भेटण्याकरितां सर्व सैन्य व मोठा परिवार घेऊन जाण्याची तयारी केली तेव्हां पुढें मार्ग करण्याकरितां सूत्रकार, पाषाणभेदक, पूल बांधणारे वगैरे हजारों लोक पाठवून "ससुधाकुट्टिमतलपन्थाः" बनविला. त्यावरून सडकाही असतील असें अनुमान करण्यास थोडीशी जागा आहे. निरनिराळे प्रदेशभाग जोडणारे लांब रस्ते असत;

**रस्ते.**

त्यांच्या दुतर्फा झाडें लावीत व ठिकठिकाणीं विहिरी व विश्रांतिस्थानें बांधून प्रवासीजनांचा प्रवास सुखावह होण्याची तरतूद केलेली असे.

अयोध्यानगरींतल्या राजमार्गावर दोहों बाजूस दुकानें असत व प्रत्येक दोन दुकानांत बरींच जागा सोडलेली असे. शहरांतील गृहें सात सात

**उद्यान-भूमिका.**

मजली उच्च असून शोभायमान होतीं व सायंकालीं घरोघरीं धूप, चंदन वगैरे जळून जिकडे तिकडे सुगंध होऊन जाई. त्याचप्रमाणें वधूंच्या नाटकशाला व उद्यानभूमिका सर्वत्र आढळून येत. साधारणपणें असें दिसतें कीं, प्रत्येक शहरीं उद्यानभूमिका असून तेथें स्त्रीपुरुष सायंकालीं क्रीडा करण्यास जात असत. राजनिवासस्थान असल्यामुळें अयोध्या नगरी सामंत राजांनीं व परप्रांतस्थ व्यापाऱ्यांनीं भरलेली असे. परदेशाशीं व्यापार ह्यावेळीं चालत होता किंवा नाहीं हें खास समजण्यास रामायणांत कांहीं साधन नाहीं. पण " सीदन्महति कांतारे सार्थहीन इवाध्वगः " ह्यासारख्या उपमांवरून आशियाखंडांतील अरबस्थान वगैरे परदेशांत हिंदुस्थानचे लोक त्यावेळीं व्यापाराकरितां जात असावेत असें वाटतें. देशांतल्या देशांत धंदे व कला हीं माग-सलेलीं नव्हतीं. सुतार, गवंडी, न्हावी, वेलदार, क्षेपणीय वगैरे, यन्त्रें करणारे, चित्रकार, कांचेच्या कुप्या व आरसे करणारे, कापसाचीं वस्त्रें, घोंगड्या वगैरे करणारे कारागीर, त्याचप्रमाणें ज्योतिषी, सामुद्रिक, मन्त्री, नट, नर्तक, गवयी, वाजंत्री वगैरे कलांत निपुण असणाऱ्या लोकांची तत्कालीं उणीव नव्हती. सुगंधीं द्रव्यें, धूप इत्यादि विकणारे, मणि, मोतीं यांस भोंकें पाडणारे, मद्य करणारे असे लोकही त्यावेळीं होते असें दिसून येतें. वैद्यकीचा धंदाही प्रचारांत असून तच्छास्त्रज्ञ गर्भांतील मूल शस्त्रानें कापून काढीत असत.

**धंदे**

अग्निहोत्रसंभार आणण्याकरितां शकटी व बसण्याकरितां अश्वयुक्त रथ हीं स्थलवाहनें प्रचारांत होतीं. शिवाय, दूत शीघ्रगामी अशा अश्वावर आरूढ होऊन निरोपांचीं कामें करीत असत. नदीप्रवाह तरून जाण्यास नावांची सोय असे. ह्या नावांस कर्णधार असे व गरजेप्रमाणें हव्या तितक्या नावा मिळूं शकत. रामभेटीस भरताची स्वारी निघाली त्यावेळेस पांचशें नावा गंगेंत त्याचें सैन्य व सामान नेण्यास तयार होत्या.

" ततः स्वस्तिकविज्ञेयां पांडुकम्बलसंवृताम् । सनन्दिघोषां कल्याणीं गुहो नावमुपाहरत् " ॥ ह्यांवरून असें दिसतें कीं, नावांना निरनिराळीं नांवें ठेवीत असत व वस्त्रावरणानें वगैरे बसण्यास सुखावह होईल अशी योजना केलेली असे. असो. ह्यावरून व लोखंड, शिस, सोनें, रुपें, मोलवान् वस्त्रें ह्यांचा सर्वत्र यथेच्छ उपयोग करीत असत ह्यावरून समाजाची स्थिति बरीच सुधारलेली असली पाहिजे यांत संशय नाहीं.

त्याचप्रमाणें ह्या भौतिक सुधारणेबरोबर नैतिक, धार्मिक व आत्मिक सुधारणा झालेली होती. किंबहुना पहिलीपेक्षां दुसरीचीच प्रगति विशेष झाली होती. न तेष्वहःसु श्रांतो वा क्षुधितो वा न दृश्यते । नाविद्वान्ब्राह्मणः कश्चिन्नाशतानुचरस्तथा ॥" ह्या श्लोकांत तत्कालीन समाजस्थितीचें संक्षेपानें निरूपण केलें आहे. हल्लीं विद्वान् ब्राह्मण जसा क्वचित् आढळतो तसा अविद्वान् ब्राह्मण त्याकालीं विरळा सांपडे. तत्कालीन ब्राह्मण वादकुशल, वेदशास्त्रसंपन्न, व्रतस्थ व व्यसनपराङ्मुख असत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद ह्या चारी वेदांपैकीं आपआपल्या वेदांचें ब्राह्मण अध्ययन करीत. वेदाध्ययनाचे अनध्यायदिन ठरले होते. प्रतिपदा हा एक त्यांपैकीं दिवस होय. " प्रतिपत्पाठशीलस्य विद्येव तनुतां गता "–प्रतिपदेला म्हणणाराची विद्या ज्याप्रमाणें कमी होते तद्वत्. सुरापी ब्राह्मण निघालाच तर त्याची रस्त्यावर उघड उघड निंदा होत असे. वर्णाश्रमांची व्यवस्था ठरून गेलेली होती. अन्य वर्णाचे धर्म आचरणारास महाशासन होत असे. एका शूद्रानें आपल्या वर्णाला अनुक्त अशी तपश्चर्या केल्यामुळें रामांनीं त्याचा शिरश्छेद केला. ह्या वरून वर्णधर्म पाळण्याबद्दल लोकांचा फार कटाक्ष असे असें दिसतें. रामाच्या सर्व चरित्रांत त्याला न शोभण्यासारखी अशी एवढीच गोष्ट दिसते. कदाचित् हा कथाभाग पाठीमागूनही घातला असेल असें मानण्यास जागा आहे.

**विद्याप्रसार.**

इतक्या प्राचीन काळीं सुद्धां हल्लींप्रमाणें सर्व संस्कार विधिपूर्वक होत असत. मूल जन्मल्यावर त्याची भूतविनाशिनी रक्षा व जन्मक्रियादि सर्व कर्में करून अकरा दिवस झाल्यावर त्याचें नामकरण करीत असत. ह्या कालीं स्वयंवराची फारशी चाल होती असें वाटत नाहीं. " पिता हि प्रभुरस्माकं दैवतं परमं च सः । यस्य नो दास्यति

**जन्मसंस्कार.**

पिता स नो भर्ता भविष्यति " ॥ तसेंच " प्रतिग्रहो दातृवशः श्रुतमेतन्मया पुरा " हीं वाक्यें स्वयंवराचे कल्पनेच्या विरुद्ध आहेत. लग्नविधि मन्त्रपूर्वक होत असे हें खालील रामलग्नाच्या उताऱ्यावरून सहज समजेल.

**प्रपामध्ये तु विधिवद्वेदिं कृत्वा महातपाः ॥**
**अलंचकार तां वेदिं गंधपुष्पैः समन्ततः ।**
**सुवर्णपालिकाभिश्च चित्रकुम्भैश्च साङ्कुरैः ॥**
**लाजपूर्णैश्च पात्रीभिरक्षतैरपि संस्कृतैः ।**
**दर्भैः समैः समास्तीर्य विधिवन्मन्त्रपूर्वकम् ॥**
**अग्निमाधाय तं वेद्यां विधिमन्त्रपुरस्कृतम् ।**
**जुहावाग्नौ महातेजा वसिष्ठो मुनिपुङ्गवः ॥**
**ततः सीतां समानीय सर्वाभरणभूषिताम् ।**
**समक्षमग्नेः संस्थाप्य राघवाभिमुखे तदा ॥**

नंतर ही माझी मुलगी सीता तुझी सहधर्मचारिणी हिचा तूं अंगीकार कर व आपल्या हस्तानें तिचें पाणिग्रहण कर; असें रामास म्हणून जनकराजानें आपल्या कन्येचें अर्पण केलें. पुढें वाद्यांच्या घोषा-

**लग्नविधि.** मध्यें त्रिवार अग्निप्रदक्षिणा करून राम व त्याचे अनुज ह्यांनीं आपआपल्या वधूंचा अंगीकार केला. 'त्वया सह चरिष्यामि' अशी प्रतिज्ञा लग्नसमयीं वराला वधूवरोबर करावी लागत असे. ह्या प्रतिज्ञेच्या जोरावरच वनवासकालीं सीतेनें आपणास बरोबर नेण्यास रामाला भाग पाडलें. " संश्रुतं गृह्णता पाणिं चरिष्यामीति यत्त्वया । स्मर तन्नाम काकुत्स्थ नय मामपि दुःखिताम् ॥ "

लग्नसंस्काराप्रमाणें अंत्य विधिही मन्त्रोक्त करण्यांत येत असे. प्रेत दहन करण्याची पद्धति ह्या कालीं सर्वसामान्य होती. प्रिय पुत्राच्या वियोगानें विव्हल झालेला दशरथराजा गतप्राण झाल्यावर मामाच्या घराहून भरताला आणीपर्यंत दशरथराजाचें प्रेत तेलानें भरलेल्या डोणींत ठेविलें होतें. पुढें भरत आल्यावर त्याच्याकडून प्रेतसंस्कार करण्यांत आला. शिबिकेमध्यें प्रेत घालून स्मशानभूमीवर नेत असतां पुढें मार्गांत सोनें, रुपें व नानाप्रकारचीं वस्त्रें वाटीत लोक चालले होते. चंदन, अगुरु, गुग्गुल, सरल व पद्मक झाडांचीं काष्ठें व देवदारु ह्यांची चिता बनविली होती. अशा तयार केलेल्या चितेवर ऋत्विजांनीं प्रेत ठेवून अग्नि तयार केला व यथाशास्त्र जप

केला. सामवेदी ब्राह्मणांनीं आपलीं सामस्तोत्रें म्हटलीं. नंतर दग्ध झालेल्या राजाला इतर वृद्ध लोकांवरोवर यानांत वसून आलेल्या राजपत्न्यांनीं ऋत्विजांसहित सव्य प्रदक्षिणा घालून त्या विलाप करीत करीत सरयू-नदींत भरतासह तिलांजलि देऊन नगरांत परतल्या व दहा दिवस अशौच राहिल्या. ह्याप्रमाणें सुतकाचे दहा दिवस गेल्यावर बारावे दिवशीं श्राद्ध-कर्म आटोपून तेराव्या दिवशीं अस्थिसंचयन व रक्षा टाकण्याकरितां पुन्हां

**अंत्यविधि**

श्मशानांत जाऊन भरतानें पित्याचा अंत्य विधि उरकला. ह्या उत्तरकार्यनिमित्त ब्राह्मणांना धन, धान्य, गाई त्याचप्रमाणें वाहनें, गृहें, छाग वगैरे देऊन भरतानें पुष्कळ दानधर्म केला. भरतमुखांतून दशरथराजाच्या निधनाची वार्ता ऐकिल्यावर राम-लक्ष्मणांनींही तावडतोव नदीतटाकीं जाऊन आपल्या पूज्य पित्यास पाणी दिलें. ह्याप्रमाणें और्ध्वदेहिकसंस्कार होत असे. प्रेतदहनाची चाल जरी सर्वत्र म्हणजे जटायूसारख्या पक्षिगणांत व सुग्रीववालीसारख्या कपिजातींत देखील होती तरी ज्यांना राक्षस म्हणत असत त्या राक्षसांत ही चाल सर्वत्र दिसून येत नाहीं. " अवटे चापि मां राम निक्षिप्य कुशली व्रज। रक्षसां गतसत्त्वानामेष धर्मः सनातनः ॥ " अशी रामाला विराध राक्षसाची विनंति आहे. असें जरी आहे तरी रावणाच्या प्रेताला दशरथराजाप्रमाणेंच अग्निसंस्कार घडला ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. "सददौ पावकं तस्य विधियुक्तं विभीषणः। स्नात्वा चैवार्द्रवस्त्रेण तिलान्दर्भैर्विमिश्रितान्॥" ह्याप्रमाणें जन्म, लग्न व मरणसंस्कारांविषयीं रामायणांत जें कांहीं आढळलें तें येथें नमूद केलें. तशीच त्यावेळच्या लोकांच्या दैनिक व धार्मिक आचारांवद्दलची हकीकत सांगितली पाहिजे. प्रभात कालीं उठून स्नानसंध्या जपजाप्यादि उरकून घेण्याचा तत्कालीं साधारण परिपाठ पडलेला दिसतो. पितृतर्पण करण्याची तर चाल होतीच.

**देवपूजा.**

शहरांत देवालयें असून शिवाय घरोघरींही देवतायतनें असत. व " दध्यक्षतघृतं चैव मोदकान्हविषस्तथा। लाजान्माल्यानि शुक्लानि पायसं कुसरं तथा ॥ " इत्यादि साहित्यांनीं स्त्रिया देवपूजा करीत; इतकेंच नाहीं तर त्या अभ्यस्त पुरुषांप्रमाणें प्राणायामांत सुद्धां मग्न असत. " तस्मिन्कालेऽपि कौसल्या तस्थावामीलितेक्षणा। ...प्राणायामेन पुरुषं ध्यायमाना जनार्दनम् ॥ " प्राणा-

याम करून ध्यानस्थ राहणें हें अगदीं सामान्य झालें होतें असें दिसतें; व त्याची मजल इतकी गेली होती कीं, एकचित्त करून बाह्य गोष्टी सुद्धां अन्तर्ज्ञानानें समजून घेण्याची शक्ति लोकांत आली होती. व्रतें व उपवास करणें हा तर एक दैनिक आचारभाग बनला होता. ज्या दिवशीं रामाला अभिषेक करण्याचें ठरलें होतें त्याच्या आदल्या रात्रीं त्यास सीतेसह उपवास करून नुसत्या दर्भावर निजावें लागलें. वैश्वदेव व श्राद्ध करण्याची पद्धति पडली होती. गयेस पितृश्राद्ध केलें असतां श्रेयस्कर आहे असा लोकांचा विश्वास होता व श्राद्धकालीं मांसग्रहण करण्याचा ब्राह्मण निषेध मानीत नसत. "यज्ञोपवीतवच्चैनं चिच्छेद कपिकुञ्जरः।" ह्यासारख्या वाक्यावरून यज्ञोपवीतें द्विजजाति-घालीत असे असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. नवीन घर बांधिल्यास त्याची प्रथम वास्तुशांति करीत असत. चित्रकूट पर्वतावर रामाज्ञेनें लक्ष्मणानें पर्णशाला तयार केल्यावर त्या भ्रातृद्वयानें अगोदर वास्तुशमन केलें. "ऐणेयं मांसमाहृत्य शालां यक्ष्यामहे वयम्। कर्तव्यं वास्तुशमनं सौमित्रे चिरजीविभिः॥"

**दैनिक विधि**

हिमालय व विंध्य ह्यांमधील प्रदेशास आर्यावर्त म्हणत व तोच यज्ञकर्माला प्रशस्त मानला जात असे. "स हि देशो नरव्याघ्र प्रशस्तो यज्ञकर्मणि" निरनिराळ्या प्रकारानें तप करणारे लोक ह्या कालीं किती होते ह्याची कल्पना खालील श्लोकांवरून होईल.

**यज्ञकर्म**

वैखानसा वालखिल्याः संप्रक्षाला मरीचिपाः।
अश्मकुट्टाश्च बहवः पत्राहाराश्च तापसाः॥
दन्तोलूखलिनश्चैव तथैवोन्मज्जुकाः परे।
गात्रशय्या अशय्याश्च तथैवानवकाशिकाः॥
मुनयः सलिलाहारा वायुभक्षास्तथा परे।
आकाशनिलयाश्चैव तथा स्थण्डिलशायिनः॥
तथोर्ध्ववासिनो दान्तास्तथार्द्रपटवाससः।
सजपाश्च तपोनिष्ठास्तथा पञ्चतपोन्विताः॥

ह्या कालीं यज्ञ वारंवार व बरेच होत असत व त्यांत पशुहत्याही शास्त्रोक्त म्हणून होत असे; तथापि, खालील उताऱ्यावरून लोकमत पशु-

श्रीमंत तो. मं. पं. ग्रंथालय, भोर


हत्येच्या विरुद्ध होतें असें दिसतें " निश्चेष्टानां वधो राजन्कुत्सितो जगतीपतेः । क्रतुमध्योपनीतानां पशूनामिव राघव ॥"

आतां तत्कालीन लोकांचे समज कसे होते ह्याचा थोडक्यांत उल्लेख करूं. मुलगे बापाप्रमाणें होतात व मुली आईच्या वळणावर जातात असा समज त्यावेळीं असे. " सत्यश्चात्र प्रवादोऽयं लौकिकः

**समजुती.** प्रतिभाति माम् । पितृन् समनुजायन्ते नरा मातरमङ्गनाः ॥" पण मुलगा मुलगी हा भेद न करितां एकंदर मनुष्यजातीचा विचार केला तर त्यांच्यांत पितृस्वभाव विशेष उतरतो असा ग्रह होता. " न पित्र्यमनुवर्तन्ते मातृकं द्विपदा इति । ख्यातो लोकप्रवादोऽयं भरतेनान्यथा कृतः ॥" पूर्व जन्मावर विश्वास असून त्या जन्मीं आपल्या हातून जें घडलें असेल तसेंच ह्या जन्मीं आपणांस प्राप्त होतें अशाविषयीं लोकांची खात्री असलेली दिसते. " मन्ये खलु मया पूर्वं विवत्सा बहवः कृताः । प्राणिनो हिंसिता वापि तन्माभिदमुपस्थितम् ॥ " हें पुत्रवियोगानें सुचलेले दशराथाचे उद्गार आहेत; व अशाच मासल्याचे कौसल्येचे उद्गार व सीतेचे उद्गार आहेत. कालिन्दी नदीच्या मध्यभागीं आल्यावर, इक्ष्वाकुपुरीला राम सुखरूप परत आल्यावर सहस्र गाई व शंभर सुराघट यांनीं मी तुझें यजन करीन " यक्ष्ये त्वां गोसहस्रेण सुराघटशतेन च । " असें जें सीतेनें कालिन्दीनदीची प्रार्थना करून म्हटलें त्यावरून इष्ट देवतांस नवस करीत असत असें दिसतें. " नवमासधृतं गर्भं भास्करस्य गभस्तिभिः । पीत्वा रसं समुद्राणां द्यौः प्रसूते रसायनम् ॥ " त्याचप्रमाणें " अपास्य

**नवस.** हि रसान्भौमांस्तप्त्वा च जगदंशुभिः । परेताचरितां भीमां रविराचरते दिशम् ॥ " सर्व जगाला तापवून व पृथ्वीवरील रसांचें शोषण करून गतासूंनीं भरलेल्या अज्ञानभयोत्पादक दक्षिण दिशेला सूर्य जात आहे. ह्यामध्यें शास्त्रीय ज्ञानाचा व पौराणिक कल्पनेचा उल्लेख स्पष्ट आहे. दुष्ट स्वप्नें पडलीं असतां कांहींतरी अप्रायकारक घडणार असा समज असे. दशरथराजाच्या मरणापूर्वीची हकीकत कळण्यापूर्वी भरताला अप्रिय स्वप्न पडलें होतें. " नरो यानेन यः स्वप्ने खरयुक्तेन याति हि । अचिरात्तस्य धूमाग्रं चितायां संप्रदृश्यते ।" स्वतःचें मरण ओढवलें असलें म्हणजे सोन्याची झाडें, रुधिरवाहिनी वैतरणी नदी, कण्टकयुक्त शाल्मलीवृक्ष वगैरे दिसूं लागतात असें लोकांस वाटत असे. शकुनापशकुन

भोर

नांवरही लोकांचा विश्वास असे. कोल्हीं ओरडणें, डावा डोळा लवणें वगैरे अपशकुन मानीत. मुहूर्त पाहिल्याशिवाय कोणतेंहि कार्य होत नसे. " युक्तो मुहूर्ते विजये प्रातो मध्यं दिवाकरः " असें सुग्रीवास सांगून राम सैन्यासह लंकेस जाण्यास निघाला. मुहूर्त जर चांगला लाभला नाहीं तर प्रस्थान ठेवीत नसत. नवीन मैत्री करावयाची म्हणजे ती नेहमीं अग्निसमक्ष हातांत हात घालून होत असे. राम व सुग्रीव ह्यांची मैत्री झाली तेव्हां खालील विधि करण्यांत आला. " रोचते यदि मे सख्यं बाहुरेष प्रसारितः । गृह्यतां पाणिना पाणिर्मर्यादा वध्यतां ध्रुवा ॥ ततो हनुमान्..... । काष्ठयोः स्वेन रूपेण जनयामास पावकम् । दीप्यमानं ततो वह्निं पुष्पैरभ्यर्च्य सत्कृतम् ॥ तयोर्मध्ये तु सुप्रीतो निदधौ सुसमाहितः । ततोऽग्निं दीप्यमानं तौ चक्रतुश्च प्रदक्षिणम् ॥"

**शकुन.**

ह्या कालीं लोकांचा पोषाख कसा होता हें नीटसें समजत नाहीं. तरी पण डोक्याला उष्णीष, पायांत उपानह व डोक्यावर छत्री हीं लोकांच्या वापरण्यांत असत. सीतेला पळवून नेण्याकरितां जेव्हां रावण तिच्यां आश्रमांत गेला तेव्हां तो " शिखी, छत्री, उपानही " असा होता. शिवाय, मूल्यवान् लोकरीचीं व कापसाचीं वस्त्रें लोक वापरीत असत. " आदर्शतलसंकाशा ततो वै पृथिवी मया । अलातचक्रप्रतिमा दृष्टा गोष्पदवत्कृता ॥" वरील श्लोकांत सुग्रीव म्हणतो कीं, वाली पाठीस लागल्यामुळें मीं सर्व पृथ्वी पाहिली. तिचा आकार गाईच्या पावलाप्रमाणें होता. उपमालंकारांत ठिकठिकाणीं भूकंपाचा उल्लेख अनेकवेळां आला आहे.

**पोषाख.**

ह्याप्रमाणें रामायणकालीन लोकांचे आचारविचार, धर्मप्रवृत्ति, रीतिभाती, त्यांचे समज व तत्कालीन एकंदर समाजस्थिति ह्यांचें वर्णन वाल्मीकीच्या महाकाव्यांत जसें आढळलें तसें थोडक्यांत येथें दिलें आहे. त्यावरून वाचकांच्या एक गोष्ट लक्षांत येईल कीं, सांप्रत आमचे धार्मिक आचार जसे आहेत तसेच इतक्या प्राचीन कालींही होते. आजमित्तीस ज्या आमच्या धर्मसमजुती आहेत त्यांहून फारशा भिन्न त्या वेळच्या नव्हत्या. हल्लींचा हिंदु व रामायणकालीन हिंदु हे परस्परांस अगदींच अपरिचित होणार नाहींत. पशुहत्येसारख्या कांहीं अप्रशंसनीय चाली लोकमतौघानें बंद पडून मूळ धर्मस्वरूप अढळ राहिलें आहे.

ज्योतिषशास्त्राचा प्रसार चांगला झाला होता; व त्या शास्त्रावर लोकांचा भरंवसा होता. जन्मनक्षत्रीं सूर्य, राहू व मंगल हे तीन भयंकर ग्रह आले आहेत ह्यामुळें, घोर आपत्ति किंवा मृत्यु मला येण्याचा संभव आहे असें ज्योतिषी सांगतात म्हणून अभिषेकविधि लवकर उरकून घेतला पाहिजे असें दशरथराजानें रामाला सांगितलें. " अवष्टब्धंच मे राम नक्षत्रं दारुणग्रहैः । आवेदयन्ति दैवज्ञाः सूर्याङ्गारकराहुभिः ॥ प्रायेण च निमित्तानामीदृशानां समुद्भवे । राजा हि मृत्युमाप्नोति घोरां चापदमृच्छति ॥ " त्याचप्रमाणें लंकेवर स्वारी करण्यास राम निघाला त्यावेळेस तो सुग्रीवाला सांगत आहे कीं आज ( चंद्र ) उत्तराफल्गुनींत आहे. उद्यां हस्तांत जाईल करितां आपण सैन्य घेऊन निघावें. " उत्तराफल्गुनीमद्य श्वस्तु हस्तेन योक्ष्यते । अभिप्रयाम सुग्रीव सर्वानीकसमावृताः ॥" तिथि, वार, नक्षत्रें, महिने ह्यांचा उल्लेख आढळतो. राशींविषयीं मात्र कोठें निर्देश केलेला सांपडत नाहीं. तारागणांत त्रिशंकु, वसिष्ठ, अरुंधती, सप्तर्षि ह्यांचीं नांवें आलीं असून नक्षत्रांत रोहिणी पुनर्वसु, पुष्य, स्वाती, विशाखा, पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा ह्यांचा नामनिर्देश केलेला आहे. रोहिणीचा इतर ग्रहांशीं व विशेषतः चंद्राशीं जो योग होतो तो कवीचा आवडता अलंकारविषय दिसतो. " बुधः खे रोहिणीमिव " " ग्रहेणाङ्गारकेणेव पीडितामिव रोहिणीम् " " शशांक इव रोहिणीम् " इत्यादि अनेक उदाहरणें देतां येतील. " गगने ग्रहयोर्घोरं बुधाङ्गारकयोरिव " ह्यासारख्या वाक्यांवरून लोकांचा ग्रहांशीं चांगला परिचय झाला होता असें दिसतें. एकंदर बुध, गुरु, मंगळ, सूर्य, राहु, व चंद्र ह्या ग्रहांचा स्पष्ट उल्लेख केलेला आढळतो. भगवान् अगस्त्य मुनींनीं रामाला एक सर्वशत्रुविनाशी सूर्यस्तोत्र सांगितलेलें आहे; त्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें एक श्लोकार्ध आहे. " एष सुप्तेषु जागर्ति भूतेषु परिनिष्ठितः " ह्याचा अर्थ हा म्हणजे सूर्य लोक निजले असतांही जागृत असतो असा करावा; अथवा ह्याचे किरण सुप्त म्हणजे दिसेनासे झाले असतांही तो स्वतः जागृत असतो असाही अर्थ करावा. कसाही अर्थ केला तरी त्यावरून उघड होतें कीं, रात्रीं सूर्य पृथ्वीच्या दुसऱ्या कोणत्या तरी भागाला प्रकाशित करीत असतो अशी यथार्थ कल्पना लोकांची झाली होती.

फलज्योतिष.

ज्योतिष.

## राज्यस्थिति.

**निरनिराळीं राज्यें**

प्राचीनकालीं ह्या भरतखंडभर असंख्य लहान लहान राज्यें पसरलीं होतीं. तीं कांहीं स्वतंत्र व कांहीं माण्डलिक असत. सर्व राजांचा पराभव करून त्यांपासून खंडणी घेणारा एकादा विक्रमशील राजा मधून मधून निघे हें खरें. पण सर्व देश येथून तेथून एकाच भूपतीच्या प्रत्यक्ष अमलाखालीं असल्याचें दिसत नाहीं. रामायणांत मिथिला, काशी, केकय, अंग, केसिल, मगध, सिंधु, सौराष्ट्र, द्राविड, मत्स्य, कौशिक, आन्ध्र, पुण्ड्र, चोल, केरल, पाण्ड्य, कारुपथ, मद्रक, कुरु, भरत आणि प्रस्थल इतक्या राजांचा स्पष्ट उल्लेख केलेला आढळतो. ह्यांशिवाय दाक्षिणात्य म्हणजे दक्षिणेकडील राजे व त्यांचे प्रांत आणि म्लेच्छाचार्य–बर्बर, यवन, पल्हव वगैरे राजांचीं राज्यें निराळींच.

**राज्यव्यवस्था.**

राजे लोक आपल्या मंत्रिमंडळाच्या सहाय्यानें राज्यकारभार चालवीत असत. लोक वाटेल त्याला जरी राजा नेमित नसत तथापि राजघराण्यांतील पुरुष राज्यपदावर आरूढ होण्याच्या पूर्वी त्या गोष्टीस प्रजेची अनुमति असावी लागत असे. रामास राज्याभिषेक करण्याच्या ह्या गोष्टीस संमति आहे काय असें स्पष्ट विचारलें होतें. अगोदर दशरथानें आपल्या सर्व प्रजेस बोलावून तुमची प्रजेनें आपला अनुकूल अभिप्राय दिल्यावर न जाणो कदाचित् तोंडापुरते हे उद्गार असतील अशी शंका येऊन दशरथानें जमलेल्या लोकांस पुन्हां विचारलें कीं, मी धर्माला अनुसरून राज्य करीत असतां तुम्ही रामाची इच्छा कां करितां ? ह्यावरही पुन्हां असंशयात्मक उत्तर आल्यावर दशरथानें आपला बेत कायम करून रामास सांगितलें कीं, " अद्य प्रकृतयः सर्वास्त्वामिच्छन्ति नराधिपम् । अतस्त्वां युवराजानामाभिषेक्ष्यामि पुत्रक ॥ " सर्व प्रजेची इच्छा आहे कीं, तूं राजा व्हावें म्हणून मी तुला हे पुत्रा, राज्याभिषेक करणार आहें. त्याचप्रमाणें वैदर्भक राजाचा पुत्र श्वेत हा आपला पूर्व वृत्तांत कथन करीत असतां म्हणतो " ततः पितरि स्वर्याते पौरा मामभ्यषेचयन् । तत्राहं कृतवान्राज्यं धर्म्यं च सुसमाहितः ॥ " पिता वारल्यावर पौरजनांनीं मला राज्याभिषेक केला तेव्हां मी धर्माप्रमाणें राज्य केलें.

ह्याप्रमाणें राज्यपदप्राप्ति प्रजेच्या संमतीवर अवलंबून असल्या कारणानें प्रजापालन हें राजाचें आद्य कर्तव्य ठरलें. प्रजापालनदक्ष होण्यास अवश्य लागणारे सद्गुण राजामध्यें लागत असत.

**प्रजावात्सल्य.**

प्रजेच्या सुखाशिवाय इतर सुखाची राजे बिलकूल अपेक्षा करीत नसत. प्रजानुरंजनाकरितां रामानें आपल्याला अत्यंत प्रिय असलेल्या सीतेचाही त्याग केला. ( ही हकीकत ) त्याप्रमाणेंच रामाच्या पूर्वजांपैकीं एका राजानें प्रजेचें प्रिय करण्याकरितां आपल्या पुत्राचाही त्याग केला. हा मुलगा इतका खोड्याळ होता कीं, तो रस्त्यावर खेळत असलेल्या मुलांस उचलून सरयूनदींत नेऊन सोडी. ह्यामुळें, संतत झालेले नागरिक एक दिवस राजाकडे जाऊन म्हणाले कीं, तुला मुलगा पाहिजे असेल तर आम्हांस सोड किंवा आम्ही हवे असल्यास मुलाला सोड. एवढ्या भीतिचें कारण काय म्हणून विचारिल्यावर त्यांनीं मुलाची कृति राजास निवेदन केली. तें ऐकिल्यावरोबर राजानें आपल्या दुष्ट मुलाचा त्याग केला. लगेच त्यानें त्या मुलाला व त्याच्या बायकोला गाडींत घालून यावज्जीव राज्यांत परत पाय न टाकण्याविषयीं फरमाविलें. " स तासां वचनं श्रुत्वा प्रकृतीनां नराधिपः। तं तत्याजाहितं पुत्रं तासां प्रियचिकीर्षया ॥ तं यानं शीघ्रमारोप्य सभार्यं सपरिच्छदम् । यावज्जीवं विवास्योऽयमिति तानन्वशात्पिता ॥" ह्या गोष्टीवरून तत्कालीन राजे किती सद्गुणी असले पाहिजेत ह्याचें अनुमान करितां येईल. चिरकाल राज्य चालविणाऱ्या राज्याच्या अंगीं नीति व विद्या हीं असलींच पाहिजेत. " विद्यास्वाभिविनीतो यो राजा राजन्नयानुगः । स शास्ति चिरमैश्वर्यमरींश्च कुरुते वशे ॥" ह्याच्या उलट जो नीच मनोवृत्तींचा महीपति असेल त्याची किंमत प्रजाजन श्मशानांतील अग्निप्रमाणें कांहींच समजत नसत. " सक्तं ग्राम्येषु भोगेषु कामवृत्तं महीपतिम् । लुब्धं न बहु मन्यन्ते श्मशानाग्निमिव प्रजाः ॥ " अशाच प्रकारचा उपदेश दशरथ राजानें रामास राज्याभिषेकप्रसंगीं केला आहे. तो असा. " गुणवत्यपि तु स्नेहात्पुत्र वक्ष्यामि ते हितम् । भूयो विनयमास्थाय भव नित्यं जितेन्द्रियः ॥ कामक्रोधसमुत्थानि त्यज स्वव्यसनानि च । परोक्षया वर्तमानो वृत्त्या प्रत्यक्षया तथा ॥ अमात्यप्रभृतीः सर्वाः प्रजाश्चैवानुरञ्जय । कोष्ठागारायुधागारैः कृत्वा संनिचयान्बहून् ॥ " खरा मुत्सद्दीपणा म्हणजे लबाडी, लुचेगिरी, छपवाछपवी, लपंडाव ह्यांत भरलेला आहे

असा पुष्कळांचा समज आहे; पण तो अगदीं चुकीचा आहे. अत्यंत धार्मिक बुद्धीनें राज्यकारभार करणाऱ्याला उत्कृष्ट मुत्सद्दी बनतां येतें हें ग्लॅडस्टन साहेबांनीं आपल्या उदाहरणानें सिद्ध करून दिलें आहे. प्राचीन हिंदु राजांचाही समज असाच होता. सत्य हाच राज्यकारभाराचा पाया होय असा त्यांचा दृढ विश्वास होता. " सत्यमेवानृशंसं च राजवृत्तं सनातनम् । तस्मात्सत्यात्मकं राज्यं सत्ये लोकः प्रतिष्ठितः ॥ "

वनवासार्थ गेलेल्या पूज्य भ्रात्याला भेटण्याकरितां जेव्हां भरत आला तेव्हां राज्यासंबंधीं रामानें त्याला अनेक प्रश्न विचारिले आहेत त्यावरून त्यावेळच्या राजनीतीची कल्पना करितां येईल. राम विचारितो—" कोणतीही मसलत तूं एकटाच करीत नाहींस ना ? त्याचप्रमाणें मसलत करते वेळेस पुष्कळांवर विश्वास ठेवीत नाहींस ना ? गुप्त मसलत तुझी सर्व राष्ट्रभर पसरत नाहीं ना ? अल्प यत्नांनीं साध्य होणारें फार फायदेशीर काम करण्याचें योजिल्यावर तें करण्याच्या कामीं दिरंगाई करीत नाहींस ना ? तूं मनांत आणशील तें झालेंच असेंच तुझें मांडलिक राजे समजतात नां ?

**राज्यकारभार.**

तूं आपली मसलत दुसऱ्यास सांगितली नाहींस तरी ती तर्कानें ते जाणत नाहींत ना ? तसेंच परमंत्र तुला अथवा तुझ्या मंत्रिमंडळाला समजल्यावांचून रहात नाहीं ना ? हजारों मूर्ख पदरीं असलेले गेले तरी चालेल पण जवळ एक पण्डित पाहिजे अशी इच्छा धरतोस ना ? कारण तो तिजोरीची स्थिति सुधारून सुव्यवस्था करूं शकतो. हजारों किंवा लाखों मूर्ख जरी जवळ असले तरी त्यांच्या ठिकाणीं कार्यक्षमता आढळणार नाहीं. एक जरी अमात्य असला पण तो जर बुद्धिमान्, दक्ष, शूर, शहाणा असा असेल तर राजाला विपुल संपत्ति प्राप्त करून देईल. नोकरांच्या योग्यतेप्रमाणेंच त्यांना तूं कामें सांगितलीं आहेस ना ? अतिशय कडक शिक्षा करून तूं आपल्या प्रजेस उद्विग्न करून टाकिलें नाहींस ना ? त्याचप्रमाणें राष्ट्रांत तुझा किंवा तुझ्या मंत्र्यांचा कोणी अवमान करीत नाहीं नां ? तुझा सेनापति कुलीन, दक्ष, शूर, बुद्धिमान्, धीट, शुद्ध व तुझ्या ठिकाणीं सप्रेम असा आहे ना ? तुझ्या सैन्यापैकीं ज्यांना दररोजच्या दररोज व ज्यांना महिना भरल्यावर पगार द्यावयाचा त्यांना तो मुदतशीर तूं देतोस ना ? कारण मुदतशीर न दिल्यास सेना क्रुद्ध होते व भयंकर परिणाम घडतो.

सर्व किल्ल्यांमध्यें धन, धान्य, आयुधें, उदक, यंत्रें, वाकबगार सैन्य हीं भरपूर आहेत ना ? तुझा वसूल मोठा असून खर्च वेताचा आहे ना ? अपराधाची शाबिती झाल्यावर पैशाच्या लोभानें चोराची मुक्तता होत नाहीं ना ? इत्यादि.

ह्यावरून स्पष्ट दिसतें कीं, अर्वाचीन देशी राजांमध्यें दृष्टीस पडणाऱ्या अवगुणांपैकीं एकही अवगुण प्राचीन हिंदु राजांत नव्हता. ते आपल्या सैन्याचा पगार कधींही थकवीत नसत. पैसे खाऊन अपराधी सोडीत नसत; आद्यापेक्षां खर्च जास्त करीत नसत व कधींही गाफिल नसत. निदान वर सांगितलेली प्राचीन हिंदुराजनीति आहे ती हल्लींच्या राजनीतितत्त्वांशीं ताडून पाहतां कांकणभर सरसच ठरेल ह्यांत संशय नाहीं. स्वतः हिंदु राजे प्राचीनकाळीं किती विद्याविनयसंपन्न, नीतिमान् प्रजाहितदक्ष व न्यायी असत हें रामाचें चरित्र पुढें देण्यांत येईल त्यावरून उत्तम रीतीनें समजेल.

**मंत्रिमंडळ.**

खुद्द राजाच्या ठिकाणीं इतके अप्रतिम गुण पाहिजेत मग त्याला साहाय्य करणाऱ्या मंत्र्यांमध्यें कमी असणें असंभवनीय आहे. मोठा पंडित असून राजाचें हित चिंतणारा असेल तोच मंत्री राजानें नेमिला पाहिजे असें वर दिलेल्या उताऱ्यावरून उघड होतें. दशरथराजाच्या मंत्र्यांचें वर्णन दिलें आहे त्यावरूनही तीच गोष्ट सिद्ध होते. दशरथाचे मंत्री एकंदर आठ होते. त्यांच्या गुणांचें वर्णन खालील श्लोकांत केलें आहे.

" मन्त्रज्ञाश्चेङ्गितज्ञाश्च नित्यं प्रियहिते रताः ।
" शुचयश्चानुरक्ताश्च राजकृत्येषु नित्यशः ।
" विद्याविनीता ह्रीमन्तः कुशला नियतेंद्रियाः ।
" श्रीमन्तश्च महात्मानः शास्त्रज्ञा दृढविक्रमाः ।
" कीर्तिमन्तः प्रणिहिता यथा वचनकारिणः ।
" तेजः क्षमा यशः प्राप्ताः स्मितपूर्वाभिभाषिणः ।
" क्रोधात्कामार्थहेतोर्वा न ब्रूयुरनृतं वचः ।
" तेषामविदितं किंचित् स्वेषु नास्ति परेषु वा ।
" क्रियमाणं कृतं वापि चारेणापि चिकीर्षितम् ।
" कुशला व्यवहारेषु सौहृदेषु परीक्षिताः ।

17 MAR 1990

" प्राप्तकालं यथादण्डं धारयेयुः सुतेष्वपि ।
" कोशसंग्रहणे युक्ता बलस्य च परिग्रहे ।
" अहितं चापि पुरुषं न हिंस्युरविदूषकम् ।
" सुवाससः सुवेषाश्च ते च सर्वे शुचिव्रताः ।
" हितार्थाश्च नरेन्द्रस्य जाग्रतो नयचक्षुषा । " इत्यादि.

म्हणजे दशरथाचे मंत्री त्याच्या आज्ञेप्रमाणें चालणारे, कधींहि असत्य भाषण न करणारे, प्रसंग आला असतां प्रत्यक्ष पुत्रास सुद्धां शासन करणारे व शत्रु असून देखील निरपधारी असेल तर त्याच्या वाटेस न जाणारे, राष्ट्रकोश वृद्धिंगत करणारे श्रीमान् शास्त्रज्ञ व पराक्रमी असे होते.

राजा व त्याचे मंत्री हे कसे असावे ह्याविषयींचीं वचनें वर दिलीं आहेत. ह्या वचनानुसार राज्यचालकांचें वर्तनही असे. हें प्रत्यक्ष रामाच्या कारकीर्दीवरून स्पष्ट समजेल ह्या उद्देशानें रामचरित्र संक्षिप्तरीतीनें

**रामचरित्र.** येथें देण्याचें योजिलें आहे.

बारा महिने गर्भवास काढल्यावर चैत्र महिन्यांत नवमीच्या दिवशीं पुनर्वसु नक्षत्रीं राम जन्मास आला. त्याचवेळेस पांच ग्रह स्वगृहींचे असून उचीचे होते. चंद्र व गुरु एकाच राशीचे होते व लग्न कर्क होतें. " ततश्च द्वादशे मासे चैत्रे नावमिके तिथौ ॥ नक्षत्रेऽदितिदैवत्ये स्वोच्चसंस्थेषु पञ्चसु । ग्रहेषु कर्कटे लग्ने वाक्पताविन्दुना सह ॥ " राजपुत्र व त्यांतहि नवससायास करून प्राप्त झालेला पुत्र असूनसुद्धां बालपणीं रामाच्या शिक्षणाविषयीं यत्किंचित्ही हयगय झाली नाहीं. बालपणींच वेदाध्ययन करून धनुर्विद्येंत व घोड्यावर बसण्यांत तो वाकबगार झाला होता; व इतकें असूनही तो नेहमीं " पितृशुश्रूषणरत " असे. रामाचे डोळे लाल, बाहु विस्तृत, ओष्ठ रक्तवर्ण व आवाज दुंदुभीप्रमाणें असे. " लोहिताक्ष महाबाहुं रक्तोष्ठं दुन्दुभिस्वनम् " पंधरा वर्षांचा असतांच यज्ञक्रियेस व्यत्यय आणणाऱ्या राक्षसांचें निर्दलन करण्याकरितां रामास विश्वामित्र घेऊन गेला. पुढें " गोब्राह्मणहितार्थ " व " देशहितार्थ " मुनिवर्यांचा उद्देश सिद्धीस

**शिक्षण.** नेल्यावर जनकराजाच्या धनुष्याचा भंग करून वीर्यशुल्क सीतेचा पत्न्यर्थ रामानें अंगीकार केला; वयोवृद्धीबरोबर रामाची गुणवृद्धिही होत होती. देशकाल पाहून कोठें कसें वागावें हें त्यास

चांगलें समजत असे. त्याची स्मरणशक्ति वाखाणण्यासारखी होती. प्राकृत-मिश्रित संस्कृत नाटकें आदिकरून त्यानें वाचलीं होतीं. राज्यकारभाराचें सर्व शिक्षण त्याला मिळालें असून त्याचें खासगी आचरण सरल, सत्याला धरून व विनययुक्त असे; व " व्यसनेषु मनुष्याणां भृशं भवति दुःखितः ॥" दुसऱ्यास दुःख झालें असतां त्यास अत्यंत दुःख होई असा त्याचा स्वभाव असे. अशा गुणवान् पुत्रास राज्याभिषेक करून पुष्कळ वर्षें राज्यधू वाहिल्यानें थकलेल्या दशरथास विश्रांति घेण्याची मनीषा झाली. परंतु, भरतास राज्य मिळत नाहीं एवढ्यावरून उत्पन्न झालेल्या कैकयीच्या मत्सरामुळें रामास चौदा वर्षें वनवास काढणें भाग पडलें. दशरथानें कैकयीस पूर्वी दोन वर दिले होते ते त्या दुष्टबुद्धि स्त्रीनें त्या संधीस मागितले. आपल्या पित्यास आपण दिलेलें वचन राखितां यावें व सत्यापासून त्यानें भ्रष्ट होऊं नये म्हणून त्या पितृभक्तिपरायण पुत्रानें वनांत जाण्याचें मोठ्या खुशीनें कबूल केलें. ह्याचें नांव पितृभक्ति व सत्यनिष्ठा !

**रामाचें व्यवहार-ज्ञान.**

वनांत जाण्याच्या पूर्वी सीतेला भेटण्याकरितां तिच्याकडे राम गेला त्यावेळेस त्यानें आपल्या भार्येला एकाद्या व्यवहारज्ञ मनुष्याप्रमाणें मोठ्या शहाणपणाचा व धूर्तपणाचा उपदेश केला आहे. घटकाभर राम ही काल्पनिक व्यक्ति मानली तरी काव्यकाराच्या चाणाक्षपणाविषयीं कौतुक वाटल्यावांचून रहात नाहीं. " सोऽहं त्वामागतो द्रष्टुं प्रस्थितो विजनं वनम् । भरतस्य समीपे ते नाहं कत्थ्यः कदाचन ॥ ऋद्धियुक्ता हि पुरुषा न सहन्ते परस्तवम् । तस्मान्न ते गुणः कत्थ्या भरतस्याग्रतो मम ॥ अहं ते नानुवक्तव्यो विशेषेण कदाचन । अनुकूलतया शक्यं समीपे तस्य वर्तितुम् ॥.....याते च मयि कल्याणि वनं मुनिनिषेवितम् । व्रतोपवासपरया भवितव्यं त्वयानघे ॥ कल्यमुत्थाय देवानां कृत्वा पूजां यथाविधि । वन्दितव्यो दशरथः पिता मम जनेश्वरः ॥ माता च मम कौसल्या वृद्धा संतापकर्षिता । धर्ममेवाग्रतः कृत्वा त्वत्तः संमानमर्हति ॥ " ओसाड वनांत जावयास निघालेला मी तुला भेटण्याकरितां आलों आहे. भरत जवळ असतांना त्याच्या समक्ष माझे गुण केव्हांहि गाऊं नकोस. कारण, संपन्न स्थितींतल्या पुरुषांना दुसऱ्याची केलेली प्रशंसा

सहन होत नाहीं. माझी किंवा माझ्या स्वरूपाची वाखाणणी कोणाजवळ तूं कधींही करूं नकोस; कारण, त्याच्या योगानें भरताविषयीं प्रतिकूल ग्रह करण्यासारिखें आहे. मी वनांत गेल्यावर उपवास व व्रतें करून तूं कालक्रमण कर. प्रातःकालीं उठून यथाविधि देवांची पूजा केल्यावर माझ्या पित्याला दशरथाला नमस्कार करीत जा; आणि माझ्या दुःखी वृद्ध मातेचा नेहमीं मान राखीत जा. अशासारिख्या व्यावहारिक उपदेशाची हल्लींच्या आमच्या विधवांना किती तरी अवश्यकता आहे. अशा प्रकारचे उपदेश ज्या पुराणांत सांपडतात त्या पुराणांची योग्यता निःसंशय कमी नाहीं. परंतु, आमच्या दृष्टिवरचें आवरण अद्यापि निःशेष गेलें नाहीं. तें जाईपर्यंत पुराणांची उपयुक्तता आमच्या मनावर ठसावी तशी ठसणार नाहीं. सुमंत्रावरोबर आपल्या आईला रामानें वनांतून जो निरोप पाठविला तोही वरच्यासारखाच धूर्तपणाचा आहे. राम म्हणतोः—माझ्या आईला सांग कीं. " अभिमानं च मानं च त्यक्त्वा वर्तस्व मातृषु । अनुराजानमार्यां च कैकेयीमम्ब कारय " मी राजाची वडील बायको आहें हा गर्व सोडून राजाच्या दुसऱ्या स्त्रियांशीं आपलें वर्तन ठेव. एवढेंच नव्हे तर राजा जिचें ऐकतो अशा कैकयीलाच मान दे.

वनवासाचे क्लेश सहन करण्याचें भाग पडून राज्यपद हातचें गेलें व भरताला तें प्राप्त झालें ह्याबद्दल रामाला वाईट वाटलें नाहीं व भरताचाही त्यानें मत्सर केला नाहीं. अयोध्येहून निघते वेळीं तद्वासी पौरवांना त्यानें केलेल्या उपदेशावरून त्याच्या निष्कलंक मनाची अटकळ होईल. " या प्रीतिर्बहुमानश्च मय्ययोध्या निवासिनाम् । मत्प्रियार्थं विशेषेण भरते सा विधीयताम् ॥ स हि कल्याणचारित्रः कैकेय्यानन्दवर्धनः । करिष्यति यथावद्वः प्रियाणि च हितानि च ॥ ज्ञानवृद्धा वयोबाला मृदुर्वीर्यगुणान्वितः । अनुरूपः स वो भर्ता भविष्यति भयापहः ॥ " अयोध्यावासी जनांची जशी प्रीति मजवर आहे; मला ते जसा मान देतात तशीच प्रीति व तसाच मान किंबहुना त्याहीपेक्षां विशेष त्यांनीं भरताला द्यावा. भरताचें वर्तन शुद्ध आहे. तो तुम्हांला प्रिय व हितावह असेल तेंच करील. भरत वयानें लहान आहे तरी पण तो ज्ञानसंपन्न, मृदुभाषी, शूर व गुणवान् असून योग्य रीतीनें राज्यकारभार करण्यासारिखा आहे; ह्यावरून उघड दिसतें कीं, कैकेयीच्या

**रामाचें सरळ मन.**

श्रीमंत तो. दं. पे. ग्रंथालय, सांगली


दुष्ट कृतीनें संतापून जाऊन रामानें भरताविषयीं आपलें मन कलुषित होऊं दिलें नाहीं.

उच्च नीच कशीही स्थिति येवो; प्रसंग येईल तो स्वावलंबनानें पार पाडितां येण्यासारिखें शिक्षण राजपुत्रांना मिळालें होतें. अरण्यमार्ग आक्रमीत असतां वाटेंत नदी, नाले लागल्यास पलीकडे जाण्याकरितां जंगलांतलीं लांकडें आणून तराफा बनवून रामलक्ष्मण पैलतीरीं जात असत. अरण्यांत निरनिराळ्या ठिकाणीं वस्तीकरितां पर्णकुटिका ते स्वतः बांधीत व जटायूसारख्या आप्तांचें देहावसान झालें असतां त्याचा अन्त्य विधि स्वतः मन्त्रोक्त रीतीनें उरकून टाकीत. ह्यावरून प्राचीन कालच्या लोकांना व्यावहारिक व व्यापक शिक्षण कसें मिळत असे व कोणत्याही स्थितींत तदनुरूप होण्यास ते किती लायक असत ह्याची कल्पना करितां येईल.

**पत्नीप्रेम.**

रामाच्या अंगीं जे अनेक गुण होते त्यांपैकीं सीतेच्या ठिकाणीं अनन्य अनुराग हा एक होय. " मयि भावो हि सीतायास्तत्त्वतो विनिवेशितः । ममापि भावःसीतायां सर्वथा विनिवेशितः ॥" ह्याप्रमाणें ह्या पतीपत्नीचें एकमेकांवर निःसीम प्रेम असे; व त्याबद्दल एकमेकांची पूर्ण खात्री होती. रावणानें सीतापहार केल्यावर रामाला शोकानें कसें विव्हल केलें होतें हें सर्वांस माहीत आहे. सीतेसाठीं हळहळणाऱ्या व तत्प्राप्तीसाठीं आतुर झालेल्या रामाचें वर्तन युद्धांत रावणाचा पराभव करून सीता पुन्हां फार दिवसांनीं भेटल्यावर फारच निराळ्या प्रकारचें होतें. आनंदांत मग्न होऊन सीतेचा अंगीकार एकदम न करितां तो फार सावधपणानें वागला. त्याची मुद्रा गंभीर झाली. पत्नीप्रेमाला वश होऊन त्यानें विवेकशक्तीला सोडिलें नाहीं. बिभीषण सीतेला घेऊन आला तेव्हां जवळ असलेल्या लोकांना एकीकडे सारण्याची एकच गर्दी उडाली. सीतेच्या मार्गावर व आसपास कोणीही फिरकूं नये म्हणून वेत्रधारी शिपायी इतस्ततः छडी फिरवीत फिरवीत फिरूं लागले. पण दुसऱ्यांना निरर्थक यत्किंचित्हि त्रास पोहोंचूं नये अशी इच्छा बाळगणाऱ्या रामाला हें सहन कसें व्हावें ? " उत्सार्यमाणान्द्दष्ट्वाथ जगत्यां जातसंभ्रमान् । दाक्षिण्यात्तदमर्षाच्च वारयामास राघवः ॥ संरम्भाच्चाब्रवीद्रामः चक्षुषा प्रदहन्निव । बिभीषणं महाप्राज्ञं सोपालम्भमिदं वचः ॥ किमर्थं मामनादृत्य क्लिश्यतेऽयं त्वया जनः । निवर्तयैनमुद्वेगं जनोऽयं स्वजनो मम ॥ " लोकांना तेथून घालवून

दिल्यामुळें, त्यांच्या ठिकाणीं भीति उत्पन्न झालेली पाहून, तें सहन न होऊन व सभ्यपणाला तें अनुचित आहे असें वाटून रामानें त्या गोष्टीचें निवारण केलें व बिभीषणाला तो जरा टोंचून बोलला. मला विचारल्यावांचून तुम्हीं ह्या लोकांना त्रास कां देतां ? त्यांना उद्विग्न करूं नका. हे लोक माझेच आहेत. हल्लींच्या बड्या अधिकाऱ्यांनीं ह्यापासून बोध घेतला तर बरें होईल. पुढें राम म्हणतोः—गृहें, वस्त्रें किंवा प्राकार ह्यांनीं स्त्रियांचें आवरण होत नाहीं. त्यांचें शुद्धाचरण हेंच त्यांना आवरण होय. संकटांत असतां, युद्धांत यज्ञभूमीवर अथवा लग्नांत स्त्रिया पुरुषांच्या दृष्टीस पडल्या तरी त्यांत दोष नाहीं. पालखी सोडून सीतेला पायांनींच मजकडे येऊं द्या. पुढें सीता जवळ आली. परंतु, पूर्वी प्रेमळ व पत्नीचें कुतूहल पुरविण्यांत तत्पर असलेला भर्ता ह्या क्षणीं कठोर चित्त झालेला तिनें अवलोकिला; व खालीं लिहिल्याप्रमाणें रामानें उच्चारिलेले शब्द ऐकून तर तिला फारच दुःख झालें. रामानें तिला सांगितलेः—

**रामाचा थोर स्वभाव**

" विदितश्चास्तु भद्रं ते योऽयं रणपरिश्रमः ।
" सुतीर्णः सुहृदां वीर्यान्न त्वदर्थं मया कृतः ॥
" रक्षता तु मया वृत्तमपवादं च सर्वतः ।
" प्रख्यातस्यात्मवंशस्य न्यङ्गं च परिमार्जता ॥
" प्राप्तचारित्रसंदेहा मम प्रतिमुखे स्थिता ।
" दीपो नेत्रातुरस्येव प्रतिकूलासि मे दृढा ॥
" तद्गच्छ त्वानुजानेऽद्य यथेष्टं जनकात्मजे ।
" एता दशदिशो भद्रे कार्यमस्ति न मे त्वया ॥ "

खेह्यांच्या शौर्यानें सफल झालेला हा युद्धाचा खटाटोप जो मीं केला तो तुझ्याकरितां नव्हे हें तूं पक्कें समज. वायकोला पळवून नेणाराचें ह्याला शासन करितां येत नाहीं असा अपवाद मला लागूं नये व कुळाला कमीपणा येऊं नये एवढ्याचकरितां मी ह्या युद्धाच्या भरीस पडलों. तुझ्या चरित्राविषयीं संशय उत्पन्न झाल्यामुळें नेत्ररोग झालेल्या मनुष्याला जसा दिवा सोसत नाहीं तसाच प्रकार तुझ्याविषयीं माझा झाला आहे. म्हणून वाटेल तिकडे तूं जा. माझी तुला परवानगी आहे. तुझ्याशीं मला कांहीं कर्तव्य नाहीं. ह्यावरून हें उघड होतें कीं, रामाचें मन जितकें प्रेमळ होतें तितकेंच

निश्चयी होतें. पण सीता ही तरी रामाचींच बायको. तिला आपल्या निर्दोष वर्तनाची खात्री होती. आतां ही लज्जेची वेळ नाहीं असें पाहून तिनेंही रामाला बाणेदार उत्तर दिलें:—

" किं मामसदृशं वाक्यमीदृशं श्रोत्रदारुणम् । रूक्षं श्रावयसे वीर प्राकृतः प्राकृताभिव ॥ न तथास्मि महाबाहो यथा मामवगच्छसि । प्रत्ययं गच्छ मे स्वेन चारित्रेणैव ते शपे ॥ " एखादा असंस्कृत मनुष्य आपल्या असंस्कृत पत्नीला बोलतो तद्वत् हें कठोर, कानाला कठीण लागणारें अनुचित वाक्य मला कां ऐकवितां ? मला आपण समजतां तशी मी नाहीं, असें खास समजा; असें मी आपल्या चरित्राची शपथ घेऊन सांगतें. एवढेंच म्हणून ती राहिली नाहीं. रामाच्या व जमलेल्या सर्व लोकांच्या समक्ष " माझें आचरण जर निष्कलंक असेल तर सर्वसाक्षी अग्नि माझें संरक्षण करो " असें म्हणून तिनें प्रदीप्त केलेल्या अग्नींत प्रवेश केला. परंतु, अग्निज्वालांनीं तिचा देह भडकून न जातां विभावसूनें तिला आपल्या अंकावर घेऊन रामाच्या स्वाधीन केलें. तेव्हां हिच्या ठिकाणीं पापाचा लवलेश नाहीं अशा विषयीं रामाची खात्री झाली. रावणाच्या अन्तःपुरांत दीर्घ काल राहणाऱ्या सीतेचा एकदम अंगीकार केला असतां बालिशत्वाचा आरोप येईल तो चुकवावा म्हणून रामानें वरील प्रकार केला. ज्या राजनीतीच्या शिक्षणानें लोकमताला मान देणारे राजे पूर्वी निपजत त्या राजनीतितत्त्वांची प्रशंसा करावी तेवढी थोडीच.

तथापि, एवढ्याच प्रसंगानें सीतेचें संकट टळलें नाहीं. चौदा वर्षें वनवासांत काढून रावणाचा पराभव केल्यानंतर सीतेसह राजधानींत राम परत आल्यावर राज्य चालवीत असतां सीतेविषयीं लोकांची कुजबुज त्याच्या कानांवर आली. " रक्षसां वशमापन्नां कथं रामो न कुत्स्यति ॥ अस्माकमपि दारेषु सहनीयं भविष्यति । यथा हि कुरुते राजा प्रजास्तमनुवर्तते ॥ " अशा प्रकारची टीका लोक सर्वत्र करीत आहेत असें रामास त्याच्या सोबत्यांनीं कळविलें. तेव्हां रामाचें मन पुन्हां उद्विग्न झालें; आणि सीतेचा त्याग करण्याचा त्यानें निश्चय केला. " अप्यहं जीवितं जह्यां युष्मान्वा पुरुषर्षभाः । अपवादभयाद्भीतः किं पुनर्जनकात्मजाम् ॥ " लोकापवादाच्या भीतीनें मी आपल्या आयुष्याचाही त्याग करीन मग सीतेची कथा काय ? असा विचार करणाऱ्या रामानें हा आपला अभिप्राय त्रिवर्गबंधूस कळविला;

व सीतेला वाल्मीकीच्या आश्रमाच्या आसपास सोडून देण्याची आज्ञा त्यानें लक्ष्मणाला केली. ज्या काळीं प्रजाजनांकरितां आपल्या आवडत्या भार्येसही सोडून देण्यास राज्यकर्ते तत्पर असत, त्या कालच्या राज्यव्यवस्थेच्या प्रशंसनार्थ जास्त लिहिण्याची अवश्यकता नाहीं.

रामाच्या अशा वर्तनाबद्दल जसें सानंद आश्चर्य वाटतें त्याहूनही जास्त सीतेला सोडून लक्ष्मण परत फिरतांना त्याच्या बरोबर तिनें जो निरोप रामाला पाठविला, तो वाचून वाटतें. " यथा भ्रातृषु वर्तेथा-

**सीतेचा बाणेदारपणा.**

स्तथा पौरेषु नित्यदा । परमो ह्येष धर्मस्ते तस्मात्कीर्तिरनुत्तमा ॥ यत्तु पौरजने राजन्धर्मेण समवाप्नुयात् । अहं तु नानुशोचामि स्वशरीरं नरर्षभ ॥" " भावांबरोबर जसें तुझें वर्तन आहे तसेंच प्रजाजनांबरोबर सदोदित असो. हाच धर्म श्रेष्ठ आहे. ह्याच्यापेक्षां दुसरी कीर्ति उत्तम नाहीं. पौर जनांच्या ठिकाणीं धर्मानें वागणाऱ्या तुला पुण्य प्राप्त होवो. माझ्या शरीराला क्लेश होतील त्याविषयीं मी दुःख बाळगीत नाहीं. " आपल्यामुळें आपल्या पतीला अपवाद लागण्याची भीति आहे म्हणून खुषीनें व धैर्यानें पतीचा वियोग सहन करणाऱ्या स्त्रिया फार क्वचित् सांपडतात. आपल्या त्यागाचें कारण लक्ष्मणाच्या तोंडून ऐकिल्यावर रामाला पाठविलेल्या वरील निरोपावरून सीतेच्या समयसूचकतेची तारीफ केल्याशिवाय राहवत नाहीं.

वरील विवेचनांवरून राम धार्मिक, प्रजाहितदक्ष, सरळ मनाचा, कोमल अंतःकरणाचा व दृढ निश्चयी होता हें दिसून येईल. त्याचप्रमाणें तो फार दूरदर्शी आणि मनुष्यस्वभावाची पारख करणारा होता. तो जरी साधा होता तरी एकदम फसून जाण्यासारिखा भोळा नव्हता. दशरथाच्या मरणानंतर राम वनवासास गेल्याकारणानें भरत राज्यकारभार पहात होता. चौदा वर्षें राजलक्ष्मीचा उपभोग घेतल्यानें न जाणों कदाचित् भरताच्या स्वभावांत विपर्यास झाला असेल असें मनांत येऊन वनवासांतून परत आल्यावर अयोध्या नगरींत शिरण्याच्या पूर्वी पुढें रामानें हनुमंताला भरताचा अभिप्राय जाणण्याविषयीं धाडिलें:—" एतच्छ्रुत्वा यमाकारं भजते भरतस्ततः । स च ते वेदितव्यः स्यात्सर्वं यच्चापि मां प्रति ॥ ज्ञेयाः सर्वे च वृत्तान्ता भरतस्येंगितानि च । तत्त्वेन मुखवर्णेन दृष्ट्या व्याभाषितेन च ॥

**रामाचा धोरणी स्वभाव.**

सर्वकामसमृद्धं हि हस्त्यश्वरथसंकुलम् । पितृपैतामहं राज्यं कस्य नावर्तयेन्मनः ॥ " मी आलों आहें असें भरताला समजल्यावर त्याची मुद्रा कशी होते व माझ्या संबंधानें एकंदर त्याची वागणूक कशी आहे तें सर्व पाहून ये. त्याचप्रमाणें तोंडावरून, दृष्टीवरून व भाषणांवरून भरताच्या मनांतला अभिप्राय जसा असेल तसा काढून मला कळीव. कारण, सर्व वासना परिपूर्ण होत असून, हत्ती, घोडे, रथ ह्यांची अनुकूलता असून व वडिलार्जित राज्य प्राप्त झालें असून कोणाचें मन बदलल्याशिवाय राहणार नाहीं. जर कदाचित् कैकेयीच्या संगतीनें स्वतः राज्य करण्याची भरताला इच्छा झाली असेल तर त्याला राज्य करूं दे. " संगत्या भरतः श्रीमान्राज्येनार्थी स्वयं भवेत् । प्रशास्तु वसुधां सर्वामखिलां रघुनन्दनः ॥ " वरील उताऱ्यावरून रामाचा शहाणपणा व स्वार्थत्याग हे दोन्ही दिसून येतात.

रामानें ह्या जगामध्यें किती वर्षें घालविलीं हें निर्णयात्मक ठरविणें कठीण आहे. " दशवर्षसहस्राणि दशवर्षशतानि च । कृत्वा वासस्य नियमं स्वयमेवात्मना पुरा ॥ " ह्या रामायणांतील वाक्यावरून अकरा हजार वर्षें रामाची आयुर्मर्यादा ठरते. पण सहस्रशब्दाचा अर्थ हजार होतोच असा नियम नाहीं. रामायणाच्याच एका टीकाकारानें अन्य ठिकाणीं सहस्रशब्द दिनवाचक ठरविला आहे. तथापि, हाही अर्थ येथें लागूं पडत नाहीं. कारण, तेहतीस वर्षांपेक्षां जास्त रामाची आयुर्मर्यादा निःसंशय होती. पण ह्यावरून एवढेंच ठरतें कीं, सहस्रशब्दाचा अर्थ निराळा असला पाहिजे. रामाचें लग्न झालें तेव्हां तो पंधरा वर्षांचा होता आणि सीता सहा वर्षांची होती. पुढें सीता म्हणतेः—वनवासास येण्याच्या पूर्वी मीं बारा वर्षें इक्ष्वाकूंच्या घरीं काढिलीं. " उषित्वा द्वादशसमा इक्ष्वाकूणां निवेशने " म्हणजे वनवासास निघतेवेळीं रामाचें वय सत्तावीस वर्षांचें होतें. पुढचीं चौदा वर्षें वनवासांत गेलीं. म्हणजे परत अयोध्येस राम आला त्यावेळीं त्याचें एकेचाळीस वर्षांचें वय होतें. रामाच्या बरोबर आलेली विभीषण, सुग्रीव वगैरे मंडळी एक वर्ष ( कांहीं टीकाकारांच्या म्हणण्याप्रमाणें पांच महिने ) आनंदांत काढून निघून गेली. तेव्हांपासून " अत्यक्रामच्छुभः कालः शैशिरो भोगदः सदा " आणखीं एक संवत्सर गेला. पुढच्या वर्षांत रामानें शत्रुघ्नाला लवणावर

**रामाचें वय.**

स्वारी करण्यास पाठविलें. लवणाला मारून त्याचें राज्य घेऊन बारा वर्षांनीं शत्रुघ्न परत अयोध्येस आला. " ततो द्वादशमे वर्षे शत्रुघ्नो रामपालिताम् । अयोध्यां चक्रमे गन्तुमल्पभृत्यबलानुगः ॥" ह्या वेळेस रामाचीं चौपन वर्षें पुरीं झालीं असलीं पाहिजेत. नंतर रामानें अश्वमेध केला. त्यास एक वर्षावर दिवस लागले " संवत्सरमथो साग्रं वर्तते न च हीयते " ह्याप्रमाणें त्यानें " दशवर्षसहस्राणि " यज्ञ केले. सहस्रशब्दाचा अर्थ दिवस केला तर अश्वमेध धरून सरासरी तीस वर्षें रामाचें यज्ञकृत्य चाललें होतें असें दिसतें. तेव्हां ह्यावेळीं रामाचें वय चवंच्यायशीं वर्षांचें होतें असें ठरतें. पुढें लगेंच रामानें भरताला सिन्धुदेशावर पाठविलें. तेथून तो पांच वर्षांनीं परत अयोध्येस आला. " निवेश्य पञ्चभिर्वर्षैर्भरतो राघवानुजः । पुनरायान्महाबाहुरयोध्यां केकयीसुतः ॥ " भरत परत आल्यावर तावडतोब रामानें लक्ष्मणास सांगितलें कीं, तुझे दोन मुलगे आहेत. त्यांच्या स्वाधीन कोठला तरी मुलुख केला पाहिजे. करितां कारुपथदेशांत जाऊन तेथें दोन राज्यें स्थापून आपल्या मुलांना तेथें राज्यभिषेक कर. त्याप्रमाणें लक्ष्मणानें करून तो एक वर्षानें परत अयोध्येस आला. " लक्ष्मणस्त्वङ्गदीयायां संवत्सरमथोषितः । पुत्रे स्थिते दुराधर्षे अयोध्यां पुनरागमत् ॥" ह्यावेळीं अर्थात् रामाचें वय नव्वदावर गेलें. नंतर थोडक्या दिवसांनीं कालानें रामाला आठवण दिली कीं, तुझी भूलोकींच्या अवताराची यत्ता संपली. त्यावर रामानें उत्तर केलें कीं, " भद्रं तेऽस्तु गमिष्यामि यत एवाहमागतः । " त्याप्रमाणें लागलींच सरयूकांठीं जाऊन रामांनीं मनुष्य देहाचा त्याग केला. ह्यावरून रामाचें वय मरणसमयीं एक्याण्णव ब्याण्णव वर्षांचें असावें असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाहीं.

ह्या त्रोटक रामचरित्रावरून तत्कालीन राजे व राज्यव्यवस्था ह्यांविषयीं नीटशी कल्पना करितां येईल. लोकसत्तात्मक व अनियंत्रित राज्यव्यवस्थेमधील दोष काढून शक्य तितकी निर्दोष राजव्यवस्थाही असलेली दिसते. रामराज्यांत लोक सुखी होते तसे नंतर केव्हांही नसतील.

---

## युद्धस्थिति.

मागें राज्यव्यवस्थेंविषयीं लिहितांना सांगितलें आहे कीं, आपला खजिना व युद्धसामुग्री जय्यत ठेवण्याविषयीं राजांचा मोठा कटाक्ष असे. साधारण

मोठ्या शहराला प्राकार असून त्यावर लढाईचीं यंत्रें ठिकठिकाणीं ठेविलेलीं असत. हे तट बळकट असून त्यांवर ध्वज फडकत असत. " उच्चाट्टालध्वजवतीं शतघ्नीं शतसंकुलाम् " असें अयोध्येचें वर्णन आहे. त्याचा अर्थ तटावर उंच चावड्या असून ध्वज फडकत होते व शतघ्नींची गर्दी होती. शत्रूपासून संरक्षण व्हावें म्हणून गिरिदुर्ग, जलदुर्ग, वनदुर्ग असे नानाप्रकारचे किल्ले बांधीत असत. सैन्यामध्यें बहुधा पायदळाचाच भरणा विशेष असे. रामाची स्वारी लंकेवर निघाली तेव्हां सैन्याच्या वेगवेगळ्या तुकड्या करून त्यांवर निरनिराळ्या वानरप्रमुखांची योजना झाली होती; व " यास्यामि बलमध्येऽहं बलौघमभिहर्षयन् " असें म्हणून राम स्वतः सैन्याच्या मध्यें राहिला होता.

हल्लीं सुधारणेच्या काळांत सुद्धां युद्धांत भूतदयेचे नियम पाळले जात नाहींत. पण अशी स्थिति रामायणासारख्या प्राचीन काळीं नव्हती. युद्धामध्येंही भूतदया व न्याय ह्यांचे नियम अक्षरशः पाळले जात असत. शत्रूकडला दूत आला असतां प्राणास मुकण्याची त्यास कधींही धास्ती नसे. कारण " दूता न वध्या समयेषु राजन्सर्वेषु सर्वत्र वदन्ति सन्तः " न मारण्याचें कारण कीं, " साधुर्वा यदि वाऽसाधुः परैरेष समर्पितः । ब्रुवन्परार्थं परवान्न दूतो वधमर्हति " दूत सज्जन असो अथवा असज्जन असो तो दुसऱ्यानें पाठविलेला असतो. तो केवळ निरोप्या असतो. तो जें कांहीं बोलतो तें त्याचें स्वतःचें नसतें एवढ्याकरितां त्याचा वध करणें योग्य नाहीं. रावणाचा दूत शुक हा रावणाकडून सुग्रीवाला निरोप घेऊन आला असतां सर्व वानर त्याच्यावर पडून त्यांनीं त्याला त्राहि त्राहि करून सोडलें तेव्हां रामाकडे त्यानें आपली दाद लाविली. " न दूतान्घ्नन्ति काकुत्स्थ वार्यन्तां साधु वानराः । यस्तु हित्वा मतं भर्तुः स मतं संप्रधारयेत् । अनुक्तवादी दूतः सन्स दूतो वधमर्हति " तो रामाला म्हणालाः—दूतांना कधीं मारीत नसतात. ह्या वानरांचें तूं निवारण कर. आपल्या यजमानाचा अभिप्राय बाजूला ठेवून आपलेंच मत जो स्थापूं लागेल व यजमानानें न सांगितलेली गोष्ट सांगेल तो दूत काय तो वध करण्यास योग्य होतो. ह्याप्रमाणें, जरी दूताचा वध करणें कधींही उचित मानलें जात नसे तथापि, त्यास प्रसंगानुसार शासन

करणें झाल्यास अन्य मार्गानें करीत हें खालील श्लोकावरून

**युद्धांतील नियम.**

समजेल. " वैरूप्यमङ्गेषु कशाभिघातो मौण्ड्यं तथा लक्षण-संनिपातः । एतान्हि दूते प्रवदन्ति दण्डान्वधस्तु दूतस्य न नः श्रुतोऽस्ति ॥ " दूतवधाप्रमाणेंच स्त्रीवधाचा निषेध केलेला आहे. स्त्री असल्यामुळेंच रामानें क्रोधाविष्ट होऊन आलेल्या ताटकेला सोडून दिलें. स्त्रीस्वभावानें रक्षित असलेल्या ताटकेला मारण्यास रामाचा हात धजेना. " न ह्येनामुत्सहे हन्तु स्त्रीस्वभावेन रक्षिताम् " युद्धामध्यें दुसऱ्या-वरोवर शत्रु सामना करण्यांत गुंतला आहे हें पाहून त्याच्यावर तुटून पडणें हें खऱ्या वीर्याचें लक्षण मानलें जात नसे. त्याचप्रमाणें युद्धांत थकून पड-लेल्यावर शस्त्र उपसून त्याचा प्राण घेणें हें अनुचित कृत्य गणलें जात असे. " तस्मात्परिश्रांत इति व्यवस्य न त्वां शरैर्मृत्युवशं नयामि " ह्याव-रून युद्धामध्यें रामायणकालीं अमानुष व क्रूर कृत्यें होत नसत असें दिसतें. तथापि, ह्या उत्कृष्ट नियमांचें बंधन राक्षसांत कांहीं कमी असा-वेसें दिसतें. कारण, राक्षस कदाचित् वाटेंतील फळें, मुळें व पाणी विष कालवून अथवा अन्य तऱ्हेनें खाण्यास नालायक करतील अशा भीतीनें रामानें वाटेचें संरक्षण करण्याकरितां मुद्दाम पुढें कांहीं सैन्य पाठविलें होतें. " दूषयेयुर्दुरात्मानः पथि मूलफलोदिकम् । राक्षसाः पथि रक्षेथा स्तेभ्यस्त्वं नित्यमुद्यतः ॥" वरील नियमांत जसा सौम्यपणा दिसतो तशी आपल्या सैन्यांत उत्कृष्ट व्यवस्था राहावी म्हणून कडक नियमांचें अवलंबन केलेलेंही आढळतें. आपल्या जाग्यावरून पळ काढणाऱ्या शेंदाड शिपायाला देहान्त शासन होत असे. सैन्याची व्यवस्था लावल्यावर वानरराज सुग्रीवानें खालील सक्त हुकूम फरमाविला होता. " आसन्नं द्वारमासाद्य युध्यध्वं च प्लवङ्गमाः । यश्च वो वितथं कुर्यात्तत्र तत्राप्युपस्थितः । स हन्तव्योऽभिसंप्लुत्य राजसाशसनदूषकः ॥" ह्याप्रमाणें धाक, उत्साह, निंदा व लालूच ह्यांच्या योगानें सेनानायक आपली सेना कार्यदक्ष ठेवीत असे. शत्रूनें वानरसेनेंत गोंधळ उडवून दिला असतां वानरसेना पळावयास लागली तेव्हां अंगद त्यांस म्हणतोः—आपले प्राण रक्षीत काय वसलां आहां. आपापल्या जागीं परत फिरा. आयुधें टाकून, निर्वीर्य होऊन पळत सुटणाऱ्या तुम्हांला पाहून वायकाही तुमचा उपहास करितील. अल्पायु प्राणी आपण मरून पृथ्वीवर पडलों तर भेकड योद्धयांना प्राप्त होण्यास कठीण असा ब्रह्मलोक आपणांस प्राप्त होईल.

कृपया पुस्तके जपून वापरा


अथवा आपण जर शत्रूला युद्धांत मारिलें तर कीर्ति मिळून पृथ्वीचें राज्य करण्यास सांपडेल. " स्थानं सर्वे निवर्तध्वं किं प्राणान्परिरक्षथ । निरायुधानां क्रमतामसङ्गगति पौरुषाः । दाराह्युपहसिष्यन्ति सवै घातः सुजीविनाम् । शयामहे वा निहताः पृथिव्यामल्पजीविताः । प्राप्नुयामो ब्रह्मलोकं दुष्प्रापं च कुयोधिभिः ॥ "

लढायांचीं वर्णनें रामायणांत जीं कांहीं आढळतात त्यांवरून प्रत्येक बाजूचें सर्व सैन्य झटापटींत गुंतलेलें असे असें खात्रीपूर्वक सांगतां येणें कठीण आहे. बहुतेक ठिकाणीं द्वंद्व युद्धाचे प्रसंग वर्णिलेले आढळतात. अशा ठिकाणीं अर्थातच शस्त्रांचा उपयोग फारसा होत नसे. दोन वीरांची प्रत्यक्ष गांठ पडल्यावर बाहुयुद्ध, मुष्टियुद्ध ह्यांपैकींच एकाद्याचा अवलंब करण्यांत येत असे; व हा युद्धप्रसंग बहुधा बाण न वापरणाऱ्या योद्धयांचा होत असे. निरनिराळ्या प्रकारचीं अस्त्रें, कवच, गदा व बाण ह्यांचा उपयोग लढाईत करीत असत. ह्यांशिवाय हातास लागेल तें शस्त्राप्रमाणें वापरण्यांत येई. झाडें, दगड वगैरे वस्तूंचें साहाय्य युद्धेच्छु जनांस फार होई. " केचिदस्त्राणि संत्यज्य बाहुयुद्धमकुर्वत । तलैश्च चरणैश्चापि मुष्टिभिश्च द्रुमैरपि ॥ जानुभिश्च हताः केचिद्भग्नदेहाश्च राक्षसाः ।

**शस्त्रास्त्रें** शिलाभिश्चूर्णिताः केचिद्बानरैर्युद्धदुर्मदैः ॥" त्याचप्रमाणें "गदां त्यक्त्वा ततस्तत्र मुष्टियुद्धमकुर्वत । अन्योन्यं जघ्नतुस्तत्र तावुभौ हरिराक्षसौ ॥ " झाडदगडांनीं लढणारे व बाणांनीं युद्ध करणारे ह्यांत भेद गणिला जात असे असें दिसतें. रामलक्ष्मणांनीं ह्या पहिल्या रानटी हत्यारांवजा वस्तूंचा उपयोग कधींही केलेला दिसत नाहीं. हीं हत्यारें वानर व राक्षस ह्यांची होत. राक्षसांमध्येंही रावण बाणांनीं युद्ध करीत असे. ह्यावरून बाणांनीं युद्ध करणारांची पायरी जरा वरचढ दिसते. राक्षस कोणतीं हत्यारें वापरीत हें खालील श्लोकावरून समजेल. " मुद्गरैरायसैः शूलैः प्रासैः खड्गैः परश्वधैः । राक्षसाः समरे शूरं निजघ्नू रोषतत्पराः ॥ " रामाच्या बाणांचें वर्णन खालील श्लोकांत केलेलें आढळतें. " ततः कनकपुङ्खैस्तु शरैः सेनतपर्वभिः । चिच्छेद रामः संक्रुद्धः खरस्य समरे ध्वजम् ॥" ह्याप्रमाणें युद्धासंबंधीं जी थोडीबहुत हकीकत रामायणांत आढळली ती येथें दिली आहे.

11 JAN 1994

रामायणासंबंधानें वादविषयक प्रश्नांची चर्चा पुढील भागांत करण्याचा इरादा होता; परंतु कांहीं आगन्तुक कारणांमुळें प्रस्तुत तो बेत रहित करणें भाग पडलें. पुढें साधल्यास ते भाग तयार करितां येतील. रामायणासंबंधानें सर्व गोष्टी एके ठिकाणीं याव्या असा हेतु होता. पण तूर्त तरी तो सिद्धीस जाईलसें दिसत नाहीं. तथापि, एकंदर जनसमूहाला हाच भाग बोधप्रद होईल. रामायण वाचीत असतां लक्षांत ठेवण्यासारखीं वचनें खुणा करून ठेविलीं होतीं. तींच वर्गीकरण करून प्रसिद्ध केल्यास आपल्या प्राचीन समाजाची बरीच माहिती होईल असें वाटल्यावरून हा उद्योग केला आहे. तो वाचकांना ग्राह्य होईल अशी आशा आहे.

श्रीमंत सौ. गं. पं. वाचनालय, मोरे

# ३ चरित्रनायकाच्या गुणांबरोबर दोषांचें वर्णन करावें कीं नाहीं ?

सदरहू विषयावर एक लहानसा लेख 'विविधज्ञानविस्तार' मासिक पुस्तकाच्या गेल्या सालच्या आगष्ट महिन्याच्या अंकांत, रा. देव यांनीं लिहिला आहे. त्यांत ह्या वादग्रस्त विषयाच्या दोनही पुरस्कर्त्यांचीं मतें देऊन आपला स्वतःचा अभिप्रायही त्यांनीं ध्वनित केला आहे. विषय फार महत्वाचा असून मराठी वाङ्मयांत तद्विषयक विवेचन साकल्यानें करण्याचा फारसा प्रयत्न झालेला नसल्यागुळें, रा० देव ह्यांचा लेख वाचल्यावर त्यांत जी आमच्या समजुतीप्रमाणें अपूर्णता दिसली तिचें उद्घाटन करून रा० देव ह्यांच्या लेखांत भर घालण्याचा आमचा विचार आहे.

चरित्रांत विषयनायकाच्या गुणांबरोबर त्याच्या दोषांचें वर्णन करावें कीं नाहीं ह्या प्रश्नाचें उत्तर निश्चित करण्यापूर्वी चरित्रलेखनाचा उद्देश मनांत आणणें अवश्य आहे. त्याशिवाय वरील सामान्य प्रश्नाचें उत्तर सामान्य अतएव निष्फल झाल्याविना राहणार नाहीं.

ज्या व्यक्ति समाजास पूज्य होतात; देहविसर्जनानंतरही कीर्तिरूपानें ज्या ह्या नश्वर जगांत अनश्वरत्व पावतात; ज्यांत जन्म घेतला त्या समाजास उपकारबद्ध करण्याचें सामर्थ्य ज्यांच्यांत असतें अशा व्यक्तींच्या अंगीं कांहीं विशिष्ट गुण अगर गुणबाहुल्य असावें लागतें. हे गुण कोणते, त्यांचा उद्भव व विकास कसा झाला, इष्टकार्याला ते कितपत कारणीभूत झाले इत्यादि महत्त्वाच्या बाबींचें विवेचन चरित्रलेखकास प्राधान्येंकरून करावयाचें असतें. चरित्रलेखकानें चरित्र लिहितांना अशी खबरदारी घेतली पाहिजे कीं, चरित्रांत चरित्रनायकाच्या अंगचा विशिष्ट गुण पदोपदीं दृश्यमान व्हावा. इतर गोष्टींचा उहापोह केला तरी तो ह्या उद्दिष्ट हेतूला पोषक होईल अशाच रीतीनें केला पाहिजे. तात्पर्य, चरित्रनायकाच्या अद्वि-

तीय गुणाची जर योग्य परीक्षा लेखकास झाली नाहीं, अगर तो गुण विशेष दृष्टीसमोर ठेवून जर चरित्र लिहिलें गेलें नाहीं, तर तें चरित्र अगदीं नीरस झाल्याशिवाय राहणार नाहीं. मराठीवाङ्मयांत अशा नीरस चरित्रांचा भरणा कमी आहे असें नाहीं. मोठा मनुष्य असला कीं लिहा त्याचें चरित्र व चरित्र लिहावयाचें म्हणजे चरित्रनायकासंबंधी उपलब्ध होतील तितक्या गोष्टी एकत्र गुंफावयाच्या असाच क्रम सामान्य प्रतीच्या चरित्रलेखकांचा दिसतो. कित्येक चरित्रें तर अशीं निघतील कीं नायकाच्या कोणत्या विशिष्ट गुणांला मोहित होऊन लेखकानें त्याचें चरित्र लिहिण्यास प्रारंभ केला, ह्याचा उलगडा संबंध चरित्र वाचूनही होणें दुर्घट जाईल.

उपरिनिर्दिष्ट चरित्र लिहिण्याची तऱ्हा जर मान्य होण्यासारखी असेल, तर चरित्रांत नायकाच्या अंगीं असलेल्या दोषांनें वर्णन करावें कीं नाहीं ह्या प्रश्नाचा निकाल लावण्यास कठीण जाणार नाहीं. कारण, दोषनिरूपणानें मुख्य गुणाची हानि अंशतःसुद्धां होण्याचा संभव नसल्यास त्या दोषाचा निर्दोष अप्रस्तुत असल्यामुळें सन्मान्य चरित्रांत त्याला जागा मिळणेंहि रास्त नाहीं, मग त्याचा उहापोह करण्याची गोष्टच काढावयास नको. उदाहरणार्थ, कांहीं थोर पुरुषांच्या ठिकाणीं आपण कांहीं सदोषता कल्पून तिचा उल्लेख त्यांच्या चरित्रांत कितपत साजला असता ह्याचा विचार केला म्हणजे अप्रस्तुत दोषोद्घाटनाची अनुपयुक्तता तेव्हांच निदर्शनास येते. अमेरिकेला स्वातंत्र्य प्राप्त करून देणाऱ्या वाशिंगटनच्या चरित्रांत त्याच्या हातून एके प्रसंगीं परस्त्रीगमनासारखा अत्याचार झाला होता, ह्या आपण कल्पिलेल्या दोषाचा उल्लेख केवळ अप्रस्तुत व म्हणूनच निंद्य होय. ज्या गुणांच्या जोरावर तो अमेरिकन लोकांस स्वतंत्रता देण्यास कारणीभूत झाला त्या गुणांची त्याच्या एकवार परस्त्रीगमनानें किंचित्ही हानि होण्याचा संभव नाहीं; ह्या दोषनिदर्शनानें चरित्रकार आपल्या वाचकांस काय बोध घ्यावयास सांगणार ? जॉर्ज वाशिंगटन हा कोणी देवमाणूस नव्हता, मनुष्यच होता व इतर मनुष्याप्रमाणें त्याच्या ठिकाणीं गुणवैकल्य होतें हेंच कीं नाहीं ? पण आपल्या दत्तक देशास परावलंबनांतून मुक्त करणारा वाशिंगटन ह्याचीं खासगी कृत्यें येथून तेथून सर्व दोषवर्जित असलीं पाहिजेत; त्याशिवाय त्यास इतका पराक्रम करितां येणार नाहीं असें मानणारे दुधखुळे वाचक फार निघण्याची भीति नको.

वॉशिंग्टन, शिवाजी, नेपोलिअन इत्यादि राज्यपटु वीरांचीं चरित्रें वाचण्याची लालसा प्रत्येक विद्याभिलाषी माणसास असते. म्हणून त्यांच्या चरित्रांत सदोष अंगाचा उल्लेख एक वेळ चरित्र पूर्ण करण्याकरतां केला आहे म्हणून क्षम्य मानतां येईल. कारण या थोर व परमपूज्य नायकांसंबंधीं प्रत्येक गोष्ट त्यांच्या अद्वितीय पराक्रमामुळें, जाणण्याची उत्कंठा प्रत्येकास असते. परंतु कांहींचीं चरित्रें त्यांच्या विशिष्ट गुणामुळें विशिष्ट वर्गालाच प्रिय असतात. नाईल नदीचा उगम शोधणारा, हिमालयाच्या उच्चतम शिरावर आरूढ होणारा, नवी वसाहत करणारा, सुएझ कालव्यासारखे प्रचंड कालवे खणून जलमार्ग सुगम करणारा, विमानांची कल्पना काढून वातावरणांत विहंगमाशीं स्पर्धा करणारा, तारेच्यासुद्धां साहाय्यावांचून इकडला संदेश तिकडे पाठवण्याची हांव धरणारा, इत्यादिकांसारख्यांचीं चरित्रें तत्तद्व्यासंगी लोकच विशिष्ट उद्देशानें वाचीत असतात. अशा चरित्रांत नायकांचे साद्यंत दोष अगर अवगुण वर्णन करण्याचा खटाटोप निष्कारणी होय. तात्पर्य, चरित्रांत नायकाचे दोष वर्णन करावे कीं नाहीं हें ठरवितांना तें चरित्र साऱ्या जनसमूहाकडून अथवा विशिष्ट वर्गाकडूनच वाचलें जाण्यासारखें आहे ह्याचा विचार केला पाहिजे.

तसेंच जें दोषनिदर्शन एका चरित्रांत त्याज्य ठरेल तेंच दुसऱ्या चरित्रांत केवळ प्रासंगिकच नव्हे तर अवश्य समजलें जाईल. आपल्या चलाख बुद्धिमत्तेच्या जोरावर हायकोर्टांत उत्कृष्ट वकीली करून नांवारूपास आलेल्या गृहस्थांचें तेवढ्याचकरितां चरित्र लिहिणें झाल्यास त्यांत त्यांच्या वैश्यासहचारित्वाचा अथवा मदोत्पादक पदार्थसेवनलोलुपतेचा उल्लेख न केल्यास फारसें बिघडणार नाहीं. पहिला अत्याचार तर अप्रस्तुत म्हणून अग्राह्यच ठरेल. परंतु ह्याच गोष्टी एखाद्या प्रमुख प्रार्थनासमाजस्थापकाच्या चरित्रांत वगळणें म्हणजे जाणून बुजून असत्याचा अंगीकार केल्याचें पाप लागणार आहे, व अशा वगळण्यानें चरित्रावर अपूर्णतेचा दोष येईल तो निराळाच.

वरील उदाहरणावरून वाचकांच्या लक्षांत आलेच असेल कीं, एकाच माणसाचीं निरनिराळीं चरित्रें वेगवेगळ्या दृष्टीनें लिहितां येतील. कै० आपटे हे कोणत्या गुणांनीं अत्युत्तम वकील बनले हें प्राधान्येंकरून ज्यांत वर्णिलें आहे असें एक चरित्र आणि दुसरें ज्यांत त्यांच्या धार्मिक मतांतराचा ऊहापोह विशेषेंकरून केला आहे असें लिहितां येईल. दुसऱ्या चरित्रांत त्यांच्या

सर्व गुणावगुणांचा निर्देश चरित्रकारानें स्पष्टपणें करणें अगत्याचें आहे. ह्यावरून आमचें असेंही म्हणणें आहे कीं, चरित्रांत कोणताही दोष प्रस्तुत असल्यास बगळणें बरें नाहीं. 'ज्या दोषाचें नामाभिधान नुसतें उच्चारण्यास मूर्तिमंत निंदेसही लज्जा वाटते, इतिहास ज्यांकडे नुसता दृष्टिक्षेप करण्यासही धजत नाहीं, सर्व प्रकारच्या मानवी मूर्तिमंत भ्रष्टतेच्या रसातळास जाऊन पोहोंचलेल्या जीवानें ज्यांकडे नुसता दृष्टिपात केला तरी देखील त्यास ओकारी आल्यावांचून राहत नाहीं' अशा वर्गांतील दोषांचा नामनिर्देशही चरित्रांत उपयोगाचा नाहीं, असें मेकाले साहेबांचें मत रा० देवांनीं दिलें आहे. परंतु मेकॉले साहेबांच्या ज्या कित्येक अतिशयोक्ति आहेत त्यांपैकींच ही एक समजली पाहिजे. अगोदर असे नीच दोष कोणते तें समजत नाहीं, व दुसरें, असे दोष चरित्र लिहिण्यास पात्र झालेल्या माणसांत क्वचित् आढळतील. त्यांतूनही जर असलेच तर ते प्रस्तुत असल्यास त्यांचा अवश्य निर्देश झाला पाहिजे. साधुसंत म्हणून जो कांहीं लोकांस पूज्य झाला त्याच्यांत जर मेकॉले साहेब म्हणतात असे कांहीं दोष अथवा दुर्गुण लेखकांस खात्रीपूर्वक सिद्ध करतां येतील, तर ते दोष दाखवून त्याच्या साधुपदास गौणत्व येतें असें म्हणण्यास काय हरकत आहे आम्हास तरी कळत नाहीं. एखाद्या यन्त्रशोधकाच्या चरित्रांत त्यानें एकादे प्रसंगीं हलकटपणाचें कृत्य केलें असल्यास त्याचा उल्लेख नसावा हें म्हणणें ठीक आहे, पण नीतितत्त्ववेत्याच्या चरित्रासंबंधानें हें म्हणणें कधींही सयुक्तिक होणार नाहीं.

जे दोष दुर्गुणाभिधान पावतात, त्यांचा उल्लेख जर कित्येक प्रसंगीं अपरिहार्य होतो, तर दोषसुद्धां म्हणतां न येणारे जे अवगुण त्यांचा निर्देश करणें भाग आहे. असे अवगुण बारीकसारीक गोष्टीवरून जसे सिद्ध होतात तसे लौकिक गोष्टीवरून होत नाहींत. म्हणून दिसण्यांत क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टींचाहि स्फोट चरित्रांत लेखकानें अवश्य केला पाहिजे. उघडच आहे कीं, मनुष्याच्या स्वभावाचें प्रतिबिंब त्याच्या वर्तनांत अगर कृतींत दृश्यमान होतें. एवढ्याकरितां त्याची कोणतीहि कृति उपेक्ष्य मानतां कामा नये. मात्र तिचा उल्लेख प्रासंगिक पाहिजे. रावबहादुर रानड्यांची देशावर अगर अर्थावर जास्त भक्ति होती हा त्यांच्या चरित्रांत प्रस्तुत मुद्दा असल्यास अर्थभक्ति सिद्ध करणाऱ्या त्यांच्या पुष्कळ बारीकसारीक

गोष्टींचा निर्देश करणें अवश्य आहे. सामाजिक सुधारक ह्या नात्यान त्यांच्या प्रौढपणीं कुमारिकाविवाह करण्याच्या कृत्याचा निर्देश न करणें अशक्य आहे. मोठ्या माणसांच्या ठिकाणीं निष्कारण दोष लादण्याकडे जशी कित्येकांची प्रवृत्ति असते तशी वास्तविक दोष तोंडांतून न उच्चारण्याकडे दुसऱ्या कित्येकांची असते हेंहि येथें प्रसंगोपात्त सांगणें जरूर आहे.

" कविचरित्रांतील " ॲडिसनच्या चरित्रांत जॉनसननें त्याच्या दोषनिदर्शक कृत्यांचा उल्लेख केला आहे. ॲडिसनचे हे दोष इतके ठळक आहेत कीं, ते त्याच्या चरित्रांत न येणें अपरिहार्य आहे. ॲडिसन हा मोठा निबंधकार व नीतितत्त्ववेत्ता होता व अशाच दृष्टीनें त्याचें चरित्र लिहिलें जाणार. दुसऱ्याच्या वर्तनावर टीका करून तें सुधारण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या माणसास स्वतःचें वर्तन कलंकहीन करितां येईना हा मुद्दा प्रस्तुत चरित्रांत अगदीं अवश्य आहे. तसेंच ज्याला आपण आपला मित्र म्हटला त्यास थोड्याशा रुपडक्यांकरितां कोर्टांत खेंचणें हें कृत्य मनाच्या अनुदारतेचें व असहृदयतेचें स्पष्ट व्यंजक आहे.

" कविचरित्रें " हीं पूर्ण चरित्रें नव्हत. जॉनसननें प्रथम केवळ प्रास्ताविक लेख लिहिण्याचें ठरविलें होतें. हेच लेख पुढें लिहितां लिहितां विस्तृत झाले एवढेंच. प्रास्ताविक चरित्रात्मक लेखांत आणि पूर्ण चरित्रांत फरक आहे. पहिल्या प्रकारचीं चरित्रें कोणत्याही उद्देशानें लिहिलीं नसतात. वाचकांना त्या व्यक्तीची त्रोटक माहिती देण्याचाच नियमित संकल्प चरित्रलेखकानें केलेला असतो. अशा चरित्रांत प्रस्तुत अप्रस्तुत हा भेदाभेद राहत नाहीं. कोणतीही ठळक गोष्ट—मग ती चांगली असो अगर दोषास्पद असो—वगळली नाहीं म्हणजे झालें. कै० मंडलीक ह्यांचे लेख व भाषणें ग्रंथरूपानें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांस रा० पाध्यानीं जें इंग्रजींत लिहिलेलें चरित्र जोडलें आहे तें प्रास्ताविक आहे. आधुनिक कवींचीं निवडक काव्यें ग्रथित होऊन प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांत कवींचीं संक्षिप्त चरित्रें दिलीं आहेत. ' बालबोधां'तील चरित्रें अशाच मासल्याचीं असतात. अशा प्रकारच्या चरित्रांत चरित्रनायकाचे दोष वर्णिलेच पाहिजेत, अशी जबाबदारी लेखकावर असण्याचें कारण नाहीं. तथापि ठळक अशा दोषाहि कृत्यांचा उल्लेख केल्यास तोही अस्थानीं म्हणतां येणार नाहीं.

त्यांतल्यात्यांतही 'बालबोधां'तील चरित्रांत दोषवर्णन येऊं नये असेंच आम्हांस वाटतें. कारण 'बालबोधां'तील चरित्रें ही अल्पवयस्क व परप्रत्ययनेय अशा बालांनीं वाचावीं ह्या उद्देशानें लिहिलेलीं असतात. परिपक्व बुद्धीच्या, स्वतंत्र विचारांच्या प्रौढ माणसांकरितां तीं लिहिलेलीं नसतात. ह्या चरित्रांच्यायोगानें लहान मुलांस थोर पुरुषांची ओळख करून द्यावयाची असते. ते आपल्या अंगच्या गुणांनीं व कर्तृत्वशक्तीनें बहुमानास चढले तसे आपण चढूं; त्यांनीं स्वार्थत्याग करून देशकार्य केलें तसें आपण करूं अशी भावना चरित्रवाचनानें मुलांच्या मनांत जागृत करावयाची असते. त्यांच्या ठिकाणीं स्फूर्ति व उत्साह ह्यांचें आरोपण करावयाचें असतें. त्यांस प्रौढ वयांत अभ्यासण्यास योग्य असें मानसशास्त्र शिकवावयाचें नसतें. अप्रस्तुत अशा दोषवर्णनानें उत्साह व स्फूर्ति ह्यांचा अंशतः तरी भंग झाल्याशिवाय रहाणार नाहीं. तात्पर्य, मुलांकरितां जीं चरित्रें लिहावयाचीं त्यांत चरित्रनायकाच्या दोषांचें वर्णन टाळणेंच श्रेयस्कर आहे.

वरील विवेचनावरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, प्रस्तुत प्रश्नाचा निकाल लावतेवेळीं, कोणाकरतां चरित्रें लिहिलेलीं आहेत ह्याचाही विचार करणें अवश्य आहे; व ह्या विचारावरच त्या प्रश्नाचा निर्णय एकाबाजूनें अवलंबून रहाणार आहे. कोणाकरितां व कोणत्या उद्देशानें चरित्र लिहावयाचें आहे ह्याची स्पष्ट कल्पना चरित्रलेखकास झाली पाहिजे. म्हणून सुधारणेच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर असलेल्या समाजांत एकाच नियमानें चरित्रें लिहिणें कधींही हितकारक व्हावयाचें नाहीं. सुशिक्षित, संपन्न व स्वास्थ्य उपभोगणाऱ्या समाजांत चरित्रनायकाच्या दोषांचें वर्णन त्यांच्या गुणांबरोबर करण्यास कांहीं हरकत नाहीं. तेथें कोणत्याही गोष्टीच्या सर्व बाजूंचा शांतपणें विचार करण्यास लोक पात्र असतात. समाजाला स्थैर्य प्राप्त झाल्यामुळें, चरित्रलेखनानें समाजांत कोणत्याही विशिष्ट कल्पनांचा प्रक्षोभ करावयाचा नसतो. कोणत्याही गुणानें लोकादरास प्राप्त झालेल्यांची इत्थंभूत हकीकत समजून घेण्याची लोकांची उत्कटेच्छा तृप्त करणें हाच अशा समाजांत चरित्रलेखनाचा प्रधानहेतु असतो. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका ह्या देशांत चरित्रनायकाचे दोष यथातथ्य वर्णन करून चरित्रें लिहिण्यास हरकत नाहीं. पण रशिया, चीन अथवा हिंदुस्थान यासारख्या अज्ञानरूपी महानिद्रेंतून जागृत होऊं पाहणाऱ्या देशांत, गुणांबरोबर

दोषांचाही परिस्फोट करून थोर व पराक्रमी पुरुषांचीं चरित्रें लिहिणें केव्हांहि श्रेयस्कर होणार नाहीं. अशी चरित्रें लिहितांना लेखकानें तारतम्याचा उपयोग अवश्य केला पाहिजे.

ह्याच कारणामुळें, ठाणें येथील ग्रंथसंग्रहालयाच्या वार्षिक समारंभाच्या प्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें रा० महाजनी ह्यांनीं गुदस्ता कै० चिपळूणकर यांच्यासंबंधानें जे उद्गार काढले ते अप्रयोजक म्हटल्यावाचून राहवत नाहीं. इतर चरित्रनायकांच्यासंबंधानें प्रस्तुत वादाचा निर्णय कसाही लागो; पण राष्ट्रांतील परमपदारूढ विभूतीसंबंधानें विचार करतां या प्रश्नाचें उत्तर एकच असलें पाहिजे. महाराष्ट्रांत अशा विभूती दोन होत. एक शिवाजी महाराज व दुसरे विष्णुशास्त्री चिपळूणकर. विष्णुशास्त्री हे महाराष्ट्राचे खरे नायक होत. महाराष्ट्रांतील सर्व लोकांच्या विचारांचा ओघ बदलून इष्ट-मार्गाकडे नेण्याचें अद्वितीय कार्य त्यांनीं केलें आहे. आज प्रत्येक महाराष्ट्रीयाला ते पूज्य आहेत. महाराष्ट्रांतील तरुणांची तर त्यांच्यावर अनुपम भक्ति आहे. शास्त्रीबोवांच्या लेखांची छाप ज्याच्यावर बसली नाहीं असा एकही विचारशील प्राणी ह्या महाराष्ट्रांत तरी निघणार नाहीं. चिपळूणकरांच्या विचारांचें प्रतिबिंब आज प्रत्येकांच्या कृतींत व उक्तींत दिसत आहे. ह्याप्रमाणें निखिल महाराष्ट्रीयांस दीपस्थानीं झालेल्या थोर व्यक्तीचे काल्पनिक अगर अकाल्पनिक दोष विकाराभिनिविष्ट जनतेच्या समोर उच्चारण्यानें आपण महाराष्ट्राची केवढी हानि करीत आहों ह्याची थोडी बहुत कल्पना जर रा० महाजनींस असती तर आम्हांस वाटतें त्यांच्या हातून अशी चूक झाली नसती.

ज्या व्यक्तीनीं राष्ट्राला कायमचें इष्ट वळण लावलें, ज्यांच्या पश्चात्ही लोक त्यांचें अनुकरण उत्साहपूर्वक करीत आहेत, व विशेषतः हें अनुकरण जोंपर्यंत राष्ट्राभिवृद्धीस श्रेयस्कर आहे, तोंपर्यंत तरी निदान अशा व्यक्तीचे दोष अगर अवगुण वास्तविक असले तरी चरित्रांत न आणणें एकंदरींत देशाच्या फायद्याचें आहे. ज्याच्याविषयीं आपल्या मनांत अत्यंत पूज्यबुद्धि वसत असते अशा माणसासंबंधी एकादी वाईट गोष्ट जर आपल्या कानीं आली तर त्या माणसाबद्दलची पूज्यबुद्धि कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं. एवढेंच नव्हे, तर त्याच्यांतील गुणांचें आपल्या ठिकाणीं अबुद्धिपुरःसर होणारें जें संक्रमण त्यास व्यत्यय आल्यावांचून चुकत नाहीं. हा अनुभव प्रत्येकास असतोच. हीच

गोष्ट राष्ट्रासही लागू पडते. राष्ट्रीय पुरुषांच्या अंगच्या गुणांचें लोकांनीं अनुकरण करावें, हा जो अशा पुरुषांचें चरित्र लिहिण्याचा मुख्य हेतु तो निष्फल होतो. विचारांपेक्षां विकारांचें प्राबल्य मनुष्यावर नेहमीं असणारच. सामान्यजनसमूहावर तर तें फारच असतें. सबब अशा प्रकारचीं चरित्रें राष्ट्रप्रगतीस विघातक होत. चिपळूणकर गर्विष्ठ होते, ढोंगी होते, त्यांचे खरे विचार त्यांच्या लेखांतून प्रकट केलेल्या विचारांहून भिन्न होते, इत्यादि खऱ्या खोट्या गोष्टी चरित्रांत आल्यास त्यांच्याविषयीं पूज्यबुद्धि लुप्तप्राय होईल. तसें झालें असतां त्यांचे लेख वाचण्याकडे कोणाची प्रवृत्ति होणार नाहीं. अर्थात् त्यांच्या गुणांचें आरोपणही कोठें होण्याचा संभव नाहीं. मग देशांत जागृति उत्पन्न कशी होणार ? रा. महाजनी ह्यांच्या भाषणावर 'केसरींत' जी कडक टीका आली होती ती अगदीं योग्य होती असें प्रत्येक दूरदर्शी मनुष्यास मान्य करणें भाग आहे. रा० महाजनींच्या एतद्विषयक उद्गारांच्या दुष्परिणामांची अटकळ दुसऱ्या वर्तमानपत्रकारांस करतां आली नाहीं हें दुर्भाग्य होय. कै० मण्डलिक, तेलंग, रानडे इत्यादिकांच्या चरित्रांत गुणां. बरोबर पाहिजेतर दोषांचें वर्णन करा. परंतु राष्ट्रनायकांच्या चरित्रांत राष्ट्रप्रगतिविघातक दोषवर्णन केव्हांही येतां कामा नये.

हाच नियम धार्मिक बाबतींत पूज्य असलेल्या देवतातुल्य विभूतींना लागू पडतो. आम्हांस सर्व आर्यांस रामचरित्र परम पूज्य वाटतें. रामाचें एकपत्नीव्रत, स्वप्रजानिष्ठा, सत्यप्रीति इत्यादि गुणांनीं ह्या चरित्रानें लोकांवर आपला पूर्ण अंम्मल बसवला आहे. अशावेळीं निष्पाप व शूर अशा रामाच्या अंगीं नसते आरोप लादण्याचा कधीं कधीं झालेला बालिश प्रयत्न पाहून आश्चर्य वाटतें. चांगलें आहे तें काढून टाकून त्याच्या ऐवजीं त्याहून चांगलें आपण कांहीं ठेवीत नाहीं हें अशा दोषदर्शकांनीं कधींही विसरतां कामा नये.

सारांश नायकाचे दोष दाखवितांना लेखकानें आपण कोणाचें चरित्र लिहित आहों, काय उद्देशानें लिहित आहों व कोणत्या काळांत लिहित आहों ह्याचा विचार अवश्य केला पाहिजे. असा उद्देश निश्चित केला म्हणजे प्रस्तुत कोणतें अप्रस्तुत कोणतें हें पाहिलें पाहिजे. दोष जर चरित्रांत प्रस्तुत असतील तर त्यांचा अन्तर्भाव अवश्य झाला पाहिजे. अप्रस्तुत असल्यास त्यांचा निर्देश करण्याचें कारण नाहीं.

# ४ कोर्टसंचार.



ह्या देशांत इंग्लिशांचा अंमल सुरू झाल्यापासून राज्यव्यवस्थेंतील इतर अंगाप्रमाणें न्यायपद्धतिसुद्धां इंग्लिश धर्तीवर चालू झाली आहे. ह्या पद्धतीची आपणांस इतकी संवय झाली आहे कीं, ह्या व्यतिरिक्त दुसरी एखादी पद्धति असणें शक्य आहे कीं नाहीं, आणि असल्यास तिच्यांत जास्त चांगुलपणा असेल कीं नाहीं ह्याची प्रत्येकास शंका येत असते. परंतु दुरभिमान सोडून क्षणभर सूक्ष्म विचार केल्यास प्रचलित पद्धति सदोष आहे हें कबूल करणें प्रत्येकास भाग पडेल असें आम्हांस वाटतें, व त्याचप्रमाणें अर्वाचीन पद्धतीहून भिन्न अशाही पद्धति पूर्वी होत्या व सांप्रत आहेत हें इतिहासज्ञांस सांगण्याची जरूर नाहीं.

फार प्राचीन काळीं न्यायाचें काम कोणत्या रीतीनें चालत असे ह्याचें थोडेंबहुत अनुमान स्मृतींवरून–विशेषतः नारदस्मृतीवरून—करतां येण्यासारखें आहे. ह्यांत निर्दिष्ट केलेले कानू अर्वाचीन कानूंशीं बऱ्याच अंशानें जुळण्यासारखे आहेत. त्याचप्रमाणें मृच्छकटिकांतील खुनाबद्दल चारुदत्ताची चौकशी करणारा न्यायाधीश हल्लींच्या हायकोर्टांतील खुर्चीवर बसण्यास अगदींच अपात्र होता असें म्हणतां येणार नाहीं.

अलीकडे म्हणजे मुसलमानी किंवा मराठ्यांच्या अमदानींत न्यायपद्धतीचें स्वरूप काय होतें ह्याची सविस्तर माहिती अद्यापि उपलब्ध नाहीं ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. मराठ्यांच्या इतिहासाचें संशोधन करीत असतां एतद्विषयक जुने लेख प्रसिद्ध कां होऊं नयेत हें समजत नाहीं. ह्या संशोधकांत कोणी कायदेपंडित नाहीं हें एक त्याचें कारण असूं शकेल. खरें म्हटलें तर असले कागद संरक्षण करून ठेवण्यांत प्रत्येकाचें हित असल्यामुळें ते मिळण्यास फारशी अडचण पडूं नये. जुने ठराव, समानें वगैरे थोडेबहुत कागद जे आमच्या पाहण्यांत आले आहेत त्यावरून ह्या दिशेनें

प्रयत्न करणारांस फार अडचण पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. असो. एवढें मात्र निश्चित कीं, कोणत्याही खटल्याचा निकाल ग्रामाधिकाऱ्याकडून पूर्वी होत असे. एकाहून अनेक असे अभिज्ञ ग्रामाधिकारी, गांवांतील इतर सभ्यगृहस्थांच्या मदतीनें गांवांतील तंट्याचा निकाल करीत. हे निकाल हल्लींच्या कोर्टांच्या निकालांहून अधिक समाधानकारक असले पाहिजेत ह्यांत संशय नाहीं. कायद्यानें जखडलेल्या, तीन तीन वर्षांनीं स्थानांतर पावणाऱ्या अनभिज्ञ अशा हल्लींच्या भाडोत्री न्यायाधीशाकडून खरा न्याय मिळणें मुष्किलीचें झालें आहे.

ग्रामसंस्थांची रचनाच अशी असे कीं, त्यांत अन्याय होण्याची भीति फार कमी असे. न्यायाचें काम अनेकांच्या हातीं असल्यामुळें पक्षपातीपणा होण्याचा संभव कमी असे. त्याचप्रमाणें गांवांतील लोकांची व त्यांच्या भांडणाची माहिती असल्याकारणानें त्यांच्या ठरावांस एकप्रकारचा भारदस्तपणा येई, व अशा स्थितींत न्याय करण्याची पात्रता अंगीं येण्यास फारशी विद्वत्ता पाहिजे असेंही नाहीं. कोणत्याही सामान्य बुद्धीच्या माणसास परस्परांतील तंटे तोडण्यापुरती शक्ति असते. कायद्याची व्याख्या आरिस्टाटलनें केली आहे त्यावरूही हेंच सिद्ध होतें. तो म्हणतो मनोविकारांनीं ग्रस्त न होतां जो सारासार विचार तोच कायदा law is reason-without Passion. अमेरिकेंत न्यायाधीशास येण्यास विलंब लागल्यास कोर्टांत हजर असलेल्या कोणत्याही मनुष्यास दोन्ही पक्षकार न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसावयास सांगून त्याच्याकडून आपल्या तंट्याचा निकाल लावून घेतात. ह्यावरून वरील म्हणण्यास बळकटी येते. सारांश, खरा न्याय मिळण्याचा संभव मागील पद्धतींत जितका होता तितका हल्लींच्या पद्धतींत दिसत नाहीं.

ग्रामाधिकाऱ्यांशिवाय निरनिराळ्या ठिकाणीं पूर्वी न्यायाच्या कामीं मुद्दाम माणसें नेमलेलीं असत. मुख्य न्यायाधीशाशिवाय बाकीच्या खालच्या न्यायाधीशास न्यायाधीशाकडील कारकून असेंही म्हणत; असें वाटतें. शिवाय पेशव्यांकडे तंटा गेला असतां ते त्या विशिष्ट कामाचा निकाल करण्यासाठीं मुद्दाम एखादा माणूस नेमीत असेंही इतिहासावरून दिसून येतें. मुसलमानी अमदानींतील फारशी शब्द सांप्रतही कोर्टांतून वापरले जातात. उदाहरणार्थ; सदरअमीन, मुन्सफ, निशाणी, कैफियत, तकरार, फैसल्ला

इत्यादि. ह्या शब्दांवरूनसुद्धां न्यायाचें काम पूर्वी कसें चालत असे ह्याची अंशतः कल्पना करतां येईल.

न्यायगृहें, न्यायाधीश, वकील, पक्षकार, साक्षी आणि कायदा इतके हल्लींच्या न्यायपद्धतीचे घटकावयव होत. अर्थात् हे सर्व घटकावयव ज्या प्रमाणानें चांगले असतील त्या प्रमाणानें खरा न्याय मिळण्याचा संभव जास्त. परंतु असा योग क्वचित्च घडतं असल्यामुळें, सत्य बाहेर येणें दुर्घट झालें आहे.

१ प्रथमतः न्यायगृहांचा आपण विचार करूं. न्यायगृहांच्या रचनेचा पुढें होणाऱ्या निकालावर परिणाम घडतो हें वाचून पुष्कळांस आश्चर्य वाटेल व मानसशास्त्रानभिज्ञ लोकांस असें वाटणें साहजिक आहे. ह्या इलाख्यांतलि अधिकारीही अशा लोकांहून निराळ्या मनोवृत्तींचे आहेत असें मानण्यास कारण नाहीं. कारण कित्येक जिल्ह्यांतील कोर्टें इतकीं घाणेरडीं आहेत कीं, तेथें गेल्यावर तेथून केव्हां निघेन असेंच जाणारास झालें पाहिजे. पुष्कळ ठिकाणीं तर सरकारी कोर्टें बांधलेलीं नाहींत. अशा स्थळीं कचेरीच्या सोईची इमारत नसल्यानें इमारतीच्या सोईनें कचेरीचें काम करण्याचा प्रसंग येतो. न्यायदेवतेच्या पदकमलांचे एकनिष्ठ सेवक म्हणूनच कीं काय न्यायालयांत न्यायाधीशास व इतरांस नम्रतापूर्वक वांकून चालावें लागतें. त्याचप्रमाणें प्राचीन स्टोईक ( सर्वसह ) तत्ववेत्यांचे पट्टशिष्य बनविण्याकरितांच जणूं काय न्यायाधीशाच्या दृष्टीसमोर मलिन साहित्य व देखावा पडेल अशी खबरदारी घेतलेली असते. कोर्टांत बसण्यास जागा नाहीं एवढ्याच कारणाकरितां त्या कोर्टांत वकीली करण्याची परवानगी देतां येत नाहीं असा शेरा होतकरू वकीलांच्या अर्जावर मारण्याचा प्रसंग कित्येक डिस्ट्रिक्ट जजांस येत असेल. सूर्य आपलें तेज फाजील फांकतो अशा समजुतीनेंच कीं काय प्रकाशहीन अशा कांहीं न्यायगृहांतून कांच बसवून नेमस्त प्रकाश कृत्रिम उपायांनीं फक्त न्यायाधीशाच्या टेबलापुरता घेतलेला असतो. अशा कोर्टांत बसण्याचा प्रसंग आल्यानें बसणाराचा उत्साहभंग होतो व त्यामुळें त्याच्या हातून उत्कृष्ट काम होण्यास विघ्न येतें. ह्या उघड गोष्टीकडे अद्यापि दुर्लक्ष कां केलें जावें समजत नाहीं. मन जर आनंदित नसेल तर महत्वाचीं कामें उरकण्यास

अवश्य जी एकाग्रता ती असूं शकत नाहीं. न्यायखात्यापासून एकंदरींत फायदा असतां असलीं जुनाट भाडोत्री कोर्टें अद्यापि रहावीं हें आश्चर्य आहे.

कोर्टाच्या ज्या नवीन इमारती सरकारनें बांधल्या आहेत त्याही सर्व सोईच्या व सशास्त्र आहेत असें नाहीं. प्रथमतः ह्या इमारती फार लहान बांधल्या गेल्या आहेत, म्हणजे चेम्बर, काम चालतें ती जागा, वकीलांची खोली इत्यादि कांहीं भाग जास्त विस्तृत असावयास पाहिजेत. नैसर्गिक अवश्यकतेच्या सोयीही पुष्कळ ठिकाणीं असत नाहींत. खुर्च्या, जाजमें, टेबलें, गाद्या, लोड इत्यादि सामान स्वच्छ, सुंदर व नवीन फारच थोडक्या कोर्टाच्या नशीबीं येतें. ह्या बाबतींत डिस्ट्रिक्ट जजांचे सल्लागार डिस्ट्रिक्ट कोर्टातील नाझर ह्यांस जबाबदार धरणें गैरवाजवी होणार नाहीं. नाझर, शिरस्तेदार, हेडक्लार्क हीं माणसें अशिक्षित असल्यामुळें कोत्या मनाचीं असतात. परंतु त्यांच्या शिक्षणाच्या मानानें त्यांच्याकडे जो अधिकार असतो तो फार मोठा असतो; तेव्हां तो अधिकार त्यांस नीट बजावतां आला नाहीं तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. गादी, तक्या, जाजम वगैरे सामान स्वच्छ असेल तर कारकुनांच्या हातून काम जास्त होण्याचा संभव आहे हें समजण्याइतकें परिपक्व मन ह्या शिक्षणहीन पण अधिकारसंपन्न माणसांचें नसतें. युनिव्हर्सिटी पदवीधर मिळत असतां जाणून बुजून अशा माणसांस इतक्या महत्त्वाच्या जागीं नेमणें कोणत्याही दृष्टीनें श्रेयस्कर नाहीं. सारांश सांगावयाचा इतकाच कीं, न्यायाचें काम फार विचाराचें व गांभीर्यपूर्वक करावयाचें असल्यामुळें, अशा मनोवृत्ति जेथें उचंबळतील अशींच कोर्टगृहें बांधणें अत्यंत आवश्यक आहे. निवांत जागीं, जलप्रवाहासन्निध व प्रच्छायस्थलीं बांधलेल्या देवालयांत जातांच ज्याप्रमाणें नास्तिकाच्या मनांतहि क्षणभर भक्तिप्रसव झाल्याविना रहात नाहीं त्याप्रमाणें विचारप्रगल्भता व गांभीर्य ह्यांचा जेथें उद्भव होईल अशीं कोर्टगृहें असणें अगत्याचें व फायद्याचें आहे. सर्व साहित्य नीटनेटकें व व्यवस्थित असल्याकारणानें, एकाग्रचित्तानें काम करतां येत नाहीं अशी कुरकुर कोणाची असत नाहीं; परंतु ह्याच्या उलट स्थिति असतां मात्र ज्यांचें लक्ष कामाकडे असत नाहीं अशीं पुष्कळ माणसें आढळतात. हा मनुष्यस्वभाव ध्यानांत आणून कोर्टगृहें सुधारणें इष्ट आहे.

२ वर निर्दिष्ट केलेल्या घटकावयवांपैकीं न्यायाधीश हा दुसरा घटक होय. ह्या लेखांत सिंध वजा करून मुंबई इलाख्यांतील न्यायपद्धतीचाच आणि तोही विशेषतः दिवाणी विचार चालला आहे ही गोष्ट वाचकांनीं ध्यानांत ठेवावी. निव्वळ मराठी जाणणारे न्यायाधीश हल्लीं कोणीहि राहिले नाहींत. कोर्टाच्या एकंदर तीन पायऱ्या आहेत. कनिष्ट प्रतीचीं कोर्टें म्हणजे मुन्सफ कोर्टें होत. मुन्सफांचे दोन वर्ग करतां येतील. एक युनिव्हर्सिटी पदवीधरांचा व दुसरा हायकोर्टाची परीक्षा पास झालेल्यांचा. हल्लीं दरवर्षीं एल्एल् बी. पुष्कळ होत असतां मुन्सफीची परीक्षा अद्यापि कायम ठेवण्यांत हायकोर्टाचा काय हेतु आहे समजत नाहीं. न्यायाधीशाचें काम करणाऱ्या इसमास शिक्षणसंस्कार नसला तरी चालतो असें मत हायकोर्टातील जजांचें असल्यास न कळे. एल्एल् बी. होण्याच्या पूर्वी चार वर्षें जें युनिव्हर्सिटी शिक्षण मिळतें तें अगदीं निरुपयोगी समजावयाचें कीं काय ? विविध प्रकारच्या मनुष्यस्वभावाचें पूर्णज्ञान, बालिश मनोवृत्तींपासून सुटका, गांभीर्य इत्यादि अनेक गुण न्याय करणाराच्या अंगीं असणें अवश्य आहे, व हे गुण शिक्षणानें मन संस्कृत झाल्यावांचून सहसा यावयाचे नाहींत. कांहीं व्यक्ति अशा असूं शकतील हें खरें आहे, पण त्या नियमाला केवळ अपवाद होत.

मुन्सफांना प्रथमतः १५० रुपये पगार देण्यांत येतो. हा पगार त्यांच्या कामाच्या मानानें फारच कमी आहे. ह्या बाबतींत त्यांची पिछेहाट झाली आहे. कारण पूर्वी २०० वर त्यांचा आरंभ होत असे. मुन्सफांत ओरड करणारे कोणी नसल्या कारणानें त्यांचे पगार वाढण्याच्या ऐवजीं कमीच झाले. न्यायखात्यांतील लोकांची स्थिति चांगली नसते अशी इंग्रेजी पत्रांनीं ओरड करतांच हायकोर्ट जजांचे व डिस्त्रिक्ट जजांचे पगार वाढविण्यांत आले. पण मुन्सफांकडे मात्र कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं. एकंदर न्यायपद्धतीचे मुन्सफ हे घटकावयव नाहींत काय ? मुन्सफांस जितक्या संकटांतून काम करावें लागतें तितकें कोणालाच करावें लागत नसेल. परकी भाषा, सटीक पुस्तकांचा अभाव व निष्णात आणि कार्यदक्ष वकीलांची दुर्मिळता इतक्या अडचणी सोसूनहि त्यांच्या हातून जें काम होतें तें खरोखर वर्णनीय आहे. लॉ रिपोर्ट चाळले असतां असें दिसून येईल कीं, डिस्ट्रिक्ट जजांपेक्षां मुन्सफांचेच निकाल हायकोर्टास अधिक पसंत पडले

आहेत. असें असतां हायकोर्ट जजांचे व डिस्ट्रिक्ट जजांचे पगार वाढविले तेव्हां मुन्सफांचे पगार कां वाढविले जाऊं नयेत हें समजत नाहीं. अथवा आहेत हेच पगार फार मोठे आहेत असें तर वाटत नाहींना ? निस्पृहपणानें आणि मान्यतेनें वागतां येण्यास अधिक पगार असणें जरूर आहे.

डिस्ट्रिक्ट जजांचें मुख्य काम म्हटलें म्हणजे खालील कोर्टांनीं केलेल्या निकालांवर झालेल्या अपीलांची चौकशी करणें हें होय. डिस्ट्रिक्ट जजांच्या नेमणुका अत्यंत असमाधानकारक रीतीनें केल्या जातात असा लोकापवाद आहे. लोकांच्या रीतिरिवाजांची ज्यांस माहिती नाहीं, कायद्यांचें अध्ययन ज्यांनीं फारसें केलेलें नाहीं अशांनीं कायद्याच्या परीक्षेंत पास झालेल्या एतद्देशीय अशा मुन्सफांनीं केलेल्या निकालांची चौकशी करणें हें लोकांच्या मनास पटत नाहीं. हे लोक प्रथम काम करावयाला लागतात तेव्हां त्यांस अनुभव नसल्यामुळें त्यांच्याकडून समाधानकारक काम होणें अर्थातच शक्य नाहीं. कुटिल वादीप्रतिवादीस अशा न्यायाधीशाकडून फायदा होण्याचा संभव असतो. सहा महिने काम केलें नाहीं तोंच असिस्टंट जजांना अपीलांचा अधिकार देण्यांत येतो. ह्या पद्धतीचा प्रतिकार अद्यापि कोणाकडून होत नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे. अस्सल काम कांहीं वर्षें केल्यावांचून अपीलाचें काम करतां येणें अशक्य आहे. कागदावरूनच अपील कोर्ट न्याय्यान्याय्यतेचा विचार करणार. पण खालील कोर्टाचा जो ठराव असतो तो होण्यास कागदांत आलेल्या गोष्टींशिवाय इतर अनेक गोष्टी कारणीभूत होत असतात, ह्याचा अनुभव सहा महिन्यांच्या कामानें येणें संभवनीय नाहीं. एक उदाहरण दिलें असतां हें म्हणणें जास्त विशद होईल. समजा. वकीलानें साक्षीदाराला ह्या बाईचा धंदा ( बाई व्यभिचारिणी आहे असें समजून ) काय ? असा प्रश्न केला. साक्षीदार तावडतोब उत्तर देतो " ईश्वरास माहीत " हा जबाब लिहून घेतला जात नाहीं. शिरस्तेदार किंवा वकील पुन्हां साक्षीदारास विचारतो, " अरे तुला काय ठाऊक असेल तें सांग. " साक्षीदार ( व्यभिचारिणी आहे हें सांगण्यास नाखुष होऊन ) पुनः उत्तर देतो " ती काय धंदा करते हें मला माहीत नाहीं. " हेंच उत्तर जबानींत लिहून घेतलें जातें. झालें. सर्व साक्षीदारांच्या जबान्या ह्याप्रमाणें होतात. कोणताही साक्षीदार ती व्यभिचारिणी स्त्री आहे असें म्हणतो असें जबानीवरून दिसून येत

नाहीं. तथापि "ईश्वराला ठाऊक" ह्या साक्षीदाराच्या तोंडांतून निघालेल्या प्रथमोद्गारांनीं न्यायाधीशाच्या मनावर ती स्त्री व्यभिचारिणी असली पाहिजे असा ठसा उमटतो, व कजाचा निकाल विशिष्ट रीतीनें होण्यास तो ठसा कारणीभूत होतो. परंतु ह्याचें अपीलांतील जजास काय होय ? तो खालच्या कोर्टाचा ठराव चुकीचा व पुराव्याला धरून नाहीं म्हणून शेरा मारणार.

कांहीं वेळां तर कोर्टांत पक्षकारांची हालचाल व वायफळ बोलाचाली होते त्यावरूनसुद्धां न्यायाधीशाचा ग्रह बनतो. तसेंच साक्षीदाराच्या अथवा पक्षकाराच्या चेहेऱ्यावरून ( वर्तनावरून नव्हे ) त्याचें इंगित जाणतां येतें. परंतु तें कागदावर आणण्यास कांहीं मार्ग नाहीं. ह्या सर्व कारणांचा विचार करून अनुभवी व पोक्त अपील जज्ज खालच्या कोर्टानें काढलेल्या अनुमानांत ढवळाढवळ सहसा करीत नाहींत.

पुराव्यावर फक्त जो ठराव केला गेला असेल त्यावर दुसरें अपील हायकोर्टांत नाहीं हें एक कायद्यांत मोठें व्यंग आहे. खालच्या कोर्टाचा व पहिल्या अपील कोर्टाचा पुराव्यासंबंधीं एकच अभिप्राय पडला असतां हायकोर्टानें मध्यें पडूं नये हें ठीक आहे, परंतु जेथें दोन्ही कोर्टांचे अभिप्राय भिन्न असतील तेथें हायकोर्टाकडे अपील चालणें अगदीं अवश्य आहे. गृहीत गोष्टींवरून अप्रयोजक अनुमानें काढिलीं असतील तर तो कायद्याचाच प्रश्न समजला गेला पाहिजे असें नेहमीं मानलें जात नसल्यामुळें, पुष्कळांना कधीं कधीं नुकसान सोसून गुपचुप बसणें भाग पडतें.

न्यायाधीशास विशिष्ट झगा घालून कोर्टांत बसावयास लावणें हें इंग्लिश लोकांच्या पुराणप्रियतेचें चांगलें द्योतक आहे.

पक्षकारांस खरा न्याय मिळणें हें न्यायाधीशाच्या शहाणपणावर फार अवलंबून आहे. तथापि एवढें सांगून भागत नाहीं. न्यायाधीश कसा असावा हें सांगणें कठिण आहे व जसा असावा तसा तो मिळणें हें तर अगदींच अशक्य आहे. तो अतिशय चलाख, धूर्त अगर शहाणा असला तरी त्याच्या हातून खरा न्याय मिळण्याचा संभव नाहीं. अथवा तो थंड अगर मतिहीन असेल तरीहि तीच स्थिति. कारण धूर्त मनुष्याच्या मनांत वारंवार ज्या कल्पना येतात त्यांस वस्तुतः अस्तित्वच नसतें. उलटपक्षीं न्यायाधीशाच्या ठिकाणीं बुद्धिमांद्य असेल तर लोकांच्या खटपटीचें आकलन त्यास करतां येणार नाहीं. खरें पहातां ज्या लोकांचा न्याय करा-

वयाचा असतो त्यांच्या समतोल बुद्धीचा व मनोवृत्तींचा न्यायाधीश असला पाहिजे. परंतु हें घडावें कसें ? व पुढें येणाऱ्या सर्व लोकांची बुद्धि एकाच अंशावर असणार कशी ? साधारण बुद्धीच्या माणसास जें वाटेल तें खरें असा सर्वत्र समज आहे व त्यास कायद्यांतही मान मिळाला आहे. परंतु जगांमध्यें असाधारण बुद्धीचीं आणि न्यून बुद्धीचीं माणसें असतील व असतात तेव्हां ह्या म्हणीची वाट काय ? तात्पर्य, खरा न्याय मिळण्यास विघातक गोष्टी फार आहेत.

त्याचप्रमाणें, निरनिराळ्या न्यायाधीशांच्या कमजास्त अनुभवामुळें, त्यांचे निकाल बरेवाईट होतात हें उघड आहे. न्यायाधीशांच्या ह्या नैसर्गिक व म्हणूनच अपरिहार्य उणीवांचें फळ लोकांस सहन करावें लागतें. उदाहरणांनीं हें विवेचन जास्त स्पष्ट करूं. वादीनें पैसे मागण्याचा खतावरून दावा आणला. लिहितां वाचतां येत नसल्यामुळें खतावर प्रतिवादीच्या सहीचा दस्तुर दुसऱ्यानें केलेला आहे. पुढें कोर्टात प्रतिवादी येऊन तक्रार करतो कीं, मी दस्तऐवज लिहून दिला नाहीं. मला सही करतां येते व तो आपली सही करूनही दाखवितो. जगांतील कुटिल व्यवहारांचा फारसा अनुभव नसलेल्या नवीन न्यायाधीशास प्रथमतः प्रतिवादीचें म्हणणें खरें वाटल्याशिवाय रहाणार नाहीं, व वादीनें लबाडीनें खोटा दस्त केला आहे असाही पण त्याचा ग्रह होईल. हा ग्रह नाहींसा करण्याकरितां वादीस फार त्रास पडेल, व अखेरीस यश येईलच असा नियम नाहीं.

आतां दुसरा अनुभवी न्यायाधीश घ्या. कोर्टात फिर्याद लागल्यावर खोटी तक्रार करतां यावी म्हणून कांहीं लोक मुद्दाम सही करावयास शिकतात. ह्या गोष्टीचा ज्यांस अनुभव असेल ते न्यायाधीश प्रतिवादीच्या तक्रारीस फार महत्व देत नाहींत. इतर पुराव्यावरून शाबीत झालें तरच ते ती तक्रार खरी मानतील. परंतु ह्या अनुभवाचा फायदा वादीस मिळतो. तेव्हां पक्षकारांचें नफानुकसान न्यायाधीशाच्या अनुभवजन्य ज्ञानावर अवलंबून आहे हें उघड आहे. प्रत्येकाच्या अनुभवामध्यें अंतर असणें अपरिहार्य असल्यामुळें खरा न्याय मिळण्यास व्यत्यय येतो.

परंतु येवढ्यावरच संपत नाहीं. अशा रीतीनें झटपट सही करावयास शिकून खोटी तक्रार करण्याची कर्तबगारी सर्वांतच नसते. म्हणून अशा

रीतीनें खोट्या तक्रारी लोक करतात ह्या अनुभवाचा उपयोग न्यायाधीशानें सर्वत्र करतां कामा नये. आपल्यासमोर उभा असलेल्या मनुष्यांत अशी धूर्तपणाची तक्रार करण्याइतकी अक्कल आहे काय तें त्यानें त्याच्या चेहऱ्यावरून व इतर परिस्थितीवरून सूक्ष्मपणें निरीक्षण करून ठरविलें पाहिजे. ह्यावरून न्यायाधीशाच्या अंगच्या शहाणपणाचा उपयोग पक्षकारांस किती होतो ह्याची थोडीबहुत कल्पना होईल.

दुसरें एक मासलेवाईक उदाहरण देऊं. मी आपली दागिन्यांची पेटी प्लेगच्या दिवसांत प्रतिवादीजवळ ठेवण्यास दिली; ती माझी मला परत मिळावी म्हणून एका बाईनें कोर्टांत फिर्याद लाविली. प्रतिवादीनें अशी तक्रार केली कीं, दागिने माझ्या स्वाधीन केले ही गोष्ट खरी आहे. पण ते वादीनें केले नसून अनें केले. वादी ही अची लग्नाची बायको नसून ठेवलेली आहे. त्यामुळें ती अची वारस नाहीं. करतां तिला दागिने मागण्याचा हक्क नाहीं.

मीच दागिने प्रतिवादीजवळ ठेवण्यास दिले, असें शाबीत करण्याकरतां बाईनें साक्षीदार दिले व आपल्या जबानींत असें सांगितलें कीं, प्रतिवादी कोणी साक्षीदार असल्यावांचून दागिने ठेवीना, म्हणून मी कांहीं लोकांस मुद्दाम बोलावून आणून त्यांच्यासमक्ष दागिने प्रतिवादीस दिले.

कोणी ठेव ठेवावयास आणून देत असतां, कागद करून दिल्याशिवाय अगर कोणी साक्षीदार असल्याशिवाय मी ती घेणार नाहीं. असें म्हणणारा गृहस्थ उच्च जातींतसुद्धां मिळणें प्रायः अशक्य, मग खालच्या जातीबद्दल गोष्टच बोलावयास नको. जगाची नीतिमत्ता इतक्या प्रमाणावर अद्यापि आली नाहीं व पुढें कधीं येईलसेंही वाटत नाहीं, अशा समजुतीच्या खालच्या कोर्टानें वादीच्या साक्षीवर गैरभरवंसा ठेवला; परंतु अपीलांत असें सांगणारीं माणसें पुष्कळ मिळतील. त्यांत कांहीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं, असें घरून दुसऱ्या अगर वरिष्ठ न्यायाधीशांनीं त्याच साक्षीवर पूर्ण विश्वास ठेवून वादीचा दावा देवविला.

ह्यामध्यें कोण चुकला आहे ह्याची वाटाघाट करण्याचें कारण नाहीं. पण एकाचा अनुभव अयथार्थ आहे एवढें मात्र निःसंशय. ह्यामध्यें आपणांस बोधप्रद गोष्ट इतकीच घ्यावयाची कीं, सर्व न्यायाधीशांस जगाचा यथार्थ अनुभव मिळणें अशक्य असल्यामुळें कोर्टातून पक्षकारांस खरा

न्याय मिळेलच असें निश्चयपूर्वक सांगणें दुर्घट आहे; आणि एवढ्याचकरितां कज्जा कोर्टांत मांडणें म्हणजे जुगार खेळणें आहे अशी लोकांची समजूत झालेली असते.

वरील विवेचनावरून मुन्सफाचें काम करणाऱ्या इसमाची योग्यता फार मोठी असली पाहिजे ह्याबद्दल कोणाचीहि खात्री होईल. तथापि कित्येकांस त्यांची कांहीं किंमत वाटत नाहीं हें त्यांचें दुर्भाग्य होय. शेवटल्या पायरीच्या मुन्सफापेक्षां आनररी तिसरा वर्ग माजिस्ट्रेटाची योग्यता सरकारनें विशेष मानली आहे. सिव्हिल लिस्टांत निरनिराळ्या अधिकाऱ्यांचा जो मानानुक्रम दिला आहे त्यावरून वरील गोष्ट व्यक्त होते. कोठें दरबारांत वगैरे जाण्याचा प्रसंग आल्यास तिसरा वर्ग मॅजिस्ट्रेटाच्या खालची खुर्ची १५० रुपयांच्या मुन्सफास द्यावी लागते. ह्यावरून दिवाणी अधिकाऱ्यापेक्षां फौजदारी अधिकाऱ्यांना सरकार अधिक चाहतें असें होतें. ह्याप्रमाणें दिवाणी कोर्टांतील भानगडीचें काम मोठ्या चातुर्यानें पार पाडणाऱ्या अधिकाऱ्यांसंबंधानें झालेला हा अन्याय लोकांनीं आजपर्यंत सहन केला हें चमत्कृतिजनक आहे. कौन्सिलांतल्या एतद्देशीय गृहस्थांचें इकडे लक्ष जाईल काय?

डिस्ट्रिक्ट जज्जाचें काम करण्याकरितां एतद्देशीयांच्या अधिक नेमणुका होणें फार महत्वाचें आहे. शिक्षण, रीतिभातींचें ज्ञान, स्वभाषा ह्यांच्या योगानें त्यांच्यांत साहजिकच विशेष पात्रता येते. हायकोर्टांतील न्यायाधीशांचें काम फार जोखमीचें आहे. त्या ठिकाणीं चांगलींच कसलेलीं विद्वान् माणसें पाहिजेत. त्यावांचून हायकोर्टाचें वजन खालील कोर्टावर पडत नाहीं. हायकोर्टांत जी मंडळी असते ती फार कमी दर्जाची असली म्हणजे त्यांच्याविषयीं आदरबुद्धि उत्पन्न होण्याचा संभव नाहीं. त्यांच्या ठिकाणीं जबरदस्त विद्वत्ता आहे किंवा नाहीं हें त्यांच्या दर महिन्यास प्रसिद्ध होणाऱ्या निवाड्यांवरून दिसून येणारें आहे. कोणत्याही प्रश्नांचा विचार निरनिराळ्या बाजूंनीं केलेला आहे कीं नाहीं हें दृष्टीस पडतें. इकडील लहान मोठ्या कोणत्याही ठरावांत इंग्रेजी ठरावांचा पाठ म्हणणें हेंच काय तें विद्वत्तेचें चिन्ह होऊन बसलें आहे. इंग्रजांचें प्रत्येक बाबतींत आम्ही दास्य पत्करलें आहे हें पदोपदीं दृष्टीसमोर आणण्याकरतांच कीं काय प्रत्येक ठरावाला इंग्लिश ठरावाचा पाठिंबा दिला जातो. एकंदरींत हायकोर्टांतील नेमणुका नेहमीं काळजीपूर्वक झाल्या तरच बरें.

खालील न्यायाधीशाच्या बरेवाईटपणावद्दल परीक्षा हायकोर्टाला होत नाहीं किंवा तें करीत नाहीं हा एक दुसरा आरोप आमच्या हायकोर्टावर नेहमीं केलेला ऐकण्यांत येतो. कोणी चांगलें काम केलें तर त्यास उत्तेजन मिळेल ही आशा नको. बरें वाईट काम एकाच मापानें मोजलें जातें.

३ कोर्ट आहे तेथें वकील नाहींत असें ह्या बाजूला तरी उदाहरण नाहीं. म्हणून तेही न्यायपद्धतीचे एक अवश्य घटकावयव होऊन बसले आहेत. मुन्सफाप्रमाणें वकीलांचेही दोन वर्ग आहेत. एकांत एल्एल्. बी. ची गणना होते, व दुसऱ्यांत हायकोर्टाकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षेंत पास होणारांचा समावेश होतो. कायद्याच्या ज्ञानाशिवाय उदात्त शिक्षणाचा संस्कार होणें मुन्सफाला जितकें जरूरीचें आहे तितकें वकीलास नाहीं हें खरें. परंतु वकील दर एक कोर्टांत फार झाल्यामुळें वकीलीची परीक्षा बंद करण्याचें हायकोर्टानें मनांत आणलें आहे. एका दृष्टीनें हा विचार चांगला आहे व एका दृष्टीनें अनिष्ट आहे. नवीन कायद्यानें युनिव्हर्सिटी शिक्षण जास्त खर्चाचें होणार आहे. इकडे लोक तर अधिकाधिक दरिद्री होत चालले आहेत. अशा प्रसंगीं गरीब होतकरू माणसांस एका प्रतिष्ठित धंद्याचें द्वार बंद व्हावें हें पाहून फार वाईट वाटतें. परंतु उलट पक्षीं वकील फार होणें कोणासच हितावह नाहीं हेंही कबूल करणें भाग आहे. निस्पृहपणानें राहण्याइतकी कमाई वकीलांस न झाल्यास स्वतंत्रतेचें पाणी त्यांच्यांत राहत नाहीं व त्यामुळें ते आपणा स्वतःस व आपल्याबरोबर आपल्या देशासही खड्ड्यांत घालण्यास चुकणार नाहींत. आजच असा प्रसंग येऊन ठेपला आहे कीं, वकीलांचें वजन लोकांवर पडण्याच्या ऐवजीं लोकच वकीलांस आपल्या मुठींत ठेवूं लागले आहेत. अशा वकीलांचें वजन सरकारावर काय पडणार हें दिसतेंच आहे. बाजारांतील पदार्थाप्रमाणें वकीलांच्या धंद्यांत चढाओढीचें तत्त्व अमलांत आणणें वाजवी नाहीं. प्रतिष्ठित व निस्पृह वकीलांपासूनच देशाचा फायदा आहे, विरुद्ध गुणांच्या वकीलांपासून हानि मात्र होण्याचा संभव फार. तेव्हां वकील कमी करणें जर अवश्यच आहे तर जास्त शिक्षणाचे जे एल्एल्. बी. ते ठेवून निव्वळ कायदे पाठ करणारे वकील बंद करणें ओघासच येतें.

असें जरी आहे तरी हायकोर्ट वकीलीची अगर मुन्सफीची परीक्षा कायम ठेवून वकीलीची परीक्षा बंद करणें केवळ वेडेपणाचें आहे. मॅट्रिक्युलेशन

परीक्षा पास होऊन नंतर लगेच ह्या परीक्षेस बसण्याची मोकळीक असल्यामुळें वयाची हरकत ह्या मंडळीस येण्याचा संभव नाहीं. ह्यामुळें सबजज विनपदवीधर होऊन वकील मात्र पदवीधर होतील ह्याचा परिणाम काय होईल हें सांगावयास नको. सबजजांचें वजन वकीलांवर पडावें तसें पडणार नाहीं, व विद्वत्तेनें श्रेष्ठ असल्यामुळें वकीलांच्या मनांत कोर्टाबद्दल आदरबुद्धि बसणार नाहीं. हायकोर्ट प्लीडरची परीक्षा कायम ठेवून डिस्ट्रिक्ट प्लीडरची परीक्षा बंद करण्याचें प्रथमतः कोणाच्या डोक्यांत आलें असेल कोणास ठाऊक. पण तें फार अनिष्ट आहे.

असो. हल्लीं सर्व कोर्टांतून वकीलांची गर्दी आहे. कोणास प्रतिष्ठितपणानें निर्वाह करण्याइतकी किफाईत होण्याची मुष्कील, अशी सर्वत्र ओरड ऐकूं येते. दाटी फार आहे ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. तथापि ही गोष्ट लक्षांत धरली पाहिजे कीं, संख्येची दाटी असली तरी गुणांची विरलताच आहे. आपलें काम झटून व योग्य प्रकारानें करणारे वकील खालील कोर्टांत तरी क्वचित् आढळतात. म्हणून काळजीपूर्वक काम करण्याचा निश्चय नवीन माणसानें केल्यास त्यास अद्यापि आकुंचित प्रदेश झालेला नाहीं. आपआपल्या पक्षकाराची बाजू स्पष्टपणें कोर्टापुढें मांडून न्यायाच्या कामीं मदत करणें हें जें वकीलांचें आदिकर्तव्य तें नीटपणें बजावणारे वकील फार थोडके आहेत.

वकीलीचा धंदा प्रतिष्ठितपणाचा व धूर्ततेचा आहे. खऱ्या बुद्धिमान् पुरुषास आपलें कौशल्य निदर्शनास आणण्यास मुबलक सवलत मिळते. परंतु व्यवस्थित रीतीनें काम करण्याची संवय बऱ्याच वकीलांस नसल्यामुळें त्यांच्या बुद्धीचा उपयोग त्यांस, लोकांस किंवा दुसऱ्या कोणासच होत नाहीं. हायकोर्टांतल्या सालिसिटरांचें अनुकरण जर खालील कोर्टांतील वकील करतील तर त्यापासून स्वतः वकीलांस, पक्षकारांस आणि कोर्टांस सर्वांसच फार फायदा होईल. पक्षकार घरीं आल्याबरोबर तो सांगेल त्याप्रमाणें फिर्याद, कैफियत अगर अर्ज लिहून कोर्टांत दाखल करणें, येतील त्या साक्षीदारांस तपासणें व सर्व कज्जा पुरा झाला म्हणजे आपणांस कांहीं अनुकूल आधार मिळेल काय म्हणून लॉरिपोर्टांचीं पुस्तकें धुंडाळणें हा क्रम धंद्यांत यश येण्यास अपायकारक आहे ही गोष्ट पुष्कळ वकील विसरतात. फिर्याद तयार करण्याच्या वेळेसच पुढें चालावयाच्या कज्जाची जय्यत

तयारी करणें भाग आहे. पक्षकाराजवळ पुरावा काय आहे, कोणत्या स्वरूपाचा दावा आणला म्हणजे त्यास हायकोर्टाच्या ठरावांचें आनुकूल्य मिळेल, विरुद्ध बाजूकडून कोणतें उत्तर येण्याचा संभव आहे, इत्यादि गोष्टींचा पूर्ण विचार करून वकीलानें फिर्याद लिहिण्यास आरंभ करावा. व त्याच वेळेस त्यानें पक्षकारापासून कज्जासंबंधीं संपूर्ण माहिती घेतल्यावांचून राहूं नये. साक्षीदारांचीं नांवें, वय, जात, धंदा, योग्यता, कोणता साक्षीदार काय मजकूर सांगणार त्याचा सारांश, इत्यादि माहितींचें टिपण जवळ असल्यावांचून वकीलानें साक्षीदार तपासण्यास आरंभ करणें अगदीं मूर्खपणाचें आहे.

वकीलाचें मुख्य कसब उलटतपासणींत आहे. ह्या प्रसंगीं आपलें कौशल्य दाखविणारे वकील फारच विरळा दृष्टीस पडतात. उलटतपासणींत पुष्कळ प्रश्न विचारले पाहिजेत हा समज सर्वसाधारण झालेला आढळतो. पण असें करणें अशास्त्रीय आहे हें कुशाग्रबुद्धीच्या व अनुभवी वकीलांस सांगणें नकोच. साक्षीदार अगदींच खुळा नसेल तर उलट तपासणींत नेमके प्रश्न विचारणेंच श्रेयस्कर आहे. आपल्याला ज्या गोष्टी शाबीत करावयाच्या त्या प्रथम साक्षीदाराकडून शक्य तर वदवण्याचा प्रयत्न करून साक्षीदार भरंवसा ठेवण्यास लायक नाहीं अशा हेतूनें कांहीं प्रश्न विचारले म्हणजे उलट तपासणींतलें बरेंच काम आटोपतें. परंतु कोणत्या गोष्टी उलट बाजूनें दाखवल्या म्हणजे वादीची बाजू कमकुवत होईल ह्याबद्दल वकीलांची चांगलीच तयारी पाहिजे. ज्या कज्जांतील मुख्य गोष्टी नव्हेत पण ज्या शाबीत केल्या असतां कायद्याचा प्रश्न उद्भवून वादीचा दावा रद्द होण्याचा संभव आहें, असे प्रश्न उलट बाजूच्या साक्षीदारास विचारले असतां त्यांत अनुकूल उत्तरें मिळण्याचा संभव जास्त असतो. कारण बहुतेक साक्षीदारांस कायद्याची माहिती नसते, म्हणून हे प्रश्न कोणत्या घोरणानें विचारले जात आहेत ह्याची त्यांस अटकळ करतां येत नाहीं. उलटतपासणी करण्याची तयारी फार थोडक्यांची असते. तेव्हां साक्षीदारास बरेचसे वायफळ प्रश्न विचारून त्याच्याकडून परस्परविरोधी उत्तरें काढलीं म्हणजे झालें अशीच पुष्कळांची समजूत असते. उलटतपासणींतील प्रश्नांवरून प्रतिवादीच्या तक्रारीचें घोरण स्पष्ट कळलें पाहिजे. नाहींतर वादीच्या साक्षीदारांस तत्संबंधीं प्रश्न करण्याचें धैर्य नाहीं, सबब प्रतिवादीची बाजू

17 MAR 1990

कुमकुवत आहे असा कोर्टाचा समज होतो, व तो तसा होऊं देणें इष्ट नाहीं.

साक्षीदाराची उलटतपासणी करण्याच्या अगोदर तो कोणत्या दर्जाचा आहे ह्याची परीक्षा चाणाक्ष वकीलानें करणें अगत्याचें आहे. धूर्त साक्षीदारास त्यास जसजसे जास्त प्रश्न विचारावे तसतशी उलटतपासणी आपल्याच गळ्यांत येते. अशा साक्षीदारास ज्या गोष्टी कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं असेच प्रश्न विचारावेत; आणि त्याची लायकी व विश्वसनीयता कमी करण्यासारखी असल्यास करून सोडून द्यावी. कोणत्याही दर्जाच्या साक्षीदारास सरसकट सारखेच प्रश्न विचारीत गेल्यानें फायदा न होतां उलट नुकसान होतें. आपल्याला अंशतः अनुकूल असें उत्तर चुकून साक्षीदाराच्या तोंडून आल्यास कांहीं वकील तें सर्वस्वी अनुकूल यावें म्हणून तत्संबंधीं जास्त प्रश्न विचारण्याच्या भरीस पडतात, पण ही त्यांची नेहमीं चूक होते. धूर्त साक्षीदार आपण घसरलों आहों हें तेव्हांच ताडतो व पुढच्या प्रश्नांचीं उत्तरें देतांना झालेली चूक उलट सुधारून घेतो. ह्या साठीं कोणताही प्रश्न विचारण्याच्या पूर्वी फार विचार करावा लागतो. एकादा प्रश्न असा असतो कीं, त्याचें उत्तर साक्षीदारानें आपणांस अनुकूल दिलें तर उत्तमच. पण जर कां उत्तर प्रतिकूल आलें तर तेथपर्यंत मिळालेला फायदाही नाहींसा होतो. अशावेळीं साक्षीदाराची अक्कल किती आहे ह्याचा विचार करून प्रश्न विचारला पाहिजे. तात्पर्य, साक्षीदार पिंजऱ्यांत आल्यावर त्याच्या चेहऱ्यावरून सूक्ष्म निरीक्षण करणें अगत्याचें आहे. त्याचप्रमाणें बनावट साक्षी कोण व खरा साक्षी कोण हेंही उलट तपासणी करणाऱ्या वकीलानें तावडतोब ओळखलें पाहिजे. खरा साक्षी असल्यास त्यास फारसे प्रश्न विचारण्याच्या भानगडींत पडूं नये.

साक्षीदारावर ओरडण्याची खोड कांहीं वकीलांस असते. पण त्यापासून कांहींएक कार्यभाग होत नाहीं. साक्षीदाराला गोंजारून सर तपासणींत त्यानें सांगितलेला मजकूर खराच आहे असें वारंवार म्हणून आपल्या प्रश्नांचीं उत्तरें त्याच्याकडून काढून घ्यावीं. अडाणी साक्षीदार असेल तर हा प्रयत्न चांगलाच सफल होतो. कित्येक आडमुठ्या साक्षीदारांना तर आपला वकील कोणता व दुसऱ्याचा कोणता हें माहीत नसतें. दरडावून प्रश्न विचारणारा विरुद्ध वकील आहे

असें ते नंतर समजतात; म्हणून अशा साक्षीदारांस नेहमीं शांतपणेंच प्रश्न विचारावे. तसेंच प्रत्येक माणसांत कांहींना कांहीं व्यंग असतें त्याप्रमाणें ह्या साक्षीदारांत काय आहे हें जाणण्याचाही प्रयत्न वकीलानें केला पाहिजे. उलटजबानी देण्यांत मी कुशल आहें अशी कित्येकांना घमेंड असते. मी धार्मिक असून खोटें बोलणारा नाहीं असा कित्येकांना अभिमान असतो. मी गांवांतील पुढारी आहें असें लोकांनीं कबूल करावें अशी कित्येकांस हौस असते. हें स्वभाववैचित्र्य ओळखून साक्षीदाराची त्याच्या खोडीबद्दल निर्भर्त्सना न करतां प्रशंसा करून आपणांस इष्ट उत्तरें त्याच्याकडून काढून घ्यावीं.

आपणांस कोणतीं उत्तरें इष्ट आहेत ह्याचा मागमूसही साक्षीदाराला लागणार नाहीं अशाविषयीं शक्य तितकी खबरदारी घ्यावी. ह्यासाठीं संगतवार प्रश्न कधींहि विचारूं नये, कधीं कधीं उद्दिष्ट हेतु साधण्याकरतां पोकळ प्रश्नही विचारावे लागतात. त्याचप्रमाणें अमुक एक प्रश्न विचारणारास फार महत्त्वाचा आहे ह्याची कल्पनासुद्धां विचारणाराच्या स्वरावरून साक्षीदारास होतां कामा नये. एवढ्यासाठीं बरेचसे वायफळ प्रश्न विचारून मध्यें हळूच महत्त्वाच्या प्रश्नाचें उत्तर काढून घ्यावें. इतकेंही करून मुद्याबाहेर वकिलानें कधीं जातां कामा नये.

पुष्कळ वेळां वकील आपल्या पक्षकाराशीं आणि साक्षीदारांशीं कोर्टांत अशा रीतीनें वागतात कीं, त्यावरून आपली बाजू लंगडी आहे अशी वकीलाची समजूत आहे असा कोर्टाचा ग्रह होतो. तो तसा होऊं देणें अगदीं अनिष्ट आहे. वकीलांनीं निदान कोर्टामध्यें आल्यावर तरी आपल्या बाजूकडे सत्य आहे असें निदर्शनास येईल असें वागलें पाहिजे. ही हातोटी कित्येक वकिलांना चांगली साधते. वारंवार तर असें होतें कीं असल्या वकीलांकडे खोटे कज्जेच हमेशा येतात. पण त्यांच्या काम चालवण्याच्या पद्धतीवरून व एकंदर वर्तनावरून हे नेहमीं खरे कज्जे घेत असावेत असा कोर्टाचा अभिप्राय होतो, व त्याचा त्यांना प्रसंगोपात्त फायदाही मिळतो. असो. एकंदरींत वकिलाचें काम सोपें नाहीं. वकीलाच्या कर्तबगारीवर पक्षकारांचें नफानुकसान अवलंबून असतें.

४ पक्षकार हे आमच्या न्यायपद्धतीचे चवथे घटक होत. आमच्या लोकांस कोर्टांत कज्जे आणण्याचें मात्र माहीत आहे. पण त्या कज्जासाठीं

किती तयारी करावी लागते ह्याची त्यांस बिलकूल कल्पना नाहीं. वकील लोक म्हणजे बोलून चालून पैसे देऊन भाड्यानें काम करण्याकरतां विकत घेतलेलीं माणसें. त्यांच्या ठिकाणीं पक्षकाराची आस्था व कळकळ असणें शक्य नाहीं. तेव्हां विद्यार्थी परीक्षेला जातांना जसा विषयाचा अभ्यास करतात त्याप्रमाणें पक्षकारांनीं आपल्या दाव्याचें अध्ययन केलें पाहिजे, व आपला दावा जिंकण्यास कोणत्या अडचणी येतील ह्याचें त्यांनीं आगाऊ धोरण बांधलें पाहिजे.

कोर्टानीं जबानी घेतल्यास विचारलेल्या प्रश्नांचीं सरळ व तत्परतेनें उत्तरें देण्यानें कोर्टाच्या मनावर चांगला ग्रह होतो ही गोष्ट घुष्कळ पक्षकार विसरतात. ज्या गोष्टी नाकबूल करणें शक्य नाहीं अशा गोष्टीसुद्धां स्पष्टपणें सांगण्यास हरकत घेणें म्हणचे आपल्या पायावर दगड ओढून घेण्यासारखें आहे. कोर्ट काय प्रश्न विचारील व त्यांचीं काय उत्तरें द्यावीं ह्याचा विचार न करितां साक्षीस उभें राहणाऱ्या माणसांचींच बहुधा टाळाटाळीचीं उत्तरें देण्याची चाल असते. कांहीं पक्षकार असे असतात कीं, त्यांस दाव्यासंबंधीं कांहीं एक माहिती नसून विचारलेल्या प्रश्नांचीं मूर्खपणानें कांहीं तरी उत्तरें देतात. अशा पक्षकारांस वकीलानें कधींहि एकदम साक्षीस उभे करूं देऊं नये. तसेंच विरुद्ध बाजूनें केलेलीं विधानें अजीबात नाकारणें हें आपणांस हितावह आहे असें प्रत्येक पक्षकारास वाटत असतें; पण हा समज अगदीं चुकीचा आहे. सारांश, कोर्टाच्या मनांत आपल्याविषयीं अनुकूल ग्रह उत्पन्न करण्यास पक्षकारानें कधींही चुकूं नये.

वकील करून देण्यांतही पक्षकारांनीं फार खबरदारी घेणें अगत्याचें आहे. थोड्याशा पैशाच्या लालचीनें अननुभवी वकील करून आपलें कायमचें नुकसान होतें हें त्यांनीं विसरतां कामा नये. वकीलाशीं नेहमीं पक्षकारांचें वर्तन प्रामाणिकपणाचें व विश्वासयुक्त असलें पाहिजे. होतां होईल तितकें करून एकाच वकीलाला आपलीं सर्व कामें देण्यांत फायदा असतो. प्रत्येक कामाकरतां नवीन वकील पाहणें हितावह नाहीं. कारण एकच वकील असल्यानें त्यास पक्षकाराच्या व्यवहारांची चांगली माहिती झालेली असते. तात्पर्य, पक्षकारांच्या शहाणपणावरही खरा न्याय होणें कांहीं अंशीं अवलंबून आहे.

५ पक्षकारांनंतर न्यायाधीश आपल्या ठरावाची सर्व इमारत ज्यांच्यावर उभारतो ते साक्षीदार होत. वास्तविक पाहतां कोणत्याहि पक्षाचा अभिमान न बाळगतां आपणांस माहीत असेल तेवढेंच सांगणारे जे त्यांसच साक्षी ही संज्ञा अन्वर्थक लावतां येते. असा साक्षीदार आपल्या हयातींत कोणी न्यायाधीशास एखादा तरी आढळेल किंवा नाहीं ह्याची शंकाच आहे. लॉर्ड कर्झन ह्यांनीं आपल्या पदवीदानसमारंभाच्या वेळीं केलेल्या भाषणांत सद्‌बुद्धि कायम ठेविली असती व आमच्या पूर्वजांना आणि धर्मग्रंथांना आमच्याच मालिकेंत गोंवलें नसतें तर त्यांचें भाषण सद्यःस्थितीचें वास्तविक प्रतिबिंब उठविणारें नाहीं असें कोणी म्हटलें असतें ? धर्मशिक्षण कोणासच नसल्यामुळें, व व्यावहारिक शिक्षण फार थोडक्यांसच मिळत असल्यामुळें, खोटें बोलण्यांत आपण कांहीं पाप करीत आहों ही भावनासुद्धां पुष्कळांच्या चित्तास शिवत नाहीं. कोर्टाच्या कामाची ज्यांना माहिती असेल त्यांसच वरील यथार्थता किती आहे हें कळून येईल. वरून सभ्यपणाचा पोषाख केलेले व समाजांतील आपली प्रतिष्ठा कोर्टाच्या निदर्शनास आणूं पाहणारे, सत्यवादित्वाची आपण शपथ घेतली आहे ह्याचा विचार न करतां बुद्धिपुरःसर निरर्गलपणें असत्यापलाप करतांना पाहिले म्हणजे कोणत्याही विवेकी मनुष्याचें अंतःकरण देशाच्या भावी स्थितीबद्दल कचर खाल्यावांचून रहाणार नाहीं.

आपल्यास माहिती थोडी असतां सर्व हकीकत सांगितलीच पाहिजे असा साक्षीदारांचा सामान्य समज झालेला असल्याकारणानें खोट्याचें मिश्रण नाहीं अशी जबानीच कोणाची व्हावयाची नाहीं. आपणांस भूषणावह उत्तर ज्या प्रश्नाचें आहे त्या प्रश्नाचें तसेंच उत्तर पुष्कळ लोक देत असतात. मग त्यांत सत्य असो अगर नसो. उदाहरणार्थ एकादा गृहस्थ दुसऱ्याच्या सामान्य माहितीवरून " आपण कांहीं तरी धर्मविषयक ग्रंथ वाचल्याशिवाय दिवस घालवीत नसाल ? " असा त्यास प्रश्न करतो, तेव्हां तसा प्रघात नसतांही वाचीत नाहीं म्हणूनच साफ उत्तर देण्याचें धैर्य फारच थोड्यांस होतें. नाहीं म्हणून उत्तर देणारे फार. निदान अर्धवट गुटमळत तरी उत्तर देतील. मनुष्यस्वभावांतील हें व्यंग जाणणारा चतुर वकील अशा प्रश्नांनीं साक्षीदारास तेव्हांच फसवितो. " खतावर स्वतः सही करतांना प्रतिवादीला पाहिल्यावांचून आपण साक्ष घालीत नसालच " असा प्रश्न विचा-

रला असतां साक्षीदार एकदम नाहीं म्हणून उत्तर देऊन चुकतो. आतां वास्तविक प्रकार तसा नाहीं, हें अगोदर प्रतिवादीच्या, इतर साक्षीदारांच्या किंवहुना वादीच्याही साक्षीवरून निर्विवाद झालेलें असतें. शिवाय प्रतिवादीला सही करतांना साक्षीदारानें पाहिलें पाहिजे ही अट कायद्यानें प्रत्येक ठिकाणीं नडते असाही नेम नाहीं. " प्रतिवादीनें मजसमक्ष सही केली नाहीं, पण केल्याबद्दल त्यानें मजजवळ कबूल केलें " इतकें साक्षीदारानें सांगितलें असतें तरी कांहींएक वादीच्या दाव्यास कमीपणा येत नव्हता. पण आत्मश्लाघेला भुलून साक्षीदार निरर्थक वकीलाच्या जाळ्यांत सांपडतो, आणि पक्षकाराचें नुकसान करतो. कारण तेवढ्या उत्तरानें तो साक्षीदार अविश्वनीय आहे एवढें मात्र ठरतें.

एवढ्यासाठीं साक्षीदारांनीं सदैव यथातथ्य सांगण्याची सवय ठेवावी. वादीकडील निकाल होवो अथवा प्रतिवादीकडील होवो, साक्षीदारानें त्याबद्दल पर्वा करू नये. विचारल्याच्या बाहेर उत्तर देण्याची साक्षीदारास खोड असते. उलट तपासणींत प्रायः हा प्रकार फार घडतो. त्यांच्या समजुतीप्रमाणें अर्धवट दिलेल्या उत्तराची पुरवणी फेर तपासणींत आपले वकील करून घेतील इतका त्यांस धीर नसतो. अशा अधीरपणानें एकपक्षीयत्व मात्र अनुमित होतें. आतां एवढें खरें कीं, हें अनुमान नेहमीं खरें असतें असें नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें पुष्कळ प्रसंगीं स्वभाववैचित्र्याचे हे परिणाम असतात. कित्येक वेळां मात्र साक्षीदार आपणांस अभिप्रेत असलेल्या पक्षकाराचा फायदा व्हावा या इच्छेनें प्रेरित होऊन सांगत असतात. हें हेतुवैचित्र्य झालें. परंतु पुन्हां कोणत्याही हेतूनें प्रेरित होऊन साक्षीदार फाजील सांगो; तें खोटें आहे किंवा काय ह्याचा विचार न्यायाधीशास करावयाचा असतो. कारण विचारल्याच्या बाहेर सांगणें म्हणजे खोटें बोलणें नव्हे.

विनभत्त्यानें साक्ष देण्याकरतां आलेल्या साक्षीवर गैरभरंवसा ठेऊन त्या अनुरोधानें कज्जाचे निकाल करण्यांत येतात. येथेंसुद्धां हे साक्षी पक्षपाती अतएव अविश्वसनीय आहेत असें प्रत्येक प्रसंगीं मानणें अन्यायाचें होईल. कारण खऱ्या पक्षाला मदत करणारे लोक कांहीं असतात. त्यांस पैशाची पर्वा नसते. कित्येक माणसांचे मनोविकार तर जास्त प्रखर असतात. गरीब माणसांचा कोणी अन्यायानें छल केला तर तीं आपण होऊन कदा-

चित् पैशाची हानि सोसूनहि त्याच्या वतीनें सर्व प्रकारची खटपट करण्यास प्रवृत्त होतात. अशा प्रबल मनोवृत्तींच्या माणसांविषयीं जगांत नेहमीं गैरसमज उत्पन्न होतो. त्यांच्या खऱ्या स्वभावाची परीक्षा होणारे थोडे. तोच प्रकार साक्षीदारांचा असतो. उच्छृंखल उत्सुकतेनें परंतु शुद्ध व उदात्त बुद्धीनें साक्षीदारानें एकादी बाजू उचलली असली तर त्यास त्याच्या सद्धेतूंचें बक्षीस मिळण्याच्या ऐवजीं प्रतिकूल टीकेला मात्र तो आपणांस पात्र करून घेतो. अशा प्रकारच्या साक्षींची निवड न्यायाधीशानें सूक्ष्मावलोकनानें करणें अवश्य आहे.

कांहीं साक्षीदारांची मुखचर्या स्वभावतःच इतकी थंड असते कीं, त्यांच्या शांतपणानें दिल्या जाणाऱ्या जबानीवरून त्यांच्याविषयीं न्यायाधीशांच्या मनांत फारच अनुकूल ग्रह उत्पन्न होतो. परंतु येथें थोडी खबरदारी घेणें न्यायाधीशांस भाग आहे. असलीं माणसें कधींच खोटें बोलत नाहींत असा समज वस्तुस्थितीस अनुसरून असणार नाहीं. शांत चित्तवृत्तीच्या माणसांच्या हातून अनन्वित कर्में होणार नाहींत हें खरें; पण खोटें बोलण्याचें अल्पस्वल्प पाप ते करणार नाहींत, असें मात्र नाहीं. असलीं माणसें घरींदारीं, खरेंखोटें कसेंही कोठेंही बोलत असलीं तरी एकाच तऱ्हेनें बोलत असतील. त्यांचा वृत्तिभंग फारसा होत नाहीं. तेव्हां अशा साक्षीवर केव्हां केव्हां फाजील विश्वास बसण्याचा संभव असतो. असो; ह्यावरून इतकें निश्चित आहे कीं, न्यायाचा कांटा विशिष्ट दिशेनें झुकविण्यास साक्षीदार बऱ्याच अंशानें कारणीभूत होतात.

६ ह्याशिवाय कायदे सूत्रप्राय झाल्यामुळें, त्यांच्या शब्दरचनेवर पक्षकारांचें नफानुकसान अवलंबून राहतें. लिहिणाराचा उद्देश एक असून शब्दांचा अर्थ दुसराच होतो असे प्रसंग दुर्मिळ नसतात. कायद्याच्या चौकटींत न्यायरूपी तसबीर बसावयाची असल्यामुळें तिला सर्वस्वी पराधीन असावें लागतें. कायद्यामध्यें लवचिकपणा नसतो. त्यामुळें न्याय करतां कायद्याची ओढाताण करतां येत नाहीं. कायद्यास अनुसरून न्यायाधीशास निकाल करावा लागतो. असा निकाल नेहमींच न्यायाचा कसा व्हावा ?

७ बरोबर न्याय व्हावा म्हणूनच कदाचित् आणीकहि. कितीतरी अडथळे आहेत. त्यांत प्रमुखतः इंग्रजी भाषेंत कोर्टांचें काम

11 JAN 1994
भोर

काम चालवणें हें होय. हायकोर्टाशिवाय इतर कोर्टांचें काम देशी भाषांतूनच चालण्यास कायद्याची परवानगी आहे हें खरें; पण ह्या कायद्याची अम्मलबजावणी होणार नाहीं अशी परिस्थिती मात्र निदर्शनास येते. इंग्रजींत निकाल न लिहिणाऱ्या सबजज्जास बढती दिली नाहीं म्हणजे अर्थात् तो कसें तरी करून त्या परकी भाषेंत आपले ठराव लिहितो. पण इतरांच्या सोयीकरितां मुन्सफास इंग्रजींत ठराव लिहिण्यास लावणें अगर वकीलांस त्या भाषेंत कज्जाची तक्रार करण्यास परोक्ष अपरोक्ष रीतीनें भाग पडणें हें अन्यायाचें व अनिष्ट आहे. आरोपीस अगर वादी प्रतिवादीस आपला वकील काय बोलतो आहे हें जाणण्याची सवलत ज्या कायद्यानें अगर कानूनें ठेवली नाहीं तो कायदा वा कानु अन्यायमूलक नाहीं असें कोण म्हणेल ? ज्या गोष्टींत आपलें हिताहित आहे त्यासंबंधानें आपले विचार अथवा म्हणणें आपल्याच भाषेंत व्यक्त करण्याचा हक्क प्रत्येक माणसाचा नैसर्गिक आहे. परंतु हिंदुस्थानांत सर्वच विलक्षण प्रकार चालतो. साऱ्या दुनियेंत जो प्रकार आढळणार नाहीं तो येथें आढळेल, व सर्वांमध्यें मोठा चमत्कार हा कीं, आमचे लोक मुकाट्यानें हें सोशीत आहेत.

एतद्देशीयांच्या ठरावासंबंधानें कधीं कधीं इंग्रेजी न्यायाधीश, खालच्या कोर्टानें काय लिहिलें आहे हें आम्हांस समजत नाहीं म्हणून उद्गार काढतात. अशा उद्गारांच्या मुळाशीं किती अज्ञान आहे हें उघड दिसण्यासारखें आहे. आपणांस देशी भाषा चांगल्या रीतीनें समजणें अवश्य असून त्या समजत नाहींत म्हणून आपल्या खालच्या न्यायाधीशास परकी भाषेंत कायद्याविरुद्ध भानगडीचे विचार व्यक्त करावयास केवळ आपल्या सोयीकरितां भाग पडलें आहे ही गोष्ट त्यांच्या ध्यानांतच राहत नाहीं. देशी भाषेंत जर कोर्टाचें सर्व काम चाललें तर तें लोकांना बोधप्रद होईल हा एक त्यापासून निराळा फायदा आहे. कोर्टानें आपल्या साक्षीवर कां गैरविश्वास ठेवला, आपण काय चुका केल्या म्हणून आपला दावा बुडाला, इत्यादि गोष्टी जर देशी माणसांस आपल्याच भाषेंत वाचावयास मिळतील तर त्यांस एक प्रकारचें शिक्षण मिळाल्यासारखें होईल. शेतकऱ्यांच्या हितासाठीं म्हणून सरकारनें निराळा कायदा केला आहे. पण त्यांत ठराव देशी भाषेंतच लिहिले पाहिजेत अशी अट

कोठेंही ठेवली नाहीं. वस्तुतः मराठींत बाळबोध लिपींतसुद्धां शेतकऱ्यांच्या समजुतीसाठीं कोर्टानें ठराव लिहिणें जरूरचें आहे. पण खरोखर फायदा कशांत आहे ह्याची मीमांसाच आमच्या इकडे कोणी करीत नाहींत.

सारांश, विचार करण्यासारखी गोष्ट इतकीच कीं, हल्लींची उत्कृष्ट म्हणून ठरलेली जी न्यायपद्धति ती अपरिहार्य व परिहार्य अशा अनेक दोषसमुच्चयानें अभिभूत आहे. पूर्वीं लोकांना न्याय मिळत नसे आणि आतां तो मिळतो हा समज अगदीं अज्ञानमूलक असला पाहिजे. खरा न्याय होण्यास विघातक गोष्टी प्राचीन पद्धतींत फारच कमी असल्यामुळें, त्या पद्धतीनेंच लोकांस जास्त संतोष होत असला पाहिजे ह्यांत शंका नाहीं.



# ५ वैदिक धर्म.

## लेखांक १ ला.

" Either one believes in a religion and then everything in it appears natural; or one does not believe in it and then everything in it appears absurd. "

( एक तर मनुष्याची धर्माच्या ठिकाणीं अन्धश्रद्धा असते, त्यामुळें त्यास त्यांतील सर्वच गोष्टी अगदीं स्वाभाविकशा वाटतात. नाहीं तर धर्मावर मुळींच विश्वास बसत नाहीं. आणि मग त्यांतील प्रत्येक गोष्ट वेडगळ भासूं लागते. )

वरील उद्गार एका फ्रेंच सिनेटरचे आहेत. धर्माच्या बाबतींत जगांतील बहुतेक लोक वरील कोणत्या तरी वर्गांत पडत असल्यामुळें तटस्थ राहून निःपक्षपातानें सत्यान्वेषण करणें कठीण पडतें ह्यांत संदेह नाहीं. तथापि ह्या लेखांत आर्यधर्माचें स्वरूप विशेषतः सांगावयाचें असल्यामुळें धर्मश्रद्धेच्या फोलपणाबद्दल अगर यथार्थतेबद्दल ऊहापोह करण्याचें प्रयोजन नाहीं. धर्माची आवश्यकता वाचकांना मान्य आहे असें गृहीत धरून पुढील विवेचन करण्याचें योजिलें आहे.

कोणत्याहि धर्माचा उगम मनुष्याच्या ठिकाणीं जी ईश्वरविषयक आस्तिक्यबुद्धि असते तींत असतो. ह्या सृष्टीचा कोणी तरी नियंता आहे असें ज्यांच्या मनाला वाटतें, ते आपला व त्याचा संबंध जडवितात व ह्यांतच धर्माच्या कल्पनेचें बीज प्रथम प्रादुर्भूत होतें. ज्या समाजाला परमेश्वराचें अस्तित्व कबूल नाहीं तो समाज नीतिदृष्ट्या कितीही उच्च दर्जाचा असला तरी, धार्मिक म्हणून गणला जाणार नाहीं. कोणत्याहि धर्माचे तात्विक व व्यावहारिक असे दोन भाग असतात. व्यावहारिक धर्म आचारप्रधान असतो. आणि आचार म्हणजे विधिनिषेधात्मक असतो. आतां राजानें केलेले कायदे ज्याप्रमाणें लोक शिक्षेच्या भीतीनें पाळतात, त्याप्रमाणें ईश्वर-

विषयक पारलौकिक भीति जर नसेल तर कोणतीही व्यक्ति अगर कोणताही समाज–कितीही बुद्धिमान् माणसानें आचारनियम केलेले असोत--ते पाळीलच असा नियम नाहीं; व कोणत्याही समाजानें असे नियम निरंतर कां पाळावे ह्यास जरी बाह्यतः सयुक्तिक वाटणारें कारण देतां आलें तरी ती गोष्ट मनुष्यस्वभावाचा विचार करतां शक्य नाहीं. तात्पर्य, धर्माचा उगम ईश्वराविषयींच्या आस्तिक्य बुद्धींत आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवणें फार अगत्याचें आहे. ती दृष्टिआड केल्यानें धर्माच्या स्वरूपाबद्दल आपल्या चुकीच्या कल्पना होत असतात. बौद्धधर्म निरीश्वरवादी अगर ईश्वरवादी आहे ह्याचा खल मोठ्या गांभीर्यानें कांहीं विद्वान् माणसें करीत असतात. जर बौद्धधर्म खरोखर निरीश्वरवादी असेल तर त्यास धर्म म्हणणें अप्रशस्त होय. तें एक फक्त मत किंवा दर्शन म्हणून म्हणतां येईल. आचारहीन माणसास अधार्मिक म्हणण्याचा प्रघात आहे. तथापि मनुष्य कितीही अनाचारी असो; ईश्वराचें अस्तित्व मान्य असून शिवाय त्याच्याकडे ह्या सृष्टीचें चालकत्व आहे, ही गोष्ट जर त्यास ग्राह्य होईल तर तो " अधार्मिक " असला तरी धर्मबाह्य अगर नास्तिक खास नव्हे. परमेश्वराचें अस्तित्व गृहीत धरलें म्हणजे तो परमेश्वर सर्व शक्तिमान्, सर्वज्ञ, सर्वगुणसंपन्न आहे ह्या तत्वाचा स्वीकार करणें ओघास येतें. पण सर्वज्ञ परमेश्वराचें नुसतें अस्तित्व मान्य करून पुरें पडत नाहीं. ह्या सृष्टीचें रहाटगाडगें सुरू करून तो स्वस्थ शेषशायी होऊन निद्रिस्त झाला, तर पुन्हां आपला व त्याचा कांहीं संबंधच राहात नाहीं; आणि मग परमेश्वर मानला काय किंवा न मानला काय दोहोंचें पर्यवसान एकच. ह्या जगांत दुःख व कष्ट आहेत. तेव्हां परमेश्वराच्या सर्व शक्तिमत्तेचा उपयोग आपलें दुःख निवारण्याच्या कामीं करून घ्यावा, अशी साहजिक भावना मनुष्याच्या ठायीं उद्भवते. म्हणून आपल्या समजुतीप्रमाणें परमेश्वराला जें आचरण प्रिय असेल तें आपण ठेवावें असें मनांत येतें. हाच व्यावहारिक धर्माचा पाया होय. कोणताही धर्म घ्या, त्यांत परमेश्वराच्या स्वरूपाच्या तात्विक विवेचनाशिवाय तद्धर्मानुयायांनीं ह्या जगांत कसें वर्तन ठेवावें एतद्विषयक नियम घालून दिलेले असतात. केवळ परमेश्वराच्या स्वरूपाचा तात्विक विचारच असेल, तर त्यास धर्म न म्हणतां तत्वज्ञान म्हणावें लागेल. म्हणून प्रत्येक धर्मांत उपासनामार्ग सांगून शिवाय थोडेबहुत आचारनियमही सांगितलेले असतात. उदाहर-

णार्थ, मुसलमानी धर्मात उपोषणें करणें, मिळकतीचा चाळीसावा हिस्सा धर्म करणें इत्यादि बंधनें घातलीं आहेत. त्याचप्रमाणें ख्रिस्ती धर्मात आठवड्याच्या शेवटीं एक दिवस कांहीं काम न करणें, शपथ न घेणें, व्यभिचार, चोरी अथवा हत्या न करणें वगैरे आज्ञा देवानें केल्या आहेत.

ह्यावरून आचार हा एक धर्माचा अपरिहार्य भाग आहे हें ध्यानांत येईल. आपण जन्मतः मनुष्य आहों, पण कृतीनें व गुणानें देव व्हावें ही मनुष्याची महत्त्वाकांक्षा असते; व ही सफल होण्यास त्याचें आचरण मुख्यतः कारणीभूत होतें. सर्व मनुष्यें जन्मतःच सद्गुणी निपजलीं, तरी सुद्धां त्यांच्याकरितां नियम घालून देण्याची आवश्यकता राहणार; कारण निर्बंधहीन आचरणानें ह्या जगांत त्यांच्या सद्गुणांची हानि होण्याचा संभव असतो. मग जेथें जन्मप्राप्य गुणसंपन्नता नाहीं, विवेकापेक्षां विकारांचें प्राबल्य अधिक, आध्यात्मिक अगर शाश्वत सुखापेक्षां क्षणैक टिकणाऱ्या विषयसुखाकडे प्रवृत्ति बलवत्तर अशा ठिकाणीं निर्बंधाची किती जरूरी आहे, ह्याची सहज कल्पना करतां येण्यासारखी आहे. ह्याच उद्देशानें " आचारः प्रथमो धर्मः " असें म्हणून आमच्या स्मृतिकारांनीं आचाराचें महत्व प्रतिपादिलें आहे. आचारांमध्यें व विचारांमध्यें सामान्यतः अनुरूपता असते. आचारांवरूनच आपण मनुष्याच्या मानसिक स्थितीचें अनुमान करतों. आचार हा विचाराचें दृश्यस्वरूप आहे. विचार कारण असून आचार त्याचें कार्य आहे, हा सिद्धान्त प्रायः जरी निर्दोष असला तरी, विचार–आचारांत फारकत होऊं लागली म्हणजे, कार्यकारणभाव विपर्यस्त होतो, म्हणजे कारणस्थानीं आचार जाऊन विचार कार्यरूपी होतो, अर्थात् आचाराला अनुकूल असेच मनोविचार बनूं लागतात. एतदर्थ आचाराविषयीं उदासीनता कित्येकांच्या ठिकाणीं दिसते ती अनिष्ट मानली पाहिजे. कोणता आचार श्रेयस्कर हें पुढें पाहूं. धर्माचें आचार हें एक आवश्यक अंग आहे, आचारावांचून कोणताही धर्म असणें शक्य नाहीं हेंच येथें विशेषतः सांगावयाचें आहे. बायबलामध्येंही या मताचा पुरस्कार केला आहे हें खालील उताऱ्यावरून दिसून येईल. " Even so faith, if it hath not works, is dead, being alone. Yea a man may say. Thou hast faith and I have works, show me thy faith without thy works and I will show thee my faith by my

works. Thou believest that there is one God. Thou doest well. The devils also believe and tremble" James Chapter II. धर्माचें पूर्ण स्वरूप बनण्यास आणखी एका गोष्टीची आवश्यकता असते. पुनर्जन्म आपण मानला नाहीं तर धर्मग्रन्थांत सांगितलेलीं बंधनें आपण कां पत्करावीं हा प्रश्न अनुत्तर राहतो. देहावसानाबरोबर जीवाचाही अन्त होत असेल, तर विशिष्टाचरणाचें प्रयोजनच रहात नाहीं. ह्या जन्मांतच परमेश्वरानें कृपाळू होऊन आपणांस सुखसंपत्ति द्यावी अशा भावनेनें प्रेरित होऊन मनुष्य जर परमेश्वराची आराधना करील, अगर धर्माचरणानें वागेल तर त्यास बहुतेक प्रसंगीं निराश होण्याचीच पाळी येईल व मग धर्मावरची त्याची श्रद्धा क्षीण होऊं लागली तर त्यांत कांहीं आश्चर्य मानण्याचेंही कारण रहाणार नाहीं. ह्या जन्मांत तर परमेश्वर आपल्या सहाय्यास येत नाहीं व पुनः तर जन्म घेणें नाहीं तर परमेश्वराची करुणा कां भाकावी ? राजपुरुषांस शासन करतां येणार नाहीं असें पाप कां करूं नये, विषयसुख सोडून बौद्धिक सुखाची अपेक्षा कां करावी ? शरीरसामर्थ्यवृद्धीपेक्षां आत्मिक उन्नतीकडे विशेष लक्ष कां द्यावें ह्याचीं समर्पक उत्तरें देणें कठीण जाईल. मेल्यानंतर परमेश्वर सर्व माणसांस पुनः सजीव करील व तेव्हां प्रत्येक माणसाला आपल्या पापपुण्याचा झाडा द्यावा लागेल, व तदनुरूप सुखदुःखही अनुभवावें लागेल, एथपर्यंतच कित्येक धर्मांची मजल गेली आहे. ह्या कल्पनेंत आत्म्याच्या अविनाशित्वाची कबुली आहेच असें म्हणतां यावयाचें नाहीं; मृतमाणसांस परमेश्वर आपल्या अद्वितीय सामर्थ्यानें आपल्या फुरसुतीप्रमाणें पुनः जागृत करतो इतकेंच. ज्यास जीव एकदां निर्माण करतां आला त्यास तो पुनः करतां येणार नाहीं असें कोण म्हणेल ? परंतु सजीव केल्यावर परत आपणांस परमेश्वर देहधारी बनवीलच असा नियम नाहीं. मग परमेश्वरानें शिक्षा तरी कां द्यावी ? केव्हांही झालें तरी शिक्षा देण्याचा हेतु माणसानें पुढें सुधारावें असा असतो. पण त्या जीवाचा अवतार पुन्हां व्हावयाचा नसेल तर शिक्षा देण्याचें तरी प्रयोजन काय ? एवढ्यासाठीं पुनर्जन्म मानणें हें धर्माचें एक प्रमुख अंग असलें पाहिजे. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं, ईश्वराचें अस्तित्व ईश्वराचा व मनुष्याचा नित्यसंबंध व पुनर्जन्म हीं धर्माचीं सारभूत तत्त्वें

असलीं पाहिजेत. धर्म म्हटला कीं, ह्या तीन कल्पनांचा उद्बोध झाला पाहिजे. ज्या धर्मांत ह्या कल्पनांचा अंतर्भाव होत नसेल तो धर्म त्या मानानें विकल, अपूर्ण व व्यंग समजावा. उपरिनिर्दिष्ट गोष्टी धर्माच्या उत्पादक आहेत व त्यांनीं धर्माला पूर्णता येते हें विधान जर निर्दोष असेल तर धर्मसंस्थापक प्रमाणभूत धर्मग्रन्थ अथवा अमीमांस्य अशीं विशिष्ट मतें Dogmas ह्यांना धर्माच्या व्याख्येंत कोठेंच जागा मिळणें शक्य नाहीं. पाश्चात्य लेखकांनीं धर्माची व्याख्या करण्यांत हीच चुकी केली आहे. येशू ख्रिस्त आणि बायबल, महंमद आणि कुराण हीं डोळ्यांपुढें ठेवून तन्निर्दिष्ट गोष्टींचें अव्यभिचारित्व धर्माशीं त्यांनीं प्रतिपादिलें आहे. एकाद्या तीव्र बुद्धीच्या माणसानें मी परमेश्वराचा दूत आहें म्हणावें, अमुक गोष्टीवर तुम्ही विश्वास ठेवा व अमुक तऱ्हेनें वागा, असें आपल्या अनुयायांस सांगावें व अशा रीतीनें धर्माची संस्थापना करावी व असें होणेंच सर्वथा उचित आहे अशी पाश्चात्यांची दृढमूल कल्पना होऊन बसल्यामुळें धर्माचें विवेचन त्यांच्या हातून व्हावें तसें निर्दोष होत नाहीं. व्यक्त्युत्पन्न धर्मांची स्थिति सांचलेल्या पाण्याप्रमाणें होणार ह्यांत संदेह नाहीं. असें पाणी वर्षाऋतूंतील सतत वाहणाऱ्या जलौघाची बरोबरी कशी करूं शकणार ?

धर्माला मूलभूत असणाऱ्या गोष्टी कोणत्या हें निश्चित केल्यावर तदनुरोधानें आर्यधर्माचें निरीक्षण करणें सोईचें होईल. ईश्वराचें अस्तित्व तर प्रत्येक धर्माला मान्य असलेंच पाहिजे व आहेही; म्हणून त्याविषयीं विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. इतर धर्मांहून आर्यधर्माचें भिन्नत्व दुसऱ्या दोन गोष्टींत आहे. पुनर्जन्म आर्यधर्मांत प्रतिपादन केला आहे, एवढेंच नव्हे, तर पुनर्जन्मावरच आर्य धर्माची इमारत रचली गेली आहे. त्याचप्रमाणें मनुष्य व ईश्वर ह्यांमधील संबंधाचा शोध आर्यधर्माप्रमाणें दुसऱ्या धर्मानें केलेला दिसत नाहीं. परमेश्वर व मनुष्य ह्यांमधील नातें आपण ठरवूं त्यावर धर्माचें उन्नत अगर अवनत स्वरूप अवलंबून राहणार. पुनर्जन्म मानला नाहीं तर नीतिबद्ध आचरणाला प्रेरक कांहीं रहात नाहीं, हें मागें सांगितलेंच आहे. आतां परमेश्वराचा व आपला संबंध काय ह्याचा विचार केला तर आर्य धर्माशिवाय इतर सर्व धर्मांत दोहोंमध्यें कायमचा भेदभाव मानला आहे. जीवात्म्याचें परमात्म्याशीं ऐक्य फक्त आर्यधर्मानेंच प्रस्थापित केलें आहे[1] ह्या

१ हें विधान चिंत्य आहे असें आम्हांस वाटतें. (संपादक धर्मजागृति.)

गोष्टीचा आचारावर अगर व्यावहारिक धर्मावर फार परिणाम होतो. दासवृत्तींत असतांना मनुष्याचें वर्तन असतें, तेंच मी धनी आहे हें त्यास समजतांक्षणींच बदलतें. हा आपणांस अनुभव आहे. मी स्वतःच परमात्मस्वरूपी आहे. फक्त अज्ञानपटल अगर भ्रमनिरसन केलें म्हणजे झालें; असें एकदां मनाला पटलें, म्हणजे मनुष्य त्या दिशेनें जाऊं लागेल. उलट परमेश्वरामध्यें व माझ्यामध्यें महान् अंतर आहे, परमेश्वर सर्व शक्तिमान्, मी अल्पशक्ति; तो सर्वज्ञ, मी अल्पज्ञ; तो धनी, मी दास; तो निर्दोष, मी सदोष, अशा तऱ्हेचा भिन्नभाव पतकरला तर तदुचित आचरणही निराळें होणार हें उघड आहे. अद्वैतवादाचा अंगीकार सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतही केला जात आहे. ह्यावरून हें मत सर्वमान्य होणारसें दिसतें. तात्पर्य, पुनर्जन्म व जीवपरमात्मैक्य ह्या त्रिकालाबाधित सिद्धांतावर आर्यधर्माची उभारणी झाली असल्यामुळें, आर्यधर्मास सनातन धर्म म्हणण्याचा प्रघात आहे. आर्यधर्माचीं हीं तत्वें म्हणजे आर्य ऋषींच्या अनेक युगांच्या अनुभवाचीं व विचारांचीं फळें होत. एकाच व्यक्तीच्या म्हणण्यास आर्यधर्मांत कधींच महत्व दिलें जात नाहीं. ह्याच हेतूनें स्वतः अवतारी कृष्णांनीं अर्जुनाला "तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते" असें सांगून माझ्या शब्दापेक्षां शास्त्रावर तूं विश्वास ठेव असें बजाविलें. शास्त्रें म्हणजे अनेकांचें अनुभवजन्य ज्ञान होय. उत्क्रान्तितत्व आर्यधर्मालाच लागू आहे, इतर धर्मांना नाहीं. तर्काची कसोटी आर्यधर्माला लागू पडेल तशी दुसऱ्या धर्मांस लागू पडणार नाहीं. अन्यधर्म एकतंत्री आहेत तर आर्यधर्म बहुतन्त्री आहे. आर्यधर्माचें स्वरूप प्रजासत्ताक आहे तदितर धर्मांचें राजसत्ताक आहे. व्यक्तितन्त्रधर्म सनातन असणें शक्य नाहीं. आर्यधर्माचीं तत्वें चिरकालीन आहेत; कारण त्यांचा पाया अखंड आहे.

इतर धर्मांशीं तुलना करून आर्यधर्माचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा प्रधान हेतु प्रस्तुत लेखांत नसल्यामुळें, पुनर्जन्मकल्पनेच्या अभावीं इतर धर्म कसे पांगळे झाले आहेत, ह्याचें सविस्तर विवेचन करण्याचें कारण नाहीं. परिणत स्थितीस पोंचलेल्या धर्मांचीं मूलभूत तत्त्वें जीं अवश्य असावयास पाहिजेत, तीं वर निर्दिष्ट केलीं आहेत; व तीं सर्व आपल्या आर्य-

१ चित्वम्. (संपादक धर्मजागृति.)

धर्मात सांपडतात हेंही वर सांगितलेंच आहे. परंतु आतांपर्यंत जें विवेचन झालें तें धर्माच्या तात्त्विक बाजूचें झालें. धर्माचें जें व्यावहारिक अंग असतें त्याचा आतां आपणांस विचार कर्तव्य आहे. अर्थात् आपणांस प्रथम आचाराकडे वळलें पाहिजे. कोणत्याही धर्मात आचाराचें प्राबल्य आहेच. परंतु अमुक आचार इष्ट कां, व अमुक अनिष्ट कां ह्याचें सयुक्तिक व सप्रमाण उत्तर मात्र सर्व धर्मात मिळत नाहीं. परमेश्वर न्यायी आहे; दयाळू आहे त्याप्रमाणेंच मनुष्यांनींही होण्याचा प्रयत्न करावा असा प्रत्येक धर्माचा कटाक्ष आहे. पण परमेश्वर व मनुष्य ह्यांमध्यें जर कायमचा भेदभाव आहे, परमेश्वराचें सामर्थ्य अमर्यादित, मनुष्याचें संकुचित; परमेश्वराचें बुद्धिसामर्थ्य अफाट, मनुष्याचें तुटपुंजींचें अशी स्थिति जर आहे, तर ईश्वरी निर्दोषत्व आपणांमध्यें आणि तेंही सर्वथा प्रतिकूल परिस्थिति असतां आणण्याचा प्रयत्न करणें हास्यास्पद नसलें तरी असाध्य होय हें कोणत्याही विकारहीन मनुष्यास पटण्यासारखें आहे. मनुष्य व ईश्वर ह्यांमध्यें अभिन्नत्व आणि तादात्म्य मानलें तरच वरील प्रयत्नाची सफलता संभवनीय कोटीपैकीं वाटते. गुलामानें आपली कितीही उन्नति करण्याचा प्रयत्न केला तरी त्याच्या उन्नतीला सीमाही आहेच. तो गुलामाच्या स्थितींत आहे तोंपर्यंत सीमा ओलांडून जाणें त्यास शक्य नाहीं. आणि तसें न झालें तर त्यास दोष देण्यास कोणास कसा अधिकार पोंचतो हें समजत नाहीं. पण हा विचार सोडून दिला तरी एकदां पुनर्जन्म कबूल केल्यावर ज्या कृत्यानें ह्या जन्मीं आपल्या आत्म्याची उन्नति होईल निदान अवनति होणार नाहीं, त्या कृत्यास धर्माची मंजुरी मिळाली पाहिजे असें मानणें भाग पडतें. आतां प्रत्येकाचा आत्मिक अगर मानसिक विकास सम प्रमाणांत असणें शक्य नसल्यामुळें, एकाचा धर्म तोच दुसऱ्याचा धर्म असणें संभवत नाहीं. माणसें उत्क्रान्तीच्या जिन्याच्या निरनिराळ्या पायऱ्यांवर असल्याकारणानें अगदीं खालच्या पायरीवर उभा राहणारा व अगदीं वरच्या पायरीवर चढून गेलेला ह्या दोहोंना एकच धर्मबन्धन लागू करणें अन्यायमूलक तर आहेच, पण निकृष्ट दर्जाच्या माणसानें परिणत बुद्धीच्या माणसाचा धर्म आचरणांत आणण्याचा प्रयत्न करण्यानें केव्हां केव्हां त्याचा अपकर्षच होण्याचा अधिक संभव असतो. ही गोष्ट आमच्या ऋषींच्या ध्यानीं येऊन चुकल्यामुळें त्यांनीं सर्व लोकांना

एकच धर्म सांगितला नाहीं; एवढेंच नव्हे, तर प्रत्येक माणसाचा बौद्धिक विकास जन्मादारभ्य सारखा नसल्यामुळें, वयपरत्वें प्रत्येक माणसाला निरनिराळे धर्म त्यांनीं घालून दिले आहेत. आर्यधर्माचें हें विशिष्टत्व लक्षांत ठेवणें अवश्य आहे. इतर कोणत्याही धर्मामध्यें हें तत्व आढळून येत नाहीं. सर्वांना समान लेखणें म्हणजे मुक्त व पशु ह्यांत फरक न करण्यासारखें मूर्खपणाचें आहे. चातुर्वर्ण्य व आश्रम ह्यांच्या मूलाशीं वरील तत्त्व आहे हें निराळें सांगावयास नकोच. ह्या जगावर प्रेम ठेवणें म्हणजे परमेश्वराचें शत्रुत्व संपादन करणें होय, हा बायबलांतील सर्वांना सारखाच केलेला उपदेश शेंकडा नव्याण्णव माणसांच्या संबंधानें अनाठायीं होय ह्यांत शंका नाहीं. ह्याचा अर्थ असा होतो कीं, सर्व धर्मांत उच्चतम तत्वेंच गोंवलेलीं असल्यामुळें ते ते धर्म फारच थोड्या लोकांसंबंधानें कार्यक्षम होतात. बहुजनसमूहास वास्तविक कांहींच धर्म राहात नाहीं. व मग ते धर्महीन बनतात. ख्रिस्ती धर्मासंबंधानें ही गोष्ट प्रत्यक्ष अनुभवास येत आहे अशाबद्दल तद्धर्मोपासकांचाच पुरावा देतां येईल. "That Christianity as an intellectual or as a spiritual force holds great dominion over commercial or even over social life, the growth of intemperance, the laxity of morals and the daily revelations of our law courts afford no proofs; while a superficial knowledge of the life of the majority of successful businessmen offers little support to the altruism of the Christian ideal."

Dynhmics of the Fiscal Problems, page 80.

राजशासन आणि धर्मशासन ह्यांत मोठा फरक आहे. शारीरिक अपराधांबद्दल राजास शिक्षा करतां येते. मानसिक अपराधांबद्दल राजाचें दौर्बल्य सर्वांस कबूलच आहे. पण धर्माचा अम्मल मनावर विशेषतः असतो. मनाला वळण लावून तें पूर्णावस्थेस आणण्याचें काम धर्माचें असतें. तें मनास पायरीपायरीनें शिक्षण देऊनच करावें लागतें. सर्वांवर एकच बोजा लादल्यानें कांहीं त्याखालीं चिरडून मात्र जातील. व्यक्तिव्यक्तीमधील ही स्वभावसिद्ध भिन्नता ज्या धर्मानें ओळखली नाहीं तो धर्म शाश्वत टिकणें शक्य नाहीं. आर्यधर्माला "सनातन" हें विशेषण कसें शोभतें व तें किती अन्वर्थक आहे हें ह्यावरून कोणासही समजण्यासारखें आहे. "श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः" हीं जीं धर्म-

प्रमाणें मनूनें सांगितलीं आहेत त्यांतील "स्वस्य च प्रियमात्मनः" ह्याचा वास्तविक अर्थ काय असला पाहिजे व त्यांतील रहस्य काय आहे हें आतां वाचकांच्या सहज लक्षांत येईल. आपल्या आत्म्याला प्रिय म्हणजे इष्ट, पथ्यकर असेल तदनुसार आचरण्यानें धर्महानि होत नाहीं असें प्रतिपादण्याचा मनुचा आशय आहे. आपल्या आत्म्याची उन्नति कोठपर्यंत झाली आहे, कोणत्या कृत्यानें ह्या उन्नतीचा ऱ्हास होणार नाहीं हें ज्याचें त्यानेंच ठरविलें पाहिजे. ह्याच तत्त्वावर स्त्रीनें पुनर्विवाह करणें धर्मबाह्य म्हणतां येणार नाहीं. पतिनिधनानंतर स्त्रीनें अविवाहित रहावें हा उत्कृष्ट धर्म होय. असें उच्च ध्येय आमच्या पुढें ठेवल्याबद्दल आपण आमच्या ऋषींचे उपकार कधींही विसरतां कामा नये. त्यावरून आम्ही संस्कृतींत इतर समाजांच्या पुढें किती आहों हें व्यक्त होतें. परंतु परिस्थितीमुळें, शिक्षणाभावानें अगर नैसर्गिक मानसिक दौर्बल्यामुळें ज्या स्त्रीला विधवावस्थेंत शुद्धाचरण राखणें शक्य नसेल तिनें आपलें आत्मपरीक्षण करून पुनर्विवाह करण्याचें ठरविल्यास तें सदोष असलें तरी अधार्मिक म्हणतां येणार नाहीं. कारण वैधव्यांत तिच्या आत्म्याची अवनति होण्याचा संभव असेल तर ती न होऊं देणें हें तिचें आद्यकर्तव्य आहे. आमच्या धर्मांत हातून घडलेल्या दोषांबद्दल प्रायश्चित्तें सांगितलीं आहेत त्यांचा अलीकडील लोक उपहास करीत असतात. परंतु नितान्त धार्मिक आचरण व गौण अथवा दोषयुक्त आचरण ह्यांतील फरक समाजाच्या मनावर बिंबविण्यास प्रायश्चित्तांची आवश्यकता आहे हें विचारी माणसांस सम्मत होण्याजोगें आहे. नाहींतर धार्मिक तत्वांचा विपर्यास झाल्याशिवाय राहणार नाहीं. सध्यां हीच स्थिति अनुभवास येत आहे. पुनर्विवाह करणें, अस्पृश्य जातीच्या माणसानें केलेलें अन्न सेवन करणें इत्यादि गौण आचार निर्दोष व प्रशस्त आचारांची जागा पटकावूं पहात आहेत. उत्कृष्ट संस्कृतीचा जे उघड उघड अनादर करतात व भ्रष्टाचारांचें जे महत्व प्रस्थापित करूं पहातात ते समाजाचीं नांव खडकावरच आदळणार असें वाटतें. अनिर्वाह पक्ष म्हणून गौण आचरण अनेक प्रसंगीं करावें लागतें ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. तथापि कोणता आचार शंभरनंबरी आहे व कोणता हीणकस आहे ह्याची समाजाला केव्हांही विस्मृति पडतां कामा नये. व ही स्मृति सतत जागृत ठेवण्यास प्रायश्चितांचा उपयोग फार होतो.

केवळ पैसे उकळण्याकरितां धूर्त ब्राह्मणांनीं ही युक्ति काढलेली नाहीं. आर्यधर्माचें शास्त्रीयरीत्या अध्ययन केलें म्हणजे प्रायश्चितांचा भाग अगदीं आवश्यक आहे अशी खात्री पटते. तत्वतःच आर्यधर्माचें साम्य अन्य धर्मांशीं नसल्यामुळें त्यांतील सर्वच गोष्टी इतर कोणत्याही धर्मांत आढळणार नाहींत अशा आहेत. अन्यधर्मीयांना आर्यधर्मांत सर्वत्र वेवंदशाही आहे असें वाटतें पण तो भ्रम आहे. आर्यधर्माची उभारणी शास्त्रीय पायावर केलेली आहे.

आतांपर्यंत धर्माचा तात्विकदृष्ट्या विचार केला, म्हणजे कोणत्याही खऱ्या सनातन धर्माचीं मूलभूत तत्त्वें कोणतीं असलीं पाहिजेत तें सांगितलें. आर्यधर्मांत तीं सर्व आहेत हें निर्दिष्ट केलें. आर्य धर्म हा एका व्यक्तीच्या नांवाशीं अगर त्यानें प्रतिपादलेल्या विचारांशीं निगडित नसल्यामुळें तो सर्व जगाचा धर्म होण्यास पात्र आहे. निरंकुश हटवादाला आर्यधर्मांत जागा नाहीं. ह्या धर्माची सर्व भिस्त विचारावर आहे. अमुक एक मनुष्य असें सांगतो म्हणून तो धर्म समजावयाचा ही कल्पना आर्यधर्माला अपरिचित आहे. अखिल विश्वाचा धर्म होण्यास आमचा धर्म पात्र आहे असें म्हटलें म्हणजे इतर धर्मीयांना आमच्या धर्मांत येण्यास प्रतिबंध नाहीं असें कबूल करावें लागतें. व आमचे पूर्वज आर्य असून त्यांनीं अनार्य जे शूद्र त्यांचा चातुर्वर्ण्यांत समावेश केला ह्या गोष्टीवरून वरील अनुमानास आधार मिळतो. ह्याप्रमाणें आर्यधर्माच्या अंतरंगाचें परीक्षण केल्यावर त्याच्या बहिरंगाचें विवेचन पुढील स्वतंत्र लेखांत करणें अधिक सोयीचें होईल.

---

## लेखांक २ रा.

**आर्यं धर्मोपदेशं च वेदशास्त्र विरोधिना ।**
**यस्तर्केणानुसंधत्ते स धर्मं वेद नेतरः ॥**

—मनु.

प्रथमतः ज्याला सांप्रत हिंदुधर्म म्हणतात त्या धर्माच्या नांवाचा आपण विचार करूं. हिंदुधर्म हें नांव आमच्या धर्मास व हिंदु हें नांव आम्हांस परकीयांनीं दिलें आहे हें सर्वविश्रुतच आहे. शास्त्रकारांनीं तर आमच्या धर्मास कोणतेंच नांव दिलेलें नाहीं. आतां हिंदुधर्म हा शब्द सर्वांच्या

तोंडीं बसला आहे ही गोष्ट खरी पण तो शब्द परकीयांनीं प्रथम लावलेला म्हणून त्याज्य, इतकेंच नव्हे, तर शिवाय आमच्या धर्माचें रहस्य व श्रेष्ठत्व मनावर एकदम विंबण्यास निरुपयोगी आहे. आर्यसंस्कृतींत अनार्यांना आणणें, ही क्रिया ज्या धर्मांत चालते, त्या धर्माला तसेंच अन्वर्थक नांव पाहिजे हें उघड आहे. हिंदु शब्दांत अनार्यांचा समावेश होतो तेव्हां सर्व हिंदूंचा समान दर्जाचा एकच धर्म आहे असा भ्रामक समज "हिंदुधर्म" ह्या शब्दानें होण्याजोगा आहे. शूद्र हे अनार्य असून ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे आर्य होत. "आर्यानार्ययोर्व्यतिक्षेपे कर्मणः साम्यम्" ह्या गौतमसूत्रावरील टीकाकारानें ही गोष्ट मान्य केली आहे. तो म्हणतो, "आर्यः त्रैवर्णिकः अनार्यः शूद्रः" तीन वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य होत. "त्रयो वर्णाः द्विजातयः ब्राह्मणक्षत्रियवैश्याः" ( वसिष्ठ ). ह्यावरून आर्य आणि अनार्य ह्या दोहोंचा "हिंदू" त समावेश होतो हें उघड आहे. जगांतील सर्व मानवजातीचें वर्गीकरण केलें तरी तें आर्य आणि अनार्य ह्याहून निराळें असूं शकणार नाहीं. अर्थात् हिंदुधर्म, आर्य आणि अनार्य ह्या दोहोंचा म्हणजे सर्व मानवजातीचा असला पाहिजे. परंतु आर्य आणि अनार्य ह्यांच्या संस्कृतींत महदन्तर असल्यामुळें अनार्यांचा धर्म तोच आर्यांचा असें ज्याच्या योगानें ध्वनित होतें, तो शब्द आम्हांस आदरणीय वाटणार नाहीं; आणि एवढ्याचकरितां "हिंदुधर्म" हा शब्दप्रयोग आमच्या धर्माच्यासंबंधानें करणें विवेकी माणसास सम्मत होत नाहीं. हिंदुधर्मांत अनार्य जरी समाविष्ट झाले असले तरी तसें होण्यांत आर्यसंस्कृतीचा परिणाम अनार्यांवर व्हावा हाच हेतु असला पाहिजे. आर्यांचा अनार्यांत लोप व्हावा, त्यांची संस्कृति नष्ट व्हावी हा आर्यानार्यसंयोगजन्य परिणाम कोणालाच इष्ट नाहीं. ह्या दृष्टीनें विचार केला असतां "हिंदुधर्म" हा शब्द अप्रयोजक ठरतो. हिंदुधर्माशिवाय, आर्यधर्म, ब्राह्मणधर्म आणि वैदिकधर्म ही नांवेंही आमच्या धर्मास दिलीं जातात. माझ्या मतें कोणत्या तरी नांवानें तो धर्म ओळखला जावा असा आग्रह असेल—आणि तो असणें यथार्थ आहे—तर आमच्या धर्मास वैदिक धर्म हें नांव देणें सयुक्तिक दिसतें. ब्राह्मण धर्म म्हटल्यानें ब्राह्मणांचा गौरव जरी होत असला तरी ह्या शब्दद्वयानें आमचा धर्म संबोधणें ऐतिहासिक दृष्ट्या चुकीचें होईल. कारण ब्राह्मण हेच मुळीं वैदिक धर्मानें निर्माण केले आहेत. आर्यधर्म हे शब्द

यापरल्यानें धर्मास विशिष्टत्व येण्यास व इतर धर्मांहून आपल्या धर्माचें भिन्नत्व लक्षांत येण्यास कांहींच मार्ग नाहीं. इंग्लिश लोकांचा धर्म, जपानी लोकांचा धर्म असें म्हणण्यानें कांहींच अर्थबोध होत नाहीं. शिवाय हल्लीं युरोपियन लोकही आपणांस आर्य म्हणवितात म्हणून सर्व गोष्टींचा विचार करतां आपल्या धर्मास वैदिकधर्म म्हणजे वेदविहितधर्म ह्या नांवानें उल्लेखणें चांगलें. आमच्या धर्मांतील प्रमुख तत्त्वें वेदाशिवाय इतरत्र कोठेंही आढळावयाचीं नाहींत. तीं समजून घेण्यास प्रो. मॅक्स मुल्लरप्रमाणें वेदाध्ययनच केलें पाहिजे. सारांश, हिंदुधर्म हा शब्दप्रयोग सोडून आपल्या धर्मास वैदिकधर्म म्हणण्याचा परिपाठ लोकांनीं पाडावा हें बरें दिसतें.

धर्माची व व्यवहाराची फारकत पाडली पाहिजे असें कांहीं लोक प्रतिपादन करीत असतात. पण अशा लोकांस धर्माचीं मूलतत्वेंच समजलीं नाहींत असें म्हणणें भाग पडतें. हा आपला संसार म्हणजे एक मोठे विश्वविद्यालयच आहे. त्यांत आपल्या आत्म्याची एकसारखी परीक्षा घेतली जाते व ह्या परीक्षेच्या निकालावर पुनर्जन्मीं पुढच्या अगर खालच्या वर्गांत जाणें अवलंबून असतें. आपण विचार करतों, बोलतों अथवा अन्य कर्म करतों त्या प्रत्येकाची नोंद असते. किंवा असें म्हणावयाचें नसेल तर त्या त्या विचाराचे अगर कर्माचे संस्कार मनावर होऊन ते पुढच्या जन्मांतील फळें तयार करीत असतात. तेव्हां धर्माचा आणि व्यवहाराचा वियोग होणें अशक्य आहे, एवढेंच नव्हे, तर नीतिशास्त्रही धर्मापासून अलग करूं पाहणें निरर्थक होय. धर्म म्हणजे परमेश्वराच्या मर्जीखातर कांहीं निरर्थक गोष्टी करणें असा ज्यांचा समज असेल त्यांनाच हें म्हणणें शोभेल, नीतिशास्त्र म्हणून आमच्यांत निराळें मानलें नाहीं, ह्यांतील बीज हेंच होय. परद्रव्यापहरण अनिष्ट कां ? तर त्यायोगानें आपल्या आत्म्याचो अवनति होते म्हणून; आत्मिक अवनति करून घेऊन आपण विषयसुख मिळवतों, अर्थात् ही गोष्ट धर्माला संमत नाहीं. कारण ज्या कृत्यानें आत्मापकर्ष होईल तें कृत्य अधार्मिक होय हें मागें सांगितलेंच आहे. म्हणून धर्माचा अंमल व्यवहारांतही अनियन्त्रित असला पाहिजे. आठवड्यांतून एकदां चर्चमध्यें गेल्यानें किंवा देवावर दररोज पाणी सोडल्यानें तुमचें धार्मिक कर्तव्य आटोपलें, मग तुम्हीं पाहिजे तसे वागा, असें सांगण्याइतका परमेश्वर अथवा कोणताही धर्मसंस्थापक खास खुळा नाहीं. धर्म म्हणजे एक स्वतंत्र

अलग असें खातें नाहीं, सर्व व्यवहाराला पुरून धर्म उरला आहे. धर्माच्या करड्या नजरेतून अंतःकरणांत उद्भूत होणारा सूक्ष्म विचारांकुरही सुटणें अशक्य आहे. प्रत्येक व्यावहारिक कृत्यांत धर्म अनुस्यूत झाला आहे. हें तत्त्व आमच्या ऋषींना पूर्णपणें अवगत होतें म्हणूनच त्यांनीं धर्माचरणापासून धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष प्राप्त होतो असें निर्धास्त विधान केलें आहे. ऐहिक सुख प्राप्त होण्यासही धर्माचरण अवश्य आहे असें आमच्या ऋषींचें आग्रहपूर्वक सांगणें आहे. उदाहरणार्थ, दक्षस्मृतींतील खालील श्लोकाचा विचार करा: " न क्लेशेन विना द्रव्यं द्रव्यहीने कुतः क्रिया ॥ क्रियाहीने न धर्मः स्याद्धर्महीने कुतः सुखम् ॥ " तेव्हां आतां आम्हांला आमच्या वैदिक ऋषींनीं धर्म तरी काय सांगितला आहे तें पाहूं.

सर्व व्यवहार धर्ममय असला पाहिजे असें एकदां मान्य केलें म्हणजे धर्माचा अर्थ मनुष्याचें कर्तव्य असा होतो. ह्या जगांत निरनिराळ्या माणसांचीं निरनिराळीं कर्तव्यें असतात, त्यामुळें सर्वांना एकच धर्म पाळणें शक्य नसतें, हें जाणून आमच्या स्मृतिकारांनीं वर्णाश्रमधर्म सांगितले आहेत. वर्णाश्रमधर्माव्यतिरिक्त हिंदु म्हणविणाऱ्या प्रत्येक माणसास सामान्य असे धर्माचरण सांगण्याचा प्रयत्न एकाही स्मृतिकारानें केला नाहीं. ह्याची साक्ष खालील उताऱ्यांवरून पटण्यासारखी आहे.

( १ ) आश्रमेषु च सर्वेषु वर्णानामनुसर्वशः । प्रायश्चित्तविधिं कृत्स्नं वक्ष्यमाणं निबोधत ॥ अङ्गिर.

( २ ) चतुर्णामपि वर्णानामत्रिः शास्त्रमकल्पयत् । अत्रि

( ३ ) आपस्तम्बं प्रवक्ष्यामि प्रायश्चित्तविनिर्णयम् । दूषितानां हितार्थाय वर्णानामनुपूर्वशः ॥ आपस्तम्ब.

( ४ ) अतःपरं प्रवक्ष्यामि जातिवृत्तिविधानकम् । औशन.

( ५ ) ब्रह्मचारी गृहस्थश्च वानप्रस्थो यतिस्तथा । एतेषां तु हितार्थाय धर्मशास्त्रमकल्पयत् ॥ दक्ष.

( ६ ) भगवन्म्लेच्छनीताहि कथं शुद्धिमवाप्नुयुः । ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्राश्चैवानुपूर्वशः । कथं स्नानं कथं शौचं प्रायश्चित्तं कथं भवेत् । किमाचारा भवेयुस्ते तदाचक्ष्व सविस्तरम् ॥ देवल.

( ७ ) श्रुतिस्मृत्युदितं धर्मं वर्णानामनुपूर्वशः । प्राब्रवीदृषिभिः पृष्टो मुनीनामग्रणीर्यमः ॥ यम.

( ८ ) ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रश्चैव तथापरः । एतेषां धर्मसारं यद्वक्ष्यमाणे निबोधत ॥ लघुविष्णु.

( ९ ) पप्रच्छुर्मुनयोऽपेत्य धर्मान्वर्णव्यवस्थितान् ॥ वेदव्यास.

( १० ) चातुर्वर्ण्यहितार्थाय शङ्खशास्त्रमकल्पयत् । शङ्ख.

( ११ ) चातुर्वर्ण्यसमाचारं शृणुध्वं मुनिपुङ्गवाः । पराशर.

( १२ ) वर्णानामाश्रमाणां च धर्मान्नो ब्रूहि सत्तम । हरित.

( १३ ) वर्णानामाश्रमाणां च धर्मान्वद सनातन । विष्णु.

( १४ ) भगवन्सर्ववर्णानां यथावदनुपूर्वशः...धर्मान्नो वक्तुमर्हसि । मनु.

कांहीं स्मृतिकार आम्हीं फक्त प्रायश्चित्तें सांगतों म्हणून म्हणतात, कांहींनीं प्रस्तावना न करतां एकदम विषयाला आरंभ केला आहे. तथापि सर्वांनीं वर्णाश्रमांकडे दुर्लक्ष करून धर्म सांगितला असें कोठेंही झालें नाहीं. ह्यावरून हें उघड होतें कीं, स्मृतिकारांच्या वेळीं चातुर्वर्ण्यव्यवस्था दृढमूल झाली होती. आतां ह्या चार वर्णांकरितां कोणता धर्म सांगितला आहे तें पाहूं. धर्माप्रमाणें वागणें ह्या दिवसांत शक्य नाहीं; आमच्या धर्मामुळें आमच्या ऐहिक प्रगतीस अडथळा येतो; धर्म सोडल्यावांचून आमच्या राष्ट्राचा उद्धार होणार नाहीं अशा प्रकारच्या कल्पनांनीं अलीकडील लोकांचीं मनें पीडित झालीं आहेत. पण त्यांत तथ्य किती आहे ह्याचाही पुढील विवेचनानें उलगडा होईल. आमचे ऋषि हे मोठे सुधारक होते. हल्लींच्या सुधारकांतही त्यांची बरोबरी कोणी करूं शकेल असें मला वाटत नाहीं. असो. चित्तशुद्धीकरितां व आत्मोन्नतीकरितां करावयाचें कर्म आणि उपजीविकेसाठीं करावयाचें कर्म, ह्यांमधील भेद ऋषींनीं स्पष्ट करून दाखविला आहे. पहिलें कर्म आवश्यक असून दुसरें ऐच्छिक आहे. गौतमसूत्रांतील उतारा खालीं देतों त्यावरून वरील विधानाची सत्यता दिसून येईल.

द्विजातीनामध्ययनमिज्यादानम्। ब्राह्मणस्याधिकाः प्रवचनयाजनप्रतिग्रहाः। पूर्वेषु नियमस्तु ॥ यावर हरदत्ताची टीका येणेप्रमाणें आहे. " नियमः अवश्यकर्तव्यता । पूर्वाणि अध्ययनादीनि अवश्यकर्तव्यानि । अकुर्वन् प्रत्यवैति । कुर्वन् च अभ्युदैति । प्रवचनादीनि तु वृत्त्यर्थानीति । अतः अकरणे न प्रत्यवायः करणे न अभ्युदयः ॥" द्विज म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य. ब्राह्मणः क्षत्रियो वैश्यः शूद्रश्चेति वर्णाश्चत्वारः । तेषामाद्या द्विजातयः" विष्णुस्मृति. ह्यावरून ब्राह्मणक्षत्रियवैश्यांचीं आवश्यक कर्तव्यें म्हणजे

अध्ययन, यज्ञ आणि दान हीं तीन होत. (आपस्तंम्बीय व वसिष्ठसूत्र पहा). आतां परमेश्वर व मनुष्य ह्यांविषयींच्या यथार्थ कल्पना जर आमच्या वेदांत असतील आणि त्या आहेत असें सर्व जग हळुहळू मान्य करूं लागलें आहे—तर वेदांचें अध्ययन—हल्लींच्या कालाला अनुसरून—केल्यानें देशाचें अनहित कसें होईल हें समजणें कठीण आहे; दानाविषयीं तर कोणालाच तक्रार करण्याचें कारण नाहीं. बाकी राहिला यज्ञ, त्यांतही त्यागाची कल्पना गर्भित आहे; शिवाय यज्ञाचीही संक्षिप्त आवृत्ति निघाल्यामुळें वैदिकधर्म पाळण्याची ज्याला इच्छा असेल त्यास तेंही करणें अशक्य, खर्चाचें अगर कालक्षेपाचें वाटणार नाहीं. शूद्रांच्यासंबंधानें पुढें निराळें विवेचन करूं. सध्यां सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, न केल्यानें प्रत्यवाय येतो म्हणजे हिंदुत्वाची हानि होते, अशीं सर्व द्विजांचीं तीनच कर्में होत. स्मृतीप्रमाणें पुराणांत द्विजांचीं हींच प्रमुख कृत्यें म्हणून सांगितलेलें आहे. उ. "दानं दद्याद्यजेद्वान्यैः स्वाध्यायतत्परः । नित्योदकी भवेद्विप्रः कुर्याच्चाग्निपरिग्रहम् । दानानि दद्यादिच्छातो द्विजेभ्यः क्षत्रियोऽपि हि । यजेच्च विविधैर्यज्ञैरधीयीत च पार्थिव । तस्याप्य (वैश्यस्य) ध्ययनं यज्ञो दानं धर्मश्च शस्यते ॥" विष्णुपुराण. तेव्हां हिंदुधर्माचा आवश्यक भाग कोणता हें वरील स्मृतिपुराणवाक्यांवरून चांगलें व्यक्त होतें. तसेंच हीं वचनें फार महत्त्वाचीं आहेत. कारण ह्या आवश्यक धार्मिक कर्तव्यांत आचाराचा बिलकुल समावेश केलेला नाहीं ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे.

निर्वाहाकरितां करावें लागणारें कर्म व धार्मिक म्हणून अवश्य गणलें जाणारें कर्म ह्यांतील भेद आमच्या ऋषींनीं स्पष्ट करून दाखविला आहे, हें मागें सांगितलेंच आहे. अध्ययन, यजन व दान हीं सर्व द्विजांचीं आवश्यक कर्में होत. उपजीविकेचीं साधनें म्हणून मात्र निरनिराळ्या वर्णांत निरनिराळीं कर्में सांगितलीं आहेत. "द्विजानां वृत्तयः ब्राह्मणस्य याजनप्रतिग्रहैः क्षत्रियस्य क्षितित्राणं, कृषिगोरक्षणं वाणिज्यकुसीदयोनिपोषणानि वैश्यस्य । " विष्णुपुराण. सर्व ऋषींची ह्या बाबतींत एकवाक्यताच आहे. वसिष्ठधर्मसूत्रांतून खालील उतारा घेतला आहे. "षट्कर्माणि ब्राह्मणस्य स्वाध्यायाध्ययनमध्यापनं यजनं याजनं दानं प्रतिग्रहश्चेति । त्रीणि राजन्यस्य अध्ययनं यजनं दानं च शस्त्रेण च प्रजापालनम् । एतान्येव त्रीणि वैश्यस्य कृषिर्वाणिज्यं पशुपाल्यं कुसीदं च ॥ " थोड्याशा निराळ्या भाषेंत पण

आपस्तम्बसूत्रांतही ह्याच वृत्ति निर्दिष्ट केल्या आहेत. "स्वकर्म ब्राह्मणस्याध्ययनमध्यापनं यज्ञो याजनं दानं प्रतिग्रहणं दायाद्यं शिलोञ्छः । एतान्येव क्षत्रियस्याध्यापनयाजनप्रतिग्रहणानीति परिहाप्यदण्डयुद्धाधिकानि । क्षत्रियवैश्यस्य दण्डयुद्धवर्जे कृषिगोरक्ष्यवाणिज्याधिकम् ॥" ह्यामध्यें ब्राह्मणाच्या निर्वाहाच्या साधनांत वारस हक्कानें प्राप्त झालेलें द्रव्य व शेतांत पडलेलीं धान्याचीं कणसें ह्या दोहोंची भर टाकलेली आहे. त्याचप्रमाणें वैश्यांना कुसीद म्हणजे सावकारीचा धंदा सांगितलेला नाहीं. पण सध्यां याच्याशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं.

ह्याप्रमाणें धार्मिक आवश्यक कर्में निराळीं काढल्यावर जगण्याकरितां करावीं लागणारीं कर्में अर्थातच गौण ठरतात. व ही गोष्ट आमच्या स्मृतिकारांनीं मान्य केली आहे. कारण परिस्थितीप्रमाणें हीं कर्में बदलण्यास हरकत नाहीं, असा अभिप्राय त्यांनीं स्पष्ट नमूद केला आहे. सर्व जनतेकडून वर्णाश्रमधर्म पाळले जावे हें बघण्याचें काम राजाचें आहे. वर्णाश्रमधर्म न पाळणाराला राजास शासन करतां येतें. परंतु ज्या भूमीवर क्षत्रियांचें राजवैभव नष्ट झालें तेथें वर्णाश्रमधर्म बुडालेच पाहिजेत. आपण सर्व कालशरण आहों. कालापुढें कोणाचा कांहीं उपाय चालत नाहीं. क्षात्रधर्म लुप्त झाला म्हणजे, बाकीचे धर्म आपोआपच नाहींसे होतात. अशा प्रसंगीं कोणत्याही उपायानें निर्वाह करणें भाग पडतें. तथापि आपण ज्या वृत्तीचा अंगिकार करूं तिचे संस्कार मनावर होत असल्यामुळें तिच्यासंबंधानें घेववेल तितकी खबरदारी घेणें जरूर आहे. ह्याच उद्देशानें गौतमांनीं ब्राह्मणांस कृषिवाणिज्यांवर निर्वाह करण्याची परवानगी दिली आहे. पण शक्य तर प्रत्यक्ष काम दुसऱ्यांकडून करवावें असें त्यांचें म्हणणें आहे. " कृषिवाणिज्येवाऽस्वयंकृते कुसीदं च " आतां कृषिकर्म हें वेदविद्यापोषक होणें संभवनीय नाहीं. विद्वान् माणसांच्या हातून इतर व्यवसाय चांगल्या रीतीनें होत नाहींत हा आपला नेहमींचा अनुभव आहे. म्हणून बौद्धायन ऋषींनीं वेळींच योग्य इशारा देऊन ठेवला आहे. ते म्हणतात—" वेदः कृषिविनाशाय कृषिर्वेदविनाशिनी । शक्तिमानुभयं कुर्यादशक्तस्तु कृषिं त्यजेत् ॥" म्हणजे शेतकीच्या नादीं लागलां तर ज्ञानार्जन व्हावें तसें होणार नाहीं. आणि विद्येच्या ठिकाणींच केवळ रममाण व्हाल तर कृषिकर्म नीट साधणार नाहीं. दोनही गोष्टी चांगल्या रीतीनें करण्याचें सामर्थ्य ज्यांच्यांत असेल त्यानें त्या बेलाशक

कराव्या. पण हें महत्कृत्य सर्वांसच कांहीं साधत नाहीं. अशा माणसांनीं शेती सोडून वेदाध्ययनच तेवढें संभाळावें. वरील अवतरण देण्याचा दुसरा एक उद्देश असा आहे कीं, ब्राह्मणानें कृषिकर्म आपत्काल नसतांही करण्यास प्रत्यवाय नाहीं, असें बौधायन मुनींचें मत दिसतें. येथें शारीरिक सामर्थ्याचा प्रश्न आहे. उपजीविकेचें साधन लुप्त झाल्यामुळें ब्राह्मणानें अन्यवृत्तीचा अंगीकार करावा कीं काय, हा प्रश्न नाहीं. कारण तसें असतें तर कृषि सोडून वेदाध्ययन कर म्हणून सांगण्यांत कांहीं अर्थच नाहीं. ह्यावरून असें दिसतें कीं, कर्माचा म्हणजे वेदाध्ययनाचा म्हणजे ज्ञानार्जनाचा लोप न होऊं देतां जर कृषिवाणिज्य अगर सावकारी करतां येईल तर त्याचा निषेध शास्त्र करीत नाहीं. आपत्कालांत म्हणजे आपापल्या धर्माचरणानें पोट भरत नसेल तर कोणताही धंदा करण्यास आडकाठी ठेवलेली नाहीं. " आपदि अनन्तरा वृत्तिः " ( विष्णु ) असें सूत्र आहे. वसिष्ठांनीं हीच गोष्ट स्पष्ट शब्दांत सांगितली आहे. " अजीवन्तः स्वधर्मेण अनन्तरां पापीयसीं वृत्तिमातिष्ठेरन् । न तु कदाचित् ज्यायसी ॥" क्षत्रियाला क्षात्र धर्मानें राहणें कठीण पडेल तर त्यानें वैश्यवृत्ति स्वीकारावी. एकदम सेववृत्ति पत्करूं नये. ह्याचप्रमाणें इतर वर्णांविषयीं समजावें. परंतु वरच्या वर्णाची वृत्ति अवलंबिणें व्यक्तीच्या व समाजाच्या दृष्टीनें इष्ट नव्हे असा आमच्या ऋषींचा अभिप्राय होता. आणि तो अगदींच मूर्खपणाचा होता असें कोण म्हणेल ? धर्मग्रंथाच्या विरुद्ध ब्राह्मण आतांच सेवाधर्मानें वागूं लागले, असा जो कित्येकांचा समज आहे तो चुकीचा आहे. गौतमसूत्रावरील वृत्तिकार म्हणतो, " याजनादि अलाभे ब्राह्मणः सेवादिना जीवेत् क्षात्रवृत्त्या वा वैश्यवृत्त्या वा जीवेत् " तात्पर्य, पोट भरण्याकरितां वाटेल तो धंदा करावा. " सर्वथा वृत्तिरशक्तौ " कुटुम्बधारणस्य असंभवः अशक्तिः तस्यां सत्यां सर्वथा वृत्तिः " ( गौतमसूत्र व वृत्ति. ) त्याचप्रमाणें याज्ञवल्क्य पहा, " क्षात्रेण कर्मणा जीवेद्विशां वाप्यापदि द्विजः । आपद्गतः संप्रगृह्णन्भुञ्जानो वा यतस्ततः ॥" भागवतकारांनींही विप्राला चतुर्विध वृत्ति मोकळी ठेवली आहे. " विप्रवृत्तिश्चतुर्धेयं श्रेयसी चोत्तरोत्तरा। जघन्यो नोत्तमां वृत्तिमनापदि भजेन्नरः। ऋते राजन्यमापत्सु सर्वेषामपि सर्वशः ॥ " स्कंध ७ अ. ११. वरील सर्व अवतरणांवरून असा सिद्धान्त निघतो कीं, प्रसंग नसेल तेव्हां चातुर्वर्ण्यान्तर्गत लोकांनीं आपआपलीं विहित कर्में करावीं; शक्य नसेल तेव्हां वरील वर्णानें आपल्याहून

खालच्या वर्णांचीं कर्में उपजीविकेकरितां करण्यास हरकत नाहीं. परंतु खालच्या वर्णांनीं वरच्या वर्णांचीं कर्में करूं नये. वरवर नुसते शब्द वाचणाराला हा नियम अन्यायमूलक वाटेल. पण थोडा विचार केला असतां, त्यांत कोणत्याही प्रकारचा अन्याय नाहीं अशी मनाची खात्री होईल. क्षत्रियाची वृत्ति म्हणजे " शस्त्रेण प्रजापालनम् " पण क्षत्रियांचा ऱ्हास झाला म्हणजेच आपत्काल प्राप्त होतो आणि वृत्त्यन्तर करणें भाग पडतें; तेव्हां वरील वर्णाच्या वृत्तीचा स्वीकार करावयाचा म्हणजे याचना करावयाची. ती कोणीं करूं नये, ह्या सांगण्यांत कांहींच गैर नाहीं. शूद्रांबद्दल सध्यां येथें विचार करीत नाहीं. तथापि वर्णसंकर होत असतां अगर आत्मसंरक्षणार्थ वैश्यांनीं शस्त्र हातांत धरण्यास प्रतिबंध नाहीं अशी वसिष्ठांची स्पष्ट अनुज्ञा आहे. " आत्मत्राणे वर्णसंकरे वा ब्राह्मणवैश्यौ शस्त्रमाददीयाताम् "। सारांश, आमच्या ऋषींनीं आमच्यापुढें चातुर्वर्ण्याचें ध्येय ठेवलें आहे वर्णधर्म पाळल्यानें समाजाचें हित होतें व आश्रमधर्मानुसार वर्तल्यानें स्वतःच्या आत्म्याची उन्नति होते, असा त्यांनीं विचारान्तीं निश्चय केलेला दिसतो. परंतु आपत्कालीं म्हणजे आपल्या वर्णधर्मावर निर्वाह होत नाहींसा झाला म्हणजे, ज्याला जें साधन उपलब्ध होईल त्याचें त्यानें विनादिक्कत अवलम्बन करावें. शेतांत अगर अन्य धंद्यांत राबावें लागलें तर अध्ययनसातत्य अबाधित राहत नाहीं ह्याचा अनुभव सर्वांना असतोच. कारण नसतांना मात्र ब्राह्मणानें कोणत्याही धंद्यांत पडूं नये असें मन्वादि ऋषींचें म्हणणें आहे. " योऽनधीत्य द्विजो वेदमन्यत्र कुरुते श्रमम् । स जीवन्नेव शूद्रत्वमाशु गच्छति सान्वयः ।।" मनु. आपत्काल मनुष्याला येतो तद्वत् समाजालाही येतो. सध्यां सर्व हिंदुसमाज आपत्काल अनुभवीत आहे. कारण आपला समाज सांप्रत परधर्मीयांच्या अमलाखालीं गेला आहे. त्यामुळें आमच्यांतील एक वर्ण म्हणजे क्षत्रियवर्ण नष्टप्राय झाला आहे. त्या कारणानें त्यावर अवलंबून असलेले इतर वर्णही नामशेष होणें स्वाभाविक आहे. अशी स्थिति जोंपर्यंत आहे तोंपर्यंत आपण आपत्कालांतच गुरफटलेले आहों असें म्हणणें भाग आहे. ही स्थिति ब्रिटिश अमलापूर्वीच सुरू झाली होती. क्षात्रधर्माचा लोप झाला म्हणजे व्यापारही नष्ट होतो व मग प्रत्येकाला शेतीवरच उपजीविका करावी लागते. वरच्या तीन वर्णांचा ऱ्हास झाल्यानंतर शूद्र तरी सेवा कोणाची करणार ? अशा प्रसंगीं उपजीविकेचीं दोनच साधनें प्रायः

उपलब्ध असतात. एक राज्यकर्त्यांची सेवा व दुसरी शेती. अशाही प्रसंगीं आमचे ऋषि डगमगले नाहींत हें त्यांच्या बुद्धिमत्तेस व मुत्सद्दीपणास भूषणावह आहे. "कृषिस्तु सर्ववर्णानां सामान्यो धर्म उच्यते। कृषिर्भृतिः पाशुपाल्यं सर्वेषां न निषिध्यते॥" वृद्ध हारीत. राज्यक्रान्तीमुळें वर्णाश्रमधर्मांचा लोप झाला म्हणजे जगावें कसें हाच प्रश्न समाजापुढें असतो. धर्माची बाब कमी महत्वाची होते. कसें तरी करून जिवन्त राहाणें हाच धर्म बनतो. ही गोष्ट निर्भींडपणें प्रतिपादण्यास आमचे ऋषि कचरले नाहींत. " देशभंगे प्रवासे वा व्याधिषु व्यसनेष्वपि। रक्षेदेव स्वदेहादि पश्चात् धर्मं समाचरेत्॥" पाराशर. पहिल्या लेखांत सांगितल्याप्रमाणें कोणत्याही परिस्थितींत आपल्यास आपल्या आत्म्याच्या उन्नत्यर्थ जें कांहीं करतां येईल तें केलें म्हणजे आपल्या धर्माची हानि होत नाहीं. पाराशर ऋषींचाही असाच अभिप्राय आहे. " येन केन च धर्मेण मृदुना दारुणेन च। उद्धरेदीनमात्मानं समर्थो धर्ममाचरेत्॥" धर्मशास्त्राचें अध्ययन न केलेल्या माणसांस आमच्या ऋषींचीं विचारपूर्ण वचनें विसंगत दिसतात. परंतु धर्माचें रहस्य अवगत असणाऱ्यास कांहींच विसंगतता आढळणार नाहीं; व कोणत्या प्रसंगीं कोणता आचार ठेवावा, ह्याविषयीं त्यास शंकाही येणार नाहीं. सारांश, ह्या लेखांत मी मुख्यतः दोन गोष्टी वाचकांच्या निदर्शनास आणतों. त्या या कीं, शूद्रेतर सर्व वर्णांचा धर्म–आवश्यक कर्तव्यें–म्हणजे स्वाध्याय यजन आणि दान हा होय. हीं आचरण्यास अडचण नाहीं. परंतु तेंही शक्य नसेल तेथें त्यांचा त्याग झाला असतांही पाप नाहीं. ह्या ठिकाणीं विशेष लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही आहे कीं, ब्राह्मणांनीं आपल्या हातांत विद्या ठेवली असा जो कित्येक लोक आरोप करीत असतात तो अगदीं निराधार आहे. अध्ययन म्हणजे विद्यार्जन हें तीनही वर्णांस–ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांस–सारखेंच विहित आहे. शूद्रांची गोष्ट अर्थात् निराळी आहे. व त्यांच्यासंबंधानें मी स्वतंत्रच विवेचन करणार आहें त्यावरूनही ह्या बाबतीत ब्राह्मणांकडे कोणताही दोष नाहीं असेंच प्राञ्जलपणें कबूल करावें लागेल. दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवणें अवश्य आहे ती ही कीं, प्रसंग पडला असतां वाटेल त्या वृत्तीनें निर्वाह करण्यास आमच्या शास्त्रकारांची आडकाठी नाहीं. जुन्यानव्या समजुती ह्या बाबतींत चुकीच्या आहेत, व त्याचें कारण केवळ धर्माविषयीं अज्ञान होय. जुन्या लोकांस धर्म बुडाला असें वाटतें; व नवीनांस धर्म झुगारून देऊन आम्ही अलौ-

किंवा पराक्रम करीत आहों असें वाटतें. परिस्थितीप्रमाणें कराव्या लागणाऱ्या आचरणानें धर्म बुडतही नाहीं अथवा त्याची कोणत्याही तऱ्हेनें हानि होत नाहीं, किंवा कोणास त्याचें उपबृंहणही करतां येत नाहीं. वैदिक धर्म इतका व्यापक आहे कीं, त्यांत सर्वांचा समावेश होऊं शकेल. त्यास जुनाट वटवृक्षाची उपमा शोभेल. असो. हा लेख बराच लांबल्यामुळें आचारासंबंधी विचार करणें पुढें टाकणें भाग आहे.[१]

पुस्तके जपून वाप

## लेखांक ३ रा.

### "आचारः परमो धर्मः सर्वेषामिति निश्चयः"

—वसिष्ठ.

परमेश्वराविषयीं विचार करण्यास बहुजनसमूहास फुरसतही नसते आणि जरूर तें बुद्धिसामर्थ्यही नसतें. मानसिक उन्नत्ति, अवनति, स्वकर्तव्य, नीतिमत्ता इत्यादिकांचें आकलन करण्यास त्यांच्या मनाची पात्रता नसते. परंतु अशांनींही घसरटत खालीं जाऊं नये म्हणून त्यांना कोणी तरी मार्ग-

१ या लेखांतील मुख्य मुद्दा नवीन आहे असें वाटतें. निदान तो आम्ही यापूर्वी दुसरीकडे पाहिलेला नाहीं. पण वर्णाचें कर्तव्य एक व तें केल्यावर ज्यास उपजीविकेसाठीं कर्तव्य करणें आहे त्यास आपत्काल नसतांही वाटेल तें दुसरें कर्तव्य अंगीकारण्यास हरकत नाहीं असें असेल तर भानगडीचे प्रश्न उत्पन्न होतील. वर्णव्यवस्था ही कांहीं कृत्रिम अवस्था नाहीं. जीवात्म्याच्या योग्यतेवर वर्ण अवलंबून असला पाहिजे. उपजीविकेचीं कर्तव्यें पुष्कळ वेळां अशीं असतात कीं, त्यांत राबल्यास ज्या तऱ्हेची वृत्ति बनते ती वर्णधर्मास फारशी अनकूल नसते. उदाहरणार्थ, सावकार ब्राह्मण व अध्ययन अध्यापन करणारा ब्राह्मण यांच्या वृत्तींत विरोध आहे व ब्राह्मणास दोन्ही करूं दिलीं तर त्याच्या जीवात्म्याची उत्क्रांति किती सुरळीत होईल हा प्रश्नच आहे. वर्णाश्रमधर्म जिवंत ठेवावयाचे असतील तर ब्राह्मणांस जीवात्म्याच्या उत्क्रान्तीसाठीं तसेंच उपजीविकेसाठींही अध्ययन—अध्यापनाशिवाय वाटेल तो व्यवसाय करूं देणें तत्वविचाराच्या दृष्टीनें इष्ट होईल काय ? वर्णधर्मांतच उपजीविका अंतर्भूत व्हावी अशी अर्थशास्त्रदृष्ट्या जुनी समाजव्यवस्था नव्हती काय !—( संपादक, धर्मजागृति ).

दर्शक लागत असतो. स्मृतिकार हे असे मार्गदर्शक होत. विचार तसा आचार व आचार तसा विचार असा सामान्य नियम आहे. दुष्ट विचारांच्या माणसांचा आचार चांगला असला तरी त्याची कोणी प्रतिष्ठा समजत नाहीं. ह्याच हेतूनें वामनपुराणांत मन जोंपर्यंत भ्रष्ट आहे तोंपर्यंत नुसत्या बाह्य तपश्चर्येनं शुद्धि होत नाहीं, असें सांगितलें आहे. " न शरीरस्य संक्लेशैरपि निर्दहनात्मकः । शुद्धिमाप्नोति पुरुषः संशुद्धं यस्य नो मनः ॥" परंतु ज्यांचें मन कोरें आहे, म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें ज्यांना स्वतः विचार करवत नाहीं, त्यांच्यासंबंधानें वसिष्ठ ऋषींनीं म्हटल्याप्रमाणें आचार हाच परधर्म हें विधान सत्यमूलक आहे. सदाचारानें वाईट मनही सुसंस्कृत होतें; दुराचारानें चांगलें मनही वाईट बनतें. अशा दृष्टीनें श्रुतीचें म्हणणें कीं " यथाकारी यथाचारी तथा भवति " हें अगदीं यथार्थ आहे असेंच मानलें पाहिजे, म्हणून आचाराची कोठें प्रशंसा केली आहे तर अन्यत्र निन्दाही केली आहे. तथापि ह्यांत विसंगति अथवा असंबद्धता आहे असें मात्र समजण्याचें कारण नाहीं.

आतां आचार म्हणजे काय ह्याचा आपण विचार करूं. त्रैवार्णिकांना यजन श्रुतीनें सांगितलें आहे. परंतु यज्ञ कसे, केव्हां, कोणत्या तऱ्हेनें करावयाचे असे एतद्विषयक जे नियम त्यांस श्रौताचार म्हणतात. " श्रौतो धर्मोऽग्निहोत्रादिराचारस्तदनुष्ठितिः ।" ( माधव ). ह्यावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं, यज्ञ करणें हें मुख्य असून तो कोणत्या विधीनें केला जातो हें गौण आहे. श्रौतानुष्ठानाशीं आपणांस येथें कांहीं कर्तव्य नाहीं. व्यावहारिक आचाराचीच छाननी आपणांस येथें करावयाची आहे. तीनही वर्णांची सामान्य अशीं धार्मिक कर्तव्यें श्रुतीनें सांगितलीं, परंतु निरनिराळ्या वर्णांच्या निरनिराळ्या आश्रमांतील जनांनीं कशा रीतीनें दैनिक आचरण ठेवावें ह्याविषयीं श्रुतीची मुग्धता युक्तच आहे. आणि ह्या एका गोष्टीवरूनच आचाराचें गौणत्व आपोआप सिद्ध होतें. श्रौतस्मार्तधर्म म्हणजे कोणता हें मत्स्य पुराणांत व्यक्त केलें आहे. " दाराग्निहोत्रसम्बधमिज्या श्रौतस्य लक्षणम् " " स्मार्तो वर्णाश्रमाचारो यमैश्च नियमैर्युतः ।" आणखी "इज्यावेदात्मकः श्रौतः स्मार्तो वर्णाश्रमात्मकः । " तात्पर्य, श्रुतीमध्यें सामान्य धर्माचें विधान असून स्मृतींमध्यें विशिष्ट धर्म निर्दिष्ट केले आहेत. आतां वर्णभेदामुळें व आश्रमभेदामुळें आचारभिन्नता असणें स्वाभाविक आहे.

आणि त्याप्रमाणें वर्णाश्रमानुरूप प्रत्येकास निरनिराळे धर्मही स्मृतिकारांनीं घालून दिले आहेत. म्हणून वर्णाश्रमधर्मांना प्रमाणभूत ग्रन्थ म्हणजे स्मृति होत. " सर्वेषामुपनयनप्रभृतिसमान आचार्यकुले वासः । सर्वेषामनुत्सर्गो विद्यायाः ॥ " ( आपस्तम्बसूत्र ) इत्यादि प्रकारचे हे धर्म होत, वर्णाश्रमाशीं ज्या व्यावहारिक कृत्यांचा निकट संबंध नाहीं, तीं सर्व कृत्यें आचारांत मोडतात. " साधूनां च यथावृत्तमेतदाचारलक्षणम् । " असें आचाराचें लक्षण केलें आहे. जो आचार धर्माला हेतुभूत होतो त्या यजनयाजनात्मक आचाराला कर्म म्हणतात. "आचारो यस्य धर्मस्य कारणत्वेन वर्तते । सोऽयं यजनयाजनादिकर्मलक्षणो धर्मः समाचारः । श्रुत्यन्तरे च कर्मवृत्तयोर्भेद आम्नायते अथ यदि ते कर्मविचिकित्सा वा वृत्तविचिकित्सा वा स्यादिति" ह्या अवतरणावरून कर्म आणि आचार ह्यांतील फरक वाचकांच्या लक्षांत येईल. शिक्षोपनिषदांतील " वृत्तविचिकित्सेचा " उल्लेख वरील उताऱ्यांत आलाच आहे. त्यावरील टीकेंत टीकाकार वृत्त ह्याचा अर्थ काय करतात तें आतां आपण पाहूं. " वृत्तमाचारः कुलपरम्परागतः तस्मिन् विचिकित्सा संशयः यथा केषांचित् मातुलसुताविवाहमांसभक्षणादिक किंचित् अपरेषां न इत्यादि दर्शनेन....." ( शंकरानन्दकृत टीका ). शंकरानन्द स्वामीनीं आचाराचीं उदाहरणें दिलीं आहेत, तीं फार महत्वाचीं आहेत; त्यावरून व्यावहारिक सर्व गोष्टी ज्यांना कर्म म्हणतां येत नाहींत अशा—आचारांत मोडतात हें उघड होतें. एखाद्या आचाराविषयीं शंका आली तर शिष्ट वागत असतील त्याप्रमाणें आपण वागावें असें शिक्षोपनिषदांतच सांगितलें आहे. त्यावर शिष्यानें ज्या शंका घेतल्या त्यांवरूनही वरील विधानाला पुष्टिच मिळते. म्हणून तो सबंध उताराच येथें देतों. " ननु यद्यत् पूर्वैः कृतं तत्करणीयम् । तथाच जामदग्न्यः स्वजननीं जघान, शुनःशेपः स्वजनकं तत्याज, याज्ञवल्क्यस्त्वाचार्यं; गौतम इन्द्रमतिथिं; ब्रह्मा स्वसुतां जगाम, इन्द्रस्त्रिशीर्षं ब्राह्मणं जघान, क्षत्रियो बलदेवः सुरां पपौ, सोमो गुरोर्भार्यां जहार, इत्यादि महतामाचारानुसारादहमप्यनुष्ठास्यामि इति अतः आह " वगैरे. अन्यत्रही अशीच शंका घेतली आहे. " यदि शिलम् ( अनुष्ठानं ) प्रमाणं तर्हि अतिप्रसंगः स्यात् यथा वसिष्ठश्चाण्डालीमक्षमालां जगाम; कतकभरद्वाजौ व्यत्यस्य भार्ये जग्मतुः " गौतमसूत्र पहा. तात्पर्य,

ह्या सर्व व्यवहारांचा अन्तर्भाव " कर्मांत " न होतां " आचारांत " होतो हें विसरतां कामा नये.

ज्याप्रमाणें अग्निहोत्रादि कर्मांना श्रुति प्रमाण, वर्णाश्रमकृत्यांना स्मृति प्रमाण, त्याप्रमाणें आचारांना शिष्ट माणसें प्रमाण होत. शिष्ट कोणास म्हणावयाचें ह्याविषयींही खुलासा ऋषींनीं केला आहे. "शिष्टाः खलु विगत-मत्सराः निरहंकाराः कुम्भीधान्याः, अलोलुपाः दम्भदर्पलोभमोहक्रोधविव-र्जिताः ॥ " (बौधायन) " धर्मेणाधिगतो यैस्तु वेदः सपरिबृंहणः । ते शिष्टा ब्राह्मणाः ज्ञेयाः श्रुतिप्रत्यक्षहेतवः ॥" (गौतमसूत्र) म्हणून श्रुति, स्मृति आणि सदाचार हे धर्माचे स्वतंत्र उगम होत. आचाराला स्मृति प्रमाण नाहींत. शिष्टांचें, धर्मनिष्ठांचें वर्तन हेंच त्या कामीं प्रमाणभूत होय. आतां स्मृतींमध्यें आचार सांगितला आहे, ही गोष्ट खरी आहे. पण तेवढ्यावरून आचारप्रामाण्य स्मृतींना येत नाहीं. स्मृतींमध्यें आचार सांगितला आहे त्याप्रमाणें व्यवहार म्हणजे कायदाही आहे. इतकेंच नव्हे तर श्रुत्युक्त कर्मेही स्मृतींत उल्लेखिलें आहे. उदाहरणार्थ—

कर्म स्मार्तं विवाहाग्नौ कुर्वीत प्रत्यहं गृही । दायकालाहृते वापि श्रौतं वैतानिकाग्निषु ॥—याज्ञवल्क्य.

श्रुतिप्रदेशांत स्मृति प्रवेश कसा करतात हें खालील वाक्यावरून समजेल. जैमिनीन्यायमालेंतून हें अवतरण मी घेतलें आहे. "यथा स्मर्यते औदुम्बरी सर्वा वेष्टयितव्या " परंतु हें विधान श्रुतिविरुद्ध आहे. श्रुति " औदुम्बरीं स्पृष्ट्वा उद्गायेत् " सर्ववेष्टने स्पर्शः न संभवति अतः स्मृतिर्न प्रमाणम् । ह्यावरून ज्याप्रमाणें श्रौतकर्मासबंधानें स्मृति प्रमाण मानतां येत नाहींत त्याचप्रमाणें स्मृतींमध्यें केवळ आचार कथन केला आहे म्हणूनच त्या प्रमाण मानणें सयुक्तिक दिसत नाहीं. स्मृतींचा उदय प्रायः वर्णाश्रमधर्मनिवेदन करण्या-करितां झाला आहे हें मागल्या लेखांत दिलेल्या उताऱ्यांवरून सिद्ध होतें. वर्णाश्रमधर्म आम्हांस सांगा, असा स्मृतिकारांस सर्व लोकांचा प्रश्न असतो. व त्यास मी तुम्हांस वर्णाश्रम सांगतों असें ऋषींचें उत्तर असतें. वर्णधर्म आणि आश्रमधर्म. उदाहरण. " पालाशो दण्डो ब्राह्मणस्येति "—खेरीज करून इतर म्हणजे गुणधर्म, साधारण धर्म व निमित्तधर्मही स्मृतिकारांनीं सांगितले आहेत ही गोष्ट विज्ञानेश्वरासही मान्य आहे.

असतां कोणास असें वाटेल कीं, वर्णाश्रमधर्मांतच आचाराचा समावेश होतो म्हणून आचाराला स्मृतिप्रामाण्यच धरलें पाहिजे. एवढ्या एका शंकेचें निवारण झालें म्हणजे आचाररूप धर्माला शिष्टवर्तनच प्रमाणभूत आहे असें सहज सिद्ध होईल. प्रथमतः हें ध्यानांत ठेवणें अगत्याचें आहे कीं, सांप्रत उपलब्ध असलेल्या स्मृति भर घालून वाढविलेल्या आहेत. रावसाहेब मण्डलिकांनीं म्हटल्याप्रमाणें आचारानंतर व्यवहार, प्रायश्चितादि प्रकरणें स्मृतींत आलीं असलीं पाहिजेत. त्याचप्रमाणें माझ्या मतें आचार सुद्धां मूळच्या स्मृतींत नसावेत. प्राचीन स्मृति थोडक्या श्लोकांच्या असाव्यात असें हल्लीं अनुमान करतात. ह्याला प्रत्यन्तर पाहणें असेल तर मत्स्य पुराणाचा चाळिसावा अध्याय पाहावा. ह्या अध्यायांत सहा श्लोकांत ययातीनें वर्णाश्रमधर्म सांगितले आहेत. वर्णाश्रमधर्माहून आचाराची भिन्नता दाखविण्याकरितां ते सहाही श्लोक येथें देणें अवश्य आहे.

(१) आहुताध्यायी गुरुकर्मसु चोद्यतः पूर्वोत्थायी चरमं चोपशायी ।
मृदुर्दान्तो धृतिमानप्रमत्तः स्वाध्यायशीलः सिध्यति ब्रह्मचारी ॥

(२) धर्मागतं प्राप्यधनं यजेत दद्यात्सदैवातिथीन्भोजयेच्च ।
अनाददानश्च परैरदत्तं सैषा गृहस्थोपनिषत्पुराणी ॥

(३) स्ववीर्यजीवी वृजिनान्निवृत्तो दाता परेभ्यो न परोपतापी ।
तादङ्मुनिः सिद्धिमुपैति मुख्यां वसन्नरण्ये नियताहारचेष्टः ॥

(४) अशिल्पजीवी विगृहश्च नित्यं जितेन्द्रियः सर्वतो विप्रमुक्तः ।
अनोकशायी लघुलिप्समानश्चरन्देशानेकचरः स भिक्षुः ॥

(५) रात्र्या यया चाभिरताश्च लोका भवन्ति कामाभिजिताः सुखेन च ।
तामेव रात्रिं प्रयतेत विद्वानरण्यसंस्थो भवितुं यतात्मा ॥

(६) दशैव पूर्वान्दश चापरांस्तु शतांस्तथाऽऽत्मानमथैकविंशम् ।
अरण्यवासी सुकृतं दधाति मुक्त्वा त्वरण्ये स्वशरीरधातून् ॥

ह्या उताऱ्यावरून वर्णाश्रमधर्मांत आचार आलेच पाहिजेत असें मानण्याचें कारण नाहीं. वर्णाश्रमांतील व्यवस्था स्मृतिकारांनीं लाविली म्हणून एतद्विषयक प्रामाण्य त्यांच्या ठिकाणीं संभवतें. परंतु पूर्वीं सांगितल्याप्रमाणें "साधूनां च यथावृत्तम्" हेच जर आचाराचें स्वरूप तर त्याला स्मृतींतील समय म्हणजे स्मृतिकारांनीं सुचविलेले नियम प्रमाणभूत कसे होणार ! म्हणून स्मृतिशास्त्र आणि आचार यांतील भेद फार महत्वाचा आहे; व तो

पूर्वीच्या विद्वानांनीं निर्दिष्टही केला आहे. उदाहरण, " समयः स्मृतिशास्त्रं त्वाचारः शिष्टानुवर्तनम् " (श्रौतसूत्रावरील महादेवकृत वैजयन्ती टीका) समय म्हणजे मनुष्यकृत व्यवस्था " पौरुषेयी व्यवस्था समयः ( आपस्तम्ब सूत्रावरील हरदत्ताची टीका ) वर्णाश्रमांची व्यवस्था स्मृतिकारांनीं केली आहे. ब्रह्मचाऱ्यानें गुरुगृहीं बारा वर्षें कां रहावें ? तर स्मृतिकार सांगतात म्हणून. स्मृतिकारांच्या वेळेस निरनिराळे लोक निरनिराळे व्यवसाय करीत असत तदनुसार सर्व जनतेचें वर्गीकरण स्मृतिकारांनींच केलें, आणि आश्रमांची व्यवस्था स्मृतिकारांनींच लावली. वर्णाश्रमव्यवस्थेंत कृत्रिमपणा दिसतो. वनांत जाऊन रहा, असें सांगितल्याशिवाय कोणीही गृहस्थ आपण होऊन घर सोडून वनांत वास्तव्य करणार नाहीं. परंतु आचाराची गोष्ट अशी नसते. जसे आचार स्मृतिकारांना आढळले तसे त्यांनीं लिहून ठेवले, " देशधर्मजातिधर्मकुलधर्मांश्च श्रुत्यभावाद्ब्रवीन्मनुः (वसिष्ठ ) तेव्हां आचारांवरूल शिष्टवर्तन प्रमाण होय असें ठरलें. स्मृतीशीं त्याचा कांहीं संबंध नाहीं. शिष्टांचें लक्षण मागें दिलेंच आहे. युगमानानें शिष्टत्वांतही फरक पडणें स्वाभाविक आहे. प्रत्येक युगाचें ध्येय निराळें असतें. करितां त्या त्या वेळेला जे जे शिष्ट असतील त्यांच्या मागूनच इतर जनांनीं गेलें पाहिजे. शिष्टांना किंवा त्यांच्या वर्तनाला नांवें ठेवण्यांत अर्थ नाहीं. पाराशर ऋषीनीं ही गोष्ट बेधडक सांगितली आहे. " युगे युगे च ये धर्मास्तत्र तत्र च ये द्विजाः । तेषां निन्दा न कर्तव्या युगरूपा हि ते द्विजाः ॥ "

एका युगाच्या कसोटीला दुसऱ्या युगांतल शिष्ट जरी उतरले नाहींत तरी त्या युगांत केव्हांही झालें तरी शिष्ट हे इतर लोकांपेक्षां श्रेष्ठ असणारच. त्यांचें वर्तन नुसतें निष्कलंक असतें एवढेंच नाहीं पण अत्युच्च दर्जाचें असतें उच्च ध्येय सर्वांनाच साध्य होणें शक्य नाहीं, म्हणून प्रत्यक्ष व्यवहारांत शिष्टांच्या वर्तनाचें अनुकरण बहुजनसमाजाकडून होईलच असा नियम नसतो. तेव्हां ज्यांनीं त्यांनीं आपला मगदूर पाहून कमी दूषणयि असा मार्ग आक्रमण करावा हेंच इष्ट होय. ह्या उद्देशानें मनूनें " स्वस्य च प्रियमात्मनः " हें धर्मप्रमाणांत एक सदर घातलें आहे. ह्याप्रमाणें " श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः" ह्याचा अर्थ मी केला आहे. टीकाकारांनीं केलेला अर्थ भिन्न आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें श्रुतीच्या विरुद्ध नसेल तेथें स्मृति प्रमाण; श्रुतिस्मृतीशीं विरुद्ध नसेल तेव्हां सदाचार प्रमाण

आणि विकल्प असतांना आपली इच्छा हें प्रमाण हा अर्थ कितपत बरोबर आहे याचा आतां विचार करूं.

ह्या अर्थाच्या संबंधानें पहिला आक्षेप असा आहे कीं, श्रुतिस्मृतींच्या विरुद्ध आचार असतां कामा नये; श्रुतीच्या विरुद्ध स्मृति असतां कामा नये आणि आपणांस इष्ट असेल तें उचलण्यास विकल्प पाहिजे असें म्हणणें म्हणजे मुळांत जे शब्द नाहींत ते तेथें घुसडणें हें होय. शब्दांचा सरळ अर्थ होत असतां श्लोकांत नसलेले शब्द घालून अर्थ करण्याची तऱ्हा सदोष आहे. दुसरें, श्रुतीला अनुसरूनच स्मृति व आचार पाहिजे असें मानलें तर धर्माला एक श्रुतिच प्रमाण आहे असें म्हटलें असतां चाललें असतें. चार निरनिराळीं प्रमाणें निर्दिष्ट करण्याचें कारण नव्हतें. तिसरें, श्रुतिकालीन आचार सदैव राहणार नाहींत, त्यांत अनेक कारणांनीं फरक पडणें स्वाभाविक आहे ही गोष्ट पूर्वीच्या विद्वानांनींच प्रतिपादन केली आहे. उदाहरण, " देशभेदात्कालभेदात्पुंभेदादन्यथान्यथा विपर्यस्यति शास्त्रार्थः " (माधव). ह्यापेक्षां अधिक स्पष्ट काय असणार ? जगामध्यें कांहींच स्थिर नाहीं. मग आचारांत तरी स्थैर्य असावें अशी अपेक्षा कोणी करावी ?

" मन्वन्तराणां परिवर्तनानि चिरप्रवृत्तानि युगस्वभावात् ।
क्षणं न संतिष्ठति जीवलोकः क्षयोदयाभ्यां परिवर्तमानः" ॥ (मत्स्यपुराण)
" तथैव धर्मं स्मरति मनुः कल्पान्तरान्तरे. " ( पाराशर )

पाराशर ऋषीनीं म्हटल्याप्रमाणें प्रत्येक युगाचा धर्म वेगवेगळा असतो " अन्ये कृतयुगे धर्मास्त्रेतायां द्वापरे परे । अन्ये कलियुगे नृणां युगरूपानुसारतः " ॥ धर्माची अनुज्ञा स्पष्ट असूनही लोकाचार विपरीत असेल तर धर्माची अनुज्ञा पाळण्याचें कारण नाहीं, असें याज्ञवल्क्यांचें वचन आहे.

" अस्वर्ग्यं लोकविद्विष्टं धर्ममप्याचरेन्न तु. "

श्रुतिस्मृतींच्या विरुद्ध आचार धर्माचें प्रमाण मानावयाचा नाहीं. असा जर मनूचा अभिप्राय असता तर ज्या देशांत लोकांचा परम्परागत जो आचार असेल तोच सदाचार समजावयाचा अशी निराळी सदाचाराची व्याख्या मनूनें दिली नसती. तो म्हणतो " यस्मिन्देशे य आचारः पारम्पर्यक्रमागतः । वर्णानां किल सर्वेषां स सदाचार उच्यते ॥" देवलाचें वचन म्हणून रावसाहेब मण्डलिकांनीं आपल्या हिंदुधर्मशास्त्रांत दिलें आहे त्याच्यावरूनही वरील विधान दृढतर होतें. " आदौ तावदेशधर्मो विचिन्त्यो

देशे देशे या स्थितिः सैव कार्या । लोकद्विष्टं पण्डिता वर्जयन्ति दैवशोऽतो लोकमार्गेण यायात् ॥ येषु देशेषु ये देवा येषु देशेषु ये द्विजाः । येषु देशेषु यच्छौचं याश्च यत्रत्यमृत्तिकाः ॥ येषु देशेषु यत्तोयं धर्माचारश्च यादृशः । तत्र तान्नावमन्येत धर्मस्तत्रैव तादृशः ॥ " व्यवहारमाधवांत ऋतुमती कन्या झाली असतां अगर मातुलसुताविवाह केला असतां कांहीं देशांत ह्या गोष्टी दोषार्ह समजत नाहींत असें सांगितलें आहे. " कर्नाटकदेशे बलान्मातुलसुताविवाहो न दोषाय । केरलदेशे कन्या ऋतुमती चेन्न दोषाय । एवमादितस्तत्तद्देशसमयः .." असो. इतक्या वचनांवरून कोणताही आचार चांगला अथवा निंद्य ठरविण्याचा प्रसंग आला असतां स्मृतींतील वाक्यांप्रमाणें तो ठरविण्याचा प्रयत्न करणें अशास्त्रीय होय असें मला वाटतें. स्मृतिकारांनीं आचार कोणता असावा हें जें सांगितलें आहे त्यांत कांहीं दोष नाहीं. नैतिक सदाचाराचें दिग्दर्शन करणें उचितच होतें. परंतु आचारबद्दल स्मृतींनीं आरणांकडे प्रामाण्य घेतलें नाहीं. " शास्त्राद्रूढिर्बलीयसी " ह्या वचनाचा आधुनिककालीं उपहास करण्यांत येतो; पण त्यांत हिंदुधर्माचें रहस्य भरलेलें आहे. आचाराची गोष्ट राहो. पण प्रत्यक्ष श्रुतीलाही आचारच आधारभूत आहे ही गोष्ट पुष्कळांना माहीत नसेल. " श्रुतं तु सर्वेभ्यो गरीयस्तन्मूलत्वात् । धर्मस्य श्रुतेश्च " असें एक सूत्र आहे. ह्यावरील टीका येणेप्रमाण—श्रुतं मन्त्र—ब्राह्मणविभागेन वेदार्थ परिज्ञानम् । श्रुतमूलमनुष्ठानम् । अनुष्ठानमूलो धर्मः । श्रुतेश्चाप्यनुच्छिन्नसंप्रदायो मूलम् । तस्मात् श्रुतस्य गरीयस्त्वम् ( गौतमसूत्र ). अगदीं अशाच अर्थाचें वाक्य महाभारतांत आहे. आचारसंभवो धर्मो धर्मे वेदाः प्रतिष्ठिताः । वेदैर्यज्ञाः समुत्पन्ना यज्ञैर्देवाः प्रतिष्ठिताः ॥ ( वनपर्व ). तात्पर्य, रावसाहेब मण्डलिकांनीं प्रतिपादन केल्याप्रमाणें आमच्या सर्व शास्त्रांचा पायाच रूढीवर रचलेला आहे.

" श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्यस्य च प्रियमात्मनः ।" ह्यांतील आचार शब्दाचा अर्थ कांहीं टीकाकारांनीं फारच संकुचित केला आहे. राघवानन्द म्हणतो, " विवाहादौ कंकणबन्धादिः " कुल्लूक म्हणतो " कम्यलवल्कलाद्याचरणरूपः " ह्या आचारांचा आणि पापपुण्याचा कांहीं संबंध नाहीं. हे आचार धर्माला कारणभूत नाहींत. शिवाय ह्या आचारासंबंधानें कुलाचार किंवा देशाचार असेल त्याप्रमाणें वागावें असें मनूनें अन्यत्र स्वतंत्र विधान केलें असल्यामुळें उपरिनिर्दिष्ट श्लोकांतील आचार शब्दाचा अर्थ निराळा

असला पाहिजे. कंकणबन्धादि आचारांकरितां शिष्टांकडे धांव मारण्यास कोण विचारी मनुष्य सांगेल ? कित्येक शिष्ट तर कंकणबन्धनापासून मुक्तच असतील. टीकाकारांनीं केलेला अर्थ चुकीचा आहे असें मला वाटतें. आचाराकरितां श्रुति प्रमाण मानावयास सांगणें म्हणजे श्रुतींची योग्यता कमी करणें हें होय अशी माझी समजूत आहे. आचार म्हणजे लौकिक वृत्त ह्याविषयीं श्रुतींत कांहींच सांगितलेलें नाहीं.* तेव्हां सर्व आचारांना नष्ट अगर विद्यमान श्रुतींचा आधार मानणें योग्य नव्हे. "उपदिष्टो धर्मः प्रतिवेदम्" असें बौद्धायन सूत्र आहे. ह्यांत उपदिष्ट याचा अर्थ "उपदेशः वेदः तेन कर्तव्यतया विहितः वैतानिक इति यावत्" (श्रौतसूत्रावरील वैजयन्ति व्याख्या) असा केला आहे. तेव्हां श्रुतीमध्यें उपदिष्ट असलेला धर्म म्हणजे वैतानिक—अग्निहोत्रविषयक—होय असेंच पूर्वींचे लोक मानीत आले. त्याप्रमाणें निरनिराळ्या युगांत निरनिराळे स्मृतिकार प्रमाण मानावयाचे आहेत. "कृते तु मानवो धर्मस्त्रेतायां गौतमः स्मृतः । द्वापरे शंखलिखितः कलौ पाराशरः स्मृतः ॥" ह्यावरूनही तेंच सिद्ध होतें. सर्व स्मृतिकार एकच आचार सांगतात हें म्हणणें ह्या श्लोकापुढें टिकत नाहीं. तसेंच प्रयोजन पडल्यामुळें निरनिराळ्या युगांत निरनिराळ्या स्मृतिकारांना अवतार घ्यावा लागला. सत्याषढाचार्यांनीं "ज्याप्रमाणें ईश्वराला निरनिराळे अवतार घ्यावे लागले त्याप्रमाणें स्मृतिकारांनाही घ्यावे लागतात" असें म्हटलें आहे, तें अगदीं यथार्थ आहे. "यतः एकः सर्वज्ञः सर्वशक्तिरपि ईश्वरः अपि न प्रभवति एकेन अवतारेण सकलं प्रयोजनं साधयितुं इति नाना अवतरन्ति तथा स्मृतिकाराः"

आचारांबद्दल जर स्मृतिच प्रमाण असल्या तर श्रुतींविरुद्ध स्मृतीनीं ह्या बाबतींत केलेलें बंड कोणीही चालूं दिलें नसतें व स्मृतिकारांनींही इतकी धिटाई केली नसती. श्रुतिकालीं प्रचलित असलेले कांहीं आचार—मांसाशन व सुराग्रह—हे स्मृतिकारांनींच बंद पाडले. "न मांसमश्नाति" असें एक हिरण्यकेशीय श्रौतसूत्र आहे. यज्ञ करणाऱ्या इसमास जे नियम पाळावे लागतात त्यांपैकीं त्यानें मांसाशन करूं नये असा एक नियम आहे. अर्थात्

*वरील मतास जैनधर्मग्रंथांतूनहि आधार मिळतो. उदा० "द्वौ हि धर्मौ गृहस्थानां लौकिकः पारलौकिकः । लोकाश्रयो भवेदाद्यः परः स्यादागमाश्रयः ॥"— (जैनसिद्धांत मासिक)

ह्या प्रसंगाव्यतिरिक्त मांसभक्षणास प्रत्यवाय नव्हता. असें असून मांसभक्षणाचा निषेध स्मृतिकारांनींच केला आहे. वरील सूत्रावरील टीकाकार म्हणतात, " अयं वैधव्यतिरिक्तमांसाशनप्रतिषेधो युगान्तर उपयुज्यते कलौ तु मांसाशनस्य सर्वथैव निषेधेन तदप्राप्तिरेव " त्याचप्रमाणें दुसरें एक सूत्र " सौत्रामण्यां सुराग्रहः " असें आहे. त्यासंबंधानें व्याख्याकार गोपीनाथ म्हणतात, " अक्षतागोपशुश्चैव श्राद्धे मांस तथा मधु इत्यादिभिः कलिवर्ज्यविषयकवचनैर्विशेषनिषेधेनाग्निष्टोमादीनां गोव्यतिरिक्तच्छागादिपशूनां च निषेधाभावस्यार्थादेव प्रदर्शनात्. " सारांश, श्रुतिकालीन आचार ह्या युगांत चालूं ठेवणें इष्ट न वाटल्यामुळें स्मृतिकारांनी बंद केले हें कोणत्या आधारावर ? आचाराला प्रमाण जर श्रुतीचें असतें तर स्मृतिकारांनीं असें साहस कधींही केलें नसतें; व त्यांचें कोणी ऐकलेंही नसतें. परंतु मांसभक्षण अगर सुरापान न करणें हें सर्वशिष्टसंमत झालें तेव्हां तो अनुभव पुढील पिढ्यांकरितां स्मृतिकारांनीं नियमरूपानें लिहून ठेविला.

श्रुतीच्या विरुद्ध स्मृति असतां कामा नये हा नियम बरोबर आहे. पण तो आचारासंबंधानें नाहीं. श्रुतीच्या आत्मप्रदेशांत स्मृतीनें ढवळाढवळ करतां कामा नये व केली तर ती कांणी चालूंही देणार नाहीं. " श्रुतिविरोधे स्मृतिर्न प्रमाणम् " ह्या वचनाचा अंमल फक्त श्रौत कर्मांत चालतो. पूर्वमीमांसेतील उदाहरण " औदुम्बरी सर्वा वेष्टयितव्या " हें पूर्वी दिलेंच आहे. सारांश, श्रुतिस्मृतीचे प्रान्त भिन्न आहेत व आपापल्या प्रान्तांत त्यांचा अधिकार अबाधित आहे ह्यांतही शंका नाहीं. " स्मार्ते वैवाहिके वह्नौ श्रौते वैतानिकाग्निषु । कर्म कुर्यात्प्रतिदिनं विधिवत्प्रतिपर्व च " ( वेदव्यासस्मृति ) वर्णाश्रमधर्मापैकीं विवाहाग्नींवर हवन करणें हा एक धर्म आहे म्हणून तद्विषयक प्रामाण्य स्मृतींच्या ठिकाणींच संभवतें.

वरील विवेचनावरून श्रुति, स्मृति व सदाचार हीं धर्माचीं स्वतंत्र प्रमाणें आहेत हें सिद्ध होण्यास अडचण पडणार नाहीं. "स्वस्य च प्रियमात्मनः" हें चौथें प्रमाण आहे. ह्याचाही अर्थ करण्यांत टीकाकारांची भूल झाली आहे असें मानावें लागतें. हें करावें अगर तें करावें असें असेल तेथें आपणांस इष्ट तें करावें असा अर्थ टीकाकार लावतात. परंतु ह्यावर कोणी असें विचारील कीं, दोनही गोष्टी करण्यास श्रुतिस्मृतीची परवानगी असली तर कोणतीहि गोष्ट केली तरी त्यास श्रुतिस्मृतीचा आधार आहेच. मग हें

मनूनें चौथें प्रमाण म्हणून निराळें कां म्हणून सांगावें. ? बरें, विकल्प असतां इष्ट तें करावें हा अर्थ सगळ्याच टीकाकारांनीं मान्य केला नाहीं. रामचन्द्रानें केलेला अर्थ अधिक खोल व समंजसपणाचा आहे. तो म्हणतो " स्वस्य–स्वकीयस्य बन्धोः आत्मनश्च यत्प्रियं स सदाचारः । आत्मनः प्रियं परदाराभिमर्शनं प्रियं भवेत् चेत् तन्न । बन्धूनां तत्प्रियं न. " ज्या कृत्यापासून इतरांना त्रास होणार नाहीं तें कृत्य अनिन्द्य मानण्याचें जें एक पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांचें माप आहे तेंच माप त्यांच्यापूर्वी आमच्याकडल्या विद्वानांनींही वापरलेलें दिसतें. पण ह्यांत एक दोष आहे. तो हा कीं, शिष्टांचें नेहमीं असेंच वर्तन असतें. सदाचार म्हणून धर्मप्रमाण पूर्वी सांगितलेंच आहे. त्याचेंच " स्वस्य च प्रियमात्मनः " हें एक व्याख्यान झालें; परंतु मनूनें तर हीं चार स्वतंत्र प्रमाणें सांगितलीं आहेत. म्हणून हा अर्थही योग्य आहेसें दिसत नाहीं. प्रत्येकाला स्वतंत्र प्रमाण मानतां येईल असाच अर्थ केला पाहिजे. आणि तो मी मागेंच निर्दिष्ट केल्याप्रमाणें आहे. शिष्टांचें वर्तन सदाच अत्युच्च दर्जाचें असणार. सामान्य माणसांनीं अक्षरशः अनुकरण करणें शक्य नाहीं. करतां आपल्या आत्म्याला जें प्रिय म्हणजे हितावह असेल तें त्यानें करावें. मला इतरांप्रमाणें मोठी उडी घेतां आली नाहीं तर जितकी घेतां येईल तेवढीच घ्यावी. पतिमरणोत्तर अन्य पति न करणें हा उत्तम मार्ग. पण ज्या स्त्रीचा आत्मा इतक्या उच्च स्थितीप्रत पोंचला नसेल तिनें अवनति टाळण्याकरितां पुनश्च विवाह करण्यास हरकत नाहीं एकीकडे तर स्मृतिकार उच्च ध्येय पुढें ठेवून अन्य पति करू नये म्हणतात. शिष्टवर्तनही पाहिलें तर तेंच असणार. आणि दुसरीकडे आपल्या मनाची दुर्बलता आपणांस पतिविरहित राहिलें असतां भलतीकडेच नेण्याचा संभव, अशा प्रसंगीं कोणता आचार आपल्या आत्मोन्नतीच्या दृष्टीनें हितकर आहे तें निश्चित करून तदनुसार वागावें. व सज्जनांनींही त्या कृत्यास अधर्म म्हणूं नये. साधूंच्या मनाला हें कृत्य रुचलेंच पाहिजे. आणि तोच धर्म होय. " संशयितेषु अर्थेषु यः अर्थः धर्मत्वेन साधूनां मनसे रोचते स धर्मः " ( नन्दन ). अथवा " यत्त्वार्याः क्रियमाणं प्रशंसन्ति स धर्मः । यद्गर्हन्ते सः अधर्मः " ( आपस्तम्बीय सूत्र ) ह्याच कारणाकरितां " बहुद्वारस्य धर्मस्य सूक्ष्मा दुरनुगा गतिः " म्हणून म्हटलें आहे. स्मृतींतील नुसतें वाक्य घेऊन त्याचा अर्थ करावयाचा असेल तर त्यांत

11 JAN 1994

कांहींच गहन नाहीं. परंतु परिस्थितीमुळें आचार बदलणें भाग पडतें तेव्हां कोणता बदल इष्ट आहे हें ठरविण्यास वामनपुराणांत म्हटल्याप्रमाणें " कामविवर्जित, क्रोधनिर्मुक्त आणि अमूढबुद्धि " अशींच माणसें लागतात.

आचाराचा आणि श्रुतीचा संबंध नाहीं असें म्हणण्यास आणखी एक बलवत्तर कारण असें आहे कीं, श्रुति अपौरुषेय आहेत परंतु स्मृतींत सांगितलेले धर्म पौरुषेय आहेत. " अथातः सामयाचारिकान्धर्मान्व्याख्यास्यामः " अशा रीतीनें सूत्रकार आरंभ करितात. समय म्हणजे पौरुषेय व्यवस्था, " समयमूला आचाराः समयाचाराः । तेषु भवाः सामयाचारिकाः एवंभूतान्धर्मानिति " तात्पर्य, कोणत्याही दृष्टीनें विचार केला तरी आचाराला श्रुति प्रमाण ठरत नाहीं. श्रुति जाणणाऱ्यांनाच सदाचार कोणता हें निश्चयानें सांगतां येईल हें खरें आहे. पण श्रुतिज्ञ म्हणजे श्रुति नव्हे. तसेंच सामयाचारिक धर्म हे देशजातिकुलोद्भव आहेत. " सामयाचारिको धर्मो देशजातिकुलोद्भवः " ( आचारेन्दूमधील उतारा )

आतां धर्मलक्षण अथवा धर्माप्रमाणें निर्दिष्ट करणारे श्लोक खालीं देतों.

" श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
सम्यक्संकल्पजः कामो धर्ममूलमिदं स्मृतम् ॥" **याज्ञवल्क्य.**

" वेदः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः ।
एतच्चतुर्विधं प्राहुः साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥" **मनु.**

" वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम् ।
आचारश्चैव साधूनामात्मनस्तुष्टिरेव च ॥" **मनु.**

सदाचाराची व्याख्या मनूनेंच दिली आहे ती अशीः—

" तस्मिन्देशे य आचारः पारंपर्यक्रमागतः । वर्णानां सान्तरालानां स सदाचार उच्यते ॥ " ह्यावरूनही सदाचार हा श्रुतिस्मृतीला धरून असला पाहिजे हें म्हणणें निर्मूल दिसतें. अखेरीस इतकेंच सांगणें कीं, श्रौतस्मार्त कर्माला अनुक्रमें श्रुति व स्मृति प्रमाण होत; परंतु धर्ममूल आचाराला शिष्टवर्तनच प्रमाण. हाच अर्थ मनूलाही अभिप्रेत असला पाहिजे. ह्याच कारणाकरितां योग्य व आवश्यक सुधारणांना आमचा धर्म आडवा येतो हें म्हणणें असमंजसपणाचें दिसतें. आमच्या धर्माइतकीं उदात्त तत्त्वें दुसऱ्या कोणत्याही धर्मांत आढळणार नाहींत.

पुस्तके जपून वापरा

# ६ ऐतरेय ब्राह्मण.

ब्राह्मण हा एक वेदाचा अमंत्रक भाग होय. मंत्र आणि ब्राह्मण मिळून वेद होतात. संस्कृतांत गद्य ग्रन्थ फार थोडे ह्या दृष्टीनें ब्राह्मणाचें महत्त्व फार आहे. प्रत्येक मन्त्रगत वेदाला ब्राह्मणाची जोड ही आहेच. व ही जोड क्वचित् एकाहून अधिक ब्राह्मणांचीही आहे. उदाहरणार्थ ऋग्वेदाचा ऐतरेय ब्राह्मणाशिवाय आणखी कौशितकी ब्राह्मण म्हणून भाग आहे. पूर्वी बरेच ब्राह्मणग्रंथ अस्तित्वांत होते; परंतु हल्लीं ते सर्व उपलब्ध नाहींत.

ब्राह्मण हा शब्द ब्रह्म शब्दापासून निघाला आहे. ब्रह्म शब्दाचा अर्थ वेदामध्यें 'ऋचा' असा केलेला आहे, तेव्हां ऋचांसंबंधीं यांत ऊहापोह केला आहे तो ब्राह्मणग्रंथ होय. म्हणजे यज्ञांत कोणत्या ऋचेचा उपयोग केव्हां, कोठें, कसा व कां करावयाचा ह्याची चिकित्सा ब्राह्मणांत केलेली असते. ह्यावरून ब्राह्मणग्रन्थांना मूळ आधार वेदमंत्राचा आहे हें उघड आहे. मंत्राच्या अस्तित्वाशिवाय ब्राह्मणाचें अस्तित्व शक्यच नाहीं. ह्यावरून मंत्रानंतर ब्राह्मणग्रन्थ रचले गेले पाहिजेत असें होतें. मन्त्रब्राह्मणांचा काल निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळ्या प्रमाणांवरून ठरविलेला आहे, व तो कमींत कमी खिस्तिसनापूर्वी दोन हजार वर्षांचा आहे. ह्या काल-निर्णयाच्या कसोटीस आणखी एक प्रमाण लागू केलें असतां गैरशिस्त होणार नाहीं. आज २५०० वर्षें ह्या देशांत नाणीं प्रचलित होतीं असें आतां निर्विवाद ठरलें आहे. तेव्हां ज्या ग्रन्थांवरून तत्कालीन समाजास नाणीं वापरण्याचें ठाऊक नव्हतें असें दिसून येईल, ते सर्व ग्रन्थ अडीच तीन हजार वर्षांच्या पाठीमागचे मानण्यास हरकत नाहीं.

ऐतरेयब्राह्मणांत नाण्याचा कोठेंही उल्लेख नाहीं. आतां अभावावरून कांहीं निष्पन्न होत नाहीं हें खरें. तथापि जेथें एखाद्या वस्तूचा निर्देश

अवश्य व स्वाभाविक असतो तेथें तसा तो नसल्यास अगर त्याऐवजीं दुसऱ्याच पदार्थाचा निर्देश असल्यास त्याच्या अस्तित्वाबद्दल अनुमान काढणें कधींही चुकीचें होणार नाहीं. ऐतरेय ब्राह्मणांत जेथें जेथें क्रयविक्रयाचा उल्लेख केलेला आहे तेथें तेथें तो नाणें अगर धातूचा पैसा वापरल्याशिवायच झालेला आहे असें दिसून येईल. ह्याचें एक उदाहरण 'रुपाया शिरशहानेंच सुरू केला काय ?' ह्या निबंधांत पूर्वी दिलेंच आहे. दुसरें एक उदाहरण येथें देण्यासारखें आहे. अजीगर्तानें आपला मुलगा शुनःशेप हरिश्चंद्रपुत्र रोहिताला १०० गाई घेऊन विकत दिला. शुनःशेपाला यज्ञांत बलि द्यावयाचा होता; त्यामुळें पशूप्रमाणें त्याला खांबाशीं बांधून त्याची हत्या करण्याचा प्रसंग आला तेव्हां कोणी तयार होईना. अशा प्रत्येक प्रसंगीं तें तें कर्म करण्यास अजीगर्तानें १०० गाई रोहिताकडून मागून घेतल्या; ह्यावरून गाईरूपी पैशानेंच लोकांचा व्यवहार होत असे हें स्पष्ट होतें. लोकांना धातूचें नाणें तर माहीत नव्हतेंच, पण धातूचा पैसाही माहीत नव्हता, ह्यामुळें कर्मांत कमी तीन हजार वर्षांपूर्वीचे ब्राह्मण आहेत असें अनुमान करण्यास हरकत नाहीं.

ह्या ब्राह्मणाला "ऐतरेय ब्राह्मण" म्हणण्याचें कारण एका आख्यायिकेंत निर्दिष्ट केलें आहे ती येणेंप्रमाणें—एका महर्षीला पुष्कळ बायका होत्या. त्यांपैकीं एकीचें नांव इतरा असें होतें. तिला महिदास नांवाचा मुलगा होता; परंतु त्याच्या बापाचें प्रेम इतर स्त्रियांच्या पुत्रांवर विशेष असे. एके दिवशीं यज्ञसभेंत महिदासाला दूर सारून दुसऱ्या पुत्रांना बापानें आपल्या मांडीवर घेतलें. ह्यामुळें महिदासाचें तोंड उतरलेलें पाहून त्याच्या आईस वाईट वाटलें. तिनें आपल्या कुळदेवतेची आराधना केली. त्याबरोबर ती दिव्यमूर्ति यज्ञसभेंत आली व तिनें महिदासाला दिव्यासनावर बसवून सर्व कुमारांत त्याला महापंडित बनविलें. तिच्याच प्रसादानें महिदासाला हा ब्राह्मणग्रंथ करतां आला. अशा प्रकारच्या कथा संस्कृत वाङ्मयांत बऱ्याच असल्यामुळें ही आख्यायिका किती विश्वसनीय मानावयाची हा प्रश्न निराळा; परंतु ह्या ग्रंथाचें कर्तृत्व इतरेचा मुलगा महिदास ह्याकडे देण्यास हरकत नाहीं. शिवाय हा ग्रंथ एकट्याचाच असावा असें मानण्यास आंतील भाषेवरून शंका वाटत नाहीं. अरण हाही ब्राह्मणाचाच भाग आहे. " ऐतरेयब्राह्मणेऽस्तिकाण्डमारण्यकाभिधम् "

(आरण्यक नांवाचें काण्ड ऐतरेय ब्राह्मणांत आहे.); परंतु हा भाग अरण्यांत म्हणावयाचा असल्यामुळें त्यास अरण ही संज्ञा प्राप्त झाली.

वर ब्राह्मण शब्दाची जी व्युत्पत्ति दिली आहे, त्यावरून ह्या ग्रंथाचा विषय कोणता हें समजण्यासारखें आहे. ह्या ग्रंथाचे एकंदर चाळीस अध्याय असून प्रत्येक पांच अध्यायांची एक पंचिका अशा आठ पंचिका अगर पुस्तकें केलीं आहेत. ह्यांत ज्योतिष्टोम, गवामयन, आदित्यायन, आङ्गिरसामयन आणि द्वादशाह इतक्या यागांचा विधि सांगितलेला आहे. विशेषतः होत्यानें करावयाचें कर्म विस्तृतपणें ग्रथित केलें आहे. कारण ऋक्मन्त्रांनींच हौत्र करावयाचें असतें. असो. यशाची व तदंगभूत कर्मांची माहिती सामान्य वाचकांस नीरस वाटल्यावांचून रहाणार नाहीं म्हणून ती गाळून त्यांस मनोवेधक होईल अशीच माहिती ह्या निबंधांत संकलित करण्याचें योजिलें आहे.

प्राचीन आर्यांचा बहुतेक काल यज्ञ करण्यांत जात असे. कित्येक यज्ञ सबंध वर्षभरही चालत. ह्या ब्राह्मणकालीं तरी निदान ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद हे तीनच वेद अस्तित्वांत असल्यामुळें या तीन वेदांतील मंत्रांचाच उपयोग यज्ञकर्माकडे होणें शक्य होतें. अथर्ववेद अजून अस्तित्वांत यावयाचा होता. हौत्र ऋक्मन्त्रांनीं, आध्वर्यव यजुष्मन्त्रांनीं व सामांनीं उद्गीथ अशी योजना असे. ( ऋचैव हौत्रमकुर्वन्यजुषा SS ध्वर्यवं साम्नोद्गीथं ) होत्याच्या हाताखालीं आणखी सहा ऋत्विज असतात त्यांचीं नांवें:– १ मैत्रावरुण, २ ब्राह्मणाच्छंसी, ३ नेष्टा, ४ पोता, ५ आग्नीध्र आणि ६ अच्छावाक. हे अर्थात् ऋग्वेदी पाहिजेत. अच्छावाक तर ऋग्वेदी पाहिजे याबद्दल खुद्द ब्राह्मणांतच सांगितलें आहे. " तस्माद्योब्राह्मणो बह्वृचो वीर्यवान् स्यात्सोऽस्याच्छा वाकीयां कुर्यात् " तसेंच " वीर्यवान्वा एष बह्वृचो वह्निवदेतत्सूक्तं वहति हवै वह्निर्धुरोयासु युज्यते तस्मादच्छावाको वह्निवदेतत्सूक्तमुभयत्र शंसति ". कोणत्या ब्राह्मणाला आर्त्विज्य देऊं नये ह्याविषयीं ब्राह्मणांत जें सांगितलें आहे तें हल्लींही मनन करण्यासारखें आहे. " तहैतदेव जग्धं यदा शंसमानमार्त्विज्यं कारयत उत वा मेदघादुत वा मावृणीतेति तद्धतत्पराङेव " " अथ हैतदेवगीर्ण यद्विभ्यदार्त्विज्यं कारयत. उत वा मा न बाधेतोत वा मेव यज्ञवेश संकुर्यादिति तद्धत तत्पराङेव " " अथहैतदेव वातं यदभिशस्यमानमार्त्विज्यं कारयते " ह्याचें तात्पर्य इत-

केंच कीं, लोभी ब्राह्मणाला अगर गांवांत श्रेष्ठ असलेल्या पण आमंत्रण न दिल्यास पुढें मागें हा आपणांस त्रास देईल किंवा यज्ञांत विघ्न आणील ह्या सबबीवर, एकाद्या मूढ ब्राह्मणाला तसेंच प्रयोगकुशल पण निन्द्याचारी ब्राह्मणाला यज्ञांत ऋत्विक्पणाचा अधिकार देऊं नये.

सामान्य मनाला कुतूहल उत्पन्न करणारें यज्ञांतलें प्रमुख कृत्य म्हटलें म्हणजे पशुहत्या हें होय. मारलेला पशु यजमानाला स्वर्गाला नेतो अशी तत्कालीन लोकांची समजूत झालेली दिसते. पशूची हत्या कशी करावी ह्याबद्दल सूक्ष्म नियम सांगितले असून त्या नियमांना अनुसरून यज्ञपशूचें हनन न झालें तर मोठा दोष सांगितलेला आहे. तसेंच मारल्यानंतर त्या पशूच्या कोणत्या भागाचें कोणी भक्षण करावयाचें याविषयींचेही नियम ठरले आहेत. जीभ आणि हनवटी हा प्रस्तोत्याचा भाग; वक्षस्थल उद्गात्याचा; कंठ आणि तालु हीं प्रतिहर्त्याच्या वांटणीचीं; उजवी श्रोणि होत्याची व डावी ब्रह्मयाची; उरूंच्या खालील भाग अनुक्रमें मैत्रावरुण आणि ब्राह्मणाच्छंसी यांचे; खांद्यासकट उजवी बाजू अध्वर्यूची; उपगात्यांची डावी बाजू; डावा खांदा प्रतिप्रस्थात्याचा; उजवा हात श्रेष्टयाचा व डावा पोत्याचा; दक्षिण व सव्य ऊरु अनुक्रमें अच्छावाक आणि आग्नीध्र यांचे; दोन बाहूंपैकीं उजवा आत्रेयाचा व डावा सदस्याचा; पाठीचा कणा व मूत्राशय हीं यजमानाचीं; उजवा पाय यजमानाला भोजन घालणाराचा; आणि डावा त्याच्या बायकोचा; ओंठ हा ह्या दोघांचाही सारखाच भाग होय. यजमानानें तो त्या दोघांना वांटून द्यावयाचा असतो. यजमानाच्या बायकांना शेंपूट देतात; पण ती त्यांनीं ब्राह्मणाला द्यावी अशी अनुज्ञा आहे. गळ्याचें मांस व आंतील तीन हाडें हा भाग ग्रावस्तुत्याचा, दुसरीं तीन हाडें व पाठीवरील मांसाच्या गोळ्याचा अर्धा भाग उन्नेत्याचा. ह्याचा दुसरा अर्धा भाग व हृदयाच्या बाजूचा क्लोम नांवाचा मांसाचा गोळा हीं पशु मारणाऱ्या इसमाच्या वांटणीचीं; परंतु हा इसम ब्राह्मण नसेल तर त्यानें आपला भाग दुसऱ्या कोणत्या तरी ब्राह्मणाला दिला पाहिजे. पशूचें शिर सुब्रह्मण्य नांवाच्या ऋत्विजाचें, 'श्वः सुत्यां' (उद्यां यज्ञांत) असें म्हणणारा जो ऋत्विज (आग्नीध्र) त्याच्या हिशाला चामडें, ह्याशिवाय पशूचा जो इला भाग (यज्ञान्न) तो सर्वांचा सारखा अगर होत्याचा.

ह्याच्या उलट मनसोक्त वांटणी केल्यास तो चोर, पापी, केवळ उदरपोषणाभिलाषी म्हणून समजावयाचा. वर आत्रेयाला म्हणजे अत्रिकुलांत उत्पन्न झालेल्या ब्राह्मणास एक भाग असल्याचें सांगितलें आहे. ह्या ब्राह्मणास यज्ञामध्यें कांहीं काम नसतें. ह्यामुळें कर्मनिरपेक्ष वंशपरंपराहक्क इतक्या प्राचीन काळीं अस्तित्वांत असल्याचें दिसतें. हा पशुविभाग कसा करावा हें देवभाग ऋषीला माहित होतें. परंतु ती विद्या कोणाला न सांगतां तो मरण पावला. (तामुहाप्रोच्यैवास्माल्लोकादुच्चक्रामत.) परंतु पुढें ह्या पशुविभक्तीची माहिती अमानुष जातीपैकीं एकानें बभ्रूचा मुलगा गिरिज नामक महर्षि त्यास सांगितली. हल्लींच्या सर्व मनुष्यांना एतद्विषयक ज्ञान ह्या ऋषीपासूनच परंपरेनें प्राप्त झालें आहे. ( तामुह गिरिजाय बाभ्रव्याया मनुष्यः प्रोवाच ततो हैनामे तदर्वाङ् मनुष्या अधीयतेऽधीयते. ) ह्यावरून मनुष्येतर जातींतही यज्ञ करण्याची चाल होती असें अनुमान करतां येतें. असुरांना यज्ञविध्वंसक हें विशेषण लावण्याचा प्रघात आहे; परंतु तेही यज्ञ करीत असत असें दिसतें. आहवनीय अग्नि कायम असून गार्हपत्याग्नि विझाला आहे अशा वेळीं गार्हपत्याकरितां पश्चिमच्या बाजूचा आहवनीय अग्नि काढून घेतला तर हें कृत्य असुरांच्या यज्ञाप्रमाणें होतें असें म्हटलें आहे. (असुरवद्यज्ञं तन्वीत). एका शाखेमध्यें तर असुरयज्ञाची तन्हाही सांगितली आहे, ती अशीः—त्यांनीं प्रथम आहवनीय अग्नीचें आधान केलें. नंतर गार्हपत्याचें आणि शेवटीं अन्वाहार्यपचनाचें. देव, मनुष्य, असुर, राक्षस आणि गंधर्व अशा पांच जाती वैदिक काळीं मानल्या जात. ह्यावरून असुर आणि राक्षस हे एकच नव्हत हें दिसून येईल. मनांत एक आणि बोलणें दुसरेंच (अन्यमना वाचं वदंति) असें असुरांच्या स्वभावाचें वर्णन केलेलें आहे. बल, वृत्र, अरूरमघ, विश्वरूप, शम्बर इतक्या असुरांचीं नांवें ब्राह्मणांत आलीं आहेत. ह्या सर्व जातींच्या लोकांत यज्ञ करण्याचा प्रघात असला पाहिजे.

ऋक्मंत्रांत देवांचीं नांवें आहेत त्याहून निराळीं ब्राह्मणांत नाहींत. देवांमध्येंही मनुष्याप्रमाणंच वर्णभेद असे. अग्नि आणि बृहस्पति हे ब्राह्मण, इंद्र, सोम, वरुण, रुद्र, पर्जन्य, यम हे क्षत्रिय; गणेश, वसु, आदित्य; विश्वेदेव आणि मरुत् हे वैश्य आणि पूषा शूद्र. देवांमध्यें इंद्र श्रेष्ठ; तो

त्यांचा पुढारी, सर्वांमध्यें बलिष्ठ, अत्यंत तेजस्वी, कंटक, छातीठोक व उत्तम स्वभावाचा असें इंद्राचें वर्णन आढळतें. ( देवानामोजिष्ठो बलिष्ठः सहिष्ठः सत्तमः पारयिष्णुतमः ) इतकें श्रेष्ठत्व इंद्राचें देवांनीं मान्य केलें तथापि आपल्या अधिकाराचा व योग्यतेचा दुरुपयोग केल्यास त्यास शासन केल्यावांचून देव रहात नसत. एकदां देवतांनीं पांच अपराध इंद्रावर स्थापित करून त्यास यज्ञांत सोमपान मिळणार नाहीं अशी व्यवस्था केली. देवांच्या स्वभावाचें त्रोटक असें प्रसंगोपात्त जें जें वर्णन केलेलें आढळतें तें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. देव अमर्त्य तर आहेतच, पण त्यांस खरें बोलणारे ह्या विशेषणानें खोटें बोलणाऱ्या मनुष्यांपासून विश्लिष्ट केलें आहे. ( सत्यसंहिता वै देवा अनृतसंहिता मनुष्याः ) देवांमध्यें दुसरा विशेष हा आहे कीं, ते एकमेकांच्या घरीं रहात नाहींत. ( न वै देवा अन्योन्यस्य गृहे सन्ति ) देवांमध्येंही कांहीं उदारमतवादी व कांहीं अनुदारमतवादी असा भेद असावा असें वाटतें. प्रजापति हा पहिल्या वर्गांतला होता. मनुष्यांत जो योग्य व लायक असेल त्यास आपल्यापैकींच एक मानून देवांचे सर्व हक्क देण्यास तो तयार असे. ऋभु हे मनुष्य असतांना त्यानें त्यांना देवांत घेऊन यज्ञांतही देवांबरोबर भाग दिला. ( प्रजापतिर्वै पितॄन् ऋभून्मर्त्यान्सतोऽमर्त्यान्कृत्वा तृतीयसवन आभजत् ) परंतु ह्यांना आपल्या पंक्तीस घेण्यास अग्निवसु आदिकरून देव कबूल होईनात. ह्यांच्या अंगाला घाण येते असें त्यांचें म्हणणें होतें. ( तेभ्यो वै देवा अपैवाबीभत्सन्त मनुष्यगन्धात् ). देवही यज्ञ करीत. त्यांनीं एकदां मनुष्ययज्ञ केला होता. ( पुरुषं वै देवाः पशुमालभन्त ). ब्राह्मणांत हरिश्चन्द्राची आख्यायिका दिली आहे, त्यांतही मनुष्ययज्ञाचीच कथा आहे. ह्यावरून फार प्राचीनकाळीं मनुष्ययज्ञ करण्याची चाल आर्य म्हणवणाऱ्या लोकांत होती असें अनुमान कित्येकांनीं केलें आहे.

पंचजनांपैकीं देवांविषयीं ही हकीगत झाली. मनुष्यासंबंधानेंही थोडी बहुत माहिती ब्राह्मणांतून मिळण्यासारखी आहे. मनुष्यांत ब्राह्मण, क्षात्रिय, वैश्य, शूद्र, असे चार वर्ण रूढ झाले होतेच. सर्वांत ब्राह्मण अगोदरचे असा समज होता (क्षत्रात्पूर्वं ब्रह्म). काव्य अन्ध्र, पुंड्र, शबर, पुलिन्द, मूतिब इतक्या निरनिराळ्या लोकांच्या नांवाचा उल्लेख ब्राह्मणांत केलेला आढळतो त्याचप्रमाणें पुष्कळ राजांचा व ऋषींचा उल्लेख केलेला आहे त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

| राजे. | राजे. |
|---|---|
| १ मनतंतु. | २२ दुर्मुख. |
| २ एकादशाक्ष. | २३ शिबी. |
| ३ परीक्षित. | २४ शुष्मिन. |
| ४ पनमेजय. | २५ सुत्व. |
| ५ सहदेव. | २६ किरिश. |
| ६ सोमक. | २७ भार्गायण. |
| ७ शार्यात. | २८ विरोचन. |
| ८ सत्राजित. | २९ अरिंदम. |
| ९ शतानीक. | ३० सनश्रुत. |
| १० उग्रसेन. | ३१ नग्नजित्. |
| ११ युधांश्रौष्टि. | ३२ गांधार. |
| १२ आंबाष्ट्य. | ३३ सार्जय. |
| १३ भुवन. | ३४ विश्वंतर. |
| १४ विश्वकर्म. | ३५ दैवावृध. |
| १५ पिजवन. | ३६ वैदर्भ. |
| १६ सुदास. | ३७ भीम. |
| १७ अविक्षित. | ३८ ऋतुवित्. |
| १८ मरुत. | ३९ जानकि. |
| १९ अङ्ग. | ४० सुषम्ना. |
| २० दुष्यंत. | ४१ हरिश्चंद्र. |
| २१ भरत. | ४२ वेधस. |

## ऋषि.

| | |
|---|---|
| १ अवत्सार. | ७ जमदग्नि. |
| २ वैद. | ८ गृत्समद. |
| ३ शक्ति. | ९ लांगल. |
| ४ शाक्त्य. | १० मुद्गल. |
| ५ गौरिवीत. | ११ विमद. |
| ६ ऐतरेय. | १२ परुच्छेप. |

१३ कक्षीवान.
१४ सुकीर्ति.
१५ जतूकर्ण.
१६ जानश्रुतेय.
१७ अर्बुद.
१८ काद्रवेय.
१९ अंगिर.
२० विश्वामित्र.
२१ वामदेव.
२२ भरद्वाज.
२३ वसिष्ठ.
२४ नोधा.
२५ वालखिल्य.
२६ वरु.
२७ वृषाकपि.
२८ बुलिल.
२९ अश्वतर.
३० गौरूल.
३१ ऐतश.
३२ श्रुत.
३३ देवभाग.
३४ गिरिज.
३५ पैंगि.
३६ कौषीतकि.
३७ सौजात.
३८ आराहूळ.
३९ सोमशुष्म.
४० कश्यप.
४१ पर्वत.
४२ नारद.
४३ अग्नि.
४४ तुर.
४५ कवष.
४६ सत्यकाम.
४७ अरुण.
४८ उद्दालक.
४९ च्यवन.
५० वाजरत्न.
५१ सूयवस.
५२ अत्रि.
५३ दीर्घतमा.
५४ बृहदुक्थ.
५५ अजीगर्त.
५६ वृषशुष्म.
५७ वभ्रु.
५८ संवर्त.
५९ उदमय.
६० मियमेघ.
६१ सत्यहव्य.
६२ कुपारव.
६३ मैत्रेय.
६४ प्रियव्रत.

सर्वचरु, कुरुक्षेत्र, अवचत्नुक, मण्णार, साचीगुण, वृत्रघ्न इतक्या देशांचीं नांवें आलीं आहेत. आठव्या त्रिकेंत कोणत्या लोकांच्या राजांना काय संज्ञा आहे तें सांगितलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, पूर्वेकडील लोकांच्या राजांना सम्राट्, दक्षिणेकडील राजांना भोज, पश्चिमेकडील नीच्य

आणि अपाच्य नामक लोकांच्या राजांना स्वराट्. उत्तरेकडे हिमालयाच्या पलीकडे असणाऱ्या उत्तर कुरु व उत्तर मद्र नांवाच्या लोकांना विराट्, मधल्या भागांतिल कुरु पञ्चाल, वश आणि उशीनर नांवाच्या लोकांच्या राजाला राजा, ह्याप्रमाणें निरनिराळ्या राजांना निरनिराळ्या संज्ञा उल्लेख्य होत्या. ह्यामध्यें एक वाक्य विशेष लक्ष देण्याजोगें आहे. " उदीच्यां दिशि ये के च परेण हिमवन्तं जनपदा उत्तर कुरव उत्तरमद्रा इति वैराज्यायैव ते अभिषिच्यन्ते विराळित्येनानाभिषिक्ता नाचक्षत. " हिमालयाच्या पलीकडे उत्तर कुरु व उत्तर मद्र हे लोक असून त्यांच्यांत राजा म्हणून कोणी नसे. राज्यकारभार लोकांच्याच हातीं असे. वैराज्य म्हणजे राजावांचून राहणें हींच त्यांची उत्कट इच्छा असे म्हणून राज्यकारभार चालविणाऱ्या लोकांना विराट ही संज्ञा प्राप्त झाली.

हल्लीं ज्याप्रमाणें सामान्य नांवानें कांहीं लोक निर्दिष्ट केले जातात त्याप्रमाणें पूर्वीही जात असत असें दिसतें. उदाहरणार्थ, श्यापर्ण ब्राह्मण; भूतवीरब्राह्मण, असितमृग ब्राह्मण. बापाच्या अथवा आजाच्या नांवावरून मुलाला किंवा नातवाला अथवा पुढल्या सर्व वंशजांना नांव प्राप्त होई. उसुष ह्याचा पुत्र सौषद्म; वाजरत्नाचा नातु वाजरत्नायन; शक्ति नामक ऋषीच्या कुलांत जन्मलेले शाक्त्य अशा रीतीनें पुरुषांवरून त्यांचे वंशज ओळखले जात. त्याचप्रमाणें स्त्रियांवरूनही जात असत. उदाहरणार्थ, भार्गवेय राम ( भृगुस्त्रीचा पुत्र ); कद्रु नामक स्त्रीचा पुत्र काद्रवेय; इतरेचा मुलगा ऐतरेय; ममतेचा मुलगा मामतेय. सांप्रत आपण स्वतःच्या व बापाच्या नांवानंतर उपनांव लावून पूर्ण नांव बनवितों. पूर्वी स्वतःचें, बापाचें आणि आजाचें नांव लावण्याचीहि वहिवाट होती असें वाटतें. उदाहरणार्थ, "वृषशुष्मो हवातावत उवाच जातूकर्ण्यः," जतूकर्ण्याचा नातु व तावन्नामक ऋषीचा मुलगा वृषशुष्म म्हणाला.

ब्राह्मण कालीं समाज सुव्यवस्थित असून सुधारणेच्या पायावर प्रतिष्ठित झाला होता. सर्व सुधारणांचा मूलाधार जी विवाहपद्धति ती अस्तित्वांत आलेली होती हें सांगावयास नकोच. आई, बहीण, बायको, सून, सासरा वगैरे संबंध दृढ झाले होते. कुटुंबांतील स्त्रीपुरुषांची परस्परांशीं वागणूक हल्लींहून निराळी होती असें दिसत नाहीं. सासऱ्याला पाहतांच सुनेनें लाजून तोंडावर पदर घेण्याचा रिवाज एवढ्या प्राचीन काळींही होता. ( तद्यथैवा-

दःस्नुषाश्वशुराल्लज्जमाना निलीयमाना ) एका पुरुषानें पुष्कळ स्त्रियांशीं लग्न करण्याची मोकळीक होती. ( यदिह वा अपि बह्वय इव जायाः पतिर्वाव तासां मिथुनम्) परंतु एका स्त्रीला मात्र अनेक पति (अर्थात् एकाच वेळीं ) करतां येत नसत. ( तस्मादेकस्य बह्वयो जाया भवन्ति नैकस्यै बहवः सहपतयः ). ब्राह्मणांत सर्वत्र शत्रूच्या ऐवजीं भ्रातृव्य शब्दाचा उपयोग केलेला आढळतो. ( तत्पाप्मानं भ्रातृव्यमपबाधते ); ह्यावरून कुटुंबांतील कलह त्यावेळींही किती तीव्र असले पाहिजेत ह्याची चांगली कल्पना करतां येण्यासारखी आहे. जायेच्या ठिकाणीं प्रवेश करून पतीच पुन्हा पुत्ररूपानें जन्मास येतो ही कल्पनाही तेव्हां प्रचलित होती ( पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वा स मातरम्। तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते.)

ऋग्वेदकालींही लोक उत्कृष्ट वस्त्रें परिधान करीत असत. ( युवा सुवासाः परिवीत आगात् ) मग ब्राह्मणकालीं उत्कृष्ट वस्त्रें तयार होत असत हें सांगण्याची अवश्यकता नाहीं. " यथैव प्रवयणतः पेशकुर्यात् " ह्या वाक्यावरून रंगविरंगीं वस्त्रें करण्याचेंसुद्धां लोकांस ज्ञान होतें असें अनुमान होतें. त्याचप्रमाणें हत्ती वगैरे जनावरांचीं चित्रें, आरसे इत्यादि पदार्थ तयार करण्याइतकी कारागिरी लोकांत होती—एतेषांवै शिल्पानामनुकृतीह शिल्पमधिगम्यते हस्तीकंसो, वासो, हिरण्यमश्वतरीरथः शिल्पम्। अश्वतरीरथ ह्या शब्दावरून लोकांच्या प्रवासाचें साधन रथ होता हें उघड आहे. गाड्यांना कधीं घोडे, कधीं बैल तर कधीं खेंचरें लावीत असत. जमिनीवरील साधन जशी गाडी तशी पाण्यावरून जाण्याचें नौका हें साधन होतें. अन्नसामुग्री घेऊन नौकेंत बसत ह्यावरून लांबीचें जलपर्यटण करण्याची लोकांस संवय होती हें उघड दिसतें. ( तद्यथा सैरावतीं नावं पारकामाः समारोहेयुः ). खेचर हा ग्राम्य पशु होय. एकंदर ग्राम्य पशु सात. ' सप्त वै ग्राम्याः पशवः ' अज, अश्व, गौ, महिषी, वराह, हस्ती हे बाकीचे ग्राम्य पशु होत. ह्या देशांत मार्जार जातीचें अस्तित्वही निदान तीन हजार वर्षें आहे असें ब्राह्मणांत त्या जातीचा जो उल्लेख केलेला आहे त्यावरून मानण्यास हरकत नाहीं. वर सात ग्राम्य पशु सांगितले त्यांत गाईचा समावेश केलेला आहेच. ह्या गाईचा उपयोग यज्ञाशिवाय अतिथिसंतर्पणाकडेही होत असे. पूज्य अतिथि आला असतां यजमान गाय मारून तिच्या मांसानें अभ्या-

गताचा सत्कार करीत असे. ह्या अत्यंत प्राचीन चालीचा निर्देश ब्राह्मणांत स्पष्टपणें केलेला आहे.

' अग्निं मन्यन्ति सोमे राजन्यागते तद्यथैवादो मनुष्यराज आगतेऽन्यस्मिन्वाऽईत्युक्षाणं वा वेहतं वाक्षदन्त एवमेव ' ॥

वेदकालीं मांसभक्षणाचा अगदीं सामान्य प्रचार होता असें दिसतें. पुढें कोणत्या तरी निमित्तानें हा अनिष्ट प्रकार संपुष्टांत आणण्याचा बुद्धिपुरःसर प्रयत्न झाला असावा. त्यापैकींच अमेध्यपशूचें मांस खाऊं नये हा निषेध होय. ' तएत उत्क्रान्त मेधा अमेध्याः पशवस्तस्मादेतषां नाश्नीयात् ' घोडा, गाय, बैल, उंट, अज हे अमेध्य पशु होत. सांप्रतचें कालमान ब्राह्मणकालींही निश्चित झालें होतें. वर्षाचे सहा ऋतु असूनसुद्धां वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत आणि शिशिर हीं नांवें रूढ झालीं होतीं. वर्षाचे चोवीस अर्धमास व बारा मास ठरले होते. तथापि ब्राह्मणकालाच्या पूर्वी तेरा महिन्यांचा संवत्सर असावा. ( तं त्रयोदशान्मासादक्रीणन् ) ह्या तेरा महिन्यांचे अभिमानी देव होते असें म्हणतात. हल्लीं आपण दिवसाचा आरंभ सूर्योदयापासून करतों; पण ब्राह्मणकालीं तो रात्रीपासून होत असे असें खालील उताऱ्यावरून दिसून येईल. ' यां च रात्रिमजायेऽहं यो च प्रेतास्मि तदुभयमन्तरेण ' ' ज्या दिवशीं मी जन्मलों ' असें आतां आपण म्हणतों; परंतु पूर्वी ' ज्या रात्रीं मीं जन्मलों ' असें म्हणत असत. एक वर्ष म्हणजे ३६० दिवस. त्रीणि च वै शतानि षष्टिश्च संवत्सरस्याहानि. खालीं दिलेल्या गाथेंत चारी युगांचीं नांवें आढळतात. कलिःशयानो भवति संजिहानस्तु द्वापरः । उत्तिष्ठं त्रेताः भवति कृतं संपद्यते चरंश्चरैवेति ' येथेंही युगांचीं नांवें आहेत कीं फाशांच्या अवस्थांची आहेत हा वादग्रस्त प्रश्न आहे. तथापि टाकलेल्या फाशांच्या निरनिराळ्या अवस्थांवरून युगांना नांवें प्राप्त झालीं हा जो कित्येकांचा समज आहे तो खरा असावा असें वाटतें.

ऋतु सूर्याच्या गतिमुळें होतात; म्हणून सूर्यास त्यांचा पति म्हटलें आहे. दिवसरात्रीचें कारण बरोबर ठरविण्यांत आलें होतें. ' स वा एष न कदाचनास्तमेति नोदेति तं यदस्तमेतीति मन्यन्तेऽन्ह एव तदन्तमित्वाऽथाऽऽत्मानंविपर्यस्यते रात्रीमेवावस्तात्कुरुते ऽहः परस्तात् । अथ यदेनं प्रातरुदेतीति मन्यंते रात्रेरेव तदन्तमित्वाऽथाऽऽत्मानंविपर्यस्य तेऽहरेवा-

वस्तात्कुरुते रात्रिं परस्तात् '. पृथ्वीच्या सभोंवार समुद्र परलेला आहे " परिगृह्य तिष्ठति समुद्र इव भूमिं " ही समजूत प्राचीन लोकांमध्यें किती सर्वसामान्य होती हें कोणत्याही प्रकारच्या संस्कृत वाङ्मयावरून दिसून येणारें आहे; पण " अलोमिकेवाग्र आसीत् " व " तस्याः शोचत्या इमे प्रदराः प्रादीर्यन्त. येऽस्या इमे प्रदराः समेव हैव ततःपुरा. " ह्या पृथ्वीवर पूर्वी वृक्ष वगैरे कांहीं नव्हतें. तिच्यावर प्रदर ( छिद्र ) नव्हतें. तिचा तल सारखा होता इत्यादि वचनांवरून भूगर्भशास्त्राच्या मूलतत्त्वांची थोडीशी तरी पण यथार्थ कल्पना आमच्या प्राचीन ऋषींस होती हें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

खालीं दिलेल्या ब्राह्मणांतील उताऱ्यावर त्या वेळच्या लोकांच्या नीति-कल्पना कशा होत्या तें दिसतें. " अनेन समेनसासोऽभिशस्तादेन स्वतोवाऽ पहरादेनः । एकातिथिमपसायं रुणद्धि विसानि स्तेनो अपसो जहारेति ॥" कमळाचे तंतु चोरणारा व सायंकाळीं आलेल्या अतिथीस घरांत न घेणारा निर्दोषी लोकांवर ह्या अपराधाचा आरोप करील व दोषी असलेल्यांचा दोष काढून टाकील. ह्यावरून असें दिसतें कीं, कमळाचे तंतु चोरणें व सायंकाळीं अतिथीस घरांत आश्रय न देणें हे महान् अपराध समजले जात असत व हा दोष आपल्यावरचा जावा म्हणून दोषी मनुष्य वस्तुतः निर्दोषी माणसांवर ते अपराध लादीत असे. निरपराधी माणसांवर असत्य आरोप करण्यानें आपल्या अपराधांचें क्षालन होतें ही समजूत फारच चमत्कारिक दिसते. हा क्षालनप्रकार अत्यंत प्राचीन असला पाहिजे.

" तस्माद्वाप्येतर्हि भरताः सत्वनां वित्तिप्रयन्ति तुरीयेहैव संग्रहीतारो वदन्ते" ह्या वाक्यावरून युद्धांत मिळालेली लूट सेनेंत वांटून देण्याची चाल फार जुनी आहे असें दिसतें. अशा लुटीचा चौथा भाग फक्त सारथ्याला मिळण्याचा हक्क आहे असें वरील वचनांत म्हटलें आहे. बहुधा सारथ्यांस ठरीव वेतन मिळत नसे असेंही मानण्यास हरकत नाहीं.

ह्याशिवाय ब्राह्मणांत आख्यानें, उपाख्यानें आहेत तींसुद्धां फार बोधप्रद आहेत. परंतु ऐतरेय ब्राह्मणांतील आख्यायिका स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा हेतु असल्यामुळें त्यांजविषयीं येथें कांहीं लिहित नाहीं.

# ७ ऐतरेयब्राह्मणांतील ४३ आख्यायिका.

## प्रस्तावना.



ह्या लेखांत ऐतरेय ब्राह्मणांतिल त्रेचाळीस आख्यायिका दिल्या आहेत. त्या मुलांस मनोरंजक व थोरांस बोधप्रद झाल्यावांचून राहणार नाहींत. ह्यापैकीं बऱ्याच आख्यायिका निःसंशय केवळ कल्पनासृष्ट आहेत. फार थोड्या ऐतिहासिक असाव्यात. तथापि त्यावरून तत्कालीन म्हणजे ब्राह्मणकालीन लोकांचे समज काय होते ह्याची कल्पना होण्यासारखी असून शिवाय त्या वेळच्या समाजघटनेंचें चित्रही आपणांस रेखाटतां येण्यासारखें आहे.

पुढें दिलेल्या त्रेचाळीस आख्यायिकांपैकीं ज्यांत देवांच्या यज्ञाचा उल्लेख आहे अशा एकोणीस आहेत, व देवासुरांच्या युद्धाच्या हकीकतींनें भरलेल्या अशा दहा आहेत.

पहिलीच आख्यायिका फार महत्वाची आहे. त्यांत दक्षिणहिंदुस्थानचा स्पष्ट उल्लेख आहे एवढेंच नव्हे तर लोकवस्तीही तेथें ब्राह्मणकालीं होती असें त्यावरून दिसून येणार आहे. ह्या एका गोष्टीवरून ब्राह्मणग्रंथाची रचना रामायणापूर्वी झाली असावी असें अनुमान करण्यास जागा आहे. त्याचप्रमाणें भारतांतील कांहीं व्यक्तींचा नामनिर्देश असून दशरथ अथवा राम ह्यांचा कोठेंही उल्लेख नाहीं, ह्यावरून तेंच अनुमान दृढ होतें.

ह्याच आख्यायिकेंत नद्या पश्चिमाभिमुख वहात असण्याचें एक कल्पित कारण दिलें आहे. हिंदुस्थानांत अशा नद्या फार नाहींत. असें असून अशाच नद्यांचा उल्लेख केला आहे त्या अर्थी ब्राह्मण रचणारा ऋषि—निदान ही आख्यायिका रचणारा तरी—दक्षिण हिंदुस्थानांत पश्चिमेकडे समुद्रकिनाऱ्यावर राहणारा असला पाहिजे.

एकोणीस आख्यानें देवांच्या यज्ञासंबंधानें आहेत म्हणून वर सांगितलेंच आहे. आतां ऋग्वेदामध्यें ज्याप्रमाणें नैसर्गिक सृष्टिचमत्कारांचा देव

शब्दानें बोध होतो त्याच अर्थी ब्राह्मणांतील देव शब्द योजलेला आहे कीं काय ? म्हणजे ब्राह्मणांतील देव–आणि असुरसुद्धां–ह्या काल्पनिक अगर वास्तविक व्यक्ति होत्या हें ठरविणें सोपें नाहीं. देव आणि असुर ह्या संज्ञा ज्यांना आहेत अशा दोन जाती नसतील कशावरून ? तें कांहींहि असो. देव व असुर हे दोन निरनिराळ्या जातींचे लोक होते असें आपण मानून चालल्यास त्या दोघांचें ब्राह्मणांत केलेलें वर्णन फारच महत्वाचें वाटल्याशिवाय राहणार नाहीं. देवांमध्यें प्रथम कोणी राजा नव्हता. अराजक स्थितींत समाज टिकणें शक्य नाहीं असें आढळून आल्यावर त्यांनीं असुरांना अनुसरून आपणांमधील एकास राज्यपदावर आरूढ केलें. ( आ० ३ ). असुरांत परस्परांत कलह नसत; पण देवांत एकी क्वचितच असे. आपसांतील वैमनस्यामुळें असुरांबरोबर लढाई करतांना त्यांस वारंवार अपयश येई. युद्धापुरती तरी एकी असावी म्हणून त्यांनीं एके प्रसंगीं सर्वांचीं वायकामुलें एके ठिकाणीं कोंडून ठेवण्याची युक्ति काढली. जो कोणी फुटून जाईल तो आपल्या वायकामुलांस मुकेल असें त्यांनीं ठरविलें. ( आ० ६ ). मत्सरानेंही देव ग्रस्त झालेले असत असें दिसतें. आपल्याप्रमाणें मनुष्यांनीं किंवा ऋषींनीं स्वर्गास येऊं नये अशी त्यांची फार इच्छा असे. ( आ० ८ ). हा स्वर्गलोक कोणता ? गंधर्वलोक व स्वर्गलोक एकच असावे असें २५ व्या आख्यायिकेवरून दिसत. ३५ व्या आख्यायिकेवरून असुर फार श्रीमंत असत व ते समुद्रकांठीं रहात असें वाटतें. राजाच्या कल्पनेप्रमाणें किल्ले बांधण्याची युक्ति ही देवांनीं असुरांपासून संपादन केली. ( आ० ५ ).

मनुष्यांनीं देवांपासून यज्ञाची माहिती मिळविली. ( आ. १२ ). पण यज्ञाची कल्पना देवांमध्येंच प्रथम उद्भवली असें दिसत नाहीं. सर्व यागांत सोमयाग प्रधान आहे. परंतु सोमवल्ली देवाच्या प्रदेशांत उपजत नव्हती. ती पूर्वेकडील देशांत होत असून तेथें रानटी लोकांची वस्ती होती. हे लोक वर्षाचे तेरा महिने मानीत. ( आ. २ ). ह्याच लोकांना गंधर्व म्हणत, ( आ. ७ ) असें दिसतें. यज्ञांत यजमानाला दीक्षा घ्यावी लागते व क्षीरपान करावें लागतें. हे दोनही आचार ह्याच लोकांपासून देवांनीं घेतले असावे. ( आ. २५ ). ह्या सर्व गोष्टींवरून यज्ञ करण्याची, निदान सोमयाग करण्याची प्रवृत्ति मूळची हिमालय पर्वतावरील गंधर्व नामक

रानटी लोकांमध्यें असून त्यांच्यापासून ती इतरांनीं उचलली असें म्हणण्यास हरकत नाहीं. हे लोक रानटी होते असें म्हणण्याचें कारण त्याच आख्यायिकेंत ( २ ) सोमविक्रय करणाराला अशिष्ट व पापी म्हटलें आहे.

येथवर एकंदर आख्यायिकांचें सामान्य निरूपण केलें. ह्याशिवाय किरकोळ बोध घेतां येईल अशा आख्यायिका त्या दृष्टीनें वाचणें अवश्य आहे. उदाहरणार्थ, ज्याच्यामुळें आपणांस लाभ होतो अथवा ज्याच्यावर आपली उपजीविका आहे त्याचा सर्वस्वी नाश केल्यानें आपणांस फायदा होत नाहीं, तर त्याचें पोषणच केलें पाहिजे ही गोष्ट आपणांस ४ थ्या आख्यायिकेवरून शिकतां येण्यासारखी आहे. कांहीं रानटी जातींत क्रयविक्रयांत पैशादाखल माणसाचा उपयोग होत असावा. ( आ. ७ ). १० व्या आख्यायिकेवरून यज्ञांत होणाऱ्या पशुहत्येचें समर्थन लोक कसें करीत तें समजेल. हें समर्थन कित्येकांस अगदीं लंगडें वाटेल; तथापि त्यावरून आपल्या पूर्वजांस त्याबद्दल विशेष दोष देण्याचें कारण नाहीं. सांप्रत सुधारलेल्या काळांतही मांसभक्षक लोकांकडून हेंच कारण पुढें करण्यांत येत असतें. आम्हाला खाण्याकरितां बोकड मारावयाचा असला म्हणजे आधीं आम्ही त्यास खायला घालून पुष्ट करतों व हे त्याच्यावर उपकारच करतों अशा तऱ्हेचें प्रतिपादन हल्लींही कित्येक परकी धर्मप्रचारक करीत असतात.

आख्यायिका १४—ऋषींनीं केलेल्या यज्ञाची ही एकच आख्यायिका आहे. ऋग्वेदकालाप्रमाणें ब्राह्मणकालींही कांहीं ब्राह्मणांना जुगार खेळण्याचा नाद असे. हींत सरस्वती नदीचा नांवानें उल्लेख केला आहे; व परिसारक देश हल्लीं कोणत्या नांवानें ज्ञात आहे हें समजून घेण्यासारखें आहे.

आख्यायिका १५—दहीं मिसळून सोमरसाचा अम्मल कमी करण्याची युक्ति देवांनीं काढली. ह्या आख्यायिकेंत लांब जिभेची म्हणून आसुरीचें वर्णन आहे. परंतु हें वर्णन राक्षसांचें किंवा असुरांचें पाहिजे, हें मनन करण्यासारखें आहे. असुर आणि राक्षस एकच नव्हत. (आ० ११).

आख्यायिका १६—भांडणाचा निकाल लावून घेण्याची ही तऱ्हा फार प्राचीन असून मर्दानी आहे.

आख्यायिका १७—देव व असुर ह्यांचे यज्ञ करण्याचे निरनिराळे मार्ग होते.

आख्यायिका २६—ही आख्यायिका फार महत्वाची आहे. वरिष्ठ वर्गाची कनिष्ठ वर्गाविषयीं तिरस्कारबुद्धि आजचीच नाहीं हें ह्यावरून स्पष्ट होतें. मानवजातींतील ऋभूंनीं देवाबरोबर यज्ञांत सोमपानाचा हक्क संपादन केला, ह्यावरून ऋभूंचा पराक्रम जितका दिसून येतो, तितकीच प्रजापतीची उदार बुद्धिही व्यक्त होते.

आख्यायिका २७—प्रजापतीनें आपल्या मुलीबरोबर समागम केला ही जी पुराणांतली कथा तें वस्तुतः रूपक आहे, हें ह्या आख्यायिकेंत उघड सांगितलेलें आहे. दुसरें, पुराणांतील कथा केवळ अर्वाचीन नसून त्या फार प्राचीन कालापासून प्रचलित आहेत असेंही सिद्ध होतें.

आख्यायिका २९—अव्यवस्थित रीतीनें लढाई होत नसून सैन्याच्या लहान लहान टोळ्या करून युद्ध करीत असें अनुमान होतें.

आख्यायिका ३१—गाडीस गाढव लावीत, व कन्या पराक्रमी पुरुषालाच अर्पण करीत.

आख्यायिका ३६—ह्यांतील सत्यनिष्ठेचें उदाहरण कोणाकडूनही अभिमानपूर्वक वाचलें जाईल. ह्या वेळीं वाटप होऊं लागलें होतें, व बाप जीवंत असतांच मुलांना वाटपाचा हक्क प्राप्त झाला होता हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हल्लीं आपण संपत्ति म्हणजे धातूचें नाणें समजतों; पण प्राचीनकाळीं गाई म्हणजेच संपत्ति होती. अर्थात् गाई विनिमयसामान्य होतें.

आख्यायिका ४०—भूगर्भशास्त्राची अंधुक कल्पना होती हें ह्या आख्यायिकेवरून निर्विवाद ठरतें.

आख्यायिका ४१—जाया ही मित्राप्रमाणें असते असें स्पष्ट म्हटलें आहे, ह्यावरून स्त्रियांची योग्यता आह्मीं कमी मानतों हा जो आरोप आमच्यावर केला जातो तो किती निराधार आहे तें दिसून येईल. पूर्वी मनुष्ययज्ञ करीत कीं काय अशी शंका येते.

वरील संक्षिप्त विवेचनावरून पुढील आख्यायिका मराठी वाचकांस बोधप्रद व मनोरंजक झाल्याशिवाय राहणार नाहींत अशी आशा करण्यास जागा आहे.

## आख्यायिका १.

एकदां असें झालें कीं, यज्ञदेवता देवांना सोडून चालती झाली. तेव्हां देवांना यज्ञासंबंधीं कांहीं एक करतां येईनासें झालें. ते अगदीं गोंधळून गेले. तेव्हां ते अदितीला म्हणाले, तुझ्या प्रसादानें यज्ञ करण्याचें सामर्थ्य आम्हांला येऊं दे. बरें आहे असें म्हणून ती देवांना पुन्हा म्हणाली, मी तुमच्याजवळ एक वर मागतें. देवांनीं " माग " असें म्हटल्यावर तिनें असा वर मागितला कीं, सर्व सोमयागांचा उपक्रम माझ्यापासून व त्यांचें पर्यवसानही माझ्या ठिकाणीं असो. देवांनीं अदितीचें मागणें कबूल केलें. ह्याप्रमाणें अदितीला वर प्राप्त झाल्यामुळें यज्ञाचा प्रारंभकालीन व समाप्तिकालीन चरु अग्निदेवताक असतो.

अदितीनें देवांना आणखी असें सांगितलें कीं, मी, अग्नि, सोम व सविता ह्यांच्यावरून तुम्हीं दिशांची ओळख ठेवा. म्हणजे माझें ज्या ठिकाणीं अधिष्ठान आहे ती पूर्व, आणि अग्नि, सोम व सविता ह्यांचें अधिष्ठान जेथें आहे त्या दिशा अनुक्रमें, दक्षिण, पश्चिम व उत्तर असें समजा.

पथ्येचें (अदिति देवतेचें) यजन होत असल्यामुळें, आदित्य पूर्वेस उदय पावतो व नंतर पश्चिमेस अस्तंगत होतो. कारण हा पथ्येच्या पाठोपाठ संचार करतो[1].

अग्नीचें यजन होतें म्हणून दक्षिण दिशेकडे धान्यें लवकर परिपक्व होऊन आपल्या धन्यांच्या घरीं येतात. कारण औषधि पक्वस्थितीला आणण्यास अग्नीच कारण आहे. सोमाचें यजन होत असल्या कारणानें, पुष्कळ नद्या पश्चिमाभिमुख वाहत आहेत. कारण नद्यांचा सोमाशीं संबंध आहे.

सवित्याचें यजन होत असल्यामुळें त्यानें प्रेरित असा हा वायु उत्तर व पश्चिम ह्या दोन दिशांच्या दरम्यान सोसाट्यानें सचार करितो.

आकाशांतील अदितीचें यजन होत असल्यामुळें, पृथ्वीला आकाश पावसानें आर्द्र करतें व ( उन्हाळ्यांत उष्णतेनें ) शुष्क करतें.

---

१ उदयनीय इष्टीमध्यें पश्चिमेस पथ्येचें यजन करतात. म्हणून पथ्येचा पश्चिम दिशेसही संबंध आहे असें समजावयाचें.

## आख्यायिका २.

पूर्वी देवांनीं सोम राजा पूर्व दिशेस विकत घेतला; म्हणून सांप्रतही पूर्व दिशेसच तो खरेदी करतात.

तो सोम तेराव्या महिन्याच्या अभिमानी पुरुषापासून विकत घेतला; त्यामुळें तेरावा महिना ( शुभकर्माला ) उपयुक्त नाहीं. त्याचप्रमाणें सोमाचा विक्रय करणारा ( शिष्टाचाराला ) अनुकूल नसतो. कारण जो सोमविक्रय करतो तो पापी होय. विकत घेतल्यानंतर मनुष्याकडे सोम आणला असतां त्यांतील वीर्य व इन्द्रियें तीक्ष्ण करण्याचें सामर्थ्य त्यांतून उडून गेलें व सर्वत्र पसरलें. एका ऋचेनें तें एकत्र करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला; पण त्यांना यश आलें नाहीं. त्यांनीं दोन, नंतर तीन, नंतर चार, नंतर पांच, नंतर सहा, नंतर सात ऋचा म्हणून एकवट करण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. शेवटीं आठ ऋचांनीं त्यांना त्या गेलेल्या वीर्याचा व सामर्थ्याचा अवरोध करून तीं पूर्णपणें परत आणतां आलीं.

---

## आख्यायिका ३.

ह्या लोकीं एकदां देव आणि असुर ह्यांचें युद्ध जुंपलें. पूर्व दिशेस त्यांची लढाई झाली, त्यांत देवांचा असुरांनीं पराजय केला. दक्षिण दिशेस लढाई झाली, त्यांतही असुर जिंकले. त्याचप्रमाणें पश्चिमेस व उत्तरेस त्यांच्या लढाया झाल्या, त्यांतहि प्रत्येक वेळीं असुरांचाच विजय झाला. नंतर ईशान्य दिशेस लढाई झाली, त्यांत मात्र देवांचा पराजय झाला नाहीं. ती ही विजयी दिशा होय. म्हणून ह्या दिशेसच प्रयत्न करावा व करवावा. कारण, असा मनुष्य आपल्यास ऋणमुक्त करून घेण्यास समर्थ होतो.

नंतर ते देव म्हणूं लागले, आपल्यामध्यें राजा नसल्याकारणानें त्यांनीं आपणांस जिंकलें. आपणही राजा करू. सर्वांची मान्यता मिळाल्यावर त्यांनीं सोमाला राजा केला. सोमराजाच्या योगानें त्यांनीं सर्व दिशा जिंकल्या.

---

## आख्यायिका ४.

एकदां यज्ञ देवांवर रागावून मी तुमचें अन्न होणार नाहीं असें म्हणून चालता झाला. तूं जाऊं नकोस, तूं आमचें अन्नच होशील असें म्हणून

देवांनीं त्याला ठार मारलें. त्यांनीं त्याचे तुकडे तुकडे केल्यावर तो ( क्षुधा तृप्त करण्यास ) पुरेसा नाहीं असें त्यांस वाटलें. तेव्हां देव विचार करूं लागले कीं, मथित झालेला हा यज्ञ आपणांस पुरेसें अन्न होणार नाहीं. करतां ह्या यज्ञाचें आपण पोषण करूं. ही गोष्ट सर्वांस मान्य झाल्यावर त्यांनीं त्या यज्ञाचें पोषण केलें. ( विस्कळीत केलेल्या ) त्या यज्ञाला पूर्ववत् केल्यावर ते अश्विनींना म्हणाले ह्याला औषध द्या. कारण अश्विनी देवांचे वैद्य आहेत.

---

## आख्यायिका ५.

ह्या लोकांत देवासुरांचें युद्ध सुरू झालें. पराक्रमी व बलयुक्त राजांप्रमाणें असुरांनीं ह्या तीन लोकांचीं प्राकारयुक्त पुरें बनविलीं. त्यांनीं भूलोकाला लोहमय केलें, अन्तरिक्ष रजतमय केलें आणि द्युलोक सुवर्णमय केला. ह्याप्रमाणें त्यांनीं ह्या लोकांचे किल्ले बनविले. तेव्हां देवांनीं आपसांत विचार केला कीं, असुरांनीं ह्या लोकांचीं पुरें बनविलीं, करितां आपणही त्यांच्या प्रतिकारार्थ दुसरीं पुरें बनवूं, असा विचार करून त्यांनीं भूलोकापासून सदोनामक मंडप उभारला. अन्तरिक्षापासून आग्नीध्र नामक धिष्ण्य तयार केलें, व भूलोकामधून हविर्धान नामक दोन शकट निर्माण केले. ह्याप्रमाणें देवांनीं प्रतिपुरें निर्माण केलीं.

नंतर देव म्हणूं लागले, आपण उपसदाख्य होम करूं. कारण उपसदांनींच महापुरें जिंकतां येतात. ही गोष्ट सर्वांस मान्य होऊन त्याप्रमाणें त्यांनीं केलें. पहिला होम केल्याबरोबर त्यांनीं असुरांना भूलोकांतून हाकून लावलें. दुसऱ्या होमानें अन्तरिक्षांतून व तिसऱ्या होमानें भूलोकांतून असुरांना घालवून लावलें. अशा रीतीनें त्यांनीं असुरांना ह्या लोकांतून बाहेर घालविलें.

ह्या तीनही लोकांतून हाकून लावलेले ते असुर ऋतूंच्या आश्रयास गेले. तेव्हां उपसदाख्य होमच आपण करावे असा विचार करून देवांनीं त्याप्रमाणें केलें. ऋतु सहा पण उपसद तीनच असल्यामुळें प्रत्येक होम त्यांनीं दोनदां केला. अशा रीतीनें सहा होम करून त्यांनीं ऋतूंपासूनही असुरांचें उत्थापन केलें.

17 MAR 1990

ऋतूंपासून घालवून दिलेल्या त्या असुरांनीं नंतर मासांचा आश्रय केला. त्यावेळेसही उपसन्नामक होमच आपण करूं असा विचार करून देवांनीं त्याप्रमाणें केलें. महिने बारा म्हणून पूर्वी सहा वेळां केलेले होम त्यांनीं आतां बारा वेळां केले. आणि अशा रीतीनें मासांपासूनहि असुरांना देवांनीं अनाश्रित केले.

मासांपासून निघाल्यावर असुरांनीं अर्धमासांचा आश्रय केला. उपसदाख्य होमच आपण करूं असा विचार करून देवांनीं तसें केलें. बारा असलेले उपसद् होम त्यांनीं ह्या खेपेस चोवीस वेळां केले. कारण अर्धमास चोवीस आहेत. असें करून असुरांना देवांनीं तेथूनही घालविलें.

अर्धमासाचा आश्रय सुटल्यावर असुर अहोरात्रांच्या आश्रयास गेले, तेव्हां उपसद् होमच आपण करूं असें देव म्हणूं लागले, व तसें त्यांनीं केलेंही. पूर्वान्हीं त्यांनीं जो उपसदाख्य होम केला त्याच्या योगानेंच दिवसापासून त्यांनीं असुरांस घालविलें, व अपराह्णीं केलेल्या होमाच्या योगानें ते असुरांना रात्रीपासून घालवते झाले. अशा रीतीनें अहोरात्रापासूनही असुरांना देवांनीं हांकून लाविलें.

## आख्यायिका ६.

(देवासुरांच्या युद्धांत) देवांना अशी भीति पडली कीं, आपल्यामध्यें जे आपआपसांत कलह आहेत त्यांच्यायोगानें असुर आपलें राज्य घेतील म्हणून तेथून दुसऱ्या ठिकाणीं जाऊन आपआपल्या मन्त्र्यांसह ते विचार करूं लागले. अग्नि वसूंना घेऊन गेला, इन्द्र रुद्रांना घेऊन गेला, वरुण आदित्यांसह चालता झाला, व बृहस्पति विश्वेदेवांना घेऊन निघाला.

ह्याप्रमाणें दूर जाऊन ते विचार करूं लागले. ते म्हणाले, हीं आपलीं आवडतीं बायकामुलें ह्या राजा वरुणाच्या घरांत बंदोबस्तानें ठेवूं. जो आपणांतून फुटेल व आपलीं बायकामुलें तेथून घेऊन जाण्याची इच्छा करील त्यास तीं मिळणार नाहींत. हा विचार सर्वांस पसंत पडल्यावर त्यांनीं राजा वरुणाच्या घरांत आपलीं बायकामुलें ठेविलीं.

## आख्यायिका ७.

सोमराजा गंधर्वांकडे होता; तेव्हां तो आपणांकडे कसा येईल अशा-

विषयीं देव आणि ऋषि विचार करूं लागले. वाग्देवी म्हणाली, गंधर्व स्त्रीलंपट आहेत, करतां मी स्त्री होतें, मला देऊन तुम्ही त्यापासून सोम विकत घ्या. आम्ही तसें करणार नाहीं, तुझ्याशिवाय आमचें कसें होईल असें देव म्हणूं लागले. त्यावर ती म्हणाली, तुम्ही मला देऊन सोम विकत घ्याच. जेव्हां तुम्हाला माझें कारण लागेल तेव्हां मी तुमच्याकडे परत येईन. ही गोष्ट देवांनीं मान्य केली. नंतर वाग्देवी मोठी सुंदर पण नग्न अशी कुमारी बनली. तिच्यायोगानें देवांनीं सोम विकत घेतला.

## आख्यायिका ८.

पूर्वी एकदां यज्ञाच्यायोगानें देव स्वर्गास गेले. त्यांना अशी भीति पडली कीं, हा आपला यज्ञ पाहून मनुष्य आणि ऋषि आपल्या पाठोपाठ येतील. म्हणून त्यांना भ्रम पाडण्याच्या उद्देशानें वर बुंधा आणि खालीं शेंडा करून एक यूप यज्ञभूमीवर देवांनीं पुरून ठेवला. पुढें मनुष्य आणि ऋषि यज्ञभूमीवर आले. येथें आपणांस कांहीं तरी यज्ञाची खूण दृष्टीस पडेल, व त्यावरून देवांनीं यज्ञ कसा केला हें आपणांस समजेल असा विचार करीत करीत ते यूपापाशीं येऊन पोंचले. ज्याचा शेंडा जमिनींत पुरला आहे असा तो यूप त्यांनीं अवलोकन केला तेव्हां त्यांना असें वाटलें कीं, आपणांस भ्रम व्हावा ह्याकरतांच देवांनीं आपल्या यज्ञांत अधोमुख यूपाची भेसळ केली. तेव्हां त्यांनीं तो यूप काढून पुन्हा ऊर्ध्वमुख पुरला. त्यामुळें, देवांनीं यज्ञाचें कसें अनुष्ठान केलें हें त्यांस समजलें व ते स्वर्गास गेले.

## आख्यायिका ९.

पूर्वी एकदां देवांच्या अन्नार्थ व यज्ञप्रसंगीं वधार्थ उपयोगी पडण्याचें पशूंनीं नाकारलें. ते देवापासून दूर अंतरावर जाऊन तुम्हांला आतां आम्ही मारण्याकरितां सांपडणार नाहीं, तुम्हांला आतां आम्ही मारण्याकरितां सांपडणार नाहीं असें पुनः पुनः म्हणूं लागले. तेव्हां देवांनीं ह्या यूपाचा वज्राप्रमाणें उपयोग केला. त्यांनीं यूप उभारला. त्याच्यामुळें पशु भ्याले आणि देवाजवळ आले. पूर्वी असा प्रकार घडल्यामुळें अद्यापिहि पशु यूपा-

जवळ असतात. तेव्हांपासून देवांना दही, दूध देण्याचें व यज्ञप्रसंगीं वघार्थ उपयोगी पडण्याचें पशूंनीं कवूल केलें.

## आख्यायिका १०.

देव पशूला वधस्थळीं घेऊन जात असतां त्यानें मूर्तिमंत मृत्यु अवलोकन केला. तेव्हां देवांच्या बरोबर जाण्याचें त्यानें नाकारलें. देव त्यास म्हणाले, तुला आम्हीं स्वर्गाला घेऊन जाऊं. बरें आहे, पण तुमच्यापैकीं एकाला माझ्यापुढें चालूं द्या असें तो देवांना म्हणूं लागला. तें देवांनीं मान्य केलें व अग्नि पशूंच्या पुढें चालूं लागला. तेव्हां पशूही मोठ्या आनंदानें त्याच्या मागोमाग गेला.

## आख्यायिका ११.

देवांनीं पूर्वी एकदा यज्ञ केला. आपण यज्ञविच्छेद करूं असें म्हणून असुर त्या यज्ञ करणाऱ्या देवाजवळ आले. प्रयाजांनीं पशूचें संतर्पण झाल्यावर व पर्याग्नि करणाच्या पूर्वी पूर्वेस यूपाजवळ ते आले. देवांनीं त्यांचा हेतु जाणून आपल्या व यज्ञाच्या रक्षणार्थ पशूच्या भोंवतीं तीन अग्निमय प्राकार रचले. हे ह्यांचे अग्निरूप दैदीप्यमान प्राकार प्रकाश पाडते झाले. ह्या प्राकारांच्या वाटेस न जातां असुरांनीं तेथून पलायन केलें. अग्नीच्याच योगानें देवांनीं पूर्वेकडे व पश्चिमेकडे असुरांना व राक्षसांना पळावयास लावलें.

## आख्यायिका १२.

पूर्वी एकदा यज्ञ, तप, हवन व तीर्थयात्रा करून देवांनीं स्वर्गलोक वश करून घेतला. वपेचें हवन करतांच त्यांस तो लोक व्यक्त झाला. वपेचें हवन करून पुढलीं कर्में त्यांनीं सोडून दिलीं. व तसेंच ते स्वर्गाप्रत गेले. नंतर यज्ञाचें अनुष्ठान समजून घेण्याच्या उद्देशानें मनुष्य व ऋषि देवांच्या यज्ञभूमीवर आले. इकडे तिकडे फिरल्यावर वपारहित असें पशूचें शरीर जेथें पडलें होतें तेथें ते आले. तेव्हां त्यांना असें खास वाटलें कीं, वपा हेंच पशूचें सारभूत अंग आहे.

## आख्यायिका १३.

पूर्वी एके प्रसंगीं प्रजापतीनें स्वतः होतृत्व पतकरलें. तो प्रातरनुवाक् म्हणण्यास उद्युक्त झाला असतां ह्यानें मला उद्देशून आरंभ करावा, अशा प्रकारची अपेक्षा सर्व देवतांनीं केली. तेव्हां प्रजापतीनें असा विचार केला कीं, एकदेवतोद्दिष्ट मन्त्र म्हणून जर मी प्रारंभ केला तर इतर देवतांना राग येईल. म्हणून सर्व देवतांचा उपक्रम एकदम एका ऋचेनें होईल अशी "आपोरेवतीः" ही ऋचा त्यानें शोधून काढिली. आप आणि रेवती ह्या शब्दांनीं सर्व देवता निर्दिष्ट केल्यासारख्या होतात. ह्या ऋचेनें प्रजापतीनें प्रातरनुवाकाचा प्रारंभ केला, त्यामुळें मला उदेशून ह्यानें आरंभ केला असें प्रत्येक देवतेला वाटून त्या सर्वांनाच आनंद झाला.

---

## आख्यायिका १४.

सरस्वतीच्या कांहीं ऋषींनीं एकदां सत्र करण्यास प्रारंभ केला. तेथें इलूष नामक ऋषीचा कवष म्हणून मुलगा होता. हा दासीपुत्र जुगारी व अब्राह्मण आहे, ह्याला आपल्यामध्यें दीक्षा कशी घेतां येईल, असा विचार करून ऋषींनीं त्याला सोमयागांतून घालवून दिला; आणि सरस्वतीचें उदक त्याला न मिळून तान्हेनें तो मरावा ह्या हेतूनें त्यांनीं त्याला निर्जल प्रदेशांत नेऊन सोडलें. अशा त्या जलरहित प्रदेशांत तृष्णेनें व्याकुळ झालेल्या कवषानें 'देवत्रा ब्रह्मणे गातुः' इत्यादि अपोनप्त्रीय सूक्त म्हटलें. त्यामुळें जलाभिमानी देवतांच्या प्रियधामाप्रत तो प्राप्त झाला. तेथें त्याला भरपूर उदक मिळालें, व स्वतः सरस्वती नदीही त्याच्याभोंवतीं धांवत आली. ज्या ठिकाणीं कवष ऋषीला सरस्वती नदीनें परिवेष्टित केलें त्या ठिकाणास अद्यापिही परिसारक ही संज्ञा आहे.

तेव्हां ऋषींनीं विचार केला कीं, ह्या कवषाला प्रत्यक्ष देवही ओळखतात म्हणून आपण आतां ह्याला आपल्या जवळ बोलवूं. त्याप्रमाणें त्यांनीं त्याला बोलाविलें, व बोलाविल्यावर त्यांनीं त्यांचें अपोनप्त्रीयसूक्त म्हटलें. ह्या सूक्ताच्यायोगानें जलदेवतांचें तसेंच अन्यदेवतांचें प्रिय स्थान त्यास प्राप्त झालें.

---

## आख्यायिका १५.

लांब जीभ असलेल्या एका असुरस्त्रीनें देवांच्या सकाळच्या यागांतील सोमरस चाटला. त्यामुळें त्या रसांत अत्यंत माद उत्पन्न झाला, तेव्हां देवांना विचार पडला. ते मित्रावरुणांना म्हणाले, तुम्ही हें बरोबर करा. वरें आहे; पण आम्ही एक वर मागतों असें ते म्हणाले. मागा असें म्हटल्यावर प्रातःसवनांतील दह्याचा भाग त्यांनीं आपल्याकरितां मागून घेतला. तें हें दहीं त्यांना निरंतर मिळतें. कारण तें त्यांनीं वरानें मागून घेतलें आहे. असुरस्त्रीच्या अवलेहनानें जें वित्तम ( कडक ) झालें होतें तें आतां बरोबर झालें. बिघडलेल्या सोमांतील दोष मित्रावरुणांनीं दह्याच्या-योगानें काढून टाकला.

## आख्यायिका १६.

पूर्वी एकदा प्रथम सोमरस कोणी प्यावा ह्याविषयीं देवांमध्यें ऐक्यमत्य राहिलें नाहीं. मला प्रथम पिण्यास मिळावा असें सर्वांस वाटूं लागलें. तेव्हां त्यांनीं आपसांत असें ठरविलें कीं, धावण्याच्या शर्यतींत आपणांपैकीं जो सर्वांत पुढें जाईल त्याला एकट्यालाच सोमाचा रस प्रथम पिण्याचा मान मिळेल. हा विचार सर्वांस मान्य झाला, व नेमलेल्या हद्दीपर्यंत धावून जाण्यास त्यांनीं आरंभ केला. त्या सर्वांच्यापुढें वायु गेला; त्याच्या मागून इन्द्र, नंतर मित्रावरुण व मग अश्विनी गेले.

वायु सर्वांच्या पुढें जाणार हें इन्द्रानें अगोदर जाणलें. तेव्हां तो वायूच्या पाठोपाठ सपाट्यानें धांवत जाऊन त्यास म्हणूं लागला कीं, तूं अर्धें सोमपान कर, मी अर्धें करीन आणि आपण दोघे सारखाच जय मिळवूं. वायूनें ही गोष्ट नाकारली व मी एकटाच विजयी होईन असें म्हणूं लागला. ह्यावर इन्द्रानें असें बोलणें लावलें कीं, सोमपानांत माझा तिसरा भाग व तुझे दोन भाग अशा अटीवर आपण बरोबरच जय मिळवूं. वायूनें हेही साफ नाकबूल केलें व मी एकटाच विजयी होईन असें म्हणूं लागला. ह्यानंतर इन्द्राचें माझा एक भाग व तुझे तीन भाग अशा अटी-वर आपण दोघे सारखेच विजयी होऊं हें म्हणणें वायूनें कबूल केलें व इन्द्राला चौथा भाग दिला.

ह्याप्रमाणें इन्द्र व वायू हे दोघे नेमलेल्या ठिकाणीं बरोबर जाऊन पोचले. त्यांच्या पाठीमागून मित्रावरुण गेले व त्यांच्यानंतर अश्विनी जाऊन पोचले. अशा अनुक्रमानेंच यज्ञांत इन्द्र, वायु, मित्रावरुण आणि अश्विनी सोमपान करतात.

## आख्यायिका १७.

पूर्वकालीं एकदा असें घडलें कीं, देवांनीं यज्ञांत जें जें केलें तें तें सर्व असुरांनींही केलें. त्यामुळें ते दोघे समानवीर्य झाले. त्यांच्यांतलें न्यूनाधिक्य नाहींसें झालें. त्या वेळेस देवांना तूष्णींशंस नांवाचें शस्त्र सुचलें. पण असुरांनीं ह्याचा समज न पडल्यामुळें त्यांनीं त्याचें अनुष्ठान केलें नाहीं. हें शस्त्र म्हणजे ऋक्समूह मनांत म्हणावयाचें म्हणून त्यास तूष्णींशंस म्हणतात.

ज्या ज्या वज्राचा देव उपयोग करीत त्या प्रत्येकाचा असुरांनीं प्रतिकार केला. तेव्हां देवांनीं ह्या तूष्णींशंस शस्त्ररूपी वज्राचा उपयोग केला. ह्याचा प्रतिकार असुरांना करतां येईना; ह्या शस्त्रानें देवांनीं असुरांना मारलें व त्यांचा पराभव केला.

## आख्यायिका १८.

पूर्वी प्रजापतीनें देवामध्यें यज्ञाची आणि छंदाची वांटणी केली. अग्नीला आणि वसूंना त्यानें प्रातःसवनांतील गायत्री दिली. मध्यंदिन सवनांतील त्रिष्टुप् छंदाची वांटणी त्यानें इन्द्र आणि रुद्र ह्यांच्यांत केली. आणि तृतीय सवनांत जगतीला विश्वदेव व आदित्य ह्यांच्या वांटणीस घातलें.

प्रजापतीचा स्वतःचा जो अनुष्टुप छंद त्या अनुष्टुप् छंदाला त्यानें यज्ञाच्या शेवटीं अच्छावाकीय ऋक्कडे सोडून दिलें. तेव्हां ती अनुष्टुप् प्रजापतीला म्हणाली, मी तुझा मूळचाच छंद असून तूं मला आपल्यापासून दूर केलेंस ह्यावरून तूं सर्व देवांत अत्यंत पापी आहेस. अनुष्टुभेचा हेतु प्रजापतीनें जाणला आणि तिचा दोषारोप राहूं नये म्हणून त्यानें आपला सोमयाग केला. त्या सोमयागांत त्यानें अनुष्टुप छंदाला प्रथम स्थानापन्न केलें. तेव्हापासून अनुष्टुप छंदाचा उपयोग सर्व सवनांत प्रथमतः केला जातो.

## आख्यायिका १९.

एकदां अग्नीनें देवांचें होतृत्व पतकरलें होतें. परंतु बहिष्य व मानस्तोत्र म्हटल्यावर मृत्यु त्याच्याजवळ प्राप्त झाला. तेव्हां अनुष्टुप् छन्दांत आज्यशस्त्र म्हणून त्यानें मृत्यूचें अतिक्रमण केलें. आज्यशस्त्र संपूर्ण होतांच पुन्हा मृत्यु त्याच्याकडे आला. त्यावेळीं प्रउगशस्त्र म्हणण्यास आरंभ करून त्यानें मृत्यूचा परिहार केला.

पुढें माध्यंदिन स्तोत्र म्हणतांच मृत्यु प्राप्त झाला. तेव्हां अनुष्टुप् छन्दांत मरुत्वतीय शस्त्र म्हणून अग्नीनें त्याचें निराकारण केलें. हें शस्त्र पूर्ण झाल्यावर बृहती छन्दस्क ऋचा म्हणण्यास अग्नीनें प्रारंभ केला, तेव्हां मृत्यु त्याच्यापाशीं जाण्यास समर्थ झाला नाहीं. कारण बृहती म्हणजे प्राण-स्वरूपच आहेत.

तृतीय पवन स्तोत्र म्हणून झाल्यावर मृत्यु पुन्हा अग्नीकडे आला. त्या-वेळीं अनुष्टुप् छन्दांत वैश्वदेवाख्यशस्त्र म्हणून मृत्यूचा परिहार केला.

नंतर यज्ञायज्ञीयस्तोत्र संपल्यावर मृत्यु अग्निसन्निध आला. तेव्हां अग्नीनें वैश्वानरीय सूक्तानें मरुत्वतीयशस्त्र म्हणण्यास प्रारंभ केला व मृत्यूचें निवारण केलें. कारण वैश्वानरीयसूक्त म्हणजे वज्रच होय व यज्ञायज्ञीय स्तोत्र ही यज्ञाची प्रतिष्ठा होय. म्हणून सूक्तरूप वज्रानेंच यज्ञसमाप्तीपर्यंत अग्नीनें मृत्यूचें निवारण केलें. अग्नीनें मृत्यूच्या सर्व पाशांपासून व आयुध-रूपी काष्ठांपासून आपली मुक्तता करून घेतली. मानवांमध्यें अग्नीचें जो अनु-करण करील त्याचीही त्याच्याप्रमाणेंच मृत्यूपासून सुटका होईल.

---

## आख्यायिका २०.

एकदा इन्द्रानें वृत्रनामक दैत्याला मारलें. परंतु तो मेला नाहीं अशा समजुतीनें इन्द्र दूर पळाला. तेथेंही त्याची भीति न गेल्यामुळें तो तेथून आणखी लांब गेला. तो वाक्स्वरूपी अनुष्टुप्मध्यें प्रविष्ट होऊन तेथेंच शयन करता झाला. तेव्हां सर्व भूतांनीं मिळून निरनिराळ्या दिशेस त्याचा शोध चालविला. शेवटीं यज्ञाच्या आदले दिवशीं पितरांनीं व दुसरे दिवशीं देवांनीं त्यास गांठलें. ह्या कारणास्तव अमावास्येस पितृयज्ञ व प्रतिपदेस देवयज्ञ करतात.

इन्द्राची गांठ पडल्यावर ते देव आपसांत म्हणूं लागले कीं, आपण सोमरस काढूं म्हणजे हा इन्द्र अगदीं त्वरित आपणाकडे येईल. हा विचार सर्वांस मान्य होऊन त्याप्रमाणें ते करूं लागले. देवांनीं "आत्वारथ" हा मन्त्र म्हणतांच इन्द्र अनुष्टुप् सोडून अभिषवाच्या ठिकाणीं आला. "इदं वसोसुतमन्ध" हीं ऋचा म्हणतांच तो प्रगट झाला, आणि "इन्द्र नेदीय एदिहि" हीं ऋचा म्हटल्याबरोबर तो यज्ञाच्या मध्यभागीं येऊन उभा राहिला.

---

## आख्यायिका २१.

इन्द्रानें वृत्राला मारलें; परंतु तो मेला नाहीं असें मानून सर्व देवतांनीं इन्द्राचा परित्याग केला. तथापि निद्रेंत देखील जागृत असणारे मरुत् ह्यांनीं मात्र त्याला सोडलें नाहीं. प्राण हेच निद्रेंत जागृत असणारे मरुत् होत. म्हणून प्राणांनींच इन्द्राला सोडलें नाहीं असें म्हणावयाचें. ह्यामुळें प्रत्येक मरुत्वतीय शस्त्रांत इन्द्राची प्रशस्ति असतेच असते.

---

## आख्यायिका २२.

वृत्राला मारण्यास प्रवृत्त झालेला इन्द्र सर्व देवतांना म्हणाला, मला तुम्ही मनापासून पाठिंबा द्या व माझ्या उपयोगीं पडा. तेव्हां त्या सर्व देवता होय म्हणून वृत्राला मारण्याच्या हेतूनें धांवत आल्या. ह्या आपणांस मारण्याकरितां येत आहेत हें वृत्राला समजलें. तेव्हां आपण ह्यांना भेवडावूं असा विचार करून त्यानें त्यांच्यावर श्वास सोडला. त्या श्वासानें भिऊन जाऊन सर्व देव पळत सुटले, मरुतांनीं मात्र इन्द्राला सोडलें नाहीं. महाराज मारा, पराक्रम करा असें म्हणून त्यांनीं इन्द्राला धीर दिला.

एका ऋषीनें देवांना पळतांना पाहून इन्द्रास म्हटलें, मित्र म्हणून ज्यांना तूं समजत होतास ते सर्व वृत्राच्या श्वासाला भिऊन तुला सोडून गेले. म्हणून ह्या मरुतांबरोबर तुझें सख्य असो. त्यांच्या योगानें वृत्राच्या सर्व सेनेचा तूं पराभव करूं शकशील.

नंतर इन्द्रानें विचार केला हे मरुत् माझे मित्र खरे, ह्यांनीं मला सोडलें नाहीं. म्हणून माध्यंदिनगतशस्त्रांत ह्यांना वांटेकरी करावें. त्याप्रमाणें त्यानें

मरुतांस त्या शस्त्रांत भाग दिला. ह्याच्या पूर्वी माध्यंदिन सेवनांत केवळ इन्द्रदेवताक शस्त्रें होतीं.

——

## आख्यायिका २३.

इन्द्रानें वृत्राला मारून सर्व भूमि जिंकली. नंतर तो प्रजापतीला म्हणाला, जो तूं आहेस तोच मी होऊंदे. म्हणजे सर्व भूतांमध्यें मला श्रेष्ठ होऊंदे. त्यावर प्रजापतीनें उत्तर दिलें, तूं सर्वांत श्रेष्ठ झाल्यावर मी कोण (सं. कः) असणार. तेव्हां इन्द्र त्यास म्हणाला, तूं आपल्याला उद्देशून आतां जो शब्द वापरलास तोच तूं हो. म्हणून तेव्हांपासून प्रजापति कः ह्या नामानें प्रसिद्ध झाला, व इन्द्र महान् झाला म्हणून त्यास महेन्द्र अन्वर्थक म्हणूं लागले.

इन्द्र महान् झाल्यानंतर देवतांना म्हणूं लागला माझा विशेष सत्कार करण्याकरितां यज्ञांत तुम्हीं मला निराळा भाग द्या. हल्लींसुद्धां जो सर्वांत श्रेष्ठ बनतो त्याची अशीच इच्छा असते. तेव्हां देव म्हणाले, तुला जें इष्ट असेल तें तूं स्वतःच सांग. त्यावरोबर इंद्रानें महेंद्र पात्र माध्यंदिन सवन, निष्केवल्य शस्त्र, त्रिष्टुप् छंद आणि पृष्ठस्तोत्र ही आपणाकरितां स्वतंत्र मागून घेतलीं व त्याप्रमाणें त्यास तीं प्राप्त झालीं.

असें झालें तेव्हां इतर देव इंद्राला म्हणूं लागले, तूं सर्वच भाग उचललास; आमचा थोडा तरी भाग ह्यांत राहूं दे; परंतु इंद्रानें ही देवांची विनंति नाकारिली. आमचा भाग असूंदेच म्हणून पुन्हा देवांनीं इंद्राची प्रार्थना केली. तेव्हां इंद्रानें देवाकडे फक्त अनुग्रहदृष्टीनें पाहिलें.

इंद्राचा अभिप्राय न समजून देव परस्परांत बोलूं लागले कीं, इंद्राची मध्यम जातीय (वावाता) परंतु प्रिय स्त्री प्रासहा येथें आहे, करतां तिच्याकडे जाऊन इंद्राचा अभिप्राय काय आहे तो आपण समजून घेऊं. हा विचार सर्वांस पसंत पडतांच तिच्याकडे जाऊन त्यांनीं आपली इच्छा प्रदर्शित केली. तेव्हां ती त्यांस म्हणाली तुम्हीं सकाळीं या, त्या वेळीं मी तुमच्या प्रश्नाचें उत्तर देईन. हल्लींसुद्धां स्त्रिया आपणास कळावयास पाहिजे असेल तें सर्व पतीपासून रात्रीं काढून घेतात. ठरल्याप्रमाणें देव तिच्याकडे सकाळीं गेले. तेव्हां ती त्यांना म्हणाली, तुम्हांला पाहिजे होतें

तें इंद्रानें केलें आहे. हें उत्तर ऐकून देव आपसांत म्हणूं लागले कीं, "वाहवा ताईनें आपणावर उपकार केले आहेत; करितां तिचाही भाग ह्या निष्केवल्य शस्त्रांत असावा" असें म्हणून त्यांनीं त्याप्रमाणें केलें.

## आख्यायिका २४.

पूर्वी ऋक् आणि साम अगदीं भिन्न होतीं. ऋक् सा ह्या नांवानें प्रसिद्ध होती व अम ह्या नांवानें साम प्रसिद्ध होते. ऋक् सामाकडे येऊन म्हणूं लागली, 'प्रजोत्पादनार्थ आपला संयोग व्हावा.' 'माझा महिमा तुझ्यापेक्षां अधिक आहे' असें म्हणून सामानें तिची विनंति अमान्य केली. तेव्हां दोन ऋचा सामाकडे आल्या; तरीसुद्धां साम त्यांच्याजवळ बोलेना. नंतर तीन ऋचा आल्या, त्यांच्याबरोबर सामानें संयोग केला. असा हा तीन ऋचांशीं संयोग झाल्यामुळें साम गाणारे यशांत तीन ऋचांवर साम म्हणतात. एका सामाचा तीन ऋचांशीं संबंध झाल्याकारणानें एका पुरुषाच्या पुष्कळ नायका असूं शकतात; पण एका स्त्रीला एकाच वेळीं पुष्कळ पति असूं शकत नाहींत. सा आणि अम हीं एक झाल्यामुळें साम हें नांव त्या मिथुनास प्राप्त झालें.

## आख्यायिका २५.

पूर्वी सोम राजा स्वर्गलोकीं होता. म्हणून आपणास त्याची प्राप्ति कशी होईल ह्याविषयीं देव आणि ऋषि विचार करूं लागले. विचार करून गायत्र्यादिच्छन्दांना ते म्हणाले, 'तुम्ही आमच्याकरितां सोमराजाला इकडे घेऊन या.' 'होय, आणतों' असें म्हणून छन्दांनीं पक्ष्याचें स्वरूप धारण केलें व ते स्वर्गाप्रत चालते झाले. सुपर्ण ( पक्षी ) होऊन छन्द चालते झाले. म्हणून पौराणिक ह्यास सौपर्णिकाख्यान असें म्हणतात.

सोमराजाच्या प्राप्त्यर्थ छन्द निघाले. त्यावेळेस चार अक्षरांचेच छन्द होते. त्यापैकीं चतुरक्षरा जगती प्रथम निघाली, परंतु अर्ध्या मार्गावर गेल्यावर थकून जाऊन तिनें तीन अक्षरें टाकून दिलीं. एकाक्षरा होऊनच ती पुढें गेली. त्यामुळें तेथें गेल्यावर सोमाला घेऊन येणें तिला होईना. तेव्हां तेथील सोमयागसंबंधीं दीक्षा व क्षीरपानादिरूप तप हीं घेऊन ती परत फिरली.

जगतीच्या मागून त्रिष्टुप् निघाली ती पडत पडत जात होती. पण अर्ध्या रस्त्यावर गेल्यावर अगदीं थकली. तेव्हां एक अक्षर तिनें तेथें सोडलें व त्र्यक्षरा होऊन ती भूलोकीं जाऊन पोचली. तेथील 'दक्षिणा' घेऊन ती माघारी फिरली.

नंतर देव गायत्रीला म्हणाले 'तूं सोम राजाला घेऊन ये.' 'होय आणतें' असें ती म्हणाली; पण माझ्याकरितां तुम्हीं स्वस्त्ययन मन्त्र म्हणा असें तिनें देवांस सांगून ठेवलें व देवांनीं त्याप्रमाणें मन्त्र म्हटले. गायत्री निघाली ती सोमाप्रत प्राप्त झाली, व सोमरक्षकांना तिनें भिववून दूर घालविले व नंतर पायांनीं आणि मुखानें सोमराजाला तिनें घेतलें. एवढेंच नव्हे, तर इतर छन्दांनीं जीं चार अक्षरें टाकलीं होतीं तींहीं घेऊन ती परत फिरली.

गायत्री परत आल्यावर तिला त्रिष्टुप् व जगती म्हणूं लागल्या, 'तुला प्राप्त झालेलीं अक्षरें आमचीं आहेत करितां तीं आमचीं आम्हाला मिळावीं.' परंतु गायत्रीनें ही गोष्ट साफ नाकारली. 'ज्याला जें मिळालें तें त्याचें समजावयाचें' असें तिचें म्हणणें पडलें. म्हणून त्या दोन शब्दांनीं देवांकडे जाऊन त्यांस ह्या प्रश्नाचा निर्णय करण्यास सांगितलें. देवांनींही 'तुमच्यापैकीं जिला जें मिळालें असेल तें तिचें' असाच निकाल दिला. त्यामुळें सांप्रतही 'ज्याला जी वस्तु सांपडेल ती त्याच्याच मालकीची' असें न्यायपंडित सांगतात. एव्हांपासून गायत्री आठ अक्षरांची, त्रिष्टुप् तीन अक्षरांची व जगती एक अक्षराची झाली.

अष्टाक्षरा गायत्री प्रातःसवनयज्ञ तडीस नेती झाली. परंतु तीन अक्षरांच्या त्रिष्टुप् च्छंदाकडून माध्यंदिन सवन तडीस जाईना. तेव्हां गायत्री तिला म्हणाली 'तूं मला ह्या यज्ञांत भाग देशील तर मी तुला साहाय्य करीन.' ही गोष्ट त्रिष्टुप्नें मान्य केली व 'तूं आपल्या आठी अक्षरांनीं माझ्यांत प्रवेश कर' असें ती गायत्रीस म्हणाली; गायत्रीनें होय म्हटलें. गायत्रीच्या प्रवेशामुळें अकरा अक्षरांची झालेली जी त्रिष्टुप् तिला नंतर माध्यंदिन सवन तडीस नेतां आलें.

त्याचप्रमाणें तृतीय सवन पार पाडण्यास एकाक्षरा जगती असमर्थ झाली. तिला गायत्री म्हणाली 'माझा भाग ह्या सवनांत राहील तर मी

तुझ्या साहाय्यार्थ येतें.' 'हें मला मान्य आहे, तूं आपल्या अकरा अक्षरांसह माझ्यांत प्रवेश कर' असें ती गायत्रीला म्हणाली. गायत्रीनें त्याप्रमाणें केलें, त्यामुळें बारा अक्षरांची झालेली जी जगती तिला तृतीय सवनाचें कृत्य शेवटास नेतां आलें. तेव्हांपासून गायत्री आठ अक्षरांची, त्रिष्टुप् अकरा अक्षरांची व जगती बारा अक्षरांची झाली.

## आख्यायिका २६.

ऋभुनामक देवांनीं तप करून सोमपानाचा हक्क संपादन केला. तेव्हां प्रातःसवन यागांत ह्यांना सोमपान मिळावें अशी प्रजापतीनें इच्छा प्रदर्शित केली. परंतु अग्नीनें आपल्या वसुनामक अनुयायांच्या मदतीनें प्रातःसवनांतून ऋभूंस हाकलून लावलें. त्यामुळें माध्यंदिन सवनांत त्यांच्या सोमपानाची योजना प्रजापतीनें केली. पण तेथेंही इन्द्रानें रुद्रांच्या सहाय्यानें त्यांचा शिरकाव होऊं दिला नाहीं. नंतर तृतीय सवनांत ऋभूंस सोमपान मिळावें म्हणून प्रजापतीनें मनांत आणलें; पण विश्वेदेवांनीं तेथेंही त्यांचें निराकारण केलें. 'ह्या ठिकाणीं ते पिणार नाहींत' 'येथें ते पिणार नाहींत' असें म्हणूं लागले. तेव्हां सवित्याला प्रजापति म्हणाला, 'हे ऋभु तुझे शिष्य आहेत. तूं ह्यांच्यासह सोमपान कर.' हें सवित्यानें मान्य केलें. मग प्रजापतीला तो म्हणाला, 'तूंही ह्यांच्या दोनही बाजूस उभा राहून पान कर;' त्याप्रमाणें प्रजापतीनें केलें. त्याबरोबर अग्नि, वसु आदिकरून देव ह्या मनुष्याचा गंधसुद्धां नको असें म्हणून दूर गेले व त्यांची निर्भत्सना करूं लागले.

## आख्यायिका २७.

प्रजापतीची कामवासना एकदां आपल्या मुलीवर गेली. तेव्हां ही मुलगी कोण समजावयाची ह्याबद्दल ऋषींमध्यें मतभेद पडला. कांहीं म्हणूं लागले प्रजापतीची मुलगी म्हणजे द्युलोक होय. दुसऱ्यांचा अभिप्राय पडला कीं ती उषा होय. प्रजापतीनें मृगाचें रूप धारण करून ऋतुमती झालेल्या आपल्या मुलीबरोबर मैथुनक्रिया केली. तेव्हां प्रजापतीनें करूं नये तें केलें असें सर्व देव म्हणूं लागले, व ह्याला कोण शिक्षा करील ह्याची चौकशी करूं लागले. परंतु प्रजापतीला शासन करणारा त्यांस त्यांच्यांत कोणी मिळेना. म्हणून त्यांनीं त्यांच्यामध्यें जीं उग्र शरीरें होतीं तीं सर्व एकत्र करून त्यांचें एक

शरीर बनविलें. तोच हा ( रुद्र ) देव होय. ह्या कारणास्तव रुद्राला 'भूत-शब्दानें युक्त' असें नांव प्राप्त झालें.

नंतर त्याला देवांनीं सांगितलें 'प्रजापतीनें करूं नये तें कर्म केलें आहे, करतां तूं त्याला बाणांनीं प्रहार कर.' 'करतों, पण तुमच्याजवळ मी वर मागतों' असें रुद्र म्हणाला. 'माग,' असें म्हटल्यावर 'पशूंचें आधिपत्य माझ्याकडे असावें' असा त्यानें वर मागितला. म्हणून रुद्राला 'पशु शब्दानें युक्त' असें नांव प्राप्त झालें.

पुढें रुद्रानें धनुष्याची दोरी ओढून प्रजापतीस विद्ध केलें. विद्ध झालेला तो प्रजापति ऊर्ध्वमुख होऊन पडला. अशा रीतीनें पडलेल्या मृगरूप प्रजापतीला आकाशांत पाहून लोक त्यास 'मृग' असें म्हणतात. मृगघाती रुद्राला 'व्याध' म्हणतात. रक्तवर्ण प्रजापति कन्येला 'रोहिणी' म्हणतात, व ज्या बाणानें प्रजापतीला रुद्रानें विद्ध केलें त्याला 'त्रिकाण्डबाण' म्हणतात.

मृगरूप प्रजापतीनें आपल्या कन्येच्या ठिकाणीं जें रेत सिंचन केलें तें चोहीकडे धावूं लागलें. सखल प्रदेश मिळाल्याबरोबर त्याची एक नदीच झाली. तेव्हां देव म्हणाले कीं, 'प्रजापतीचें रेत दोषयुक्त न होवो.' देवांनीं असें म्हटल्यामुळें त्या रेताला 'मादुष' ही संज्ञा प्राप्त झाली. वस्तुतः मादुष असा शब्द असतां वर्णव्यत्यय करून परोक्षप्रिय असणारे देव 'मानुष' असें म्हणूं लागले.

---

## आख्यायिका २८.

वर सांगितलेलें जें प्रजापतीचें रेत तें अग्नीकडून देवांनीं परिवेष्टित करविलें, नंतर मरुतांनीं त्यांत वायुसंचार करविला. तथापि अग्नीच्यानें त्या रेताचें रूपांतर होईना, त्यामुळें वैश्वानरसंज्ञक अग्नीनें त्या रेताभोंवतीं परिवेष्टन केलें, व मरुतांनीं तें संचलित केलें. त्या बरोबर तें रेत पिंडाकार बनलें. प्रथमच जो उद्दिष्ट पिंड बनला तो 'आदित्य' झाला. दुसरा पिंड भृगु झाला. भृगूचा वरुणानें पुत्रत्वानें स्वीकार केला. म्हणून त्याला 'वारुणि' असें म्हणूं लागले. तिसरा पिंड बनला त्यापासून अदितिपुत्रांची उत्पत्ति झाली. जे रेतपिंड दग्ध होऊन निखारे बनले होते, ते सर्व अङ्गिरसनामक ऋषि झाले. जे झगझगीत विस्तवासारखे होते ते सर्व बृहस्पति झाले.

विझलेल्या निखाऱ्यांत जे काळे कोळसे बनले होते ते काळे पशू झाले. विस्तवामुळें, तांबडा झालेला जो जमिनीचा भाग त्यापासून तांबड्या पशूंची उत्पत्ति झाली.

## आख्यायिका २९.

असुरांबरोबर युद्ध आरंभलें; परंतु त्यांच्याबरोबर जाण्याचें अग्नीनें नाकारलें. तेव्हां देव त्याला म्हणाले, 'तूं आमच्यापैकीं एक आहेस, तुला आलेंच पाहिजे.' 'मला उद्देशून स्तुति केल्यावांचून मी येणार नाहीं. करितां तुम्हीं माझें स्तवन करा' असें अग्नीनें उत्तर दिलें. देवांनीं हें म्हणणें मान्य केलें, व तावडतोब उठून अग्नीसमोर उभे राहून त्यांनीं त्याचें स्तवन केलें. त्याबरोबर अग्नि देवांबरोबर जाता झाला.

अग्नीनें आपल्याबरोबर तीन टोळ्या घेतल्या, व तीन रांगा करून विजयार्थ तो असुरांवर धांवून गेला. गायत्री, त्रिष्टुप् आणि जगती हे छंदच त्या तीन रांगा होत; आणि प्रातःसवन, माध्यंदिन व तृतीयसवन ह्या त्या तीन टोळ्या होत. अटकळीच्या बाहेर अग्नीनें असुरांचा पराभव केला. देवांचा विजय झाला व असुर पराभव पावले.

## आख्यायिका ३०.

असुरांबरोबरच्या युद्धांत विजयी झालेले देव स्वर्गाप्रत गेले; परंतु अग्नीनें जागच्या जागीं राहून स्वर्गाला स्पर्श करून तेथील प्रांत व्यापून टाकला. त्यानें स्वर्गलोकचें द्वार बंद केलें. कारण अग्नि हा स्वर्गलोकचा अधिपति आहे. त्याच्याकडे प्रथम वसु येऊन म्हणाले, 'आम्हांला स्वर्गप्राप्ति करून दे. आम्हांस स्वर्गांत जाण्याची संधि दे.' 'माझी स्तुति केल्याशिवाय मी हें स्वर्गद्वार खुलें करणार नाहीं, करतां माझें तुम्हीं स्तवन करा' असें अग्नीनें उत्तर दिलें. वसूंनीं ही गोष्ट मान्य केली व त्रिवृन्नामक स्तोत्रानें त्यांनीं अग्नीचें स्तवन केलें. ह्याप्रमाणें स्तवन केल्यानंतर अग्नीनें त्यांना स्वर्गद्वार मोकळें करून दिलें व नंतर ते वसु आपापल्या स्थानीं गेले.

नंतर रुद्र, मग आदित्य आणि पाठीमागून विश्वेदेव अग्नीकडे येऊन म्हणूं लागले कीं, 'आम्हांला स्वर्गप्राप्ति करून दे.' 'माझें स्तवन केल्यावांचून

मी स्वर्गद्वार सोडणार नाहीं, म्हणून माझी स्तुति करा' असें अग्नि त्यांस म्हणाला. तें मान्य करून त्यांनीं त्याची अनुक्रमें पंचदश, सप्तदश व एकविंश स्तोमानें स्तुति केली. तेव्हां अग्नीनें स्वर्गाचें द्वार मोकळें केलें आणि सर्व आपापल्या स्थानीं गेले.

---

## आख्यायिका ३१.

प्रजापतीनें आपली म्हणून मानलेली कन्या 'सूर्या सावित्री' हिला सोमराजाला दिली, त्यावेळीं तिला वरण्याकरितां सर्व देव वर होऊन आले होते. तेव्हां प्रजापतीनें त्यांच्यापुढें सहस्र ऋचात्मक आश्विनशस्त्र हरिद्रादि मंगल द्रव्यांच्या ऐवजीं ठेवलें.

त्या शस्त्राबद्दल देवांमध्यें वाद उत्पन्न झाला. 'हें मला मिळो,' 'हें मला मिळो' असें प्रत्येकजण म्हणूं लागला. तेव्हां ह्याची तोड काढावी म्हणून त्यांनीं असा विचार केला कीं, 'धांवण्याच्या शर्यतींत जो बाकीच्यांस जिंकील त्याला हें शस्त्र मिळावें.' गार्हपत्य अग्नीपासून आदित्यापर्यंत धांवत जाण्याचें त्यांनीं ठरविलें.

धांवण्याच्या शर्यतींत त्या निरनिराळ्या दिशांनीं धांवणाऱ्या देवांत अग्नि प्रथम मुखाप्रमाणें पुढें निघाला, त्याच्यामागून अश्विनी गेले. ते अग्नीला म्हणाले 'तूं दूर हो.' 'आपण दोघे हें शस्त्र जिंकूं, माझा ह्यांत भाग असो' असें म्हणून अग्नीनें तें मान्य केलें; व अग्नीचें म्हणणें अश्विनींनाही मान्य झालें म्हणून आश्विन शस्त्रांत, होता अग्निदेवताक ऋचा म्हणत असतो.

धांवतां धांवतां अश्विनी उषसेच्या मागें राहिले. तेव्हां ते तिला म्हणाले, 'तूं मागें रहा आपण दोघेही तें शस्त्र जिंकूं.' 'माझा त्यांत भाग असूंदे' असें म्हणून तिनें तें म्हणणें मान्य केलें, व अश्विनींनाही तिचें म्हणणें कबूल झालें. एवढ्याकरतां आश्विन शस्त्रांत उषसेला उद्देशून ऋचा म्हणतात.

नंतर इन्द्र अश्विनींच्या पुढें गेला. तेव्हां अश्विनी त्यास म्हणाले, 'हे मघवन्, आपण दोघे हें शस्त्र जिंकूं.' इन्द्राला एकीकडे हो असें म्हणण्याची त्यांची छाती झाली नाहीं. त्यावर 'होय माझा या शस्त्रांत भाग असो' असें इन्द्रानें म्हटलें, व तें अश्विनींनीं मान्य केलें. म्हणून आश्विन शस्त्रांत इन्द्रदेवताक ऋचा म्हणाव्या लागतात.

अशा रीतीनें अश्विनींना जय प्राप्त झाला, व त्यांना तें शस्त्र प्राप्त झालें. म्हणून त्या शस्त्रास आश्विन शस्त्र हें नांव प्राप्त झालें.

शर्यतींत अग्नीच्या रथाला खेंचरें जोडलीं होतीं. त्यांना पळवितांना अग्नीनें त्यांची योनि दग्ध केली. त्यामुळें त्यांच्यापासून अपत्योत्पादन होत नाहीं.

उषसेच्या रथाला लालसर बैल जोडले होते. ह्या कारणास्तव सांप्रतहि पहाट होऊं लागली म्हणजे तिचें स्वरूप आरक्तवर्ण दिसतें.

इन्द्राच्या रथाला घोडे लावलेले होते. म्हणून शब्दयुक्त उच्चस्वर हें क्षत्रियांचें स्वरूप होय. कारण हा उच्चस्वर इन्द्राचा होता.

अश्विनींनीं गर्दभयुक्त रथानें शर्यत जिंकली व शस्त्र मिळविलें. शर्यत अश्विनींनीं जिंकली व शस्त्र मिळविलें ह्यामुळें ( फार श्रम झाल्यामुळें ) गर्दभ हा मंदगति व रूक्ष प्राणि झाला. हल्लींसुद्धां सर्व वाहनांत तो अत्यंत वेगरहित प्राणि दिसतो. तथापि ह्याच्या रेतांचें वीर्य अश्विनींनीं हरण केलें नाहीं. त्या कारणानें तें जनावर द्विरेत ( खेचर व गर्दभ उत्पन्न करण्यास समर्थ ) राहिलें आहे.

---

## आख्यायिका ३२.

पूर्वी एकदां हे दोन लोक ( भू आणि स्वर्ग ) एकत्रच होते. पुढें त्यांची फाटाफूट झाली तेव्हां पाऊस पडेनासा झाला; सूर्यप्रकाश बंद झाला; ( देव मनुष्यादि ) पांचही प्रकारच्या जनांचें ज्ञान नष्ट झालें. तेव्हां देवांनीं दोनही लोकांचा समागम पूर्ववत् करून दिला. देवांच्या विवाहपद्धतीनें ह्या संयोग पावलेल्या लोकांनीं विवाह केला. रथंतर सामाच्यायोगानें ही भूमि द्यु लोकाला प्रसन्न करते, व बृहत्सामानें द्यु लोक हिची प्रीति संपादन करितो. नौधस सामानें पृथ्वि द्यु लोकाला प्रसन्न करते, तर शैत सामानें तो लोक हिला प्रसन्न करतो. अग्निजन्य धूमानें ही भूमि द्यु लोकांची प्रीति संपादन करिते तर द्यु लोक वृष्टीच्या योगानें भूमीला प्रसन्न ठेवतो. भूमीनें देवयजनप्रदेश स्वर्गलोकीं ठेवला तर द्यु लोकानें भूमीवर पशू ठेवले. चन्द्रावर जो काळा डाग दिसतो तोच हा देवयजनप्रदेश होय.

## आख्यायिका ३३.

स्वर्ग लोकाच्या प्राप्तीकरितां आंगिरस महर्षींनीं एकदां सत्र करण्यास आरंभ केला, परंतु षडहाच्या दुसऱ्या दिवसाच्या कृत्यापर्यंत ते आले कीं त्यांची पुन्हां पुन्हां चूक होई. तेव्हां 'शार्यात' नामक कोणी एका मानवानें त्यांस दुसऱ्या दिवसांकरितां हें सूक्त सांगितलें. त्यामुळें त्यांस यज्ञ तडीस नेतां आला व ते स्वर्गास गेले.

---

## आख्यायिका ३४.

तिसऱ्या दिवसाचें अनुष्ठान पुरें झाल्यावर देव स्वर्गास गेले. तेथें त्यांचा प्रवेश होऊं नये म्हणून असुर व राक्षस त्यांचें निवारण करूं लागले. तेव्हां देवांनीं 'तुम्हीं विरुद्ध रूपधारी व्हा' असा शाप असुरांस व राक्षसांस दिला, व आपण आपल्या मूळच्या स्वरूपानें स्वर्गाप्रत जाते झाले. तथापि ह्या देवशापामुळें कुरूप झालेले ते असुर व राक्षस तसेच देवांच्या पाठोपाठ जाऊं लागले, व पुढें ते दूर अंतरावर उभे न राहतां देवांत जाऊन मिसळले. तेव्हां सर्व देवांनीं घोड्याचें रूप धारण करून पाठीमागें उभे असलेल्या असुर राक्षसांना पायांनीं ताडण केलें. ह्यावरून लोकांमध्येंसुद्धां, चतुष्पाद जनावरांत जे पादताडनांत कुशल असतील त्यांस अश्व ही संज्ञा देत असतात.

---

## आख्यायिका ३५.

ह्या लोकांत देवासुरांचें युद्ध झालें. त्यांत सहाव्या दिवशीं देवांनीं असुरांना ह्या लोकांतून हाकून लावलें. पुढें हत्तिवरून नेण्याइतकी आपली संपत्ति घेऊन असुर समुद्रकाठीं गेले व त्या समुद्रांत त्यांनीं ती टाकून दिली. नंतर पारुच्छेपीयछन्दाचें अनुष्ठान करून देव त्यांच्या पाठोपाठ गेले. आणि पारुच्छेपीय ऋक्रूपी अंकुशानें त्यांनीं ती सर्व संपत्ति समुद्रांतून काढून घेतली.

---

## आख्यायिका ३६.

मनूचा मुलगा नाभानेदिष्ठ वेदाध्ययन करण्याकरतां गुरुगृहीं ब्रह्मचर्य व्रतानें राहिला असतां, पाठीमागें त्याच्या वडील भावांनीं आपल्या

पित्याची सर्व मिळकत आपसांत वांटून घेतली. नाभानेदिष्ठाचा भाग त्यांनीं काढला नाहीं. कांहीं दिवसांनीं, वेदाध्ययन समाप्त करून नाभानेदिष्ठ घरीं परत आल्यावर आपल्या भ्रात्यांस विचारूं लागला कीं, 'माझ्या वांट्याला तुम्हीं काय मिळकत घातली आहे ?' त्या भावांनीं पिता मनु ह्याच्याकडे बोट दाखवून उत्तर दिलें, 'आम्हांला कांहीं ठाऊक नाहीं. धर्मशास्त्रवेत्ता व कोणाला काय मिळावयाचें हें जाणणारा जो पिता त्यालाच तूं विचार.' ह्याप्रमाणें भ्रात्यांकडून उत्तर मिळाल्यावर तो नाभानेदिष्ठ पित्याकडे येऊन त्यास म्हणूं लागला, 'हे तात माझा भाग तुझ्याजवळ आहे तो मला दे.' तेव्हां मनु म्हणाला 'हे पुत्रक तूं आपल्या भ्रात्यांच्या वचनावर विश्वास ठेवूं नको. तुझ्या भावांनींच सर्व धन घेतलें. पण तुला मी धनप्राप्तीचा एक उपाय सांगतों. जवळच अंगिरस नामक महर्षि स्वर्गप्राप्तीची इच्छा धरून यज्ञ करीत आहेत. परंतु सहाव्या दिवसाच्या अनुष्ठानांत मन्त्र पुष्कळ असल्यामुळें ते कोठें तरी चुकतात व त्यांचा यज्ञ समाप्त होत नाहीं. तरी सहाव्या दिवशीं तूं तेथें जाऊन त्यांना " इदमित्थ " व " ये यज्ञेन " ही दोन सूक्तें सांग म्हणजे त्यांचा यज्ञ समाप्तीस जाईल, व ते स्वर्गास जातेवेळीं अवशिष्ट राहिलेलें सर्व धन तुला देतील.'

नंतर तो नाभानेदिष्ठ अंगिरस ऋषीकडे येऊन त्यांस म्हणाला 'हे बुद्धिमान् ऋषीहो, मनुपुत्र जो मी त्या माझा तुम्ही स्वीकार करा.' ह्यावर ते ऋषि म्हणाले, ' तूं काय हेतूनें असें म्हणत आहेस ?' तेव्हां नाभानेदिष्ठानें उत्तर केलें; ' तुमचें सहाव्या दिवसाचें अनुष्ठान पुरें कसें होईल तें मी तुम्हांस सांगतों. यज्ञ समाप्त होऊन तुम्ही स्वर्गास जाऊं लागला म्हणजे अवशिष्ट राहिलेलें सहस्रसंख्याक धन मला द्या.' त्या ऋषींनीं ही गोष्ट कबूल केली. तेव्हां नाभानेदिष्ठानें बापानें सांगितलेलीं दोन सूक्तें त्यांस सांगून त्यांचा यज्ञ पार पाडला.

तेव्हां स्वर्गाला जाणारे अंगिरस नाभानेदिष्ठाला म्हणाले; ' हे ब्राह्मणा, यज्ञभूमीवर शिल्लक राहिलेल्या हजार गायी आम्ही तुला दिल्या आहेत.' त्याप्रमाणें नाभानेदिष्ठ हें धन गोळा करतो आहे तों इतक्यांत त्या यज्ञभूमीवर कृष्णवस्त्र परिधान केलेला पशुपति अवतीर्ण झाला व त्यास म्हणूं लागला कीं, ' हें पशुसहस्र माझें आहे. कारण यज्ञसमाप्तीनंतर जें कांहीं अवशिष्ट राहील त्याच्यावर माझी सत्ता आहे. ' नाभानेदिष्ठानें उत्तर केलें

" पण मला हें अंगिरस ऋषीनीं दिलें आहे. " तेव्हां तो पुरुष त्याला म्हणूं लागला कीं, 'ज्याअर्थीं ह्या धनावर सत्ता कोणाची ह्याबद्दल संशय आहे त्याअर्थीं तूं व मी दोघेही तुझ्या पित्यालाच ह्या प्रश्नाचा निकाल करण्यास सांगूं.' ह्याप्रमाणें विचारण्याकरतां नाभानेदिष्ठ पित्याकडे चालता झाला. पित्यानें त्याला पाहतांच विचारलें; 'हे मुला, तुला अंगिरस ऋषीनीं द्रव्य दिलें काय ?' तो म्हणाला 'होय दिलें पण कोणी एक कृष्णवस्त्र परिधान केलेला पुरुष यज्ञभूमीवर उत्तरेच्या बाजूनें येऊन यज्ञावशिष्ट द्रव्य माझें आहे असें म्हणून घेता झाला.' मनूनें तेव्हां मुलाला म्हटलें; हे मुला, तें द्रव्य त्याचें खरेंच; कारण यज्ञावशिष्ट स्वामी व पशुपति ह्या दोनही नात्यांनीं त्याची त्या द्रव्यावर सत्ता आहे. तथापि तूं जा. तो तुला तें धन देईल. पित्याच्या आज्ञेप्रमाणें यज्ञभूमीवर जाऊन नाभानेदिष्ठानें त्या पशुपतीस हें धन तुझेंच आहे म्हणून पित्यानें म्हटल्याचें सांगितलें. हें ऐकून रुद्रानें म्हटलें, 'ज्याअर्थीं तूं सत्य भाषण केलेंस त्याअर्थीं हें धन मी तुलाच देतों.' असें म्हणून त्यानें नाभानेदिष्ठाला तें सर्व धन देऊन टाकलें.

---

## आख्यायिका ३७.

देवांनीं एकदां यज्ञ करण्यास आरंभ केला. तो यज्ञ करीत असतां 'ह्यांच्या यज्ञाचा आपण नाश करूं' असा हेतु धरून असुर व राक्षस यज्ञभूमीवर आले. यज्ञभूमीची दक्षिणेकडील बाजू कोणी रक्षक नसल्याकारणानें दुर्बल आहे असें पाहून ते त्या बाजूला आले, देवांनीं हें जाणून दक्षिणेकडे मित्रावरुण पाठविले, व त्यांच्याकडून असुर आणि राक्षस ह्यांचा पराभव करविला.

दक्षिणेकडे पराभव झाल्यानंतर ते असुर यज्ञाच्या मध्यभागीं आले. देवांनीं तें पाहून इन्द्राला तिकडे पाठविला व त्याच्याकडून त्या बाजूस त्यांनीं दैत्यांचा पराभव करविला.

मध्यभूमीवर पराभूत झालेले ते दैत्य उत्तरेकडून यज्ञभूमीवर शिरूं लागले. हें कळल्यावर देवांनीं इन्द्राग्नीला तिकडे रवाना केलें, व त्यांच्या बलावर त्यांनीं असुरराक्षसांचा पराजय केला.

ह्याप्रमाणें उत्तरेकडे पराजित झाल्यावर ते असुर चांगलें सैन्य घेऊन

यज्ञभूमीच्या पूर्वदिशेस प्राप्त झाले. देवांना हें समजतांच त्यांनीं त्या दिशेस अग्नीची योजना केली व तेथून त्यांना पिटाळून लावलें.

इकडे पराजय झाल्यावर असुर पश्चिमेकडून प्रवेश करूं लागले. तें पाहून देवांनीं त्यांचे विशेष आप्त जे विश्वेदेव त्यांस पश्चिमेकडे पाठवून तेथें त्यांनीं त्या असुरांचा आणि राक्षसांचा विश्वेदेवाकडून पराभव करविला.

अशा रीतीनें सर्व बाजूनीं देवांनीं असुरांचा पराभव केला.

देवांनीं त्या पापी असुर राक्षसांचा ह्याप्रमाणें पराभव केला व ते स्वर्गास जाते झाले.

---

## आख्यायिका ३८.

वलराक्षसांच्या घरांत देवांना ( आपल्या हरवलेल्या ) गायी आढळल्या. त्या यज्ञाच्याच योगानें प्राप्त करून घेण्याचा त्यांनीं निश्चय केला. षडह यज्ञ करून त्यांनीं त्या गायी मिळविल्या. प्रातःसवनांत नभाकऋषीनें पाहिलेलें स्तोत्र म्हणून त्यांनीं वलाचें ताडन केलें; ताडन होतांच तो अगदीं शिथिल झाला. पुढें तृतीय सवनांत वालखिल्याख्य ऋग्रूपी वज्रानें वलाला पक्का जेर करून देवांनीं आपल्या सर्व गायी परत आणल्या.

---

## आख्यायिका ३९.

ऐतश नामक मुनि ' अग्नेरायुः ' ह्या नांवाचें मन्त्रकाण्ड पाहता झाला. ह्याच काण्डाला कांहीं याज्ञिक यज्ञाचें अयातयाम ( रसभरित भाग ) असें म्हणतात. तो आपल्या मुलांना म्हणाला, "मुलांनों, मी 'अग्नेरायुः' नामक मन्त्र पाहिले आहेत, ते मी म्हणतों; मी जें कांहीं म्हणेन त्याचा तुम्हीं उपहास करूं नका." ( असें बोलून ) त्यानें म्हणण्यास प्रारंभ केला.

ह्याप्रमाणें तो मुनि मन्त्र म्हणत असतां अभ्याग्नि नामक त्यांच्या पुत्रानें आपला बाप वेड्यासारखा बडबडत आहे असें समजून संतोरून उठून जवळ येऊन हातानें त्याचें तोंड बंद केलें.

तेव्हां मुनि त्याला म्हणाला, "तूं माझी वाणी बंद केलीस, तुला ऐकण्याचाच कंटाळा आला आहे, तूं येथून चालता हो. अल्पायुषी गायीला मी शतायुषी करीन अगर पुरुषाला सहस्रायुषी करीन ( इतका माझा पराक्रम

भोर

आहे. ) तूं माझा अपमान केला आहेस; तस्मात् तुझीं मुलें अत्यन्त पापी निपजतील." ह्यावरून और्व गोत्रोत्पन्न एतश मुनीचे अभ्यग्निप्रमुख वंशज झाडून सारे अत्यन्त पापी आहेत असें लोक मानतात.

## आख्यायिका ४०.

देव आणि अंगिरस ऋषि ह्यांची स्वर्गप्राप्तीकरितां स्पर्धा चालली होती. 'आम्हीं स्वर्गास प्रथम जाऊं' असें प्रत्येकजण म्हणे. यज्ञाला प्रथम आरंभ करणारे जे आंगिरस महर्षि त्यांनीं स्वर्गलोकप्राप्तीला साधनीभूत जो सोमाभिषव तो दुसऱ्या दिवशीं करण्याचें ( एक दिवस ) निश्चित केलें. त्यांनीं आपल्यापैकीं अग्नि नामक ऋषीला देवाकडे पाठविला. ते त्याला म्हणाले; 'हे अग्ने, तूं जा आणि स्वर्गाचें द्वार प्राप्त करून देणारा सोमाभिषव आम्हीं उद्यां करणार आहों त्याकरितां तुम्हीं ( आर्त्विज्य करण्यास ) या असें सांग.' अग्नीला पाहतांच स्वर्गलोकदायक अभिषव तावडतोब करण्याचें देवांनीं ठरविलें. देवांकडे येऊन अग्नि म्हणाला 'स्वर्गलोकप्राप्तिकारक सोमाभिषव उद्यां आम्हीं करणार त्या करतां तुम्हांस आमन्त्रण देत आहें.' त्यावर देव म्हणाले, 'स्वर्गलोक मिळवून देणारा सोमाभिषव आम्हीं आतांच करतों व तुम्हांस आमन्त्रण देतों. तूंच आमचें होतृत्व पतकर, तुझ्यासह आम्हीं स्वर्गाला जाऊं.' अग्नीनें तें मान्य केलें व परत तो आंगिरसांकडे आला.

आंगिरसांनीं त्याला विचारलें, 'आमचा निरोप तूं देवांना सांगितलास काय ?' 'होय सांगितला' असें अग्नीनें उत्तर देऊन देवांनीं त्याला जें प्रत्युत्तर दिलें तेंही त्यानें निवेदन केलें. त्यावर आंगिरस म्हणाले, 'काय तूं देवांचें होतृत्व नाकबूल केलें नाहींस ?' 'मी तें पतकरलें' असा अग्नीनें जबाब दिला. 'जो ऋत्विक्पणा पतकरतो तो यशस्वी होतो. जो तो सोडून येतो तो यशहीन असतो. म्हणून मी आमन्त्रणाचा प्रतिकार केला नाहीं.'

त्यानंतर सर्व आंगिरस ऋषींनीं यज्ञ पार पाडण्यांत देवांना मदत केली. याजन करणाऱ्या आंगिरसांना दक्षिणेच्या प्रसंगीं ही सर्व पृथ्वी देवांनीं दिली. प्रतिग्रहानंतर पृथ्वीनें त्यांना जाळलें. म्हणून त्यांनीं तिला टाकलें. तेव्हां ती सिंहीण होऊन धांवूं लागली व लोकांना खाऊं लागली. ह्याप्र-

मार्णे भूमि संतापली असतां तिच्यावर हल्लीं दृग्गोचर होणारे प्रदर पडले. त्यापूर्वी ती अगदीं सारखी म्हणजे सपाट होती.

——

## आख्यायिका ४१.

इक्ष्वाकु वंशांतील वेधस राजाचा पुत्र हरिश्चन्द्र हा निपुत्रिक होता. त्याला शंभर बायका होत्या. त्यामध्यें एकीलाही पुत्र झाला नाहीं. हरिश्चन्द्राच्या घरांत पर्वत व नारद असे ऋषि रहात असत. त्यांपैकीं नारदाला त्यानें खालीं लिहिल्याप्रमाणें प्रश्न केला.

"ज्याअर्थी विचारशील (मनुष्य) आणि विवेकहीन (पशु) सर्व प्राणी पुत्राची इच्छा करतात त्याअर्थी पुत्राच्या योगानें काय फल मिळतें हें नारदा मला सांग."

नारद म्हणाला:—"जन्मलेल्या व जीवंत असलेल्या पुत्राचें मुख जो पिता पाहतो तो त्या पुत्राच्या रूपानें आपलें ऋण फेडतो व अमर होतो. पृथ्वी अग्नि, आणि उदक ह्यांपासून प्राण्यांना जीं सुखें प्राप्त होतात त्या सर्वांहून अधिक सुख पित्याला पुत्राच्या ठिकाणीं अनुभवितां येतें."

"पुत्राच्यायोगानें पिते नेहमीं मोठमोठीं संकटें पार पाडून गेले आहेत. (पुत्र उत्पन्न झाला म्हणजे) आपल्यापासून आपण उत्पन्न होतो तों (पुत्र) अन्नसामग्रीनें भरलेली नौकाच होय."

"मलीन (गृहस्थाश्रमी) राहून काय उपयोग? हरणाचें चामडें (ब्रह्मचर्याश्रमी) वापरून काय करावयाचें? श्मश्रु (वानप्रस्थाश्रम) कशाकरतां? तप (पारिव्राज्य) काय म्हणून? हे ब्राह्मणहो, पुत्रप्राप्तीची इच्छा करा. खरोखर पुत्रलोकाची निंदा करणें अयोग्य आहे."

"अन्न प्राण रक्षितें. वस्त्र गृहाप्रमाणें थंडीचें निवारण करतें. सुवर्ण सौंदर्य वाढवितें. विवाहांच्या योगानें पशूंची समृद्धि होते. जाया ही मित्राप्रमाणें असते. कन्या दुःखदायक असते. परतु पुत्र हा अत्युच्य आकाशांत ज्योतीप्रमाणें उपयोगी पडतो."

"पुढें माता होणारी जी आपली स्त्री तिच्या ठिकाणीं पति गर्भ होऊन प्रवेश करतो. तिच्या ठिकाणीं पुनः नवीन (बालरूप) होऊन दहाव्या महिन्यांत जन्मास येतो."

"स्त्रीच्या ठिकाणीं पुनः ( पति ) उत्पन्न होतो. म्हणून तिला 'जाया' म्हणतात. तिच्या ठिकाणीं वीज सिंचन केलें जातें म्हणून तिला 'भूति' व 'अभूति' हीं नांवेंही प्राप्त झालीं आहेत."

"देव आणि ऋषि ह्यांनीं हिच्या ठिकाणीं मोठें तेज प्रस्थापित केलें." देव मनुष्यांना म्हणाले, 'ही तुमची पुन्हा आई होईल.'

"पुत्रहीनाला लौकिकसुख प्राप्त होत नाहीं हें सर्व पशूंनासुद्धां माहीत आहे, म्हणून ( पशुजातींत) पुत्र, माता किंवा बहीण यांच्याबरोबर समागम करितो."

"पुत्र ज्यांना आहेत असे लोक शोकरहित होऊन जो मार्ग आक्रमितात तोच हा सर्वांच्या तोंडीं असलेला मार्ग होय. पशुपक्ष्यांना तो माहित आहे म्हणून ते मातेबरोबरही समागम करितात."

याप्रमाण नारदांनीं सांगितलें.

नंतर हरिश्चंद्राला नारद म्हणाला, "मला पुत्र होवो; त्या पुत्रानें तुला उद्देशून मी यज्ञ करीन,' असें राजा वरुणाला जाऊन सांग."

'बरें आहे' असें म्हणून तो वरुणराजाजवळ आला व 'मला पुत्र होऊं दे, त्या पुत्रानें तुला उद्देशून मी यज्ञ करीन' असें म्हणाला; त्यावर 'बरें आहे' असें वरुणानें उत्तर दिलें. हरिश्चंद्राला रोहित नांवाचा मुलगा झाला.

हरिश्चंद्राला वरुण म्हणाला, 'तुला मुलगा झाला आहे त्यानें आतां मला उद्देशून तूं यज्ञ कर.' हरिश्चंद्र म्हणाला, 'दहा दिवस झाल्यानंतर पशु यज्ञास योग्य होतो, दहा दिवस होऊन जाऊं दे, नंतर मी तुझें यजन करीन.' वरुण म्हणाला, 'ठीक आहे.'

दहा दिवसांहून जास्त दिवसांचा तो झाला. तेव्हां वरुण त्याला म्हणाला, 'याला दहा दिवस होऊन गेले. आतां ह्यानें माझें यजन कर.' तो म्हणाला 'पशूला दांत आले म्हणजे मग तो यज्ञास योग्य होतो. ह्याला दांत येऊं दे, नंतर मी तुझें यजन करीन.' 'बरें आहे' असें वरुणानें म्हटलें.

त्याला दांत आले तेव्हां तो हरिश्चंद्राला म्हणाला, 'ह्याला दांत आले. आतां ह्यानें माझ्याकरितां यज्ञ कर.' तो म्हणाला, 'पशूचे दांत पडतात तेव्हां तो यज्ञास योग्य होतो, ह्याचे दांत पडूं दे, नंतर मी तुझें यजन करीन.' वरुणानें हेंही कबूल केलें.

त्याचे दांत पडले तेव्हां त्याला वरुण म्हणाला, 'ह्याचे दांत पडले ह्यानें माझें आतां यजन कर.' तो म्हणाला 'पशूला जेव्हां पुन्हां दांत येतात तेव्हां तो यज्ञास पात्र होतो म्हणून याला दांत येऊं दे. नंतर मी तुला उद्देशून यज्ञ करीन.' 'बरें' असें वरुण म्हणाला.

त्याला पुन्हां दांत आले तेव्हां त्याला म्हणाला, 'ह्याला पुन्हां दांत आले आहेत त्यानें आतां मजसाठीं यज्ञ कर.' तो म्हणाला, 'क्षत्रिय जेव्हां कवच धारण करण्यासारखा होतो तेव्हांच तो यज्ञास योग्य होतो. याचे अंगावर कवच पडूं दे, नंतर मी यज्ञ करीन.' वरुण म्हणाला 'तसें होऊं दे.'

तो कवच घालूं लागला तेव्हां हरिश्चंद्राला वरुण म्हणाला, 'ह्याला कवच प्राप्त झालें आहे. ह्यानें माझें यजन कर.' 'करतों' असें म्हणून हरिश्चंद्रानें आपल्या मुलास हांक मारिली व त्याला म्हणाला, 'हे पुत्रा, ह्यानें तुला मला दिलें आहे, म्हणून पशूच्याऐवजीं तुलाच देऊन मी ह्याचें यजन करतों.'

हरिश्चंद्राच्या मुलानें ही गोष्ट नाकबूल केली. 'नाहीं' असें म्हणून धनुष्य घेऊन अरण्यांत चालता झाला. एक वर्षभर तो अरण्यांत राहिला.

नंतर हरिश्चंद्राला वरुणानें पछाडलें. त्याला उदर झाला, ही हकीकत रोहिताच्या कानावर आली. तो अरण्यांतून एका गांवीं आला तेथें त्याला पुरुषरूप धारण केलेला इंद्र भेटला आणि म्हणाला, 'हे रोहिता, आम्हीं असें ऐकत आलों कीं जो फिरत नाहीं त्याला संपत्ति प्राप्त होत नाहा. श्रेष्ठ मनुष्यसुद्धां मनुष्यांत राहील तर पापी होतो. फिरत राहणाऱ्या तुझा प्रत्यक्ष इंद्र साहाय्यकर्ता होईल म्हणून तूं फिरतच रहा.'

'फिरत रहा' असें ब्राह्मणानें आपणांस सांगितलें आहे. म्हणून आणखी एक वर्ष तो अरण्यांत फिरत राहिला; नंतर तो अरण्यांतून गांवीं आला. तेथें त्याला इंद्र पुरुषरूपानें येऊन म्हणाला, 'फिरणाऱ्याच्या मांड्या पुष्पयुक्त वृक्षाप्रमाणें होत. त्यांचें वृद्धिंगत पावणारें शरीर आरोग्यरूप फलानें युक्त होतें. याचीं सर्व पापें मार्गांत होणाऱ्या श्रमानें नष्ट होऊन पडतात, म्हणून तूं फिरतच रहा.'

'फिरत रहा' असें ब्राह्मणानें आपणास सांगितलें आहे असें समजून त्यानें तिसरें वर्ष अरण्यांत फिरून काढलें. नंतर तो अरण्यांतून गांवीं जाण्यास निघाला. त्याला इंद्र पुरुषरूपानें येऊन म्हणाला, 'बसून राहणाऱ्यांचें नशीब

खालीं बसतें, उभें राहणाऱ्यांचें उभें राहतें, निजून राहणाऱ्यांचें निजलें जातें, चालणाऱ्यांचें चालतें म्हणून तूं फिरत रहा."

'फिरत रहा' असें ब्राह्मणानें सांगितलें म्हणून चौथें वर्षही त्यानें अरण्यांत फिरून काढलें. नंतर तो अरण्यांतून गांवीं येण्यास निघाला. तेथें त्याला इंद्र पुरुषरूपानें येऊन म्हणाला, 'निजणारा कलीप्रमाणें होतो, निद्रेचा परित्याग करणारा द्वापराप्रमाणें होतो, उठून उभा राहणारा त्रेता होतो, व चालणारा कृताप्रमाणें होतो म्हणून तूं फिरतच रहा.'

'फिरत रहा' असें ब्राह्मणानें आपणांस सांगितलें आहे म्हणून पांचवें वर्षही त्यानें अरण्यांत फिरून काढलें. नंतर तो अरण्यांतून गांवीं येण्यास निघाला. तेथें त्याला इंद्र पुरुषरूपानें येऊन म्हणाला, 'फिरणाऱ्या मनुष्याला मध व गोड उदुंबराचीं फळें प्राप्त होतात. जो चालण्याला कधीं आळस करीत नाहीं, असल्या सूर्याचें श्रेष्ठत्व पहा. म्हणून तूं फिरतच रहा.'

'फिरत रहा' असें ब्राह्मणानें आपणांस सांगितलें आहे म्हणून सहावें वर्षही त्यानें अरण्यांत फिरून काढिलें. पुढें त्याला क्षुधेनें व्याकुळ झालेला सूयवस् नामक ऋषीचा पुत्र अरण्यामध्यें भेटला.

त्या अजीगर्ताला शुनःपुच्छ, शुनःशेप, आणि शुनोलांगूल असे तीन मुलगे होते. त्याला रोहित म्हणाला, 'मी तुला शंभर गाई देतों, आणि ह्या तिघांपैकीं एकानें मी आपल्याला विकत घेतों.' (तुझा एक मुलगा वरुणाला देऊन मी आपली मुक्तता करून घेतों.) त्याबरोबर आपल्या वडील मुलाला देऊं न इच्छिणारा तो अजीगर्त रोहिताला म्हणाला, 'ह्याला तूं घेऊं नको.' त्याचप्रमाणें सगळ्यांत धाकट्या मुलाविषयीं आईनें सांगितलें; त्या दोघां आईबापांनीं मधला मुलगा जो शुनःशेप त्याला देण्याचें निश्चित केलें. त्याला शंभर गाई देऊन शुनःशेपाला घेऊन रोहित अरण्यांतून गांवीं येण्यास निघाला. तो बापाजवळ येऊन म्हणाला, 'बाबा मी ह्याला (शुनःशेपाला) देऊन आपल्याला विकत घेतों.' असें म्हटल्यावर वरुणराजाजवळ येऊन 'ह्यानें (शुनःशेपानें) मी तुझें यजन करितों' असें म्हणाला. वरुण म्हणाला 'बरें आहे, क्षत्रियापेक्षांही ब्राह्मण चांगला.' नंतर वरुणानें राजाला राजसूय यज्ञाचा विधि सांगितला. अभिषेचनीय नांवाच्या

सोमयागाच्या दिवशीं पशूच्या ऐवजीं ह्या पुरुषाची ( शुनःशेपाची ) योजना करण्याचें हरिश्चंद्रानें निश्चित केलें.

ह्या यज्ञांत विश्वामित्र होता, जमदग्नि अध्वर्यु, वशिष्ट ब्रह्मा, आणि अयास्य उद्गाता होता. पूर्वसंस्कार झाल्यानंतर त्याला ( शुनःशेपाला ) यूपाशीं बांधणारा त्यांना कोणी आढळेना, तेव्हां सूयवसाचा मुलगा अजीगर्त म्हणाला, 'मला आणखी शंभर गाई द्या, मी याला बांधीन.' त्यानें त्याला आणखी शंभर गाई दिल्या त्याबरोबर त्यानें त्याला बांधिलें.

उपाकर्मानंतर शुनःशेपाला बांधला. आप्री ऋचा म्हटल्या व त्याच्या भोंवतालीं अग्नि फिरविला; परंतु त्याचा वध करणारा त्यांना कोणी मिळेना; तेव्हां सूयवसाचा मुलगा अजीगर्त म्हणाला 'मला आणखी शंभर गाई द्या; मी याचा वध करीन.' त्याला त्यांनीं आणखी शंभर गाई दिल्या. त्याबरोबर अजीगर्त आपली तरवार पाजवून ( मारण्याकरितां ) चालता झाला.

नंतर शुनःशेपानें विचार केला कीं, ' हे मला पशूप्रमाणें मारताहेत मी देवतांची आराधना करितों.' ' कस्यतूनं' इ० ऋचा म्हणून देवांमध्यें वडील जो प्रजापति त्याची त्यानें आराधना केली. तेव्हां त्याला प्रजापति म्हणाला, 'अग्नि हा देवाच्या अगदीं जवळचा आहे, त्याचीच तूं उपासना कर.' तेव्हां त्यानें अग्नीची उपासना केली. अग्नि त्याला म्हणाला, 'सविता सर्व प्राण्यांचा स्वामी आहे त्याच्याकडे तूं जा,' म्हणून त्यानें सवित्याची आराधना केली. सविता त्याला म्हणाला 'राजा वरुणाकरितां तूं बद्ध झाला आहेस म्हणून त्याचीच तूं आराधना कर,' तेव्हां त्यानें वरुणाची आराधना केली.

त्याला वरुण म्हणाला, 'अग्नि हा देवाचें मुख आहे व तो अत्यंत दयाळू आहे त्याची तूं स्तुति कर, मग आम्हीं तुला सोडूं,' त्यानें अग्नीचा स्तव केला.

तेव्हां त्याला अग्नि म्हणाला, 'विश्वेदेवांची प्रार्थना कर, नंतर तुला आम्हीं बंधमुक्त करूं.' त्यानें विश्वेदेवांचें स्तवन केलें. तेव्हां त्याला ते म्हणाले 'सर्व देवांत इंद्र हा अत्यंत तेजस्वी, बलिष्ठ, काटक, सत्यनिष्ठ व कोणतेंही कृत्य तडीस नेणारा असा आहे, तेव्हां त्याची तूं स्तुति कर, नतर आम्हीं तुला सोडूं.' त्याप्रमाणें इंद्राची त्यानें स्तुति केली. या स्तुतीनें इंद्राचें मन प्रसन्न होऊन त्यानें त्याला सोन्याचा रथ दिला, व शुनःशेपानें त्याचा ' शश्वदिंद्र ' ऋचा म्हणून स्वीकार केला.

इंद्रानें त्याला सांगितलें, 'तूं अश्विनीची स्तुति कर म्हणजे आम्हीं तुला सोडूं;' तेव्हां त्यानें अश्विनीची स्तुति केली; तेव्हां अश्विनींनीं त्याला सांगितलें, 'तूं उषेची स्तुति कर, नंतर आम्हीं तुला सोडूं.' त्याप्रमाणें त्यानें उषेची स्तुति केली.

एकेक ऋचेबरोबर त्याचा पाश तुटूं लागला आणि हरिश्चंद्राचें उदर लहान होऊं लागलें. शेवटली ऋचा संपतांच तो पाशमुक्त झाला व हरिश्चंद्राचा रोग अजीबात गेला.

नंतर शुनःशेप विश्वामित्राच्या मांडीवर जाऊन बसला; तेव्हां सूयवसपुत्र अजीगर्त विश्वामित्राला म्हणाला, 'माझा मुलगा मला परत दे;' विश्वामित्र म्हणाला ' मी देणार नाहीं, मला हा देवांनीं दिला आहे. ' तेव्हांपासून शुनःशेप हा ' देवरात ' नांवाचा विश्वामित्राचा मुलगा झाला. कपिल बभ्रुगोत्री हे त्याचेच वंशज होत.

नंतर अजीगर्त शुनःशेपाला म्हणाला, 'तूं आमचेकडे ये. आम्हीं तुला बोलावितों.' अजीगर्त पुन्हा म्हणाला 'तूं जन्मानें आंगिरस गोत्रांत उत्पन्न झाला असून अजीगर्ताचा मुलगा आहेस व विद्वान् म्हणून तुझी प्रसिद्धि आहे. हे ऋषे, तूं या वंशांतून जाऊं नको. माझ्याकडे तूं पुन्हा ये.' त्यावर शुनःशेपानें उत्तर केलें. 'शूद्राच्या हातांत जें मिळणार नाहीं असें खड्ग ( मला मारण्याकरितां ) तुझ्या हातांत लोकांनीं पाहिलें, हे अंगिर, मला टाकून तूं तीनशें गाई मिळविल्यास. '

अजीगर्त म्हणाला, 'हे मुला, मी केलेलें पाप मला ताप देत आहे त्याचा मी आतां परिहार करितों. मी मिळविलेल्या तीनशें गाई तुलाच असूं देत.' यावर शुनःशेप म्हणाला, ' जो एकदां पाप करितो तो नंतर दुसरेंही पाप करूं शकतो. शूद्रजातीच्या क्रौर्यापासून तूं अद्यापि अलिप्त नाहींस. निष्कारण न करितां येण्यासारखें तूं पाप केलें आहेस. '

'होय निष्कृति न होण्यासारखें तें आहे' असें विश्वामित्रही बोलला. तो आणखी म्हणाला, 'अजीगर्त शस्त्र घेऊन मारण्यास प्रवृत्त झाला तेव्हां तो भयंकर दिसत होता म्हणून तूं ह्याचा मुलगा होऊं नकोस, माझाच मुलगा हो.' शुनःशेप म्हणाला 'हे राजपुत्र, जसा तूं क्षत्रिय असून ब्राह्मण समजला जातोस, त्याप्रमाणें मी अंगिर कुलोत्पन्न असून तुझा मुलगा कसा होऊं तें सांग.' विश्वामित्र म्हणाला, 'तूं आमच्या सर्व पुत्रांत ज्येष्ठ हो. तुझी प्रजा

सर्वांत श्रेष्ठ होईल. देवांनीं मला दिलेलें जें पुत्रत्वरूपी दाय तें तुला प्राप्त होवो. त्यानेंच ( पुत्र म्हणून ) मी तुला हाक मारीन.'

तो शुनःशेप पुन्हां म्हणाला, 'हे भरतश्रेष्ठ, तुझे सर्व मुलगे या गोष्टीस कबूल झाले म्हणजे ज्याच्याथोगानें मला तुझें पुत्रत्व प्राप्त होईल, त्यांचें प्रेम माझ्यावर राहील व त्यांजकडून मला संपत्ति प्राप्त होईल अशा रीतीनें तूं त्यांना सांग.' नंतर विश्वामित्र आपल्या मुलांस म्हणाला, 'हे मधुच्छंद, ऋषभ रेणु, अष्टक ऐका; जे तुम्हीं भाऊ आहां त्या तुम्हीं ह्यालाच ज्येष्ठ बंधु म्हणून समजा.'

विश्वामित्राला शंभर मुलगे होते. मधुच्छंदाहून पन्नास वडील व पन्नास कनिष्ठ. त्यापैकीं वडील भावांना ही गोष्ट रुचली नाहीं, त्यामुळें विश्वामित्रानें त्यांना असा शाप दिला कीं, 'तुमची प्रजा हीनजातीची होईल.' ह्या शापामुळें विश्वामित्राच्या वंशजांमध्यें अट्टल चोर व हीन जातींत उत्पन्न झालेले असे पुष्कळ आहेत व त्यापैकींच अंध्र, पुंड्र, शवर, पुलिंद, मूतिब हे होत; पण आपल्या पन्नास लहान भावांसह मधुच्छंद म्हणाला—( शुनःशेपाला ) 'जें आमच्या पित्याला पसंत पडलें त्याप्रमाणें आम्हीं चालूं. आम्हीं तुला पुढें करतों आणि आम्हीं सर्व तुझे पाठीमागून येऊं.' ह्यामुळें विश्वामित्राचा विश्वास बसला व त्यानें आपल्या मुलाची प्रशंसा केली. तो म्हणाला, 'तुम्हीं माझें म्हणणें ऐकलेंत व मला वीरमाद्र पुत्र असा केलात त्यामुळें हे पुत्रानों, तुमच्याजवळ पुष्कळ पशु असतील व तुम्हांला वीर पुत्र प्राप्त होतील. हे वीरपुत्रयुक्त गाधिप्रौत्र हो, देवरात हा तुमचा पुढारी असल्यावर ' तुम्हीं सर्व यशस्वी व्हाल. हा तुम्हांला सन्मार्ग दाखवील. हे कुशिकवंशज, हा वीर देवरात तुमचा आहे. त्याचे तुम्हीं अनुयायी बना. माझी वडिलार्जित मिळकत तुम्हांला व त्याला प्राप्त होईल व तुम्हांला जी विद्या येत आहे तीही तुम्हांला अवगत होईल. गाधीचे नातू व माझे पुत्र असे जे धनसंपन्न असून देवराताचें पोषण करण्यास व त्याचें श्रेष्ठत्व मान्य करण्यास सारखेच तयार झाले, ते सर्व प्रशंसनीय होत.'

---

## आख्यायिका ४२.

प्रजापतीनें यज्ञ केला. यज्ञानंतर ब्राह्मण आणि क्षत्रिय अशा दोन जाती निर्माण केल्या. ब्राह्मण आणि क्षत्रियांच्या नंतर यज्ञान्न खाणारा आणि

11 JAN 1946

यज्ञान्न न खाणारी अशा दोन प्रकारच्या प्रजा उत्पन्न केल्या. ब्राह्मणांच्या नंतर यज्ञान्न खाणारी प्रजा उत्पन्न केली व क्षत्रियांच्या उत्पत्तीनंतर यज्ञान्न न खाणारी प्रजा उत्पन्न केली. जे ब्राह्मण आहेत ते यज्ञान्न खाणारे व जे क्षत्रिय, वैश्य, शूद्र ते यज्ञान्न न खाणारे होत.

ह्या प्रजांपासून यज्ञ दूर चालता झाला. त्यांच्या पाठीमागून ब्राह्मण व क्षत्रिय गेले. ब्राह्मणांचीं जीं आयुधें होतीं तीं ब्राह्मण घेऊन गेले व क्षत्रियांचीं जीं आयुधें होतीं तीं घेऊन क्षत्रिय गेले. यज्ञांचीं आयुधें तींच ब्राह्मणांचीं आयुधें होत. अश्वयुक्त रथ, कवच, धनुष्य व बाण हीं क्षत्रियांचीं आयुधें होत.

यज्ञप्राप्ति न होतां क्षत्रिय मागें फिरले. क्षत्रियांच्या आयुधांना भिऊन यज्ञ दूर पळून गेला. नंतर त्याच्या पाठीमागून ब्राह्मण गेले. त्यांनीं त्याला गांठून त्याचा पुढचा मार्ग बंद करून ते उभे राहिले. ह्याप्रमाणें ब्राह्मणांनीं गांठून ज्याचा पुढील मार्ग बंद केला आहे, असा तो यज्ञ स्तब्ध उभा राहिला. ( ब्राह्मणांच्या हातांत असलेलीं ) आयुधें आपलींच आहेत असें पाहून तो ब्राह्मणांकडे गेला. म्हणून अद्यापिही यज्ञ हा ब्राह्मणांमध्येंही जे विद्वान् ब्राह्मण आहेत, त्यांच्याच ठिकाणीं प्रतिष्ठित झालेला आहे ( म्हणजे यज्ञामध्यें ब्राह्मणांनाच आर्त्विज्य करितां येतें. )

नंतर ब्राह्मणांकडे क्षत्रिय गेले आणि म्हणाले, 'ह्या यज्ञांत आम्हांला तुम्हीं बोलवा.' ते म्हणाले 'ठीक आहे परंतु तुम्हीं आपलीं आयुधें ठेऊन ब्राह्मणांचींच आयुधें घेऊन ब्राह्मणांचीं रूपें धारण करून, आणि ब्राह्मणांसारखें होऊन यज्ञाकडे या.' क्षत्रियांनीं त्याप्रमाणें केलें. त्यांनीं आपलीं आयुधें खालीं ठेविलीं व ब्राह्मणांच्याच आयुधांनीं ब्राह्मणांचा वेष धारण करून ब्राह्मण होऊन ते यज्ञाकडे आले; म्हणून हल्लींही क्षत्रिय यजमान आपलीं आयुधें ठेऊन ब्राह्मणांचींच आयुधें घेऊन व ब्राह्मणांचा वेष धारण करून ब्राह्मणासारखा होऊन यज्ञ करितो.

---

## आख्यायिका ४३.

सुपद्म राजाचा मुलगा विश्वंतर यानें यशाला श्यापर्णनामक ब्राह्मणांना न बोलावतां विश्यापर्ण ब्राह्मणांना बोलावलें; ही गोष्ट समजतांच श्यापर्ण ब्राह्मण यज्ञाच्या ठिकाणीं आले व ते वेदीशेजारीं येऊन बसले त्यांना पाहून

राजा (आपल्या नोकरांना) म्हणाला, 'हे श्यापर्ण ब्राह्मण, पापकर्म व निंद्य-भाषण करणारे येथें बसले आहेत त्यांना हांकलून लावा; हे माझ्या वेदींत बसतां कामा नये.' 'बरें आहे' असें म्हणून त्यांनी त्यांना तेथून हांकून लाविलें.

तेथून उठवून लावल्यावर ते मोठ्यानें ओरडून म्हणाले, 'पारिक्षित जनमेजयानें कश्यपांना न बोलावतां केलेल्या यज्ञांत कश्यपांपैकीं असितमृग नांवाचे ब्राह्मण होते त्यांनीं तेथें ( अगोदर आर्त्विज्य करीत असलेल्या ) भूतवीर नामक ब्राह्मणांपासून सोमयाग हस्तगत करून घेतला हा जो कश्यपांनीं जय मिळविला त्याचें कारण त्यांच्यामध्यें हे असितमृग ब्राह्मण शूर होते, तर मग आपणांमध्यें असा कोण पराक्रमी आहे कीं, जो हा सोमयाग हरण करील ? ' ( त्यावर ) 'हा तुमचा वीर मी आहे,' असें मृगवू नामक स्त्रीचा पुत्र राम म्हणाला.

हा मृगवुपुत्र राम श्यापर्ण ब्राह्मणापैकीं असून वेदशास्त्रपारंगत होता. वेदींतून ब्राह्मण उठले तेव्हां तो राजाला म्हणाला, 'हे राजा, यागसंबंधीं ज्ञान असलेल्या मलासुद्धां तुझे नोकर वेदींतून उठवतात ? ' (राजा म्हणाला) 'हे ब्राह्मणाधम, इतकें धाष्टर्य करणारा जो तूं त्या तुला कसें ज्ञान असणार ?'

राम म्हणाला, ' पूर्वी इंद्रानें त्वष्ट्याचा पुत्र जो विश्वरूप त्याची अवहेलना केली, वृत्र मारिला, कोल्ह्यांपुढें यतींना फेंकून दिलें, अरुर्मघांची हत्या केली, बृहस्पतीला प्रत्युत्तर केलें, ह्या अपराधांमुळें देवतांनीं इंद्राला यज्ञांतून घालविला, त्यामुळें इंद्राला सोमपान मिळेनासें झालें. इंद्राला सोमपान मिळेनासें झालें त्यावरोबर सर्व क्षत्रियांचेंही सोमपान बंद पडलें, परंतु इंद्रानें त्वष्ट्यापासून बळजबरीनें सोमपान मिळविलें. अद्यापि बाकीचे क्षत्रिय सोमपानाशिवाय राहिले आहेत. ज्याच्यायोगानें क्षत्रिय समृद्ध होतात असें सोमपान ज्यांना नाहींसें झालें आहे, अशा क्षत्रियाचें भक्ष्य ज्याला ठाऊक आहे त्याला ह्या वेदींतून तुझे लोक कसे उठवितात' ? (विश्वंतर म्हणाला ) 'हे ब्राह्मणा, काय तुला तें भक्ष्य ठाऊक आहे ? ' 'होय मला ठाऊक आहे' असें ( रामानें ) उत्तर दिलें. तर मग 'हे ब्राह्मणा सांग. ' ' हे राजा तुलाच सांगतों ' असें राम म्हणाला.

' सोम, दहीं किंवा उदक या तीन भक्ष्यांपैकीं एक भक्ष्य ( ऋत्विज ) घेतील. ब्राह्मणांचें भक्ष्य असलेला सोम जर त्यांनीं घेतला तर त्याच्यायोगानें तूं ब्राह्मणांना संतुष्ट करशील. तसें झालें म्हणजे तुझे संततींत कोणी तरी

ब्राह्मणासारखा निपजेल म्हणजे तो प्रतिग्रह घेईल, सोमपान करील, भिक्षा मागेल, वाटेल तेव्हां धिःकारून देण्याच्या योग्यतेचा होईल. क्षत्रियाकडून चूक झाल्यास त्याच्या संततींत ब्राह्मणासारखी ( शौर्यरहित ) संतति होते. त्याच्यापासून दुसरी किंवा तिसरी पिढी ब्राह्मण होण्यास समर्थ होते. ब्राह्मणांबरोबर बंधुत्वानें राहण्याची ती इच्छा करील. '

' वैश्यांचें भक्ष्य असलेलें दहीं जर ते तुला देतील तर त्या भक्ष्यामुळें वैश्यांना प्रिय होशील. तुम्ही प्रजा वैश्यगुणी होईल, म्हणजे दुसऱ्याला कर देणारी, दुसऱ्याचें खाद्यच खाणारी व राजाच्या मर्जीप्रमाणें जुलूम ज्यांच्यावर करितां येतो अशी होईल. क्षत्रियाच्या हातून अशी कृति झाल्यास त्याला वैश्यासारखी प्रजा होते. त्याच्यापासून दुसरी किंवा तिसरी पिढी वैश्य होण्यास समर्थ होते व ती वैश्यवृत्तीनें राहण्यास प्रवृत्त होते. '

' शूद्राचें भक्ष्य जें उदक तें जर ते तुला देतील तर त्या भक्ष्यामुळें तूं शूद्रांना संतोषविशील. तुझी प्रजा शूद्रासारखी दुसऱ्याची चाकर, धन्याच्या मर्जीस येईल तेव्हां घालवून टाकली जाणारी, ताडन केली जाणारी, अशी होईल. क्षत्रियाकडून असा प्रमाद घडल्यास शूद्रासारखी त्याला प्रजा होते. त्याच्यापासून दुसरी किंवा तिसरी पिढी शूद्र होण्यास समर्थ होते व शूद्रवृत्तीनें राहण्यास प्रवृत्त होते. '

तो ह्मणाला, ' हे राजा यज्ञ करणाऱ्या क्षत्रियानें ह्या तीन प्रकारच्या भक्ष्यांची इच्छासुद्धां करूं नये. आतां त्याचें स्वतःचें भक्ष्य सांगतों. वडाच्या पारंब्या, उदुंबर, पिंपळ आणि पायरी यांचीं फळें ह्यांचा रस काढून तो प्यावा, तें त्याचें स्वतःचें भक्ष्य होय. ' ह्याप्रमाणें भार्गवेय रामानें शूषद्मपुत्र विश्वंतराला हें भक्ष्य सांगितलें. रामाचें सांगून झाल्यावर तो राजा त्याला म्हणाला, 'हे ब्राह्मणा, तुला मी सहस्र गाई देतों आणि माझ्या यज्ञांत श्यापर्ण ब्राह्मण असोत.'

# ८ फलज्योतिष.

लोकांच्या आचारविचारांवरून त्यांच्या नैतिक संपत्तीची, पुरुषार्थाची वगैरे अटकळ करण्यासारखी असते. समाजाच्या निकृष्ट स्थितींत चेटकें, भुतेंखेतें, ज्योतिष, शकुन, अपशकुन यांवर मनुष्यांचा फाजील विश्वास असतो. स्वातंत्र्याची एकदां चटक लागल्यावर इतर जुलमी व अन्यायाचीं बंधनें झुगारून देण्याकडे ज्याप्रमाणें मनुष्याची प्रवृत्ति होऊं लागते, त्याप्रमाणें वर निर्दिष्ट केलेल्या पूर्वग्रहांची दास्यग्रंथि शिथिल करण्यासही तो तत्पर होतो. ह्या निबंधांत फक्त ज्योतिषासंबंधानें विचार करण्याचें योजिलें आहे.

आकाशस्थ ग्रहांची अमुक स्थिति असली म्हणजे अमुक मनुष्यास अमुक फल प्राप्त होतें असें सांगणाऱ्या शास्त्राला फलज्योतिष म्हणतात. ग्रहांचे परिणाम मनुष्यांप्रमाणें इतर प्राण्यांवर व वृक्षादिकांवर होतात किंवा नाहीं त्याचा विचार शास्त्रांत केला नाहीं व त्याचा अनुभव कोणीं घेतल्याचें ऐकिवांत नाहीं. सध्यां तरी ज्योतिषी मनुष्यांचींच फलें त्यांच्या ग्रहांवरून वर्तवीत असतात.

आपल्या इकडील एखाद्या ज्योतिष्याचा पत्रव्यवहार पाहिला असतां फलज्योतिषाचा अंमल आमच्या लोकांवर अद्यापि किती जोराचा आहे; ह्याची चांगली कल्पना करतां येईल. सुशिक्षित, अशिक्षित, साक्षर, निरक्षर सर्व दर्जाचे लोक ज्योतिष्यांना आपली भावी हकीकत मोठ्या उत्सुकतेनें विचारीत असतात. मला स्त्रीसुख आहे किंवा नाहीं ? प्रमोशन कधीं मिळेल ? माझी वकिली अमुक ठिकाणीं कशी काय चालेल ? व्यापार करीत आहें, त्यांत फायदा होईल कीं नाहीं ? माझ्या साहेबाचें व माझें जुळेल कीं नाहीं ? पुत्रयोग कसा आहे ? हेच प्रश्न लोक बहुधा विचारीत असतात. मातृसुख, पितृसुख अगर बंधुसुख कोणी विचारीत नाहीं. लोकोपयोगी पडण्याचा योग आहे कीं नाहीं, ह्याची चौकशी करण्याचें कोणाच्या

मनांत येत नाहीं. आपल्या देशाचे ग्रह कसे आहेत ह्याची विचारपूस करावीशी कोणास वाटत नाहीं. ह्यावरूनच फलज्योतिषाचा उपयोग सांप्रत किती कोत्या स्वार्थबुद्धीनें केला जात आहे हें कोणाच्याही सहज ध्यानांत येईल. ज्योतिषशास्त्र खोटें असें आमचें म्हणणें नाहीं. आकाशांतील ग्रहांचा व पृथ्वीवरील माणसांचा काय संबंध आहे असें विचारणारे; ज्योतिषशास्त्र निराधार आहे म्हणणारे व खोट्या पत्रिकांवरून लोकांना फसविण्यांत भूषण मानणारे लोक नाहींत असें नाहीं; पण त्याचें कारण त्यांचें अज्ञान अगर विकारवशता हेंच होय. ह्या निबंधांत आम्हांला इतकेंच सिद्ध करावयाचें आहे कीं, फलज्योतिष जरी निव्वळ थोतांड नसलें तरी त्याच्या अनुमानानें अगर तदनुरोधानें वर्तविलेल्या फलांत इतकी अनिश्चितता आहे कीं, शास्त्र या पायरीला फलज्योतिष केव्हांही येणें शक्य नाहीं. म्हणून लोकांनीं एखाद्या पंगु माणसाप्रमाणें फलज्योतिषावर सर्व भार टाकून आपली व आपल्या समाजाची अवनति करून घेऊं नये. कुंडलीवरून निश्चित फलें सांगतां येतात असें जर कित्येकांचें म्हणणें असेल तर त्यांना फलावरून कुंडली बिनचूक अगर जवळजवळ तरी बरोबर मांडून देतां आली पाहिजे. चेहऱ्यांवरून पत्रिका तयार करून देऊन आकाशांतील ग्रहांचा व मनुष्याचा निकट संबंध महाडकर ज्योतिषांनीं अस्खलित रीतीनें स्थापित केला, त्याप्रमाणें मनुष्याच्या आयुष्यक्रमावरून जर एखादा ज्योतिषी कुंडली तयार करील तर मात्र फलांचा अनुभव पूर्णपणें येतो, असें थोडें बहुत मानतां येईल. परंतु अशा रीतीनें कुंडली तयार करून देणारा ज्योतिषी आमच्या पाहण्यांत नाहीं. एवढ्या एका गोष्टीवरूनच फलांचा धरसोडपणा सहज सिद्ध करतां येण्यासारखा आहे.

फलें अनुभवास न येण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, मनुष्यास परमेश्वरानें पूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे. आपलें हित अगर अनहित करून घेण्याचें मनुष्याच्याच हातीं आहे. पुढील जन्माची गोष्ट राहो ! पण ह्या जन्मांतील सुखसुद्धां बहुतांशीं त्याच्याच प्रयत्नावर अवलंबून आहे. तुम्हीं कांहीं करा, ग्रहांची फलें अनुभवास आलींच पाहिजेत असें मानलें तर मनुष्य ग्रहाधीन अगर प्रारब्धाधीन आहे; परतंत्र आहे; ललाटांत लिहिलें असेल, त्याप्रमाणें ह्या जन्मांत सुखदुःख त्यानें भोगावयाचें आहे; व त्याकरितांच त्याचा अवतार आहे, असें म्हणावें लागतें. पण ही विचारसरणी शास्त्रांस असंमत

आहे. मनुष्य स्वाधीन असल्यामुळें ग्रहसूचित अनिष्ट गोष्टींचा प्रतिकार त्याच्या हातून होणें दुर्घट नाहीं. म्हणून परमेश्वरानें दिलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग करणाऱ्या सुसंस्कृत मनाच्या सुशिक्षित माणसासंबंधानें ज्योतिष्यांनीं वर्तविलेलें भविष्य चुकण्याचा पुष्कळ संभव असतो; पण त्याचें कारण ज्योतिष्यांच्या लक्षांत येत नाहीं. अशिक्षित 'रानटी' माणसासंबंधानें फल बरोबर उतरण्याचा संभव अधिक. ग्रह उत्तम आहेत पण जाणूनबुजून मीं जर विस्तवावर पाय ठेवला तर तो भाजलाच पाहिजे. तेथें बिचारे ग्रह काय करणार ? सन्मार्ग व दुर्मार्ग दोन्ही परमेश्वरानें आपल्यापुढें ठेवलेले आहेत. वाटेल त्या मार्गाचें अवलंबन करणें आपल्या हातीं आहे. एकदां कां आपली निवड झाली म्हणजे मग मात्र ज्योतिष्यांचीं फलें कदाचित् विनचूक जमतील. पण हा सुलगा अमकाच मार्ग स्वीकारील असें आग्रहानें कोणत्याही ज्योतिष्यानें सांगणें अनुचित आहे. कारण, सुशिक्षणाच्या योगानें सन्मार्गाला लावणें हें त्या बालकाच्या पालकाच्या स्वाधीन आहे. तात्पर्य, ग्रहफलें खोटीं पाडण्याचें सामर्थ्य आपल्यांत आहे, हें प्रत्येकानें लक्षांत ठेवावें. यंदां संतति होईल असें ज्योतिष्यानें सांगितल्यावर संततिप्रतिबंधक उपाय एखाद्यानें योजिले तर फल अनुभवास कसें येणार ? तेव्हां ग्रहांचीं फलें अनुभवास येण्यास प्रयत्नाची सांगड पाहिजे, हें उघड आहे. ग्रह फक्त अनुकूल अगर प्रतिकूल स्थिती दाखवितील इतकेंच. आपले प्रयत्न अनुकूल असतील तर फलसिद्धि सुलभ होईल. विरोधी असतील तर ग्रहांच्या अनुकूलतेचा उपयोग काय होणार ? तात्पर्य, ज्या मानानें आपल्या मनाचा निश्चय बलवत्तर त्या मानानें ग्रह दुर्बल होतात; त्यांचा अनुभव येत नाहीं. दुसऱ्याच्या कृतीवर आपलें सुखदुःख अवलंबून असलें तर तेथें आपला नाइलाज आहे, पण आपल्या स्वतःच्या वर्तनावर जर तें अवलंबून असेल तर प्रायः ग्रहांचें आपल्या पुढें कांहीं चालणार नाहीं. एखादा मनुष्य मिताहारी, सुव्यवस्थित, व नीतिमान् असला तर त्याची प्रकृति निरोगी राहणारच मग पत्रिकेंतील ग्रह कांहीं सांगोत. शिवाय, सुखदुःखाच्या कल्पना प्रत्येकाच्या निरनिराळ्या असतात. एकामध्यें ज्यास सुख वाटेल त्यांतच दुसऱ्याला दुःख वाटेल, पण ज्योतिषी तर सामान्य माणसांच्या सुखदुःखाच्या कल्पना घेऊनच तद्विषयक फलें वर्तवीत असतात. तेव्हां तीं एखाद्या विशिष्ट व्यक्तीच्या संबंधानें अनुभवास न आलीं तर त्यांत कांहीं

आश्चर्य नाहीं. धनपुत्रदारादिकांच्या योगानें सामान्यतः मनुष्य सुखी असतो; पण ज्यांच्या ठिकाणीं पूर्ण वैराग्य बिंबल्यामुळें ज्यांच्या मनाची तळमळ परमार्थाकरितां होत आहे तो आपल्याला सुखी समजत नाहीं. तात्पर्य, मनुष्य स्वतंत्र आहे. आयुष्यांत शिक्षणाचा व संगतीचा मनावर परिणाम होऊन त्याप्रमाणें त्यांचा चरित्रमार्ग ठरला जातो. हे शिक्षणरूपी व संगतिरूपी दोन ग्रह आकाशस्थ नवग्रहांचे रिपु होत ! व ते नजीक असल्यामुळें त्यांचा जोर जास्त होऊन आकाशस्थ ग्रह मागें पडतात व त्यांच्या फलांचा अनुभव येत नाहीं. शिक्षण व सहवास ह्यांचा संस्कार ज्यांच्या मनावर तादृश झाला नसेल त्यांच्याविषयीं फार तर ज्योतिषांना कांहीं निश्चितपणें सांगतां येईल.

स्वातंत्र्याप्रमाणें पारतंत्र्यहि ग्रहांच्या फलांचा अनुभव येऊं देणार नाहीं. स्वातंत्र्य ग्रहांच्या फलांच्या आड येतें. तसेंच तें फलांचा अनुभव येण्यासहि अवश्य आहे. कारण ग्रहांच्या केवळ अनुकूलतेवरून हातपाय न हालवितां कार्यसिद्धि होईल असें कोणीही म्हणणार नाहीं. म्हणून प्रयत्न करण्याला मूलभूत असलेलें स्वातंत्र्यच जर आपणांस नसेल, इकडे जायचें किंवा तिकडे जायचें हें दुसऱ्याच्या इच्छेवरच जर अवलंबून असेल तर तेथें ग्रहांचा अनुभव कसा यावा ? व ज्योतिष्यांनीं पारतंत्र्यस्थितीमध्यें फलें सांगण्याची उठाठेव तरी कशाला करावी ? हा सिद्धांत व्यक्तिशः तसाच समाजशः ही खरा असला पाहिजे. जो समाज परतंत्र आहे त्यांतील व्यक्तींचीं सर्व फलें वर्तविण्याच्या भरीस ज्योतिष्यांनीं पडूं नये. मराठी साम्राज्य असतांना पुष्कळांच्या कुंडलींत राजयोग असले पाहिजेत, पण आतां राजयोगाचीं माणसें जन्मासच येत नाहींत असें म्हणावयाचें काय ? शिवाजीच्या अगर अकबराच्या कुंडलींत बलिष्ठ ग्रह अगर उत्तम योग असतील, तशाच प्रकारच्या ग्रहयोगांवर हल्लींही माणसें जन्मास येत असतील; पण त्यांना राज्य तर राहोच पण हजारांत ज्यांचा पगार सांगतां येईल असें एकादें सेवापदही लाभणार नाहीं !

एवढ्याचकरितां लहान मुलांचे ग्रह पाहूं नयेत, असें शास्त्रकारांनीं ठरविलें आहे. अशा अवस्थेंत मूल असतांना त्याच्या ग्रहांची फलें कशीं अनुभवास येणार ? हातपाय हालवितां येत नाहींत व दूध दुसऱ्याकडून बोंडल्यानें पाजावें लागतें अशा तान्ह्या बालकाचे ग्रह मोठे पराक्रमी असले

तरी त्या बालकाला पराक्रम करून दाखविण्याचें सामर्थ्य असेपर्यंत ते ग्रह मुग्धावस्थेंतच असणार हें उघड आहे; ह्यावरून निष्पन्न इतकेंच होतें कीं फलें दृष्टोत्पत्तीस येण्यास शारीरिक व मानसिक ही दोन्हीं सामर्थ्यें माणसांत असलीं पाहिजेत. परंतु आपलें शरीर आणि मन हीं जर आपण दुसऱ्यास वाहिलेलीं असलीं तर ग्रहयोग उत्तम असूनही वायां जाणार. तात्पर्य, परतंत्रपणांत ग्रहांचा अनुभव येणार नाहीं. विवाहानंतर स्त्रियांच्या पत्रिका आपल्या इकडे कोणी पहात नाहींत ह्याचे कारण हेंच आहे.

ह्याशिवाय फलांचा अनुभव न येण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, आपण समाजापेक्षां व्यक्तीला ज्योतिषांत महत्व फार देतो. मनुष्य हा समाजाशीं निगडित आहे. समाजावर सुखदुःखाची लाट येईल त्याबरोबर व्यक्तिही वाहून गेल्याच पाहिजेत. व्यक्तींचें हिताहित देशाच्या हिंताहिताशीं अव्यभिचारानें संलग्न आहे. देशाचे ग्रह जर अनिष्ट असतील तर त्यांतील एकाद्या व्यक्तीचे ग्रह कितीही परमोच्च असले तरी त्याचा किमपिही उपयोग होणें नाही. देशाचे ग्रह अगोदर पाहून नंतरच व्यक्तींच्या ग्रहांचीं फलें तदनुरोधानें सांगितलीं पाहिजेत. तदभावीं, एखाद्या पत्रिकेंत शास्त्रपठित राजयोग आढळतांच हा मुलगा खचित राजा होणार असें सांप्रतच्या स्थितींत एखाद्या ज्योतिष्याने सांगितलें तर तो आपलें हसेंच करून घेईल ! शिवाय राजयोग म्हणजे काय ? हें तरी कोणी ठरविलें आहे ! एकाला जो राजयोग वाटेल, तोच दुसऱ्याला गुलामयोग वाटेल. हुकूम सोडण्याचें ज्याच्या हातांत नाहीं, दुसऱ्यांनीं सोडलेल्या हुकुमांची अमलबजावणी करणें एवढेंच ज्याचें काम, त्याच्यासंबंधानें हा शब्दप्रयोग करणें हास्यास्पद आहे. अगर देशकालाप्रमाणें सेवायोगालाच राजयोग शब्द लावणें भाग पडत आहे असें म्हटलें तरी चालेल. मनुष्य हा समाजाचा घटक आहे. त्याचें सुखदुःख दुसऱ्याच्या कृतीवर अवलंबून आहे. समाजांतील प्रत्येक व्यक्तीच्या लहान मोठ्या प्रत्येक कृत्याचा थोडाबहुत परिणाम दुसऱ्या प्रत्येक व्यक्तीवर होत असतो. इतके त्याचे हितसंबंध परस्परसंलग्न आहेत. तेव्हां समष्टीच्या ग्रहांच्या कार्यक्षेत्रापलीकडे व्यक्तीच्या ग्रहांचें कार्यक्षेत्र जाणें शक्य नाहीं. म्हणून ज्योतिषांनीं इतःपर व्यक्तीचीं वर्षफलें वर्तविण्याचा नाद सोडून देशाचीं फलें वर्तविण्यास लागावें हें बरें. ही गोष्ट अद्यापि यावी तशी लोकांच्या लक्षांत येत नाहीं असें

दिसतें. कारण, ह्या दिवसांत आगगाडीनें प्रवास करावयाचा असूनही मुहूर्त बघून निघणारी पुष्कळ मंडळी आढळते. एकाकी प्रवास करावयाचा असतो तेथें सुलग्न पहाणें युक्त होईल. परंतु जेथें हजारों माणसें एकाच अग्निरथांतून प्रवास करितात, तेथें एखाद्या प्रवाश्याचे त्याच्या प्रवासारंभीं कितीही अनिष्ट ग्रह असले तरी ते काय करूं शकणार ? कारण बाकीचे कांहीं प्रवासी सुमुहूर्तावर निघाले असणारच आणि आगगाडींतील एका मनुष्याला धक्का पोहोंचावयाचा म्हणजे त्याच्याबरोबर दुसऱ्याही कित्येकांना धक्का बसल्यावांचून सहसा रहावयाचा नाहीं. सारांश, सर्व लोकांचें शुभाशुभ जेथें एकाच गोष्टीवर अवलंबून असतें तेथें एखाद्या व्यक्तीनें मुहूर्त पहाणें अस्थानीं होय. नुकत्याच झालेल्या आगगाडीच्या आपघातांत सांपडलेल्या कित्येक सुज्ञान माणसांच्या कुंडल्या प्रसिद्ध करून त्यावरून त्यांचे ग्रह फार अनिष्ट होते व त्यांना मृत्यु आला तो बरोबर आला असें ज्योतिषशास्त्रावरून सांगण्याचा प्रयत्न कित्येक ज्योतिष्यांनीं केला आहे. पण त्यांस आमचे असें विचारणें आहे कीं, मेलेल्यापैकीं प्रत्येकाची कुंडली त्यांस माहीत आहे काय ? एखाद्याच्याही जरी पत्रिकेवरून त्यास आलेल्या मृत्यूचें कारण समजण्यासारखें नसलें तर ह्या ग्रहांची वाट कशी लावणार ? जेवढे लोक मेले तेवढ्या सर्वांच्या पत्रिकेंत मृत्युयोगच त्या वेळेस स्पष्ट दिसले पाहिजेत असें निश्चयानें कोणी ज्योतिषी सांगण्याचें धाष्टर्य करील असें आम्हांस वाटत नाहीं. समजाः—दहा माणसें एकत्र आहेत व प्रसंग आला तर सगळ्यांनाच तो सारखा भोंवला पाहिजे अशी स्थिति आहे. आतां त्यांपैकीं एकाचे ग्रह मृत्यु सुचवीत आहेत व बाकीच्या माणसांची ग्रहस्थिति मृत्युयोगकारक मुळींच नाहीं तर अशा प्रसंगीं नऊ माणसांना मरण आलें तर त्याचें कारण कोठें शोधावयाचें ? अर्थात् दुसऱ्याच्या ग्रहदशेंत नऊ माणसांचा मृत्यून्मूख अशा एका माणसाशीं सहवास झाला, हें त्या इसमांच्या आपत्तीचें कारण होय. या प्रसंगीं टिटानिक बोटीच्या अपघाताचें स्मरण वाचकांना चटकन् होईल. आतां टिटानिक बोटीच्या अपघातांत ज्यांना मरण आलें त्या प्रत्येकाचा मरणकाल कोणत्याही ज्योतिर्विदाला अगोदर निःसंदेह सांगतां आला असता असें जर म्हणणें असेल तर त्यास आमच्याजवळ कांहीं उत्तर नाहीं; कारण ही पुराव्याची गोष्ट आहे. पण आम्हांस तर तें अगदीं असंभवनीय दिसतें. सारांश, आमचें असें म्हणणें

आहे कीं, एका मनुष्याच्या ग्रहावरून कोणताही कष्टप्रद प्रसंग सूचित होत नाहीं, दुसऱ्या एखाद्या माणसाचा मृत्युयोग मात्र निःसंशय दिसून येतो. हीं दोन्हीं माणसें प्रसंगानें एकत्र झालीं तर एका माणसाच्या ग्रहांचा परिणाम दुसऱ्यावर होईल कीं नाहीं, हा प्रश्न आहे. आमच्या मतें ज्याचे ग्रह अत्यंत उत्कृष्ट फलदायक असतील त्या ग्रहांचा परिणाम दुसऱ्यावर झाल्याविना राहणार नाहीं. दोन माणसांचा संबंध जडला म्हणजे त्यापैकीं एकाच्या ग्रहाचा परिणाम दुसऱ्यावर होतो ही गोष्ट आपण कित्येक ठिकाणीं मान्य करितों. स्त्रीचे ग्रह अत्युच्च असतील तर त्या ग्रहांचा फायदा तिला मिळण्यापूर्वी तिच्या पतीस मिळणें अवश्य आहे, हें बहुधा सर्वसंमत आहे. पेशवाई बुडाल्याबरोबर खुद्द पेशव्यांचें घराणें राहो पण दुसरीं कित्येक थोर घराणीं एकदम अधोगतीस लागलीं. कित्येक लोक अन्नाला महाग झाले. सर्व राष्ट्राची राज्यलक्ष्मी विलयास गेली. त्यावेळीं ह्या सर्वांची रावापासून रंकापर्यंत ग्रहदशा अनिष्टप्रसंगसूचक होती अगर असलीच पाहिजे असें कोणी म्हणण्यास तयार आहे काय ? नुकत्याच पेढ्या बुडाल्या; त्यांचा परिणाम अनेक लहानमोठ्या स्त्रीपुरुषांवर झाला. ह्या प्रत्येकाच्या पत्रिकेंत गुदस्तां धनहानीचा योग होता काय ? सारांश समाजाच्या आपत्तींचीं कारणें व्यक्तीच्या पत्रिकेंत दृग्गोचर होतील असें वाटत नाहीं.

तसेंच कुटुंबांतील एका माणसाची पत्रिका पाहून फलें सांगण्यापूर्वी कुटुंबांतील बाकीच्या माणसांच्या पत्रिका पाहणें जरूर आहे. स्त्रीवियोग पाहणें असेल तर मातृसुख किती आहे, हेंही मुलांच्या पत्रिकेवरून पाहणें जरूर आहे. पण अशा रीतीनें सर्वांच्या पत्रिका पाहून फळ ठरविणारे ज्योतिषी दुर्मिळ. ह्या कारणास्तव पुष्कळ चुका होण्याचा संभव असतो. मनुष्याचा व्यवहार विविध व गुंतागुंतीचा, मनुष्यस्वभावाच्या असंख्य भिन्नभिन्न छटांचें वर्णन करणें दुर्घट; हींही कारणें फलानुभवाला विघातक आहेत. क, ख, ग अशीं तीन माणसें परस्परसबंद्ध आहेत. क, ख ह्यांच्या पत्रिकेवरून त्यांचा सलोखा राहील असें आहे. क, ग ह्यांचें तर चांगलेंच सख्य आहे. परंतु ख, ग ह्यांचें मात्र जमणार नाहीं असें त्यांच्या ग्रहांवरून दिसतें. आतां क, ग जर प्रेमाधिक्यानें शृंखलित असतील तर क, ख ह्यांचा संबंध कमी सुखाचा झालाच पाहिजे. तेव्हां नुसत्या क, ख ची

पत्रिका पाहून त्यांच्यांत प्रेम वसेल म्हणून वर्तविणाऱ्या ज्योतिर्विदाची वासलात काय करावी ?

क्रूर व सौम्य असे ग्रहांचे दोन वर्ग आहेत. क्रूर ग्रहांचीं फलें अनुभवास येतात तशीं सौम्य ग्रहांचीं येत नाहींत. व्यवहारांतही असाच अनुभव आहे. दुष्ट मनुष्य—मग तो किती कां क्षुद्र असेना—दुसऱ्यास सहज त्रास देऊं शकतो. पण तेंच सज्जन माणसांच्या हातून दुसऱ्याचें कल्याण चटकन् होऊं शकत नाहीं. निद्राभंग कोणत्याही तद्विषयक औषधानें निश्चयानें करतां येतो. ढेंकूण, पिसवा, डांस हीं तर प्रत्यहीं मनुष्यांवर जुल्म व अन्याय करीत असतात ! पण निद्रा येण्याला वैद्यांचीं नामांकित औषधें पुष्कळ वेळां लटपटतात. पापग्रह अकरावे आले असतां जितकी फायदा होण्याची खात्री जास्त तितकी शुभग्रह तत्स्थानीं आले असतां कमी.

शिवाय, नानाविध योगांचीं परस्परविरुद्ध फलें एकवटून त्यांतून संकीर्ण फळ बरोबर सांगतां येण्यास लागणारा भरपूर अनुभव पुष्कळांना नसतो. ह्याखेरीज ह्या शास्त्रांत मतांतरेंही कमी नाहींत. परंतु त्याविषयीं लिहिण्याचा आमचा विचार नसल्यामुळें ह्या गोष्टीचा फक्त उल्लेखच केला आहे. आमचा मुख्य मुद्दा असा आहे कीं, मनुष्याला समाजापासून विलग करतां येत नाहीं. समाजाचा तो घटक आहे. त्याचें सुखदुःख समाजांतील इतर व्यक्तींवर अवलंबून असतें. आतां एकाद्याच्या नशिबांत सुख असेल तर तें इष्टच असतें; परंतु दुःख असल्यास त्याचा परिहार करण्यास प्रत्येक मनुष्य झटत असतो. तरी ह्या कामीं उत्तम उपाय म्हटला म्हणजे समाजसेवेंत मनुष्यानें आपलें आयुष्य खर्च करावें. समजा. एखाद्याच्या पत्रिकेवरून अकालीं मृत्युयोग दिसत आहे तो इसम जर समाजास अतिशय उपयोगी असेल तर त्याच्या एकट्याच्या मृत्यूनें पुष्कळांची हानि होत असल्यामुळें समाजाच्या दैवबलानें त्याचा अकालीं मृत्यु टळेल असं मानणें अगदींच असमंजसपणाचें होणार नाहीं. तात्पर्य, सुख प्राप्त करून घेणें व दुःख टाळणें हीं दोन्हीं मनुष्याच्या स्वाधीन आहेत मग त्याचे ग्रह कसेही असोत. ग्रहांवर सर्वस्वी अवलंबून राहणें निव्वळ वेडेपणाचें आहे.

# ९ संतांची कामगिरी.



महाराष्ट्रांतील ज्ञानेश्वरादि संतांनीं भक्तिमार्गाचें पुनरुत्थापन करून विठ्ठलभक्तीचा उत्कर्ष केला, पंढरीच्या वाऱ्या करण्याचा प्रघात पाडला, व सर्व समाजाच्या भक्तीचा ओघ एकवटून तिचा प्रवाह एकाच मार्गानें लावून दिला. समाजांतील प्राकृत जनांसही संस्कृतांतील भक्तितत्त्वाचें द्वार खुलें व्हावें एतदर्थ त्यांच्याच भाषेंत संतांनीं ग्रंथरचनाही केली. हें जें संतांनीं कार्य केलें त्याबद्दल कोणाचाच मतभेद नाहीं. हें कार्य दृश्य असल्यामुळें शिक्षितांना तसेंच अशिक्षितांनाही तें सहज समजलें. परंतु ह्या कार्याच्या महत्वाची यथार्थ कल्पना येण्याकरितां ह्या कार्याच्या बुडाशीं संतांचा कोणता हेतु होता, त्यांत संतांचा मुत्सद्दीपणा व दूरदर्शित्व कसें दिसून येतें, हें समजणें अवश्य आहे. संत म्हणजे केवळ टाळकुटे असें म्हणून कोणी त्यांचा उपरोध करतात, तर कोणी सद्गोलंकाराचें पातक त्यांच्या माथीं मारतात. ह्याशिवाय आणखी कित्येक ब्राह्मण्याला त्रासून ब्राह्मण्याचा नायनाट करण्याच्या हेतूनें संतांनीं हें भक्तिरूप शास्त्र मुद्दाम निर्माण केलें असें म्हणून संतांची थोरवी गातात. हें तिसरें मत न्या. रानडे यांनीं आपल्या

---

१ रा. वि. का. राजवाडे यांचें हें मत असून, तें त्यांनीं "मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें" ह्यांपैकीं एका खंडांत प्रदर्शित केलें आहे. रामदास व इतर संत ह्यांच्यांत जमीनअस्मानाचा फरक होता, ही गोष्ट निर्विवाद आहे. रामदासांची कामगिरी उच्च दर्जाची आहे. त्यांची मठस्थापनेची कल्पनाही अपूर्व आहे. तसेंच इतर संत व रामदासी ह्यांच्यांत मतभेद आणि आचारभेदही आहे. किंबहुना आमच्या मतें रामदासीपंथाचा संतपंथांत अन्तर्भाव करणेंही गैर आहे. तथापि तेवढ्यावरून ज्ञानेश्वरादि संत केवळ टाळकुटे होते हें म्हणणें चुकीचें दिसतें.

**मराठ्यांच्या इतिहासांत** प्रदर्शित केलें आहे. प्रस्तुत लेखांत ह्या मताच्या युक्तायुक्ततेची छाननी करण्याचा विचार आहे. प्रथमतः ब्राह्मण्याला संतांनीं शह लाविला म्हणजे काय ह्याचा विचार केला पाहिजे. ब्राह्मण्य या शब्दानें ब्राह्मणांचें सोंवळें ओवळें, ब्राह्मणांचा जातिभेद, ब्राह्मणांचें आन्हिक कर्म, ब्राह्मणांच्या धर्म–समजुती, ब्राह्मणांचें यज्ञयाग इत्यादिकांचा बोध होतो. आतां कोणत्या संतानें आपली मुलगी आपल्या जातीच्या बाहेर दिली, अगर अन्य जातीची मुलगी आपल्या घरांत आणली, अथवा जातिभेद झुगारून देऊन पंक्तिप्रपंच न करितां वाटेल त्यांच्याकडे संत अन्नसेवन करीत असत; तसेंच ब्राह्मणसंत स्नानसंध्यादि कर्मांचा त्याग करून ओवळ्यानें अन्नग्रहण करीत; असें जोंपर्यंत उदाहरणानें दाखवितां येत नाहीं तोंपर्यंत ब्राह्मण्यहानि सिद्ध होणें शक्य नाहीं. व संतांचा ब्राह्मणपणा आणि भक्तिमार्ग यांचें साहचर्यच जर दृष्टोत्पत्तीस येतें तर एकाला मूठमाती देण्याकरितां दुसऱ्यास जन्मास घातलें ही कल्पना संतांच्या संबंधानें कशी करतां येईल, याचें आम्हांस मोठें गूढ वाटतें. वरील मताचें वैय्यर्थ सिद्ध होण्यास फारशी अडचण पडणार नाहीं असें वाटतें. युरोपखंडांत रोमन कॅथोलिक पंथावर प्रॉटेस्टंटांनीं विजय मिळविला तसाच प्रकार संतांचे संबंधानेंही घडला आहे असेंही प्रतिपादण्यांत येतें. परंतु या दोहोंमध्यें कोणत्याही प्रकारचें साम्य दिसत नाहीं. युरोपांतील धर्मक्रांतीचा प्रकार म्हणजे एका मताचें समूळ उच्चाटन करून त्या ऐवजीं नवीन पंथाची अगर मताची स्थापना करणें हा होय. पण महाराष्ट्रांतील संतांना कशाचाही उच्छेद करावयाचा नव्हता. त्यांचें कार्य संघटनात्मक स्वरूपाचें होतें. आमच्या मतें सर्व समाज एकजीव करण्याकरितां, सर्व समाजांत बंधुप्रेम उत्पन्न करण्याकरितां, व विस्कळित झालेल्या समा-

---

१ "प्राचीन अधिकार व प्राचीन संप्रदाय हिंदुस्थानांत.....ब्राह्मण जातीमध्यें दृढतर खिळून गेले होते. व या ब्राह्मणजातीच्या प्रभुत्वाविरुद्ध साधुसंत मोठ्या धैर्यानें झगडत होते."

मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष.
ग्रंथमाला–भाषांतर

जाला संकलित करण्याकरितां, संतांनीं भक्तिमार्ग उपदेशिला.[1] ज्ञानेश्वराचे वेळीं समाजाची जी स्थिति होती त्या स्थितीचा विचार केला म्हणजे संतांनीं योजिलेला उपाय किती रामबाण होता हें कळून येईल. वास्तव हिंदुसमाजाचीं स्थित्यंतरें आरंभापासून बाराव्या शतकापर्यंत कसकशीं झालीं ह्याचा थोडक्यांत निर्देश करणें अवश्य आहे.

वेदांतील प्रमाणांवरून हिंदुस्थानांतील आर्यांचें मूळ वसतिस्थान उत्तर ध्रुवावर होतें हा **टिळकां**चा सिद्धांत आतां बहुतेक विद्वन्मान्य झाल्यामुळें तो निर्विवाद म्हणून घेऊन चालण्यास हरकत नाहीं. ऋग्वेदावरून असें दिसतें कीं, उत्तरध्रुवावर आर्यांच्या बरोबरच दस्यू, अहि, दानु, यातुधान, नराशंस, इत्यादि अनार्यांचाही दुसरा एक समाज होता. दुसरी एक विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे, या दोन समाजांतील लोकांची नेहमीं भांडणें होत असत. या दासांचा व आर्यांचा मिलाफ कधींहि झालेला दिसत नाहीं. पुढें बर्फाच्या योगानें उत्तरध्रुवावरून जेव्हां या दोन समाजांतील लोकांना खालीं यावें लागलें तेव्हां वेदानुयायी आर्य हिंदुस्थानांत येऊन येथेंच त्यांनीं आपलें वास्तव्य केलें. परंतु वेदबाह्य जे उपरिनिर्दिष्ट दास ते आपल्या शत्रूंबरोबर हिंदुस्थानांत आले, अशाबद्दल कांहीं पुरावा नाहीं. हे लोक युरोपखंडांतच राहिले असावे. हिंदुस्थानांत आल्यावर आर्यांचा शूद्रांशीं संबंध झाला. दासांबरोबर सतत लढाया करून त्रस्त झालेल्या आर्यांनीं शूद्राच्या संबंधानें एक मोठा अपूर्व प्रयोग करून पहाण्याचा निश्चय केला. शत्रूंबरोबर कलह करून व युद्धांत त्यांना मारून त्यांचा बीमोड करण्याचे नादीं न लागतां त्यांना आपल्यामध्यें घेऊन त्यांच्याशीं सलोखा करून, त्यांची उन्नति करून त्यांना आपणासारखें करून सोडावें ही इच्छा त्यांनीं मनांत बाळगिली, व या इच्छेचेंच पहिलें स्वरूप चातुर्वर्ण्यस्थापनेंत[2] दिसून येतें. चातुर्वर्ण्यांत शूद्रांना

---

१ उलट ज्ञानेश्वर काय म्हणतात पहाः—" सांघें शूद्रगृहीं आघवीं । जन्हि पक्वान्नें आथि बरवीं । तीयें द्विजें केंवि सेवावीं । दुबला जन्हें ॥ "

२ हिंदुस्थानांत आर्यांची वस्ती होण्यापूर्वी चातुर्वर्ण्यव्यवस्था नव्हती असें आम्हांस वाटतें. चतुर्वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र. ह्याशिवाय निराळीं नांवें कोठेंही आढळत नाहींत. आणि शूद्र हा शब्द तर

सामील करून घेण्याचा उद्देशच असा कीं, शूद्रांची तद्द्वारा धार्मिक उन्नत्ति व्हावी. 'शूद्रो वर्णश्चतुर्थोऽपि वर्णत्वाद्धर्महर्हति ।' ह्या वचनावरून वरील अनुमान खरें ठरतें. ह्याशिवाय, ब्राह्मणादि द्विज हे शूद्रस्त्रियांबरोबर विवाह करूं लागले तेव्हां तर हे दोन समाज अधिकच एकजीव झाले. आर्यानार्यांच्या एकीकरणाचा हा प्रयोग जगाच्या इतिहासांत पहिलाच होय. परंतु या वैवाहिक संबंधाचे कांहीं अनिष्ट परिणाम ब्राह्मणांच्या लक्षांत येऊन त्यांनीं पुढें अशा प्रकारचे विवाह बंद केले. तथापि क्षत्रिय व वैश्य यांचा मात्र शूद्रस्त्रियांबरोबर विवाह करण्याचा प्रघात तसाच चालू राहिला. हीन संस्कृतीच्या स्त्रिया घरांत येतांच क्षत्रिय वैश्यांची संस्कृतिही लुप्तप्राय झाली, व त्यामुळें क्षत्रिय व वैश्य हे दोन वर्ण शूद्रांत समाविष्ट झाले. याचाच अर्थ शूद्र किंवा शूद्रतुल्य समाज वाढत चालला. ही सर्व क्रांति हळू हळू भारती युद्धाच्या पूर्वकालीं होत होती. भारती युद्धानें ह्या क्रांतीला अधिकच गति मिळाली. कारण भारती युद्धांत पुष्कळच क्षत्रिय कुलांचा ऱ्हास झाला, ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे.

---

सगळ्या ऋग्वेदांत एकच ठिकाणीं—म्हणजे पुरुषसूक्तांत—आला आहे. पुरुषसूक्त हें ऋग्वेदांतलें अगदीं अखेर रचलेलें सूक्त असावें, ही गोष्ट सर्वसम्मत आहे. ह्यावरून चातुर्वर्ण्यव्यवस्थाही आर्य हिंदुस्थानांत आल्यानंतरची आहे हें अनुमान निघतें. हिंदुस्थानांत येण्यापूर्वी पंचजनात्मक समाज होता, चातुर्वर्ण्यात्मक नव्हता. कृतयुगामध्यें एकच वर्ण होता, असें मत्स्यपुराणांत म्हटलें आहे; " यथा कृतयुगे पूर्वमेकवर्णमभूत्किल. " प्रजापतीनें यज्ञ केला, व नंतर ब्राह्मण आणि क्षत्रिय अशा दोन जाति निर्माण केल्या अशी ऐतरेय ब्राह्मणांत एक आख्यायिका आहे. ( आ. ४२ ) अर्थात् त्यावेळीं एकाचे दोन वर्ण झाले होते. प्रथम दोन जाति होत्या नंतर त्रेता युगांत तीन झाल्या, असें रामायणांत म्हटलें आहे. त्रेता युगांत आर्य हिंदुस्थानांत आले असावे असा तर्क आहे. ह्यावरून चातुर्वर्ण्याची रचना शूद्रांना घेऊन ह्या देशांत करण्यांत आली हें उघड होतें.

१ जातो नार्यामनार्यायामार्यादार्यो भवेद्गुणैः ।
जातोऽप्यनार्यादार्यायामनार्य इति निश्चयः ॥
तावुभावप्यसंस्कार्याविति धर्मो व्यवस्थितः ॥ " मनु.

ह्यापुढें आपणांस क्षणभर बौद्धधर्माकडे वळलें पाहिजे. इसवीसनापूर्वीच हिंदुस्थानांत बौद्धधर्माचा फारच प्रसार झाला होता. हिमाचलापासून कन्याकुमारीपर्यंत सर्वत्र पूर्वी असलेल्या आर्यधर्मानुयायांनीं बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. बौद्ध धर्मांत जातिभेद नसल्यामुळें द्विज आणि शूद्र या दोघांचीही धर्मांतर केल्यावर एकच जात होऊन बसली. एवंच मोठा थोरला समाज बौद्ध बनला होता, ही गोष्ट नाकारतां येण्यासारखी नाहीं. पुढें बौद्धधर्माचा ऱ्हास झाल्यावर ह्या देशांत कोठेंच बौद्धधर्मानुयायी उरले नाहींत, असा प्रसंग आला. हिंदुस्थानांतील बौद्धांनीं देशत्याग करून चीन किंवा जपान या देशांत वस्ती केल्याचें इतिहासांत कोठेंच नमूद नाहीं. तेव्हां हा एवढा समाज परत हिंदुधर्मांत अंतर्भूत झाला असेंच अनुमान करणें प्राप्त होतें.[1]

ह्याच सुमारास चातुर्वर्ण्य बहुतेक नाहींसें होऊन द्विवर्णात्मक समाज झाला होता. ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर इंच सामान्यतः समाजाचीं दोन प्रमुख अंगें झालीं. अर्थात् ब्राह्मणेतर बहुसंख्याक व ब्राह्मण अल्पसंख्याक अशी स्थिति झाली. हिंदुस्थानांत ज्या वेळेस आर्य आले त्यावेळेस आर्येतर संस्कृतिहीन तर होतेच, पण त्यांचा एक संघटित समाज नसल्यामुळें एका अर्थानें बहुसंख्याकही नव्हते, असें मानण्यास हरकत नाहीं. आर्यांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य इतक्यांचा अंतर्भाव होत होता. त्यांची वस्तीही विस्कळित नसून एकेच ठिकाणीं होती. त्यामुळें संस्कृतिहीन, संघहीन, विद्याहीन, अशा अनार्यांवर आर्यांची छाप पडणें अगदीं स्वाभाविक होतें. पण ज्ञानेश्वरांच्या पूर्वी हा सर्व प्रकार बदलला होता. त्यावेळचे शूद्र सुविद्य, आचारसंपन्न, धर्मपरायण आणि बहुसंख्याक असे होते. अशा समाजामध्यें पुन्हां चातुर्वर्ण्याचें पुनरुजीवन करण्यासारखी परिस्थिति नव्हती. बौद्धधर्माला कंटाळून बौद्धधर्मीयांचें परावर्तन हिंदुधर्मांत जरी झालें होतें तरी हिंदुधर्माचें पूर्ववत् आचरण करण्यास हा समाज सर्वस्वी तयार होणें शक्य

---

१ या बाबतींत डब्ल्यू. टी. उइकिन्स ह्यांचें निराधार मत अथवा तर्क कोणासही मान्य होणार नाहीं.

२ यथा यथा हि सद्वृत्तमातिष्ठत्यनुसूयकः ।
तथा तथेमं चामुं च लोकं प्राप्नोत्यनिन्दितः ॥

मनु.

नव्हतें. एवढ्या मोठ्या समाजाला धर्माचा कोणता मार्ग काढावा, हा तत्कालीन लोकाग्रणींच्या पुढें प्रश्न होता. ह्या प्रश्नाचा निकाल संतांनीं कसा दिला हें आपण पाहिलेंच आहे. भागवतधर्माचा प्रसार करून सर्व लोकांना एका ठिकाणीं जमतां येईल, शूद्र अंत्यजादि सर्व जातींच्या लोकांना एकाच देवतेची भक्ति करतां येईल, अशी त्यांनीं योजना केली. पंढरीचा विठोबा हाच सर्वांचा देव. ह्या देवासमोर लिंगभेद नाहीं, मतभेद नाहीं. सर्वच वैष्णववीर, परस्परांनीं परस्परांना प्रेमपुरःसर आलिंगन द्यावें, नमस्कार करावा, आणि उपदेशामृतपान करावें, असा हा पंढरींतील अपूर्व महिमा संतांनीं घडवून आणिला. स्त्रीशूद्रादिक समाजांत धर्ममतांचा प्रसार करण्याच्या हेतूनें ग्रंथलेखनाची भाषा संस्कृतांतून प्राकृतांत आणली एवढेंच नव्हे, तर विठोबा हें एक नवीनच दैवत स्थापन केलें. यामध्यें संतांचा अतुल मुत्सद्दीपणा दिसून येतो. पूर्वींच्याच देवांपैकीं एखादा देव पुढें आणण्याचा प्रयत्न केला असता तर त्यांना यावें तसें यश आलें नसतें. गाणपत्यांचा विरोध वैष्णवांशीं, वैष्णवांचा शैवांशीं, शैवांचा देवीभक्तांशीं, व देव्युपासकांचा खंडोबाच्या भक्तांशीं, असा प्रकार असल्यामुळें कर्नाटकांतून एक नवीनच देव महाराष्ट्रांत आणून संतांनीं त्याच्या उपासनेचा नवीन मार्ग काढला. न्यायमूर्ति रानडे म्हणतात कीं, असें करून संतांनीं ब्राह्मणेतरांना ब्राह्मणाच्या योग्यतेस चढविण्याचा उपक्रम केला[1]. ही गोष्ट निःसंशय खरी आहे. तथापि संतांच्या पूर्वी ऋषींच्या हातून असे प्रयत्न झाले नाहींत हा जो अर्थ त्यांनीं ध्वनित केला आहे तो मात्र आम्हांस मान्य नाहीं. आमच्या मतें पूर्वपरंपरेला अनुसरूनच, पण नवीन परिस्थितीला अनुरूप, असेंच हें संतांचें कार्य होतें. शूद्रांचा दर्जा पूर्वीच्या ऋषींनीं वाढविला, व या वाढलेल्या दर्जाला उचित असें वर्तन आपण त्यांच्या संबंधानें ठेविलें पाहिजे, असेंही मत सूत्रकारांनीं व पुराणकारांनीं प्रदर्शित केलें आहे. " आर्यानार्ययोर्व्यतिक्षेपे कर्मणः साम्यम् । " असें गौतमसूत्र आहे. ह्या सूत्रावरील टीका येणेंप्रमाणें:—' आर्यः त्रैवर्णिकः

---

१. शूद्रवर्गाला पारमार्थिक शिक्षण देऊन, त्यांचें समाजामध्यें महत्त्व वाढवून ब्राह्मणांच्या तोडीस या चळवळीनेंच आणून बसविलें.
" मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष. "

अनार्यः शूद्रः तयोः कर्मणः आचारस्य व्यतिक्षेपे व्यत्यासे सति तयोः साम्यमेव भवति । न परिचार्यपरिचारकभावः ' पुढील उतारा मत्स्यपुराणांतील आहेः—

" कर्मभिः शुचिभिर्देवि शुद्धात्मा विजितेन्द्रियः ।
शूद्रोऽपि द्विजवत्सेव्य इति ब्रह्माऽब्रवीत्स्वयम् ॥ "

ह्यावरून शूद्रांची उन्नति करण्याचा उपक्रम ज्ञानेश्वरप्रभृति संतांनींच केला असें नव्हे तर त्यांच्या अगोदर ऋषींनींही केला होता. संतांनीं परंपरा पुढें चालविली एवढेंच. आर्यांचा व शूद्रांचा संबंध कलहांत, द्वेषांत, मत्सरांत झालाच नाहीं. शूद्रांना आपणांत समाविष्ट करून घेऊन त्यांना आपल्या योग्यतेला चढविण्याचा हेतु प्रथमपासूनच द्विजांचा दिसून येतो. म्हणून ह्या बाबतींत न्या. रानड्यांचें म्हणणें मान्य होण्याजोगें नाहीं. हिंदुसमाजाच्या संघटनेचा अभ्यास शास्त्रोक्तपद्धतीनें होत नसल्यामुळें अशा चुका होण्याचा संभव असतो. वरील त्रोटक विवेचनावरून संतांच्या कामगिरीची यथार्थ कल्पना करतां येईल, अशी आशा करून हा लेख पुरा करतों.

# १० स्नेह.

पापान्निवारयति योजयते हिताय । गुह्यं च गूहति गुणान् प्रकटीकरोति ॥
आपद्गतं च न जहाति ददाति काले । सन्मित्रलक्षणमिदं प्रवदन्ति सन्तः ॥

सांप्रतच्या कौटुंबिक व सामाजिक ऱ्हासाचा विचार करीत असतां, आपल्या समाजांत स्नेहबुद्धीचा पूर्ण अभाव वसत आहे ही गोष्ट प्रमुखत्वानें पुढें येते. आतां समाजाची अवनति व स्नेहबुद्धीचा अभाव ह्यांत कार्यकारणभाव कसा आहे हें निश्चित करणें जरी कांहीं अंशीं दुर्घट असलें, तरी आपला समाज विगलितेन्द्रिय झाला आहे हें सिद्ध करण्यास स्नेहबुद्धीचा अभाव हें उत्कृष्ट साधन आहे, ह्यांत संदेह नाहीं. हा विचार कित्येक दिवस मनांत घोळत असल्यामुळें, आपल्या समाजांत हल्लीं ज्यांना स्नेही म्हणतां येईल असे भाग्यशाली पुरुष कोणी आहेत कीं काय ह्या जिज्ञासेनें प्रेरित होऊन निरीक्षण करीत असतां, नकारार्थीच अनुभव आला. एवढेंच नव्हे तर विरुद्ध क्रियाच जास्ती जोरांत आहे असें आढळून आलें. हवा खाण्यास बाहेर पडलेल्या दोन दृढपरिचित गृहस्थांची मार्गांत भेट झाल्यास व एकानें दुसऱ्यास अमुक ठिकाणीं आज फिरावयास जाऊं असें म्हटल्यास, दुसरा ही विनंती मान्य करीलच इतकाही भरंवसा देतां येणार नाहीं. मग स्नेहाच्या गोष्टी एकीकडेच राहिल्या ! इतकी विस्कळित स्थिति आपल्या समाजाची झाली आहे. घरोबा हा शब्द हल्लीं कोशांतच आढळतो. कोशाच्या बाहेर त्याला अस्तित्वच नाहीं.

परंतु पूर्वी हा प्रकार खास नसला पाहिजे. स्नेहशीलपणाला प्राचीन ग्रीस देशांत तसेंच आपल्या देशांत फार प्राधान्य दिलें जात होतें. स्नेही अगर मित्र हा एक आपल्या कुटुंबांतीलच आहे अशी आमची समजूत होती. स्नेह्याच्या मृत्यूनंतर अशौच्य धरणें व त्यास उदक देणें ह्यावरून ही गोष्ट चांगली प्रत्ययास येते. अरिस्टॉटलनें तर आपल्या सर्वमान्य नीति-

शास्त्रावरील ग्रंथांत ह्या विषयाचा विस्तृत व शास्त्रीय ऊहापोह केला आहे. व आम्हीही हा विषय आज हातीं घेण्याचें कारण समाजांतील हें मुख्य व्यंग लोकांच्या निदर्शनास आणावें हेंच आहे.

स्नेह हा शब्द संस्कृत स्निह् ह्या धातूपासून झाला आहे. 'स्निग्ध' हें त्यापासून विशेषण आहे. अंगाला लावलेलें तेल जसें अंगाशीं एकजीव होतें, तद्वत् आपल्या स्नेह्याचा व आपला एकजीव झाला पाहिजे.

ज्याप्रमाणें पुरुषाला स्त्रीची आवश्यकता आहे त्याचप्रमाणें स्नेह्याचीही आहे, असें आम्हांस वाटतें. ह्या संसारामध्यें एकाद्यास मातृसुख, पितृसुख, पुत्रसुख, स्त्रीसुख, बन्धुसुख ह्यांपैकीं एकादें कमी असल्यास त्या माणसास जसें आपण दुर्दैवी समजतों, तसेंच वरील सर्व सुखें असून 'मित्रसुख' जर नसेल तरी सुद्धां त्याच्या सुखाला न्यूनत्व आल्याशिवाय रहात नाहीं. सर्व प्रकारचीं सुखें उपलब्ध आहेत; पण मित्रसुख जर नसेल तर कोणीही मनुष्य खुषीनें जगण्यास तयार होणार नाहीं, हें अरिस्टॉटलचें म्हणणें अक्षरशः खरें आहे. (Without friends no one would choose to live even if he had all other goods. Book V I I I.) आईच्या सहवासापासून जें सुख होईल तें पुत्रापासून होणार नाहीं; पुत्रापासून मिळणारें सुख स्त्रीपासून लाभणार नाहीं; आणि स्त्रीसुखाचा अनुभव पित्याच्या ठिकाणीं येणार नाहीं. त्याचप्रमाणें मित्रसुखाची उपलब्धि कुटुंबांतील वर निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही माणसाकडून होणें शक्य नाहीं. ह्याचें कारण असें आहे कीं, ह्या प्रत्येकासंबंधानें आपल्या मनोवृत्ति भिन्न भिन्न असतात. स्त्रीच्या आलिंगनानें ज्या मनोवृत्ति क्षुब्ध होतात त्यांहून अत्यंत भिन्न अशा मनोवृत्ति सुतालिंगनानें प्रादुर्भूत होतात. पिता आणि पुत्र दोघेही आपणांस प्रिय असतात, तथापि पित्याच्या संबंधानें जी आपली मनोवृत्ति असते तद्भिन्न मनोवृत्ति पुत्राच्यासंबंधानें असते. तोच प्रकार मित्राचा आहे. माणसाच्या ह्या अन्तःकरणांत असणारी स्नेहविषयक वृत्ति अगदीं स्वतंत्र आहे. तेव्हां आपणांस स्नेही नसेल तर त्याचा अर्थ असा कीं, आपलें मन अपरिपक्व आहे. त्याचा पूर्ण विकास झाला नाहीं म्हणून त्यांत स्नेहवृत्ति उत्पन्न होत नाहींत. आपणां बहुतेकांना आईबाप, बायकामुलें असतात; पण तत्तद्विषयक वृत्ति आपल्या सर्वांच्या मनांत सारख्याच विकसित झालेल्या आहेत असें म्हणतां येणार नाहीं. विवाहपद्धतीमुळें

कुटुंब बनतें; व कुटुंबांतील कांहीं माणसांचा व आपला संबंध तद्विषयक मनोवृत्ति उत्पन्न होण्यापूर्वीच घडतो. त्यामुळें आपणांस आपल्या मनोवृत्तींचें खरें स्वरूप कळत नाहीं. पण स्नेहाची गोष्ट तशी नसते. मनोवृत्ति उद्भूत झाल्यावांचून स्नेहसंबंध घडत नाहीं. ह्यावरून आपल्या समाजाची मानसिक अवनति किती झाली आहे हें निदर्शनास येईल. नीतिदृष्ट्या ही फार मोठी हानि आहे. सर्वांगांनीं जर मन पूर्ण विकास पावलें नसेल तर मनुष्यत्वालाच कमीपणा येतो, असें आम्हांस वाटतें. मातापिता, स्त्री, बंधु इत्यादिकांच्या संबंधानें सुद्धां आमच्या मनोवृत्ति असाव्यात तशा नाहींत. परंतु वृत्ति असोत वा नसोत, ह्यांचा संबंध जडणें त्यांवर अवलंबून नसल्यामुळें वृत्तीचें वैगुण्य आपल्यास प्रमुखत्वानें भासत नाहीं. परंतु सूक्ष्म विचार करणारास योग्य मनोवृत्तींचा ऱ्हास हेंच समाजाच्या विस्कळित स्थितीचें कारण आहे असें दिसून येईल.

आपल्या समाजांत हल्लीं परस्पर स्नेह कोठें आढळत नाहीं असें आम्ही गृहीत धरूनच चाललों आहों. ज्यांस ही गोष्ट मान्य असेल त्यांस ह्या समाजाच्या अवनतीचें आणखी एक प्रमाण आढळून येईल. कारण, स्नेहाचें बीज सद्गुणांतच रुजतें. तेव्हां स्नेह जेथें नाहीं तेथें सद्गुणही नाहीं हें अनुमान अगदींच चुकीचें ठरणार नाहीं. ह्यावरून ह्या विषयाचें महत्त्व फार आहे हें कोणासही पटेल असें वाटतें.

स्नेहवृत्ति हें मनाचें कार्य असल्यामुळें माणसांमाणसांतच स्नेह असणें शक्य आहे. निर्जीव पदार्थांबद्दल आपल्या ठिकाणीं स्नेहबुद्धि असूं शकणार नाहीं, म्हणून राष्ट्राराष्ट्रांतही स्नेह असणें अशक्यच आहे. कारण राष्ट्र ही एक व्यक्ति नाहीं.

आतां स्नेहाचा पाया सद्गुणांत आहे हें वर सांगितलेंच आहे. त्यावरून दुर्गुणी अगर निर्गुणी माणसांत स्नेह असणें शक्य नाहीं हें उघड होतें. दारुबाज, जुगारी, दरोडेखोर इत्यादि दुष्ट लोकांचें ऐक्य लवकर होतें, व ते एकजुटीनें कामेंही करतात. पण परस्परांविषयीं स्नेहवृत्ति त्यांच्यांत असत नाहीं. सर्वांचा हेतु एक असल्यामुळें तो साधण्याकरतां दरोडेखोर एकत्र होतात, परंतु स्नेह घडून येण्याला मुळीं हेतुच लागत नाहीं; एवढेंच नव्हे तर हेतु मनांत असतांच कामा नये. कोणता तरी हेतु मनांत धरून आपण दुसऱ्याबरोबर सख्य ठेवतों त्यास स्नेह म्हणतां यावयाचें

नाहीं. ज्या कार्याकरतां असले स्नेह घडून येतात तें कार्य संपतांच ते नष्ट होतात. परंतु खरा स्नेह प्रायः चिरकालीन असतो. कारण तो मनाचा धर्म आहे. तेव्हां मनच विकृत होईल त्याच वेळेस खरा स्नेह लुप्त होण्याची भीति असते. एकंदरींत स्नेहाचा सद्गुणाशीं अन्वयव्यतिरेकी संबंध आहे हें सिद्ध होतें.

आजपासून आपण स्नेही होऊं असें म्हणून स्नेह बनत नसतो. करारानें कोणी स्नेही होत नाहींत. दोन सद्गुणी माणसांचा परिचय व सहवास झाल्यावर हळूहळू स्नेह घडून येतो. चोर एकत्र जुळून दरोडा घालतात, त्यांच्यामध्यें स्पष्ट नसला तरी गर्भित करार असतो. तात्पर्य, स्नेह केव्हांही एकदम जुळत नाहीं. अशा रीतीनें दोन सद्गुणी माणसांमध्यें खरा जडलेला स्नेह क्वचितच अनुभवास येतो. स्नेहाच्या नांवाखालीं सर्वसामान्य हेतु अगर व्यसन ह्यांच्या योगानेंच एकवटलेले लोक बहुधा दृष्टीस पडतात. ह्यांचा हेतु समान असला तरी मनोवृत्ति विसदृश असतात. त्यामुळें असल्या लोकांचा स्नेह क्षणिक असतो. तो शाश्वत टिकणारा नाहीं. परंतु सद्गुणी माणसांच्या स्नेहाची गोष्ट तशी नसते. त्यांचा स्नेह चिरकालीन असतो. नेहमीं एके ठिकाणीं ज्यांची बैठक असते अशा लोकांत वितुष्ट आलेलें आपल्या वारंवार अनुभवास येतें. त्याचें वस्तुतः कारण हेंच कीं, सद्गुणांत त्यांच्या सहवासाचें मूळ नसतें.

स्नेह्यांच्या मनांत परस्परांविषयीं सदिच्छा वसत असली पाहिजे; व जें कांहीं चांगलें असेल तें आपल्या मित्राला असावें, अशीच स्नेह्यांची परस्परांशीं बुद्धि असावी लागते. म्हणूनच दुर्गुणी लोकांत स्नेह असणें शक्य नाहीं असें आम्ही म्हटलें. प्रारंभीं दिलेल्या श्लोकांतील प्रथम चरणावरून भवभूतीचाही उद्देश तोच दिसतो.

आतां परस्परांविषयीं सदिच्छा असली म्हणजे त्यांस स्नेही म्हणतां येईल असें मात्र नाहीं. तर स्नेह घडण्यास ही गोष्ट परस्परांस माहीत असावी लागते. नुसती माहीत असूनही उपयोग नाहीं; त्यांचा सहवास घडावा लागतो. कारण चांगल्या माणसांत इतरांविषयीं सदैव सदिच्छाच वसत असते. परंतु तेवढ्यावरून त्यांस स्नेही म्हणतां येणार नाहीं. तसेंच इंग्लंडमध्यें चांगलें काम करणारा इसम व हिंदुस्थानांतही चांगलें काम करीत असणारा इसम ह्यांमध्यें परस्पर सद्भासना असूं शकेल, व ही गोष्ट

एकमेकांना माहीतही असेल. पण एवढ्यानें ते स्नेही आहेत असें म्हणतां यावयाचें नाहीं. स्नेह घडण्याच्या पूर्वी त्यांचा सहवास होणें जरूर आहे. सहवासानंतर परस्परांच्या मनांत परस्परांविषयीं स्नेहवृत्ति उद्भूत होतात. ह्या वृत्ति प्रकट झाल्याशिवाय स्नेह घडत नाहीं. स्नेहवृत्ति म्हणून स्वतंत्र वृत्ति आहेत; व त्या सद्भासनेहून भिन्न आहेत. जे आपले स्नेही नाहींत त्यांचें सुद्धां चांगलें असावें असें आपण इच्छितों.

अरिस्टॉटलच्या मतें तर स्नेह घडण्यास व तो टिकण्यास सहवास अगदीं अपरिहार्य आहे. म्हणून दूर अंतरावर राहणाऱ्या माणसांचा स्नेह घडणें शक्य नाहीं. त्याच्या मताप्रमाणें, दोन स्नेह्यांची कायमची ताटातूट झाली असतां त्यांच्यांतील स्नेहाचें नातेंही तेव्हांच विलीन होतें. अरिस्टॉटलचें हें मत ह्या आगगाडीच्या आणि तारायंत्रांच्या दिवसांतही मान्य होण्याजोगें आहे. कारण उघडच आहे कीं, समागमाशिवाय मनोवृत्ति कायम राहात नाहींत. स्नेहभाव ही एक मनोवृत्ति असल्यामुळें स्नेही नष्ट झाल्यानें वृत्तिही भंग पावते. तात्पर्य, पत्रद्वारा स्नेह कायम टिकणें शक्य नाहीं. त्यास निकट सहवासाची जरूरी आहे.

दोन माणसांचा स्नेह प्रथम तारुण्यांत जडण्याचा संभव फार. कारण वृद्धापकाळीं माणसाच्या मनोवृत्ति क्षीण होतात. समाजापासून त्याचें अतःपर समाधान होत नाहीं. त्याचें चित्त एकांताकडे धांव घेत असतें. मनाची शक्ति कमजोर होत चालल्यामुळें स्वतंत्र नवीन विचार त्यास सुचत नाहींत. जुन्या शिळ्या विचारांवरच त्याला निर्वाह करावा लागतो. म्हातारीं माणसें दुसऱ्याला नेहमीं आपल्या पूर्व वयांत घडलेल्या गोष्टी त्याच त्याच पुन्हा पुन्हा सांगत असतात, ह्याचें कारण तरी हेंच आहे. अखेरपर्यंत ज्याचें मन तरतरीत असतें व ज्याच्या मनांत नवीन विचार उद्भूत होत असतात त्या माणसास मात्र आपल्या पूर्वकथा वारंवार सांगत बसण्याचा प्रसंग येत नाहीं. पण अशीं माणसें थोडीं असतात. आणि यदा कदाचित् मनाची तरतरी कायम असली तरी शरीराची मनाबरोबर धांव घेण्याची तयारी नसते. तेव्हां उतार वयांत नवीन स्नेह जडणें अशक्य नसलें तरी कठीण असतें. तात्पर्य, स्नेह जडण्यास तारुण्यदशाच योग्य होय. तारुण्यांत जडलेला स्नेह वृद्धावस्थेंत टिकण्यास मात्र कांहीं हरकत दिसत नाहीं.

स्नेह जमण्याला ज्या अनुकूल व अवश्य गोष्टींचा उल्लेख वर केला त्यावरून हें उघडच होतें कीं, एका माणसाचा पुष्कळ माणसाशीं स्नेह होणें प्रायः अशक्य आहे. सद्गुण, निकट सहवास, स्वभावसादृश्य, विशिष्ट परिस्थति, आणि शिवाय परस्परांविषयीं मनांत जागृत होणाऱ्या नैसर्गिक स्नेहवृत्ति, इत्यादि कारणांनीं एका माणसाचा शेंपन्नास माणसांशीं स्नेह जडलेला आपणांस पहावयास मिळणार नाहीं. **अ** आणि **ब** हे दोघे परस्पर स्नेही आहेत, व **ब** आणि **क** ह्या दोघांचा स्नेह आहे. तेव्हां **अ** व **क** ह्यांचा स्नेह बनेल कीं नाहीं ? ह्या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें नाहीं. परंतु स्नेह जमणें हें जर मनाच्या विशिष्ट वृत्तीवर अवलंबून असेल तर **अ** व **क** हे स्नेही बनतीलच असें खात्रीनें म्हणतां येणार नाहीं. **ब** हा दोघांचा सामान्य स्नेही आहे, एवढ्यावरूनच **अ** व **क** ह्यांचा स्नेह जमला पाहिजे असें मानल्यास सर्व जग स्नेहबद्ध होईल असें म्हणावें लागेल. पण ही अशक्य कोटींतीलच गोष्ट आहे.

आतां भिन्न दर्जाच्या माणसांचा स्नेह घडेल कीं नाहीं, ह्याचा आपण विचार करूं. अरिस्टॉटलच्या मतें उच्च नीच स्थितींतील माणसांचा स्नेह जुळणें संभवनीय नाहीं. परंतु ही गोष्ट अशक्य आहे असें मात्र आम्हांस वाटत नाहीं. कमी अधिक दर्जाच्या माणसांचा निकट सहवास होण्यास कारणें फार कमी असतात; ह्यामुळेंच प्रायः स्नेह जडण्यास अडचण पडते. पण दोन सद्गुणी माणसांचा कोणत्याही कारणानें सहवास झाल्यास व इतर मानसिक स्थिति अनुकूल असल्यास केवळ सामाजिक दर्जाची भिन्नता स्नेह जुळण्याच्या आड येणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. कारण, प्रेम आणि स्नेह हीं बहिरुपाधींवर अवलंबून नसतात. स्नेह म्हटला कीं बरोबरीचें नातें पाहिजे. ह्यामुळें सेव्यसेवक भाव जेथें असेल तेथें स्नेह घडावयाचा नाहीं. ह्यासाठींच राजेलोकांची स्थिति ह्या बाबतींत मोठी अनुकंपनीय आहे. सर्व देशांत राजा सेव्य व प्रजाजन वस्तुतः सेवक असा प्रकार असल्यामुळें स्नेह करण्यास लायक असा कोणीच राजास मिळत नाहीं. निरानिराळ्या राजांचा स्नेह होण्यास व्यत्यय फार असतात. त्यांत निकट सहवासाचा अभाव हा प्रमुख होय. निरनिराळ्या राजांचा दृढपरिचय व समागम घडवून आणण्याची जर कांहीं योजना झाली तर राजेलोकांना तर फायदा होईलच; पण एकंदर जगालाही त्यापासून सुखच होईल. अलीक-

डील परिषदांच्या कालांत निरनिराळ्या देशच्या राजांची परिषद अद्यापि भरली नाहीं हा चमत्कारच म्हणावयाचा ! तात्पर्य, सेव्यसेवकभाव नसेल तर कमी अधिक दर्जाच्या माणसांचा स्नेह जुळण्यास हरकत नाहीं. भिन्न दर्जाच्या माणसांप्रमाणेंच, सुशिक्षित व अशिक्षित ह्यांचा स्नेह जुळणें अशक्य नसलें तरी दुर्घट होय. दोघांचे व्यवसाय भिन्न; आचार विचार भिन्न; कदाचित् मनोरचनाही भिन्न. अशा स्थितींत दोघांचा निकट सहवास घडून परस्परांचीं मनें परस्परांकडे ओढणें प्रायः असंभवनीय असतें. तथापि दोन सद्गुणी माणसांचा स्नेह जमल्यावर प्रसंगवशात् दोघांच्या शिक्षणांत कालान्तरानें फार फरक पडला तरी तेवढ्यामुळें स्नेहांत विघात झालाच पाहिजे असें नाहीं. उलट सुशिक्षणानें सद्गुणांची परीक्षा ज्यास्त होऊन स्नेह दृढतर होण्याचाच संभव अधिक. आमच्याकडे ह्याच्या अगदीं उलट स्थिति अनुभवास येते, हें खरें. पण त्याचें कारण निराळें आहे. आमच्या हल्लींच्या समाजांत विश्वविद्यालयाचें उच्चशिक्षण ज्यांस प्राप्त झालें आहे व सरकारी नोकरींत बऱ्याच हुद्याच्या जागा ज्यांस लाभल्या आहेत त्यांच्या ठिकाणीं लीनतेच्या ऐवजीं फाजील घमेंड व इतरांविषयीं तिरस्कार बुद्धि हींच प्रायः दृष्टीस पडतात. ह्याचें मूळ सांप्रतच्या शिक्षणपद्धतींत आहे. आधुनिक शिक्षणानें अकलेचा विकास होतो, पण बुद्धीवर संस्कार होत नाहीं. असंस्कृत बुद्धि व तीव्र अक्कल ( Intellect ) ह्यांचा योग झाला असतां तेथें सद्गुणांची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. आपल्याहून कमी दर्जाच्या माणसाच्या पत्रास उत्तर न लिहिणें, त्याची ओळख पूर्वी झाली असली तरी विस्मरण झाल्याचा आव आणणें, आपणांस दुसऱ्यापासून कांहींच शिकण्यासारखें नाहीं असा समज करून घेणें, दुसऱ्याचे गुण कधींही कबूल न करणें, इत्यादि प्रकार हीं आधुनिक थोरांच्या मोठेपणाचीं लक्षणें म्हणून मानण्यास सबळ कारणें आहेत. असो. सद्गुणांत लोहचुम्बकाची शक्ति असते, आपणांमध्यें जर सद्गुण असतील तर दुसऱ्या सद्गुणी माणसाकडे आपलें मन स्वभावतःच आकृष्ट झालें पाहिजे. सारांश, दर्जाच्या व शिक्षणाच्या व्यस्त प्रमाणानेंच अगोदर असलेल्या स्नेहांत अंतर पडलेंच पाहिजे, असें नाहीं.

---

१ अलीकडे नरेन्द्र परिषत् सरकारी रीत्या भरूं लागलेली आहे.

आमच्या समाजांत जातिभेदही स्नेहाभावास अंशतः कारणीभूत आहे. तरी पण हल्लींच्या अननुभूत स्थितीचा संबंध जातिभेदाशीं कोणत्याच प्रकारें लावणें शक्य दिसत नाहीं. कारण एका जातीच्या माणसाचा दुसऱ्या जातीच्या माणसाशीं स्नेह कदाचित् जमणार नाहीं; पण एकाच जातीच्या माणसांचा तरी परस्पर स्नेह जुळण्यास अडचण येऊं नये. पण आरंभीं सांगितल्याप्रमाणें तोही प्रकार दुर्दैवानें दृष्टोत्पत्तीस पडत नाहीं. कॉलेजमध्यें असतांना निरनिराळ्या जातींच्या विद्यार्थ्यांना तरुणपणीं एकत्र राहण्याचा प्रसंग येतो. अशा वेळीं स्नेहगत मनोवृत्ति विद्यार्थ्यांत जर उद्भूत होतील तर स्नेह जुळण्यास विलंब लागणार नाहीं, व अशा वयांत जडलेला स्नेह केवळ जातिभेदामुळें विघात पावणार नाहीं. उलट जातिभेदाची तीव्रता कमी होण्यास तरुणपणीं जडलेला स्नेह फारच उपयुक्त होईल. परंतु सांप्रत तरी आमच्या समाजांत स्नेहवृत्ति विकसित न झाल्यामुळें स्नेहाच्या आड जातिभेद येतो असें मानतां येत नाहीं. जातिमात्सर्यापेक्षां व्यक्तिमात्सर्यच ह्याकाळीं विशेष जोरदार दिसत आहे; व त्याचें कारण अर्थात् शिक्षणांतील वैगुण्य हें होय.

स्नेह आणि प्रेम ह्यांत अंतर आहे. स्नेह दोन व्यक्तींचा आश्रय करून असतो, परंतु प्रेम एकाच व्यक्तीमध्यें स्वतंत्रपणें असूं शकतें. आईचें प्रेम मुलांवर असतें, पण मुलांचें आईवर असतेंच असा नियम नाहीं. एखादा मुलगा दुराचारी असला तरी त्याच्यावरील आईचें प्रेम कमी होत नाहीं. परंतु दुराचाररूपी पायावर स्नेहमंदिराची रचना कधींच होणें शक्य नाहीं. प्रेम निरक्षेप आहे; तर स्नेह सापेक्ष आहे. वियोगनें स्नेह नाश पावतो; पण प्रेम उलट दुणावतें.

स्नेहाची उत्पत्ति सद्गुणांत आहे त्याचप्रमाणें तो चिरस्थायी होणें हेंही सद्गुणांच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. किंबहुना स्नेह आणि सद्गुण ह्यांचें तादात्म्य आहे असें म्हटलें तरी चालेल. करितां, कर्मधर्मसंयोगानें दोन स्नेह्यांपैकीं एकास व्यसन व दुर्गुण जडले असतां त्यांचा स्नेह टिकणें शक्य नाहीं. कारण स्नेहवृत्तीचें अधिष्ठान सद्गुण आहे. अधिष्ठानाचाच लोप झाला तर आश्रिताचाही लोप झालाच पाहिजे. आतां खरा सद्गुणी मनुष्य क्वचितच दुर्गुणी निघतो, हें खरें आहे. तथापि पुष्कळ वेळां आपण ज्यास गुणी मनुष्य समजतों तो वस्तुतः तसा नसून त्याच्यांत दुर्गुणी वृत्ति

लीन असतात; व्यक्त नसतात. परिस्थिति अनुकूल होतांच त्या दुर्वृत्तींचा प्रादुर्भाव होतो. परंतु त्यांतही हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, सर्वच दुर्गुण स्नेहविघातक होतील असें नाहीं. कारण क्षम्य आणि अक्षम्य असे दुर्गुणांचे प्रकार करतां येण्यासारखे आहेत. मानवी प्राणी निर्दोषी नाहीं. लहानसहान प्रमाद त्याच्या हातून वारंवार होत असतात; पण अशामुळें स्नेहांत व्यत्यय येण्याचें कारण नाहीं. दुर्बलमनस्क होऊन माणसाच्या हातून प्रमाद घडतात. तेव्हां त्याच्याबद्दल आपणांस रोष न येतां त्याची कींव येते. अन्तःकरणरूपी झरा जोंपर्यंत निर्मळ आहे तोंपर्यंत त्या माणसाबद्दल निराश होण्याचें कारण नाहीं. पण अंतःकरणच जेव्हां दुर्गुणाश्रित होईल तेव्हां त्या मनुष्याशीं संबंध ठेवणें शक्य नाहीं.

आतां लहानसहान चुकांबद्दल आपल्या स्नेह्याची बाजू घेणें हें आपलें काम आहे. कारण स्नेही म्हणजे आपला दुसरा आत्माच होय. आपल्या हातून घडलेल्या चुकांचें जसें आपण प्रदर्शन करीत नाहीं त्याचप्रमाणें आपल्या स्नेह्याच्या चुकांवरही पांघरूण घालणें आपलें कर्तव्य आहे. जे दोन स्नेही सार्वजनिक कामांत पडतात त्यांनीं तर ही गोष्ट लक्षांत बाळगणें अत्यन्त जरूरीचें आहे. दुर्दैवानें महाराष्ट्रांतील समाजधुरीणांमध्यें-एकच अपवाद खेरीज करून—हा गुण आढळत नाहीं. अथवा खरें म्हटलें असतां, ह्या लोकांत आम्ही वर सांगितलेल्या तऱ्हेचा स्नेहच दिसत नाहीं. स्नेह्याला ज्यावेळीं मदतीची आवश्यकता फार अशा आणीबाणीच्या प्रसंगीं त्यास सोडून देण्यास ज्यांस यत्किंचितही संकोच वाटत नाहीं अशीच मंडळी फार. एकंदरींत स्नेह्याच्या बाबतींत न्यायाचा धारवाडी कांटा वापरणें दुर्घट होय. परंतु हा दोष नसून सद्गुण आहे. सार्वजनिक बाबतींत मतभेद पडल्यास स्नेह राहील काय ? हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आमच्या मतें मतभेदच प्रामाणिक असेल तर त्यामुळें स्नेहांत अंतर पडण्याचें यत्किंचितही कारण नाहीं. आतां सार्वजनिक कामांत मतभेद असलेल्यांचा नवीन स्नेह जडण्याचा संभव प्रायः नाहींच म्हणावयास हरकत नाहीं. तथापि पूर्वीचा स्नेह प्रामाणिक मतभेदानें नाहींसा होण्याचें कारण नाहीं. शिवाय आपल्या मनांत स्नेह्याविषयीं सदिच्छा वसत असली पाहिजे म्हणून आपल्या स्नेह्याचें जेणेंकरून वाईट होईल असें कोणतेंही कृत्य आपल्या हातून होणार नाहीं.

वस्तुतः पाहतां सदिच्छा ही स्नेहवृत्तींना मूलभूत आहे. ज्याच्या अन्तःकरणांत सद्वासनांचा अंकूर कधींच फुटलेला नाहीं त्याच्या ठिकाणीं स्नेहवृत्तीचाही प्रादुर्भाव होणार नाहीं. म्हणून दुसऱ्याचें अनिष्ट चिंतणारीं माणसें स्नेहाला नालायक असतात. खरें म्हटलें असतां दुष्ट मनुष्य स्वतःचाच शत्रु असतो; मग दुसऱ्यावरोबर त्याचें मित्रत्व कसें व्हावें ?

स्नेह्याची उणीव कशाच्यानेंही भरून यावयाची नाहीं. अखिल वैभवसंपन्न मनुष्यालाही स्नेही नसेल तर त्याचें आयुष्य सुखांत जाणार नाहीं. श्रीमंती असली म्हणजे स्नेह्याची गरज राहिली नाहीं असें म्हणतां यावयाचें नाहीं. स्नेहाचें दारिद्र्य पैशाच्या श्रीमन्तीनें नाहींसें कसें होणार ? पूर्णावस्थेला पोंचलेलें मन स्नेहशील असल्यामुळें अशा मनाची तळमळ स्नेहमुख लाभल्यावांचून राहणार नाहीं. म्हणून दरिद्री आणि श्रीमंत दोन्ही माणसांस स्नेह्याची आवश्यकता सारखीच आहे असें आम्हांस वाटतें. श्रीमंत माणसास स्नेही पुष्कळ असतात असें दिसतें; पण ते वस्तुतः पैशाचे स्नेही असतात. दुर्दैवानें विपर्यस्त स्थिति आल्यास अशा स्नेह्यांचा मागमूसही लागत नाहीं !

एकंदरींत आमच्या समाजांत स्नेह वनण्यास विघातक कारणें पुष्कळ आहेत; तीं सांगणें म्हणजे आमच्या दुर्गुणांची मालिका पुढें आणणें होय. पण त्यांतल्या त्यांत स्वतःविषयीं फाजील अभिमान व एकंदर सदिच्छेचा अभाव हीं कारणें प्रमुखत्वानें सांगितलीं पाहिजेत. मी फार शहाणा आहें ह्या मिशाच्चानें एकदां का मन पछाडलें, म्हणजे बाकी सर्व मूर्ख आहेत ह्या भावनेनें मन घेरून जातें. त्यामुळें दुसऱ्याशीं बरोबरीच्या नात्यानें वागण्याचें त्याच्या हातून होत नाहीं. अशा रीतीनें उच्चस्थानीं आपण आपल्यास उभें करून घेतलें म्हणजे तेथें स्नेहाचें बीज कसें रुजणार ? ह्याचाच दुसरा परिणाम असा असतो कीं, दुसऱ्याच्या अंगच्या निर्विवाद गुणांवद्दल आपणांस मत्सर वाटूं लागतो. हल्लींच्या समाजाला मत्सरानें तर अगदीं ग्रासून टाकल्यासारखें दिसतें. ह्याच कारणानें दुसऱ्याचे गुण कबूल करण्याची प्रवृत्ति नष्ट होते. आमच्या समाजांत कांहीं माणसें अशीं आहेत कीं, त्यांच्याकडे तुम्ही गेलां तर सर्व थोर मानल्या जाणाऱ्या ग्रन्थांची छिद्रें त्यांच्याकडून तुम्हांस एका क्षणांत कळतील. गुणग्राहकता तर नाहींच, पण दुसऱ्याचीं व्यंगें आम्हास चट्कन् दिसतात. असलेले गुण कबूल करून त्यांचें चीज केल्यानें विरोध एकदम नाहींसा होतो व स्नेह जमण्यास मार्ग

खुला होतो. आपले दोष कबूल करणें व दुसऱ्याचे गुण घेणें हा थोर मनाचा धर्म आहे. पण अशा थोर मनाचीं माणसें आमच्या समाजांत दैवदुर्विपाकानें फार कमी आढळतात. भाषणावरून व लेखावरून एकाद्याच्या स्वभावाचा अदमास केला व वस्तुस्थितीशीं त्याचा मेळ घालूं लागलों, तर पुष्कळ वेळां केलेला अंदाज चुकीचा ठरतो.

असो. आमच्यांत स्नेहशीलवृत्ति जोंपर्यंत उद्भवल्या नाहींत तोंपर्यंत आमच्या समाजाची प्रगति कोणत्याही तऱ्हेनें होणार नाहीं असें पुष्कळांस वाटतें, तें खरें आहे.

# ११. मराठी मासिकें, त्यांचें स्वरूप व सुधारणेच्या दिशा.

माझ्या माहितीप्रमाणें मुंबई इलाख्यांत एकंदर मराठी भाषेंत प्रसिद्ध होणारीं ४४ मासिकें आहेत.

मासिक हा शब्द येथें लक्षणेनें वापरण्याचें प्रयोजन नाहीं. कारण ह्यापैकीं प्रत्येक दर महिन्यास प्रसिद्ध व्हावयाचें असतें. मासिकांचीं नांवें येणेंप्रमाणें:—

( १ ) मधुकर; ( २ ) मकरंद; ( ३ ) प्रेमोद्यान; ( ४ ) बालबोध; ( ५ ) भांडारी विहारी; ( ६ ) भगिनीसमाचार; ( ७ ) ज्ञानांजन; (८) आनंद; (९) क्षात्रदूत; ( १० ) मराठामित्र; ( ११) मराठी शालापत्रक; ( १२ ) मराठी शिक्षक; ( १३ ) नवयुग; ( १४ ) नवें मन्वन्तर; (१५) प्रभात; ( १६ ) विहार; ( १७ ) इतिहाससंग्रह; (१८) मोदक; ( १९ ) गोवर्धनमाला; ( २० ) भिषग्विलास; ( २१ ) केरळकोकिळ; ( २२ ) खेळगडी; ( २३ ) चतुष्पाद आणि कृषिकर्म; (२४) उद्यान; ( २५ ) चित्रमय जगत्; ( २६ ) दैवज्ञमासिक; ( २७ ) धर्मविचार; ( २८ ) लोकमित्र; ( २९ ) ज्योतिर्विजय; ( ३० ) लोकशिक्षण; ( ३१ ) काव्यरत्नावलि; ( ३२ ) मनोरंजन; (३३)उषा; ( ३४ ) प्रभुमासिक; (३५ ) वैश्यमासिक; ( ३६ ) विविधज्ञानविस्तार; ( ३७ ) ब्रह्मविद्याग्रन्थरत्नमाला; ( ३८ ) विश्वब्रह्मवृत्त; ( ३९ ) धर्मजागृति; ( ४० ) ज्योतिषरत्नभांडार; ( ४१ ) रंगभूमि; ( ४२ ) मराठा; (४३) संतांचे बोल; आणि ( ४४ ) शेती व शेतकरी.

ह्यांपैकीं पांच मासिकें म्हणजे प्रभुमासिक, वैश्यमासिक, दैवज्ञमासिक, क्षात्रदूत, आणि भांडारी विहारी हीं ज्ञातिविशिष्ट हितानहिताची चर्चा करणारीं आहेत.

निवळ काल्पनिक गोष्टींनीं क्षणभर चित्तरंजन करणारीं अशीं चार मासिकें आहेत. त्यांचीं नांवें–मधुकर, मकरंद, प्रेमोद्यान, व विहार.

एकाच विषयाला वाहिलेलीं अशीं १५ आहेत, तीं येणेप्रमाणें:– (१) मराठी शालापत्रक, (२) मराठी शिक्षक, (३) गोवर्धनमाला, (४) इतिहाससंग्रह, (५) भिषग्विलास (६) चतुष्पाद आणि कृषिकर्म, (७) ब्रम्हविद्याग्रंथरत्नमाला, (८) विश्वब्रम्हवृत्त, (९) धर्मजागृति, (१०) ज्योतिषरत्नभांडार, (११) धर्मविचार, (१२) रंगभूमि, (१३) शेती आणि शेतकरी, (१४) ज्योतिर्विजय, (१५) काव्यरत्नावलि.

बालबोध, आनंद, मोदक व खेळगडी हीं चार मासिकें मुलाकरितां अवतरलीं आहेत.

स्त्रियांच्या उन्नत्यर्थ म्हणून निघालेलें असें मासिक म्हटलें म्हणजे 'भगिनीसमाचार' हें होय.

मासिक मनोरंजन द्विविध प्रकृतीचें दिसतें. यांत गहन विषयांवर मनन करण्यासारखे क्वचित् लेख असतात, तर प्रेमविषयक गोष्टीही पुष्कळ असतात.

ज्यांमध्यें कांदबऱ्या मुळींच घेतल्या जात नाहींत व सर्व विषयांचा ऊहापोह केला जातो अशीं मासिकें चार आहेत. विविधज्ञानविस्तार, लोकशिक्षण, नवें मन्वन्तर, आणि उषा.

चित्रमयजगत्, नवयुग, लोकमित्र, मराठामित्र, प्रभात, उद्यान, ज्ञानांजन, हीं मिश्र मासिकें होत.

संतांचे बोल हें मासिक त्याच्या नांवावरून कोणत्या जातीचें आहे तें समजण्यासारखें आहे.

स. १९१२, १३ व १४ ह्या तीन सालांत प्रसिद्ध झालेले मासिकांचे अंक मी विवेचनार्थ घेतले आहेत. मासिकांसंबंधानें एकंदर आढावा काढण्यास गेलीं तीन वर्षें पुरीं आहेत. ह्या कामीं अर्थातच एकदेशीय, ज्ञातिविशिष्ट, व कादंबऱ्या प्रसिद्ध करणारीं मासिकें निरुपयोगी होत. त्यांचेंही कार्य महत्त्वाचें आहे पण तें स्वभावतःच मर्यादित असल्यामुळें त्यांचा विचार निराळा करण्यांत येईल. सर्व समाजास उपयुक्त व समाजाची सर्वांगपूर्ण सेवा करणारीं जीं मासिकें आहेत त्यांमध्यें गेल्या तीन वर्षांत कोणते विषय आले, ते कोणी लिहिले व त्या विषयविवेचनाचें धोरण काय

हें समजणें जरूर आहे. त्याशिवाय मासिकांनीं केलेल्या कामगिरीचें यथार्थ स्वरूप समजणार नाहीं. अशा प्रकारच्या चर्चेला साहाय्य करणारीं मासिकें म्हटलीं म्हणजे उषा, प्रभात, कोकिळ, विस्तार, लोकशिक्षण, चित्रमय जगत्, ज्ञानांजन, लोकमित्र, मराठा मित्र, नवें मन्वंतर, नवयुग व मनोरंजन हीं होत. परंतु नवें मन्वंतर, नवयुग, उषा, प्रभात व कोकिळ हीं गेल्या सालींच आणि तींही अखेरीला प्रसिद्ध होऊं लागल्यामुळें त्यांचा विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. ज्ञानांजनही १९१२ च्या आरंभीं निघालेलें नाहीं.

विस्तार, चित्रमय–जगत्, लोकशिक्षण, मनोरंजन, लोकमित्र व मराठा-मित्र इतकीं मासिकें पुरीं तीन वर्षें असल्यामुळें ह्यांपैकीं प्रत्येकाचे ३६ अंक प्रसिद्ध झाले आहेत. ह्या अंकांतून प्रसिद्ध झालेल्या निबंधांचा तक्ता विषयवारीप्रमाणें तयार करून सोबत जोडला आहे. त्यावरून असें दिसेल कीं, गेल्या ३ सालांत एकंदर चरित्रें ८३, ऐतिहासिक लेख ३९ धर्मपर लेख ४४, तत्वज्ञानावर ३१, सामाजिक विषयांवर ५५, शिक्षणात्मक ३१ आरोग्यावर २०, औद्योगिक २२, वाङ्मयात्मक ३२, राजकीय १५, शास्त्रीय २३, अर्थशास्त्रावर ३, मराठी भाषा ७, प्रवासवर्णनें १५, शेतीवर ९, आयुर्वेद ३, व्यापार २, ज्योतिष २, आणि रसायनशास्त्रावर १, ह्याप्रमाणें लेख आलेले आहेत.

चरित्रांचा भरणा बालबोध व चित्रमय–जगत् ह्यांत विशेष आहे. चित्र-मय–जगतांत ३ वर्षांत ३९ चरित्रें आलीं आहेत. अर्थात् दरमहिन्यास एकाहून अधिक चरित्र पडलें आहे. त्याच्या खालोखाल बालबोध व लोक-मित्र ह्यांचा नंबर येईल. लोकमित्रांत २३ चरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. ऐतिहासिक विषयांवर विस्तारांत सर्वांत अधिक, म्हणजे २३ लेख आले आहेत.

सर्व मासिकें मिळून प्रसिद्ध झालेल्या ३९ ऐतिहासिक लेखांपैकीं एकट्या विस्तारांत २३ लेख आले आहेत ह्यावरून ह्या मासिकाचें विशिष्ट स्वरूप म्हणजे ऐतिहासिक विषय होय असें ठरतें. धर्मपर लेखांत चित्रयय–जगताचा नंबर पहिला लागून विस्ताराचा दुसरा लागतो. एकंदर ४४ धर्मपर लेखांपैकीं अनुक्रमें १५ व १२ लेख सदर मासिकांतून प्रसिद्ध झाले

आहेत. तत्त्वज्ञानावर सर्वांत जास्त लेख–१२ लोकशिक्षणांत असून त्याच्या खालोखाल विस्तारांत व मनोरंजनांत आले आहेत.

सामाजिक विषयांची चर्चा करण्याचें पुष्कळसें श्रेय मनोरंजन, मराठा-मित्र व लोकशिक्षण यांजकडे आहे. ५५ सामाजिक लेखापैकीं २७।१०।११ असे लेख या मासिकांतून अनुक्रमें प्रसिद्ध झाले आहेत.

लोकशिक्षणानें आपल्या नांवाप्रमाणें २० लेख लिहून लोकांस शिक्षणामृत पाजिलें आहे. ३१ पैकीं २० लेख फक्त ह्या एका मासिकांत प्रसिद्धि पावल्यामुळें ह्या मासिकाचें विशिष्ट स्वरूप कोणतें, तें सहज समजण्यासारखें आहे. आरोग्यावर मनोरंजनांत ७ तर चित्रमयजगतांत ६ लेख आले आहेत. स्त्रीपुरुषांच्या आरोग्यवृद्धीबद्दल मनोरंजनाची कळकळ लक्षांत घेण्याजोगी आहे.

औद्योगिक विषयांवर १४ पैकीं ११ लेख एका लोकशिक्षणांत आले आहेत. ह्यावरून आपल्या लोकांची उद्योगधंद्यांत प्रगति व्हावी एतद्विषयक लोकशिक्षणकारांची उत्सुकता व्यक्त होते.

वाङ्मयचर्चेंत सगळ्यांच्या वर लोकशिक्षण असून त्याच्या खालीं विस्तार व चित्रमय–जगत् येतात.

राजकीय बाबतींत विस्ताराची मुग्धता सोडून चित्रमय जगतानें तीन वर्षांत १२ म्हणजे दर वर्षास ४ लेख लिहिले आहेत. शास्त्रीय विषयांवरही चित्रमयजगतानें सर्वांत अधिक लेख लिहिले आहेत.

प्रवास व स्थलवर्णनें चित्रमय जगतांत १६ आलीं असून मनोरंजनांत ५ आलीं आहेत. रसायनशास्त्रासंबंधानें लोकशिक्षणांत काय तो एकच लेख प्रसिद्ध झालेला दिसतो. आयुर्वेद व व्यापार ह्यांवरसुद्धां शिक्षणकर्त्यांशिवाय दुसऱ्या कोणी लेख लिहिला नाहीं. शेतीवर लोकशिक्षण आणि चित्रमय–जगत् ह्या दोघांनींच लेख लिहिले आहेत.

वरील विवेचनावरून असें दिसून येईल कीं, प्रत्येक मासिकाचें कांहीं तरी विशिष्ट स्वरूप व धोरण आहे. हें धोरण मासिकांना त्या त्या संपादकांनीं दिलें आहे अगर तें त्यांतील लेखकांनीं लावलें हा प्रश्न मात्र वादग्रस्त होईल. विस्ताराचें विशिष्टत्व ऐतिहासिक लेखांत आहे, तर लोकशिक्षणाचें शिक्षणात्मक व औद्योगिक बाबतींत आहे. पुस्तकपरीक्षणाच्या कामांत तर विस्ताराची बरोबरी कोणीच करूं शकत नाहीं.

चित्रमय-जगताचें स्वरूप ह्या दोन्हीं मासिकांहून भिन्न आहे. तत्त्वज्ञान, शिक्षण, उद्योगधंदे, अर्थशास्त्र वगैरे विषयांना साफ फांटा देऊन ह्या मासिककारांनीं धर्म, प्रवास, राजकारण, शास्त्रीय विषय, ह्यांवर लेख लिहून तद्द्वारा विशेषतः लोकशिक्षण व मनोरंजन करण्याचें योजिलें असावें असें दिसतें.

ह्याप्रमाणें प्रत्येक मासिकाला इतरांहून भिन्नत्व कशानें प्राप्त झालें आहे तें सांगितलें. आतां विषयांच्या संख्येकडे पाहिलें तर–सामाजिक विषय वर्जिले असतां धर्मविषयक लेखांची संख्या सर्वांत अधिक. हा प्रकार आम्हां भारतीयांच्या पूर्वापार परंपरेला अनुरूप आहे ह्यांत शंका नाहीं.

सांप्रत इतिहासाविषयीं राष्ट्रांत कांहींशी जाग्रति उत्पन्न झाली आहे, तिचें प्रतिबिंब येथेंही पडलेलें आढळेल. कारण धर्मानंतर ह्याच विषयाला लेखकांनीं प्राधान्य दिलेलें दिसतें. सामाजिक विषयाची व्याप्ति ही ऐतिहासिकादि विषयांहून अधिक आहे. ह्यावरून गतकालीन गोष्टींप्रमाणें सद्यःकालीन गोष्टींकडे लोकांचें लक्ष वेधलेलें पाहून कोणासही आनंदच होईल. ह्याच्या खालोखाल शिक्षणात्मक, औद्योगिक आणि राजकीय विषयांवरील लेखांनीं जागा व्यापिली आहे. बाकीच्या नानाविध विषयांवर कोणी फारसें लिहिलेलें दिसत नाहीं. ह्यावरून धर्म, इतिहास, शिक्षण ह्यांवांचून इतर विषयांचें अज्ञान लेखकवर्गांत तरी आहे, अगर असले विषय वाचकांस आवडत नाहींत असें तरी म्हणावें लागतें.

कोणत्या विषयावर कोणत्या मासिकांत कोणते लेख आले हें दाखविणारा तक्ता सोबत जोडला आहे. ह्या लेखांच्या अंतरंगाचा विचार केला असतां काय निष्पन्न होतें हें पाहणें अवश्य आहे. प्रथम चरित्रें घेऊं. परकीयांच्या चरित्रांपेक्षां हिंदी लोकांचीं चरित्रें अधिक देण्याचा प्रघात अलीकडे बालबोधकारांनीं पाडला होता तोच प्रशस्त आहे, ह्याबद्दल मतभेद असणें शक्य नाहीं. बालबोधांतलीं चरित्रें अर्थातच लहान व अपुरीं; कारण तीं मुलांकरितां लिहिलेलीं असतात. ह्या बाबतींत चित्रमय–जगताचा प्रयत्न फारच प्रशंसनीय आहे. आमच्यांतीलच विद्यमान व मृत श्रेष्ठांच्या चरित्रांतील अनुकरणीय गोष्टी तरुणांपुढें ठेवल्यानें त्याचा परिणाम तरुण पिढीला नीतिमान्, उत्साही व कार्यक्षम करण्यांत होईल ह्यांत संदेह नाहीं. मोठ्या

माणसांचे सद्‌गुण जगापुढें आल्यानें सद्‌गुणांचा ऱ्हास होत नाहीं. उलट त्यांना प्रसिद्धि मिळाली नाहीं तर ते त्या माणसांबरोबर लय पावतात. कै. मण्डलिक, भाऊ दाजी, नाना शंकरशेट इत्यादि जुन्या पिढींतील कित्येक माणसांच्या अंगीं कोणते विशिष्ट गुण होते ह्याची कल्पनाही नवीन मंडळीस नाहीं. अर्थात् ह्या श्रेष्ठ जनांचें त्या त्या बाबतींत अनुकरण नवीनांकडून कसें व्हावें ! दुसरें असें कीं, मोठें म्हटल्यानें मोठेपण उत्पन्न होतें. लोकांनीं आपल्या अंगीं एकादा गुण लावला म्हणजे त्या गुणाला अपकर्षक होईल अशी क्रिया आपल्या हातून घडणार नाहीं इतकी जबाबदारी आपणांस स्वाभाविकच घ्यावी लागते. ह्यावरून हीं चरित्रें गुणपोषक कशीं होतात तें दिसून येईल. विद्यमान स्त्रीपुरुषांचीं चरित्रें दिल्यानें हा लाभ विशेषच होईल. ज्या ज्या स्त्री–पुरुषांत विशेष अनुकरणीय असा कांहीं गुण असेल त्यांचीं चरित्रें देऊन त्या त्या गुणांचा विकास राष्ट्रांमध्यें करण्याचें श्रेय चित्रमय–जगत्कारांनीं अवश्य घ्यावें. चरित्र देण्याला मनुष्याच्या मरणाची वाट पाहण्याचें कारण नाहीं.

धर्मविषयाची चर्चा विवधज्ञानविस्तार व चित्रमयजगतानें बरीच केली आहे हें पूर्वी सांगितलेंच आहे. धर्माचें महत्त्व फार आहे. निदान ह्या देशाची उन्नति धर्माच्या बाजूनेंच होणार असा कित्येकांचा समज आहे. त्यांतही सध्यां बाह्य धर्मांशीं आमचा निकट संबंध आल्यामुळें आमच्या धर्माचें निरीक्षण करण्याची वासना प्रत्येक सुशिक्षितांत उत्पन्न होत आहे. आमच्या धर्मानें आमच्या उद्दिष्ट भौतिक उन्नतीला विरोध येण्यासारखा आहे काय, हा प्रश्न सर्वांच्या पुढें उभा आहे, व त्यास उत्तर देण्याचा प्रयत्न समाजनेत्यांनीं करणें अवश्य आहे. म्हणून प्रथम आपल्या धर्माचें रहस्यस्वरूप अनावृत करून धर्माचरणानें आर्थिक व कामिक उन्नति संपादितां येते अशाबद्दल लोकांची खात्री करून दिली पाहिजे. अर्थात् हा हेतु साधण्यास इतर धर्मांची माहिती आवश्यक आहेच. शिवाय आपल्या धर्मांत चांगलें असेल त्याचें समर्थन व धर्मावर अनिष्ट पटलें चढलीं असतील त्यांचें उद्‌ग्रासन ह्या दोन्ही गोष्टी झाल्या पाहिजेत. ह्या दिशेनें थोडाबहुत प्रयत्न आमच्या मासिकांनीं केला आहे, ही संतोषाची गोष्ट होय. ह्या बाबतींत लोकशिक्षणांत प्रसिद्ध झालेले लेख फार महत्त्वाचे व चिन्तनीय आहेत. उदाहरणार्थ, " शास्त्राधाराचें महत्त्व " हाच लेख घेऊं. शास्त्राच्या पोथ्या म्हणजे कच-

| विषयांचें नांव | विविधज्ञानविस्तार | मनोरंजन | लोकशिक्षण | चित्रमयजगत् | मराठामित्र | लोकमित्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| चरित्रें | ९ | ३ | १ | ३९ | ८ | २३ | ८३ |
| ऐतिहासिक | २३ | १ | ४ | ६ | १ | ४ | ३९ |
| धार्मिक | १२ | ० | ९ | १५ | ४ | ४ | ४४ |
| तत्त्वज्ञान | ८ | ८ | १२ | ० | ३ | ० | ३१ |
| सामाजिक | ४ | २७ | ११ | ३ | १० | ० | ५५ |
| शिक्षणात्मक | ३ | १ | २० | ० | ५ | २ | ३१ |
| आरोग्य | ० | ७ | ३ | ६ | १ | ३ | २० |
| औद्योगिक | २ | २ | १४ | १ | १ | २ | २२ |
| वाङ्मयचर्चा | ९ | ४ | १० | ७ | ० | २ | ३२ |
| राजकीय | ० | २ | १ | १२ | ० | ० | १५ |
| शास्त्रीय | २ | २ | १ | १८ | ० | ० | २३ |
| अर्थशास्त्र | ० | २ | १ | ० | ० | ० | ३ |
| मराठी भाषा | ६ | १ | ० | ० | ० | ० | ७ |
| प्रवासवर्णन | २ | ५ | १ | १६ | १ | ० | २५ |
| शेती | ० | ० | ३ | ५ | ० | ० | ८ |
| आयुर्वेद | १ | ० | २ | ० | ० | ० | ३ |
| व्यापार | ० | ० | २ | ० | ० | ० | २ |
| ज्योतिष | ० | १ | १ | ० | ० | ० | २ |
| रसायनशास्त्र | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| एकूण | ८१ | ६६ | | १२८ | ३४ | ४० | ४४६ |

ज्याच्या पाठींत टाकून देण्याच्या लायकीच्या, असा जो कित्येकांचा अज्ञानोत्पन्न व अविवेकजन्य समज आहे तो दूर करण्यास ह्या लेखाचा चांगला उपयोग होईल अशी आमची समजूत आहे. जुनीं शास्त्रें म्हणजे अनेक पिढ्यांचा अनुभव हें ह्या विद्वान् लेखकाचें म्हणणें आदरास पात्र आहे. ह्यामुळें ज्या ज्या वेळेस आपणांस एकादी नवीन गोष्ट प्रचारांत आणावयाची असेल त्या त्या वेळीं शास्त्र काय म्हणतें ह्याची चौकशी करणें अगदीं जरूर आहे. परंतु ह्यावर कोणी असें म्हणेल कीं शास्त्रांत कांहीं गोष्टींस आधार मिळणार नाहीं, व कांहीं इष्ट व शिष्टसंमत गोष्टींस प्रतिकूल आधार मिळेल; तेव्हां शास्त्रें निरुपयोगी होत. पण हा समज आमच्या इकडे शास्त्रीयरीत्या किंवा सूक्ष्मबुद्धीनें कोणी धर्मशास्त्राचें अध्ययन करीत नसल्यामुळें उत्पन्न झालेला आहे. वरील भ्रमाचें निरसन ह्याच लेखांत लेखकांनीं केलें आहे. त्यांनीं " अनाम्ना तेषु धर्मेषु कथं स्यादिति चेद्भवेत्। यं शिष्टा ब्राह्मणाः ब्रूयुः स धर्मः स्यादशंकितः । " हें शास्त्रवचन देऊन ज्याच्याविषयीं पूर्वी विचार झाला नाहीं अशा बाबतींत शिष्ट ब्राह्मण सांगतील तो धर्म निःशंकपणें मानावा असें प्रतिपादन केलें आहे. तसेंच इष्ट सुधारणेस शास्त्र प्रतिकूल असेल तर निराश होऊन बसण्याचें कारण नाहीं, असा अभिप्राय ह्या लेखांत व्यक्त केला आहे. " कालानुरोधानें फेरबदल करणें जरूर असेल तर तो करून घेतला पाहिजे. " " सहवास आणि अनुकरण " ह्या निबंधांत लोकशिक्षणाच्या विद्वान् संपादकांनीं असाच अभिप्राय पुनरुक्त पण अधिक स्पष्ट दिला आहे. ते म्हणतात, " हजारों वर्षांच्या चाली, रूढि व संस्था आमच्यांत आहेत त्या तशाच चालाव्यात असें कोण म्हणेल ?.....शतकेंच्या शतकें योग्य रीतीनें चालन न मिळालेल्या धर्मशास्त्रास शिरसावंद्य मानणाऱ्या समाजाची अवस्था शोचनीय होते हें आम्ही जाणून आहों. " असो. ह्यावरून धर्मसमजुतींत नवीन पिढींत कसा फरक पडत चालला आहे हें दिसून येईल. जुन्या नव्याचा विनडाग मिलाफ मोठ्या कुशलतेनें केला जात आहे.

लोकशिक्षणांतील दुसरा उत्कृष्ट लेख " चातुवर्ण्य " हा होय. ह्या लेखांत चातुवर्ण्याचें जें मार्मिक समर्थन केलें आहे तसें दुसरीकडे कोठें पाहावयास मिळणार नाहीं. जुन्याचा अभिमान पुष्कळांस असतो, पण

त्याचें समर्थन बिनतोड रीतीनें करणें सर्वांस साधत नाहीं. हा लेख वाचतांना बर्कच्या बुद्धिमत्तेची व पुराणप्रियतेची वाचकास आठवण होते.

रा. ओल्डमाने शास्त्री यांनीं लिहिलेल्या " हल्लींचे धर्माधिपति समाजनियमनाला पात्र आहेत काय ? " ह्या लेखांत धर्माध्यक्षांना प्रतिकूल असाच अभिप्राय दिला आहे. शंकराचार्य हे जर, हल्लीं लौकिक समज आहे त्याप्रमाणें, खरोखर धर्माधिपति असतील तर त्यांच्या एका मुख्य कर्तव्याची आठवण त्यांस ह्या लेखांत करून द्यावयास पाहिजे होती. वर सांगितल्याप्रमाणें अडचणीच्या प्रसंगीं धर्म कोणता आणि अधर्म कोणता हें विद्वान् ब्राह्मणांच्या मताप्रमाणें ठरवावयाचें असेल तर शंकराचार्यांनीं लोकांच्या प्रतिनिधींचें एक मन्त्रिमंडळ नियतकालीं भरवून लोकांच्या वारंवार उपस्थित होणाऱ्या प्रश्नांसंबंधीं लोकमत काय आहे तें अजमावून त्याप्रमाणें आज्ञापत्रें काढणें जरूर आहे. ह्याबद्दल मासिकांतून विशेष चर्चा व्हावयास पाहिजे होती.

मूर्तिपूजेवर दोन लेख आले आहेत, त्यावरून हा विषय अद्यापि वादग्रस्त आहे असेंच दिसतें. " मूर्तिपूजा मण्डनीय नाहीं व खण्डनीय नाहीं " असें एक लेखक म्हणतात, तर ती सर्वथा त्याज्य आहे असें रा. सातवळेकर आपल्या विस्तारांतील लेखांत प्रतिपादतात. ते म्हणतात " मूर्तिपूजा हा ईश्वरभक्तीचा खरा मार्ग नाहीं. " ह्या म्हणण्यांत जरी फारसें गैरशिस्त नसलें तरी " मूर्तीला नैवेद्य अर्पण केला म्हणजे देव संतुष्ट होईल ही भावना मूर्तिपूजेच्या बुडाशीं आहे " हा त्यांचा सिद्धांत एकाद्या खिस्ती मिशनऱ्याच्या तोंडांतच अधिक शोभला असता. आमच्या आचारांबद्दल आमचें किती अज्ञान आहे हें ह्यावरून दिसून येतें. रा. भाण्डारकर यांनीं " सामाजिक सुधारणेची खरी दिशा " ह्या लेखांत " मूर्तींची पूजा नको, खऱ्या ईश्वराची पाहिजे " असें आपलें मत दिलें आहे. ह्यावरून शिकलेल्या माणसांत एकंदरींत मूर्तिपूजेविषयीं विरोधभक्तिच दिसते.

प्रो. कानेटकर यांनीं " धार्मिक शिक्षण " ह्या लेखांत धार्मिक शिक्षणाची कॉलेजांत व कॉलेजाबाहेरही अनवश्यकता व निष्फलता प्रतिपादन केली आहे. त्यांच्या मतें धर्म हा तर्काच्या, व युक्तीच्या कसोटीला उतरण्यासारखा नाहीं, म्हणून तद्विषयक अज्ञानच बरें. कॉलेजच्या आवाराच्या

बाहेर ह्या मताचे कोणी अनुवादी असतील असें मानण्यास फारशी जागा नाहीं. ह्या महत्त्वाच्या प्रश्नाबद्दल अधिक ऊहापोह व्हावयास पाहिजे होता.

" महाराष्ट्रांतील धर्मवृत्तीचें स्थूल सिंहावलोकन " ह्या निबंधांत प्रो. भानु ह्यांनीं " ज्या धर्माचा पाया वैदिक सिद्धांतांवर उभारला नाहीं, ज्या धर्मांत मूर्तिपूजेचा किंवा वर्णाश्रमधर्माचा अन्तर्भाव होत नाहीं, त्या धर्माचें बीज येथें रुजावयाचें नाहीं " असा निष्कर्ष काढला आहे. ह्यावरून भानूंच्या मताप्रमाणें मूर्तिपूजा ही आम्हांस सुटणार नाहीं व वैदिक धर्मावरील श्रद्धाही आमची ढळणार नाहीं. हें जर खरें असेल तर त्या धर्मांचें शिक्षण लोकांस मिळेल तर हितावहच होईल असा त्यांचा अभिप्राय असावा असें वाटतें.

विश्वविद्यालयांत वैदिक धर्माला जागा नसल्यामुळें त्या धर्मांचें अध्ययन चिकित्सापूर्वक होत नाहीं, तेव्हां ही कामगिरी मासिक पुस्तकांवर ह्या देशांत विशेषतः पडणार. " महाराष्ट्रांतील संतांची राष्ट्रीय कामगिरी, " " यज्ञसंस्था व त्यांचें महत्व, " " पंढरपूरचा विठोबा आणि वारकरी पंथ " इत्यादि लेख ह्या दृष्टीनेंच लिहिलेले आहेत. " महादेवाचें स्वरूप, " " वेदांतील रोगजन्तु शास्त्र " ह्या लेखांवरून आमच्यांत शोधक बुद्धि उद्भवत आहे ह्या म्हणण्याची साक्ष पटते.

" भारतवर्षाचें मूलभूत ऐक्य " ह्या निबंधांत आमच्या राष्ट्रैक्याला वैदिक धर्मापासून पोषणच मिळेल, विरोध होणार नाहीं, असें सिद्ध केलें आहे. धर्माचें साहाय्य राष्ट्रीय आकांक्षा सफल होण्यास अवश्य आहे असें लोकांस वाटत असावें असें दिसतें.

" पापमोचन " ह्या लेखांत पापमोचन हें तत्त्व ख्रिस्ती धर्मांतून उसनें घेण्याचें कारण नाहीं, तें मूळचें आमचेंच आहे, असें अभिमानपूर्वक उत्तर ख्रिस्त्यांना लेखकानें दिलेलें आहे.

एकंदरींत धर्मविषयक उत्कृष्ट लेख लिहून मासिकांनीं आपली कामगिरी बजावली आहे. तथापि त्यांतही लोकशिक्षणांतील लेख उत्तम वठले आहेत. चित्रमय–जगतांत ह्या विषयावर आलेले लेख धर्माच्या बाबतींत लोकांस वळण लावण्याच्या कामीं उपयोगी पडतील असें वाटत नाहीं. ते ऐतिहासिक स्वरूपाचेच विशेष आहेत. तथापि सर्व मासिकांचा विचार करतां

वैदिक धर्माबद्दल आदर बाळगणारे लेखक पुष्कळ दिसतात. त्या धर्माबद्दल अनादर उत्पन्न करणारीं मतें कोणी प्रसृत केलेलीं नाहींत.

सामाजिक सुधारणेसंबंधानें अलीकडे सर्वांनीं मौन स्वीकारलेलें दिसतें. मासिक मनोरंजनांत आपाततः लहान लहान गोष्टींच्या रूपानें समाजांतील कांहीं चालीचें दोषाविष्करण केलें जातें हें खरें. पण शास्त्रशुद्ध व प्रगल्भ लेख फारच थोडे आले आहेत. आरंभीं जोडलेल्या तक्तयावरून लोकशिक्षणानेंच ह्या बाबतींत पुढाकार घेतलेला दिसतो. " सामाजिक विचारांची दिशा " ह्या लेखांत लेखकानें शास्त्रीय तत्त्व गोवून ठेवलें आहे, तें सर्वांनीं ध्यानांत बाळगण्यालायक आहे. ते लिहितातः—" संस्था व सांप्रदाय हे त्या त्या काळच्या लोकस्थितीचीं प्रतिबिंबें असतात. सबब त्या संस्थापकांना मूर्ख म्हणणें युक्त नाहीं. आपल्या काळाला उचित सुधारणा पूर्वजांना मूर्ख न म्हणतां करून घ्याव्या. " परंतु दुसऱ्या एका लेखांत निकृष्टजनोद्धारण व पुनर्विवाह ह्या सुधारणा अनिष्ट म्हणून त्यांनीं जो अभिप्राय दिला आहे त्यावरून ह्या विद्वान् संपादकांच्या विद्वत्तेच्या जोडीला अद्यापि अनुभवाची जोड मिळाली पाहिजे असें वाटतें. ह्याच लेखांत स्त्रीपुरुषांचें एकत्र शिक्षण, स्त्रीपुरुषांचा मिश्र समाज, स्त्रियांच्या शिक्षणांत फाजील पुस्तकी शिक्षण, इत्यादि महत्त्वाच्या विषयांचा नुसता नामनिर्देश केला आहे. पण ह्या विषयांचें विवेचन अधिक व्हावयास पाहिजे होतें. पण चमत्कार हा कीं कोणत्याही लेखकाचें लक्ष इकडे गेलें नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सामाजिक प्रश्नांची चर्चा कोणींच केलेली नाहीं. पूर्वीच्या चालीरीतींत हल्लीं किती व कसकसा बदल होत चालला आहे; त्याच्या श्रेयाची वांटणी प्रवर्तकांचा निश्चय व बाह्य परिस्थितीचा जोर ह्यांत कशी करावी; इष्ट असोत वा अनिष्ट असोत ज्या गोष्टी घडून येणार अशा कोणत्या व समाजानें मुद्दाम घडवून आणल्या पाहिजेत अशा कोणत्या, वगैरे गोष्टींचा ऊहापोह केलेला कोठेंही आढळणार नाहीं. श्रम, अनुभव, शोध व शांत आणि प्रगल्भ विचार जेथें अवश्य आहेत असे लेख फारसे प्रसिद्ध होत नाहींत. नुसत्या बुद्धीवर भागेल असेच लेख विशेषतः येत असतात. नगरसंवर्धन, खेळ व व्यवहार, गटारें, सुजननशास्त्र वगैरे प्रसिद्ध झालेल्या लेखांवरून सामाजिक

सुधारणांचो व्याप्ति दिवसेंदिवस अधिकाधिक होत चालली आहे असें अनुमित होतें.

मनोरंजनांत सामाजिक सुधारणेचें एक अंग—म्हणजे स्त्रीसुधारणा—त्यासंबंधीं बरेच स्त्रीपुरुषलेखकांचे लेख आले आहेत. मातृत्वाची थोरवी, गृहराज्य, गृहशिक्षण, स्त्रियांची उन्नति, आईचीं कर्तव्यें, सुगृहिणीवाद इत्यादि स्त्रियांसंबंधीं विषयांवर बरेंच लिहिलें गेलें आहे. सम्राट् व सम्राज्ञी यांच्या छत्राखालीं व त्यांच्या आशीर्वादानें हिंदुस्थानचीं सामाजिक प्रगति होत चालली आहे ही गोष्ट सर नारायणराव चंदावरकर यांनीं व स्त्रियांच्या स्थितींत सुधारणा होत आहे ही गोष्ट रा. रामभाऊ जोशी यांनीं कबूल केली आहे. तथापि कांहीं गोष्टीसंबंधानें अद्यापि मतभेद आहे असें दिसतें. ह्याचें प्रत्यन्तर सुगृहिणीवाद वाचला म्हणजे समजण्यासारखें आहे. सौ. गिरिजाबाई केळकर यांनीं प्रौढविवाहांतील वास्तविक अडचणींचें नुसतें दिग्दर्शन केलें आहे. पण मनोरंजनकारांस तें देखील खपलें नाहीं. एकंदरींत सर्व लेख प्रौढविवाहाला अनुकूल आहेत. " विवाहासंबंधीं कांहीं विचार " ह्यांत गांधर्वविवाह सर्वांत प्रशस्त ठरविला आहे. " स्त्रियांची उन्नति " ह्या लेखांत सौ. सोकरीबाई मानकर यांनीं स्त्रियांच्या अंगचे दोष दाखविले आहेत तर सौ. राधाबाई भिडे यांनीं शिक्षणाचा अभाव ही सामाजिक सुधारणेंतील मोठी अडचण एका लेखांत दाखविली आहे. " वैवाहिक नीति व दांपत्यसुख " हा सौ० गोळे यांचा लेख वाचनीय आहे. कमळाबाई केळकर यांचा " स्त्रियांचा पेहराव " हा लेख वाचला म्हणजे विकारवश न होतां एखाद्या बाबतींत आमच्या स्त्रिया अभिप्राय देण्यास कशा लायक होत आहेत तें समजतें. मनोरंजनकारांनीं जातिभेदावर थोर व प्रमुख गृहस्थांचे अभिप्राय मागवून प्रसिद्ध केले आहेत, त्यांवरून एकंदरींत जातिभेदाविरुद्ध मत बनत चाललें आहे हें कोणीही कबूल करील. पुनर्विवाह, प्रौढविवाह, हुंडा वगैरे विषयांवर असेच अभिप्राय घेऊन ते प्रसिद्ध केल्यानें त्या त्या विषयाला चालन दिल्यासारखें होऊन शिवाय लोकमताचा वारा कोणत्या दिशेनें वहात आहे हें समजेल. एकंदरींत सामाजिक बाबींची चर्चा जितक्या जोरानें व चिकित्सापूर्वक व्हावयास पाहिजे तितकी झालेली दिसत नाहीं.

मासिकमनोरंजनांतील फाजील प्रणयाला कंटाळलेल्या लोकांना भगिनी-समाचार मासिक पसंत पडण्यासारखें आहे. ह्या मासिकाचा विशेष हा आहे कीं ह्यांतील बरेच लेख स्त्रियांचे असतात. व त्यांपैकीं कांहीं प्रशंसा-पात्रही आहेत. उदाहरण, सौ. इंदुमतीबाई नाईक यांचा "खऱ्या गृहिणीचें कर्तव्य" हा लेख शोधकबुद्धीनें लिहिला आहे. पाश्चात्य संस्कृति जशीच्या तशीच न उचलतां आपल्यांतलें चांगलें कायम ठेवून जरूर तेथें नवीन अवश्य स्वीकारावें अशा मताचें पुरस्कर्तृत्व भगिनीसमाचाराकडे आहे. समाजांत नीति वाढविण्यास ह्या मासिकाचा चांगला उपयोग होईल.

## अर्थशास्त्र.

आमच्या तरुणांना सद्यःस्थितीची यथार्थ कल्पना आणून देण्यास अर्थ-शास्त्राचीं तत्त्वें समजावून देणें भाग आहे. शिवाय अर्थशास्त्राचीं प्रमेयें देश-कालापेक्ष असल्यामुळें आमच्या दृष्टीनेंच ह्या शास्त्रांचें अध्ययन झालें पाहिजे. परंतु सध्यां कॉलेजांत शिकणाऱ्या मुलांना ही दृष्टि प्राप्त होत नाहीं व त्यामुळें पुढें उत्तरवयांत सार्वजनिक प्रश्नांची व्यवस्थित व योग्य चर्चा करण्यास ते अपात्र बनतात. म्हणून हें काम मासिककारांनीं आपल्या अंगावर घ्यावयास पाहिजे होतें. पण दुर्दैवानें कोणत्याही मासिकानें ह्या विषयावर म्हणण्यासारखें लिहिलें नाहीं. वरती दिलेल्या तक्त्याकडे पाहिलें असतां असें दिसून येईल कीं या विषयावर मनोरंजनांत २ व लोकशिक्ष-णांत १ असे तीनच लेख उभ्या तीन वर्षांत प्रसिद्ध झाले आहेत. त्यांपैकीं "ह्याला आळा बसेल काय?" ह्या सदराखालीं लोकशिक्षणांत चेनीचे पदार्थ वर्ज करून दारिद्र्य घालविण्याचा कांहींसा तात्त्विक उपाय सुचविला आहे. रा. आपटे यांनीं "हिंदुस्थानांतील नाणीं व शिक्के" हा अर्थशास्त्रांतील रूक्ष लेख मनाचें रंजन करणाऱ्या मासिकांत लिहिला आहे. ह्याच विषयांवर ग्रन्थमालेंत पूर्वी कांहीं लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांची माहिती रा. आपट्यांस नाहीं असें त्यांच्या लेखावरून वाटतें. "अर्थ-शास्त्रांतील एक सत्याभास" हा एक लेख कोकिळेंत प्रसिद्ध झाला आहे. अशा प्रकारचे लेख पुष्कळच यावयास पाहिजे होते. हिंदुस्थान देश दरिद्री झाला आहे असें ज्यांस वाटतें त्यांस तें सिद्ध करून दाखवा म्हटलें तर साधत नाहीं. आगगाड्या-आगबोटींतून गर्दी, दारूचे पिठे भरलेले, इत्यादि

गोष्टीवरून हिंदुस्थानचीं सघनता स्थापित करण्याचा एका बाजूचा प्रयत्न असतो. तेव्हां त्यांत कितपत खरेपणा आहे हें आमच्या लोकांस कळळें पाहिजे. चैनीच्या पदार्थांचा खप वाढत आहे. ह्यावरून काय ध्वनित होतें तें बरोबर समजलें पाहिजे. सरकारी बजेटांची माहिती करून दिली पाहिजे. कांहीं गांवांची आर्थिक पाहणी करून काय सिद्ध होतें तें पाहिलें पाहिजे. हल्लीं खेड्यांचा ऱ्हास होत आहे, हें आपणांस किती श्रेयस्कर आहे, पदार्थांच्या महागाईमुळें आपलें हित अगर अनहित होत आहे हें प्रत्येकास समजलें पाहिजे. पण ह्या विषयाकडे मुळींच कोणाचें लक्ष गेलेलें नाहीं.

## राजकीय.

प्रचलित राजकीय विषयांवर लिहिणारीं मासिकें महाराष्ट्रांत मुळींच नाहींत असें म्हणण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं. ह्याचें कारण काय असावें ह्याचा खल करण्याचें प्रस्तुत स्थळ नव्हे. तथापि आहे ही गोष्ट निदर्शनास आणणें भाग आहे. सरकारच्या रोषास पात्र न होतां सुद्धां राजकीय बाबतींत पुष्कळ लिहिण्यासारखें आहे. कायदेकौन्सिलांची वाढ झाल्यामुळें, तसें जिल्ह्यांच्या ठिकाणाहूनसुद्धां सामान्य मनुष्यास कौन्सिलांत प्रवेश करून घेण्याची संधि प्राप्त झाल्यामुळें, राजकीय विषयांचें ज्ञान सामान्य मनुष्यापर्यंत पोंचणें अवश्य झालें आहे. हा ज्ञानप्रसार कसा करतां येईल ह्याचा विचार व ऊहापोह मासिकांतून होणें अपरिहार्य होतें. पण ह्याविषयीं कोणीही लिहिलेलें दिसत नाहीं. तसेंच कौन्सिलच्या घटनेंत काय दोष आहेत, त्यामुळें चांगले चांगले ठराव पास होण्यास कशा अडचणी येतात, वगैरे गोष्टींकडे मासिककर्त्यांची दृष्टि कां वळली नाहीं समजत नाहीं. देशी भाषेंतून शिक्षण देण्याचा ठराव वरिष्ठ कायदे कौन्सिलांत कसा नापास झाला हें ज्यानें विचारपूर्वक पाहिलें असेल त्यास आमच्या मासिककर्त्यांची मुग्धता अक्षम्यच वाटेल. तात्पर्य, राजकीय शिक्षण देण्याची जबाबदारी वृत्तपत्रकारांनींच उचललेली दिसते. चित्रमय–जगत्कारांनीं ह्या विषयावर १०।१५ लेख लिहिले आहेत खरे, पण ते ऐतिहासिक स्वरूपाचे व परराष्ट्रीय आहेत. उदाहरण, चिनांतील राज्यक्रांति, विमानांचें सामर्थ्य, आयर्लंडांतील स्वराज्याचा तंटा, पिंवळा बागुलबोवा इत्यादि. हल्लीं हिंदुस्थानांत **नेमस्त जहाल** असे जे दोन पक्ष झाले आहेत त्यांच्यासंबंधीं कोणत्याही पक्षाचा

एकही लेख लिहिला गेला नाहीं. हिंदुस्थानांतच फ्रेंच व पोर्तुगीज ह्यांच्या वसाहती आहेत तेथील राज्यव्यवस्थेची माहिती, तसेंच आमच्या संस्थानिकांचा साम्राज्यसरकारशीं संबंध कोणाचा कसा आहे व त्यांच्या राज्याची अन्तर्गत व्यवस्था कशी आहे, इत्यादि माहिती वाचकांस कोणी करून दिलेली नाहीं.

## शिक्षणात्मक.

ह्या विषयावर लोकशिक्षणांतच पुष्कळ लेख आले आहेत. विस्तारांतील " स्त्रीशिक्षणाची दिशा" व मनोरंजनांतील "जपानांतील स्त्रीशिक्षण" एवढे खेरीज करून बाकी सर्व लेख शिक्षणांत प्रसिद्ध झाले आहेत. " आज काय शिकावें– " " खरें शिक्षण "— " दुय्यम शिक्षण मातृभाषेच्या द्वारें देण्याची आवश्यकता "– " गुरु आणि शिष्य ह्यांचा परस्परसंबंध " इत्यादि लेख प्रसिद्ध करून शिक्षणकारांनीं ह्या विषयाचा चोहों बाजूंनीं कसा विचार करावा हें आपल्या वाचकांस शिकविलें. ह्याशिवाय युरोप व अमेरिका ह्या दोन खंडांतील शिक्षणपद्धतीशींही त्यांनीं आपल्या वाचकांचा परिचय करून दिला आहे. ह्या सर्व लेखांचा रोख, हिंदुस्थानांतील प्रचलित शिक्षणपद्धति सदोष आहे; तिच्या योगानें मुलांचा शारीरिक व बौद्धिकही ऱ्हास होतो; व राष्ट्राचा दर्जा वाढविण्यास तें साहाय्यकारक होत नाहीं, असें प्रतिपादन करण्याकडे आहे. मनोरंजनकारांनीं जातिभेदावर जशीं कित्येक लोकांचीं मतें मागवून तीं प्रसिद्ध केलीं त्याप्रमाणें शिक्षणकारांनींही मातृभाषेंत शिक्षण देण्याच्या आवश्यकतेसंबंधानें विचारशील माणसांकडून अभिप्राय मागविले असते तर बरें होतें. निरनिराळ्या प्रचलित प्रमुख विषयांसंबंधीं सर्व प्रकारच्या लोकांचीं मतें मागविण्याची तऱ्हा प्रशंसनीय आहे व मनोरंजनाचें अनुकरण ह्या बाबतींत इतर मासिककार करतील तर त्यांच्या हातून मोठीच कामगिरी होईल. असो. मुलांच्या शिक्षणांतील दोषांचें जसें आविष्करण झालें तसें स्त्रीशिक्षणांतील दोषांसंबंधीं झालें नाहीं. मुलामुलींना एकच प्रकारचें शिक्षण देणें इष्ट नाहीं असा एकंदर झोंक दिसतो खरा, पण त्याचे अनिष्ट परिणाम यावे तसे अद्यापि लोकांच्या लक्षांत आले नाहींत असें दिसतें. जपानांत स्त्रियांना कोणत्या तऱ्हेचें

शिक्षण दिलें जातें हें सांगणाऱ्या लोकांचें लक्ष प्रो० कर्व्यांच्या आश्रमाकडे वळूं नये ह्याचें आश्चर्य वाटतें. कर्व्यांच्या आश्रमानें समाजांत बरेंच स्थित्यंतर होणार आहे, तेव्हां त्या आश्रमावर लोकांचें लक्ष वेधणें जरूर आहे. कर्व्यांच्या प्रसिद्ध झालेल्या व्याख्यानानें थोडेंबहुत कार्य होईल. पण लोकांनीं सहानुभूतिपूर्वक केलेल्या टीकेचा फायदा रा. कर्व्यांना मिळाल्याचें दिसत नाहीं. " आश्रमा " चीच एक स्वतन्त्र जंगी " अकॅडेमी " कशी बनवितां येईल हाही विचार करण्यासारखा एक प्रश्न होता.[1]

मुलांच्या शिक्षणाची सोय स्वतन्त्र मासिकें त्यांच्याकरितां निघाल्यानें झाली आहे. त्याप्रमाणें स्त्रियांकरितां स्वतन्त्र मासिकें निघालीं नाहींत. मनोरंजन हें स्त्रियांचेंच मासिक मानलें जातें हें खरें; पण तें सर्वस्वी तसें नाहीं. तें एकाद्या स्त्रीसंपादकाकडे सोंपविलें गेलें व त्यांत स्त्रियांचेच लेख केवळ स्त्रियांच्याच हितानहिताविषयीं प्रायः येऊं लागले तर हल्लीं दिसून येणारी उणीव नाहींशी होईल; आणि भगिनीसमाचार व मनोरंजन हीं दोन मासिकें निरनिराळ्या दिशेनें स्त्रीसेवा करीत राहतील.

## आरोग्य.

प्राचीन पिढींतील लोकांपेक्षां अर्वाचीन पिढींतील लोक कमकुवत आहेत ह्यांत संशय नाहीं. तेव्हां आरोग्य कसें ठेवतां येईल ह्या विषयावर घुष्कळांनीं लिहिणें स्वाभाविक आहे. चहा, काफी व मद्यप्राशन ह्यांचें दुष्परिणाम स्पष्ट सांगितले आहेत, तर आरोग्याचा व दुधाचा निकट संबंध किती आहे तेंही व्यक्त करून दाखविलें आहे. शारीरिक सामर्थ्यास मांसाशन जरूर आहे, ह्या भ्रमाचें निराकरण केलें आहे. फलाहार व प्राणायाम यांचें महत्त्व वर्णिलें आहे. वाहत्या पाण्याचे संस्कार लोकांस समजावून सांगितले आहेत. गरोदर व प्रसूत स्त्रियांची जोपासना कशी करावी यासंबंधाची उपयुक्त माहिती दिली आहे. सारांश, ह्या विषयासंबंधीं अवश्य गोष्टी लोकांस समजून सांगण्याविषयीं मासिककारांनीं खबरदारी घेतली आहे. ही त्यांची कळकळ फारच प्रशंसनीय आहे. ह्या बाबतींत केरळकोकिळकारांचें अग्रेसरत्व मान्य करणें जरूर आहे. कारण मनोरंजनांत ७ तर कोकिळांत १४ आरोग्यविषयक लेख आले आहेत.

---

१ आतां ही अकॅडेमी बनवली गेली आहे.

## तत्त्वज्ञान.

तात्त्विक ज्ञानरूपी सागरांत बुडी मारून तळाची माती काढणारे म्हणून आमचा जो पूर्वापार लौकिक आहे तो आम्हीं घालविला नाहीं असें एतद्विषयक जे लेख प्रसिद्ध झाले आहेत त्यांवरून उघड दिसतें. " ज्ञान हें कर्माकरितां का कर्म हें ज्ञानाकरितां ? " " सत्य हें साधन का साध्य ? " " निर्वीर्य ज्ञान आणि ज्ञानहीन कर्म, " " कीर्तीच्या दोन बाजू " वगैरे लेख वाचण्यालायख आहेत. रा. वामन मल्हार जोशी हे एक ओजस्वी लेखक मराठींत होतील असें भाकित करण्यास आजच विपुल साधनें उपलब्ध आहेत. मनोरंजनांतील आत्मानात्मविचारांना कोणी उत्तर दिलें नाहीं ह्यावरून, कोणी कांहींहि देवो तें आम्हीं अचिकित्सापूर्वक ग्रहण करतों कीं काय, असा संशय येतो. तथापि हा लेख काळजीपूर्वक वाचण्यासारखा आहे ह्यांत शंका नाहीं. कारण तो बराच विचार करून लिहिला आहे.

## मासिकांसंबंधीं सामान्य विचार.

वर मासिकांचा तक्ता जोडला आहे, त्यावरून महाराष्ट्रांत एकंदर ४४ मासिकें प्रसिद्ध होतात असें दिसतें. मराठी बोलणारांची संख्या मुंबई इलाख्यांत १०७४२००० आहे. अर्थात् अदमासें अडीच लाख लोकांना एक मासिक पडतें. एक कोटी लोकांत वाचतां येणारे किती हें समजण्यास मार्ग नाहीं; त्यामुळें मराठी भाषा बोलणाऱ्या साक्षरांशीं मासिकांचें प्रमाण काढतां येणें शक्य नाहीं. तथापि आहेत हीं पुष्कळ आहेत असें म्हणतां येत नाहीं. गुजराथी मासिकें एकंदर ३३ आहेत असें सरकारी रिपोर्टावरून दिसतें. संख्येच्या बाबतींत तरी मराठी मासिकें गुजराथीच्या पुढेंच आहेत. मराठी मासिकांत सर्वांत जास्त वर्गणी म्हणजे दरसाल रु. ५ चित्रमय जगताची आहे. मनोरंजन आणि नवयुग ह्यांची त्याच्या खालीं म्हणजे ४ रु. आहे. गुजराथींतील " फुरसुत " नांवाच्या एकाच मासिकाची ४ रु. वर्गणी आहे. बाकीच्या सर्व मासिकांची वार्षिक वर्गणी ह्याहून कमी आहे. वर्षाचे ५० रु. खर्च करणारास बहुतेक सर्व मासिकें घेतां येतील.

" त्रैमासिक ज्ञानदर्शन " काढून आमच्याकडे मासिकांचा अगर नियतकालिकांचा उपक्रम बाळ गंगाधर शास्त्री यांनीं केला असें म्हणतात. आजपर्यंत पुष्कळ मासिकें उदयास आलीं व लयही पावलीं. किती व कोणतीं

हें कित्येकांस माहीतही नसेल; तथापि कोणासही निबंधमालेचा विसर पडणें शक्य नाहीं. मागच्या व चालू मासिकांत कोणाही वर वर पाहणारास सुद्धां प्रथम फरक हा दिसतो कीं, जुन्या मासिकांतील बहुतेक लेख संपादकाचे असत. परंतु अलीकडे पाहावें तों संपादकांना दौतींत टांक बुडविण्याचा प्रसंग क्वचितच येत असेल. ह्याचें कारण हल्लीं लेखकवर्ग वाढला आहे हें होय. पण ह्याचे कांहीं अनिष्ट अगर अनपेक्षित परिणामही दृष्टोत्पत्तीस येत आहेत. ज्या प्रकारच्या विशिष्ट मतांचा प्रसार करण्याच्या उद्देशानें मासिकांचा अवतार होतो तो उद्देश बाजूस राहून तें मासिक निरनिराळ्या मतांची खिचडी बनतें. अशा मासिकांच्या वाचनानें वाचाळपणा अथवा बहुश्रुतपणा वाढेल, पण मनावर कायमचा परिणाम करून शील बनविण्यास तीं अनुपयुक्त होतात. अर्थात् हा प्रकार तरुण मुलांसंबंधानें घडतो. पोक्त व अनुभवशीर माणसांच्या पुढें निरनिराळीं मतें आल्यानें त्यांच्या मतांचा एकांगीपणा मात्र कमी होण्याचा संभव आहे. मालाकारांच्या जोरदार भाषेनें तरुण पिढीवर चांगला अगर वाईट पण कायमचा संस्कार झाला, ही गोष्ट बहुधा नाकबूल करतां येण्यासारखी नाहीं. परंतु मालाकारांनीं आपण पडद्याआड राहून निरनिराळ्या मतांच्या लेखकांना आपल्या मालेंत गोंवून घेतलें असतें तर हा परिणाम झाला असता कीं नाहीं ह्याचा वानवा आहे.

दुसरा भेद असा असतो कीं पूर्वी मासिकांचें चालकत्व विद्वान् माणसांनीं आपल्या हातीं घेतलें होतें. विद्यमान मासिकांपैकीं फारच थोड्यांचें संपादकत्व पदवीधरांकडे आहे. मतप्रसारापेक्षां निर्वाहाचें साधन म्हणूनच बरींचशीं मासिकें अस्तित्वांत येतात.

ही भिन्नता लक्षांत ठेवली म्हणजे वर्तमान मासिकांचें न्यूनत्व कोठें व कसें आहे तें दिसून येईल. आमच्यांतील सार्वजनिक गोष्टींचें मनन करणारीं अधिकारी माणसें प्रायः कोणीच मराठी मासिकांत लिहीत नाहींत. क्वचित् खास अंकांत त्यांचीं नांवें दृष्टीस पडतात. सध्यां दुय्यम प्रतीच्या माणसांवरच मासिकांतील लेख लिहिण्याचें काम पडलें आहे असें म्हटलें तरी चालेल.

" मासिकांचा-उद्देश बहुश्रुतपणा होय. म्हणजे तीं वाचलीं असतां थोड्या वेळांत सहज मौजेनें पुष्कळ ज्ञान नाना विषयांचें व्हावें " असें मालाकार म्हणतात. परंतु माझ्या मतें मासिकांचा उद्देश ह्याहून वेगळा

आहे. विद्यार्थ्यांकरितां मासिकें काढावयाचीं असतील तर हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवणें बावगें होणार नाहीं. पण परिपक्व बुद्धीच्या व विचारशील माणसांनीं वाचावयाच्या मासिकांत विकारवश न होतां साधक बाधक प्रमाणें देऊन, प्रगल्भ भाषेंत लिहिलेले असे भारदस्त लेखच आले पाहिजेत. रा. चिपळूणकरांनीं ' निबंधमाला ' काढली तो काल देशांत शिक्षणप्रसार झाला नसल्यामुळें निराळा होता; व म्हणून मौजेनें पुष्कळ ज्ञान प्राप्त करून देण्याची तेव्हां आवश्यकताही होती. पण हल्लीं तो मनु बदलला आहे. सरकारच्या कार्यकारी कौन्सिलमध्यें हिंदी लोकांचा प्रवेश अंशतः झाला आहे. तेव्हां कोणत्याही गोष्टीसंबंधानें सरकारचें धोरण असेल त्या धोरणाला हिंदी वळण लागण्याची शक्यता आहे. परंतु अगोदरपासून सार्वजनिक विषयांचें अध्ययन नसल्यास हिंदी सभासदांची ही जबाबदारी त्यांस नीट बजावतां येणार नाहीं; व ती यावी म्हणून जनतेला तयार करण्याचें काम मासिककारांनीं पतकरलें पाहिजे. आंकड्यांनीं घोळलेले असले लेख रूक्ष असणार. आतां मराठी मासिकें इंग्रेजी न शिकलेल्या लोकांकरितांच आहेत असें म्हटलें तर मात्र कै. चिपळूणकरांची उद्देश-दिशा अद्यापि बदलण्याचें कारण नाहीं. पण इंग्रजीचा गंध नसलेले लोक मराठी मासिकांचे वाचकवर्गांत पुष्कळ सांपडतील असें वाटत नाहीं. इंग्रेजी शिकलेल्यांचाच भरणा ह्या वर्गांत विशेष आहे. तथापि ही गोष्ट विसरतां कामा नये कीं मध्यम सुशिक्षित वर्गच मराठी मासिकांचा विशेषेंकरून आश्रयदाता होय. मराठी मासिकांच्या अभिवृद्धीस ही एक मोठी अडचण आणणारी बाब आहे. ही अडचण दूर होण्याचा सध्यां तरी संभव दिसत नाहीं. सार्वजनिक बाबींचा ज्यांनीं विचार केला आहे अशा विद्वान् व अनुभवशीर माणसांच्या हातांत मासिकें चालविण्याचें काम आल्याशिवाय मासिकांचें महत्त्व व त्यांचा अधिकार वाढणार नाहीं. परंतु अशा योग्यतेचे संपादक सध्यांच्या परिस्थितींत मराठी मासिकांना मिळतील अशी आशा करणें व्यर्थ होय. आमच्यांतील बुद्धिश्रेष्ठांची इच्छा अर्थातच इंग्रजींत लिहिण्याची असणार; आणि तसें करणें सकारणही आहे. तथापि केवळ महाराष्ट्रांतील समाजाचाच ज्यांशीं संबंध आहे असे विषय मराठी मासिकांत ह्यांच्या लेखणींतून उतरले तरी सुद्धां मराठी मासिकांचा दर्जा वाढल्याशिवाय राहणार नाहीं. पण ही बहुतेक असंभाव्य गोष्ट बगळली तर मध्यम

सुशिक्षित वर्ग जसजसा योग्यतेनें वाढेल तसतशी मासिकांची अभिवृद्धि होत जाईल. कारण मासिकांतील लेखक व वाचक ह्याच वर्गांतील आहेत.

गेल्या तीन सालांत लोकशिक्षण, विस्तार व मनोरंजन ह्या तीनच मासिकांत सुमारें २१३ लेखकांचे लेख आले आहेत. ह्यावरून हल्लीं लेखकवर्ग वाढत आहे असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाहीं. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर ही वाढ कायम राहील. मासिकांच्या संपादकांनीं लेखकांच्या युनिव्हर्सिटीच्या पदव्या अवश्य द्याव्या. पण ह्या साध्या गोष्टीकडेही मासिकांचे संपादक दुर्लक्ष करतात. तथापि आमच्या माहितीप्रमाणें ह्या २१३ लेखकांपैकीं १३१ तरी निदान पदवीधर आहेत. अर्थात् युनिव्हर्सिटीचें शिक्षण मिळालेल्या लोकांची प्रवृत्ति आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा इतरांस देण्याकडे होत चालली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. त्याचप्रमाणें बिनपदवीधर असे ८२ लेखक सन्मान्य अशा मासिकांच्या लेखकवर्गांत मोडत असल्यामुळें, एकंदरींत विचारविनिमयाची इच्छा सर्वसाधारण होत चालली आहे असें दिसतें. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे दिवसेंदिवस स्त्री-लेखकांची संख्या वाढत चाललेली असल्याचें स्पष्ट दिसतें. २१३ पैकीं सुमारें ९ स्त्रिया आहेत. त्याशिवाय लोकमित्रांत व मराठामित्रांतही कांहीं स्त्रियांचे लेख आले आहेत. स्त्रीलेखकांचा भरणा मनोरंजनांत जास्त असणें साहजिकच आहे. स्त्रीलेखकांत सौ. काशीबाई कानिटकर व पुरुषलेखकांत रा. ब. चिंतामणराव वैद्य यांचा प्रामुख्यानें नामनिर्देश करणें जरूर आहे. रा. ब. वैद्य यांचे लेख मार्मिक व विचारपरिप्लुत असतात. ह्यांच्या जोडीचे १० लेखक मराठी मासिकांच्या वांट्यास आल्यास ह्या मासिकांत स्थित्यन्तर झाल्याविना राहणार नाहीं. संशोधनात्मक लेखांच्या ऐवजीं राजकीय, सामाजिक, आर्थिक, शिक्षणात्मक वगैरे संबंधाच्या प्रचलित विषयांवर जर रा. ब. वैद्य लिहिण्याचा उपक्रम करतील तर त्यांचे महाराष्ट्रावर उपकार होतील.

एकाच मासिकानें सर्व वर्गांच्या वाचकांचें समाधान होणें शक्य नाहीं. म्हणून निरनिराळ्या वाचकांकरितां निरनिराळीं मासिकें असणें जरूर आहे. मुलांकरितां, साधारण शिकलेल्या स्त्रियांकरितां, इंग्रेजी मुळींच न शिकलेल्या लोकांकरितां, सामान्य ग्रॅज्युएटांकरितां, राजकीय चळवळींत पडलेल्या लोकांकरितां, अशीं निरनिराळीं मासिकें अस्तित्वांत आलीं पाहिजेत.

वाचकांच्या वर्गानुसार मासिकें निघतात तेव्हां वाचकांची सहज असणारी ज्ञानतृष्णा तृप्त करण्याकरितांच त्यांचा उद्भव होत असतो. हे मासिककार आपआपल्या वाचकांची मासिकद्वारा सेवा करीत असतात. कारण शिकलेल्या माणसांना वर्तमानपत्रांची त्याचप्रमाणें मासिकांची आवश्यकता भासत असते. गिऱ्हाईक असल्यावर त्यांस माल पुरविणारे व्यापारी निर्माण होणें स्वाभाविक आहे.

परंतु विषयानुसार जेव्हां मासिकांचें वर्गीकरण होतें तेव्हां मासिककारांचा उद्देश उदात्त असतो. अपरिचित विषयांत लोकांस अभ्यस्त करावें, त्या विषयाच्या ज्ञानाचा फैलाव समाजांत व्हावा, म्हणून असलीं मासिकें अवतरतात. पहिल्यांत, वाचकांच्या रुचीप्रमाणें लेख लिहावे लागतात; दुसऱ्यांत, वाचकांत त्या त्या विषयांची रुचि उत्पन्न करावयाची असते. ह्या मासिकांचें सामाजिक, राजकीय, आर्थिक, शिक्षणात्मक, वाङ्मयविषयक इत्यादि वर्गीकरण करतां येईल. समाजशिक्षणाच्या प्रथमावस्थेंत प्रथम सांगितलेलीं मासिकें अस्तित्वांत येतात. एकंदर समाज सुशिक्षित झाला म्हणजे दुसऱ्या प्रकारचीं मासिकें विशेषेंकरून निघूं लागतात. असलीं मासिकें समाजाची चोहों बाजूंनीं उन्नति करण्यास कारणीभूत होत असतात. समाजाला तीं विशिष्ट वळण लावतात. ह्या दृष्टीनें विचार करून आपल्या इकडे सांप्रत प्रसिद्ध होत असलेलीं मासिकें कोणत्या वर्गांत मोडतील हें पाहूं लागलें तर, दुसऱ्या वर्गांत आमच्या मासिकांपैकीं एकही पडेल कीं नाहीं ह्याची शंकाच वाटते.

राजकीय विषयाला तर आमच्या इकडे जवळ जवळ बहिष्कार घातल्यासारखा आहे. त्याचीं कारणें कांहींही असोत. पण तिऱ्हाइताला ह्यामुळें आम्हांस ह्या बाबतींत कांहींच तक्रार करण्यासारखें नाहीं असें वाटण्याचा संभव आहे. युरोपमध्यें राजकीय परिस्थिति इष्ट व स्पृहणीय आहे. ह्यामुळें वर वर विचार करणारास, आमच्या इकडे राजकीय विषयांवर जास्त लेख यावेत व इंग्लंडमधील मासिकांत ह्या विषयांवर सर्वांनीं मौन स्वीकारलेलें असावें असें वाटण्याचा संभव आहे. पण वस्तुस्थिति निराळी आहे. तिकडे राजकीय विषयांवरच फार लेख येतात यावरून स्वतंत्र राष्ट्रांत राजकीय विषयांस विशेष महत्त्व मिळतें असें दिसतें.

अंतरंग सोडून बाह्यांगाकडे आपण वळलों तर त्यांतही दिवसेंदिवस प्रगति

होत आहे हें कोणासही नाकबूल करतां यावयाचें नाहीं. अंतरंगापूर्वी बहिरंगच दृष्टीसमोर प्रथम पडतें, म्हणून बाह्य स्वरूप मनोहर असल्यानें अंतरंगाचें ज्ञान सर्वत्र पसरण्यास तें कारणीभूत होतें. नवयुग व प्रभात ह्यांनीं ह्या बाबतींत इष्ट सुधारणा केली आहे. नवयुगांतील चित्रें फार चांगलीं असतात.

नवयुग व मनोरंजन ह्यांमध्यें बराच मजकूर असतो. सामान्यतः १।२ दिवसांत वाचून टाकतां येईल इतकाच व इतक्याच दर्ज्याचा मजकूर हल्लींच्या मासिकांत येतो. अर्थात् मासिकांत ह्यापेक्षां अधिक मजकूर पाहिजे. मासिकें महिन्यास निघतात, दररोज अगर आठवड्यास निघत नाहींत, हें संपादकांनीं विसरतां कामा नये. मनोरंजनार्थ ज्यांचा अवतार नाहीं, अशा मासिकांच्या मलपृष्ठांवर चित्र नसणें चांगलें. लेखकांचीं नांवें व विषय त्या स्थानीं असणें इष्ट आहे. कित्येक वेळां वर्तमानपत्रांत शोभण्यासारखे लेख—म्हणजे अचिरस्थायी—मासिकांतून प्रसिद्ध होतात हें चांगलें नाहीं. चिरस्थायी लेख वर्तमानपत्रांत येणें अपरिहार्य असल्यामुळें, वर्तमानपत्रें हीं मासिकांचीं प्रतिस्पर्धी म्हणण्यास हरकत नाहीं.

आमचीं मासिकें अनियमितपणाबद्दल प्रसिद्ध आहेत. बालबोधाचा नियमितपणा कै. विनायकराव ओक ह्यांच्याबरोबरच न जावो. अनियमितपणाच्या सबबी अवास्तव आहेत असा पुष्कळांचा समज आहे तो खरा दिसतो. नियमितपणानें काम करण्याची संवय कोणास नाहीं हेंच एक खरें कारण दिसतें. संपादकाजवळ वाटेल तेव्हां घालतां येतील असे २।३ लेख नेहमीं शिल्लक असले पाहिजेत. पुढें अडचणी येतील असें समजून आठ दिवस अगोदरच कामास लागलें तर नियमितपणा मोडण्याचा प्रसंग येणार नाहीं, व नियतकालिकांना अनियतकालीनत्वाचा दोष लागणार नाहीं. ह्या बाबतींत कै. रा. विनायक कोंडदेव ओक ह्यांचें अनुकरण इतरांनीं अवश्य करावें.

पाया आणि वरील इमारत ह्यांचा जो संबंध आहे तोच वर्तमानपत्रें आणि मासिकें ह्यांचा आहे. वर्तमानपत्रकार बहुजनसमूहास बहुश्रुत करून प्रगल्भ लेख समजण्यास तयार करतात. म्हणून मासिकाचें कार्य वर्तमानपत्रानंतरचें आहे. खेड्यांत वर्तमानपत्र जातें तेथें मासिक जाईलच असा नियम नाहीं. मासिकें वाचीत असून वर्तमानपत्राला न शिवणारे लोक ज्यांत आहेत असें एकही खेडें आढळावयाचें नाहीं. ह्यावरून वर्तमानपत्रकाराचें कार्यक्षेत्र विस्तृत आहे हें उघड होतें. पण उलट मासिककाराचें

काम शिक्षितांना सुशिक्षित करण्याचें आहे. अर्थात् तें अधिक थोर व जबाबदारीचें आहे.

मेहनत घेऊन आस्थापूर्वक ज्यांनीं लेख लिहिले असतील त्यांस कांहीं पारितोषिक देण्याचा क्रम संपादकांनीं सुरू करावा. बहुतेक चांगलीं मासिकें संपादकांनीं चालविल्यापेक्षां लेखकांनीं चालविलीं आहेत असें म्हणणारास कोणीं नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. अशा पद्धतीनें लेखकांस श्रम करण्यास उत्तेजन येईल व उत्कृष्ट लेख प्रसिद्ध होतील. परंतु लेखकांचे औपचारिक आभार मानण्याचें औपचारिक कृत्यही ज्यांच्या हातून होत नाहीं त्यांच्याकडून द्रव्यदानाची इतक्यांतच अपेक्षा करणें व्यर्थ दिसतें. कित्येक ठिकाणीं तर लेख प्रसिद्ध करितों हे त्या लेखकांवर आपण उपकारच करीत आहों असा समज दिसतो. मासिकांची योग्यता त्यांतील लेखांवर. पण लेखकांची योग्य किंमत जेथें होत नाहीं तेथें मालही हिणकस निघाला तर त्यांत नवल नाहीं.

ज्ञातिविशिष्ट मासिकें एकंदरींत अन्य ज्ञातींना न दुखवितां उत्तम प्रकारें चालविलीं जात आहेत हें त्यांस भूषणावह आहे. अशा प्रकारच्या मासिकांनीं ज्ञात्युन्नतीचा मार्ग लौकर आक्रमण केला जाईल असें वाटतें.

' शेती व शेतकरी ' ह्या मासिकाची घेडगुजरी भाषा सुधारल्याविना तें लोकप्रिय अगर उपयुक्त होईल असें वाटत नाहीं. ह्यांतील भाषेचे मजेदार मासले एक दोन येथें देतों. " हँडल मधील लांकडी ठोकळा त्याच्या सॉकेट मधून सुमारें २ इंच बाहेर निघालेला. " " फक्त बीमचे दोन बाजूंस क्लिप्स आहेत व त्यांचीं दुसरीं शेवटें बोल्टनें बीम्समध्यें बसविलेलीं आहेत. " इंग्रजी शब्दांबद्दल मराठी शब्द बनविण्याचा प्रयत्नही यशस्वी होत नाहीं हें, demonstration बद्दल "प्रात्यक्षिक" शब्द योजला आहे त्यावरून उघड होतें.

मराठींत ' राजश्रीच्या ' ऐवजीं ' मिस्टर ' वापरणें दोषास्पद आहे हें पुष्कळ लोक विसरतात.

एकंदरींत आमच्या मासिकासंबंधीं अगदींच निराश होण्याचें कारण नाहीं. लेखकवर्ग वाढतो आहे. सुधारणा करण्याचे प्रयत्न चालू आहेत. मात्र प्रचलित विषयांना अस्पृश्य वर्गाप्रमाणें टाळण्याची प्रवृत्ति हानिकारक आहे. ह्या गोष्टीकडे संपादकांनीं अधिक लक्ष देणें अवश्य आहे.

# १२ मराठी भाषेवरील सावट.

(ता. १४ दिसेंबर १९१९ रोजीं मुंबई ग्रंथसंग्रहालयाच्या २० व्या संमेलनाचे अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण.)

'वाग्वा इदं सर्वं भूतं गायतिच त्रायतेच।'

आपल्या ह्या संस्थेच्या चालकांनीं मला आजच्या समारंभाचें आमंत्रण दिलें ह्याबद्दल मी आपला सर्वांचा अत्यन्त आभारी आहे. आज अध्यक्ष होण्याची पाळी मजवर आली ह्यामुळें आपल्या ह्या महाराष्ट्रांत विद्वानांचा दुष्काळ पडला कीं काय अशी भीति आपल्या मनांत उद्भवली असली पाहिजे. दुष्काळाची आपणांस नेहमींच संवय आहे. तथापि सुदैवानें विद्वद्दुर्भिक्ष अद्यापि आपणांस शिवलें नाहीं. महाराष्ट्रांतील विद्वान् रत्नें एकामागून एक कालमुखीं पडत आहेत ही गोष्ट खरी. कादंबरीकार **हरिभाऊ** गमावले, इतिहासकार **हरिभाऊही** गेले, तोंच यंदा कविवर्य रा. रा. **गणेश जनार्दन आगाशे** हेही आपणांस सोडून आपलें काव्य यमचरणीं अर्पण करण्यास निघून गेले! गणपतराव आगाशे यांस कविता म्हणजे हातचा मळ होता. त्यांची पुष्कळ विलापकाव्यें प्रसिद्ध आहेत. सन १९०३ सालीं ह्याच जागेवरून अध्यक्ष ह्या नात्यानें त्यांनीं आपला विद्वत्ताप्रचुर निबंध वाचलेला आपणांस अद्यापि स्मरत असेल. आगाशे ह्यांची जागा लवकर भरून येणें कठीण आहे. आणखीही पुष्कळसे महाराष्ट्रवाङ्मयसेवक या एकदोन वर्षांत कालवश झाले, त्यांची नाममालिका गेल्या मार्च महिन्यांत भरलेल्या आपल्या १९ व्या संमेलनाचे अध्यक्ष रा. रा. दामोदर गणेश पाध्ये यांनीं सवर्णन दिलेली आपणांस स्मरत असेलच.

ह्याप्रमाणें कालगतीनें आमच्यांतील विद्वान् माणसें जरी नाहींशी झालीं, तरी महाराष्ट्रांत कोणी विद्वान् राहिले नाहींत अशी भीति बाळगण्याचें कारण

नाहीं. तर मग माझ्यासारख्यावर अध्यक्ष होण्याची पाळी कां बरें यावी ? त्याचें कारण असें आहे कीं, आतां आमची मॅनेजिंग कमिटी नवें धाडस करण्यास प्रवृत्त झाली आहे. आजपर्यंत गुणिजनांना बोलावून त्यांच्या गुणांचें चीज करावें, विद्वानांची विद्वत्ता उजेडांत आणावी, हेंच आपलें कर्तव्य, अशी ह्या कार्यकारी मंडळीची समजूत होती. परंतु इतःपर नुसत्या गुणपरीक्षक ह्या पदवीनें त्यांचें समाधान होण्यासारखें नाहीं. गुणोत्पादक ह्या दैवी पदवीची हांव त्यांनीं धरली आहे. निर्गुणाला सगुण करणें ही वासना आतां त्यांच्या ठिकाणीं जागृत झाली आहे. अर्थातच ह्या नवीन साहसाचा प्रयोग माझ्या-सारख्यावर प्रथम होणें स्वाभाविक आहे. प्रसंग आला असतां निर्बुद्धांना सुबुद्ध होण्याची संधि मिळते, हा सर्वत्र अनुभव आहे. गुणांचा अभाव असतांही अगुणी अगुणी म्हणून ओरड करीत राहण्यापेक्षां, नसलेल्या गुणाचा आरोप उलट जर आपण करीत गेलों तर तेथें गुणाचा प्रादुर्भाव होतो. अशाच रीतीनें समाजांतील दूरदर्शी व शहाणे लोक वागत असतात. अर्धवट माणसांच्या संबंधानें तरी हा प्रयोग यशस्वी झाल्यावांचून राहात नाहीं. देशाभिमानशून्य माणसाची आपण देशाभिमानी म्हणून प्रसंशा करीत गेलों तर लोक आपणांस देशाभिमानी म्हणून समजतात, एवढ्या करतांच आपण थोडा तरी देशाभिमान बाळगणें अवश्य आहे, असें त्यास वाटूं लागतें. पैही खर्च न करणाऱ्या इसमाकडे आपण वर्गणी मागण्या-करितां गेलों तर, तुम्ही मोठे दाते आहां, आपल्यासारख्यांच्या दातृत्वा-वरच आमच्या संस्था चालणें शक्य आहे, इत्यादि तऱ्हेनें स्तुतिपाठ गाऊ-नच कृपणाच्या ठिकाणीं आपण दातृत्वाचा अंकुर निर्माण करतों. तात्पर्य, निर्गुणांना सगुण बनविण्याचे असे मार्ग असतात. तेव्हां ह्या संस्थेच्या चालकांची अशी ही अत्यन्त प्रशंसनीय महत्त्वाकांक्षा सफल व्हावी म्हणून मला त्यांचें आमंत्रण मान्य करणें प्राप्त झालें. कारण, अध्यक्षासाठीं ते इतरत्र जाते तर त्यांचा वारंवार निरुत्साह झाला असता. त्यांना उत्तर मिळतें, महाराज ! आपला उपक्रम स्तुत्य आहे, पण आमचा उपयोग आपणांस व्हावयाचा नाहीं, आपण पुढें जावें, कारण आम्ही निर्गुण नाहीं.

असो. निर्गुणाला सगुण करणें, दुर्बलाला सबल करणें, निर्जीवाला सजीव करणें, हा एकच उद्देश कोणत्याही अनवत देशांत निघणाऱ्या

संस्थांचा असला पाहिजे. अर्थातच 'मराठी 'ग्रंथसंग्रहालया' चा उद्देश ही मराठी भाषेची उन्नति व्हावी, मराठी भाषेची वाढ व्हावी हाच असणार. आतां कांहीं ठिकाणीं हा उद्देश व्यक्त असेल तर कांहीं ठिकाणीं अव्यक्त असेल. पण कार्य एकच. नाहींतर कुटिल टीकाकारांच्या आरोपास आपण पात्र होऊं. ते म्हणतील, अहो ! मराठींत नांव घेण्यासारखे ग्रन्थच नाहींत, मग 'ग्रंथसंग्रहालय' हें अनुपपन्न नांव कशाला ! त्याला चोपडी–संग्रहालय कां म्हणत नाहीं ?

**विद्याधरो यथा मूर्खो जन्मान्धश्च दिवाकरः**
**लक्ष्मीधरो दरिद्रश्च नाम तेषां निरर्थकम् ॥**

असाच हा प्रकार म्हणावयाचा. पण महाराज ! आमचीं ग्रंथसंग्रहालयें केवळ अजबखाने नव्हत. मराठी वाङ्मयाच्या परिपोषार्थ ज्या अनेक साधनांचा अवलंब केला जातो त्यांपैकीं संग्रहालय हें प्रमुख साधन आहे; व हाच फरक मराठीग्रंथसंग्रहालयें व इंग्रजी लायब्ऱ्या ह्यांत आहे. आपणांस इंग्रेजी पुस्तकें वाचावयास पाहिजेत, ह्या एकाच हेतूनें आपण लायब्ऱ्या स्थापन करतों. इंग्रेजी ग्रंथांना उत्तेजन देण्याची अंधुक कल्पनाही आपल्या मनांत नसते. पण मराठीग्रंथसंग्रहालयें ह्या दुहेरी हेतूनें आपण स्थापन करतों, हें अगदीं उघड आहे. म्हणून मराठीवाङ्मयोत्तेजक या दृष्टीनें ग्रंथसंग्रहालयांचा उपयोग फार मोठा आहे. तथापि हा एकच उपाय आहे असें कोणी म्हणत नाहीं. मराठी भाषेचा ज्या मानानें प्रसार होईल त्या मानानें वाङ्मयाची वाढ होणार. कोणत्याही भाषेचें वाङ्मय एकदम निर्माण करतां येत नाहीं, वृक्षाप्रमाणें त्याची वाढ होत असते, हें मेकॉलेचें म्हणणें कबूल आहे. "To hire 4–5 people to make a literature is a course which never answered and never will answer in any part of the world. Languages grow. They cannot be built. We are attempting to raise a large class of enlightened natives. Among them some will be found who will have the inclination and the ability to exhibit European knowledge in their vernacular dialects. This I believe is the only way by which we can raise up vernacular literature in the country. भाडोत्री इसमाकडून ग्रंथ तयार करवून वाङ्मय बनविण्याचे प्रयत्न निष्फळ होतात. **बडोद्याच्या महाराजांनीं** अशा प्रकारचा प्रयत्न केला, पण तो सफल झाला असें म्हणतां येत नाहीं. दहा-मजली इमारत आप-

णांस बांधावयाची असेल, तर गवंडी बोलावून, मालमसाला जमवून, नियमित कालांत इमारत उभारतां येते; परंतु वाङ्मय असें कसें तयार करतां येईल ? प्रथम बीजारोपण, नंतर अंकुर उद्भवतो, त्याचा पुढें वृक्ष बनतो. वाङ्मयाची वाढ अशीच व्हावी लागते. मेकॉलेचें हें म्हणणें खरें आहे; व गेल्या १।२ पिढ्यांवर मेकॉलेच्या ह्या विधानाचा विलक्षण परिणाम झाला आहे. तथापि ह्याला दुसरी बाजू आहे, ही गोष्ट पुष्कळांच्या लक्षांत येत नाहीं. नुसतें बीं पेरून मोठा वृक्ष होत नाहीं. त्याला चांगली माती घालावी लागते, पाणी द्यावें लागतें, हवा व प्रकाश ह्यांची अवश्यकता असते, तेव्हां कुठें मोठा वृक्ष तयार होतो. पण तुम्ही लावलेल्या रोपाला जर पाणी मिळणार नाहीं अशी व्यवस्था केलीत, चांगली माती आणून घातली नाहीं, हवा उजेड न मिळावा म्हणून वर सावट निर्माण केलें, तर त्या रोपाची वाढ कशी व्हावी ? तो लवकरच खुरटून मरण्याच्या पंथाला लागल्यावांचून राहणार नाहीं. निदान त्याचा जोमदार वृक्ष बनण्यास कल्पनातीत काल लागेल ह्यांत संदेह नाहीं. ह्या दृष्टीनें मराठी भाषेची सांप्रत स्थिति कशी आहे ह्याचा आपण आतां विचार करूं.

सध्यां सरकारी दप्तर—म्हणजे सेक्रेटरिएटमधील रेकार्ड—इंग्रेजी भाषेंत असतें; कायदेकौन्सिलमध्यें भाषणें इंग्रेजींत होतात; हायकोर्टांचें काम इंग्रेजींत चालतें; विश्वविद्यालयांतलीं कामें व परीक्षा इंग्रेजींत; शिक्षण इंग्रेजीच्या द्वारें; आणि इंग्रेजी शिकलेल्यांचा व्यवहारही इंग्रजींत ! हे लोक आपला खासगी पत्रव्यवहार सुद्धां इंग्रजींत करतात; रस्त्यांचीं नांवें; कंपन्यांचीं संस्थांचीं नांवें इंग्रेजींत; डाक्तर वकिलांच्या पाट्या इंग्रेजींत; जणूं काय यांच्याकडे इंग्लिश लोक वकील-पत्र देण्यास येत असतात ! लोकांत ज्ञानप्रसार करण्याकरतां म्हणून जीं व्याख्यानें होतात तींही इंग्रेजींत ! राष्ट्रीय सभेंत व प्रांतिक सभेंतसुद्धां भाषणें इंग्रेजींत ! ह्यावरून आपल्या घरांत इंग्रेजी भाषा किती घुसली आहे, ह्याची कल्पना करतां येईल. ज्या मानानें इंग्रेजी भाषेचा व्याप, त्या मानानें अर्थात् देशी भाषांची पिछेहाट. परंतु ह्यापैकीं बऱ्याच गोष्टी अपरिहार्य आहेत ह्यांत कांहीं संशय नाहीं. जित व जेते ह्यांची भाषा निरनिराळी असली म्हणजे जेत्यांची भाषा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीनें जितांवर लादली जाते.

आजपर्यंत जगाचा अनुभव असाच आहे; व तो इतिहासही मनोरंजक आणि बोधप्रद आहे.

हल्लीं इंग्लंडचें साम्राज्य आहे तसें पूर्वी रोमन लोकांचें साम्राज्य होतें. खुद्द इंग्लंडदेश रोमनांच्या ताब्यांत होता, हें आपणांस माहीतच आहे. रोमन लोकांनीं इतर जिंकलेल्या देशांत लॅटिन भाषा सुरू केली, त्याप्रमाणें इंग्लंडांतही त्यांनीं आपल्या भाषेचा अंमल बसविला. " The Natives clustered around the castra (camp) where justice was administered in the grand language which Cicero had ennobled in pleading the cause of dethroned kings and oppressed populations. We learn that many British chieftains at this time became masters of the Latin tongue and affected Roman manners and tastes."

नंतर युरोपखंडांत अरबीलोकांनीं तरवार गाजविली हें सर्वविश्रुतच आहे. त्यावेळीं अरबांनीं स्पेन देशांत अरेबिक भाषा सुरू केली. खुद्द इंग्लंडानें आयर्लंडमध्यें आयरिश लोकांना इंग्लिश भाषा शिकण्यास भाग पडलें. ( That the free-holders should cause their children to learn to speak English ). कोरिआ देश चीनच्या ताब्यांत असतां चिनी भाषेंत, चिनी वाङ्मयांत कोरिअन लोकांना परीक्षा द्यावी लागे, व पास झालेल्यांसच सरकारी जागा मिळत. अशी स्थिति सन १८९४ पर्यंत होती. ह्या परीक्षा बंद झाल्यावर अर्थात् चिनी वाङ्मयविषयक जिज्ञासा नष्ट झाली. जपान जागृत होण्यापूर्वी चिनी भाषेचा अंमल जपानी लोकांवर चांगलाच बसला होता. जागृतीनंतरही जपानला आपल्यावरील चिनी भाषेचें दडपण झुगारून देतां येईना: ' There has not yet been any real escape from the trammels of a tradition which assigned the crown of scholarship to whatever author drew upon the resources of the Chinese tongue. ' फिलिपाईन बेटें अमेरिकेच्या ताब्यांत आहेत. स. १९०२ च्या रुजवेल्ट-बिलानें इंग्रेजी अगर स्पॅनिश ज्यांस बोलतां येत असेल, अशा जमीनदारांसच ' लोअर–हाऊस ' चें मेंबर होतां येत असे, अर्थात् राज्यकारभार परकी भाषेंत चालावयाचा. महाराज, परकीभाषेचे अनिष्ट परिणाम फक्त देशीभाषेवरच घडतात हें मानणें चुकीचें आहे. त्यांची व्यापकता फार मोठी आहे. पोलिश लोक आमच्यापेक्षां शहाणे. परकी भाषेचें

घातक स्वरूप त्यांस पूर्णपणें ज्ञात होतें. रशियाच्या ताब्यांत पोलंड देश गेल्यावर इ. स. १८१५ मध्यें अलेक्झांडर बादशहाकडून १६५ कलमांची सनद पोलिस लोकांनीं मिळविली. नवीन राज्यघटना बनविणारांनीं ही सनद अवश्य वाचण्याजोगी आहे. त्या सनदेंतील २८ वें कलम असें होतें कीं सर्व राज्यकारभार पोलिश भाषेंतच चालविला पाहिजे. ' All public business will be transacted in the Polish language. ' दुर्दैवानें हे सुखाचे दिवस पोलिश लोकांना चिरकाल लाभले नाहींत. कारण इ. स. १८९९ सालीं वारसा–विश्वविद्यालयांत सर्व शिक्षण रशियन भाषेंतून दिलें जात असे, ही गोष्ट इतिहासांत नमूद आहे. जर्मनपोलंडमध्यें राज्यकर्त्यांनीं अर्थात आपली भाषा सुरू केली. परंतु पोलिश लोकांनीं हें भाषाविषयक जूं झुगारून देण्याची शिकस्त केली. ते असें म्हणत कीं, घरींदारीं, देवळांत, कोर्टांत एकदां जर्मन भाषा सुरू झाली कीं लोकांना जर्मन बनविण्याच्या सरकारच्या उद्योगाला यश आलेंच म्हणून समजावें. सरकारी हुद्याच्या जागांच्या लालुचीलाही ते बळी पडले नाहींत. जर्मन न शिकून ह्या जागांवरही त्यांनीं पाणी सोडलें.

पोलिश लोकांप्रमाचेंच बोअर लोकही भाषेचें महत्त्व जाणणारे होते. युद्धांत बोअर लोक जिकिरीस आले तरी सुद्धां त्यांनीं आपणांस पाहिजे तसा तह करून घेतला. ह्या तहाच्या अटींपैकीं भाषेसंबंधानें थोडें रण माजलें होतें. बोअर लोक डच भाषा सोडण्यास कबुली देतना, व इंग्लिशांच्या मनांत आपल्या भाषेचें घोंडें पुढें दामटावयाचें होतें. शेवटीं तडजोड होऊन इंग्लिश व डच ह्या दोन्ही भाषांचे समान हक्क शाळांतून राखण्यांत आले. ' Equal rights for the Dutch and English languages in Educational matters '–असें एक कलम तहांत घालावें लागलें. हें सर्व **डी वेट** ह्यांच्या आग्रहामुळें साधलें गेलें. ( 'Three Years War' by *C. R. De Wett.* ) बोअर लोकांप्रमाणें जितांनीं भाषाविषयक दक्षता ठेविली नाहीं कीं जेत्यांची भाषा स्वीकारणें त्यांना भाग पडतें. चीन जपानी युद्धानंतर स. १८९५ सालीं फोर्मोसा बेट जेव्हां जपानच्या ताब्यांत गेलें, तेव्हां जपान सरकारनें त्या बेटांतल्या लोकांना प्रथम जपानी भाषा व जपानी इतिहास शिकविण्याचा आरंभ केला. एका देशानें दुसरा देश जिंकला म्हणजे जेत्यापुढें शिक्षणविषयक असे दोन प्रश्न मुख्यतः असतात.

व्यावहारिक शास्त्रीय शिक्षण देऊन जिंकलेल्या देशांतील लोकांना अधिक सुखी करावयाचें; अथवा अशा रीतीनें शिक्षण द्यावयाचें कीं, जितांचें जेत्यांशीं पूर्ण तादात्म्य व्हावें. हे दोन मार्ग परस्पर विरुद्ध असतात. "Should they give the people a practical scientific education and thus enable them to better themselves, have more comfortable homes and make more money or should they give such an education as would assimilate them with us Japanese? अशा शब्दांनीं हें शिक्षण विषयक धोरण टेक्कोशी ह्या जपानी मुत्सद्द्यानें निर्दिष्ट केलें आहे. हिंदुस्थानांत इंग्रजांचें धोरण ह्या assimilation theory ला म्हणजे तादात्म्य–तत्त्वाला अनुसरून आहे, अशी टेक्कोशीची समजूत आहे. फोर्मोसा बेटांत हें तादात्म्यतत्त्व कधीं काळीं तरी मूर्त स्वरूप पावेल कीं नाहीं अशी एकानें शंका दर्शविली, तेव्हां टेक्कोशीनें उत्तर दिलें "You must have a great deal of patience.....It is fully a hundred years since England gained possession of India, but the people of that country are not yet fully assimilated" (*Japanese Rule in Formosae*)

भाषेचा प्रश्न सामान्य नव्हे, हें आपणांस ह्यावरून दिसून येईल. भाषेच्या द्वारानें शासितांच्या संस्कृतीचा लोप होऊन त्या ठिकाणीं शास्ते आपली संस्कृति स्थापन करतात. जर्पन लोक मुत्सद्दी. पोलिशांना जर्मन करून सोडण्याचा उत्तम उपाय म्हणजे जर्मन भाषेचा त्यांच्यांत सर्वत्र प्रसार करणें होय, हें त्यांस चांगलें कळलें होतें. तुर्की लोकांत हा मुत्सद्दीपणा कमी त्यामुळें त्यांच्या ताब्यांतील बल्गेरिया देशांत त्यांनीं ह्या अत्युत्तम साधनाकडे दुर्लक्ष केलें, व त्याबद्दल इतिहासकारांनीं त्यांस दोष दिला आहे. "The contemptuous indifference with which the Turks regarded the Christian Rayahs (persons who are not Mahomedans) was not altogether to the disadvantage of the subject race. Military service was not exacted from the Christians; no systematic effort was made to extinguish either their religion or their language." परकी भाषा आपणांस पूर्णपणें परकी करते. परकीयांचे आचारविचार, परकीयांची आवडनावड, परकीयांचा पोषाक, इत्यादि सर्व बाबतींत आपण आपलें सोडून परकी बनतों. इंग्लंडच्या संबंधानें वर जो एक इतिहासांतील उतारा दिला आहे, त्यांतील शेवटलीं दोन वाक्यें मनन करण्यासारखीं आहेत. "British Chieftains at this time became masters of the Latin tongue *and affected Roman manners and*

*tastes.*" जे परकी भाषा बोलतात त्यांचे विचार परकी होतात. परकीयांच्याप्रमाणें ज्यांचे विचार चालतात त्यांची ध्येयें परकी बनतात; आणि परकीयांच्या रीतिभाती उचलण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते–ह्या बुडरफ साहेबांच्या म्हणण्याला इतिहासाचें पूर्ण पाठबळ आहे. "Is India Civilized" ह्या पुस्तकांत ते म्हणतातः "Those who speak a foreign language will tend to think foreign thoughts. Those who think in foreign thoughts will have foreign aims and tend to adopt foreign ways and so forth." भाषेमध्यें किती जबरदस्त शक्ति आहे हें पहावयाचें असेल तर आल्सेस-लोरेन ह्या प्रांतांकडे नजर फेंकावी. हे प्रांत पूर्वीचे फ्रान्सचे. ते स. १८७० च्या युद्धांत जर्मनीनें घेतले. पण इतक्या अल्पावधींत ते इतके जर्मन झाले आहेत कीं, तहपरिषदेला ते प्रांत फ्रान्सला मुकाट्यानें परत देतां येईनात. असा हा परकी भाषेचा प्रभाव आहे. ह्यानंतर आमच्यांतीलच विद्वान् व थोर मंडळी आम्हांला इंग्रेजी भाषेंतूनच सर्व विषय शिकविले पाहिजेत असा आग्रह धरतात याचें आश्चर्य वाटण्याचें कारण काय ? असो. ईजिप्तदेश इंग्लिशांच्या ताब्यांत आहे, तेथेंही इतिहास व शास्त्रीय विषय इंग्रेजींतूनच शिकवितात.

आतां आपण हिंदुस्थानाकडे वळूं, ब्रिटिश अमलापूर्वी सर्व समाजाला हल्लींच्या अर्थानें शिक्षण मिळत नसे. हिंदूंमध्यें विशिष्ट वर्गांचें शिक्षण संस्कृतमधून होत असे, मुसलमानांचें शिक्षण अरेबिकमधून दिलें जाई. मराठेशाहींत सरकारी दप्तर मराठींत असे, व मोंगलाईंत परशिअनमध्यें असे. कंपनीकडे राज्यकारभार असतांना शिक्षणाच्या बाबतींत इंग्रेजीला उत्तेजन मिळालें नाहीं, इ. स. १७९७ मध्यें सर चार्लस् ग्रँट यांनीं सर्व शिक्षण इंग्रेजींतून द्यावें, असा रिपोर्ट केला असूनही तो न जुमानतां कंपनीनें संस्कृत व अरेबिक ह्या भाषांच्याद्वारा शिक्षण देण्याचें चालू ठेवलें. पण मेकॉले साहेबांचा खलिता सुप्रसिद्धच आहे. पुढें इ. स. १८३५ मध्यें सर्व मनू बदलला. "Henceforth all the funds available for educational purposes should be mainly devoted to the maintenance of schools and colleges of Western learning to be taught through the medium of English."

तेव्हांपासून सर्व शिक्षण इंग्रेजींतून देण्यास सुरवात झाली. तथापि हा निर्णय देशी भाषांतून शिक्षण देण्याइतक्या देशी भाषा समृद्ध नाहींत ह्या

मुद्यावर झाला. देशी भाषेंतून शिक्षण देण्याचें तत्त्व अमान्य नव्हतें; उलट अखेरीस देशीभाषेंतून शिक्षण देण्याचा हेतु सदैव डोळ्यांपुढें ठेवला पाहिजे ही गोष्ट सर्वांस कबूल झाली. " In regard to vernaculars all Parties agreed that the vernaculars contained neither the literary nor scientific information necessary for a liberal education. *But it was admitted* that the instruction of the masses of the People through the medium of their own language was the ultimate object to be kept in view. " ( *Trevelyan's Education of the People of India.* ) उत्तर हिंदुस्थानांत कोर्टाची भाषा परशिअन असे तीही इ. स. १८३७ च्या कायद्यानें बंद झाली. पुढें इंग्रेजी शिक्षण ज्यांनीं संपादन केलें असेल, त्यांनाच सरकारी नोकऱ्या मिळतील असें जाहीर करण्यांत आलें. 'Lord Hardinge announced in 1844 that thenceforward preference would be given in all appointments under Government to those who had received Western education. ' ह्याप्रमाणें इंग्रेजी भाषेचा प्रसार सर्वत्र सरराह होऊं लागला.

आतां आपणांस ह्या अडचणी कशा दूर करतां येतील ह्याचा विचार करणें अवश्य आहे. प्रथमतः ही गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे कीं, इतर उपरिनिर्दिष्ट लोकांपेक्षां आपल्या देशाची स्थिति थोडी वेगळी आहे. ह्या देशांत अनेक भाषा असल्यामुळें आपणांस इंग्रेजी भाषा आपण होऊन अनिर्वाहपक्ष म्हणून पतकरणें भाग झालें आहे. ह्या दृष्टीनें भाषावार प्रांतविभागणीचें महत्त्व किती आहे ह्याची आपणांस कल्पना करतां येईल. भाषाविषयक अडचणीमुळें सरकारी दफ्तर इंग्रजी भाषेंत राहणारच. परंतु कायदेकौन्सिलांतील भाषणें देशी भाषेंत होणें देशी भाषांच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. देशी भाषांत कोणी भाषण करतां कामा नये व इंग्रेजींतच प्रत्येकानें बोललें पाहिजे, असा कायद्याचा स्पष्ट प्रतिबंध नाहीं. मुंबई सरकारनें जे ह्या बाबतींत नियम केले आहेत त्यांत १३ वा नियम असा आहे:—' any member may, with the permission of the President, speak at the request and on behalf of another member who is unable to express himself in the English language. ' *( Bombay Legislative Council Manual).* म्हणजे इंग्रेजींत ज्यास बोलतां येत नाहीं त्याच्याकरतां दुसऱ्या सभासदानें अध्यक्षाच्या परवानगीनें बोलावें. देशीभाषेंत बोलण्याची मनाई कायद्यानें केली नसतां

कृपया पुस्तक जपून वापरा


ती कानूच्या रूपानें करण्याचा अधिकार कोणाला आहे कीं नाहीं ह्याचा निर्णय कायदेपंडितांनीं करणें अवश्य आहे. मराठींत भाषण करण्यास कायद्याची हरकत नसावी असा माझा समज आहे. कायदेकौन्सिलांतील भाषणांनीं मराठी वाङ्मयांत भर पडण्यासारखी आहे, त्यामुळें आपलें ह्या गोष्टीकडे विशेष लक्ष पाहिजे. कानडीजिल्हे मुंबईइलाख्यांत सामील केल्यानें भाषेचा प्रश्न घोटाळ्याचा झाला आहे. गुजराथीची आपणांस अडचण फारशी भासत नाहीं. गुजराथी लोकांना मराठींत बोललेलें समजतें व आपणांस गुजराथींत बोललेलें साधारण समजतें. परंतु कानडी व मराठी ह्यांत कोणतेंच साम्य नसल्यामुळें त्या भाषेचें अक्षरही समजणें शक्य नाहीं ! तथापि पुष्कळ वेळां कानडी प्रांतांतले मेंबर मराठी जाणणारे असल्यामुळें ही अडचणसुद्धां फार करून आड येत नाहीं. ह्यास्तव मराठी सभासदांनीं कायदेकौन्सिलांत मराठींत भाषणें करण्याचा प्रयत्न करावा.[1] ह्या कामीं त्यांना मनाई झाल्यास कोर्टाकडे जाऊन त्यांनीं आपला हक्क शाबीत करून घ्यावा. सुधारणानंतर मतदारक्षेत्रही फार वाढणार आहे. अशावेळीं इंग्रेजी न जाणणारे लोक कौन्सिलमध्यें येण्याचा संभव फार. नाहींतर इंग्लिश भाषेचें ज्ञान ही एक नवीनच अट उमेदवारावर लादण्यांत येईल. सध्यांही इंग्रेजी न जाणणाऱ्या इसमास कौन्सिलचें सभासद होतां येतें; मात्र बोलतां येत नाहीं. तेव्हां ह्या विषयाकडे आमच्या मंडळीचें लक्ष लागणें अवश्य आहे.

विश्वविद्यालयाकडे पाहिलें असतांही देशीभाषांना अनुत्तेजक अशीच ह्या संस्थेची रचना आहे. 'धन्यास धत्तूरा आणि चाकरास मलिदा' अशी या ठिकाणीं स्थिति आहे. देशी भाषेपेक्षां परकी भाषेचेंच स्तोम फार; एवढेंच नव्हे तर देशी भाषांसंबंधानें युनिव्हर्सिटीनें कोल्हांटी उडी मारली आहे. इ. स. १८६८ पर्यंत मराठी सर्व परीक्षांत असे. पुढें मराठीला विश्वविद्यालयानें अजीबात फांटा दिला. नंतर, आपणां सर्वांस माहीतच आहे कीं, इ. स. १९०३ सालीं न्या. रानड्यांच्या परिश्रमानें एम. ए. च्या परीक्षेला मराठी ऐच्छिक विषय म्हणून ठेवला गेला. तथापि मराठीच्या दुर्दैवानें मराठी शिकविण्याची सोय विश्वविद्यालयानें अगर कोणत्याही कॉलेजानें केलेली नाहीं. त्याचा परिणाम असा झाला कीं, आज सोळा

१ अलीकडे ही सोय अंशतः झाली आहे.

वर्षांत सोळा विद्यार्थीही मराठी घेऊन एम. ए. झाले नाहींत ! ह्यास्तव मराठी शिकविण्याची व्यवस्था विश्वविद्यालयानें तरी स्वतंत्र करावी, अगर प्रत्येक कॉलेजांत मराठीचा प्रोफेसर नेमला जाईल एवढी तरी विश्वविद्यालयानें खबरदारी घ्यावी अशी ओरड आपण केली पाहिजे. दुसरें, मराठी घेऊन पहिला येणाराला निदान ५०० रुपयांचें बक्षिस मिळेल तर त्या लालुचीनें अधिक विद्यार्थी मराठी घेतील. महाराष्ट्रांत १०००० रुपये जमा करणें कांहीं अवघड नाहीं. १०००० रु. आपण विश्वविद्यालयाच्या स्वाधीन केले तर त्यांतून ५०० रु. चें बक्षीस ठेवतां येईल. अलाहाबाद व मद्रास विश्वविद्यालयांत मराठीस योग्य स्थान प्राप्त झालें आहे, पण मराठी मुलखांत मराठीची हेळसांड होत आहे. ही गोष्ट आमच्यापेक्षां आमच्या विश्वविद्यालयालाच लाजिरवाणी आहे. मराठी वाङ्मय निर्माण करा, म्हणजे आम्ही मराठीला विश्वविद्यालयांत जागा देऊं, असें प्रतिपादन करणारा एक पक्ष आहे. पण विश्वविद्यालयानेंच मराठीचा अव्हेर केल्यावर तिनें अंग तरी धरावें कसें ? हल्लींच मराठींत जे ग्रंथ आहेत ते संग्रहालयांच्या कपाटांत धूळ खात पडले आहेत, ही गोष्ट ह्या मंडळीस माहीत नाहीं काय ? ज्यांची दुसरी आवृत्ति निघाली आहे असे कितीसे ग्रंथ मराठींत आहेत ? रा. शंकरराव राजवाड्यांच्या 'गीताभाष्या'च्या ५०० प्रतींची पहिली आवृत्ति अद्यापि खपली नाहीं ह्याचें कारण काय ? रा. वामनराव जोशी यांचा ' नीतिशास्त्रप्रवेश ' इतका सुरेख असूनही त्याची दुसरी आवृत्ति लवकरच निघण्याचा संभव आहे काय ? कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांचा भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास किती लोक वाचतात ! अशीं अनेक उदाहरणें देतां येतील. ह्याचें सयुक्तिक उत्तर कोणी तें द्यावें, आणि मग मराठींत वाङ्मय निर्माण होत नाहीं म्हणून आम्ही विश्वविद्यालयांत तिचा प्रवेश होऊं देत नाहीं, असें म्हणावें. ज्या मानानें तुम्ही आमच्या तरुण पिढीला मातृभाषेचा स्पर्शही होऊं देणार नाहीं त्या मानानें हे तरुण स्वभाषेपासून दूर दूर जाणारच. आपलीच भाषा त्यांना अपरिचित होते, मग त्या भाषेचा त्यांस अभिमान कसा यावा ? आणि अभिमान असून तरी उपयोग काय ? ' मला मराठींत बोलतां येत नाहीं, क्षमा करा, मी इंग्रेजींत बोलतों—' असें विनविण्याचा प्रसंग थोड्या लोकांवर येतो काय ? मराठींत उत्तम वाङ्मय निर्माण होण्याकरतांच आम्हांला सर्व विषय मराठी-

तून शिकविणें अवश्य आहे. मराठींत ग्रंथ नाहींत अशी सबब सांगण्यांत येते. पण विषय शिकविण्यास ग्रंथ कशाला ? तुम्हांला ग्रंथ शिकवायचा कीं विषय शिकवायचा ? ग्रंथ प्रोफेसरांस पाहिजेत, विद्यार्थ्यांस नकोत. शिक्षकांनीं इंग्रेजी पुस्तकाचा उपयोग करावा, त्यास ना कोणाची आहे ? पण त्यांचें व्याख्यान मराठींत होण्यास काय हरकत आहे ? ऑक्सफर्ड व केंब्रिज विश्वविद्यालयें स्थापन झालीं तेव्हां इंग्रेजी भाषेची जी स्थिति होती, तिच्यापेक्षां मराठीची सांप्रतची स्थिति कमी दर्जाची आहे असें म्हणतां येणार नाहीं. जॉनसनच्या इंग्रेजी कोशांत फक्त ४०००० शब्द आहेत. ह्या कोशांत सर्व शब्दांचा संग्रह नाहीं ही गोष्ट खरी आहे; तथापि प्रमुख, भारदस्त, प्रचारांतले शब्द त्यांत सोडलेले नाहींत हेंही विसरतां कामा नये. मोल्स्वर्थच्या मराठी कोशांत ६०००० शब्द आहेत. तेव्हांपासून आतांपर्यंत मराठींत आणखी किती तरी शब्द रूढ झाले आहेत. ह्याप्रमाणें मराठी भाषेचें शब्दभांडार फार मोठें आहे. निरनिराळ्या प्रांतांत रूढ असलेले पुष्कळ शब्द कोशांत समाविष्ट झालेले नाहींत. बरें, मराठींत मूळचा जोम नसून इतर भाषांतील शब्दांनीं ती समृद्ध झाली आहे असेंही म्हणण्याचा कोणास अधिकार नाहीं. कारण उपरिनिर्दिष्ट ६०००० शब्दांपैकीं फक्त ३००० शब्द हिंदुस्थानी आहेत. ह्याउपर उच्च विषय शिकविण्यास मराठींत शब्दसंग्रह नाहीं असें म्हणणें अनुचित होय. कॉलेजांतूनही सर्व विषय मराठींत शिकवा, परीक्षा मराठींत घ्या, आणि मग वाङ्मय निर्माण होतें कीं नाहीं पहा. ह्या कामीं मराठी ट्रेनिंग कॉलेजाचें उदाहरण अप्रस्तुत होय. तेथें विद्यार्थी थोडे असतात. ते गरीब, व बुद्धीनेंही कमी, आणि पुढें पास झाल्यानंतरही त्यांची उपासमार; अशा स्थितींत ते विचारे काय करणार ? तरी पण तेथें सर्व विषय मराठींतून शिकवितां येतात, मग इतरत्रच ती अडचण कां भासावी ? तसेंच मराठी वर्तमानपत्रकार सर्व विषयांची चर्चा करितातच. त्यांस जर मराठींत आपले विचार व्यक्त करण्यास अडचण भासत नाहीं तर ती कॉलेजांतच भासण्याचें कारण काय ? माझ्या मतें वाचकवर्ग नसल्यामुळें मराठींत चांगले ग्रंथ होत नाहींत; आणि तरुणांचें सर्व शिक्षण मराठींतून झाल्याविना वाचकवर्ग वाढणें शक्य नाहीं. मराठींत उत्कृष्ट वाङ्मय निर्माण झालें म्हणजे आम्ही विश्वविद्यालयांत मराठीचा प्रवेश करून घेऊं असें कित्येकांचें म्हणणें आहे.

पण महाराज ! मराठींत एकदां का उत्तम वाङ्मय निर्माण झालें म्हणजे मग आम्हीं तुमच्याकडे भिक्षा मागण्यास येतों कशाला ? मग विश्वविद्यालयाची पर्वा तरी कोण करतो ? विश्वविद्यालयाला आपली अब्रू घालवावयाची नसेल तर तेंच आपण होऊन मराठीच्या पाठीस लागेल. आतां दुसरा आक्षेप असा आहे कीं, ' इतर विषय फार झाल्यामुळें विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमांत मराठीला जागा नाहीं–विद्यार्थ्यांवर अधिक अभ्यासाचा बोजा पडतो. ' मराठीपुरता तरी हा आक्षेप अज्ञानमूलक आहे असें मला वाटतें. मराठी संस्कृतापासून निघाली आहे. संस्कृत ही मराठींत रूपांतर पावली आहे. म्हणून संस्कृताच्या अध्ययनाला मराठीची व मराठीच्या अध्ययनाला संस्कृताची अवश्यकता आहे. संस्कृत पुस्तक एखादें कमी करून त्याऐवजीं मराठी पुस्तक लावण्यास कांहीं हरकत नसावी. महाभारताचें पर्व लावलें असतां त्याच्याबरोबरच मोरोपंतांचें महाभारत ठेवलें तर संस्कृताच्या अध्ययनालाही पूर्णता येईल. संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें मराठींत झालीं आहेत. तेव्हां संस्कृताबरोबरच मराठी शिकविल्यास दोनही भाषांचें शिक्षण मिळून विद्यार्थ्यांवरील बोजाही फार वाढणार नाहीं. तात्पर्य, इच्छा असल्यास कांहीं तरी तडजोड काढणें अशक्य नाहीं. पंजाब युनिव्हर्सिटीला जें कार्य करतां येतें तें मुंबई युनिव्हर्सिटीला कां करतां येऊं नये ' The Punjab University takes an active part in the improvement of vernacular literature ' अशी शिफारस विश्वकोशांत ह्या विश्वविद्यालयाची केली आहे.

ही सर्व सुधारणा विश्वविद्यालयाची घटना बदलल्यावांचून होणें संभवनीय नाहीं. मराठीच्या दृष्टीनें ही घटना अत्यंत विघटित आहे. हल्लीं ८० ऑर्डिनरी फेलोजपैकीं खिस्ती ३८, पारशी २१, आणि मराठी फक्त १७ आहेत. मुंबई इलाख्यांत मराठी बोलणारांची संख्या ९ लाखांवर आहे. त्याशीं हें प्रमाण १ लाखांत २ पडतें. पारशी १ लाख असून त्यांचें प्रमाण एका लाखांत २१ पडतें. हा अक्षम्य अन्याय आहे. ह्याचा प्रतिकार करण्याची जबाबदारी मराठी बोलणारांवर आहे. पण आजपर्यंत ह्या कामीं जसे कसून प्रयत्न करावे तसे कोणी केले नाहींत. ह्या विलक्षण घटनेमुळेंच आमच्या विश्वविद्यालयाचें नेहमीं प्रतिगामी धोरण असतें. समजा, आमच्या दुर्दैवानें इंग्रज हिंदुस्थानांत आले नसते, तर मराठी वाङ्मय समृद्ध नाहीं ह्या सबबीवर

महाराष्ट्रांत शिक्षणच देण्याचें ह्या मंडळीनीं बंद केलें असतें काय ? संस्कृत-विषयक अर्वाचीन वाङ्मय जर्मन भाषेंतच आहे. सायन्समध्येंही जर्मन राष्ट्राची प्रगति सर्वांत अधिक आहे. मग हे विषय इंग्रजींतून न शिकवितां जर्मन भाषेंतून कां शिकवीत नाहींत? सॅडलर कमिशननें देशी भाषांसंबंधानें बऱ्याच सुधारणा सुचविल्या आहेत. पण कॉलेजमधील शिक्षण इंग्रेजींतूनच द्यावें अशी शिफारस कमिशननें केली आहे. खालचें—म्हणजे इंटरमीजिएटपर्यंतचें—सर्व शिक्षण देशी भाषांच्याद्वारें दिलेंच पाहिजे अशी शिफारस कमिशननें न केल्यामुळें त्या रिपोर्टांत मोठेंच वैगुण्य राहिलें आहे. इंग्रेजींतून शिकवावयाचे विषय शक्य तितके कमी करावे अशी कमिशनची सूचना आहे. तथापि इंटरमीजिएटपर्यंत ह्यापुढें 'अवश्य भाषा' म्हणून देशी भाषांचा अभ्यास होणार ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. शिवाय विश्वविद्यालयानेंही देशी भाषांचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीनें करण्यास उत्तेजन द्यावें अशी जी कमिशननें शिफारस केली आहे तिचाही आपणांस कांहीं उपयोग होईल. पण ह्याहीपेक्षां हितकर अशी एक गोष्ट कमिशननें केली आहे. देशी भाषांच्या उद्धाराकरतांच आम्ही त्या भाषांचा पद्धतशीर अभ्यास करवावा असें म्हणतों असें नाहीं, तर विवेचनांत विशदता येण्यास देशी भाषांचा अभ्यास कारणीभूत होतो. "We attach great importance to the systematic study of the vernaculars not only for its own sake; but as a *means to clear thinking.*" इंग्रेजींतून सर्व विषय शिकविलेच पाहिजेत अशी सक्ति नसतांना खासगी शाळांत देशी भाषांच्या द्वारें शिक्षण दिलें जात नाहीं हा चमत्कार आहे. प्रवेशपरीक्षेंत उत्तरें इंग्रेजी भाषेंत द्यावीं लागतात ही गोष्ट खरी. पण ६ वर्षांत सर्व विषय मराठींत शिकवून शेवटल्या वर्षांत तेच विषय पुन्हां इंग्रेजींत सांगतां येणार नाहींत असें नाहीं. निदान अशा तऱ्हेचें प्रयोग करूं न इच्छिणाऱ्या संस्थेला लोकांनीं मदत देण्यापूर्वी विचार करावा. वर निर्दिष्ट केलेल्या गुष्कळ अडचणी पुण्यास स्वतंत्र विश्वविद्यालय झाल्यानें दूर होऊन सुधारणांचा मार्ग निष्कंटक होण्याचा संभव आहे. म्हणून मराठी भाषाभ्युदयेच्छूंचें ह्या प्रश्नाकडे लक्ष वेधणें अवश्य आहे. ह्याशिवाय मराठीभाषेच्या हिताच्या दृष्टीनें प्रत्येक जिल्ह्यांत एक मराठी पूर्ण ट्रेनिंग कॉलेज असणें जरूर आहे. ह्या विद्यालयांचा प्रसार जितका होईल तितका मराठीला फायदा होण्याचा संभव अधिक

आहे. त्याचप्रमाणें हल्लींच्या स्थितींतही मराठी ७ इयत्तांपर्यंत शिकविणाऱ्या शाळांतून इंग्रेजी तीन इयत्तापर्यंत शिक्षण देण्याची तरतूद झाली असतां मराठींतून आपोआपच पुष्कळ विषय विद्यार्थ्यांना शिकतां येतील. पूर्वी मराठी शाळांत पुष्कळ विषय शिकवीत. संपूर्ण बीजगणित, सिद्धांताचीं ६ पुस्तकें, त्रिकोणमिती, दादोबांचें संपूर्ण मोठें व्याकरण, आणि पुष्कळशा कविता, इतकी तयारी विद्यार्थ्यांची मराठी शाळेंत असतांनाच होत असे. ह्यापूर्वीच्या पद्धतीला अनुसरून जर सध्यांचा शिक्षणक्रम बदलला तरी सुद्धां थोडेसें कार्य होण्याजोगें आहे. ह्याच्याच जोडीला ७ वी यत्ता झाल्यावांचून हायस्कुलांत मुलगा घ्यावयाचा नाहीं असा नियम व्हावयास पाहिजे. पण ह्यावद्दल आपण जर उचल केली नाहीं तर दुसऱ्यास दोष देऊन काय उपयोग ? आपल्या क्षेत्रांत शेजाऱ्याचें हळू हळू चाललेलें अतिक्रमण मूर्खपणानें आपण तसेंच चालूं दिलें तर कांहीं वर्षांनीं सर्व क्षेत्र आपल्या हातून गेलें असतां दुसऱ्यास दोष कोणत्या तोंडानें देतां येईल ? मराठी भाषेचें हिताहित पाहणें ज्यांचें आद्य कर्तव्य आहे अशा संस्था आपल्याकडे नाहींत ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

असो, ज्या गोष्टीसंबंधानें आपण स्वतंत्र नाहीं त्याविषयीं नाइलाज म्हणून स्वस्थ बसणें भाग आहे. पण ज्या बाबतींत पारतंत्र्याची सबब आपल्याला नाहीं तेथेंही आपण इंग्रेजी भाषेचा अवलम्ब करावा हें चमत्कारिक नाहीं काय ? लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार करण्याच्या हेतूनें भरलेल्या सभांत भाषणें इंग्रेजीमध्यें आपण करतों, याची आपणांस शरम वाटली पाहिजे. परकी भाषेंत बोलण्याच्या घातक संवयीमुळें आपण आपल्या देशाचें कल्पनातीत नुकसान करीत असतों. आपण आपल्या लोकांनाच परकी होतों. आपल्या लोकांची व आपली कायमची फारकत होते. आपलें वजन लोकांवर पडत नाहीं. लोकांना शिक्षणाचा मार्ग बंद केल्यासारखा होतो. आपलें मनोगत लोकांस समजत नाहीं. सारांश, आत्मतृप्तिवांचून दुसरा कोणताही फायदा परकी भाषेंतून केलेल्या भाषणांनीं होत नाहीं. "only a races' own language can express its soul" असें वुडरफसाहेबांनीं म्हटलें आहे तें सर्वांनीं मनन करण्यासारखें आहे. आपलें हृद्गत परभाषेंतून व्यक्त कसें होणार ? ज्या वर्तमानपत्रांची अथवा वक्त्यांची भाषा चांगली असते त्यांचा परिणाम, त्यांचें वजन; समाजावर अधिक, हा आपला नेहमीचा अनुभव

आहे. आपल्यांतील दृष्टांत उपमा इत्यादि आपल्या माणसांना जशा समजतील तशा परभाषेंतल्या कशा समजाव्या? व दृष्टांत–उपमांनीं अनलंकृत भाषेचा परिणाम श्रोत्यांवर–अशिक्षित समाजावर–मुळींच होत नाहीं, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. म्हणून आमच्या परिषदांचीं, सभांचीं कामें देशी भाषेच्या द्वारा चाललीं पाहिजेत. महात्मा गांधी हे स्वदेशीभक्त होत. व्हॉइसरॉयांसमोर हिंदी भाषेंत भाषण करण्याचें साहस अगर धैर्य आजपर्यंत हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणाही माणसास झालें नाहीं. 'राजव्यवहार कोश' करवून मातृभाषेचें महत्व ओळखणाऱ्या शिवाजीनंतर देशोन्नतीच्या कामीं देशी भाषेचें महत्त्व एकटे गांधीच जाणतात असें म्हटल्यानें अतिशयोक्ति होणार नाहीं. देशी भाषांचा आश्रय केल्यावांचून देश सुधारण्याची आशा करणें निष्फळ आहे. इंग्रेजीचा गंध नसलेले कोट्यावधि लोक आहेत. त्यांच्याच भाषेंत त्यांच्याशीं बोलल्याशिवाय त्यांना सज्ञान करण्याचा दुसरा उपाय नाहीं. देशांतील मूठभर लोक सुधारल्यानें देश सुधारत नाहीं. ह्यामुळेंच लोकसत्ताक राज्यपद्धतींत स्वभाषेचा उत्कर्ष होत असतो. आजपर्यंत आमच्या ह्या देशांत आमच्या पुढाऱ्यांनीं लोकांची उपेक्षा केली. त्यांची सर्व दृष्टि सरकाराकडे. त्यामुळें इंग्रेजीत बोलण्याचा प्रघात रूढ झाला. गुदस्तां प्रथमच राष्ट्रीय सभेंत शेतकरी लोक आणण्याची खटपट करण्यांत आली. त्याबरोबरच त्यांच्याकरतां अध्यक्षांचें भाषण हिंदीमध्येंही करणें भाग पडलें. 'लोकां'करतांच ज्ञानेश्वरादि संतांनीं मराठींत ग्रंथरचना केली. तात्पर्य, आपल्या दृष्टीपुढें "लोक" ठेवल्याशिवाय मराठी भाषेला उत्तेजन येणार नाहीं. म्हणून आपले खासगी व सामाजिक व्यवहार मराठींत करण्याचा आपण निश्चय केला पाहिजे.

महाराज, आमच्या ह्या देशांत कित्येक अश्रुतपुर्व चमत्कार घडत आहेत. आमच्या कोर्टांतून खुनाच्या आरोपाची चौकशी आरोपीला न समजणाऱ्या भाषेंत केली जाते. फांशीच्या शिक्षेला पात्र असा गुन्हा केल्याचा माझ्यावर आरोप–हजारों रुपये खर्च करून मी बारिस्टर देतों–पण माझा वकील काय बोलला, कोर्टानें कोणत्या कोणत्या कारणांकरतां माझ्यावरील आरोप शाबीत धरला, ह्याचें एकही अक्षर मला समजत नाहीं! आणि तुला फांशीची शिक्षा झाली आहे एवढें मात्र कोर्टाच्या माणसाकडून मला कळविलें जातें! हा किती विलक्षण प्रकार आहे बरें? पण ह्याहीपेक्षां

विलक्षण म्हणजे, ह्या कार्मी कांहीं विलक्षणता आहे असें आम्हांस भासतही नाहींसं झालें आहे !

ह्याप्रमाणें आज मराठीची स्थिति आहे. तिला सर्व ठिकाणीं सावत्र मुलीप्रमाणें वागविण्यांत येत आहे. विद्यमान परिस्थिति मराठी भाषेला उत्तेजक अशी नाहीं. मराठी भाषेचें रोप तयार झालें आहे खरें, पण हें वरील सावट काढल्यावांचून ह्या रोपाचा विस्तीर्ण वृक्ष बनणें अशक्य आहे. ही परिस्थिति कृत्रिम आहे; म्हणून ती सुधारण्यासारखी आहे. पण कांहीं गोष्टी निसर्गतःच आपल्याविरुद्ध आहेत, हें मराठीची बंगालीशीं तुलना केली असतां स्पष्ट दिसून येणारें आहे. प्रथम, मुंबई इलाख्याची लोकसंख्या दोन कोटींहूनही कमी आहे; बंगालची लोकसंख्या ४॥ कोटींहून अधिक आहे. ह्यांपैकीं दोनकोटी बेचाळीस लक्ष मुसलमान असूनही त्यांची मातृभाषा बंगालीच आहे. बंगाल्यांत ज्यांची मातृभाषा बंगाली आहे असे शेंकडा ९२ लोक आहेत. म्हणजे ४॥ कोटींमध्यें ४। कोटी लोक बंगाली बोलणारे आहेत. आतां मराठीकडे पाहा. मराठी बोलणारे सर्व हिंदुस्थानांत सारे १॥ कोट लोक आहेत. त्यांपैकीं शेंकडा ४५ काय ते मुंबई इलाख्यांत आहेत. त्यांतही गुजराथ व कानडी प्रांत सोडून दिले तर मराठी बोलणारांचा मुख्य भरणा मध्यभागांत आहे. ह्या भागाची लोकसंख्या ६२८७०६४ आहे. ठाणें, रत्नागिरी व कुलाबा धरून एकंदर मराठी बोलणारे लोक ह्या इलाख्यांत ७० लाखही नाहींत ! ४। कोटी लोकांची असणारी बंगाली भाषा कोठें व ७० लाख लोकांची मराठी भाषा कोठें ! दोहोंमध्यें कांहींच साम्य नाहीं. शिवाय कायमच्या धारापद्धतीनें बंगाली लोक संपन्न, तर मराठी बोलणारे लोक केवळ दारिद्र्यधन; बंगाली बोलणारे लोक संकलित, तर मराठी बोलणारे चोहोंकडे विखुरलेले; ह्यामुळें बंगाली वाङ्मयाला उत्तेजन मिळतें तसें मराठी वाङ्मयाला मिळणें संभवनीय नाहीं. मराठी बोलणारे लोक परमुलखांत गेले म्हणजे परभाषा शिकतात, आणि त्या मानानें मराठीला अपरिचित होतात. ह्याकरितां तंजावर म्हैसूर इत्यादि दूरच्या ठिकाणीं असलेल्या मराठी लोकांशीं आपला संबंध तुटणार नाहीं असें आपलें धोरण असलें पाहिजे. तिकडे जाऊन इकडच्या लोकांनीं मराठींत त्यांच्या करितां व्याख्यानें द्यावीं, मराठी ग्रंथांचा प्रसार करावा. तात्पर्य, त्यांची मराठी भाषा प्रज्वलित

राहून मराठी वाङ्मयांत त्यांच्याकडून भर पडेल असे हरप्रयत्न केले पाहिजेत. आपण आजपर्यंत ह्या दिशेनें मुळींच प्रयत्न केले नाहींत. केतकरांच्या सूचीवरून बेळगांव, धारवाड व विजापूर ह्या जिल्ह्यांत मराठीचा संकोच होत असून कानडीचा विकास होत आहे असें दिसतें. अर्थात् मराठी लोकांनीं ह्या भाषा सोडून आपणांस कानडीच्या मांडीवर बसवून घेतलें असें अनुमान करणें भाग आहे. कारण हिंदुस्थानांत मराठी बोलणारांचें प्रमाण वाढलें आहे. म्हणून ह्या तीन जिल्ह्यांतील मराठी लोकांनीं ह्या गोष्टीचा विचार करावा. महाराष्ट्रीय ब्राह्मण आपली मातृभाषा कानडी सांगणारे मला माहीत आहेत. कानडी प्रांतांतील ब्राह्मण व मराठे ह्यांची जन्मभाषा कानडीच झाली आहे. आपण आर्यवंशज आहों असें जर ह्या लोकांना वाटत असेल, तर त्यांनीं कानडीच्या ऐवजीं संस्कृतोद्भव मराठी भाषेचा स्वीकार करावा. ह्या प्रांतांत पुष्कळ लोक द्विभाषाविद् असे असतात. तेव्हां तेथें मराठी ग्रंथांचा फैलाव करण्याची जबाबदारी तत्प्रांतस्थ महाराष्ट्रीयांवर येऊन पडते. मराठी वाङ्मय कानडी वाङ्मयापेक्षां श्रेष्ठ दर्जाचें असल्यास मराठी ग्रंथांचा प्रसार होण्यास विलंब लागणार नाहीं; प्रयत्न मात्र कोणी केले पाहिजेत.

अशा प्रयत्नांपैकींच जागजागीं संग्रहालयें स्थापणें हा एक मुख्य प्रयत्न होय. **मुंबई मराठी संग्रहालय** ही मध्यवर्ती संस्था करून तिला जोडून मुंबईच्याबाहेर ठिकाठिकाणीं संग्रहालयें स्थापणें हें कितपत शक्य आहे हें मला सांगतां येत नाहीं. पण मुंबईमध्यें तरी निदान दुसरीं जागोजाग संग्रहालयें स्थापण्याची वेळ आली आहे. स. १८९८ सालीं ७८ वर्गणीदार जमवून स्थापन केलेल्या ह्या संस्थेचे आज ११०० वर्गणीदार आहेत. स. १९११–१२ सालीं जवळ जवळ इतकेच वर्गणीदार होते. आज ६ वर्षांत अधिक वाढ झालेली दिसत नाहीं. तेव्हां आतां ही संस्था पूर्णावयव झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसेंच आजमितीस संग्रहालयांत साडेसात हजारांवर ग्रंथ आहेत. इ. स. १८२६ सालीं मराठींत पहिलें पुस्तक छापलें गेलें. तेव्हांपासून स. १९०० पर्यंत ५००० पुस्तकें प्रसिद्ध झालीं असें गणित संशोधकांनीं केलेलें आहे. दरसाल सरासरीनें १३५ पुस्तकें प्रसिद्ध होतात. ह्या प्रमाणावरून इ. स. १८१८ पर्यंत आणखी २५०० पुस्तकें धरलीं कीं सर्व प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें ह्या संस्थेंत संग्रहित

आहेत असें अनुमान निघतें. अर्थात् ग्रंथसंग्रहाच्या दृष्टीनेंही अपूर्णतेचा दोष ह्या संस्थेस लागत नाहीं. जो कांहीं कमीपणा आहे तो वाचकांच्या वाचनपरिणामासंबंधीं आहे. तुमच्या रिपोर्टावरून मला असें वाटतें कीं, ह्या संग्रहालयाचा प्रत्येक वर्गणीदार दरसाल सरासरीनें १४ ते २० पुस्तकें वाचतो. हें प्रमाण फार आहे असें म्हणतां येत नाहीं. वर्मींघम येथील पुस्तकालयांत हेंच प्रमाण २६ पडतें; आणि लिव्हर्पूल येथील पुस्तकालयांत तें ४४ पर्यंत गेलें आहे. परंतु हा दोष कांहीं संग्रहालयाच्या व्यवस्थापकांचा खास नव्हे. तात्पर्य, ह्या संग्रहालयाची पूर्ण वाढ झाली आहे असें अनुमान करण्यास प्रत्यवाय नाहीं. ह्यामुळें इतःपर ह्या संस्थेच्या चालकांनीं आपलें कार्यक्षेत्र अधिक विस्तृत करण्याकडे लक्ष देणें अवश्य आहे. महाराज, ठाणें मुंबई येथील संग्रहालयांच्या चालकांनीं अध्यक्षांनीं केलेल्या सूचनांवर जरी अगदीं उघड उघड बहिष्कार घातल्याचें दिसत आहे, तरी सुद्धां मी आणखी एक सूचना करण्याचें धाडस करतों. गेल्या सालींच रा. पाध्ये यांनीं युनिव्हर्सिटी एक्सटेंशन लेक्चर्सच्या धर्तीवर ह्या संस्थेनें व्याख्यानें सुरू करावीं अशी अत्यंत बहुमोल सूचना केली होती. अशीच सूचना ठाण्यास कै. राजाराम शास्त्री भागवत यांनींही पूर्वी केली होती. परंतु आजपर्यंत तिकडे कोणीं लक्ष दिल्याचें दिसत नाहीं. वाचनवर्ग काढून वाचनाची अभिरुचि उत्पन्न केल्याशिवाय वाचकवर्ग तरी कसा वाढावा ? म्हणून ग्रंथसंग्रहालयानें ह्या दिशेनेंही प्रयत्न करणें वावगें होणार नाहीं. परंतु माझी दुसरी आणि मुख्य सूचना अशी आहे कीं, संस्थेच्या व्यवस्थापक मंडळीनीं ह्या एकाच संग्रहालयावर संतुष्ट न राहतां मुंबईत पण ठिकठिकाणीं दुसरीं संग्रहालयें स्थापन करण्याचें काम अवश्य हातीं घ्यावें. ताडदेव, गांवदेवी, वांद्रें, बोरीवली इत्यादि ठिकाणीं पुस्तकालयें उघडल्यास हिंद्वीतर जातींतसुद्धां मराठीची अभिरुचि आपण उत्पन्न करूं शकूं. पारशी, ख्रिस्ती, मुसलमान व हिंदु अशी मिश्र वस्ती जेथें असेल तेथें संग्रहालयांच्या द्वारें ह्या लोकांत मराठीचा शिरकाव करतां येण्यासारखा आहे. असे प्रयत्न धिम्मेपणानें व दूरदर्शीपणानें केले पाहिजेत, हें खरें; पण तसें केलें असतां ते निष्फल होतील अशी भीति बाळगण्याचें कारण नाहीं. पण ह्याच्याही अगोदर स्त्रियांकरितां दर चाळींत पुस्तकालय स्थापन करण्याचें आपण जर मनावर घ्याल तर आपल्या ह्या

संस्थेचा उत्कर्ष होऊन स्त्रियांवर अगणित उपकार केल्यासारखें होईल. साप्रत बहुतेक लहान मुली लग्न होण्यापुर्वी मराठी चौथ्या इयत्तेपर्यंत शिकतातच. तेव्हां पुस्तकें वाचण्यास मुख्य पाया जी साक्षरता तो तयार झालेला असतोच. हें शिक्षण कायम ठेवणें अगर वाढविणें हें पुस्तकालयांच्या द्वारें आपणांस करतां येण्यासारखें आहे. पण हल्लींच्या परिस्थितींत स्त्रियांस घरच्या घरींच पुस्तकें वाचावयास मिळतील अशी व्यवस्था करणें अवश्य आहे. महाराज, स्त्रियांच्या संस्कृतीनें आपल्या समाजाचें अपरिमित हित होणार आहे. शिक्षणानें स्त्रिया नवऱ्यांचा मान राखणार नाहींत हें भय निरर्थक आहे. असल्या ऑस्ट्रियन बादशाही विचाराचीं माणसें ह्या शतकांत फार आढळतील असें वाटत नाहीं. ऑस्ट्रियाच्या बादशहानें शिक्षकवर्गास एकदां असें निक्षून सांगितलें कीं, तुम्हीं आपल्या शिष्यांना फार शिकविण्याच्या भानगडींत पडूं नका. माझ्या प्रजेंत मला विद्वत्ता नको, आज्ञाधारकता हा गुण पाहिजे. " Be careful not to teach your pupils too much. I do not want learned or scientific men. I want obedient subjects. " ह्या बादशाही मताचे नवरे आमच्या समाजांत नाहींत अशी आपण कल्पना करूं या. शिक्षणावांचून आज्ञाधारकत्व निर्माण करण्याची कल्पना बादशाही थाटालाच शोभण्यासारखी आहे. शिक्षणाच्याच योगानें आमच्या स्त्रिया अधिक कार्यदक्ष, अधिक पतिनिष्ठ बनतील, अशी खातरी बाळगा. "पूजनीया महाभागाः पुण्याश्च गृहदीप्तयः । स्त्रियः श्रियो गृहस्योक्ताः" अशा रीतीनें महाभारतांत स्त्रियांची योग्यता वर्णन केली आहे. स्त्रियांना पुरुषांपेक्षांही अधिक मान मिळाला पाहिजे. पण आपण त्यांना अशिक्षित ठेवल्या तर त्या पूजनीय कशा होतील ? निरक्षर स्त्रियांविषयीं आपल्या मनांत आदर कसा वसेल ? पूर्वींच्या आपल्या स्त्रिया नुसत्या सुशील नसत, नुसत्या नीतिमान् नसत, तर विद्वानही असत. ह्याचें मोठें उदाहरण म्हणजे **सुलभे**चें होय. ही एक मोठी योगिनी होती. जनक राजाची कीर्ति ऐकून तो खरोखरच मुक्त आहे कीं काय हें पाहण्याकरितां ती मिथिला नगरीला त्याच्याकडे गेली. जनकराजानें तिची निर्भर्त्सना केल्यावर ती त्यास म्हणालीः " हे राजा ! तूं पुष्कळ बोललास खरा, पण तुला कसें भाषण करावें हें समजत नाहीं. " असा टोला मारून सुलभेनें जनकास वाक्यनियम सांगण्यास प्रारंभ केला. ती म्हणालीः "बुद्धिवाणीच्या

नवदोषांनीं अलिप्त, अठरा गुणांनीं युक्त, आणि शिवाय सौम्य, साम्य, क्रम, निर्णय व प्रयोजन ह्या पंच गुणांनीं अन्वित असा जो शब्दसमुच्चय त्याला वाक्य असें म्हणतात." पुढें सौम्यादिकांचा जनकाला अर्थ सांगून ती म्हणालीः " मी जें आतां बोलणार तें अर्थपूर्ण, दुटप्पी नव्हे असें, न्यायानुसारी, फाजील शब्द नसणारें व आटपसर असें वाक्य बोलेन. तें कोमल, स्पष्ट व श्रेष्ठ असेल. त्यांतील अक्षरें गुरु किंवा नीरस नसतील. माझें भाषण ग्राम्य, अमंगल असणार नाहीं. तें धर्मशास्त्र, अर्थशास्त्र व कामशास्त्र ह्यांतील सिद्धांतांशीं विसंगत नसेल. माझ्या भाषणांत इष्ट हेतु व्यक्त होईल. छंदव्याकरणादिकांचे दोष त्यांत नसल्यामुळें तें सुबोध असेल. वाक्यांतील पदें क्रमाला सोडून योजलेलीं नसतील, किंवा त्यांतील कांहीं शब्द अध्याहृत ठेवून तर्कानें पुरें करण्याचें कारण पडणार नाहीं. माझ्या भाषणांत काम, क्रोध, मोह, लोभ, दैन्य, दर्प, लज्जा, कृपा, किंवा अभिमान, या नऊ बुद्धिदोषांपैकीं एकही असणार नाहीं. हे राजा, जो वक्ता आपण व श्रोता या उभयतांच्या अर्थाला, अनुकूल असें भाषण करतो तोच खरा वक्ता. कारण वक्ता स्वतःचा अर्थ बाजूस ठेवून श्रोत्याला संतुष्ट करण्याकरतां त्याचाच मतलब घेऊन बोलतो, त्या ठिकाणीं खऱ्या अर्थाबद्दल भ्रम उत्पन्न होतो. त्याचप्रमाणें ज्या भाषणांत वक्ता श्रोत्याला न जुमानतां केवळ स्वतःला संमत असाच अर्थ स्थापित करूं पाहतो त्या भाषणांत खरा उत्कृष्ट अर्थ असला तरी तो मनांत भरत नाहीं." या भाषणावरून प्राचीन काळीं साहित्यशास्त्रांतसुद्धां आमच्या स्त्रियांची प्रगति किती मोठी होती ह्याची कल्पना करतां येईल. सारांश, स्त्रीशिक्षणाशिवाय आमचा समाज सर्वांग-परिपूर्ण होणें शक्य नाहीं. समाज अशिक्षित असतां वाङ्मयाची वाढ कशी व्हावी? शिक्षणाविषयीं सर्वसाधारण उत्कटता ही राष्ट्रीय नवजीवनाची खूण आहे. फ्रान्सच्या राज्यक्रांतीपूर्वी स्त्रियाही शास्त्रीय विषयांवरील व्याख्यानांना हजर असत. इटलीच्या इतिहासांतही हीच गोष्ट दृष्टीस पडते. रात्रीच्या जाग्रणाची पर्वा न करतां लोक व्याख्यानास हजर असत. " Pompeus Lactus was to be seen before daybreak descending the Equiline with his lantern and on reaching his lecture-room found it always filled to over-flowing with puplis who had come at midnight to secure a place. " (*Renaissance in Italy*)· असा शिक्षणाचा सर्वत्र फैलाव केल्याशिवाय मराठी भाषेची धडगत लागणार नाहीं.

करितां चाळींतून स्त्रियांकरितां पुस्तकालयें स्थापण्याबद्दल आपणांला माझी आग्रहाची विनंति आहे. आपणांपुढें अनेक मार्ग मोकळे आहेत. व्याख्यानें सुरू करा; अगर ग्रंथकारांपासून उत्तम ग्रंथ लिहिलेले असतील ते विकत घेऊन प्रसिद्ध करा; वाचनवर्ग काढा अगर आणखी ग्रंथसंग्रहालयें काढा, पण कांहीं तरी शक्य तितकें अधिक करा. आहे एवढ्यावर संतोष मानून राहूं नका, परंतु असले प्रयत्न यशस्वी होण्यास सहकारिता पाहिजे; समानचित्त पाहिजे. व ही गोष्ट संपादन करण्याकरितां वैदिक मंत्रानें आपली प्रार्थना करून मी आपली रजा घेतों.

**"समानो मंत्रः सामितिः समानी समानं मनः सहचित्तमेषाम् ॥**
**समानं मंत्रमभिमंत्रयवः समानेनं हविषाजुहोमि. "**

11 JAN 1994

# १३ पुस्तकपरीक्षा.

## ' सुख आणि शांति. '



महाराष्ट्राला विशेष परिचित असलेले विद्वान् लेखक रा. रा. महादेव हरि मोडक यांनीं इंग्लंडमधील सुप्रसिद्ध ग्रंथकार सर जॉन लबक यांच्या ' पीस् अँड हॅपिनेस् ' नामक ग्रंथाच्या आधारानें मराठी भाषेंत शब्दस्थानविपर्यास करून ' सुख आणि शांति ' या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. शुक्रनीतींत म्हटल्याप्रमाणें—

" सुखार्थाः सर्वभूतानां मताः सर्वाः प्रवृत्तयः "

प्राणिमात्राची प्रवृत्ति सुखाकडे असते. तेव्हां ह्या सुखाच्या शोधार्थ आजपर्यंत अनेकांनीं प्रयत्न केले आहेत. ह्या सहजवृत्तीला अनुसरून लबक् साहेबांनींही सुख कशांत आहे हें पाहण्याची खटपट केली. सुख कशानें लाभेल, ही तळमळ कोणालाही चैन पडूं देत नाहीं. ह्या लोकामध्यें जे अत्यंत मूढ असतात किंवा ज्यांना अतींद्रियशक्ति प्राप्त झाली आहे, असे द्विविध जन मात्र आनंदी असतात. बाकीच्या लोकांच्या दैवांत प्रायः क्लेशच भोगण्याचें दिसतें.

"यश्च मूढतमो लोके यश्च बुद्धेः परं गतः
तावुभौ सुखमेधेते क्लिश्यत्यंतरितो जनः ॥"

असें भागवतकारांनीं म्हटलें आहे तें अक्षरशः खरें आहे. या भूतलावरील बहुतेकांचा समावेश अंतरित जनांतच होत असल्यामुळें सुखाची इच्छा असूनही सुख प्राप्त होत नाहीं म्हणून कोणालाही शांति लाभत नाहीं. या दृष्टीनें विचार करतां सदरहू ग्रंथ प्रत्येकानें वाचून त्याचें मनन करणें किती अगत्याचें आहे याची कोणालाही कल्पना करितां येईल.

ग्रंथकर्त्यांनीं प्रथम सुखाचें स्वरूप वर्णन करून नंतर तें कशानें प्राप्त होईल, कोणत्या गोष्टींनीं त्याला व्यत्यय येणार नाहीं, याचा विचार केला आहे. असा विचार करीत असतां त्यांनीं असा सिद्धांत काढला आहे कीं,

व्यक्तिमात्राला सुख मिळण्यापूर्वी सर्व जगांत शांति नांदत असली पाहिजे; व मनुष्य धार्मिक आणि ब्रह्मनिष्ठ असून त्याच्यावर शिक्षणाचा परिणाम झाला असेल, त्याचें शरीर आणि मन जोरदार व निर्मल असेल, त्याच्या ठिकाणीं संतोष नांदत असेल, अंतःकरणांत सदयता वसत असेल, स्निग्ध जनांचा सहवास घडेल आणि निसर्गावर त्याचें प्रेम बसेल, तर त्या मनुष्याला सुख प्राप्त होण्यास अडचण पडणार नाहीं. मात्र महत्त्वाकांक्षेनें ग्रस्त होतां कामा नये, श्रीमंतीच्या मदानें उल्लू होऊन जातां कामा नये, व आपत्ति ह्या सदय परमेश्वरानें आपल्या हितार्थच आपल्याकडे पाठवून दिल्या आहेत असें समजून चाललें पाहिजे. ह्याशिवाय माणसांत थोडी चतुरता असली म्हणजे त्याच्या सुखराशींत आणखीही भर पडल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या विवेचन पद्धतीला अनुसरून ग्रंथकर्त्यांनीं साहजिकच त्या विषयाचे अठरा निरनिराळे भाग केले आहेत. त्यांचा क्रम येणेंप्रमाणेंः—

(१) सुख, (२) शरीर, (३) मन, (४) आरुरुक्षा, (५) संतोष, (६) आपत्ति, (७) सदयता, (८) शिक्षण, (९) शत्रुमित्र, (१०) श्रीमंती, (११) सृष्टीची भीषणता, (१२) सृष्टिप्रेम, (१३) सद्यःकाल, (१४) वैदग्ध्य, (१५) राष्ट्रांची शांति, (१६) चित्तस्वास्थ्य, (१७) धर्म, आणि (१८) ब्रह्मविद्या.

प्रस्तुत ग्रंथ हा, प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणें, लबक् साहेबांच्या इंग्रेजी ग्रंथाचें निव्वळ भाषांतर नसून केवळ त्या ग्रंथाचा आधार घेऊन लिहिलेला आहे हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. व याचा प्रत्यय—म्हणजे हा स्वतंत्र ग्रंथ आहे अशाबद्दलची खात्री—ह्या ग्रंथांत संस्कृत व मराठी ग्रंथांतून जीं अवतरणें घेतलेलीं आहेत, त्यावरून सहज पटण्याजोगी आहे. ह्या ग्रंथांत एकंदर ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, ऐतरेय ब्राह्मण, नारायणोपनिषद्, तैत्तिरीय श्रुति, छांदोग्य, कठोपनिषद्, मण्डूकोपनिषद्, मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति, रामायण, भारत, भागवत, भगवद्गीता, अवधूतगीता, वैशेषिक दर्शन, वृद्धचाणक्य, पंचदशी, शतश्लोकी, विवेकचूडामणि, स्वात्मसौख्य, प्रश्नोत्तरमालिका, योग्यरत्नाकर, मोहमुद्गर, वराहमिहिर, अष्टोत्तरी, शौनक, रसगंगाधर, वाग्भट, पुष्पदंत, हितोपदेश, शाकुंतल, भर्तृहरि; व सारावली, कुमारसंभव, उत्तररामचरित्र, रघुवंश, भावप्रकाश, मालविकाग्निमित्र, पंचतंत्र, किरातार्जुनीय, मृच्छकटिक, सुभाषित, ठाकूराणी;

त्याचप्रमाणें ज्ञानदेव, तुकाराम, वामन, रामदास, मोरोपंत, रामजोशी, सुंदरदास, किर्लोसकर, हरिकवि, गोडबोले, गोरखनाथ, विठोबाअण्णा, शीलनाथ, कबीर, इत्यादि ग्रंथकारांच्या चौसष्ठ निरनिराळ्या ग्रंथांतून भरपूर उतारे घेऊन शिवाय ग्रंथकाराच्या स्वकृत कविताही सदरहू पुस्तकांत विपुल घातलेल्या आहेत. अशा ग्रंथाला परोच्छिष्ट म्हणणें निःसंशय अन्यायाचें होईल. म्हणून लबक् साहेबांच्या ग्रंथावरून जरी ग्रंथकर्त्याला प्रेरणा झाली असली, तरी रा. मोडक यांचा हा स्वतंत्रच ग्रंथ आहे असें आम्ही मानतों.

ह्या ग्रंथाची भाषा शुद्ध व प्रसादयुक्त असून त्यामध्यें ग्रंथकर्त्यानीं पांच पन्नास मराठी म्हणींचा उल्लेख केलेला आहे. त्यावरून ग्रंथकर्त्याचें मराठी भाषेवरील प्रभुत्व उत्तम प्रकारें सिद्ध होतें. मराठी भाषेचा अभ्यास करणारापुढें ह्या सर्व म्हणी संकलित करून ठेविल्या तर त्याला त्यांचा पुष्कळ उपयोग होईल असा आम्हांस भरंवसा असल्यानें आम्ही त्या मुद्दाम एकत्र करून खालीं देत आहोंत. म्हणीः—( १ ) आचरट खाणें आणि मसणांत जाणें, (२) भुकी तो सुकी, ( ३ ) भुके राखे चौथा कोन, तेरा रोग घरघर रोवे, (४) अति सर्वत्र वर्जयेत्, ( ५ ) बाळातें जन्म काळा, ( ६ ) नदी नारी व्यापारी । गर्जना करिती दिवस चारी, ( ७ ) सबसे जीव प्यारा है, (८) चार महिन्यांचा उन्हाळा आणि घटकेचा पावसाळा, ( ९ ) आजा मेला आणि नातू झाला, ( १० ) बरें करावें आणि वाटेवर ठेवावें, ( ११ ) भित्यापाठीं ब्रह्मराक्षस, ( १२ ) हिमत मर्दा तो मदत खुदा, ( १३ ) कांट्याचा नायटा करणें, ( १४ ) पशाचें पायलीवर नेणें, ( १५ ) हिंवाळा भोगी, पावसाळा रोगी आणि उन्हाळा जोगी, ( १६ ) अल्ला जो बुरा करता है वो भलेके वास्ते करता है, ( १७ ) शिंक्याचें तुटलें आणि बोक्याचें पिकलें, ( १८ ) जशाशीं तसें ( न्याय ), ( १९ ) प्रेम द्यावें आणि प्रेम घ्यावें, ( २० ) कृति तसें फळ ( न्याय ), ( २१ ) जोडा घालणारानें अनवाणी चालणाराकडे पाहावें, घोड्यावर बसणाराकडे पाहूं नये, ( २२ ) धर्म करतां कर्म उभें राहतें, ( २३ ) निमाज पढावयास जावें तों मशीद गळ्यांत यावी, ( २४ ) एकदां खावें पण शहरांत राहावें, ( २५ ) दोन्ही डोळे शेजारीं । भेट नाहीं संसारीं, ( २६ ) सेवकाने पुरातने, ( २७ ) गळां नाहीं सरी आणि सुखें निद्रा करी,

(२८) गद्धोंका माल अक्कलमंदोंका खुराक,(२९)दुरून डोंगर साजरे,(३०) अतिपरिचयादवज्ञा, ( ३१ ) सबसे चूप भली, ( ३२ ) झाड सत्यभामेचे घरीं आणि फुलें रुक्मिणीचे घरीं, ( ३३ ) हत्तीचे पायांत सर्वांचे पाय ( ३४ ) दादा अंगें वहिनी सोयरी, ( ३५ ) नवसानें मागितलें आणि मुळावर आलें, ( ३६ ) चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे, (३७) रागा रागा भीक मागा, ( ३८ ) जें न देखे रवि तें देखे कवि, ( ३९ ) जात शेती नाहीं तर माती, ( ४० ) ज्याचें कुडें त्याचेच पुढें, ( ४१ ) देख्या गुरु कीं शिक्या गुरु, ( ४२ ) कां बाई रोड, तिला गांवाची ओढ.

याप्रमाणें संस्कृत व मराठी सूक्तींच्या अध्ययनानें विद्यार्थ्यांचा मराठी-भाषामंदिरांत बराच प्रवेश होईल यांत शंका नाहीं. उत्कृष्ट व शुद्ध भाषेचे मासले कोणास पाहणें असतील तर ते या पुस्तकांत असंख्य सांपडतील. संस्कृत भाषेंत प्रावीण्य संपादन केलेल्या ग्रंथकारांना संस्कृताचा ज्यांत गंध नाहीं असें झोंकदार मराठी उत्तम प्रकारानें लिहितां यावें ही गोष्ट विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. कांहीं वाक्यें आम्ही वेंचून येथें देतों, त्यावरून आमचे म्हणण्याची यथार्थता वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

" कित्येक माणसांचा स्वभावच असा असतो कीं इवल्या तिवल्या गोष्टींला तीं असें बाळसें आणून दाखवितात कीं राईचा केवळ डोंगर करून सोडतात. "

" ठरीव पुस्तकें व घोकंपट्टी यांच्या पायीं विद्यार्थ्याचे ठिकाणीं हरभासपणा येत नाहीं, त्याचा दिल खुलत नाहीं. यामुळें शाळा संपण्यापूर्वीच मुलाला विद्येचें अवढणें पडत येतें. व ती संपली कीं तिकडे पुन्हां तोंडच करीत नाहीं. "

" झोड्या मास्तर उपयोगी नाहीं, आणि मेण्याही फुकटच समजावा."

" एकानें जावें विनोदानें बोलायाला, तें दुसऱ्यानें घरावें खरेंखुरें, आणि म्हणतात तशी मस्करीची कुस्करी होऊन अंतीं विपट पडावें, असा चमत्कार होतो. "

निव्वळ मराठी लिहिण्यांत ग्रंथकर्त्यांचा जसा हातखंडा आहे, त्याचप्रमाणें योग्य दृष्टांत व उपमा यांच्या साहाय्यानें वक्तृत्वपूर्ण व परिणामकारक भाषाही त्यांस सहज लिहितां येते.

" मानवी सुंदरीचें रूप पाहून प्रसंगीं दुर्विकार जाग्रत होतात. पण ह्या रूपावलोकनानें कुविचार उलटे नष्ट होतात, आणि या सृष्टिसुंदरीची अगाध सत्ता, हृदयंगम प्रेमळता, व अखंडपरकार्यतत्परता हीं पाहिलीं म्हणजे असा कांहीं पूज्यभाव उत्पन्न होतो कीं, सत्त्वपरीक्षणार्थ आलेले त्रिमूर्ति जसे बाळ होऊन अनसूया सतीच्या पायाशीं लोळूं लागले त्याचप्रमाणें ह्या दिव्य रमणीचे आपण बाल होऊन तिचे अंकावर क्रीडत रहावें असेंच वाटतें. "

" मुंबई सारख्या शहरांत जेथें अल्पप्राप्तीचे कुटुंबांत नाकपुडी एवढे खोलींत संसार करावा लागतो–" ह्या वाक्यांत नाकपुडी हा शब्द इतका खुबीदार योजिला आहे कीं, त्यामुळें मुंबईच्या लहानशा जागेची कल्पना अगदीं बरोबर होते. तसेंच " कांहीं लेखक दुःखाचे नांवानें जी कांहीं ओरड करितात ती कांहीं बेसुमार ! हे फक्त मिळवणीच जाणतात व वजा-बाकी ओळखीतच नाहींत. केवळ दुःखाचे क्षण हिशोबांत धरतात व ओरडतात. पण त्यांत सुखाचा हिशोब बजा देत नाहींत. "

ग्रंथकर्त्यानीं खारीचें व भुजंगाचें केलेलें वर्णन इतकें बहारीचें वठलें आहे कीं त्यांतील विचार परगत असले तरी त्या वर्णनाची भाषा वाचून वाचक क्षणभर मानच डोलावूं लागतो.

" या खारीसारखा सुबक; आनंदी आणि गमतीचा दुसरा प्राणीच नसेल. अति हूड असून अत्यंत निरुपद्रव. खाण्यापिण्यांतही कोणा जीवाची प्राणहानि नाहीं. मांजराचे पिलासारखी खेळकर परंतु निर्दय नाहीं, शाखा-मृगाहूनही ( वानराहूनही ) अधिक चलाख, पाखरापेक्षां मनोहर आणि तजेलदार, आणि वनदेवतेचें आवडतें खेळणेंच. असली ही लुकलुक डोळ्यांची गोजिरवाणी मूर्ति एका वृक्षशाखेवरून दुसरीवर जाते, तेव्हां विजेची चपळाई कमी असा भास होतो. तिच्या गति तरी किती विचित्र ! क्षणांत टुणकन् उडी मारील, क्षणांत तीरासारखी धांवत जाईल, क्षणांत मध्येंच मुरडेल, त्याचा कांहीं नेमच नाहीं. सारी लहर आहे ! हरिणाहून चपळ, वाघाहून अधिक टिपण झोंकणार. देहांत सरळपणा पहाल तर मुळींच नाहीं, पण जिनगरी बाहुलीपेक्षां अधिक मोहक आणि सावरीचे कापसापेक्षां गुळगुळीत. अंगीं ऐट किती, मुरड किती, नखरा किती आणि वात्रटपणा तरी किती ! पळांत तुमचे मागें धांवेल, पळांत दृष्टीआड लपेल,

पळांत वर डुकली उचलून तुम्हांला हेरील. क्षणांत प्रियसखीप्रमाणें हळूच कान देऊन चोरून ऐकत बसेल. कोण खेळाडू, कोण धूर्त, कोण दिमाखदार, किती रंगाढंगाची ! छे, छे, मला वाटतें स्वर्गींची अप्सराच हें मुरकेदार छोटें छबेलें रूप घेऊन बाळगोपाळांच्या मौजेकरितां भूलोकीं अवतीर्ण झाली आहे. "

विषमूर्ति भुजंगाचेंही याच कुशल लेखकानें असेंच मौजदार चित्र रेखाटलें आहे–" ओहो ! तो पहा, वितळलेल्या रुप्याचा छोटासा ओघळ जमिनीवरून चालला आहे. चालला आहे कशाचा ? वाहतो आहे. कारण, ह्या चालण्यांत यत्न किंवा कष्ट कसे ते नाहींत. गति किती गमतीची ! चपळ असून शांत. पाण्याची लाट कीं वाऱ्याची झुळूक ? पुनः लाट म्हणावी तर गर्जत नाहीं; ओघ म्हणावा तर घबघबा नाहीं. सर्व शरीर एका वेळीं गतींत असूनही कांहीं भाग या कलावर झुकलेला, कांहीं उलट कलावर, निम्मे सरळ पुढल्या झोंकावर व निम्मे मागें मुरडलेला. तथापि कोणत्याही भागाला फाजील संकोच नाहीं, फाजील ताण नाहीं. सर्व शरीर सारखें एक तोलांत चाललेलें. गोंगाट नाहीं, बोभाट नाहीं. टिकल्यांच्या चंद्रहाराचा सर घसरतो आहे; कीं सुबक बुंदक्याचा गळपट्टा पडला आहे. कांहीं ओळखत नाहीं. रेशमाहून मृदु, कदली–गर्भाहून शीतळ, पुष्पहाराहून सुखतर स्पर्श. पण या सौम्यपणाला फसूं नका. दांडेत जिवंत मृत्यु उभा आहे. थोडे वाटेस जा, म्हणजे समजेल चंद्रहार कीं कट्यार, आणि गळपट्टा कीं गळा उतरणारा पट्टा आहे तो ! रुपेरी पाण्याचा ओघळ आतां नव्हे. आतां झाली विषाची लाट. गवताचे गर्दीतून हा विषारी बाण सणाणतो आहे. क्रोधानें इतका दुमटला आहे कीं, श्वास घ्यावयाला फुरसुत नाहीं. नुसता फणकारा चालला आहे. आतां त्याला शीत नाहीं, उष्ण नाहीं. पुष्पांचें मृदुत्व जाऊन पाषाणाचें कठोरपण उभें राहिलें आहे. अखिल ब्रह्मांडांतील क्रूरता, दुष्टपणा, हिंसता एकवटून तुमचे पुढें स्वारी खडी आहे. तिचे आटोक्यांत या, कीं स्वर्गद्वाराचींच भेट ! बरें, देहांत वळवळ तरी किती ! वांदरापेक्षां वृक्षारोहणांत तलख, माशापेक्षां जलतरणांत सराईत, रोहीपेक्षां टिपट टाकण्यांत तरबेज, जेठीपेक्षां पीळदार आणि वाघोबांनाही पाणी पाजण्याला समर्थ, असलें हें प्रकरण आहे. अशाला माझा दुरून नमस्कार असो. "

वरील उताऱ्यावरून ग्रंथकाराचें भाषानैपुण्य किती आहे हें सांगणें नको. पण आणखी एक गोष्ट आम्हांला सांगितल्याशिवाय राहवत नाहीं. ती ही कीं, उत्कृष्ट भाषा लिहिणारांचेही दोन वर्ग आहेत, असें आमचें ठाम मत आहे. विदग्ध वाङ्मयाच्या अभ्यासानें, नामांकित ग्रंथकारांच्या ग्रंथांच्या परिशीलनानें मनुष्य उत्कृष्ट भाषा लिहूं शकेल. आलंकारिक शब्दांचा संग्रह केला असतां साधारण लेखकाला विद्वत्तादर्शक लेख बनवितां येतात. तथापि अशा लेखकांच्या हातून भाषेची अगोदरच पडलेली सीमा वाढविली जात नाहीं. परंतु दुसरे कांहीं लेखक असे शब्दप्रयोग करतात कीं, त्या योगानें भाषेच्या चतुःसीमा घुढें ढकलल्या जातात. ह्या दुसऱ्या वर्गांत रा. मोडक मोडतात हें म्हणण्यास आम्हांस मोठा आनंद वाटतो. असो. ग्रंथकर्त्यांनीं सुभाषिताचा हार आपल्या वाचकांच्या गळ्यांत घालून उत्तम मराठी भाषेचा गुच्छ त्यांचे हातीं दिला आहे. त्याबद्दल वाचकवर्ग ग्रंथकर्त्याचा अत्यंत ऋणी असणें अगदीं स्वाभाविक आहे.

येथपर्यंत या ग्रंथाविषयीं जें कांहीं आम्हांला चांगलें दिसलें तें आम्हीं अगदीं मोकळ्या मनानें कबूल केलें आहे. पण भाषा सोडून आंतील विचार कसोटीला लावले असतां मात्र मतभेद होण्यास जागा आहे. व तत्त्वज्ञानावरील शास्त्रीय ग्रंथमालेंत ह्या पुस्तकाचा रिघाव होईल असें आमची मनोदेवता आम्हांस सांगत नाहीं. विचारांबद्दल प्रायः जरी लबक् साहेब जबाबदार असले तरी त्यामुळें ग्रंथकर्त्यावरची जबाबदारी कमी होते असें आम्हांस वाटत नाहीं. रा. मोडक यांचा पाश्चात्य व पौरस्त्य दोन्ही तत्त्वज्ञान्यांशीं चांगला परिचय असल्यामुळें उसन्या विचारांवर व्यापार करण्याची आवश्यकता रा. मोडक ह्यांस होती असें आम्हांस वाटत नाहीं. ग्रंथकार विद्वान् आहेत, स्वतः विचार करण्याची धमक त्यांचे अंगांत आहे, ह्याबद्दल आमची खातरी असल्यामुळेंच रा. मोडक यांस आम्ही या बाबतींत दोष देऊं इच्छीत आहों.

प्रथमतःच, शरीर, मन इत्यादि प्रकरणें ज्या अनुक्रमानें घातलेलीं आहेत, तो अनुक्रमही पद्धतशीर नाहीं, हें वरवर पाहणारासही दिसून येईल. सुखाला कारणीभूत म्हणून ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या एकाच अनुक्रमानें येणें रास्त होतें. ज्याप्रमाणें शरीर, निर्मल अंतःकरण आणि शिक्षणसंस्कार हीं सुखाला कारणीभूत आहेत त्याप्रमाणें आरुरक्षा आणि आपत्ति हीं सुखाला

विघातक आहेत. यास्तव शरीर, मन सदयता आणि शिक्षण ह्यांच्यामध्येंच आरुरुक्षा आणि आपत्ति हीं प्रकरणें घालणें दोषास्पद आहे. आमच्या मतें विषयांचा अनुक्रम येणेंप्रमाणें पाहिजे होताः—(१) सुख. (२) धर्म. (३) ब्रह्मविद्या. (४) राष्ट्रांची शांति. (५) चित्तस्वास्थ्य. (६) शरीर. (७) मन. (८) संतोष. (९) सदयता. (१०) शिक्षण. (११) मित्र. (१२) सृष्टिप्रेम. (१३) वैदग्ध्य. (१४) आरुरुक्षा. (१५) आपत्ति. (१६) श्रीमंती. (१७) सृष्टीची भीषणता. आणि (१८) सद्यःकाल.

आतां प्रत्येक प्रकरणांत काय सांगितलें आहे याचा थोडक्यांत विचार करूं. पहिलें प्रकरण—

## सुख.

ह्या प्रकरणांत ग्रंथकर्त्यानीं सुख प्राप्त करून देणाऱ्या साधनांचा आढावा घेतला आहे. प्रथमतः, सुख हें परावलंबी नसून आत्मावलंबी आहे असें सांगून पुढील सर्व प्रकरणांचें थोडक्यांत सार दिलें आहे. म्हणजे मनोजय, मर्यादित तृष्णा, सुसंगति, उद्योगप्रवणता, सत्यावलंबन, इत्यादि सुखसाधनांचा विचार करून पापाचरण, अविवेकप्रेरित कृत्यें इत्यादि सुखप्रतिबंधक गोष्टींचें विवेचन केलेलें आहे. प्रकरणाच्या आरंभींच सुखप्राप्तीच्या कार्मी सर्वांना सारखेच लागू पडतील असे सामान्य नियम घालणें शक्य नाहीं, असें ग्रंथकार सांगतात. पण अखेरीस सुखसाधनाची कर्मफलत्यागरूपी गुरुकिल्ली वाचकांच्या स्वाधीन करून पुढें जातात ! आमच्या मतें सुख आणि शांति यांचा परस्परसंबंध काय व त्यांचें वास्तविक खरूप काय याचा ऊहापोह ह्या प्रकरणांत विशेष करावयास पाहिजे होता. ह्या व्यवहारामध्यें सर्व सुखें इंद्रिय आणि विषय ह्यांच्या संयोगानें प्राप्त होणारीं असल्यामुळें ह्या ऐहिक सुखांचा वेदांतांत विस्तरशः ज्याचा विचार केला आहे, अशा ब्रह्मसुखाचा अभिन्नभाव दाखविण्याचा प्रयत्न भ्रममूलक आहे असें आम्हांस वाटतें. ब्रह्मानंदाला निर्व्यापार मनाची सहजस्थिति कारणीभूत असते. व्यवहारांत आपल्याला असा अनुभव येतो कीं, एखादी गोष्ट करावयाची म्हणून ठरलें म्हणजे इष्टवस्तुप्राप्त्यर्थ मनाचे व्यापार सुरू होतात. त्या वेळेस मन उद्दीप्त झालेलें असतें. इष्टवस्तुलाभ होतांच मनाचे व्यापारही शांत होतात आणि तत्क्षणींच मनुष्याला सुखाचा अनुभव येतो. ह्यामुळें

सुख आणि शांति ह्यांमध्यें कार्यकारणभाव मानणें भाग पडतें. निष्क्रिय अगर व्यापारविरहित ज्याचें मन असेल असा माणूस संसारांत राहण्यास अगदीं नालायक बनतो; तेव्हां सुख हें आत्मनिष्ठ आहे ही वेदांत्यांची व्याख्या ऐहिक सुखाला कशी लागू पडते हें आम्हांला समजत नाहीं. 'सर्वं परवशं दुःखं । सर्वमात्मवशं सुखम् ॥' हें मनूचें म्हणणें व्यापक अर्थानें न घेतां मर्यादित अर्थानेंच घेतलें पाहिजे. ज्वरयुक्त माणसाला साखर कडू लागते; चिंताग्रस्त माणसांवर सुस्वर गायनाचा विपरीत परिणाम होतो; वगैरे उदाहरणांनीं सुख हें विषयाधीन नाहीं असें सिद्ध करण्याचा पुष्कळांचा प्रयत्न असतो हें आम्हांला ठाऊक आहे. परंतु साखरेंतच गोडी असती तर ती मनुष्याला कोणत्याही अवस्थेंत गोडच लागावयाला पाहिजे, हें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. साखरेंत गोडी नसून ती माझे रसनेंद्रियांत आहे, हें जर अक्षरशः खरें असेल तर कडू पदार्थही मधुर लागावयाला पाहिजे. पण तसें जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत पदार्थांची मधुरता जी आपणांला भासते ती इंद्रियपदार्थसंयोगजन्य आहे असेंच म्हटलें पाहिजे.

समाधिस्थ योगिजनांना ब्रह्मानंदाचा अनुभव कसा प्राप्त होतो त्याबद्दल अनुभवाच्या अभावीं आम्हांला कांहींच म्हणतां येत नाहीं. तथापि व्यावहारिक सुख हें मात्र इंद्रिय आणि विषय यांच्या संयोगानेंच होणारें आहे. युरोपखंडांतील लोकांच्या नैतिक कल्पनांचा इतिहास लेकी साहेबांनीं लिहिला आहे, त्यांत त्यांनीं म्हटल्याप्रमाणें सुख हें मानवि आहे, ही गोष्ट अंशतः खरी आहे. साहेब लिहितात—Happiness is a condition of feelings and not of circumstances, and its one essential is the exclusion of painful and harassing doubts. आतां सुख जसा मनाचा धर्म आहे, त्याचप्रमाणें दुःख हाही मनाचाच धर्म होय. सर्व गोष्टींची अनुकूलता असतां मनुष्य सुखी असेलच असा नियम नाहीं हें जसें खरें, तद्वतच सर्वतोपरी कष्टमय स्थिति असतां त्या मनुष्याला सुख झालेंच पाहिजे असें म्हणण्याचें धाडस आमच्यानें करवत नाहीं. सुख हा कांहीं दुःखाचा अभाव नाहीं; म्हणून दुःखाभावीं मनुष्य सुखी असलाच पाहिजे असें म्हणतां येत नाहीं. उकीरड्यावर बसून एरोच्छिष्ट खाण्याचा प्रसंग, येणाऱ्या जाणाऱ्या कडून होणारा लत्ताप्रहार, व उनाडटप्पूंकडून

केली जाणारी टवाळकी या गोष्टी ज्याच्या सुखाला कारणभूत होत असतील तो पुरुष धन्य होय. अशा स्थितीतही मनुष्य आनंदी असूं शकणार नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. परंतु ह्या जगाबद्दल ज्याच्या अंतःकरणांत पूर्ण विरक्तता बिंबली आहे असाच मनुष्य अशा स्थितींत आनंदी असूं शकेल. पण अशा निष्क्रिय माणसाला जगाशीं कांहीं कर्तव्य नसल्यामुळें जगालाही त्याचे आनंदाची फारशी चिकित्सा करण्याचे भानगडींत पडण्याची जरूरी नाहीं. समाजहितार्थ झटणाऱ्या पुरुषांची समाजाकडून हेटाळणी केली गेली व परमेश्वराकडून त्याच्या उद्दिष्टकार्यसिद्धीला साहाय्य झालें नाहीं, तर त्या माणसास आनंद कसा व्हावा, ह्याची आम्हांस कल्पना ही होत नाहीं.

शिवाय सुखासुखांतही फरक आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. इंद्रियांपासून मनाला होणारें सुखदुःख हें मनाला स्वतंत्र मार्गानें होणाऱ्या सुखदुःखापासून भिन्न आहे. विस्तवावर पाय ठेविला असतां तो भाजणार व तद्द्वारा मनाला दुःखच होणार. जेथें मनाशिवाय इतर इंद्रियांचा संबंध येत नाहीं, तेथें मात्र सुख दुःख आपल्या आधीन ठेवण्याचें सामर्थ्य मनांत असतें. ग्रंथकर्त्यांनींच पुढें कबुली दिल्याप्रमाणें आयुष्यांत व्याधि, शोक व दुःख यांचे प्रसंग येणारच. मग हे प्रसंगच जर येणार तर मनुष्य दुःखीही होणार हें उघड आहे. फार तर विवेकानें दुःख दुःख म्हणून सुज्ञ मनुष्य रडत बसणार नाहीं; पण तेवढ्यामुळें तो सुखी असेल असें मात्र होत नाहीं. मनानें घेतलेली गोष्ट पुरी झाली म्हणजे मन शांत होतें व नंतर सुखाचा अनुभव येतो, या आमच्या म्हणण्यांत जर कांहीं सत्याचा अंश असेल तर ऐहिक व पारमार्थिक सुखांतील फरक प्रत्येकानें ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. हें भिन्नत्व दृष्टीआड केल्यानें पुष्कळांचा गोंधळ होतो व त्याप्रमाणें ग्रंथकर्त्यांचाही झाला आहे असें पुढील वाक्यावरून दिसतें. " शांतस्थिति सर्वथा स्पृहणीय आहे. तरीही कर्तव्याला रजा देऊन ती मिळवूं पाहणें प्रशस्त नाहीं. " शांतस्थिति जर सर्वथा स्पृहणीय आहे तर कर्तव्यासही रजा देऊन ती प्रात कां करून घेऊं नये ? यास सयुक्तिक कारण सांगतां येणार नाहीं. आणि कर्तव्याला रजा देणें शक्य नसेल तर शांतस्थितीचे इतके गोडवे गाऊन तरी उपयोग काय ? आमच्या मतें माणसाच्या पाठीमागें कर्तव्य हें लागलेंच आहे. तें त्याला कधींही सुटणें शक्य नाहीं. व्यक्तीचा समाजाशीं

कांहीं संबंध राहाणार नाहीं तेव्हां मात्र त्याला कदाचित् कांहीं कर्तव्य उरणार नाहीं. अशा ह्या वैय्यक्तिक सुखाचा विचार प्राचीन वेदांत्यांनीं केला आहे, व अद्यापही पुष्कळ लोक त्यांचाच अनुवाद करीत बसले आहेत. माझा कोणाशीं संबंध नाहीं अशा भावनेनें संसारापासून अलिप्त राहून निरुपाधिक सुखाचा अनुभव घेण्याचा प्रयत्न आजपर्यंत पुष्कळांनीं केला आणि त्यामध्यें त्यांना यशही आलें असेल ह्यांत संशय नाहीं. परंतु समाजाचा व माझा कायमचा संबंध जखडला गेला आहे; किंबहुना, परमेश्वरानें समाजाच्या उपयोगी पडण्याकरितांच मला जन्मास घातलें आहे ही गोष्ट एकदां मान्य झाली, म्हणजे वैय्यक्तिक सुख प्राप्त करून घेण्याचा मला हक्क पोहोंचत नाहीं. समाजाकरितां माझा जन्म आहे असें निश्चित झालें म्हणजे मनुष्याला निष्क्रिय राहतां येत नाहीं; परहितरत असणें हें त्याचें व्रतच बनलें. मनुष्य अशा प्रकारचें कर्तव्य बजावीत असतां त्याला त्याच्या कार्यांत अपयश आलें तरी वाईट वाटण्याचें फारसें कारण राहत नाहीं. कारण, तो स्वतःकरितां कोणतीच गोष्ट करीत नसतो. ह्या जगांत मनुष्याला वारंवार असंतुष्ट होण्याचे प्रसंग येतात त्याचें कारण, बहुतवेळां सर्व जग माझेकरितां परमेश्वरानें निर्माण केलें आहे अशा समजुतीनें तो वागत असतो हें होय. सर्वांनीं माझ्या सुखार्थ झटावें असें वाटून जर त्याप्रमाणें कोणी वागलें नाहीं तर अर्थातच मनाला उद्विग्नता येते. परंतु जग माझ्याकरितां नसून मी जगाकरितां आहें अशी का एकदां उरफाटी भावना दृढ झाली म्हणजे कितीही अपयश आलें तरी उद्विग्नतेची तीव्रता स्वार्थप्रेरित क्रियेच्या प्रसंगीं जितकी होईल तिच्याहून कमी झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्यामुळेंच फलावरची आसक्ति सोडून कर्म करीत जा म्हणून भगवंतांनीं अर्जुनाला उपदेश केला आहे. माझ्याकरितांच जर माझी क्रिया असली, तर फलाची अपेक्षा मीं कां करूं नये हें समजणें सोपें नाहीं; व फलाची अपेक्षाच जर करावयाची नाहीं तर माणसाच्या हातून क्रिया तरी कशी घडावी, हें समजणें दुर्घट आहे. म्हणून ज्या कर्माच्या फलाचा त्याग करण्याविषयीं कृष्णानीं अर्जुनाला पुनः पुनः आग्रहपूर्वक सांगितलेलें आहे तें कर्म सामाजिक होय, वैयक्तिक नव्हे. श्रीकृष्णाचे मनांतील हा आशय वैयक्तिक सुखाच्या मागें लागणारांच्या ध्यानीं येऊं नये हें साहजिकच आहे. माझ्या स्वतःकरितां मला कांहींच करावयाचें नसल्यामुळें माझ्या हातून घडणाऱ्या

क्रियेचें फळही मला मिळणार नाहीं हें उघड आहे. म्हणून त्या मानानें सुखदुःख दोन्हीही माझ्या मनाला व्यथित करूं शकत नाहींत. तथापि ही गोष्ट विसरतां कामा नये कीं, आपलें सामाजिक कर्तव्य बजावीत असतां तें फलद्रूप होणार नाहीं, तर मनुष्याला कदाचित् दुःख होणार नाहीं. परंतु सुख अगर आनंद होईलच हें संभवत नाहीं. कै. नामदार गोखले यांचेंच आपण उदाहरण घेऊं. त्यांनीं आपली सर्व हयात राष्ट्रहितार्थ घालविली याविषयीं मतभेद नाहीं. त्यांनीं आरंभिलेलें कार्य तडीस गेलें नाहीं, किंवा ते जिवंत असूनही त्यांच्या इच्छेप्रमाणें गोष्टी घडून आल्या नाहींत, अशी कल्पना केली तर त्यांच्या मनाची स्थिति काय झाली असती ? आपलें कर्तव्य केल्यामुळें ते सुखी अगर आनंदी असते असें आम्हांस वाटत नाहीं. उलट त्यांच्या मनाला थोडी उद्विग्नता आली असती. आतां स्वतःच्या सुखार्थ प्रयत्न करीत असतां तें न प्राप्त झाल्यामुळें होणारें दुःख अगदीं ग्राम्य; तेंच परहितार्थ झटत असतां प्राप्त झालेलें दुःख अधिक उच्च दर्जाचें. असा ह्या दोन दुःखांत फरक आहे. शास्त्रीय भाषेंत बोलावयाचें म्हणजे एक राजस दुःख व दुसरें सात्विक होय. जी गोष्ट दुःखाची तीच सुखाची. ना. गोखल्यांच्या डोळ्यांदेखत त्यांच्या देशबांधवांना मोठमोठ्या हुद्याच्या जागा मिळाल्या असत्या तर त्यांना सुख अगर आनंद वाटल्याशिवाय कधींहि राहिला नसता; अर्थात् हें सात्विक सुख होय. आमच्या म्हणण्याचा निष्कर्ष इतकाच कीं वेदांत्यांचें निरुपाधिक वैयक्तिक सुख हें आत्मवश असेल परंतु आमच्या समाजसेवकांचें सुख परावलंबी अगर परतंत्रच असणार. लोकहितार्थ आपल्याकडून होईल तितकी क्रिया केलीच पाहिजे. ("To work is an indispensable duty in a social man" Rousseau.) आणि अशी क्रिया करीत असतां सुखदुःखाचाही अनुभव क्रियावानाला येणारच. परंतु त्या क्रियेचा भोक्ता तो प्रत्यक्ष नसल्यामुळें सुख सोज्वळ होतें व दुःख असह्य होत नाहीं.

रा. मोडक ह्यांनीं समाजार्शी विलग्न असलेल्या माणसाला सुख कसें प्राप्त होईल ह्याच दृष्टीनें विशेषतः विचार केलेला दिसतो. व त्याला अनुसरून आपण आपल्या मित्रांची चांगली निवड करावी, फार हांव धरूं नये, वगैरे गोष्टी त्यांनीं सांगितलेल्या योग्यच आहेत. त्यांतही त्यांनीं सत्य हें सुखाला कारणीभूत आहे असा निर्विवाद सिद्धांत काढिला आहे. परंतु नल

आणि हरिश्चंद्र ह्यांचीं उदाहरणें ज्याला माहीत असतील, त्याला ह्या विधानाची सत्यता असत्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. आपण पुष्कळ सत्यनिष्ठ असलों तरी आपल्या भोंवतालचे लोक जर कृतघ्न, दुष्ट व पापी असतील तर त्या सत्यनिष्ठाच्या वांट्याला सुखाचा लवही येणार नाहीं.

ह्याच प्रकरणांत ओघानें दैववादाचाही निर्णय झाला आहे. दैववादी " काय करावें. माझें दैव ! " असें म्हणतो. ह्याचा अर्थ ग्रंथकर्त्यांनीं व्याकरणाचे नियम लावून मोठा विलक्षण केला आहे. परंतु त्याचा उमज आम्हांला अजूनही पडला नाहीं. माझें दैव ह्या दोन शब्दांत जन्यजनकभाव आहे. मी दैवाचा स्वामी असतां दैवाला कां भ्यावें असें रा. मोडक विचारतात. आणि प्राक्कर्माचें फळ इहजन्मीं भोगलेंच पाहिजे असें हेच ग्रंथकार आम्हांला दुसरीकडे कंठरवानें सांगतात. ( पान २४ )–हें त्याचें दुसरें म्हणणें जर खरें असेल, व तें तसें आहे ह्यांत शंका नाहीं, तर माझें प्राक्कर्म स्वामी असून इहजन्मीं त्या कर्माचा मी केवळ सेवक आहें, असेंच होत नाहीं काय?

## शरीर.

सुखाचा विचार करीत असतां जीवाच्या बरोबरच उदयास आलेलें जें शरीर अगर ज्या शरीरद्वारा जीव प्रकट होतो त्या शरीराकडे प्रथम लक्ष देणें साहाजिक आहे. भारतांत म्हटलें आहे, " मृतकल्याहि रोगिणः " जे सदा रोगी, म्हणजे ज्यांचें शरीर सदा रोगग्रस्त असतें, अशीं माणसें मेल्यासारखींच समजावीं. अशा माणसांना सुख कसें लाभावें ? शरीर निरोगी असल्यास अनेक दुःखांचे प्रसंगच दूर पळतात, हा अभावरूपी लाभ होतो इतकेंच नव्हे; तर पूर्ण सुखाचा अनुभव येण्यास सुदृढ शरीराची अत्यंत अवश्यकता आहे. ग्रंथकर्त्यांनीं ह्या शरीराच्या निरनिराळ्या अवयवांचीं अजब कार्यें चित्ताकर्षक भाषेंत खुलवून सांगून, हें विलक्षण बनविलेलें शरीर एका क्षणांत मृतकाष्ठ होऊन पडतें, हा आसुरी प्रकार पाहून विधात्याचें अपांडित्य भर्तृहरीच्या शब्दांत निवेदन केलें आहे तें असें:—

सृजति तावदशेषगुणाकरं
पुरुषरत्नमलंकरणं भुवः ।
तदपि तत्क्षणभंगि करोतिचे—
दहह कष्टमपंडितता विधेः ॥ १ ॥

ह्यानंतर जीवापासून शरीराचें भिन्नत्व प्रतिपादून शरीर आत्म्याचें भोगायतन असल्यामुळें जपून वापरलें पाहिजे म्हणून सांगितलें आहे. व त्यापुढें शरीर चांगलें न राहण्याचीं कारणें दिलीं आहेत, तीं मनन करण्यासारखीं आहेत. बेसुमार अन्नसेवन, श्रमातिरेक, विषयलोलुपता, अस्वच्छता, अस्वस्थचित्त, सुजननशास्त्राविषयीं अज्ञान, मोकळ्या हवेची टंचाई आणि मद्यसेवन इतक्या गोष्टी आरोग्यनाशक आहेत. आमच्या मतें ह्या प्रकरणांत आक्षेपार्ह कांहीं नसून सर्वच विचारणीय आहे. तथापि विद्यमान पिढीचा कमकुवतपणा, अकालीं येणारा मृत्यु, नवीन जन्मास आलेल्या मुलांतील मृत्यूचें भयंकर प्रमाण; इत्यादि गोष्टींचा विचार करतां कोणाचेंही मन विदारून जातें. ही स्थिति फार भयंकर आहे, व हें गाडें असेंच चाललें तर राष्ट्राची उन्नति केव्हांही होणें शक्य नाहीं. म्हणून ह्या गोष्टी घडवून आणणाऱ्या कारणांचा खल ग्रंथकर्त्यांनीं विशेष केला असता तर आम्हांस बरें वाटलें असतें. हल्लीं समाजाची घडी बिघडल्यामुळें व कांहीं परिहार्य तर कांहीं अपरिहार्य अशा कारणसमुच्चयानें मनुष्याला शरीरस्वास्थ्य मिळणें दुर्लभ झालें आहे. अज्ञानामुळें विषयलोलुपता बोकाळली आहे व दारिद्र्यामुळें समाजांतील कांहीं लोकांस मोकळ्या स्वच्छ हवेचा योग म्हणजे कपिलाषष्ठीचाच होऊन बसला आहे. विशिष्ट कल्पना रूढ झाल्यामुळें आमच्यांतील कांहीं वर्गांतील स्त्रियांना साऱ्या जन्मांत स्वच्छ खुल्या हवेचा स्पर्शही होत नाहीं हें पाहून अंतःकरण विव्हळ होतें, व त्यांच्या अकालीन मृत्यूबद्दल आश्चर्य न वाटतां आम्ही हिंदुस्थानांतील माणसें इतकीं वर्षें तरी कशीं जगतों याचाच अचंबा वाटतो. त्याचप्रमाणें स्त्रीसंग व संतानोत्पत्ति ह्याविषयीं सर्वांमध्यें जें अक्षम्य अज्ञान वसत आहे त्याचे दुष्परिणाम चालू पिढीला भोगावें लागत आहेत, ह्या गोष्टीकडे समाजाचें बिलकूल लक्ष गेलेलें दिसत नाहीं. आणि म्हणूनच रा. मोडक ह्यांनीं ह्या विषयाचा नुसता नामनिर्देश करून तो सोडून द्यावयास नको होता. एका ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें देशामध्यें अमक्यानें यावें व अमक्यानें येऊं नये अशाबद्दल कानू आहेत. पण ह्या जगामध्यें कोणी यावें व कोणी येऊं नये अशाविषयीं मात्र सर्वच बेदाद आहे ही फारच चमत्कारिक स्थिति आहे. शरीरदौर्बल्याविषयीं सर्वत्र उदासीनता असल्यामुळें ज्या नानाविध कारणांनीं चालू पिढींतील मंडळींचीं शरीरें

निर्वीर्य होत चालली त्यांपैकीं एकाचीही छाननी आजवर एकानेंही केलेली नाहीं. तथापि रा. मोडकांच्या ह्या प्रकरणांतील लेखानें सदरहू गोष्टीकडे लोकांचें लक्ष वेधेल यांत संशय नाहीं.

## मन.

शरीरानंतर सर्वेंद्रियपति जें मन त्यालाच सुखसाधनांत प्राधान्य मिळणें रास्त आहे. उघडच आहे कीं, पापी व अस्वच्छ मन ह्यापासूनच वरींचशीं दुःखें उद्भवतात. विशेषतः मागें सांगितल्याप्रमाणें सुख व दुःख हे मनाचे धर्म असल्यामुळें कित्येक वेळां नसल्या ठिकाणीं मनाला दुःख दिसतें, तर इतर कित्येक प्रसंगीं आपल्याच घाणेरड्या कृत्यांनीं मन निरर्थक दुःख निर्माण करतें. यामुळें शरीराहून मन थोर आहे हें ग्रंथकर्त्यांचें म्हणणें कोणालाही पटण्यासारखें आहे. शरीर सुदृढ आहे, कांतियुक्त आहे, तथापि अंतरंग जर निर्मल नसेल तर देवीभागवतांतील वचनाप्रमाणें ( निर्मलं न मनो यावत् तावत् सर्वं निरर्थकम् ) सर्व व्यर्थ आहे. याचें कारण असें आहे कीं चांगलें शरीर मन अगर आत्मा सुसंस्कृत करतें असें नाहीं, परंतु निष्कलंक मन मात्र शरीर चांगलें बनण्यास कारणीभूत होतें. ( Good body does not improve the soul but a good soul improves the body'–*Plato* ) आरंभींच हें सांगणें जरूर आहे कीं, लेखकांनीं ह्या प्रकरणांत मन आणि आत्मा हे शब्द एकाच अर्थीं योजिले आहेत. संसार हा कष्टमय आहे, मृत्यु कांहींना सुखावह तर कांहींना कष्टमय भासतो, लहानपणींच कोंवळ्या मनांवर संस्कार करावा, आईबाप मुलांसंबंधानें आपली जबाबदारी ओळखीत नाहींत, इत्यादी गोष्टी सांगून लेखकाची लेखणी स्त्रियांच्या सौंदर्यावर जणूं काय लुब्ध होऊन तेथेंच विराम पावलेली दिसते. ज्या गोष्टींचा प्रस्तुत विषयाशीं अर्थाअर्थीं संबंध दिसत नाहीं अशा गोष्टींचें विवेचन कां केलें आहे हें समजणें कठीण आहे. तथापि संतानोत्सवार्थ पेढे वाटणाऱ्या आमच्या आईबापांना आपल्यावर कांहीं जबाबदारी आहे याची रतीभरही जाणीव नाहीं, ही गोष्ट रा. मोडकांप्रमाणें आम्हींही आईबापांच्या नजरेस आणितों. गुलहौसी लोकांचे केवळ स्त्रियांच्या बाह्यसौंदर्याला भुलून निघालेले उद्गार ग्रंथकर्त्यांनीं दिले आहेत, त्यापेक्षां ह्या संसारामध्यें स्त्रीचें स्थान व तिचें महत्त्व किती आहे ह्याचा थोडा ज्यास्त विचार करा-

वयास पाहिजे होता असें आम्हांला वाटतें. स्त्रीची खरी योग्यता तिच्या वाह्यसौंदर्यावर नसून तिच्या उपयुक्ततेवरच जास्त आहे. " मनुष्याचें आयुष्य स्त्रीविना आरंभीं असहाय, तरुणपणीं सुखविरहीत, आणि अखेरीस असमाधानयुक्त होतें." असें एका फ्रेंच ग्रंथकर्त्रीचें म्हणणें आहे तें कोण खोटें म्हणेल ? ( Without woman life of a man would be without aid at the beginning of it, without pleasure in the middle of it, and without solace at the end.—*Madam D. Hondetot.* ) स्त्रीसौंदर्य एकीकडे राहो. परंतु स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या मनोरचनेंत भिन्नता आहे कीं नाहीं हा प्रश्न विचाराई आहे. ह्या बाबतींत युरोपियन नीतिमत्तेच्या इतिहासांत लेके साहेबांनीं स्त्रियांबद्दल जो आपला अभिप्राय दिलेला आहे तो आम्हांला पसंत असल्यामुळें तो आम्ही खालीं देतों.

Morally, I think the general superiority of women over men is unquestionable. If we take the somewhat coarse and inadequate creterion of police statistics, we find that while the male and female populations are nearly the same in numbers, the crimes committed by men are usually rather more than 5 times as numerous as those committed by women, and although it may be justly observed that men as the stronger sex, and the sex upon whom the burden of supporting the family is thrown, have more temptations than women, it must be remembered, on the other hand, that extreme poverty which verges upon starvation is most common among women whose means of livelihood are most restricted and whose earnings are smallest and most precarious. Self-sacrifice is the most conspicuous element of a virtuous and religious character and it is certainly far less common among men than among women whose whole times are usually spent in yielding to the will and consulting the pleasures of others. There are two great departments of virtue:—the impulsive or that which springs spontaneously from the emotions, and the deliberative or that which is performed in obedience to the sense of duty; and in both of these women are superior to men. Their sensibility is greater, they are more chaste both in thought and action, more tender to the erring, more compassionate to the suffering,

more affectionate to all about them. We find entire times spent in daily persistent self-denial, in the patient endurance of countless trials, that they are in general more addicted to petty forms of vanity, jealousy, spitefulness and ambition, and they are inferior to men in active courage. In the courage of endurance they are commonly superior, but their passive courage is not so much fortititude which bears and defies as resignation which bears and bends. In the ethics of intellect they are decidedly inferior. Women very rarely love truth and hate vehemently those who differ from them. They are little capable of impartiality or of doubt. Their thinking is chiefly a mode of feeling. They do not perceive qualifying circumstances. Men lean most to justice, wemen to mercy. Their religious or devotional realizations are incontestably more vivid. While a father is most moved by the death of a child in his presence, a mother generally feels most the death of a child in some distant land.

Physically, men have the indisputable superiority in strength and women in beauty. Intellectually a certain inferiority of female sex can hardly be denied. Women are more occupied with particular instances than with general principles.

अर्थः—पुरुषांपेक्षां स्त्रिया सामान्यतः अधिक नीतिमान् असतात ही गोष्ट कोणत्याही देशांतील गुन्हेगारांचें रजिस्टर पाहिलें असतां सहज सिद्ध करून दाखवितां येण्यासारखी आहे. जगांमध्यें साधारणपणें पुरुषांइतकी स्त्रियांची संख्या असतां कोणत्याही तुरुंगांत जा त्या, तुरुंगाचा फारच थोडा भाग स्त्री गुन्हेगारांनीं अडविलेला तुमचे दृष्टीस पडेल. आपल्या सुखावर पाणी सोडणें हा सद्गुणी व धार्मिक मनुष्यांत मोठा गुण मानला जातो. ह्या दृष्टीनेंही पाहतां हा गुण पुरुषांपेक्षां स्त्रियांमध्यें विशेष आढळून येतो. दुसऱ्याचें सुख साधण्यांत आणि दुसऱ्याचे इच्छेनुरूप वागण्यांत स्त्रिया आपला सारा जन्म खर्च करितात. सद्गुणांतही दोन तऱ्हा आहेत. कांहीं माणसें स्वयंस्फूर्तीनेंच कोणतीही चांगली गोष्ट करण्यास एकदम तयार होतात, तर दुसरीं कांहीं माणसें विवेकोत्तर कर्तव्य म्हणूनच करीत असतात. ह्या दोन्ही प्रकारच्या गुणांत पुरुषांपेक्षां स्त्रियांचेंच श्रेष्ठत्व ठर-

ण्यासारखें आहे. निर्मल विचार व शुद्ध आचरण ह्यांतही स्त्रिया पुरुषांच्याच पुढें आहेत. अपराध्याकडे सदय दृष्टीनें पाहणें, पीडितांविषयीं विशेष कनवाळूपणा वाटणें, आणि भोंवतालच्या सर्वांवर प्रेम करणें हेही स्त्रियांचे विशिष्ट गुण होत. आपल्या सुखाकडे बिलकूल लक्ष न देऊन असंख्य आपत्ति आल्या तरी त्या निमूटपणें सोसण्यांत स्त्रिया आपला सारा जन्म खर्ची घालतात. उलट थोडासा छानछोकपणा, कांहींशी आळ्यता, मत्सर, अदेखाई, महत्त्वाकांक्षा, इत्यादि कित्येक किरकोळ दुर्गुणही त्यांचे ठिकाणीं असतात. आणि धिटाईत तर पुरुष स्त्रियांना कधींच हार जाणार नाहींत. त्या फार सहनशील असतात; परंतु त्यांच्यांत धैर्याची उणीव असते, म्हणजे आलेल्या संकटास तोंड देण्याचें त्यांच्यांत अवसान नसतें. संकटांपुढें त्या हात टेकतात. बुद्धिमत्तेंतही त्यांचा नंबर पुरुषांच्या खालींच लागेल. सत्यावर स्त्रियांचें प्रेम वेताचेंच असतें आणि त्यांच्याशीं न जुळणाऱ्या माणसांचा त्यांच्या अंतःकरणांत प्रज्वलित द्वेष वसत असतो. त्या नेहमीं संशयानें पछाडलेल्या असून मनाचा समतोलपणा त्यांच्या ठिकाणीं क्वचितच दिसून येईल. विचार करण्याची त्यांना संवय नसते. त्यांच्या मनाला जें वाटेल तो त्यांचा विवेक. त्यांना सर्व बाजूंनीं विचार करितां येत नाहीं. पुरुष न्यायी असतात तर स्त्रिया दयाळू असतात. त्यांची धर्मश्रद्धा आणि त्यांचा भाविकपणा पुरुषांपेक्षां निःसंशय अधिक उज्ज्वल असतो. डोळ्यासमोर मेलेलें मूल पाहून बापाला फार वाईट वाटतें. परंतु दूर देशांत मूल मेलेलें ऐकून आई अधिक दुःखी होते. स्त्रियांहून पुरुषाचें शरीरबल अधिक हें निर्विवाद आहे. परंतु सौंदर्यांत पुरुषांना स्त्रिया मागें टाकतात हेंही तितकेंच निर्विवाद आहे. पुरुषांची दृष्टि सामान्य तत्वांवरून ढळत नाहीं; पण स्त्रियांचें लक्ष बारीकसारीक गोष्टींतच वेधलेलें असतें.

ह्याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या स्वभावांतील जन्मोत्तर संस्कारांनीं न बदलणारा भेद प्रत्येकानें लक्षांत बाळगिला पाहिजे. रा. मोडक ह्यांनीं अशा दृष्टीनें ह्याविषयीं जास्त विवेचन करण्यास पाहिजे होतें.

## आरुरुक्षा.

शरीर आणि मन या चौथ्या प्रकरणांत ग्रंथकर्त्यांनीं उदयेच्छेचा विचार केलेला आहे. उदयाची इच्छा सुखाला कारणीभूत आहे काय ? ह्या

प्रश्नाचें उत्तर आरंभीं तर ग्रंथकर्त्यांनीं छाती ठोकून दिलें आहे. " असेल आमचा हरी तर देईल खाटल्यावरी " हें म्हणणें नादानपणाचें आहे असें आपल्या वाचकांस बजावून, बळेंच करणी करून लक्ष्मी ओढून आणावी, ह्या सुज्ञ वचनाची त्यांना आठवण करून दिली आहे. आम्हांला ग्रंथकर्त्यांचा हा उपदेश अक्षरशः कबूल आहे. परंतु ते म्हणतात तशा प्रकारचें सुख असल्या प्रकारची हांव धरून कसें प्राप्त होणार ह्याचा मात्र उलगडा होत नाहीं. कारण पुढें त्यांनींच " ज्याला शांत आणि सुयंत्र असा जीवितक्रम पसंत असेल त्यानें व्याप फार माजवूं नये " असें सांगितलें आहे. ह्या दोन सिद्धांतांचा मेळ कसा घालावा ह्याबद्दल वाचक बुचकळ्यांत पडतो. परस्परविरुद्ध तत्त्वांचा संग्रह या ग्रंथांत जागोजाग दिसून येतो, हा या ग्रंथाचा मोठा दोष आहे. आरंभीं उदयेच्छोला बरेंच उचलून धरून अखेर ग्रंथकर्त्यांनीं तिचे पायच मोडून टाकिले आहेत. न्यायानें द्रव्यार्जन करून समकालीन राष्ट्रबंधूंची मान्यता संपादण्यापलीकडे आकांक्षेची मजल नेऊं नये असा इशारा देऊन अखेरीस ज्यांना शांत व सुयंत्र असा जीवितक्रम प्रिय असेल त्यांनीं व्याप फार माजवूं नये, असें त्यांचें आपल्या वाचकांस निक्षून सांगणें आहे. तदनंतर मध्ययुगीन पंडितांच्या शुष्क वादांचा उल्लेख करून गेल्या शतकांत झालेल्या शनाच्या वाढीचें वर्णन पाणीदार शब्दांनीं केलें आहे. तथापि न जाणों वाचक कदाचित् भलतीकडेच झुकतील असा संशय येऊन भौतिक उन्नतीपेक्षां आत्मोन्नति अधिक थोर असें युरोपांतच विशेष लक्षांत ठेवण्यालायक तत्त्व अनपेक्षित ठिकाणीं लोकांपुढें मांडिलें आहे. ज्या देशांतील लोकांस पोटभर अन्न खाण्यास मिळत नाहीं त्यांना आत्मिक उन्नतीच्या गोष्टी पटणें जरा कठीणच पडेल.

## संतोष.

ह्यापुढें संतोष–प्रकरणांत, संसारांत सुख नाहीं, आयुष्य कष्टप्रद आहे, इत्यादि प्रकारानें संसाराची निष्फलता मनावर ठसवून ज्याला संसारांत राहणेंच असेल त्याच्या कुटुंबांतील माणसें चांगलीं असतील तरच त्याला सुख प्राप्त होतें असें सांगून, उद्योग कसा करावा ह्याविषयींचें मर्म ग्रन्थकर्त्यांनीं व्यक्त केलें आहे. ते म्हणतात, उद्योगाची खरी रीत म्हटली म्हणजे अशी कीं, कोणत्याही कार्मी आपल्या प्रयत्नाची आपण शिकस्त करून

11 JAN 1945

सोडावी, मग शान्तपणें फलाची अपेक्षा करीत स्वस्थ राहावें. शान्तिसुखाचा नाश होईल ह्या भीतीनें मर्यादित व्याप करण्यास सांगणाऱ्या ग्रन्थकारांना लगेच उद्योगाची पराकाष्ठा करण्याविषयींचा आग्रह करण्याचा विसंगतपणा कसा दिसला नाहीं हा चमत्कार आहे. त्याचप्रमाणें फलाची इच्छा न करण्याविषयीं अगोदरच ज्यांनीं इशारत दिली आहे त्यांना तरी फलाची अपेक्षा करीत राहण्याचा उपदेश करणें शक्य नाहीं. उत्तरोत्तर वाढत चाललेल्या छानछोकीबद्दल ग्रंथकर्त्यांना वाईट वाटणें स्वाभाविक आहे. पण ह्या प्रकरणांत हें विवेचन अप्रस्तुत आहे असें आम्हांस वाटतें. संतोषानें व्यक्तिसुख लाभत असलें तथापि राष्ट्रोन्नतीचें मूळ असंतुष्टतेंत आहे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. जगाचा मी ऋणी आहें अशी भावना नसणाऱ्या सदासंतुष्ट माणसाच्या हातून कोणतीही क्रिया घडणार नाहीं, असा कर्तव्यशून्य माणूस या पृथ्वीवर जन्मास तरी कां यावा हें समजणें दुरापास्त आहे.

## आपत्ति.

सुखसाधनांमध्यें संकटांचा समावेश करण्याचें धाडस कोणी करील असें वाटत नाहीं. तथापि आपत्ति सुखविध्वंसक असल्यामुळें त्यांचा विचार करणें ओघासच येतें. आपत्तींतही मनुष्य सुखीच असतो अशी लौकिकी भाषा कानावर वारंवार पडते, नाहीं असें नाहीं. तथापि शास्त्रीयदृष्ट्या या भाषेचें समर्थन करणें म्हणजे व्यर्थ शीण होय. आत्मव्यतिरिक्त इतर वस्तूंपासून जर मनुष्याला सुख होतें तर तदभावीं सुखाचा अभाव असणें स्वाभाविकच होय. "आत्मन्येवात्मना तुष्ट" अशा लोकांच्या निरुपाधिक आनंदाचा येथें विचार करण्याचें प्रयोजन नाहीं. परंतु, अनुपमेय सृष्टिसौंदर्यापासून जर एखाद्या रसिकाला खरा आनंद होत असेल तर तोच सृष्टिप्रदेश अकल्पित कारणांनीं रूक्ष झालेला पाहून त्याचें हृदय क्षणभर आर्त झाल्यावाचून कसें राहणार ? तात्पर्य, मनुष्याच्या मनोजयानें आपत्तीपासून जरी त्यास दुःख होणार नाहीं तरी सुख होणें संभवनीय नाहीं.

ग्रंथकर्त्यांनीं संकटांचे सहा वर्ग केले आहेतः (१) सूचनार्थ, (२) परीक्षार्थ, (३) काल्पनिक, (४) स्वकृत, (५) दंडार्थक, (६) आच्छन्न. ग्रंथकाराचें म्हणणें जगांत जें दुःख येतें तें आगामि संकटांचें परिहारसूचक असतें, व एकाचें दुःख दुसऱ्याच्या सुखाला कारणीभूत होतें. यांत दुसऱ्याच्या सुखार्थ परमेश्वर तिसऱ्याला विपत्तींत पाडतो

याचें समर्थन कसें करावें हें आम्हांला समजत नाहीं. आपल्या हातून चूक झाली म्हणजे त्या चुकीचें प्रायश्चित्त आपणांस भोगलें पाहिजे व ती चूक भावी महान् अनर्थ टाळण्याला कारणीभूत होईल हेंही खोटें नाहीं. पण अशा चुका अज्ञानानेंच होतात. सबब अशा संकटांना सूचनार्थ म्हणण्यापेक्षां अज्ञानोत्पन्न म्हणणें अधिक योग्य होईल.

कांहीं संकटें परमेश्वर मनुष्याची परीक्षा पाहाण्याकरितां पाठवीत असतो. आपत्कालीं खऱ्या गुणांची पारख होते; आणि म्हणूनच त्या माणसाचा कीर्तिभानु अधिकच तेजःपुंज होतो. या म्हणण्याच्या सत्यार्थ इतिहासांतून पुष्कळ उदाहरणें देतां येतील हें जरी खरें असलें तरी अशीं संकटें घाडण्यांत परमेश्वराचा हेतु सदयच असतो हें ग्रंथकाराचें विधान आम्हांस त्यांच्याप्रमाणेंच "उघड" दिसत नाहीं. उलट चांगल्या माणसांवर आलेल्या अवचित संकटांवरून परमेश्वराचें दयालुत्व सिद्ध होण्याऐवजीं अशाही प्रसंगीं परमेश्वर सदय आहे असें म्हणणारांचा आग्रह मात्र उघड दिसतो. हरिश्चंद्र आणि नल या राजांच्या आपत्तींचीं हृदयद्रावक वर्णनें वाचलीं म्हणजे परमेश्वरानें आपली सदयता लोकनिदर्शनास आणण्याकरितां इतके जालीम उपाय योजावे किंवा नाहीं याचा निर्णय करणें कठीण जाईल. हें परमेश्वराचें करणें कदाचित् न्यायाचें असेल, पण तें निःसंशय दयाळूपणाचें म्हणतां येणार नाहीं. कोणत्याही क्रियेचे सुष्टदुष्ट परिणाम होत असतात, परंतु तो हेतुच मनांत ठेवून ती क्रिया झाली पाहिजे हें म्हणणें सर्वथा वाजवी दिसत नाहीं. सर्व गांव जळून खाक झाला म्हणजे हवा स्वच्छ होते. रोगाचें बीज राहात नाहीं, व सरकारास नवीन शहररचना करण्याची संधि प्राप्त होते, म्हणून त्या सबबीवर गांव अग्निमुखीं देण्यास कोणी प्रवृत्त होणार नाहीं.

मनुष्यावर जीं असंख्य संकटें ओढवतात त्यांपैकीं पुष्कळ स्वकृत असतात, हें ग्रंथकर्त्याचें म्हणणें प्रत्येकानें लक्षांत बाळगण्याजोगें आहे. खरें पाहिलें तर परिहार्य आणि अपरिहार्य, असे संकटाचे दोनच भाग करावयास पाहिजे होते. केसरनें जर आज लढाई उत्पन्न केली नसती तर त्यांना चिंतातुर असण्याचें कारण पडलें नसतें. शारीरिक व मानसिक क्लेश आपण केलेल्या चुक्यांमुळें आपणांस भोगावे लागतात. अग्नीवर पाय ठेवला असतां

तो भाजलाच पाहिजे. अर्थात् पाय भाजणें हा अग्नीवर पाऊल टाकण्याचा परिणाम झाला. ह्यालाच दंडार्थक संकट म्हणावयाचें.

कांहीं संकटें फणसासारखीं असतात. म्हणजे बाहेरून काटेरी असलीं तर आंत सर्व मधुरताच असावयाची. हिवाळ्यांत थंडीचा कितीं जरी बाह्यतः त्रास वाटला तरी एकंदरींत हिमकाल मनुष्याच्या प्रकृतीला सुखावहच होतो. असल्या प्रकारच्या संकटांना ग्रंथकार आच्छन्न संकटें म्हणतात.

आपत्तींचें वर्गीकरण शास्त्रीय नाहीं हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. मुख्य दोष म्हटला म्हणजे परकृत संकटांचा उल्लेखही या प्रकरणांत केलेला नाहीं. अशीं संकटें अपरिहार्य संकटांच्या सदरांत आम्हीं घालतों. आपण आपल्याकडून निर्दोष राहून तद्द्वारां येणाऱ्या संकटांचा परिहार केला तरी इतरांनीं केलेल्या कृत्यांचे दुष्परिणाम आपणांवर वारंवार घडत असतात, ते आपणांला कांहीं केलें तरी टाळतां येणें शक्य नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांना आज गहूं खाण्यास मिळत नाहींत असें झालें आहे. हें पांच हजार कोसांवर असलेल्या लोकांनीं केलेल्या कृत्याचें फळ होय. एकाच्या निष्काळजीपणामुळें लागलेल्या आगीनें त्याचेंच घर जळतें असें नाहीं, तर, इतरांचींही जळतात. त्यास त्या इतरांनीं काय करावें ? हाकलणाराच्या मूर्खपणानें दोन आगगाड्यांची टक्कर होऊन हजारों लोक मृत्युमुखीं पडतात हा कोणाचा अपराध म्हणावा ? प्रथम या देशांत कोणी तरी एकानेंच परदेशांतून प्लेगचें बीज आणलें. पण या रोगास आजपर्यंत जे लाखों लोक बळी पडले त्या बिचाऱ्यांनीं कोणता गुन्हा केला होता, कीं त्यांना मरण आलें ही योग्य शिक्षा झाली असें म्हणतां येईल ? भारतीयुद्धाचे वेळीं एका दुर्योधनाच्या राज्यतृष्णेमुळें अगणित प्राणहानि झाली. त्यावेळीं त्या लोकांनीं काय पाप केलें म्हणून सांगतां येईल ? सारांश, या जगांत दुसऱ्याच्या कृतीनें ओढवलेल्या संकटांना तोंड देणें अशक्य आहे.

ह्याशिवाय दैवी संकटें म्हणून एक तिसरा संकटांचा वर्ग पाडतां येईल. भूकंप, ज्वालामुखी पर्वत, क्षुब्ध समुद्र इत्यादिकांपासून होणाऱ्या अनर्थांचा समावेश या वर्गांत करितां येण्यासारखा आहे. याप्रमाणें स्वकृत, परकृत व दैवी असे तीन वर्ग आपत्तींचे पाडणें अधिक सयुक्तिक झालें असतें. जाग्यावर कांहीं नसून संकटाची कल्पना करून उगाच बाऊ, बाऊ, म्हणून

भेदरून जाणारे लोक असतात. त्यांच्या या काल्पनिक संकटांचा समावेश स्वकृत वर्गात करण्यास हरकत दिसत नाहीं.

## सदयता.

मनुष्य कितीही विद्वान् असो, त्याच्या अंतःकरणांत दयेचा पाझर नसेल तर त्याच्या त्या विद्वत्तेची कांहीं किंमत नाहीं. महीपतीनें म्हटल्याप्रमाणें "भूत दयेविण होटीं ज्ञान वटवट कासयां ?" अर्थात् अशा उच्चतर सद्गुणाचा समावेश सुखसाधनांत केला हें सयुक्तिकच आहे. कोणत्याही मनुष्याशीं-मग त्यानें आपला महान् अपराध कां केलेला असेना--आपण सदयतेनें व क्षमाशीलतेनें त्याच्याशीं वागावें, दुसऱ्याचे दोषच पाहूं नयेत. म्हणजे आपल्या चित्ताच्या स्वास्थ्याची हानि होण्याचा संभव कमी. कोणत्याही गोष्टींचा सर्वांगीं विचार झाला म्हणजे ती बहुधा क्षम्यच वाटते, व क्रोधाचें कारणच उरत नाहीं. अपात्रीं दान देऊं नये, कारण, वर्तनानें अपात्र आहे तो दयेलाही अपात्र आहे. नेहमीं शुभ बोलावें व सर्वांवर प्रेमाचा वर्षाव करावा, इत्यादि. ह्या प्रकरणांतील प्रमेयें प्रत्येकानें आपल्यापुढें सतत वागवितीं पाहिजेत. परंतु त्यांतल्या त्यांत ग्रंथकर्त्याचें एक विधान अत्यंत महत्त्वाचें असून तिकडे प्रत्येकाचें लक्ष वेधणें अवश्य आहे. रा. मोडक सांगतात, दुसऱ्यावर नेहमीं उपकार करीत असावें; कारण मनुष्य प्रत्येकाचा ऋणी आहे. आश्चर्याची गोष्ट ही कीं, सर्व जगाचें ऋण आपल्या डोक्यावर आहे ह्याचा विचार कोणाच्या डोक्याला शिवत नाहीं. आगगाडींत, आगबोटींत आपण बसून लांबलांबचा प्रवास करितों. अल्प कालांत आपलें म्हणणें दूरस्थ माणसांस कळवितां येतें. असंख्य लोकांनीं बनविलेल्या नानाविध पदार्थांनीं आपण आपल्या मनाची हौस पुरवून घेतों. किंबहुना आपलें जीवित, आपली सर्व चैन, आपली सर्व मौज दुसऱ्यावर चाललली आहे, ह्याचा विचार केला म्हणजे आपण दुसऱ्याकरितां कांहीं केलें तर त्याला परोपकार तरी कसा म्हणावा हें समजत नाहीं. आमच्या मतें परोपकार हा शब्दच भाषेंत असावयास नको होता. ज्या ज्या वेळेस दुसऱ्याच्या उपयोगीं पडून आपण त्याच्यावर उपकार करितों असें आपणांस वाटतें तेव्हां तेव्हां वस्तुतः आपण परोपकार करीत नसून आपण दुसऱ्याचें कर्जच फेडीत आहोंत असें समजलें पाहिजे.

असे अनेक प्रसंग आहेत कीं, ज्याच्या कृतीचा फायदा आपणास मिळतो त्याच्या उपयोगीं पुन्हां पडण्याची संधीच आपणास मिळत नाहीं. अशा प्रसंगीं त्याच्या उपकाराचें कर्ज फेडणें म्हणजे जगांतील दुसऱ्या माणसांच्या उपयोगीं पडणें हा एकच मार्ग खुला रहातो.

## शिक्षण.

शरीरापेक्षां मनाची थोरवी अधिक आहे. थोर मन असल्यानें वृत्ति सदा आनंदी असते, हें आपणांस ग्रंथकर्त्यांनीं अगोदरच सांगून ठेविलें आहे. परंतु सर्वांचीं मनें उपजतच सारखीं नसल्यामुळें मनावर संस्कार घडावे लागतात व हें कार्य शिक्षणाच्याच योगानें सिद्धीस जातें. म्हणून सुखप्राप्तीवरील विवेचनांत शिक्षणाला अग्रस्थान देणें अगत्याचें आहे. ज्या संस्कारांनीं पशूचा मनुष्य बनतो त्यांस शिक्षण म्हणावें, ही रा. मोडक यांनीं केलेली व्याख्या निर्दोष आहे. ईश्वर आपणांस पाहतो आहे ही भावना असल्याशिवाय मनुष्य सद्वृत्त निपजणें दुर्घट कर्म आहे. म्हणून धार्मिक शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करून प्रचलित शिक्षणपद्धतींतील दोष रा. मोडक यांनीं मोठ्या मार्मिकतेनें व बहुतेकांना मान्य होतील अशा तऱ्हेनें सांगितले आहेत; " आमचे शिक्षणपद्धतींत जबरदस्त दोष हा आहे कीं, तिच्या योगानें विद्यार्थ्यांची जिज्ञासा, शोधकदृष्टि किंवा ज्ञानतृष्णा हीं उत्तरोत्तर वृद्धिंगत न होत जातां उलटीं मंदावत जातात. " ही टीका आम्हांस अक्षरशः मान्य आहे. चालू शिक्षणानें पशूचा मनुष्य बनण्याऐवजीं मनुष्याचा पशू बनतो हें मात्र खास. मुलांची कोणत्या तरी विशिष्ट विषयाकडे उपजतच प्रवीणता असते, म्हणून त्याच विषयाचा अभ्यास त्याच्याकडून करवावा, ह्या ग्रंथकर्त्यांच्या हाकाटीकडे सरकारचें व लोकांचें लक्ष जाईल तो सुदीन. जन्मास आलेलें प्रत्येक मूल बी. ए. च झालें पाहिजे अशी जणुंकाय आजपर्यंत विद्याखात्याची सक्ति होती असा भास होतो. ह्या असमंजसपणाच्या धोरणानें हिंदुस्थानांतील लाखों मुलें फुकट गेलीं आहेत. ह्याकरितां उत्कर्षेच्छु राष्ट्राला शिक्षणाच्या बाबतींत सर्व प्रकारच्या सोयी करून देणें हें सरकारचें व लोकांचें आद्य कर्तव्य आहे. विद्यार्थ्याला एकाच विषयाचें ज्ञान देऊन इतर सर्व विषयांचीं मूलभूत तत्त्वें त्याला अवगत करून द्यावीं हेंही ग्रंथकाराचें म्हणणें सयुक्तिक दिसतें.

परकी भाषेंतून हल्लीं शिक्षण दिलें जात असल्यामुळें त्याचे किती अनिष्ट परिणाम होतात याचा विचार ग्रंथकर्त्यांनीं केलेला नाहीं. फाजील श्रम पडून विषयही मुलाला नीट समजत नाहीं, हा या पद्धतीचा मुख्य दोष आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक शास्त्राचीं मूलभूत तत्त्वें विद्यार्थ्यांना व्याख्यानांच्या द्वारें शिकविल्यास पुष्कळ विषय थोडक्या वेळांत व मुलांवर फार बोजा न पडतां शिकवितां येतील. परंतु ह्या गोष्टीकडे विद्याधिकाऱ्यांचें मुळींच लक्ष गेलेलें दिसत नाहीं. सांप्रत शाळांत व कॉलेजांत लहानसहान गोष्टींस फाजील महत्त्व दिल्यामुळें विषयाचें मुख्यांग मुलांचे मनावर ठसत नाहीं. अर्थातच ह्या प्रकारानें मुलांच्या मनावर शिक्षणाचा इष्ट परिणाम होत नाहीं ह्यांत विशेष आश्चर्य वाटण्याचें प्रयोजन नाहीं.

शिक्षणविषयक प्लेटोचे खालील उद्गार विचार करण्यासारखे आहेत. Education is virtue from youth upwards, which makes a man early pursue the ideal perfection of citizenship and teaches him how rightly to rule and how to obey. This is the only training which would be characterised as education. That other sort of training which aims at the acquisition of wealth or bodily strength or more cleverness apart from intelligence and justice is mean and illiberal and is not worthy to be called education at all.

लबक साहेबांनीं इंग्लंडमधील शिक्षणपद्धतींतील दोष दाखविले आहेत ते आमच्याकडेही अक्षरशः लागू पडतात. ते रा. मोडक ह्यांच्याच शब्दांत आम्ही येथें देतों.

" लबक म्हणतो, विश्वविद्यालयाचा शिक्का मिरविणारांत मला असे विद्वान् आढळले आहेत कीं, त्यांना चंद्राला क्षयवृद्धि कां असते हें माहीत नाहीं; व पोंवळीं हा किडा आहे, व्हेल हा मासा आहे आणि वाघूळ हा पक्षी आहे असें ते समजतात. इंग्लंड हें आजपर्यंत अनेक वेळां जलमग्न झालें आहे, हें त्यांना खरें वाटत नाहीं. आणि हें जग होऊन काय तीं ६००० वर्षेंच झालीं, असें ते मानतात. असल्या खुळ्यांना विद्वान् कोणी म्हणावें ? बरें, व्यवहारज्ञान ? तेंही भोपळ्या एवढें ! मंडईत भाजीवाली माळीण चटदिशीं गंडे जुळवील तर यांना पाटी लेखण पाहिजे. "

## शत्रुमित्र.

सुखसाधनांत उत्तम मित्राची गणना करणें रास्त आहे. परंतु ग्रंथकर्त्यांनीं ह्या प्रकरणांत जीं प्रमेयें वाचकांपुढें मांडलीं आहेत त्यावरून पाहतां खोल विचार करून हें प्रकरण लिहिलें असावें असें वाटत नाहीं. त्याचप्रमाणें विवेचनपद्धतही सशास्त्र आहे असें दिसत नाहीं. ज्यानें मीठ खाल्लें त्याशीं दगलबाजी करूं नये हें सर्वथा उचित आहे. पण आपल्यावर दुसऱ्यांचे जे उपकार झाले आहेत त्या उपकारांच्या स्मृतीनें त्यांच्याशीं दगलबाजी करणें रास्त होत नाहीं. ह्या गोष्टीशीं स्नेहाचा संबंध कसा पोंचतो हें समजणें कठीण आहे. तसेंच शहाण्यानें स्नेह्याशीं वाद मांडूं नये असें ग्रंथकार सांगतात, पण तें कां कोण जाणें. पुढें, ज्याला स्नेही नसेल त्यानें वनश्रीवर प्रेम धरावें असा उपदेश ग्रंथकर्त्यांनीं वाचकांना केलेला आहे. परंतु स्नेह्याची जागा वनश्रीकडून भरली जाईल असें म्हणणें म्हणजे निर्जीव-सजीवांचा स्नेह होतो असें म्हणण्यासारखेंच आहे. ह्यापेक्षां ॲरिस्टॉटलनें ह्या विषयावर लिहिलेला निबंध ज्याला ह्याचा अभ्यास करावयाचा असेल त्यानें अवश्य वाचावा अशी आमची शिफारस आहे. स्नेही एकच असावा अशी कैद नाहीं, हेंही म्हणणें आम्हांस पसंत नाहीं. आम्ही ह्याच विषयावर विविधज्ञानविस्तार (पु.४३,अंक३) मध्यें स्वतंत्र निबंध लिहिला असल्यामुळें येथें त्यासंबंधीं ज्यास्त ऊहापोह करूं इच्छित नाहीं.

## श्रीमंती.

ग्रंथकर्त्यांची सुखाची मीमांसा चुकली असल्यामुळें श्रीमंतीला दूषण देतांनाही ग्रंथकार बरेच वहावलेले दिसतात. नाहीं, तर सुतारकाम बरें, पण, अमेरिकेचें प्रेसिडेंट होणें चांगलें नाहीं, हें वाक्य त्यांच्या लेखणींतून उतरलें नसतें. हिंदुस्थानांत आज सगळेच सुतार किंवा त्याच्याही खालचे मडकीं बनविणार बनले आहेत. तेव्हां येथील लोकांसारखे आनंदी लोक साऱ्या दुनियेंत आढळणार नाहींत, अशी ग्रंथकर्त्यांची समजूत आहे कीं काय नकळे. पैशाबद्दल तळमळ नसावी हें म्हणणें कोणासही मान्य होईल, परंतु आनंदाला श्रीमंती कारणीभूत होत नाहीं असें आम्हांस वाटत नाहीं. रा. मोडक यांनींच म्हटल्याप्रमाणें, श्रीमंत

असून त्याचे अंगीं दानशूरता, उपभोगांत नेमस्तपणा, दीर्घदृष्टि, इंद्रिय-दमन व आणखी बरेच सद्गुण असतील, तर त्याला श्रीमंती सुखावह होईल. असें जर आहे तर श्रीमंती असूनही उपरिनिर्दिष्ट सद्गुण आंगीं येतील असा उपदेश केलेला बरा. नाहीं तर समुद्रांत एखादवेळ आगबोट बुडते म्हणून आगबोटींत न बसणेंच बरें असें म्हणण्याइतकेंच तें वेडेपणाचें होईल. श्रीमंतीचें भेसूर स्वरूप आजपर्यंत पुष्कळांनीं रेखाटलें आहे. आतां तिचें हृदयंगमत्वच रेखाटणारीं माणसें पाहिजे आहेत. दुसऱ्यावर उपकार करण्याची संधि धनवानाला जितकी येईल तशी अठराविश्वे–दरिद्र्याला कशी मिळावी ? जितका मनुष्य थोर व श्रीमंत तितका तो अधिक परस्वाधीन होतो. "The greater one becomes, the less can he have his own way" हें नेपोलियनचें म्हणणें ध्यानांत ठेवून तदनुसार जर मोठीं माणसें वागतील तर मोठें होण्यांतच सार्थक आहे यांत संशय नाहीं. व्यासवाल्मिकींनीं जितकें दुःखहरण केलें आहे तितकें श्रीमंत माणसांकडून होणें शक्य नाहीं हेंही म्हणणें एकांगीच दिसतें. हें स्पष्ट करण्यासाठीं फार लांब जावयास नको. अॅन्ड्रयु कार्नेगीच्या औदार्यानें आज कितीतरी लोकांना सुखाचा लाभ होत आहे ! परदुःखहरणास दया आणि दुसऱ्याची जाण ह्यांच्या जोडगोळीशिवाय द्रव्य व्यर्थ आहे. पण द्रव्य नसेल तर नुसत्या शाब्दिक सहानुभूतीनें क्षुधिताची क्षुधा कशी निवारण होणार ? द्रव्यापासून शहाण्याला सुख होतें हेंच रा. मोडकांचें म्हणणें विशेष ग्राह्य दिसतें. बाकी द्रव्य संपादन करण्यास दगदग करावी लागते, द्रव्यापासून दुर्व्यसनें जडतात व अधःपात होतो, वगैरे विधानें एकदेशी होत. मी द्रव्य संपादन करतों तें लोकांकरितां आहे, वस्तुतः या जगांत माझ्याकरितां कांहींच करावयाचें नाहीं, समाजाच्या हिताकरितां परमेश्वरानें मला जन्मास घातलें आहे, हा उपदेश जर मुलांच्या मनावर लहानपणापासून उमटेल तर श्रीमंतीबद्दल विलाप करण्याचा असा प्रसंगच कोणाला येणार नाहीं.

## सृष्टीची भीषणता. सृष्टिप्रेम.

ह्या दोन प्रकरणांत ग्रंथकर्त्यानें आमच्या पूर्वजांमध्यें सृष्टयवलोकन व सृष्टिप्रेम उत्तम होतें असें सोदाहरण सिद्ध केलें आहे. रा. मोडक यांची वर्णनात्मक शक्ति किती अवर्णनीय व अनुपम आहे हें खालील उताऱ्यावरून दिसून येईल.

" अंतरिक्षाचाही हाच प्रकार. जे प्रेक्षावान् असतील अशांना अंतरिक्ष म्हणजे विस्मय, कौतुक व आनंद यांचें एक अक्षय्य निधानच आहे. दिवसास चंडरश्मीचें तें सर्वातिशायी, भास्वर, शुक्ल तेज आणि वैभव पाहून डोळे थक्कच होतात. पुढें संध्यासमय येऊन दिनमणि अस्ताचल-चूडावलम्बी झाले, म्हणजे तें दृष्टिक्षम होऊन त्यास अधिकच रमणीयता येते. वरें, अल्पावकाशानें ते साफ दृष्टिआड होत आहेत, तों शीतरश्मि निशानाथ आपल्या असंख्य चमकदार सहचारिणींसह गगनांगणांत आविर्भूत होऊन आपल्या शरीरनिर्वापक जोत्स्नेनें सर्व जगत् भरून काढितात ! तेव्हां तर असें वाटतें कीं, दिनमणीच्या कारकीर्दीतली मौज हिजपुढें कांहींच नाहीं. निखिलनेत्रानंदन, विश्वतापहरण अमृतांशु नभोमंडलांत उदित झालेला पाहून कविगण आणि प्रेमीजन यांना तर काय होतें तें होतें. आईला जसें नव्या नवसाच्या आपल्या लाडक्याला पाहून यावर काय शृंगार चढवूं आणि कोणते अलंकार घालूं असें वाटतें, तसें कविगणांना या आनंदकंदाला कोणती उपमा द्यावी आणि कोणती न द्यावी असें होऊन जातें. आणि मग त्या उल्हासभरांत कोणी हा दिग्वधूंचा क्रीडाकंदुक, कोणी स्वर्गगंगेतील राजहंस, कोणी ताराहारांतील मध्यमणि, कोणी शृंगाररक्षामणि इत्यादि रूपकें त्याजवर करितात. प्रेमीजनांना वाटतें कीं, या सुधाकराचें राज्य आहे तों असेल नसेल ती चैन करून घेऊं. असा हा चंद्रोदय निरुपम सुखदायी आहे. "

## सद्यःकाल.

सद्यःकालाचा आणि सुखाचा कसा संबंध पोहोंचतो हें एक मोठें कोडेंच आहे. तथापि सद्यःकाल ह्या सदराखालीं रा. मोडक ह्यांनीं सर्वसंमत होणाऱ्या गोष्टी सांगितल्या आहेत. आयुष्य अनिश्चित असल्यामुळें शहाण्यानें उद्यांवर विश्वास ठेवून आजच काय करणें तें करावें; मनुष्यजन्म दुर्मिळ आहे असें सतत ध्यानांत बाळगून दूरदृष्टीनें व निश्चयानें मानसानें चालावें.

## वैदग्ध्य.

मनुष्य कितीही पुस्तकी विद्वान् असला तरी पण त्याच्या अंगीं चातुर्य नसेल तर त्याच्या विद्वत्तेचा व्यवहारांत कांहीं उपयोग होणार नाहीं. म्हणून

वैदग्ध्याची ऊर्फ चातुर्याची थोरवी, प्रत्येक काम मागचा पुढचा विचार करून करावें, वगैरे नेहमींच्या बहुमान्य गोष्टी सांगून रा. मोडकांनीं अखेरीस एक मोठा सिद्धांत काढला आहे. त्यांत मात्र मतभेद होण्याचा संभव आहे. ते लिहितात, सन्मार्ग कोणता हें प्रत्येकानें आपल्या आत्मारामाला पुसत जावें. तो कधींही फसावयाचा नाहीं व दुसऱ्याचें ऐकावयाचा नाहीं. थोराचा आत्माराम चोरी हें दुष्कृत्य आहे असेंच बेमुर्वत त्याला सांगतो इतका तो स्पष्टवक्ता आहे इत्यादि. आम्हांस तर ही उक्ति फाजील व्यापक दिसते. पुण्य कोणतें, पाप कोणतें, धर्म कोणता, अधर्म कोणता, तसेंच कर्तव्य कोणतें, अकर्तव्य कोणतें, हें जर प्रत्येकाला अंतराकडून बिनचूक समजण्याजोगें असतें, तर जगामध्यें वादग्रस्त गोष्ट म्हणून कोणतीही झाली नसती. दुष्ट व ढोंगी लोक बाजूला सोडले तरी, प्रामाणिक मतभेद ज्यांचा कित्येक गोष्टींसंबंधानें होतो अशीं असंख्य माणसें दृष्टीस पडतात. अनेक जन्मांच्या मलीन संस्कारांनीं ज्यांचा आत्माराम मलीनच बनला आहे त्या आत्मारामामध्यें चांगलें आणि वाईट हें ठरविण्याची शक्ति नष्ट होते असें आम्हांस वाटतें. रा. मोडकांनींच दिलेलें चोराचें उदाहरण वस्तुस्थितीला अनुसरून आहे असें आम्हांला वाटत नाहीं. पिढ्यानुपिढ्या ज्यांच्या कुळांत दरवडे घालून दुसऱ्याची संपत्ति हरण करण्याचा संप्रदाय आहे अशा दरवडेखोरांना आपल्या कृत्यांबद्दल यकिंचित्ही वाईट न वाटतां उलट भूषणच वाटतें, असा अनुभव आहे. दरवडे घालणें हें आपलें पवित्रकर्म आहे असेंच हे लोक मानतात, व असल्या ह्या पवित्र (?) कार्यांत ते आपल्या मुलांनाही तरबेज करतात.

## राष्ट्राची शान्ति.

युरोपांतील वर्तमान युद्धप्रसंगामुळें 'राष्ट्रांची शान्ति' हा निबंध विशेष बोधप्रद होण्यासारखा आहे. सर्व राष्ट्रांनीं आपआपलीं शस्त्रास्त्रें, आयुधें वगैरे युद्धसामुग्रीला जलसमाधि दिल्याशिवाय मधून मधून असेच युद्धाचे प्रसंग येऊन गरीबांच्या प्राणांची, वित्ताची व स्वास्थ्याची हानि झाल्याशिवाय राहणार नाहीं.

## चित्तस्वास्थ्य.

या सदराखालीं पूर्वीच सांगितलेल्या गोष्टींची द्विरुक्तता झाल्यामुळें

विशेष लिहिण्यासारखें कांहीं नाहीं. वास्तविक पाहतां हें प्रकरण निराळें कां घातलें हें आम्हांस समजत नाहीं. तथापि या प्रकरणांत जातांजातां या विषयाकडे आम्हीं ज्या दृष्टीनें पाहतों त्याच दृष्टीनें रा. मोडक यांनीं ह्या विषयाचें विवेचन केलें आहे हें पाहून आम्हांस आनंद होणें स्वाभाविक आहे.

"जे कोणी स्वहितार्थच झटत असतात अशांचे यत्न विफल झाले असतां त्यांना फार वाईट वाटतें. परंतु परहितार्थ जे झटतात त्यांची गोष्ट वेगळी आहे. त्यांना यश आलें तर दुहेरी सुख होतें व प्रसंगीं न आलें तरी आप-स्वार्थ्याइतका खेद होत नाहीं."

चित्तस्वास्थ्याची अगर सुखाची गुरुकिल्ली रा. मोडक यांना अखेरीस सांपडली हें बरें झालें. हीच किल्ली त्यांच्या हातीं अगोदर लागली असती, अथवा या गोष्टीचें यथार्थ महत्त्व त्यांच्या लक्षांत आलें असतें, तर त्यांचें विवेचन निराळ्या धर्तीवर गेलें असतें अशी आम्हांस खात्री वाटते. मनु-ष्याला कर्म हें चुकत नाहीं एवढेंच नव्हे तर कर्म करण्याकरितांच ईश्वरानें मनुष्याला निर्माण केलें आहे; व कर्म करणें तें आत्मसुखासाठीं नसून समाजाकरितां करावयाचें असतें अशा भावनेनें प्रेरित झालेल्या मनुष्याला दुःखी कष्टी होण्याचे प्रसंग येत नाहींत, व त्याचें चित्तस्वास्थ्यही ढळत नाहीं.

## धर्म व ब्रह्मविद्या.

लबक साहेबांच्या ग्रंथाशीं ज्यांचा संबंध नाहीं अशीं धर्म व ब्रह्मविद्या हीं दोन प्रकरणें ग्रंथकर्त्यांनीं स्वतंत्र लिहिलीं आहेत. ग्रंथकर्ते हे विश्वविद्या-लयाचे पदवीधर असून आर्यधर्मावर त्यांची निःसीम भक्ति आहे. हें जर मेकॉले साहेबांच्या स्वर्गस्थ आत्म्याला कळण्याचा कांहीं मार्ग असेल तर असे धर्मनिष्ठ पदवीधर हिंदुस्थानांत अद्यापि निपजत आहेत हें ऐकून अगर वाचून निराशेनें त्यांच्या मनाची काय स्थिति होईल याची कल्पनाच केली पाहिजे. कारण, इंग्लिश शिक्षणामुळें थोडक्याच अवधींत सर्व भारत-वर्षीय लोक ख्रिस्ताचे अनुयायी होतील असें त्यांनीं भाकीत करून ठेविलें होतें.

"The effect of this (English) Education on the Hindoos is prodigious. No Hindoo who had received an English Education ever remains sincerely attached to his religion. Some continue

to prefer it as a matter of policy, but many profess themselves pure Diess. Some embrace Christianity. It is my firm belief that if our plans of Education are follwed up, there will not be a single idolator among the respectable classes in Bengal thirty years hence.

*Life of Macaulay.*

रा. मोडक यांचें धर्मावरील व्याख्यान फारच बोधप्रद असून संग्रहणीय आहे. धर्म हा ईश्वरप्रणीत पाहिजे. मनुष्याचा तेथें अधिकारच नाहीं. म्हणून परमात्म्यानें भिन्न भिन्न देशांत भिन्न भिन्न कालीं अपेक्षेनुरूप अवतार घेऊन मनुष्यांत धर्मस्थापना केली आहे, हें मानवजातीचें मोठेंच भाग्य होय, असें रा. मोडक यांचें मत आहे.

**वेदः स्मृतिः सदाचारः । स्वस्य च प्रियमात्मनः ॥**
**एतश्चतुर्विधं प्राहुः । साक्षाद्धर्मस्य लक्षणम् ॥**

असें धर्माचें लक्षण मनूच्या शब्दांत त्यांनीं दिलें आहे. पुढें अंतरंग व बहिरंग असे दोन धर्माचे निराळे भाग करून " आचारप्रभवोधर्मः " असें त्यांनीं बहिरंगाचें व्याख्यान केलें आहे. व पुनः एकदां मनूच्याच शब्दांत भूतलावरील कोणत्याही लोकांना सारखींच लागू पडतील अशीं धर्माचीं मूलभूत तत्वें, (" अहिंसा सत्यमस्तेयं । शौचमिंद्रियनिग्रहः ॥ एतत्सामासिकं धर्म्यं। चातुर्वर्ण्यं ब्रवीन्मनुः ॥") देऊन ह्या प्रत्येक तत्त्वाचें उद्घाटन विस्तरशः केलें आहे. व त्यांनीं जो शेवटीं निष्कर्ष काढिला आहे त्याच्याशीं आमचें पूर्ण ऐक्य आहे. या प्रकारच्या या " पांचही अहिंसांचें या भूतलावरील प्रत्येक मनुष्य जर यथाशास्त्र अवलंबन करील तर आम्हांस वाटतें पृथ्वीवरील निम्मे दुःखराशी नाहींशीच होईल. " " शेवटली धर्माज्ञा म्हणजे ' इंद्रियनिग्रह. ' कोणी सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करील तर त्यास असें आढळून येईल कीं, मानवी व्यवहारांतील हजारों अनर्थ इंद्रियांच्या अनिग्रहामुळेंच उद्भवतात. "

आमचा ग्रंथकर्त्याशीं मतभेद आहे तो त्यांनीं केलेल्या मनूच्या श्लोकाच्या अर्थाबद्दल होय. आमच्या मतें वेद, स्मृति, सदाचार व आपली सदसद्विवेकबुद्धि हीं चार धर्माचीं उगमस्थानें असून तीं प्रत्येकीं स्वतंत्र आहेत. विष्णुपुराणांतही मनूप्रमाणेंच धर्माची व्याख्या केली आहे. व ह्या व्यापक

लक्षणामुळेंच आर्य धर्माचा लोप अद्यापि झाला नाहीं अशी आमची समजूत आहे. इतर–धर्मीयांना त्यांच्या धर्माचा उगम त्यांच्या त्यांच्या वेदांत म्हणजे धर्मपुस्तकांतच असावयाचा. परंतु कोणताही धर्मसंस्थापक त्या त्या कालाच्या अपेक्षानुरूप धर्माज्ञा करून ठेवतो. परंतु हें कालचक्र सदा फिरतें असल्यामुळें, एका काळाला उपयोगी पडणारे नियम अन्यकाळीं निरुपयोगी होतात व अशामुळें रिकामी झालेली जागा दुसऱ्या कशानें तरी भरून काढणें अवश्य पडतें. परंतु तसें करण्याला इतर कांहीं साधन नसल्यामुळें धर्मग्रंथ वाण्याच्या दुकानांत नेऊन टाकण्याच्या किंमतीचेच होतात. व जाणून बुजून धर्माविरुद्ध आचरण करण्याचे प्रसंग येत गेल्यामुळें धर्मावरील श्रद्धा उत्तरोत्तर लय पावते. आर्य धर्माची गोष्ट याहून निराळी आहे. सदाचार म्हणजे चांगल्या लोकांनीं घालून दिलेला आचार हा धर्मस्थानापन्न होऊन बसल्यामुळें आर्यधर्मातील रहस्य नेहमीं दृढमूल राहतें. वेद, स्मृति, श्रेष्ठ लोकांचें वर्तन व आपली मनोदेवता ह्या चार गोष्टींचा विचार करून प्रत्येकानें प्रसंग पडेल तेव्हां धर्म कोणता व अधर्म कोणता याचा निर्णय केला पाहिजे. एक दोन उदाहरणें घेऊन हें अधिक स्पष्ट करितां येईल. परदेशगमन स्मृतिकारांना मान्य नसलें तरी सांप्रत काळीं तें केल्याशिवाय कोणासही गत्यंतर नाहीं; व हल्लीं आमच्यांतील श्रेष्ठांचा तो सर्वसंमत आचार होऊन बसला आहे. अशा वेळीं वेद आणि स्मृति एकीकडे ठेवून सदाचार व " स्वस्यच प्रियमात्मनः " ह्याखालीं परधर्मीयांच्या देशांत जाऊन येणारांचें वर्तन धर्मबाह्य नाहीं असेंच ठरविलें पाहिजे. दुसरें उदाहरण आपण पुनर्विवाहाचें घेऊं. शास्त्रांत जरी पुनर्विवाहाला मनाई असली तरी समाजांतील सच्छील माणसांना विधवाविवाह मान्य होऊं लागले व त्यांपैकीं आचारसंपन्न माणसें–धर्मलंड मात्र नव्हेत–स्वतः विधवाविवाह प्रचारांत आणतील, तेव्हां तें कृत्य मनूच्या व्याख्येप्रमाणें धर्मबाह्य म्हणतां येणार नाहीं. " म्हणून वेद आणि स्मृति या उभयांस धरून, कालानुसार शास्त्यांनीं घातलेले परिपाठ, व वैकल्पिक पक्ष असतां आपणांस हितकर असा पक्ष, या चार गोष्टींचा धर्मांत समावेश आहे. " ह्यामध्यें ह्या ' उभयांस धरून ' व ' वैकल्पिक पक्ष असतां ' हे शब्द मूळांत नसतां ग्रंथकर्त्यांनीं आपण होऊन घातलेले आहेत. यामुळें धर्माची व्याख्या निष्कारण संकुचित झाली आहे. ह्या श्लोकाचा प्राचीन टीका-

कारांनीं रा. मोडकांप्रमाणेंच अर्थ केला आहे हें आम्हांस माहीत आहे. परंतु प्राचीन टीकाकारांचें ज्ञानक्षेत्र हल्लींइतकें विस्तृत नसल्यामुळें त्यांच्या हातून अशी चूक होणें शक्य आहे. पण सांप्रत कोणच्याही शास्त्रांत तुलनात्मक पद्धतीचा अंगिकार जगन्मान्य झाला असून मोडकांनीं तो कां झुगारून द्यावा हें समजत नाहीं. शिवाय अर्थकरण्याचे जे कायद्यांत नियम आहेत ते पाहिले असतांहि, कारण नसतां, जे शब्द मुळांत नाहींत ते तेथें घुसडून देण्याचा अधिकार कोणास आहे असें आम्हांस वाटत नाहीं. ह्यावर जितकें लिहावें तितकें थोडेंच असल्यामुळें आटोपतेंच घेणें शहाणपणाचें आहे. फक्त ही अर्थ करण्याची पद्धत आम्हांस मान्य नाहीं एवढें येथें नमूद केलें म्हणजे पुरे.

ह्याप्रमाणें सदर ग्रंथासंबंधानें आम्हीं सविस्तर निरीक्षण केलें आहे. ग्रंथांत अनेक विषय आल्यामुळें त्यासंबंधीं मतभेद होणें एका अर्थीं अपरिहार्यच आहे. तथापि हा ग्रन्थ वाचणारास बहुश्रुत करून सोडील ह्यांत संदेह नाहीं. सदरहु पुस्तक शाळांत आणि कॉलेजांत विद्यार्थ्यांच्या हातीं देण्यास सर्वथा योग्य आहे. पुस्तकाचें बहिरंगही मनोरम आहे. चालू पिढींत काय उणीवा आहेत व त्या दूर कशा करतां येतील ह्या एका दृष्टीनें रा. मोडक यांनीं आपला ग्रन्थ लिहिला असता, तर त्यांची दिशाभूल झाली नसती. पण त्यांनीं आपल्यापुढें निराळेंच ध्येय ठेवल्यामुळें ह्यापेक्षां सरस ग्रंथ उतरणें शक्यच नव्हतें.

# १४ प्राक्कालीन अधातुरूप विनिमयसामान्यें.



पैसा म्हटला म्हणजे धातुमय असला पाहिजे असा सांप्रत सर्वसाधारण समज झालेला दिसतो. ह्याचें कारण उघडच आहे कीं, आपल्याला लहानपणापासून धातूचा पैसा वापरण्याची संवय झालेली आहे. कोणत्यानाकोणत्या तरी धातूहून भिन्न पदार्थ पैशादाखल वापरलेला आपण फारसा पहात नाहीं. कदाचित् अन्य पदार्थांचा उपयोग पैशादाखल केलेला पाहण्यांत आलाच तर, सर्वत्र व मुख्यत्वेंकरून धातुमय पैसा वापरण्याची संवय हाडीं खिळल्यामुळें, अन्य द्रव्याच्या पैशाच्या उपपत्तीचा विचार आपण कधीं करीत नाहीं. आपल्या मनावर धातुमय पैशाचा पगडा इतका बसला आहे कीं, अन्य द्रव्याचा ह्या कामीं कधीं उपयोग झाला असेल ही कल्पना सुद्धां आपल्या मनाला कधीं शिवत नाहीं. पैशाचा अग्रमान धातूनींच जगाच्या आरंभापासून घेतला असावा असा समज आपला बनतो. पण वास्तविक प्रकार पाहूं गेलें असतां अगदीं उलट आहे. धातूचा पैसा नंतरचा असून समाजाच्या बाल्यावस्थेंत तो वापरण्याचें लोकांस माहीत नव्हतें असें शोधाअंतीं समजतें.

ह्या विनिमयसामान्याचें ( पैशाचें ) द्रव्य जगाच्या निरनिराळ्या भागांत व निरनिराळ्या काळीं वेगवेगळें होतें. चामडें, गुरें, ढोरें, धान्य, फळें, कापड, तेल, मांस, अंडीं, कवड्या, तंबाखु, हातऱ्या, पिसें, दगड, मीठ, खिळे इत्यादि नानातऱ्हेच्या पदार्थांचा पैशाच्या कामीं आजवर उपयोग झालेला आहे व अद्यापिहि कांहीं ठिकाणीं थोड्याबहुत प्रमाणावर होत आहे. ह्या विषयावरील इंग्रेजी ग्रंथांतून इतर देशांत प्राचीन व अर्वाचीन काळीं प्रचलित असलेल्या अशा प्रकारच्या विनिमयसामान्याचीं उदाहरणें भरपूर दिलीं आहेत. आपल्या देशांतसुद्धां अशा मालांच्याचीं उदाहरणें आढळतात हें दाखविण्याचा ह्या लहानशा निबंधाचा मुख्य उद्देश आहे. हिंदुस्थानांत

फारं प्राचीन काळापासून, किंबहुना ऋग्वेदापासूनहि सोन्यारुप्याचा पैसा वापरण्याचें लोकांस माहीत होतें असें दिसतें. तथापि त्याच्याबरोबर इतर पदार्थांचा सुद्धां उपयोग विनिमयसामान्य ( medium of exchange ) म्हणून करीत असत. हिंदुस्थानांत पूर्वी कांहीं पुढें गेलेले व कांहीं मागासलेले असे दोनही प्रकारचे समाज असल्यामुळें घातूंबरोबर अन्य द्रव्यांचाहि पैशादाखल उपयोग केलेला आढळून येतो.

मनुष्यांनीं प्रथम आपापल्या स्थितीला अनुरूप अशा पदार्थांचा उपयोग पैशाच्या कामीं केलेला असावा; व तीं स्थिति बदलल्यावर सुद्धां तो पदार्थ पैशाच्या रूपानें पुढें कांहीं काल चालू राहावा हें स्वाभाविक आहे. शिकारी स्थितींत, दुसरा पदार्थ विकत घेण्यास मनुष्याजवळ मारून आणलेली शिकार काय ती असणार तेव्हां मारलेल्या प्राण्यांचें चामडें हेंच काय तें इष्ट पदार्थ विकत घेण्याचें साधन त्याच्याजवळ असतें. ह्यामुळें चामड्याचा पैसा चालू झाला असावा असें वाटतें. असें नाणें चालू होतें अशाबद्दल प्राचीन ग्रंथांतून उल्लेख केलेला आढळतो. आपल्या हिंदुस्थानांत चामड्याचें नाणें चालत असे ह्यास ज्ञानेश्वरींतील खालील उतारा प्रमाण आहे. राजाज्ञेचीं अक्षरें आहाती । तियें चामा एका जया पडती । तया चामाकाठीं जोडती । सकळ वस्तु ॥ वांचूनि सोनें रूपें प्रमाण नोहे । एथ राजाज्ञाचि समर्थ आहे । तेंचि चाम एक जैं लाहे । तेणें विकती आघवीं ॥ ज्ञानेश्वरी अ० ९ श्लोक ४५३।५४. ह्या उताऱ्यावरून राजाच्या शिक्याचें चामड्याचें नाणें हिंदुस्थानांतील कांहीं समाजांत ज्ञानेश्वराच्या वेळीं चालू असावें असें स्पष्ट दिसतें.

शिकारी अवस्था जाऊन मनुष्य गुरेंढोरें बाळगून राहूं लागला म्हणजे त्यांच्या सहाय्यानें त्यानें विनिमयव्यवहार करावा हें साहजिक आहे. होमरच्या काव्यांत डायमंडच्या शस्त्रांची किंमत नऊ बैल व युद्धांत पकडून आणलेल्या कुशल स्त्रीची किंमत चार बैल होते असें वर्णन आहे. आपल्या इकडेही पूर्वी विनिमय करण्याकरितां चतुष्पाद जनावरांचा उपयोग करीत असत असें मानण्यास जागा आहे. पश्वभिरश्वैः क्रीता पश्वाश्वा ( कौमुदी ४।१।२२ )—पांच घोडे देऊन विकत घेतलेली—गोपुच्छेन क्रीतं गोपुच्छिकम् ( कौ० ५।१।३७ )—गाय देऊन विकत घेतलेलें; तसेंच गवा क्रीता । अश्वेन क्रीता ( पतंजलि ४।१।५० ) व व पश्वमिर्गोभिः क्रीतः

पञ्चगुः । दशगुः ( काशिका ५।४।९२ ) हीं व अशाप्रकारचीं दुसरीं उदाहरणें दिलेलीं आहेत. ह्या उदाहरणांवरून गायी, घोडे हीं विनिमयसामान्यें होतीं असें सिद्ध होतें. शिवाय दक्षिणाशब्द पूर्वी गायीला लावीत असत व लाखों गाई दक्षिणा म्हणून ब्राह्मणाला देत असत हें पुराणावरून उघड होतें. त्यावेळेस गाय जर विनिमयसामान्य नसती तर एकाच ब्राह्मणाला हजारों गायींची दक्षिणा कोणी दिली नसती. कारण, अशा दानानें त्या ब्राह्मणाचें हित न होतां उलट अनहित होण्याचाच संभव जास्त. एवढ्या गाईंना खावयास घालण्यांतच त्या बिचाऱ्याच्या पूर्वसंचित सर्वस्वाचा फडशा उडणार, ह्यावरून पूर्वी गाईचा पैशाप्रमाणें उपयोग करीत असत असें अनुमान करणें वावगें होणार नाहीं. शेतकी करूं लागला म्हणजे तो अर्थात् आपल्या श्रमानें उत्पन्न केलेल्या धान्यानें इष्ट पदार्थ खरेदी करूं शकतो. ह्याप्रमाणें धान्याचा उपयोग पैशाच्या कामीं होऊं लागला. नारवे देशांत धान्य पेट्यांतून ठेवतात व कर्जाऊ देताघेतात. आपल्या इकडेही हा धान्याचा पैसा प्राचीन काळीं चालू होता व त्याच्या साहाय्यानें लोक देवघेव करीत असत असें कौमुदींतल्याच खालीं दिलेल्या उदाहरणांवरून दिसतें. द्वाभ्यामञ्जलिभ्यां क्रीतः द्व्ञ्जलिः ( ५।४।१०२ )—दोन ओंजळी ( धान्य ) देऊन विकत घेतलेला; द्वाभ्यां-शूर्पाभ्यां क्रीतं द्विशूर्पं ( ७।३।१७ )–दोन सुपें ( धान्य इत्यादि ) घालून विकत घेतलेला; पञ्चभिर्गोणीभिः क्रीतः पटः पञ्चगोणिः ( १।२।५० )–पांच गोणी ( धान्य ) देऊन विकत घेतलेला पट; मुद्गैः क्रीतं मौद्गिकं ( काशिका ५।१।३७ ) मूग देऊन विकत घेतलेलें तें मौद्गिक. ह्यापुढें, मनुष्य यन्त्रसाध्य सामान तयार करूं लागला म्हणजे त्याचाहि खरेदीच्या कामीं तो उपयोग करतो. हातऱ्या, खिळे, घडीव दगड ह्यांचा उपयोग पैशादाखल इतर देशांतून केलेला आहे हें मागें सांगितलेंच आहे. ह्याच्या जोडीला आपल्या देशांत होड्यांचा उपयोग करीत असत, हें पुढच्या उदाहरणावरून समजेल. नावो द्विगोः ( ५।४।९९ ) ह्या पाणिनीच्या सूत्रावर " पञ्चभिर्नौभिः क्रीतः पञ्चनौः "–पांच नावा देऊन विकत घेतलेला–असें उदाहरण दिलेलें आहे. ह्यावरून नौकांच्या साधनानें लोकांचा विनिमयव्यवहार चालत असे असें होतें. नौकाप्रमाणेंच वस्त्रांचा व सुयांचा उपयोग होत होता. उदाहरण, वस्त्रेण क्रीयते । वस्त्रानें विकत घेतात, तेथें

वस्त्रक्रीतिः असें म्हणतात ( ४।१।५० काशिका ); पञ्चभिः सूचीभिः क्रीतः पञ्चसूचिः । दशसूचिः । पांच सुया देऊन विकत घेतलेलें त्यास पञ्चसूचि व दहा सुयांनीं विकत घेतलेलें त्यास दशसूची म्हणतात (१।२।५० काशिका) आजमित्तीसहि पुण्यास व अन्यत्र कांहीं ठिकाणीं कवड्या बारीकसारीक व्यवहारांत चालू आहेत. ह्या कवड्या प्रथम कशा उपयोगांत आल्या हें ठरविण्यास नक्की प्रमाण नाहीं. पण इतर ज्या ठिकाणीं त्या चालू आहेत त्या देशच्या लोकांच्या स्थितीवरून असें वाटतें कीं, अंगभूषण म्हणून त्यांचा उपयोग होत असल्यामुळें, लोक त्यांची किंमत फार मानीत व त्यावरूनच पुढें त्यांचा पैशादाखल उपयोग झाला असावा.

फळांचा विनियोग पैशाच्या कामीं करीत असत हें मागें सांगितलें आहे. हिंदुस्थानांत व गुजरायेंत बदाम किरकोळ देवघेवींत चालतात हें पुष्कळ लोकांस ठाऊक असेलच. ह्याप्रमाणें नानाविध वस्तूंचा विनियोग पैशांच्या कामीं इतर देशाप्रमाणें ह्याही देशांत होत होता हें वर दिलेल्या उदाहरणांवरून दिसून येईल.

इष्टवस्तुप्राप्त्यर्थ मनुष्यानें जड पदार्थ व पशु ह्यांचा उपयोग केला तसा मानवी प्राण्याचाही करावयास कमी केलें नाहीं. प्राचीन काळीं गुलामगिरी सर्वत्र प्रचारांत असल्यामुळें गुलाम देऊन पाहिजे तो जिन्नस खरेदी करण्याची चाल स्वाभाविकच पडली असावी. त्याप्रमाणें, हिंदुस्थानांत सुद्धां हे गुलामी पैसे लोकांनीं चालविले असें दिसतें. उदाहरण, द्वाभ्यां पुरुषाभ्यां क्रीता द्विपुरुषा । त्रिपुरुषा ( ४।१।२४ काशिका ) दोन पुरुषांला विकत घेतलेली ती द्विपुरुषा; तीन पुरुषांनीं विकत घेतलेली ती त्रिपुरुषा.

वरील उदाहरणांवरून हिंदुस्थानांतील प्राचीन समाजाचें स्वरूपही लक्षांत येईल व जगाच्या कोणत्याहि भागावरील समाजाला स्वाभाविक उत्क्रांति होत असतां विवक्षित परिस्थितींतून जावेंच लागतें असेंहि कळून येईल.

11 JAN 1955

# १५. धातुरूप विनिमयसामान्यें अथवा नाणें.

"प्राकालीन अधातुरूप विनिमयसामान्यें" या छोट्याशा निबंधांत अधात्वात्मक पदार्थांचा पैशाच्या कामीं विनियोग होत असे असें सांगितलें. हा सिद्धांत जुन्या ग्रंथांच्या परिशीलनानें अधिकाधिकच दृढ होतो. ज्योतिष्टोम यज्ञांत एक वर्षाची रक्तवर्णा व पिंगाक्षी अशी कालवड देऊन सोमवल्ली विकत घ्यावी अशी अनुज्ञा आहे.

"अरुणया पिंगाक्ष्यैकहायन्या सोमं क्रीणाति"

ह्यावरून पश्वादिकांचा विनिमयाच्या कामीं उपयोग होत असे हें स्पष्ट आहे. त्याचप्रमाणें "धनं तु गोधने वित्ते" (विश्व) व "गवादिकं जीवधनम्" (त्रिकाण्डशेष) ह्या कोशद्वयावरून वरील गोष्टीस प्रमाण मिळतें. वरील वाक्यांतील "अरुणया" ह्या शब्दाचा संबंध कोठें आहे ह्याचा ऊहापोह करीत असतां जैमिनीयन्यायमालाविस्तरांत "वाससा क्रीणाति" "अजया क्रीणाति" हीं प्रसंगवशात् उदाहरणें दिलेलीं आहेत. ह्या उदाहरणांवरूनही मागील निबंधांत केलेल्या विवेचनाला चांगली बळकटी येते. तेव्हां धातूंहून भिन्न अशा नानाविध पदार्थांचा विनिमयसामान्यादाखल उपयोग होत होता ह्यांत संदेह नाहीं.

तथापि एवढ्यावरून क्रयविक्रयांत धातूंची मदत घेण्याचें पूर्वीच्या आर्य लोकांस माहीत नव्हतें असें मात्र नाहीं. सोनें, रुपें, तांबें ह्यांचा व्यवहारांत सर्वत्र उपयोग होत असे. ह्या कामीं धातूंचा उपयोग आजपर्यंत दोन प्रकारांनीं करण्यांत आला आहे. प्रथमतः हल्लींप्रमाणें धातूंचें नाणें पाडण्याची कल्पना लोकांस सुचली नव्हती. ही क्लृप्ति व्यवहारांत येण्यापूर्वी धातूंचे नुसते तुकडे वजन करून देत घेत असत. ह्या पद्धतीस आपण तोलनात्मक चलनपद्धति म्हणूं. नाणें झाल्यानंतर लोक अर्थात् त्याची संख्या मोजूं लागले. तेव्हां ह्यास आपण संख्यात्मक चलनपद्धति असें नांव देऊं. दुसरी

पद्धति पहिल्या पद्धतीनंतर अमलांत आली असें मानण्यास पुष्कळ पुरावा आहे.

नाण्याची कल्पना ही मूळची आर्य लोकांची नसून ती त्यांनीं दुसऱ्या लोकांची उचलली असें म्हणावें लागतें. खुद्द नाणें हा शब्द परकी भाषेतला आहे. संस्कृतमध्यें नाणें ह्यास नाणक ही संज्ञा आहे. पण नाणक हा शब्द कोणत्याही संस्कृत धातूपासून बनलेला नाहीं हें उघड आहे. अमरकोशांत हा शब्द सांपडत नाहीं. मनुस्मृतींतही तो आढळत नाहीं. याज्ञवल्क्य स्मृतींत मात्र ह्या शब्दाचा उपयोग केलेला दिसतो व त्या उपयोगावरून तत्कालीं नाणीं चांगलींच प्रचारांत होतीं असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं.

"तुलाशासनमानानां कूटकृन्नाणकस्यच।
एभिश्च व्यवहर्ता यः स दाप्यो दण्डमुत्तमम्" ॥

ह्यांत बनावट नाणें करण्याला सर्वांत मोठा दण्ड सांगितला आहे. त्याचप्रमाणें—

"अकूटं कूटकं ब्रूते कूटं यश्चाप्यकूटकम्।
स नाणकपरीक्षी तु दाप्य उत्तमसाहसम्" ॥

ह्या श्लोकांत खोटें नाणें असतां तें खरें आहे असें सांगणारा व खरें असतां खोटें आहे म्हणणारा नाणकपरीक्षी मोठ्या शिक्षेस पात्र होतो असें सांगितलें आहे. ह्या वचनावरून याज्ञवल्क्य स्मृतीच्या वेळेस नाण्यांचा प्रसार सर्वत्र फैलावला होता असें स्पष्ट होतें; व ह्यावरून मनु व याज्ञवल्क्य ह्या दोन स्मृतींमध्यें बराच काल गेला असला पाहिजे असें अनुमान निघतें. मनूमध्यें नाणक शब्द नाहीं हें वर सांगितलेंच आहे. परंतु ह्या स्मृतींतील एका श्लोकावर सर्वज्ञ नारायणाची जी टीका आहे ती ह्या विषयासंबंधानें लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

"नान्यदन्येन संसृष्टरूपं विक्रयमर्हति।
न चासारं न च न्यूनं तद्धूरेण तिरोहितम्" ॥

अ० ८ श्लोक २०३.

ह्यांतील प्रथम चरणाचा अर्थ बहुतेक टीकाकारांनीं एकच उदाहरण घेऊन केलेला आहे. कुंकुमादि द्रव्यांत कुसुंभादि कुद्रव्यें मिसळून कुंकू म्हणून विकण्यास ठेवूं नये हा अर्थ मेधातिथि, कुल्लूक, राघवानंद, नंदन

ह्यांनीं दिला आहे. इतक्या टीकाकारांनीं दिलेलें उदाहरण सर्वज्ञ नारायणानें सोडून देऊन नाणकविषयक उदाहरण घेतलें आहे.

" नान्यदन्येन विजातीयेन संसृष्टं रूपं नाणकं विक्रयमर्हति "

दुसऱ्या धातूची भेसळ केलेलें नाणें विक्रीस ठेवूं नये हा ह्याचा अर्थ होय. ह्यावरून सर्वज्ञ नारायणाला नाण्याची ओळख होती हें उघड आहे. पण सर्वज्ञ नारायणाची टीका बरीच अर्वाचीन असावी असें मानतात.

मृच्छकटिक नाटकांत नाणक शब्द शकाराच्या तोंडीं घातला आहे ही गोष्टसुद्धां विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. शकारानें वसंतसेनेला नाणक-मूषिका व चारुदत्ताला निर्नाणक म्हटलें आहे. दुसऱ्या कोणत्याही पात्राच्या भाषणांत हा शब्द घातला नाहीं. उलट जेथें प्रसंग आला तेथें आर्यपरिमाणद्योतक सुवर्ण शब्दच वापरला आहे. ह्यावरून मृच्छकटिकाच्या वेळेस नाणक शब्दाचा प्रवेश संस्कृत भाषेंत अव्याहत झालेला नसावा असें वाटतें. शकारानेंसुद्धां वसंतसेनेला वश करण्याच्या हेतूनें पैशाची लालूच दाखविली त्यावेळेस नाणक शब्द वापरला नाहीं. " कार्षापणं ते ददामि " असें म्हटलें आहे ह्यावरून नाणक हा क्षुद्रद्रव्यवाचक शब्द असावा असें अनुमान करण्यास जागा आहे, व त्यावरूनच त्यावेळीं नाणीं फारशीं प्रचारांत नव्हतीं असें समजणें भाग पडतें.

**लोकसंव्यवहारार्थं याः संज्ञाः प्रथिता भुवि।**
**ताम्ररूप्यसुवर्णानां ताः प्रवक्ष्याम्यशेषतः॥**

अ० ८, श्लो० १३१.

असें म्हणून मनूनें जें कोष्टक दिलें आहे त्यांत नाण्याचा मुळींच उल्लेख नाहीं. मनूचें सर्व कोष्टक वजनी आहे; तें येणेंप्रमाणें.

३ यव=१ गुंज.
५ गुंजा=१ मासा.
१६ मासे=१ सुवर्ण.
४ सुवर्ण=१ पल.
१० पलें=१ धरण.

२ गुंजा=१ रुप्याचा मासा.
१६ रु. मासे=१ रु. धरण अथवा पुराण.
१० रु. धरण=१ रु. शतमान.
४ सुवर्ण=१ निष्क.

८० गुंजा
१ कर्ष
१६ मासे } तांबें } =१ कार्षापण किंवा पण [ तांब्याचा ].

व्यवहारांत जेवढ्या एतद्विषयक संज्ञा प्रचलित होत्या तेवढ्या सर्व मनूनें दिल्या आहेत. नाणीं व त्यांचीं निरनिराळीं दुसरीं परिमाणें जर तेव्हां अस्तित्वांत असतीं तर ह्यांत त्यांचें कोष्टक आल्याशिवाय राहतेंना. शिवाय " ताम्ररूप्यसुवर्णानां याः पणादि संज्ञाः क्रयविक्रयादिलोकव्यवहारार्थं प्रसिद्धास्ता दण्डाद्युपयोगार्थं साकल्येन कथयिष्यामि " अशी टीका ह्यावरील मनुस्मृतींतील श्लोकावर कुल्लूकानें केली आहे. म्हणजे क्रयविक्रयाकरितां ह्याखेरीज दुसरें परिमाण नव्हतें हें ह्यावरून व्यक्त होतें. तसेंच राजानें अपराध्यास अमुक दंड करावा असें मनूनें सांगितलें आहे व पण म्हणजे मनूच्या कोष्टकाप्रमाणें १६ मासे वजनाचा तांब्याचा तुकडा होय. अमरकोशांत वैश्यवर्गांत खालीं लिहिल्याप्रमाणें कोष्टक दिलें आहे.

५ गुंजा=१ मासा.
१६ मासे=१ अक्ष किंवा कर्ष.
४ कर्ष=१ पल.

१ सोन्याचा अक्ष किंवा कर्ष } =१ सुवर्ण अथवा बिस्त.

१ सो. पल=१ कुरुबिस्त.
१०० पल=१ तुला.
२० तुला=१ भार.
१० भार=१ आचित.
१ ताम्रपण=१ कार्षापण किंवा कार्षिक.

ह्यावर " इति तुलामानमुक्तम् " अशी रामाश्रमी टीका आहे. ह्यानंतर प्रस्थमान दिलें आहे. पण नाणकवाची शब्द कोठेंही नाहींत. ह्यावरून अमरसिंहाच्या वेळेस आर्य लोकांची नाण्याची पद्धति स्वतंत्र नव्हती ह्यांत बिलकुल संशय नाहीं. आर्य लोकांची स्वतंत्र पद्धति असें म्हणण्याचें कारण हिंदुस्थानांत त्यावेळीं परकी म्हणजे ग्रीक वगैरे लोकांचें नाणें चालत असलें

पाहिजे. नानार्थ वर्गांत " दीनारेऽपिच निष्कोऽस्त्री " म्हणजे दीनाराला निष्क शब्द वापरतात असें म्हटलें आहे. दीनार हें अरेबिक व ग्रीक नाणें होतें ह्याबद्दल वाद नाहीं. त्याचप्रमाणें अथर्वपरिशिष्टासारख्या जुन्या ग्रंथांतून धातूंचीं वजनी कोष्टकें आहेत, पण नाण्याबद्दल उल्लेख नाहीं. तात्पर्य, पुढें नाणें प्रचारांत इतकें आलें कीं, कविदेखील अंगीकृत विषय व्यक्त करून दाखविण्याच्या कामीं त्याचा उपयोग करूं लागले. उदाहरण:—

" जेंवि सोनें नाणें विरहित आपुलेंपणें नव्हे विपरीत. "

पासष्टी ओवी ३९. टीका १९४.

इतका प्रसार ३००० वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत झालेला दिसत नाहीं. भास्कराचार्यांनीं लीलावती लिहिली, तेव्हां क्रयविक्रय नाण्यांत होत असे असें स्पष्ट दिसतें; कारण वजनाचीं परिमाणें देऊन पैशाचें कोष्टकही त्यांनीं दिलें आहे, तें येणेंप्रमाणें.

वराटकानां दशकद्वयं यत्सा काकिणी ताश्च पणश्चतस्रः ।
ते षोडश द्रम्म इहावगम्यो द्रम्मैस्तथा षोडशभिश्च निष्कः ॥

ह्यांत दिलेलें कोष्टक असें बसतें.

२० कवड्या =१ दमडी.
४ दमड्या =१ पैसा.
१६ पैसे =१ द्रम्म.
१६ द्रम्म =१ निष्क.

एवढा वेळ झालेल्या विवेचनावरून इतकें सिद्ध झालें कीं, नाण्याची कल्पना आपण परकी लोकांपासून घेतली आहे. ती मुळची आपली नव्हती. ग्रीक लोकांचीं नाणीं हिंदु लोक वापरीत असत. वरील भास्कराचार्यांच्या कोष्टकांतील द्रम्म हें नाणें व ग्रीक नाणें ( Drachma ) ड्रक्मा हीं एकच होत. व्यवहारांत हें नाणें चालू होतें असें मानण्यास भास्कराचार्यांशिवाय आणखी पंचतंत्राचा आधार आहे तो असा:—

" ततश्च द्रम्मानादाय गुर्जरग्रामे गत्वा करभाः संक्रीताः "

तन्त्र ४.

त्याचप्रमाणें काकिणी हें व्यवहार्य नाणें होतें असें दशकुमारचरित्रावरून दिसतें. उदाहरण:—

**' एभिर्लब्धाः काकिणीर्दत्वा शाकं घृतं दधि तैलमामलकं चिञ्चाफलं च यथालाभमानय "**

पुतळ्या तर जशाच्या तशाच आपण ब्याक्ट्रीअन लोकांच्या घेतल्या हें अद्यापिहि त्यांवरील आकृतीवरून निर्विवाद सिद्ध होत आहे. त्याचप्रमाणें ग्रीक लोकांचें दीनार नांवाचें नाणें आपण वापरीत होतों हें कोष्टकांवरून उघड दिसतें. दीनार शब्द मूळ संस्कृत नसल्यामुळें कोशांत त्याचा अर्थ दिला नाहीं. पण वर सांगितल्याप्रमाणें अमरांत नानार्थ वर्गांत निष्क शब्द दीनारवाची आहे असें जें म्हटलें आहे त्यावरून हें नाणें प्रचारांत होतें असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. अमराप्रमाणेंच मेदिनी कोशांतहि दीनाराचा उल्लेख आहे.

**" निष्कमस्त्री साष्टहेमशते दीनारकर्षयोः "**

सोन्याचें अलीकडलें दुसरें एक मोहोर नांवाचें नाणें हें तर उघड मुसलमानी होय. जुन्या मोहरा पाहिल्या असतां त्यांच्यावर अद्यापि मुसलमानी अक्षरें दृष्टीस पडतात. खुद्द मोहोर हा शब्द परिशिअन असून त्याचा मूळ अर्थ शिक्का असा आहे. हा शब्द नाण्याला कसा लावला गेला ह्याची उपपत्ति एका इंग्रेजी ग्रंथकारानें खालीं लिहिल्याप्रमाणें अशीच दिली आहे.

" The ancient Greek idea of expressing a solemn compact by means of sealing or placing the stamp or seal upon a piece of metal guaranteeing the exactness of its weight and purity of the metal has its counter-part in the Indian Mohar."

महाभारतांत निष्क शब्द आला त्याचा अर्थ मराठी भाषांतरांत मोहोर म्हणून केला आहे तो बरोबर नाहीं. मोहोर ही मुसलमानांच्या वेळची आहे; व निष्क उपनिषत्कालीन आहे. मोहोर हें नाणें आहे; पण तत्कालीन निष्क हा ठरीव वजनाचा धातूचा तुकडा होय. शिवाय वजनामध्यें किंवा किंमतींत मोहोरेचें निष्काशीं यत्किंचितही साम्य नाहीं.

मराठ्यांच्या वेळेस होन चालत असत. होन शब्द हा सुवर्णवाचक कानडी शब्द जो हून त्यापासून झाला आहे; तेव्हां ह्या नाण्यालाही संस्कृत भाषेंत थारा नाहीं.

आतां सांप्रत प्रचलित असलेलें नाणें—रुपया ह्याचें मूळ कोठें आहे त्याचा विचार करूं. हा शब्द संस्कृतांतील रूप्य शब्दापासून निघाला असावा.

'आहतं रूपं अस्य' अशी व्युत्पत्ति पाणिनीच्या 'रूपादाहतप्रशंसयोर्यत्' (५।२।१२०) ह्या सूत्रावरून बसते. म्हणजे घडलेला आकार ज्याचा आहे तें रूप्य. भट्टोजी दीक्षितांनीं ह्याचें उदाहरण "रूप्यः कार्षापणः" असें दिलें आहे. ह्यावरून कार्षापण हें तीनशें वर्षांपूर्वी नाणें होतें हें खचित. रूप्य शब्द पुढें नाणेंवाचक झाला असावा असें दिसतें. कारण "कार्षापणः कार्षिकः स्यात्" ह्यावर भट्टोजी दीक्षितांचे चिरंजीव भानुजी दीक्षित ह्यांनीं केलेल्या व्याख्यासुधा नामक टीकेंत "द्वे रजतरूप्यस्य" म्हणजे कार्षापण व कार्षिक हे दोन शब्द रुप्याच्या नाण्याला लावतात असें म्हटलें आहे. ह्यांत रजत आणि रूप्य असे दोन शब्द वापरले आहेत, त्यावरून रूप्य शब्दाचा अर्थ नाणें करणें भाग आहे. आतां संस्कृतामध्यें रुपयास रूपक हा पर्याय शब्द आहे; तेव्हां रुपया हा "रूप्य" किंवा रूपक शब्दापासून निघाला हें ठरविणें जरा दुर्घट आहे; तथापि मराठी शब्दांतील यकारावरून त्याची उत्पत्ति रूप्य शब्दांशीं नेऊन पोंचविणें बरें दिसतें. व्युत्पत्ति कशीहि असो, रूप्य किंवा रूपक हे मराठी रूपयाचे संस्कृतांतील पर्याय शब्द अद्यापि समजले जातात. आतां पाणिनीच्या "पूरणार्धाच्च" (५।१।४८) व "भागाच्च" (५।१।४९) ह्या सूत्रांवरील भट्टोजी दीक्षितांच्या व्याख्येंत "अर्धशब्दो रूपकस्यार्धे रूढः" व "भागशब्दोपि रूपकस्यार्धे रूढः" अशीं उदाहरणें दिलेलीं आहेत. रुपयाच्या अर्ध्या भागास म्हणजे अधेलीच्या ठिकाणीं भाग व अर्ध शब्द रूढ आहेत असें ज्याअर्थीं येथें म्हटलें आहे त्याअर्थी दीक्षितांच्या पूर्वीपासून अर्ध, भाग व रूपक हे शब्द चांगले प्रचारांत होते हें उघड आहे. भट्टोजी दीक्षितांचा जन्म शके १५०० त झाल्यामुळें ३२५ वर्षांपूर्वी रुपये चालू होते असें सहजच ठरतें. अमरकोशांत नाण्याचा वाचक शब्दच नाहीं तेव्हां येथें एतदर्थी रूप्य किंवा रूपक शब्द सांपडत नाहीं हें सहाजिक आहे. परंतु नंतरच्या कोशांत उदाहरणार्थ हैमांत "भागो रूपार्धके" असा पाठ आहे. ह्यावरून "रूप" म्हणजे रुपया तत्कालीं निसंशय चालू होता. "रूप" शब्द नाणकवाची आहे अशाबद्दल त्या कोशाचाच आधार आहे. तो असा.

"रूपं तु श्लोकशब्दयोः । पशावाकाशे सौदर्ये नाणकं नाटकादिके ॥ अथावृतौ स्वभावेच." ह्यावरून 'रूप' किंवा 'रूपक' हे दोन शब्द मराठी

17 MAR 1990

रूपयाचे संस्कृत पर्याय हैमकोशकर्त्याच्या कालीं प्रचलित होते हें सिद्ध आहे. त्यावरून तन्निर्दिष्ट जें नाणें तेंही असलेंच पाहिजे. हैमकोशाचा कर्ता हेमचंद्र पंडित. हा जैन असून तो होऊन गेल्यास ८०० वर्षें झालीं. यानें शके १०९५ मध्यें गुजराथेंतील कुमारपाल नामक राजास जैनधर्मी केलें असें म्हणतात. ह्यावरून हल्लींचा रुपया ८०० वर्षांचा जुना आहे असें ठरतें.

असें असतां रुपया शब्द प्रथमतः शीरशहानें इ० स० १५४० आणि १५४५ ह्यांच्या दरम्यान प्रचारांत आणला असें ई कूना साहेबांनीं रॉयल ॲशियाटिक सोसायटीसमोर वाचलेल्या आपल्या निबंधांत म्हटलें आहे, तें कसें ? ह्या प्रश्नासंबंधानें त्यांनीं ज्या भागांत विवेचन केलें आहे तो असाः—

The use or employment of the word Rupia or Rupee in the annals of Indian coinage in general is of comparatively modern date. The early Mahomedan rulers used the Arabic designations of a dinar, dirhem, and falas, for the gold, silver and copper coins respectively—words belonging originally to Greek and Roman and Byzentine systems until the Pathan Sultans introduced the word Tankas for both their gold and silver coinage. Shirshaha of the family of Sur was the first to introduce the word Rupia in substitution of the Silver Tank between the years 1540 and 1545, a designation which was soon adopted by Mogal Emperors, by the Portuguese and the East India Company.

ह्याचा सारांश असा आहे कीं, पहिल्या मुसलमान राजांनीं दीनार, दिराम आणि फॅलस ह्या ग्रीक, रोमन व बायंझंटाईन संज्ञा आपल्या नाण्यांत लावल्या. पुढें पठाण सुलतान झाले त्यांनीं आपल्या रुप्याच्या नाण्यास टंक ही संज्ञा दिली व शीरशहानें इ० स० १५४० व १५४५ ह्यांच्यामध्यें टंक शब्दाच्या ऐवजीं रुपया शब्द प्रथमतः सुरू केला.

हैमकोशांतील जो वर उतारा दिला आहे त्यावरून ह्या साहेबांचें म्हणणें मान्य होण्याजोगें दिसत नाहीं. व तें एकंदर सारासार विचाराशींहि जुळत नाहीं. नाण्याचा वाचक जो जुना शब्द तो बदलून परकी भाषेंतला नवीन शब्द त्या जागीं आणण्यास मुसलमानधर्मी राजास काय कारण झालें असावें ? इतरत्र प्रचारांत असलेला शब्द त्यानें विशेष प्रचारांत आणला इतकेंच

फार तर म्हणतां येईल. पण त्यावरून रुपया हा शब्द त्यानें नवीन बनाविला असें सिद्ध होत नाहीं.

पंचतन्त्रांत एके ठिकाणीं रूपक ( रुपया ) शब्द वापरलेला आहे. त्यावरून तर हा शब्द फार जुनाट असावा अशी कल्पना होते. तंत्र ५ कथा ९ ह्यांत खालीं दिल्याप्रमाणें वाक्य आहे.

" तद्यदि दुर्भिक्षं भवति तदनेन ( सक्तुभिः परिपूरितघटेन ) रूपकाणां शतमुत्पत्स्यते ततस्तेन मयाजाद्वयं ग्रहीतव्यम् " ह्या वाक्यांत रूपक शब्दाचा स्पष्ट उल्लेख आहे. हें वाक्य जर विश्वसनीय असेल तर सांप्रतचा रुपया फार जुनाट आहे असें म्हणावें लागतें. हिंदुस्थानांतील ग्रंथ व ग्रंथकर्ते ह्यांचा कालनिर्णय अद्यापि संशयारूढ असल्यामुळें अमक्याच वर्षीं रुपयाचें नाणें प्रथमतः अस्तित्वांत आलें असें विधान करणें सांप्रतच्या स्थितींत शक्य नाहीं; तथापि वरील उदाहरणांवरून ३०० वर्षांहून जास्त वर्षांपासून हिंदुस्थानांत हें नाणें वापरलें जात आहे हें खास. आतां भास्कराचार्यांचें लीलावतींतील नाण्याचें कोष्टक वर दिलें आहे. त्यांत रुपयाचा उल्लेख नाहीं. भास्कराचार्यांचा काल निर्णीत आहे. त्यांस होऊन गेल्यास आज ८०० वर्षें झालीं. ह्यावरून रुपयाचें अस्तित्व ह्या ८०० वर्षांच्या आंतील आहे असें प्रथमदर्शनीं वाटण्याचा संभव आहे. परंतु लीलावतींत रुपयाचा उल्लेख नाहीं, ह्यावरून तेव्हां हें नाणें नव्हतेंच असें अनुमान करणें जरा घाडसाचें होईल. इंग्रेजी अमलाखालीं ह्या देशांत सर्वत्र एक नाणें चालू आहे तसें पूर्वी कधींच नव्हतें. निरनिराळ्या भागांत निरनिराळीं नाणीं व निरनिराळीं वजनें चालत असत.

ह्यामुळें भास्कराचार्यांच्या वेळीं रुपया नव्हताच हें अनुमान जसें अगदीं निर्दोष होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें पंचतंत्रांतील वरील वाक्यावरून तत्कालीं रुपयाचें नाणें होतें असें मानणेंही आम्हांस सयुक्तिक दिसत नाहीं. एक तर रुपयाचा इतका जुनाटपणा शाबीत करण्यास दुसरा स्वतंत्र पुरावा नाहीं. व खुद्द पंचतंत्रांत ज्या वाक्यांत रूपक शब्द आला आहे त्या वाक्याच्या अर्थावरून तो शब्द पाठीमागून गैरसमजुतीनें अथवा लेखकाच्या चुकीनें लिहिला गेला असावा.

भिक्षा मागून जमविलेल्या मडकेभर धान्याची किंमत शंभर रुपये कितीहि दुर्भिक्ष झालें तरी येईल असें वाटत नाहीं व यदाकदाचित् येईल

अशी कल्पना केली, तरी दोन शेळ्यांची किंमत इतकी महाग कधींही असावयाची नाहीं. विशेषेंकरून दुष्काळांत धान्याशिवाय इतर सर्व पदार्थ अधिक स्वस्त असतात, त्याचप्रमाणें ह्या एका वाक्याशिवाय पंचतंत्रांत अन्यत्र कोठेंही एतद्विषयक शब्द वापरलेला नाहीं. तात्पर्य, पंचतंत्राएवढा रूपक शब्द जुना होता असें मानण्यास सबल कारण नाहीं.

ह्या एकंदर हकीकतीवरून नाण्यांची कल्पना आपण परकीयांपासून घेतली असें ठरतें. पूर्वी आपलीं स्वतंत्र नाणीं नसून ग्रीक आदि परकी लोकांचीं नाणीं जशींच्या तशीं चालत असत. पुढें कालांतरानें त्याच नाण्यास एतद्देशीय बनविण्याचे प्रयत्न सुरू झाले असें निष्क शब्दाचा दीनार नाण्याच्या ठिकाणीं उपयोग होऊं लागला त्यावरून म्हणावें लागतें. शब्द-स्थापनेनंतर, आर्योत्पत्तिसूचक मुद्रांनीं युक्त अशीं स्वतंत्र नाणीं पाडण्याचा क्रम सुरूं झाला. लल्लादीक्षितांनीं मृच्छकटिकांतल्या नाणक शब्दाचा अर्थ "शिवाङ्कम्, टङ्कादि" ह्याप्रमाणें दिला आहे त्यावरून वरील सिद्धांतास पुष्टि मिळते. ह्याप्रमाणें ह्या देशांत फार वर्षांपासून नाणीं चालत आहेत. तीं किती जुनाट आहेत हें ठरविणें अगदीं सोपें नाहीं; तरी पण जवळ जवळ २५०० वर्षें आपण नाणीं वापरीत आहों ह्यांत संदेह नाहीं. याज्ञवल्क्य-स्मृति इ० स० नंतर २०० वर्षांनीं लिहिली असें मानतात. ह्या स्मृतींतील जो वर उतारा दिला आहे त्यावरून तत्कालीन नाण्यांचा प्रसार सर्वत्र झाला होता हें उघड होतें. त्याच्याही पूर्वीचीं म्हणजे सुंग घराण्याचीं तांब्याचीं नाणीं सांपडलीं आहेत. इ० स० पूर्वी १७८ व्या वर्षीं ह्या घराण्यांतील प्रथम पुरुष राज्यारूढ झाला.

आतां नाण्याची कल्पना निघण्यापूर्वी विनिमयासाठीं धातूंचा उपयोग होत होता; पण तो निराळ्या स्वरूपानें होत होता हें प्रथमतः सांगितलेंच आहे. धातू वजन करून कोणत्याही पदार्थाचें मूल्य म्हणून देत असत. अगदीं पूर्वीची रीत म्हटली म्हणजे धातूच्या मोठ्या कांबींतून गरज पडेल त्याप्रमाणें व तेव्हां वजन करून तुकडा पाडून तो पदार्थाच्या किंमतीदाखल देत असत. ह्या कामीं प्रत्येक वेळीं तागडी जवळ बाळगण्याचा प्रसंग व क्षणोक्षणीं वजन करण्याची मेहनत पडते. हा त्रास चुकविण्याकरितां निर-निराळ्या धातूंचे ठरीव तुकडे पाडण्याची चाल सुरू झाली असावी ही गोष्ट मनुस्मृतींतल्या व अमर कोशांतल्या वर दिलेल्या कोष्टकावरून

सप्रमाण सिद्ध होते. पल, धरण, पण, सुवर्ण, इत्यादि त्या त्या वजनांचे धातूंचे तुकडे होत. ही केवळ वजनें होतीं असें म्हणतां येत नाहीं. तसें असतें तर निरनिराळ्या धातूंचीं वजनें असण्याचें कांहीं प्रयोजन नव्हतें. वजन तांब्याचें, रुप्याचें, सोन्याचें अगर दगडाचें असलें तरी एकच. कोणताही पदार्थ तोलण्याकरितां तांब्याच्या ऐवजीं तितक्याच प्रमाणाचें सोन्याचें वजन वापरल्यानें कांहीं विशेष कार्य निष्पन्न होत नाहीं. उलट बहुमोल धातू निष्कारण अडून राहते. तेव्हां ज्या अर्थीं निरनिराळ्या धातूंचीं निरनिराळीं वजनें मनुस्मृतींत दिलीं आहेत, त्या अर्थी त्या त्या धातूंचे त्या त्या वजनाचे तुकडे मूल्यादाखल वापरीत असत असें म्हणणें प्राप्त होतें. चीन, जपान व ब्रह्मदेश येथेंही तोलनात्मक चलनपद्धति थोड्या वर्षांपूर्वीपर्यंत चालू होती. हंटर साहेब म्हणतात "The principal money of this country ( Pegu ) is silver which is not coined but paid by weight" ( पेगू येथील मुख्य चलन रुप्याचें आहें. पण तेथें रुप्याचें नाणें नाहीं, तर हें रुपें वजन करून देतात. ) कांहीं कांहीं जुन्या पैशांवर तागडी दाखविलेली असते, हेंहि ह्या प्राचीन पद्धतीचें द्योतक आहे.

वर जें भास्कराचार्यांचें नाण्याचें कोष्टक दिलें आहे त्यांत कवडी हें आदिपरिमाण धरलें आहे. हें निःसंशय आर्यांचें दिसत नाहीं. कांहीं अनार्य लोक कवड्याच्या माळा गळ्यांत घालतात व त्यांस बहुमोल समजतात आणि म्हणूनच त्यांचा पैशाच्या कामीं उपयोग करण्यांत आला हें प्रसिद्धच आहे. त्याच कोष्टकांत पण आणि निष्क हे दोनच काय ते खरे आर्यशब्द होत. त्यांतही निष्क शब्द दीनारासारख्या परकी नाण्यालाच वापरूं लागले, हें अमरावरून उघड होतें. तात्पर्य, नाण्याच्या बाबतींत आर्य लोकांनीं दुसऱ्याचें साहाय्य मुबलक घेतलें ह्यांत शंका नाहीं. नाण्यांची कल्पना त्यांनीं परकीयांकडून घेतली व त्याबरोबर तद्वाचक शब्दही घेतले. पण ते शब्द अशा खुबीनें घेतले कीं, त्यांची संस्कृत शब्दांत सहज गणना व्हावी. वेड्या वाकड्या उच्चारांचे इंग्रेजी शब्द मराठींत जसेच्या तसेच घेणारांनीं ही गोष्ट लक्षांत ठेवावी. त्याचप्रमाणें इंग्रेजी शब्द मराठींत बिलकूल शिरकवूं न देणाऱ्या कांहीं विद्वानांनींही आपल्या पूर्वजांनीं ह्या बाबतींत काय केलें आहे हें अवश्य अवलोकन करावें.

———

# १६. ब्रिटिश अमलापूर्वीच्या चलनासंबंधानें थोडी माहिती.

सांप्रत हिंदुस्थानांत ब्रिटिश अमलांतील मुलखांत रुप्याचें व तांब्याचें अशीं दोन धातूचीं नाणीं चालू आहेत. त्यांत मुख्य परिमाण रुप्याचें असून तांब्याचीं उपनाणीं आहेत. आजमितीस जी चलनपद्धति आहे तिचें जर निरीक्षण केलें तर रुपयेसुद्धां उपनाण्यांतच गणले पाहिजेत. उपनाण्यांचें मुख्य लक्षण हें आहे कीं, त्यांची ठरीव किंमत अन्तर्गत धातूच्यापेक्षां जास्त असते. आजदीनच्या तांब्याच्या बाजारभावाप्रमाणें आपल्या दिडकीची वास्तविक किंमत $\frac{५}{३}$ पैपेक्षां जास्त नाहीं. म्हणजे ठरीव किंमत $\frac{४}{३}$ पैनें अधिक आहे. ह्या कामांत सरकारास बराच नफा होतो, समजा, सरकारनें एक शेर म्हणजे ८० भार अथवा १४४०० ग्रेन वजनाचें तांबें खरेदी करून त्याच्या दिडक्या पाडल्या. एका दिडकींत १०० ग्रेन तांबें असावें लागतें, ह्या हिशोबानें एक शेर तांब्याच्या १४४ दिडक्या पडतात. अर्थात् सरकारास २। रुपये मिळतात. ह्याचा अर्थ असा कीं, सवा रुपयाच्या भांडवलावर सरकार एक रुपया नफा मिळवितें.

रुपये पाडण्याचें बंद केल्यामुळें, रुपयांची हीच स्थिति झाली आहे. एक रुपया १८० ग्रेन वजनाचा असावा लागतो व त्यांत १६५ ग्रेन शुद्ध चांदी असते. हल्लीं रुप्याचा भाव उतरल्यामुळें, नाण्याची मुख्य किंमत धातुगत किंमतीहून तीन आण्यांनीं जास्त आहे. ह्या व्यवहारांत रुपयाच्या पाठीमागें सरकारास तीन आणे नफा मिळतो. ह्या नफ्याचा उपयोग पुढें सोन्याचें नाणें सुरू करण्याच्या उद्देशानें जो हल्लीं त्या धातूचा संग्रह केला जात आहे त्या कामीं होतो.

रूपें व तांबें ह्या धातूंहून अन्य धातूचें नाणें सध्यां चालत नाहीं. सोन्याचें व निकल[1] धातूचें नाणें सुरू करण्याचा सरकारचा हेतु आहे.

---

१ निकल धातूचें नाणें हल्लीं प्रचारांत चालू आहे.

ब्रिटिश अमलापूर्वी हिंदुस्थानांत सोनें, रुपें व तांबें ह्या धातूंचीं नाणीं प्रायः चालत असत. होन, मोहरा, पुतळ्या हीं सोन्याचीं नाणीं होत. रुपये सर्व रुप्याचे. अल्प किंमतीचीं नाणीं तांब्याचीं असत. ह्या निरनिराळ्या धातूंच्या नाण्यांची परस्पर किंमत कायद्यानें ठरलेली नव्हती. सदर किंमती बाजारभावाप्रमाणें वारंवार बदलत. ह्यामुळें हल्लीं रुपयाच्या चौसष्ट दिडक्या ज्याप्रमाणें हमेश मिळतात त्याप्रमाणें पूर्वी रुपयाचे चौसष्ट शिवराई नेहमीं मिळत नसत. खुर्द्याचा भाव वारंवार बदले. कांहीं दिवसांपूर्वी जुने शिवराई रुपयास ६७ किंवा ६८ मिळत. ह्याचें कारण तांबें हल्लीं फार उतरलें आहे. हल्लीं जेथें एक शेरास सवा रुपया पडतो, तेथें पूर्वी दोन रुपये पडत. शके १६९४ ची एक जुनी जमाखर्चाची वही आम्हांस पहाण्यास सांपडली त्यांत तांब्याचा भाव दर शेरास दोन रुपये लागलेला होता, व त्याच वहींत खुर्द्याचा भाव २९ व ३० सण्या अगर ३, ३॥, ३॥।३ टक्केप्रमाणें दिला आहे.

जुन्या वह्यांतले शब्द हल्लीं प्रचारांत नसल्यामुळें अगर त्यांचें पूर्वीचे अर्थ बदलल्यामुळें त्यांची मांडणी समजणें अवश्य आहे. सणी हा शब्द हल्लीं बऱ्याच लोकांस माहीत नसेल. २ दिडक्यांस पूर्वी सणी म्हणत. तेव्हां २९ सण्या म्हणजे ५८ शिवराई व तीस सण्या म्हणजे ६० शिवराई होतात.

टक्का हा शब्दही हल्लीं निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या अर्थी वापरतात. परंतु पूर्वी १६ पैशांना टक्का म्हणत असत. रुपयाचे तीन टक्के म्हणजे ४८ शिवराई; साडेतीन टक्के म्हणजे ५६ शिवराई; पावणेचार टक्के तीन रुक्के ( ३॥।३ ) म्हणजे ६१ शिवराई.

एका पैशाचे रुक्के तीन, व त्याची मांडणी वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें असे. हल्लींच्या पैच्या किमतीचा रुक्का असे. एका रुपयावर रक्कम मांडावयाची झाली तरी टक्क्यांत लिहिण्याची वहिवाट कांहीं ठिकाणीं असलेली दिसते. व शिवराई किंवा पाव आण्याच्या ऐवजीं तीन रुक्के म्हणण्याचा प्रघात असे. उदाहरणार्थ, ब्राह्मण संख्या १८३५, दर तीन रुक्के प्रमाणें एकूण टक्के ११४॥९. कांहीं प्रांतांत रेसांत हिशेब मांडण्याची वहिवाट असे हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे.

14 JAN 1994

तात्पर्य, ह्या देशांत पूर्वी त्रिधातुपरिमाणपद्धति चालू होती म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र तांब्याचें नाणें किती रकमेपर्यंत कायदेशीर फेडीचें चलन होतें हें समजण्यास मार्ग नाहीं.

तांब्याच्या नाण्यांत दुसऱ्या धातूचें मिश्रण नसे. सोन्याचीं नाणीं व रुप्याचीं नाणीं ह्यांची परस्पर किंमत कायद्यानें ठरली नसल्यामुळें, बाजार-भावाप्रमाणें जी किंमत असेल त्याप्रमाणें त्यांचा परस्पर मोबदला होई. अर्थात् वजनावर सोन्याच्या नाण्यांची किंमत होई. वर निर्दिष्ट केलेल्या वहीवरून असें दिसतें कीं, शके १६९४ त सोन्याचा दर १५ पासून १६ पर्यंत असे, व हा भाव इ. स. १७४४ पर्यंत तरी निदान कायम होता. ह्या दरानें एका होनाची रुपयांत किंमत ३।॥≈ अथवा ३।॥– होई. एक होन सुमारें सवातीन मासे वजन भरे. त्याचा आकार उडदायेवढा असे.

हैदरानें पाडलेल्या होनांस बहादुरी व टिपूनें पाडलेल्या होनांस सुलतानी अशा संज्ञा असत. पेशव्यांच्या वेळेस कांहीं अधिकाऱ्यांचा पगार होनांत दिला जात असे. विजापूरच्या हिंदुराजांचे होन सांपडले आहेत ते इ. स. ६ किंवा ७ व्या शतकांतले असावेत.

शिवाजीच्या वेळेस खालील नांवाचे होन चालत असत.

| | | |
|---|---|---|
| पातशाही | अच्युतराई | जलखटी |
| शिवराई | देवराई | पाकनाईकी |
| | रामचन्दराई | आदवाणी |
| कावेरीपाकी | गुती | जलमाल |
| सणगरी | धारवाडी | ताडपत्री |
| अफराजी | चंदावरी | महमदशाई |
| त्रिवाळुरी | बिलघरी | वेळुरी |
| त्रिसुजी | उलफफरी | कंठेराई |
| देवजवळी | रामनाथपुरी | कुनगोटी |

मोहरांमध्येंही दिल्लीची मोहोर, अवरंगाबादी मोहोर अशा नानाविध जाती असत. त्यांपैकीं कांहींचीं नांवें येणेंप्रमाणें.

| | | |
|---|---|---|
| अमदाबाद | अंग्रशाही | अर्काट |
| अश्राफी | बऱ्हाणपूर | शहाअमलबादशाहाची |

ह्या मोहरांचें वजन १६४ पासून १९० पर्यंत असे. ह्यापैकीं अवरंगाबादी मोहरेंत शेकडा शंभर शुद्ध धातु असे. त्यामुळें ह्या मोहरेचा भाव हाली शिक्का १३ रु० असे. पुतळ्याही वजन करून घेत व त्यांची किंमत ४॥ पासून ५ रु० पर्यंत येई. ऐनी अकबरींत मोहरेची किंमत ९ रु० दिली आहे. ह्याशिवाय सोन्याच्या निरनिराळ्या किंमतीच्या दुसऱ्या सोन्याच्या नाण्यांचीं नांवें सदर ग्रंथांत नमूद केलीं आहेत. रुपये तर महाराष्ट्रांत व इतरत्र फारच निरनिराळे चालत, व त्यांचा बट्ट्याचा भावही निरनिराळा असे. ह्यामुळें सराफ लोकांस नफा मिळविण्याची चांगली संधि असे. तत्कालीं चालू असलेल्या कांहीं रुपयांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्काटगंजी | २२ | मलकापुरी | ४३ | भोसे |
| २ | इटावे | २३ | उदेपुरी | ४४ | कुमठे |
| ३ | हालीशिक्का | २४ | हुकेरी | ४५ | अमदाबाद |
| ४ | जमखंडी | २५ | निळकंठी | ४६ | अकाशाही |
| ५ | फुलचरी हैदरी | २६ | पन्हाळी | ४७ | बाबाशाही |
| ६ | पटणी | २७ | कितुरशहापुरी | ४८ | बागलकोटी |
| ७ | हातणी | २८ | गडपाडी | ४९ | बखरू |
| ८ | काशीशिक्का | २९ | भूतपाडी | ५० | बडोदे |
| ९ | मिटे | ३० | निजामशाही | ५१ | भूनगर |
| १० | दौलताबादी | ३१ | बागचलनी | ५२ | बिलासपूर |
| ११ | मल्हारशाही | ३२ | हुकुमचलनी | ५३ | खंबायती |
| १२ | भिलवडा | ३३ | शेटचलनी | ५४ | कशाणी |
| १३ | चिकोडी | ३४ | समशेरी | ५५ | चंदेरी |
| १४ | दिल्लीशिक्का | ३५ | चांभारगोंदी | ५६ | चौफुलिया |
| १५ | पैठणी | ३६ | बऱ्हाणपुरी | ५७ | चनविसाणी |
| १६ | तळेगांवचे | ३७ | वाफगांवी | ५८ | घेरागाजीखान |
| १७ | शिवराई | ३८ | जरीपटका | ५९ | घोलकी |
| १८ | बेलापुरी | ३९ | कुलाबी | ६० | डफशाही |
| १९ | चांदवड | ४० | चिकोडी | ६१ | फिसरु |
| २० | तुऱ्याचे | ४१ | अंकुशी | ६२ | हलकुरी |
| २१ | गैरसाल | ४२ | रुई | ६३ | कोरा |

| | | |
|---|---|---|
| ६४ कुभांडी | ७३ शाहापुरी | ८२ टेंभुरणी |
| ६५ कुशारी | ७४ शाहाजादी | ८३ तुकाशाही |
| ६६ लारकन | ७५ शिकारपूर | ८४ वल्लभशाही |
| ६७ मामाशाही | ७६ सोलापूर | ८५ वाईशिक्का |
| ६८ मनोरी | ७७ सुनामुल्ला | ८६ वाडीपीरखानी |
| ६९ मुल्लाशाही | ७८ सयाशाही | ८७ वाळकरशाही |
| ७० नादरी | ७९ तांबशाही | ८८ यसौवोली |
| ७१ नायपूर | ८० तांड्या | ८९ कहारी |
| ७२ पर्कणी | ८१ तालता | ९० लारी |

ह्याप्रमाणें निरनिराळीं चलनें चालत असत. नांवावरून कोठें नाणें चालत असे हें बहुतेक समजण्यासारखें आहे. कशाणी, हैद्राबाद, तांड्या वगैरे रुपये सिंधप्रांतांत चालत.

एका जुन्या इंग्रजी प्रवाशानें कराचीस चालू असलेल्या नाण्यांचें कोष्टक खालीं लिहिल्याप्रमाणें दिलें आहे.

| | | |
|---|---|---|
| ४ कशीर | = | १ दोडका |
| २ दोडके | = | १ तंग |
| २॥ तंग | = | १ कशाणी रुपया |
| ५॥ कशाणी रु. | = | १ पुतळी |

कशाणी रुपया ११ माशांचा असे.

कांहीं निरनिराळ्या रुपयांच्या बट्ट्याचा भाव वर उल्लेख केलेल्या वहींत आढळला तो असा.

| | | |
|---|---|---|
| १०० इटावे | = | ९६॥। अटीचे रोकडे ( दर ३। प्रमाणें ) |
| १०० अर्काटगंजी | = | ९९॥ अटीचे रोकडे ( दर ·॥· प्रमाणें ) |
| ४१० इटावे | = | ४०० अ. गंजी ( दर २॥ प्रमाणें ) |
| ६८० हालीशिक्का | = | ६८५ अ. गंजी ( दर ·॥।· प्रमाणें ) |
| १०० इटावे | = | १०१॥ दौलताबादी |
| १०० दौलताबादी | = | ९४॥ अ. रोकडे |
| २५ चिकोडी | = | २३॥ अ. रोकडे |

नेपाळांत रुप्याच्या नाण्यास मोहोर म्हणतात व तें आपल्या अर्ध्या रुपयाइतकें असतें.

दक्षिण महाराष्ट्रांत फानम नांवाचीं सोन्याची नाणीं चालत असत. फानम—फनम् हा पण ( पणम् ) शब्दाचा अपभ्रंश होय. ह्याच्या दोन जाती गट्टी व गोपाळी प्रसिद्ध आहेत. हीं नाणीं सुमारें ५॥ पासून ६ ग्रेन वजनाचीं असत. तसेंच दक्षिण हिंदुस्थानांत क्याश नांवाचें नाणें चाले. ८० क्याश म्हणजे १ फणम, ४२ फणम म्हणजे १ पगोडा, १ पगोड्याची किंमत सुमारें ३॥ रुपये असे. नाण्यांवर मनोऱ्यासारखी देवालयाची आकृति असे. त्यावरून पोर्तुगीज लोकांनीं त्या नाण्यास पगोडा हा शब्द लाविला. कांहीं ठिकाणीं १ फणाची किंमत ६४ क्याश दिली आहे. एक रुपया ४५६ क्याशाबरोबर होई.

शिवाजीच्या वेळेस देशाभिमानाची लाट जी महाराष्ट्रावर आली तिचा पगडा भाषेवरही बसला. राजव्यवहार कोशांत कांहीं नाण्यांची परिभाषा येणेंप्रमाणें दिली आहे.

द्रव्यं तु नक्तसंज्ञं स्यात् । वराटो होन उच्यते ॥
तदर्धं तु प्रतापः स्यात् । भाषयोरुभयोरपि ॥
वराटपादो धरणः । चवलस्त्वष्टमांशक ॥
द्रुवलः षोडशांशः स्यात् । मोहरा तु बुधैः स्मृतम् ॥
सुवर्णनिष्कं, रजतनिष्कं । स्यात् रुपयाभिधम् ॥
द्वाच्या रजवर्ती तु लाहरी फलमः पणः ॥

# १७. रुपया शिरशाहानेंच सुरू केला काय ?



"प्राकालीन अधातुरूप विनिमयसामान्यें " ह्या लेखांत धातु विरहित दुसऱ्या कित्येक पदार्थांचा—सुया, नौका, वस्त्रें, पशु इत्यादि—उपयोग पैशाच्या कामीं प्राचीन हिंदुस्थानांत करीत असत हें दाखविलें आहे. तेथें आणखीही असें सिद्ध केलें आहे कीं, ह्या कामीं मानवजातसुद्धां वगळली गेली नव्हती. द्वाभ्यां पुरुषाभ्यां क्रीता द्विपुरुषा, त्रिपुरुषा म्हणजे दोन पुरुष व तीन पुरुष देऊन विकत घेतलेली. ह्या काशिकेंतील उदाहरणांवरून वरील विधान केलें होतें. ह्याच्यावर एक असा आक्षेप घेतां येईल कीं, हल्लीं राजाच्या आकृतीवरून सोन्याच्या नाण्यास इंग्रजींत जसें साव्हरीन म्हणतात, त्याचप्रमाणें पुरुष हा नाणकविशेषवाची शब्द नसेल कशावरून? ह्यास उत्तर इतकेंच कीं प्राचीन नाण्यांवर राजाचा मुखवटा काढण्याची पद्धति नसे. आपली आकृति नाण्यांवर उठवण्याची कल्पना ऐहिक सुखेच्छु पाश्चात्यांचीच आहे. तेव्हां द्वि—त्रिपुरुष ह्या प्रयोगावरून मानवी पैशाचाच अंगीकार करणें भाग आहे. मनुष्यरूपी मूल्यानें फार प्राचीनकाळीं क्रय-विक्रयादि व्यवहार होत असावेत असें अनुमान करण्यास प्राचीन ग्रंथांत निर्दिष्ट केलेल्या आख्यायिकांवरून जागा आहे. यज्ञांत सोमवल्ली विकत घेण्यास एक वर्षाची कालवड द्यावी लागते. ह्याचें मूळ ऐतरेय ब्राह्मणांत येणेंप्रमाणें दिलें आहेः—

सोमो वै राजा गन्धर्वेष्वासीत्तं देवाश्च ऋषयश्चाभ्यध्यायन्कथमयमस्मान्सोमोराजाऽऽगच्छेदिति सावागब्रवीत्स्त्रीकामा वै गन्धर्वा मयैव स्त्रिया भूतया पणध्वमिति नेति देवा अब्रुवन्कथं वयं त्वदृते स्यामेति साऽब्रवीत्क्रीणतैव यर्हि वाव वो मयाऽर्थो भविता तर्ह्येव वोऽहं पुनरागनतस्मीति तथेति तया महानग्न्या भूतया सोमं राजानमक्रीणन.

ह्या आख्यायिकेंत सांगितल्याप्रमाणें वाग्देवीला मूल्य म्हणून देऊन देवांनीं गन्धर्वांपासून सोमवल्ली विकत घेतली. ह्या आख्यायिकेला झगझगीत दिलेलें रूप काढून घेतलें तर मुळाशीं प्राचीन काळीं लहान मुलगी देऊन सोम विकत घेत असत असें मानण्यास हरकत नाहीं. वाग्देवी अल्पवयस्क नसूनही तिनें मुद्दाम नग्निकेचें रूप धारण केलें ह्यावरून अल्पवयस्क बालिकांची पैशाच्या कामीं योजना होत असे असें दिसतें. ह्यांत जर खरोखर क्रयविक्रयाचा संबंध नसता व सोम मिळविण्यासाठीं देवांनीं स्त्रीकामगन्धर्वांना एक स्त्री दिली इतकाच प्रकार असता तर वाग्देवीनें नग्निकेचें रूप धारण करण्याचें प्रयोजन नव्हतें. अशा कामीं एक वर्षाच्या नग्निकेपेक्षां युवतीच जास्त ग्राह्य झाली असती. सारांश, विनिमयसामान्य ( madium of exchange ) म्हणून मनुष्य जातीचा उपयोग फार प्राचीन काळीं आर्यावर्तांत होत असे हें अनुमान बलवत्तर होतें.

पुढें ही चाल जेव्हां बंद पडली तेव्हां स्त्रीच्या ऐवजीं एक वर्षाच्या कालवडीची योजना होऊं लागली.

सोमक्रय फक्त एक कालवड देऊन करावयाचा नसून पुष्कळ द्रव्यांच्या साधनानें करावयाचा असतो. सोम खरेदी करण्यास कालवड, अजा, हिरण्य, वस्त्र इत्यादि द्रव्यें विहित आहेत. म्हणजे ह्यापैकीं कोणत्या तरी एका द्रव्यानें सोम खरेदी करावयाचा नसून सर्व द्रव्यें मिळून खरेदी करावयाचा असतो. ह्या पद्धतीवरूनही फार प्राचीन काळीं अदलाबदलीचा व्यवहार—म्हणजे विनिमयसामान्य लोकांस माहित नव्हतें. त्यावेळचा व्यवहार कसा करावा लागे ह्यांची कल्पना होईल. अदलाबदलीच्या व्यवहारांत आपणांस जरूर असलेला पदार्थ ज्याच्यापाशीं असेल तो कोणता दुसरा पदार्थ घेऊन देण्यास तयार होईल ह्याची अटकळ प्रथमतः करतां येत नाहीं. म्हणून आपल्याबरोबर बऱ्याचशा जिनसा घ्याव्या लागतात. अशाच हेतूनें सोमक्रय दहा द्रव्यांनीं करण्याचें विधान पूर्वमीमांसेंत केलेलें आढळतें. " बहुभिर्द्रव्यैर्विक्रेतुरानतेः [ आनुकूल्यस्य ] सौलभ्याद्दशभिः क्रीणातीति संख्योक्तेश्च समुच्चयः" ह्या भाष्यांत हा हेतु स्पष्ट रीतिनें सांगितला आहे. ह्याप्रमाणें सोमक्रयासंबंधीं आख्यायिकेवरून विनिमयसामान्याच्या पूर्वकालीन अदलाबदलीच्या व्यवहाराचें व विनिमयसामान्याच्या प्रचारानंतर विनिमयसामान्याचें स्वरूप समजण्यास चांगली मदत होते.

पुढें "धातुरूप विनिमयसामान्यें" ह्या निबंधांत मुख्यत्वेंकरून मनुस्मृति व अमरकोश हे दोन ग्रन्थ ज्या काळांत लिहिले गेले, त्या काळापर्यंत आर्य लोकांची स्वतन्त्र नाणकपद्धति नव्हती हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. ही गोष्ट विशेष रीतीनें ध्यानांत ठेवण्याचें कारण हें कीं, त्याच्या उलट म्हणजे ऋग्वेदकालीं व पाणिनीच्या वेळीं नाणीं प्रचारांत होतीं असें कित्येकांचें मत आहे. परंतु हें मत मागील निबंधांत जें प्रतिपादन केलें आहे त्यावरून निराधार असावें असें वाटतें. ऋग्वेदांत शुल्क शब्द आहे खरा; पण तें नाणेंच होतें असें मानण्यास कांहींच पुरावा नाहीं. त्याचप्रमाणें पाणिनीच्या अष्टाध्यायींत निष्क, पण, इत्यादि जे शब्द आले आहेत, तेही ठरीव वजनाच्या धातूच्या तुकड्याचे वाचक समजले पाहिजेत.एतच्छब्दनिर्दिष्ट जे धातूचे तुकडे त्यांमध्यें व नाण्यांत थोडा फरक आहे. ठरींव वजनाच्या व कसाच्या धातूच्या तुकड्यावर राजमुद्रा बसली कीं त्यांची गणना नाण्यांत होऊं लागते. तोंपर्यंत नुसत्या अमुद्रित धातूंस नाणें म्हणतां येत नाहीं. विज्ञानेश्वरांनीं नाण्याची व्याख्या अशीच केली आहे. मुद्रादिचिन्हितं राजनामाङ्कादिना लक्षितं नाणकं" म्हणजे ज्याच्यावर शिक्का मारला आहे; राजचिन्ह अगर राजाचें नांव ज्यावर उठविलें आहे त्यास नाणें ही संज्ञा आहे. अर्वाचीन पाश्चात्य अर्थशास्त्रवेत्त्यांनीं केलेली व्याख्या संस्कृतामध्यें ह्या शब्दाचें जें वर निर्दिष्ट केलेलें लक्षण दिलें आहे त्याहून फारशी भिन्न नाहीं. पृष्ठभागावर मारलेल्या शिक्क्यावरून ज्या धातूच्या तुकड्याच्या वजनाची उपलब्धि होते, अशा तुकड्यास नाणें म्हणतात अशी जीव्हॉन्स साहेबांची व्याख्या आहे. ह्या दोन लक्षणांत थोडा फरक आहे. इंग्रेजी व्याख्येप्रमाणें नाणें धातुमयच असावें लागतें. परंतु संस्कृतांतील नाणक हा शब्द शिक्का मारलेल्या कोणत्याही द्रव्यभूत पदार्थाला लावतां येईल. तथापि विनछापाच्या धातूच्या तुकड्यास नाणें म्हणतां यावयाचें नाहीं हें कोणतेंहि लक्षण घेतलें तरी सिद्ध होतें. तेव्हां असे छाप मारलेले धातूचे तुकडे पाणिनीच्या वेळेस जर प्रचारांत असते तर संस्कृत कोशांत नाणकवाची शब्द अवश्य आढळावयास पाहिजे होता. बिनशिक्याच्या सुवर्ण किंवा रजतानेंच पूर्वी व्यवहार होत असल्या कारणानें " सुवर्णं देवेभ्यः " " रजतं पितृभ्यः " असे प्रयोग संस्कृतांत वापरलेले आढळतात. तेव्हां ऋग्वेदकालीं अगर रामायण भारताच्यावेळीं देखील

शिक्का मारलेल्या धातूचा उपयोग होता असें मानण्यास सबळ प्रमाण नाहीं. महाभारतांत निष्क शब्द जागोजागीं आला आहे हें खरें. उदाहरण, " वाचयित्वा द्विजश्रेष्ठान्गोभिर्निष्कैश्चभूरिशः " [ सैन्यनिर्याण पर्व. अ. १५७ ] ह्याच्याही पूर्वीच्या ग्रंथांत म्हणजे छान्दोग्योपनिषदांत निष्क शब्द आलेला आहे. उदाहरण, "तदुहजानश्रुतिः पौत्रायणः षट्शतानि गवांनिष्कमश्वतरीरथं तदादाय प्रतिचक्रमेत ।" हाभ्युवाद. " ह्या महाभारतांतील व उपनिषदांतील निष्क शब्दाचा अर्थ काय करावयाचा हाच प्रश्न आहे. त्याचें उत्तर मागील निबंधांत मनूचें जें कोष्टक दिलें आहे त्यावरून समजून येणारें आहे. म्हणून वेदकालीं व पश्चात् हिंदुस्थानांत नाणीं प्रचारांत असत हें विधान जें कित्येक नामांकित विद्वानांनीं केलें आहे तें भ्रममूलक दिसतें.

ता० २५ सप्टेंबर सन १९०४ च्या ज्ञानप्रकाशांत " आमच्या रुपयाचा थोडासा इतिहास " या मथळ्याखालीं प्रथमतःच पुढें लिहिल्याप्रमाणें मजकूर आहे. " आमच्या देशामध्यें नाणें फार प्राचीनकाळापासून चालू आहे. वेदकालीं आमच्या देशांत नाणें चालू होतें. त्याला प्रत्यंतर पुष्कळ ठिकाणीं पहावयास सांपडतें. महाभारतांत आमच्या देशांत नाणें चालू होतें यास आधार सापडतो. मनुस्मृतींत नाण्याचा पुष्कळ ठिकाणीं स्पष्ट उल्लेख आहे. रूपधातूचा अर्थ ठोकणें ह्यावरून रुपया असा पाणिनींच्या ग्रंथांत नाण्याचा शब्द आढळतो. सारांश, वेदकालीं व महाभारताच्या वेळीं व पाणिनी सूत्रांच्या समयीं आमच्या देशांत नाणें चालू होतें ह्याबद्दल बिलकुल शंका राहात नाहीं. मुसलमानांच्या पूर्वी रुपया हें नाणें आमच्या देशांत चालू होतें ही निर्विवाद गोष्ट आहे. "

ह्या वरील उताऱ्यांत जीं विधानें केलीं आहेत त्यांच्या पुष्ट्यर्थ कांहीं आधार दिले असते तर बरें होतें. वेदकालीं जर ह्या देशांत नाणें चालू होतें तर नाणक हा शब्द परकी भाषेंतून घेण्याची अवश्यकता कां पडली ? अमरकोशांत नाणक हा शब्द कां आढळत नाहीं ? ह्या प्रश्नांचीं उत्तरें देणें कठीण आहे. मुसलमानांच्या पूर्वी रुपया होता हें विधान मात्र खरें असावेंसें वाटतें. डी. कुन्हा साहेबांच्या निबंधांतील उतारा देऊन तो हैमकोशांशीं विरुद्ध आहे हें आम्ही मागील निबंधांत दाखविलें आहे. डी. कुन्हांनीं रुपया शिरशहानें सुरू केला ही माहिती बहुधा ऐनी अकबरीवरून

दिली असावी असें वाटतें. फ्रान्सिस ग्लाडविन साहेबांनीं मूळांतील एत द्विषयक भागाचें भाषांतर येणेंप्रमाणें केलें आहे.

" Rupee is a silver coin of a round form, in weight 11 ¼ más-hás. It was first *introduced* in the time of Sheerkhan & under the present reign, it has been revived and made more pure "

रुपया हें वाटोळ्या आकाराचें रुप्याचें नाणें असून त्याचें वजन ११ ¼ मासे आहे. रुपया प्रथम शिरखानाच्यावेळीं सुरूं झाला. ह्या कारकीर्दीत.....हें भाषांतर बरोबर आहे किंवा नाहीं हें सध्यां सांगतां येत नाहीं.

हावर्थ साहेबांनीं आपल्या " वसाहतींतील नाणीं व उपनाणीं " ह्या पुस्तकांत उत्तर हिंदुस्थानांत मुसलमान राजांच्या कारकीर्दीत रुपयाची चलनपद्धति सुरू झाली असें म्हटलें आहे. " The coinage with the rupee as standard had its origin in the Mahamedan dynasties of Northern India ( Colonial coins and tokens by Howworth. )

सदरहूप्रमाणें टाइम्स ऑफ् इंडिया पत्रांत ( अंक ता. १४ आक्टोबर १९०२, जे. जी. सी. ह्या नांवानें सही करणाऱ्या गृहस्थांनीं रुपयाच्या सुरवातीसंबंधानें खालील मजकूर लिहिला आहे. " Shirsha the Afgan rival of Humayan ( circ. 1540 A. D. ) marks an important era in Indian Numismatics. Not only did he inevnt the rupee, but he put away from it the debased mixtures of silver and alloy which under the Pathan sultans had done duty as coins and contented himself with issues of simple metals containing but the necessary minimum of alloy. Sharshaha's rupee as we have seen wos a glorified Tank-a of the white or silver variety "

ह्याचा मथितार्थ इतकाच आहे कीं शिरशहानें रुपया हा शब्द नवीन बनवून तो पूर्वीच्या टंक नाण्याला लाविला; व त्यांतील हीणकसपणाही फार कमी केला.

हे साहेब लोकांचे तर्क वस्तुस्थितीस धरून नाहींत हें मागील निबंधांवरून स्पष्ट दिसेल. " रूप " किंवा " रूपक " शब्द हैमकोशांत आहे, ह्यावरून रुपया हा शब्द व तन्निर्दिष्ट नाणेंही बरेंच जुनें असलें पाहिजे असें अनुमान तेथें काढलें होतें. पण हा " रूपक " शब्द कोणत्याही नाण्याचा

वाचक आहे अथवा त्यानें एखादें विशिष्ट नाणें निर्दिष्ट केलें जातें ह्याचा स्पष्ट खुलासा झाला नव्हता. " रूपक " शब्दाचा अर्थ रुप्याचें विशिष्ट नाणें असा जर होईल तर शिरशहानें रुपया हा शब्द नवीन बनविला ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थ राहणार नाहीं. ह्या शब्दाचा अर्थ ठरविण्यास " भाग " व " अर्ध " ह्या शब्दाची फार मदत होणार आहे. " भाग-शब्दो रूपकस्यार्धे रूढः " " अर्धशब्दो रूपकस्यार्धेरूढः " हीं उदाहरणें कौमुदींतच नाहींत तर काशिकेमध्येंही दिलेलीं आढळतात. " भक्तिवीच्योर्भागो रूपार्धके भाग्यैकदेशयोः " हा अनेकार्थसंग्रहांतील उतारा आहे. आतां भाग व अर्ध शब्दांनीं कोणत्याही नाण्याचा अर्धा भाग घ्यावयाचा किंवा " रुपया " ह्या विशिष्ट नाण्याचा अर्धा भाग घ्यावयाचा हें पहावयाचें आहे. ह्याचा उलगडा महाभाष्यावरून बराच होण्यासारखा आहे. अर्ध्या कार्षापणाला अर्ध शब्द लावीत असें त्यावरून स्पष्ट होतें. उदाहरणार्थ, " अर्धिकः " " अर्धिकी " " कार्षापणार्धा " भाष्यटीका ( कैयट ) " अर्धशब्दः कार्षापणस्यार्धे रूढः " आतां कार्षापण हा नाण्याला प्रतिशब्द नसून तें एक विशिष्ट रुप्याचें नाणें होतें ह्याबद्दल कोणाला शंका येण्याचें कारण नाहीं. म्हणून अर्ध शब्दानें विशिष्ट नाणें घेणें भाग आहे. अर्ध शब्दानें विशिष्ट नाण्याचा जर बोध होत नसेल तर " अर्धिकः " " अर्धिकी " असे प्रयोग होणेंच शक्य नाहीं. " अर्धशब्दः कार्षापण-स्यार्धे रूढः इति भागवदपेक्षायामसामर्थ्यं नाशंकनीयम् ". अर्ध शब्दानें कशाचा अर्ध ही अपेक्षा रहात नाहीं. म्हणूनच अर्धिकः अर्धिकी हे प्रयोग होण्यास हरकत नाहीं. सारांश, अर्ध शब्द पूर्वी अर्ध्या कार्षापणाला लावीत. पुढें कार्षापणाची जागा रुपयानें पटकावल्यावर तो अर्ध्या रुपयास लावूं लागले हें निर्विवाद आहे. व ज्याअर्थी अर्ध शब्द कार्षापणार्धाच्या ठिकाणीं रूढ आहे म्हणून भाष्यांत सांगितलें आहे व तो रूपकार्धाच्या ठिकाणीं रूढ म्हणून काशिकेंत व कौमुदींत म्हटलें आहे, त्याअर्थी कार्षापण व रूपक हे दोन शब्द एकाच नाण्याचे वाचक असले पाहिजेत.

सांप्रतही आपण अधेली हा शब्द अर्ध्या रुपयाच्या ऐवजीं वापरतों. व अधेली हा अर्धिकी ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे हें उघड आहे. तात्पर्य, " रूपक " हा शब्द आरंभीं जरी निवळ नाणकवाची असला, तरी तो पुढें पुढें नाणक विशेषवाची झाला ह्यांत संदेह नाहीं.

रा. राजवाडे ह्यांनीं ग्रन्थमालेच्या १३५ व्या अंकांत मिरजेच्या किल्ल्याचा एक ताम्रपट प्रसिद्ध केला आहे. ह्या ताम्रपटांत रुपया हा शब्द वापरलेला आहे. " दीड चावर इनाम दीले मेली मोसा दिल्हा चैन व मेली उलाही-लाची जवसी दील्हा खण त्याचे नावे तुफ्या वारकीसहीत मैत्रीवर एक कोशाळू लुगडे आस्वीनाचे मंत्रीवर सात रुपये चावडीवर तर पुनीट शरीवर पसोली रुपये ११ मगतुलावर सोली रुपये जीमीन दावर एक. " हा ताम्र-पट शके १४११ म्हणजे इ. स. १४८९ तला आहे. शिरशहाची कार-कीर्द ह्याच्यानंतरची आहे. हा ताम्रपट जर खरा असेल व त्याच्या तारखे-विषयीं कांहीं शंका नसेल तर शिरशहाच्या पूर्वीपासून रूपकच नव्हे तर रुपया हा शब्दही महाराष्ट्रांत प्रसिद्ध होता हें उघड आहे. ह्या ताम्रपटाच्या खरेपणाविषयीं जर कांहीं शंका नसेल तर ह्या वादाचा निकाल निश्चितपणें कायमचा लागला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

# १८ परतहुंड्या ( रिव्हर्स कौन्सिल बिल्स )

## व हिंदुस्थानच्या चलनपद्धतीचें सामान्य स्वरूप.

रिव्हर्स कौन्सिल बिलांविषयीं अलीकडे इंग्रजी वर्तमानपत्रांतून व मासिकांतून जोराची चर्चा चाललेली आढळते. तीवरून इंग्रेजी जाणणाऱ्यांना या विषयाची थोडी तरी कल्पना करितां येण्यासारखी आहे. परंतु निव्वळ मराठी वाचकांना या इंग्रजी चर्चेचा कांहींही उपयोग होत नाहीं. म्हणून त्यांच्याकरितांच हा लेख मुख्यतः लिहिण्यांत आला आहे. शिवाय आर्थिक विषयाचें ज्ञान समाजांतील बोटानें मोजतां येतील इतक्याच लोकांना असावें व बाकीच्यांत तद्विषयक गाढ अज्ञान असावें, ही स्थिति समाजाला अनिष्ट आहे. आर्थिक विषय इतके भानगडीचे असतात कीं, तज्ज्ञांत सुद्धां तत्संबंधीं एकमत क्वचितच असतें. तेव्हां सामान्यजनांना कोणतेही नितांत सिद्धांत बांधतां येतील असें नाहीं. तथापि या विषयाचें स्वरूप व त्यांतील ठळक गोष्टी यांची माहिती प्रत्येकास असणें शक्य आहे व अवश्यही आहे.

' रिव्हर्स कौन्सिल बिल ' म्हणजे काय हें समजण्यापूर्वी ' कौन्सिल बिल ' म्हणजे काय हें समजलें पाहिजे. इंग्लंडमध्यें सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणून जो अधिकारी असतो त्यास सल्लागार मंडळ दिलेलें आहे. या मंडळाला इंग्रजींत ' कौन्सिल ' असें म्हणतात. या कौन्सिलनें काढलेलीं जीं बिलें त्यांस कौन्सिल बिलें म्हणतात. बिल म्हणजे हुंडी. ' कौन्सिल बिल ' म्हणजे थोडक्यांत, ' सरकारी हुंडी ' असें म्हणतां येईल. हुंडी म्हणजे तिसऱ्या माणसास अमुक रुपये देण्याबद्दल एका माणसानें दुसऱ्या इसमास लिहिलेलें पत्र; अर्थात् हुंडी म्हटली म्हणजे तेथें तीन माणसांचा संबंध येतो. पत्र देणारा, ज्याच्या नांवानें पत्र दिलें असेल तो, व ज्याला पैसे द्यावयाचे असतील तो. सरकारी हुंड्यांत स्टेट सेक्रेटरी हा हिंदुस्थानसरकारावर हुंड्या काढितो; म्हणजे स्टेट सेक्रेटरी हिंदुस्थानसरकारास असें लिहितो कीं, तुम्ही अमुक इसमास अमुक रुपये द्या. तेव्हां

स्टेट सेक्रेटरी व हिंदुस्थानसरकार या दोन व्यक्ति सरकारी हुंड्यांच्या संबंधानें कायम असतात. तिसरी व्यक्ति म्हणजे व्यापारी वर्ग होय.

हुंडयाच्या योगानें देवघेवीचा व्यवहार फार सोइस्कर होतो. व्यवहार अर्थात् नानाप्रकारचे असल्यामुळें हुंड्या काढण्याचीं कारणेंही अनेक असतात. अ ला ब चे रु. १०० देणें आहे. अ जवळ पैसे नाहींत; पण त्याचे पैसे क जवळ आहेत, अगर क जवळ त्याची पत आहे; तेव्हां तो ब ला क वर रु. १०० ची हुंडी देतो. ब हा हुंडी अ जवळून घेऊन क कडे हजर करितो, आणि त्याच्याकडून रुपये १०० घेतो. अशा रीतीनें ब च्या देण्याची अ फेड करितो. हा झाला एक प्रकार. दुसरा प्रकार असा कीं, अ आणि ब हे दोघे व्यापारी आहेत. दोघांची देवघेव असून एकमेकांचे पैसे एकमेकांकडे आहेत. क हा अ चे रु. १०० देणें आहे. हे अ चे रुपये क च्या मनांत देऊन टाकावयाचे आहेत. अ दूर अंतरावर रहाणार असल्यामुळें रुपये पाठविण्यांत खर्च होतो व रुपये वाटेंत गमावण्याचीही भीति असते; म्हणून त्याच्या गांवचा जो ब त्याच्याकडे तो जातो आणि त्याच्याजवळ अ करितां १०० रुपयांची हुंडी मागतो; व ब हा व्यापारी असल्यामुळें हुंड्या विकण्याचा धंदा करितोच, म्हणून रुपये १०० शिवाय तो वर आणखी क जवळ हुंडणावळ मागतो. हुंडणावळ हा ब चा नफा. या हुंडणावळीची कमाल मर्यादा क ला अ कडे रुपये १०० पाठविण्यास जो खर्च येईल तेथपर्यंत असते. कारण या खर्चापेक्षां जास्ती रक्कम ब मागूं लागला तर क प्रत्यक्ष रुपयेच अ कडे पाठवील. या दोन उदाहरणांवरून व्यापारामध्यें हुंड्यांची आवश्यकता किती असते हें दिसून येईल.

आतां आपण पुन्हां सरकारी हुंड्याकडे वळूं. स्टेट सेक्रेटरी हुंड्या कां काढितो ? त्याला पैसे पाहिजे असतात म्हणून. हे पैसे त्याला कां लागतात? त्याच्या स्वतःचा पगार [ आतां हा पगार विलायतसरकार सोशितें ] त्याच्या कौन्सिलच्या सभासदांचा पगार वगैरे, यांकरितां त्यास पैशाची जरूर असते. आतां हिंदुस्थानसरकारावरच ह्या हुंड्या कां काढावयाच्या ? तर हा पगार देण्याची जबाबदारी हिंदुस्थानसरकारावर आहे म्हणून. शिवाय येथील सनदी साहेबनोकर विलायतेस रजेवर गेले असतां त्यांचा पगार त्यांस तेथेंच द्यावा लागतो. तसेंच सनदी नोकर पेन्शन घेऊन परत गेले म्हणजे त्यांचें पेन्शन त्यांस इंग्लंडमध्यें दिलें जातें. त्याचप्रमाणें हिंदुस्थानसरकाराकरितां

सरकारी ऑफिसांना वगैरे लागणारे जिन्नस स्टेट सेक्रेटरी विलायतेंतून खरेदी करून पाठवितो, त्याचे पैसे येथील सरकारानें दिले पाहिजेत. तसेंच विलायतेंत हिंदुस्थानसरकारनें काढलेल्या कर्जावरील व्याज दरवर्षास द्यावयाचें असतें. लष्करी लोकांचीं पेन्शनें व लष्करी इतर खर्च हाही येथील सरकाराकरितां इंग्लंडमध्यें केला जातो. या सर्व रकमा स्टेट सेक्रेटरी देऊन टाकितो, म्हणून हिंदुस्थानसरकाराकडे त्यास पैशाची मागणी करावी लागते. या सगळ्या खर्चाला सामान्यतः "होम चार्जेस" असें इंग्रजींत म्हणतात. हे पैसे हिंदुस्थानसरकार रोख विलायतेस पाठवीत नाहीं; कारण तसें करणें त्रासाचें व खर्चाचें आहे. यास्तव स्टेट सेक्रेटरी हिंदुस्थान सरकारावर हुंड्या काढितो व त्या विलायतेंतील व्यापारी—मुख्यत्वेंकरून एक्सचेंज बँका—विकत घेतात. अर्थात् विशेष त्रासाशिवाय स्टेट सेक्रेटरीला जागच्याजागीं पैसे मिळतात.

आतां ह्या हुंड्या विकत घेणारे व्यापारी कोण ? हिंदुस्थानांतून जो माल इंग्लंडला जातो त्याचे किंमतीचे पेसे माल मागविणाऱ्या व्यापाऱ्यांना इकडे पाठवावयाचे असतात. हे लोक ह्या सरकारी हुंड्या विकत घेतात. कारण रोख पैसे पाठविण्यापेक्षां हुंड्या घेऊन पाठविणें त्यांस सोईचें पडतें. सरकारी हुंड्या विकत घेऊन त्या हे विलायतचे व्यापारी ज्यांच्याकडून त्यांनीं माल मागविला असेल त्यांच्याकडे हिंदुस्थानांत पाठवितात, व मग हिंदुस्थानांतील व्यापारी त्या हुंड्या हिंदुस्थानसरकारावर लागू करितात. हुंडी पाहतांच येथील सरकार हुंडीचे पैसे येथील व्यापाऱ्यांस देतें. हे पैसे म्हणजे विलायतेंत हिंदुस्थानसरकाराकरितां खर्च केले जातात ते—हिंदुस्थानचे तिजोरींतून दिले जातात. हिंदुस्थानसरकारचे तिजोरींत पैसे कोठून येतात ? अर्थात् हे पैसे येथील लोकांकडून करांच्या रूपानें सरकारी तिजोरींत आलेले असतात. यावरून वाचकांच्या एक गोष्ट ध्यानांत येईल कीं, हा सरकारी हुंड्याचा प्रकार हिंदुस्थानच्या विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळें उत्पन्न झाला आहे. दुसऱ्या कोणत्याही देशांत अशी स्थिति असण्याचें कारण नाहीं; व ती नाहींही. वसाहती व इंग्लंड यांच्यामधील जुजबी व्हवहार पेढ्यांच्या मार्फत होत असतात. म्हणजे एकाद्या वसाहतीला ब्रिटिशसरकारास पैसे पाठवावयाचे असले तर वसाहतसरकार तेथील बँकेचीं बिलें विकत घेऊन तीं इंग्लिशसरकाराकडे पाठवितें. हुंड्या विकण्याचें

व विकत घेण्याचें काम पेढ्या करतात. आणि पेढ्यांकडून व्यापारी व्यक्तिशः त्या विकत घेतात. प्रत्यक्ष व्यापाऱ्यांना स्टेट सेक्रेटरी सुद्धां हुंड्या विकीत नाहीं. स्टेट सेक्रेटरीची हुंड्या विकण्याची पद्धति पुढें सांगण्यांत येईल; पण येथें चाणाक्ष वाचकांच्या मनांत एक कल्पना येईल, तिचा जातां जातां उल्लेख केला पाहिजे. वसाहतसरकाराप्रमाणें हिंदुस्थानसरकारास कां करतां येऊं नये ? येथील खाजगी पेढीवाले इंग्लंडच्या पेढीवाल्यांवर हुंड्या काढ• तील त्या सरकारनें विकत घ्याव्या; म्हणजे येथील पेढीवाल्यांकडे पैसे भरावे व त्यांच्या हुंड्या घेऊन त्या स्टेट सेक्रेटरीकडे पाठवाव्या; मग तो त्या तेथील व्यापाऱ्यांवर लागू करून अगर तेथील पेढ्यांना विकून आपले पैसे वसूल करून घेईल. असें करतां येण्यासारखें आहे हें खरें. पण हिंदुस्थानासंबंधानें अशी गोष्ट आहे कीं, येथील सरकारास पुष्कळ पैसे पाठवावयाचे असतात व येथें तितक्या पुरेशा हुंड्या मिळत नाहींत. कां तें पुढें दिसून येईल. म्हणून स्टेट सेक्रेटरीनें हुंड्या काढून त्यांचे पैसे येथें देणें हा एकच मार्ग शक्य असतो. दुसरें कारण, पूर्वी पेढ्या चांगल्या नव्हत्या त्यावेळेपासून ही पद्धति चालत आलेली आहे. १८६२ पासून दुसऱ्या मार्गाचें अवलंबन करण्याचें सोडून सरकारनें हा मार्ग मुकरर केला. सरसकट मानानें पाहतां हिंदुस्थान सरकाराचा विलायती खर्च ( Home charges) दोन कोटी पौंडापर्यंत असतो. सन १८९९।१९०० सालापासूनच्या खर्चाचे आंकडे खालीं दिले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १८९९–१९००–१६१२९००० | पौंड. |
| १९००–१९०१–१६९८२००० | ,, |
| १९०१–०२–१६८७७००० | ,, |
| १९०२–०३–१७६६७००० | ,, |
| १९०३–०४–१७३९९००० | ,, |
| १९०४–०५–१८८२७००० | ,, |
| १९०५–०६–१७६६६००० | ,, |
| १९०६–०७–१८३३३००० | ,, |
| १९०७–०८–१७७६८००० | ,, |
| १९०८–०९–१८३२३००० | ,, |
| १९०९–१०–१८४४१००० | ,, |
| १९१०–११–१८६०५००० | ,, |

| | |
|---|---|
| १९११–१२–१८८६५००० | पौंड |
| १९१२–१३–१९३०२००० | ,, |
| १९१३–१४–१९४५५००० | ,, |
| १९१४–१५–१९५२५००० | ,, |
| १९१५–१६–१९४०३००० | ,, |
| १९१६–१७– | ,, |
| १९१७–१८–२४०००००० | ,, |

ह्या २४००००००० पौंडांत शें. ३९ रेल्वे खर्च, शें. २६ लष्करी वेतन, शें. २० व्याजाबद्दल, व शें. ८ पेनशन् वगैरे. बाकी इतर. १९११–१२ च्या विलायती खर्चाचा तपशील येणेंप्रमाणें:—

| | पौंड. | | पौंड. |
|---|---|---|---|
| पेनशन्–मुलकी | २०६३१०० | पेनशन्–लष्करी | २४७१४०० |
| रजेवर असणारांचा पगार | ४२६५०० | कर्जावरील व्याज | २२८४७०० |
| रेल्वेकरितां काढलेल्या कर्जावरील व्याज | ५२६८६०० | Railway Annuities and Sinking Fund | ३६२३६०० |
| लष्करी वेतन (पेनशन्खेरीज) | २२७७४०० | किरकोळ | ११३०२०० |
| | | एकूण वेरीज | १९५४५५०० |

युद्धापूर्वी सरकारी हुंड्या विकण्याची पद्धती खालीं वर्णन केल्याप्रमाणें होती. ह्या हुंड्या दर बुधवारीं विकीत व त्याबद्दल बँक ऑफ इंग्लंडच्या हपिसांत आदले बुधवारीं नोटीस लावीत. ह्या नोटिशींत एकंदर किती पौंडांच्या हुंड्या विकावयाच्या तो आंकडा लिहीत. त्याचप्रमाणें कमींत कमी अमुक भाव आला पाहिजे असेंही सर्व लोकांना कळविलें जात असे. ज्याची मागणी सर्वांत अधिक असेल ती पतकरण्यांत येई. ज्या लोकांच्या मागण्या कबूल होत त्यांस हिस्सेरश्शीनें हुंड्या देण्यांत येत. १९१७ सालापासून स्टेट सेक्रेटरी हुंड्यांचा भाव आपणच ठरवितो. विकत घेणारावर तो अवलंबून ठेवीत नाहीं. शिवाय स्टेट सेक्रेटरीच्या हपिसांत विशेष पत असलेल्या व्यापाऱ्यांची आणि पेढ्यांची यादी करून ठेवलेली असते, त्यांतील इसमासच हुंड्या विकल्या जातात. कोणी किती रकमेच्या हुंड्या मागाव्या हेंही नोटिशींत लिहिलें जातें. हल्लीं हुंडा विकण्याचा दिवस बुधवार नसून मंगळवार आहे. हा फरक हुंडणावळीचा भाव आपल्या कह्यांत आणण्याकरितां म्हणून केला आहे असें सांगण्यांत येतें.

हिंदुस्थानसरकारास विलायतेस दर साल दीड ते दोन कोटी पौंड पाठवावे लागतात हें वर सांगितलेंच आहे. तेव्हां सरकारी हुंड्या दोन कोटींपर्यंतच निघत असतील असा तर्क करणें स्वाभाविक आहे. व सन १८९३ पर्यंत अशीच वस्तुस्थिति होती. ह्या सालीं सरकारी टांकसळींतून चांदी देऊन रुपये पाडून घेण्याचा लोकांचा हक्क बंद करण्यांत आला. व तेव्हांपासून सरकारी हुंड्यांमुळें व्यापारांत चलबिचल होऊं लागली. व स्टेट सेक्रेटरीचें हर्पास म्हणजे एक व्यापारी पेढी बनली. तथापि १९०२–३ सालापर्यंत खर्च व हुंड्या ह्यांत फारशी तफावत नव्हती. खालील कोष्टकावरून विलायती खर्च व सरकारी हुंड्या ह्यांचें प्रमाण समजेलः—

| वर्ष | खर्च | हुंड्या |
|---|---|---|
| | पौंड | पौंड |
| १८९९–१९०० | १६१२९००० | १९०६७०२२ |
| १९००–१९०१ | १६९८२००० | १३३००२७७ |
| १९०१–१९०२ | १६८७७००० | १८५३९०७१ |
| १९०२–१९०३ | १७६६७००० | १८४९९९४७ |
| १९०३–१९०४ | १७३९९००० | २३८५९३०३ |
| १९०४–१९०५ | १८८२७००० | २४४२५५५८ |
| १९०५–१९०६ | १७६६६००० | ३१५६६९७२ |
| १९०६–१९०७ | १८३३३००० | ३३४३२१९६ |
| १९०७–१९०८ | १७८६८००० | १५३०७०६१ |
| १९०८–१९०९ | १८३२३००० | १३९१५४२६ |
| १९०९–१९१० | १८४४१००० | २७४१६५८६ |
| १९१०–१९११ | १८६०५००० | २६४६३३०३ |
| १९११–१९१२ | १८८६५००० | २७०५८५५० |
| १९१२–१९१३ | १९३०२००० | २५७५९७०६ |
| १९१३–१९१४ | १९४५५००० | ३१२००८२७ |
| १९१४–१९१५ | १९५२५००० | ७७४८१११ |

सन १९१४–१५ साल लढाईचें असल्यामुळें हुंड्यांची संख्या कमी आहे. कारण हिंदुस्थानसरकारासचं विलायतीसरकाराकरितां ह्या देशांत पुष्कळ खर्च करावा लागला. परंतु बाकीच्या सालीं खर्चापेक्षां स्टेट सेक्रेटरीनें हुंड्या पुष्कळ जास्त काढल्या, त्या कां व कशा ? प्रथमतः हुंड्या घेण्यास लोक तयार असतात म्हणून सरकारी हुंड्या बाजारांत खपतात, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हुंड्या कां खपतात ? तर विलायतच्या लोकांना ह्या देशांत पैसे पाठवावयाचे असतात म्हणून. पैसे कां पाठवावे लागतात ? तर इकडून नेलेल्या मालाची किंमत द्यावयाची असते म्हणून. म्हणजे हिंदुस्थानांतून जो माल जातो तो आयात मालापेक्षां नेहेमीं अधिक असतो. आमच्याकरितां विलायतेंत होणारा खर्च जाऊनही आमचें देणें राहातेंच. खालील कोष्टकावरून ही गोष्ट उघड दिसून येईल.

## आयात वजा जातां निवळ निर्गत–

**१९१४ पर्यंत खालील सालांत संपणारी ५ वर्षांची सरासरी ( पौंडाचे आंकडे तेवढ्या हजारांचे आहेत असें समजावें. )**

| | | | |
|---|---|---|---|
| १८८३–८४ | २०७१४ | १९१३–१४ | ५२१७९ |
| १८८८–८९ | २००३९ | १९१४–१५ | २९१०८ |
| १८९३–९४ | २४७७३ | १९१५–१६ | ४३५९६ |
| १८९८–९९ | २५१०६ | १९१६–१७ | ६३६७७ |
| १९०३–०४ | ३०७२७ | १९१७–१८ | ६१४२० |
| १९०८–०९ | ३५६३९ | १९१८–१९ | ५६५५३ |

ह्यावरून हें उघड होतें कीं सरकारी हुंड्या जर अधिक काढल्या नाहींत तर विलायती व्यापाऱ्यांना हिंदुस्थानांत रोकड पाठवावी लागणार. सरकारी हुंड्या आहेत तरी सुद्धां कांहीं रोकड या देशांत यावी लागतेच. पण ह्या हुंड्यांच्या योगानें काय परिणाम होतो तो वाचकांच्या लक्षांत आला असेलच. हुंड्या विकल्यामुळें ह्या देशांत जें सोनें यावयाचें त्याऐवजीं रुपयेच मिळतात. कारण हुंड्यांच्या विक्रीचें सोनें स्टेट सेक्रेटरीजवळ राहातें. व येथें व्यापाऱ्यांस हिंदुस्थानसरकारकडून हुंडणावळीचा भाव असेल त्याप्रमाणें रुपये मिळतात. स्टेट सेक्रेटरीनें आपल्या खर्चापुरतीं कौन्सिलबिलें काढण्याची वहिवाट फार पुरातन म्हणजे कंपनीसरकारपासून आहे. सन १८६२–६३

सालाकरितां ह्या सरकारी हुंड्या साडेसासष्ट लक्ष पौंडाच्याही नव्हत्या. ( ह्या सालचा नक्की आंकडा ६६४१५७६ पौंड आहे. ) त्या हल्लीं सव्वा तीन कोटीपर्यंत आल्या आहेत. अर्थात् जास्त हुंड्या काढण्यांत व्यापाऱ्यांची सोय आहेच. पण त्यांत सरकारचेही विशिष्ट हेतु साध्य करावयाचे असतात. हे हेतु नीट समजण्याकरितां चलनाचा इतिहास समजणें जरूर आहे.

इंग्रजांच्या पूर्वी ह्या देशांत निरनिराळीं रुप्याचीं व सोन्याचीं नाणीं चालू होतीं. ह्या नाण्यांचा इतिहास व स्वरूप कांहीं वर्षांपूर्वी 'ग्रंथमालेंत' प्रसिद्ध केलेल्या मीं आपल्या लेखांत वर्णिलें आहे. सध्यां येथें एवढें सांगणें पुरेसें आहे कीं, कंपनीसरकारचें राज्य सुरू झाल्यावर त्यांनीं सर्व हिंदुस्थानांत एक नाणें सुरू केलें. हें रुप्याचें नाणें होय. पूर्वी चालू असलेलें सोन्याचें नाणें कायदेशीर फेडीचें चलन म्हणून बंद झालें. हल्लीं चालू असलेला रुपया सन १८३५ सालीं सुरू झाला, याचें वजन एक तोळा अगर १८० ग्रेन आहे. यांत १६५ ग्रेन शुद्ध चांदी असून १५ ग्रेन हीणकस धातू असते. ( सन १८३५ चा ॲक्ट १७ ). सोन्याचें नाणें कायदेशीर फेडीचें चलन म्हणून जरी बंद केलें तरी तें व्यवहारांत कित्येक वर्षें चालू होतेंच, व तें टांकसाळींतही पाडीत असत. परंतु ही बाब विशेष महत्त्वाची नसल्यामुळें त्याविषयीं जास्त लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. या ठिकाणीं ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे, हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें चालू असतां तें बंद करण्यांत आलें. सन १८३५ सालीं यूरोपमध्यें रुप्याचेंच चलन पुष्कळ देशांत चालू होतें. रुपये पाडण्याचें काम सरकारनें पतकरलें पण लोकांनाही चांदी देऊन सरकारी टांकसाळींतून रुपये पाडून घेण्याचा हक्क असे. हा हक्क १८९३ सालीं काढून घेण्यांत आला. म्हणून १८३५ ते १८९३ पर्यंतचा कालविभाग पाडणें सोईचें आहे. ह्या इतक्या अवधींत एकंदर ३३५६१००० रुपये टांकसाळींत पाडले गेले. एक तोळा चांदी आणून देई त्यास एक रुपया टांकसाळींतून मिळे. ह्याशिवाय रुपयापाडणावळ म्हणून कांहीं द्यावें लागे तें निराळें. ह्या कामांत सरकारास विशेष नफा होत नसे.

रुप्याच्या चलनाशिवाय १८६१ सालापासून सरकारनें कागदी चलन सुरू केलें. त्याच्या अगोदर प्रेसिडेन्सी बँका नोटा काढीत असत. कागदी चलनामुळें विशेष फरक होण्यासारखा नव्हता. कारण जितक्या नोटा निघ-

तील तितके रुपये अगर चांदी खजिन्यांत ठेवावी लागते. फक्त चार कोटी रुपयांपर्यंत रोखे ठेवण्याची मोकळीक कायद्यानें सरकारास ठेविली होती. या रोख्यांवरील व्याज हाच सरकारचा नफा. हा नफा सरकारी खजिन्यांत जमा होई. वीस वर्षांनीं पुढें चार कोटींची इयत्ता सहा कोटींवर नेली. १८९१ सालीं सहा कोटींच्या ऐवजीं आठ कोटींपर्यंत रोखे ठेवण्याचा अधिकार सरकारास कायद्यानें मिळाला. कागदी चलन सुरू केल्यामुळें सुद्धां वरील नियमाप्रमाणें कोणत्याही तऱ्हेची खळबळ उडण्याचें कारण नव्हतें. खालील कोष्टकावरून १८९३ पर्यंत हा व्यवहार किती सुरळीत चालला होता हें ध्यानांत येईल. जास्त नोटा काढल्या कीं तितकेच रुपये अगर चांदी अगर सोनें ठेवावें लागे.

| मार्च अखेर | चालू कागदी चलन | आंकडे लाखाचे | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | चांदी | सोनें | | | कर्जरोखे | | |
| | | हिंदुस्थान | हिंदु. | इंग्लंड | एकंदर | हिंदुस्थान | इंग्लंड | एकंदर |
| १८६२ ते १८७१ सरासरी | ७६३ | ४८० | ३ | ० | ३ | २८० | ० | २८० |
| १८७२ ते १८८१ ,, | ११८२ | ५९८ | ० | ० | ० | ५८४ | ० | ५८४ |
| १८८२ ते १८९१ ,, | १५७४ | ९६४ | ० | ० | ० | ६१० | ० | ६१० |

१८९२।९३ पर्यंत सर्व कांहीं सुयंत्र चाललें होतें. लोकांस किंवा सरकारास कुरकुर करण्यास कोठेंच जागा नव्हती.

सन १८९३ पर्यंतच्या चलनाचा इतिहास वाचकांनीं नीट लक्षांत ठेवावा म्हणजे पुढें जे फेरबदल करण्यांत आले त्यांचें महत्त्व समजेल. रुपयांची किंमत बहुतेक आंतील चांदीइतकी असे. लोकांस रुपयांची गरज लागली म्हणजे चांदी देऊन ते रुपये पाडून घेत. रुपये फाजील झाले तर धितळाविण्यासही हरकत नव्हती. पण ह्यानंतर चांदीचा भाव एकदम फार उतरला. कित्येकांच्या मतें, चांदी उतरली असें म्हणण्यापेक्षां सोनेंच चढलें हें म्हणणें अधिक बरोबर. कांहीं कां असेना, सोन्यामध्यें चांदीचा भाव सांगावयाचा म्हणजे; चांदी उतरली असें म्हणण्यास हरकत नाहीं. १८७१

नंतर जर्मनी, डेड्मार्क, स्वीडन, नार्वे, हॉलंड फ्रान्स, बेलजम, इटाली, स्वित्झरलंड इत्यादि राष्ट्रांनीं चांदीचें मुख्य नाणें, बंद करून सोन्याचें नाणें सुरू केलें. त्यामुळें सोन्याचा भाव वाढला. त्याचप्रमाणें सोन्यापेक्षां चांदीची उपजही वाढत्या प्रमाणावर होती, हें खालील कोष्टकावरून दिसून येईल. कोष्टकांतिल आंकडे दहा लाखाचे आहेत.

| वर्ष | सोनें | चांदी | वर्ष | सोनें | चांदी |
|---|---|---|---|---|---|
| | औंस | औंस | | औंस | औंस |
| १८३० पर्यंत | १२९ | ४३७४ | १८७५ | ५ | ६२ |
| १८३१ ते ४० | ७ | १९२ | १८७६ | ५ | ६८ |
| १८४१ ते ५० | १८ | २५१ | १८७७ | ६ | ६३ |
| १८५१ ते ५५ | ३२ | १४२ | १८७८ | ६ | ७३ |
| १८५६ ते ६० | ३२ | १४५ | १८७९ | ५ | ७४ |
| १८६१ | ६ | ३५ | १८८० | ५ | ७५ |
| १८६२ | ६ | ३५ | १८८१ | ५ | ७९ |
| १८६३ | ६ | ३५ | १८८२ | ५ | ८६ |
| १८६४ | ६ | ३५ | १८८३ | ५ | ८९ |
| १८६५ | ६ | ३५ | १८८४ | ५ | ८२ |
| १८६६ | ६ | ४३ | १८८५ | ५ | ९२ |
| १८६७ | ६ | ४३ | १८८६ | ५ | ९३ |
| १८६८ | ६ | ४३ | १८८७ | ५ | ९६ |
| १८६९ | ६ | ४३ | १८८८ | ५ | १०९ |
| १८७० | ६ | ४३ | १८८९ | ६ | १२० |
| १८७१ | ६ | ६३ | १८९० | ६ | १२६ |
| १८७२ | ६ | ६३ | १८९१ | ६ | १३७ |
| १८७३ | ५ | ६३ | १८९२ | ७ | १५३ |
| १८७४ | ४ | ५५ | १८९३ | ८ | १६५ |

ह्या आंकड्यांवरून हें उघड दिसून येतें कीं १८६१ सालापासून सोन्याची सर्व जगांतील निपज जवळ जवळ सारखीच असून चांदीची निपज मात्र चौपट झाली. चांदीचा भाव खालावल्यामुळें हिंदुस्थान सरकारची फारच तारंबळ उडाली. येथील सरकारास इंग्लंडमध्यें खर्च करावा लागतो, हें वर सांगितलेंच आहे, व हा खर्च सोन्याच्या नाण्यांत असतो. कारण इंग्लंडमध्यें सोन्याचें नाणें असून ह्या देशांत रुप्याचें नाणें आहे. इंग्लंडमध्यें दरसाल

सुमारें दोन कोटी पौंडांचा हिंदुस्थानसरकारचा खर्च आहे. ह्या देशांत नाणें नाहीं. तेव्हां दोन कोटी पौंडाबद्दल किती द्यावयाचे हा प्रश्न. म्हणजे आपण १ रुपया दिला तर आपणांस किती पेन्स विकत मिळतील हें पाहून तितके रुपये द्यावे लागतील, अर्थात् इंग्लंडच्या बाजारांत सोन्याचा जो भाव असेल त्या मानानें रुपये द्यावे लागतील. आतां सोनें महाग झालें, अगर चांदी स्वस्त झाली, तर आपणांस अधिक रुपये द्यावे लागतील हें उघड आहे. चांदी पुष्कळ झाल्यामुळें तिचा भाव उतरला हें वर सांगितलेंच आहे. तो किती उतरला हें खालील कोष्टकावरून दिसून येईल.

| मार्च अखेर संपणारें वर्ष | चांदीची १ औंसाची सरासरीची किंमत | एक रुपयाला मिळणाऱ्या पेन्साचें सरासरीनें प्रमाण |
|---|---|---|
| १८७२ | ६०$\frac{१}{२}$ पेन्स | २३·१२५ पन्स |
| १८७३ | ६०$\frac{५}{१६}$ ,, | २२·७५० ,, |
| १८७४ | ५९$\frac{१५}{१६}$ ,, | २२·३५१ ,, |
| १८७५ | ५८$\frac{५}{१६}$ ,, | २२.२२१ ,, |
| १८७६ | ५६$\frac{७}{८}$ ,, | २१·६४५ ,, |
| १८७७ | ५२$\frac{७}{१६}$ ,, | २०·४९१ ,, |
| १८७८ | ५४$\frac{१३}{१६}$ ,, | २०·७९० ,, |
| १८७९ | ५२$\frac{९}{१६}$ ,, | १९·७६१ ,, |
| १८८० | ५१$\frac{१}{१६}$ ,, | १९·९६१ ,, |
| १८८१ | ५२$\frac{१}{१६}$ ,, | १९·९५६ ,, |
| १८८२ | ५१$\frac{११}{१६}$ ,, | १९·८९५ ,, |
| १८८३ | ५१$\frac{१}{१६}$ ,, | १९·५२५ ,, |
| १८८४ | ५०$\frac{१५}{१६}$ ,, | १९·५३६ ,, |
| १८८५ | ५०$\frac{७}{१६}$ ,, | १९·३०८ ,, |
| १८८६ | ४८$\frac{५}{१६}$ ,, | १८·२५४ ,, |
| १८८७ | ४५$\frac{७}{१६}$ ,, | १७·४४१ ,, |
| १८८८ | ४४$\frac{८}{१६}$ ,, | १६·८९९ ,, |
| १८८९ | ४२$\frac{७}{१६}$ ,, | १६·३७९ ,, |
| १८९० | ४२$\frac{१३}{१६}$ ,, | १६·५६६ ,, |
| १८९१ | ४७$\frac{११}{१६}$ ,, | १८·०८९ ,, |
| १८९२ | ४५$\frac{१}{१६}$ ,, | १६·७३३ ,, |
| १८९३ | ३९$\frac{५३}{१६}$ ,, | १४·९८४ ,, |

१८७२ सालीं एक रुपयास तेवीस पेन्स मिळत असत, तेथें १८९३ सालीं चौदा पेन्स मिळूं लागले. म्हणजे २३ पेन्स विकत घेण्याकरितां एक रुपयाच्या ऐवजीं १८९३ सालीं जवळजवळ पावणे दोन रुपये देण्याचा प्रसंग आला. एक रुपयाला चोविस पेन्स मिळूं लागले तर एक पौंडाला आपणास १० रुपये द्यावे लागतील म्हणून दोन कोंटी पौंडाकरितां वीस कोटी रुपये येथून पाठवावे लागणार. पण एक रुपयास सोळा पेन्सच मिळूं लागले तर वीस कोटीच्या ऐवजीं तीस कोटी रुपये हिंदुस्थानसरकारास विलायतेस पाठविणें भाग आहे. म्हणजे एकदम दहा कोटींची तफावत पडते; सरकारचीं अंदाजपत्रकें चुकतात; हिंदुस्थान सरकारचें जितकें उत्पन्न आहे त्याचा $\frac{1}{5}$ हिस्सा इंग्लंडमध्यें पाठवावा लागतो. शंभर कोटींच्या उत्पन्नांतून एक रुपयाला दोन शिलिंग हें प्रमाण असतां वीस कोटी द्यायचे. पण तोच भाव चढला—म्हणजे रुपयास सोळा पेन्स मिळूं लागले—म्हणजे तीस कोटी रुपये द्यावे लागतील. अर्थात् ८० कोटींतून अचानक दहा कोटी कमी झाले तर राज्यकारभाराला हरकत येईल हें निराळें सांगणें नको. चांदीचा बाजारभाव उतरला म्हणजे रुपयाची किंमतही उतरते. उलट चांदी वाढली म्हणजे रुपयाची किंमतही वाढते. एका रुपयांत १६५ ग्रेन शुद्ध चांदी असते, म्हणून रुपयाची किंमत ह्या चांदीवरच अवलंबून असते. बाकीच्या पंधरा ग्रेन हीणकस धातूला कोणी विचारीत नाहीं. शुद्ध चांदीच्या एका औंसाची बाजारांत अमुक किंमत असली म्हणजे रुपयांतील १६५ ग्रेन चांदीची किंमत अमुक असते हें पुढील कोष्टकावरून समजेल.

ठोकळ मानानें रुपयाचा भाव एका पेन्सानें जरी कमी झाला, तरी दहा लाख पौंडाचा बोजा हिंदुस्थानवर चढतो. यामुळें, अंदाजापेक्षां फारच जास्त रुपये पाठविण्याचा प्रसंग आला, तेव्हां यास काय उपाय योजावे इकडेही सरकारचें लक्ष लागलें. स्वस्त झालेले रुपये महाग करावयाचे ही गोष्ट तर निर्विवाद आहे. पण हें कोणत्या उपायानें करावयाचें हा मुख्य प्रश्न. तसेंच या देशांत रुप्याचें नाणें असल्यामुळें हा प्रसंग उद्भवतो, करितां या आपत्तीचें बीज जी ही चलनभिन्नता तेंच समूळ नाहींसें करणें हा दुसरा उपाय. ह्याशिवाय तिसरा उपाय म्हणजे हिंदुस्थानसरकारनें इंग्लंडमधील आपला खर्चच कमी करणें. इंग्लंडमध्यें कर्ज न काढतां ह्याच देशांत

| लंडन बाजारांतील शुद्ध चांदीची किंमत दर औंसास | त्याच दरानें रुपयांतील १६५ ग्रेनांची किंमत | लंडन बाजारांतील शुद्ध चांदीची किंमत दर औंसास | त्याच दरानें रुपयांतील १६५ ग्रेनांची किंमत |
|---|---|---|---|
| पेन्स | पेन्स | पेन्स | पेन्स |
| २० | ७.४३२ | ४३ | १५.९७९ |
| २१ | ७.८०४ | ४४ | १६.३५१ |
| २२ | ८.१७६ | ४५ | १६.७२३ |
| २३ | ८.५४७ | ४६ | १७.०९४ |
| २४ | ८.९१८ | ४७ | १७.४६६ |
| २५ | ९.२९१ | ४८ | १७.८३८ |
| २६ | ९.६६२ | ४९ | १८.२०९ |
| २७ | १०.०३४ | ५० | १८.५८१ |
| २८ | १०.०४६ | ५१ | १८.९५२ |
| २९ | १०.७७७ | ५२ | १९.३२४ |
| ३० | ११.१४९ | ५३ | १९.६९६ |
| ३१ | ११.५२० | ५४ | २०.०६७ |
| ३२ | ११.८९२ | ५५ | २०.४३९ |
| ३३ | १२.२६३ | ५६ | २०.८११ |
| ३४ | १२.६३५ | ५७ | २१.१८२ |
| ३५ | १३.००७ | ५८ | २१.५५४ |
| ३६ | १३.३७८ | ५९ | २१.९२५ |
| ३७ | १३.७५० | ६० | २२.२९७ |
| ३८ | १४.१२१ | ६१ | २२.६७१ |
| ३९ | १४.४९३ | ६२ | २३.०४१ |
| ४० | १४.८६५ | ६३ | २३.४१२ |
| ४१ | १५.२३६ | ६४ | २३.८७२ |
| ४२ | १५.६०८ | ६५ | २४.१५६ |

कर्ज काढलें म्हणजे दोन तीन कोटींची वचत होईल. सन १९१८ मार्च अखेर विलायतेंत आजपर्यंत काढलेल्या कर्जाचा आंकडा ३३,६५,००,००० पौंडाचा आहे. सन १८९९ सालापासून इंग्लंडमध्यें काढलेल्या कर्जाची कल्पना खालील कोष्टकावरून करितां येईल.

| वर्ष | कर्ज ( आंकडे हजारांचे ) |
|---|---|
| १८९९–१९०० | ६५०० पौंड |
| १९००–१९०१ | १४४२२ ,, |
| १९०१–१९०२ | ६००९ ,, |
| १९०२–१९०३ | ५००० ,, |
| १९०३–१९०४ | ३५०० ,, |
| १९०४–१९०५ | ३००० ,, |
| १९०५–१९०६ | १४४८० ,, |
| १९०६–१९०७ | २००० ,, |
| १९०७–१९०८ | १०७७७ ,, |
| १९०८–१९०९ | ११३४२ ,, |
| १९०९–१९१० | १५०६९ ,, |
| १९१०–१९११ | १३८७८ ,, |
| १९११–१९१२ | ७३५५ ,, |
| १९१२–१९१३ | ३००० ,, |
| १९१३–१९१४ | ३००० ,, |
| १९१४–१९१५ | १४७१५ ,, |

यावरून दिसून येईल कीं, वीस लक्ष पौंड अगर दोन तीन कोटी रुपयांकरितांही हिंदुस्थानसरकारनें विलायतेंत धांव मारली. १५० कोटी रुपये ज्या हिंदुस्थाननें ब्रिटिश सरकारास बहाल केले त्यास वीस कोटी रुपये कर्जाऊ देणें अशक्य नव्हतें.

हिंदुस्थान सरकारनें एकंदर कर्ज येथें व इंग्लंडमध्यें किती काढलें तें पुढील कोष्टकावरून दिसेलः—

( आंकडे दशलक्ष पौंडांचे )

| वर्ष | विलायतेंतील कर्ज | हिंदुस्थानांतील कर्ज | एकंदर |
|---|---|---|---|
| १७९२ | ... | ... | ९ |
| १८२९ | ... | ... | ३० |
| १८५० | ... | ... | ५१ |
| १८५८ | ... | ... | ६९॥ |
| १८७६ | ... | ... | १३९ |
| १८८८ | ८४ | ६५ | १४९ |
| १८९३ | १०६ | ६८ | १७४ |
| १८९८ | १२४ | ७४ | १९८ |
| १९०३ | १३४ | ७८ | २१२ |
| १९०८ | १५६ | ८९ | २४५ |
| १९१३ | ... | ... | २७४ |
| १९१६ | १८२ | १०४ | २८६ |

शिवाय हिंदुस्थानांत परदेशीं पाठविलेल्या मालाची किंमत म्हणून दरसाल सोनें अगर रुपें येत आहे असें सरकारचेंच म्हणणें आहे. तीच गोष्ट इंडिया ऑफिसच्या खर्चाची. हिंदुस्थान सरकारचे नोकरांना रुपयांतच पगार देण्यास कांहीं हरकत नाहीं. या देशाचें चलन चांदीचें असल्यामुळें सर्व कामगारांचा पगार या चलनांत कायम करणें अन्यायाचें नाहीं. आतां १९२०।२१ सालापासून तर इंडिआ ऑफीसच्या खर्चापैकीं दरसाल १३६५०० पौंड खर्च आपण सोसण्याचें विलायत सरकारनें ठरविलें आहे- त्याचप्रमाणें सरकारी खात्यांना लागणारा माल पुष्कळसा येथेंच खरेदी केला तर तीही कटकट मिटण्यासारखी आहे. तात्पर्य; इंग्लंडमध्यें होणारा खर्च बंद करणें, निदान त्या दिशेनें प्रयत्न करणें, अशक्य कोटींतील नव्हतें. अथवा दरसाल अमुक औंस चांदी आम्ही खरेदी करणार असें सरकारनें प्रसिद्ध करणें व जरूर तर खरेदी करणें हाही एक प्रयोग करून पाहण्या- सारखा होता. असो. हिंदुस्थान सरकारची अशी धांदल चालू असतां या सगळ्या प्रकरणाचा विचार करण्याकरितां एक कमिटी बसली. अध्यक्षाच्या नांवावरून या कमेटीला ' हर्शेल कमिटी ' म्हणण्याचा प्रघात आहे. या कमिटीच्या सूचना येणेंप्रमाणें:—लोकांकरितां टांकसाळी

बंद करणें,—म्हणजे चांदी घेऊन लोकांस रुपये पाडून सरकार देत असे तें बंद करणें; तथापि लोकांनीं सोनें आणून दिलें तर १६ पेन्साला एक रुपया या दरानें रुपये पाडून देणें; तसेंच सरकारी करांत कोणी वरील दराप्रमाणें सोनें आणून देईल तर तें घेणें, इत्यादि. या सूचना सरकारनें तावडतोब अमलांत आणल्या (जून १८९३). टांकसाळी लोकांपुरत्या बंद केल्या. मात्र आपणास स्वतःकरितां रुपये पाडण्याचा हक्क सरकारनें राखून ठेवला. तसेंच टांकसाळींत शुद्ध सोनें अगर सॉव्हरिन आणून देणाऱ्यास ७.५३४४ ग्रेनास अथवा १६ पेन्सास एक रुपया या दरानें रुपये दिले जातील असें सरकारनें जाहीर केलें. शिवाय सरकारी देण्यांतही १५ रुपयांस सॉव्हरिन अगर ७॥ रुपयांस अर्धा सॉव्हरिन या दरानें सॉव्हरिन अगर अर्धा सॉव्हरिन देण्यास लोकांस सरकारनें मुभा दिली. हा हर्शल-कमिटीचा रिपोर्ट अत्यंत महत्त्वाचा आहे हें वाचकांस निराळें सांगावयास नको. सोन्या--रुप्याचा भाव कायम करून टाकणें म्हणजे जगांतील व्यापाराचीं सूत्रें आपल्या मुठींत दाबून ठेवण्याचा प्रयत्न करणें होय. सरकार आतां प्रत्यक्ष व्यापारांत पडलें. व्यापारांत पडलें इतकेंच नव्हे तर व्यापारांतील मुख्य दोन जिनसांचे परस्परभाव आम्हीं ठरविल्याप्रमाणें राहिलेच पाहिजेत अशी त्यांनीं हांव धरली. आपला हेतु तडीस नेण्याकरितां सरकारास वाटेल त्या उपायाचें अवलंबन करावें लागलें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. जगांत अशा प्रकारचा धाडसी प्रयत्न कोणी केला असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. यामुळें विलायती खर्चापुरत्याच हुंड्या न विकतां अमर्याद हुंड्या विकण्याचें स्टेट सेक्रेटरीनें ठरविलें. दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे रुपयाची आणि चांदीची फारकत केली. आजपर्यंत रुपयाचा भाव चांदीवर अवलंबून असे. पण नवे रुपये पाडणें बंद करून कृत्रिम रीतीनें रुपये महाग केले. १८९३ च्या बाजारभावानें रुपयाची किंमत खरोखरी १४$\frac{१०७}{१२८}$ पेन्स होती; पण सरकारी रीतीनें ती आतां १६ पेन्स झाली.

तिसरा फरक म्हणजे सोनें कायदेशीर फेडीचें चलन झालें; मात्र सोन्याचें नाणें ह्या देशांत पाडण्याचा विचार अद्यापि झाला नाहीं. तथापि सोन्याचें नाणें कधीं ना कधीं तरी सुरू करण्याचा उद्देश सरकारचा उघड

असला पाहिजे. एरवीं सरकारी देण्यांत सॉव्हरिन अगर सोनें घेण्याचा त्यांनीं उपक्रम सुरू केला नसता.

टांकसाळी लोकांना बंद केल्यानंतर कांहीं वर्षें सरकारच्या हेतूप्रमाणें बाजारभाव रुपयाला सोळा पेन्सांवर आला नाहीं. स्टेट सेक्रेटरीला आपल्या हुंड्या कमी भावानें विकाव्या लागल्या. १८९४–९५ सालाचा सरासरीचा भाव तर तेरा पेन्सच होता. पण ज्यास्त रुपये न पाडण्याच्या सरकारच्या नियमामुळें सन १८९८—९९ सालीं अखेरीस सरकारी भावाजवळ जवळ बाजारभाव आला. इतक्यांत दुसरी एक कमिटी ह्याच कामासाठीं बसली होती, तिचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. ह्या कमिटीचे अध्यक्ष फाउलर साहेब असल्यामुळें तिला 'फाउलर कमिटी' असें म्हणतात. ( १ ) हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरू करावें; ( २ ) हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें लोकांकरितां पाडून द्यावें; ( ३ ) रुपया उपनाणें ( Token coin ) करूनही अमर्यादित रकमेपर्यंत तें कायदेशीर फेडीचें चलन म्हणून कायम ठेवावें. ( ४ ) रुपये पाडून जो फायदा होईल त्याचें सोनें घेऊन पुढें सोन्याचें नाणें पाडण्याकरितां तें वेगळें ठेवावें. येणेंप्रमाणें ह्या कमिटीनें शिफारशी केल्या. ह्यांपैकीं सोन्याचें नाणें चालू करण्याचें कांहीं वर्षें घाटत होतें. पण अखेरीस तो विचार ब्रिटिश ट्रेझरीनें फार विघ्नें आणल्यामुळें कायमचा सोडून देण्यांत आला. बाकीच्या सूचना सरकारनें अमलांत आणल्या. आतां वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं, सोन्याचें मुख्य नाणें सुरू करणें यावरच बाकीच्या सूचना अवलंबून होत्या. सोन्याचें नाणें पाडण्याची शिफारस कमिटीनें केली नसती तर सोन्याचा संचय करण्यास सांगण्याचेंहि प्रयोजन नव्हतें. तसेंच देशांत मुख्य नाणें सोन्याचें असावें असल्या शिफारशीमुळेंच रुपया हा उपनाणें करण्याचें कमिटीनें सुचविलें. पण मुख्य सूचना सोडून तिला पोषक ज्या दुसऱ्या सूचना तेवढ्याच उचलल्यानें हिंदुस्थानच्या चलनपद्धतींत अधिकच घोटाळा झाला. सन १८९९ सालापर्यंत हिंदुस्थानांतील चलनाचा इतिहास येणेंप्रमाणें आहे.

ह्यापुढें आपल्या चलनपद्धतीला निराळेंच स्वरूप येऊं लागलें. ह्या देशांत सोन्याचें नाणें नाहीं, सोन्याचें परिमाण नाहीं, व सोनेंहि नाहीं. मुख्य नाणें तर उपनाणें होऊन बसलेलें. दहा अकरा आण्यांना सोळा आणे म्हणावयाचे अशी स्थिति. हल्लीं या देशांत ' गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड ' आहे;

' गोल्ड स्टँडर्ड नाहीं. ' स्टँडर्ड म्हणजे परिमाण--मोलाचें परिमाण. रुपया हें उपनाणें ( Token coin ) असल्यामुळें तो मोलाचें परिमाण ( Standard of value ) नाहीं. एक रुपया दिला असतां जितकें सोनें मिळेल तेंच सध्यां परिमाण समजावयाचें; व ह्याचेंच नांव ' गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड.' स्टेट सेक्रेटरी व हिंदुस्थान सरकार यांच्या दरम्यान पत्रव्यवहार होऊन १९०० च्या दिसेंबर महिन्यांत वरील योजना मुक्रर झाली. ह्या योजनेच्या मुळाशीं कल्पना अशी आहे कीं, देशांतील व्यवहाराकरितां रुप्याचें नाणें बस्स आहे, सोन्याच्या नाण्याचें कांहीं कारण नाहीं. परदेशीय व्यवहाराकरितां फक्त सोनें असलें म्हणजे पुरे. देशांतील लोकांना रुपये देऊन सोनें हक्कानें मागतां येऊं नये, पण ठरीव दरानें व्यापाऱ्यांच्या सोयीसाठीं आयात मालाची किंमत देण्याकरितां सोनें परदेशीं पाठवितां येईल; अशी सरकारनें तजवीज करावी. व ह्यासाठीं हा सुवर्णनिधि इंग्लंडमध्यें असावा; कारण, इंग्लंडच्या बाजारांतच हिंदुस्थानास पैसे द्यावयाचे असतात. सोन्याचें नाणें ह्या देशांत पाडतां यावें म्हणून रुपये पाडून झालेल्या नफ्यांतून सुवर्णनिधि करावयाचा हा फाउलर-कमिटीचा उद्देश नसून त्याच्या ऐवजीं परदेशीय कर्ज सोन्यांतच फेडतां यावें व हुंडणावळीचा सरकारी दर कायम राहावा, हा आहे.

सुवर्णनिधीला सन १९०१ सालीं सुरवात झाली. हिंदुस्थानसरकारनें रुपये पुष्कळ पाडले, त्यामुळें नफाही पुष्कळ झाला. सन १९०० सालापूर्वी इंग्लंडमध्यें हिंदुस्थानचें सोनें मुळींच नव्हतें, व १८९० सालाच्या अगोदर ह्या देशांतही तींच स्थिति होती. हिंदुस्थानच्या चलनपद्धतींत सुवर्णनिधि हीच वादविवादाची महत्त्वाची बाब होऊन बसली आहे. कारण रुपया उपनाणें ठरलेंच. सरकारास वाटेल तेव्हां तें रुपये पाडणार. कौन्सिलबिलें जास्त विकलीं गेलीं व सरकारी खजिन्यांत तितके रुपये नसले, म्हणजे अधिक रुपये पाडणें आवश्यक होतें. चांदी जितकी स्वस्त तितका हा नफा विशेष. रुपये वितळविण्यांत आतां लोकांचा फायदा नसल्यामुळें नवीन पाडलेला प्रत्येक रुपया चलनांत भर घालतो. नाणें फाजील झालें म्हणजे पदार्थ महाग होतात. आतां सरकारनें रुपये कितीही पाडले तरी लोकांस गरज नसल्यास घेतो कोण, व कसे घेणार, अशी शंका येईल. त्यासाठीं ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, सरकार रुपये पाडतें त्यास तीन कारणें

असतात. सरकारास स्वतः खर्च करावयाचा असेल तेव्हां, लोकांनीं सरकारास सोनें किंवा सॉव्हरीन नेऊन दिले व त्याऐवजीं मागें सांगिलेल्या भावानें रुपये मागितले तर, किंवा सरकारी हुंड्या वटावण्याकरितां, स्टेट सेक्रेटरी कौन्सिलबिलें लागतील तेवढीं विकतो, त्यांचे आलेले सॉव्हरीन आपलेजवळ ठेवितो, आणि हिंदुस्थानसरकास त्या हुंडयांचे रुपये देण्यास लावितो. सरकारी हुंडयांची मर्यादा म्हणजे हिंदुस्थान सरकारची त्या हुंड्या वटावण्याची शक्ति होय.

कागदी चलनासंबंधानें विचार केला तर, जितक्या नोटा काढाव्या तितके रुपये किंवा चांदी ठेवणें इतके दिवस भाग असे. त्यामुळें त्यांत विशेष भानगड नसे. पुढें सरकारनें कायदा करून सोन्याच्या आधारावर नोटा काढण्याचें ठरविलें, समजा, दहा लाखांचें सोनें अगर सॉव्हरिन कोणी आणून दिले तर त्यास दहा लाखांच्या नवीन नोटा पाडून सरकार देऊं लागेल. शिवाय स्टेट सेक्रेटरीकडे विलायतेंत असलेल्या सोन्याच्या आधारावरही नोटा काढण्याचा अधिकार सरकारनें आपल्याकडे घेतला. म्हणून सोन्याचा संचय सरकारजवळ पुष्कळ झाला. याकरितां आधीं त्याचाच विचार करणें अगत्याचें आहे. हें सोनें अगर सोन्याचें नाणें कोठें तरी तीन खात्यांत असलें पाहिजे. सरकारचा कर वसूल झाला म्हणजे त्यांत कांहीं सोनें असतें. सरकारजवळ शिल्लक नेहमीं असतेच. ही शिल्लक कांहीं इंग्लंडमध्येंही असते. इंग्लंडमधील शिल्लक अर्थात् सोन्यांतच असते. हिंदुस्थानांतील शिल्लक सरकारी खजिन्यांत–जिल्ह्याचे ठिकाणीं सर्व देशभर–शिलकी तिजोरींत आणि प्रेसिडेन्सी ब्यांकांत ठेवलेली असते. सोनें जमण्याचें दुसरें ठिकाण म्हणजे "पेपर करन्सी रिझर्व्ह,"—कागदी चलन-खातें. आणि तिसरें ठिकाण म्हणजे "गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह." ह्याशिवाय सरकारी पैसा अन्यत्र असणें शक्य नाहीं. यांतील तीनही शिलकांचे हिशेब निरनिराळे असतात.

१९००च्या अगोदर आमच्या चलनाला सोन्याचा गंधही नव्हता, हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां शिलकी तिजोरींत सोनें १९०० नंतरच असणें संभवनीय आहे. हें सोनें किती, कोठें, व कसकसें असतें, याचा अजमास पुढील कोष्टकावरून करितां येईल.

JAN 1994

( दरवर्षी मार्च अखेर )

| वर्ष | हिंदुस्थानांतील | | | | | लंडन मधील | हिंदुस्थान व इंग्लंडमधील एकंदरींत शिल्लक. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | शिलकी खजिना कोटी रु. | प्रेसीडेन्सी बँक्स कोटी रु. | जिल्ह्यांतील खजिने कोटी रु. | एकंदर रुपये कोटी रु. | पांचव्या कोष्टकांतील रुपयांचे पौंड, १ पौंडास १५ रुपयेप्रमाणें | | |
| | | | | | दशलक्ष पौंड | दशलक्ष पौंड | दशलक्ष पौंड |
| १९०७-८ | ६.० | ४.१ | ९.२ | १९.३ | १२.८ | ४.६ | १७.४ |
| १९०८-९ | ४.४ | ३.५ | ७.५ | १५.४ | १०.२ | ८.० | १८.२ |
| १९०९-१० | ५.३ | ४.१ | ९.० | १८.४ | १२.३ | १२.८ | २५.१ |
| १९१०-११ | ६.७ | ४.१ | ९.६ | २०.४ | १३.६ | १६.७ | ३०.३ |
| १९११-१२ | ५.२ | ४.५ | ८.७ | १८.४ | १२.३ | १८.४ | ३०.७ |
| १९१२-१३ | १३.३ | ५.७ | ९.९ | २८.९ | १९.३ | ८.८ | २८.१ |
| १९१३-१४ | ७.४ | ६.० | १०.० | २३.४ | १५.६ | ८.१ | २३.७ |
| १९१४-१५ | ६.१ | ५.९ | १०.२ | २२.२ | १४.८ | ७.९ | २२.७ |
| १९१५-१६ | ३.६ | ५.४ | ९.० | १८.० | १२.० | ७.० | १९.० |
| १९१६-१७ | ४.६ | १०.१ | ८.२ | २२.९ | १५.३ | ५.४ | २०.७ |
| १९१७-१८ | २.५ | १२.९ | ७.६ | २३.० | १५.३ | १०.६ | २५.९ |
| १९१८-१९ | ३.६ | ११.८ | १०.६ | २६.० | १७.३ | १४.७ | ३२.० |

वरील कोष्टकावरून असें दिसून येईल कीं, सरकारमहसुलापैकीं सुद्धां स्टेट सेक्रेटरींच्या तिजोरींत त्याच्यां खर्चाकरितां वरीचशी रकम शिल्लक ठेवली जाते. ह्याशिवाय वरीचशी रक्कम प्रेसिडेन्सी व्यांक्यांत असते. ह्या रकमांवर सरकारास व्याज मिळत नाहीं. नोटा काढण्याचा व्यांकांचा हक्क सरकारनें काढून घेतला, त्याचा मोबदला म्हणून विनव्याजी रकम सरकार त्या व्यांकांमध्यें ठेवतें. हेतु कांहीं कां असेना, पण त्याचा परिणाम असा होतो कीं, विलायती व्यापाऱ्यांना १०।१२ कोटी रुपये फुकटचे वापरावयास मिळतात. आतां सरकारी व्यांका स्थापन झाल्यामुळें हा प्रश्नच राहत नाहीं.

आतां आपण कागदी चलन–निधीकडे वळूं. इसवी सन १८९८ पर्यंत हा निधि रुपयांमध्येंच असे. १८९८ च्या कायद्यानें सोन्याचें नाणेंही ठेवण्याचा अधिकार सरकारास मिळाला. सन १९०० च्या कायद्यानें ह्यापैकीं कांहीं सोनें विलायतेंत ठेवण्याची परवानगी दिली. १९०५ च्या कायद्यानें रुपये मात्र ह्या देशांत ठेवून वाटेल तितकें सोनें हिंदुस्थानांत अगर इंग्लंडमध्यें ठेवण्याची मुभा सरकारास मिळाली. पुढील कोष्टकावरून वाचकांना सर्व माहिती एकत्र मिळेल.

सन १८६१ च्या कायद्यानें कागदी पैसा काढण्याचा अधिकार हिंदुस्थानसरकारास मिळाला. १८९८ चा कायदा होईपर्यंत हा निधि रुपयांतच असे. १८७१ सालापूर्वी फक्त ३ लाख रुपयांचें सोनें या निधीमध्यें होतें. पुढें १८९८ नंतर हिंदुस्थानांत सोनें जमा होऊं लागलें, तोंच १९०० च्या कायद्यानें तें सोनें विलायतेंत ठेवण्यास सवड मिळाली. त्याचा परिणाम असा झाला कीं, ९।१० कोटीपर्यंत सोनें विलायतेंत राहूं लागलें. सॉव्हरिन आणून देणाऱ्यास दर सॉव्हरिनला रुपये १५ प्रमाणें सरकार देण्यास तयार झालें. तेव्हांपासून कागदी चलनाच्या निधींत सोनें येऊं लागलें. इकडून पाठविलेल्या मालाची किंमत म्हणून विलायतेंतून आलेले सॉव्हरिन देऊन व्यापारी लोक रुपये मागत. हे सॉव्हरिन अगर सोनें कागदी चलनाच्या निधींत ठेवून त्या ऐवजीं सरकार व्यापाऱ्यांना नोटा अगर रुपये देत असे. इकडे सोनें जमूं लागतांच तें विलायतेंत ठेवतां येईल अशी कायद्यानें योजना केली, आणि लगेच हिंदुस्थानांतील कागदी चलन–सुवर्णनिधि बराचसा विलायतेंत नेण्यांत आला. हें सोनें विलायतेंत

( आंकडे लाखांचे, व रुपयांमध्यें. )

| मार्चअखेर संपणारें साल | नोटांचा एकंदर वापर. | गंगाजळी कोठें व किती हें दाखविणारें कोष्टक | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | चांदी | सोनें | | | रोखे | | |
| | | हिंदुस्थान | हिंदुस्थान | इंग्लंड | ए. बेरीज | हिंदुस्थान | इंग्लंड | बेरीज |
| १८६२–७१ सरासरी | ७६३ | ४८० | ३ | ० | ३ | २८० | ० | २८० |
| १८७२–८१ ,, | ११८२ | ५९८ | ० | ० | ० | ५८४ | ० | ५८४ |
| १८८२–९१ ,, | १५७४ | ९३४ | ० | ० | ० | ६१० | ० | ६१० |
| १८९२–१९०१ ,, | २७२९ | १५७४ | २३२ | २३ | २५५ | ९०० | ० | ९०० |
| १९०२–१९११ ,, | ४३८२ | १९४५ | ९१५ | ४०२ | १३१७ | १००० | १२० | ११२० |
| १९१२ | ६१३६ | १५४८ | २३३३ | ८५५ | ३१८८ | १००० | ४०० | १४०० |
| १९१३ | ६८९८ | १६४५ | २९३८ | ९१५ | ३८५३ | १००० | ४०० | १४०० |
| १९१४ | ६६१२ | २०५३ | २२४४ | ९१५ | ३१५९ | १००० | ४०० | १४०० |

कां ?—असा प्रश्न सहजच उद्भवतो. याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं, सोन्याची जरूरी येथल्यापेक्षां तेथें अधिक. तेथें सोनें ठेवल्यानें रुपये पाडण्यासाठीं त्या देशांत चांदी खरेदी करावी लागते तेव्हां आयत्यावेळीं सोनें उपयोगी पडावें. निर्गतीपेक्षां आयात जास्त झाल्यास इकडून सोनें पाठविण्याची दगदग व खर्च वांचेल. त्याप्रमाणें इंग्लंडमध्यें सोनें असल्यानें रुपया सोन्याचा दर कायम ठेवण्यास सोनें देण्याची पाळी आल्यास अधिक मदत होईल. यावर उलट म्हणणें असें आहे कीं, कागदी चलनाच्या ऐवजीं तितकींच रोकड ठेवण्याचा उद्देश इंग्लंडांत सोनें ठेवल्यानें सफल होत नाहीं. कागदाला कांहीं किंमत नाहीं. त्याचे वाटेल तेव्हां रुपये मिळतील असा भरंवसा असल्यामुळें कागदाच्या चिटोऱ्याला १००० रुपये १०००० रुपये समजून लोक ते वापरतात. पण जेथें कागदी चलन तेथेंच जर हा निधि नाहीं तर प्रसंगाला त्या निधीचा कांहीं उपयोग होणार नाहीं. तसें चांदी विकत घेण्याकरितां सोनें ठेवणें तें नियमित प्रमाणांत ठेवतां येण्यासारखें आहे. कारण रुपये पाडण्याचा अंदाज सरकारास आगाऊ होण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें निर्गतहून आयात फारच अधिक असा प्रसंग फारच क्वचित् येतो; नाहीं म्हटलें तरी चालेल. कागदी चलननिधीपैकीं विलायतेंतील सोनें ब्यांक ऑफ इंग्लंडमध्यें ठेवलें जातें. वरील विवेचनावरून एक गोष्ट ध्यानांत येईल कीं, कागदी चलन–निधि व सुवर्ण-विनिमय–परिमाणनिधि यांत वस्तुतः कांहींच फरक नाहीं अशी हल्लीं स्थिति आहे. त्याचप्रमाणें नियमित रकमेपर्यंत रोकडीच्या ऐवजीं रोखे ठेवण्याची सवलत कायद्यानें दिली असल्यामुळें त्याचाही फायदा इंग्लिश व्यापाऱ्यांना मिळतो, हें वरील कोष्टकावरून दिसून येईल.

सन १९१२ पासून चार कोटी रुपये विलायती कर्जात अडविले आहेत. ह्या देशांत व्याज मिळतें तितकें विलायतेंत मिळत नाहीं. येथें ५॥ टक्के मिळूं शकतात. पण विलायतेंत २॥ टक्के व्याजाचे कर्जरोखे घेणें प्राप्त होतें. चार कोटी रुपये विलायती व्यापाऱ्यांना हलक्या व्याजानें वापरण्यास सांपडतात.

आतां आपण सुवर्णविनिमय–परिणामनिधींल सोन्याचा विचार करूं. हा निधि प्रथम सोन्याचें नाणें हिंदुस्थानांत सुरू करण्याचे इराद्यानें स्थापित झाला व रुपये पाडून जो नफा होईल त्या नफ्यांत हा सुवर्णनिधि निर्माण

करण्याचें ठरलें. आंतील चांदीपेक्षां रुपयाची किंमत कृत्रिम तऱ्हेनें वाढविली. चांदी स्वस्त झाली तेव्हां रुपया वितळविला तर त्याची १० आण्यांपेक्षां ज्यास्त किंमत झाली नसती. अर्थात् दर रुपयामागें ६ आणे सरकारास नफा मिळत असे. या नफ्यानें सुवर्णनिधि रचला गेला. या निधीस 'गोल्ड स्टँडर्ड रिझर्व्ह' म्हणतात; परंतु कांहीं रुपयेहि या निधींत ठेवतात. तेव्हां सुवर्णनिधि हें नांव अगदीं सार्थ आहे असें समजूं नये. हा निधि सन १९०० सालापासून सुरू झाला आहे, हें मागें सांगितलेंच आहे. तेव्हांपासून आजपर्यंत हा निधि कोठें, कोणत्या प्रमाणांत, ठेवण्यांत आला हें पुढील कोष्टकावरून समजेल. **आंकडे हजाराचे असून पौंडाचे आहेत.**

वरील कोष्टकावरून एक गोष्ट उघड दिसून येईल कीं, ह्या सुवर्णनिधींत सोन्याचा पत्ता नाहीं. सर्व कागदच. तेव्हां याला सुवर्णनिधि म्हणण्यापेक्षां कागद-निधि म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. जमलेलें सर्व सोनें कर्जरोख्यांत गुंतविलें गेलें म्हणजे ह्या सोन्याचा फायदा विलायतच्या लोकांना मिळाला हें तर उघड दिसतेंच आहे. पण जमवून ठेवण्याचा उद्देश काय ? तर प्रसंगीं, म्हणजे निर्गतीपेक्षां आयात जास्त होऊन व्यापाराचा आढावा ( Balance if trade ) हिंदुस्थानच्या विरुद्ध जाईल व त्यामुळें इकडून सोनें पाठवावें लागेल तेव्हां हा निधि उपयोगी पडावा. पण हातचें सोनें गमावून व त्याचे कागद करून ठेवल्यानें वरील हेतु सफल होण्याजोगा नाहीं. रोखे विकल्याशिवाय सोनें जरूर तेव्हां कसें मिळणार ? पण अडचणीच्या प्रसंगीं रोख्याचाही भाव उतरतो. आणि घाईघाईनें येईल त्या भावानें आयत्यावेळीं रोखे विकावे लागतात. त्यामुळें पुष्कळ नुकसान होतें. व्याज मिळतें ही सबब निरुपयोगी आहे. कारण व्याजाकरितां सोनें जमविलेलें नाहीं. शिवाय सुवर्णनिधि म्हणजे कागद-निधि नव्हे. प्रत्यक्ष सोनें जवळ असेल तेव्हांच हुंडणावळीचा भाव कायम राहण्यास त्याचा उपयोग होईल. सोनें इंग्लंडमध्यें ठेवल्यानें व तेंही रोख्यांत अडकविल्यामुळें कशी आपत्ति ओढवते ही गोष्ट १९०७ च्या प्रसंगावरून ध्यानांत येईल. म्हणून त्या प्रसंगाची हकीकत थोडक्यांत देणें इष्ट आहे.

या सालीं पाऊस न पडल्यामुळें सर्व देशभर दुष्काळ पडला. अर्थात निर्गत कमी होऊन आयात माल मात्र दरसाल इतकाच भरला. त्यामुळें

| वर्ष | इंग्लंडमध्यें– | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ मार्च | रोखे विकत घेतले तेव्हांची किंमत | थोडे मुदतीनें दिलेली रक्कम | ब्याँकेमध्यें ठेवलेलें सोनें | एकूण बेरीज |
| १९०१ | ० | ० | ० | ० |
| १९०२ | ३४५४ | ० | ० | ३४५४ |
| १९०३ | ३८१० | ० | ० | ३८१० |
| १९०४ | ६३७७ | ० | ० | ६३७७ |
| १९०५ | ८३७७ | ० | ० | ८३७७ |
| १९०६ | १२१६५ | ० | ० | १२१६५ |
| १९०७ | १२५१९ | ० | ० | १२५१९ |
| १९०८ | १३१८७ | ११३१ | ० | १४३१८ |
| १९०९ | ७४१४ | ४७० | ० | ७८८४ |
| १९१० | १३२१९ | ३०११ | ० | १६२३० |
| १९११ | १५८४९ | १४७७ | ० | १७३२६ |
| १९१२ | १६७४८ | १०७४ | ० | १७८२२ |
| १९१३ | १५९४६ | १००६ | १६२० | १८५७२ |
| १९१४ | १७१६९ | २५ | ४३२० | २१५१० |
| १९१५ | १२१४९ | ८ | १२५० | १३४०७ |
| १९१६ | १६२१९ | ५७९२ | ० | २२०११ |
| १९१७ | २५४०६ | ६००१ | ० | ३१४०७ |
| १९१८ | २८४५३ | ६००० | ० | ३४४५३ |
| १९१९ | २९७२९ | ६०१६ | ० | ३५७४५ |

| वर्ष | हिंदुस्थानमध्यें– | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ मार्च | कर्जाऊ दिलेल्या रकमा | सोनें | रुपये | एकूण बेरीज |
| १९०१ | १८३१ | १२०० | ० | ३०३१ |
| १९०२ | ० | ० | ० | ० |
| १९०३ | १ | ० | ० | १ |
| १९०४ | १६७ | ० | ० | १६७ |
| १९०५ | १५२ | ० | ० | १५२ |
| १९०६ | २८७ | ० | ० | २८७ |
| १९०७ | ३०१ | २२ | ४००० | ४३२३ |
| १९०८ | ० | ० | ४००० | ४००० |
| १९०९ | ० | ० | १०५८७ | १०५८७ |
| १९१० | ० | ० | २५३४ | २५३४ |
| १९११ | ० | ० | १९३४ | १९३४ |
| १९१२ | ० | ० | १९३४ | १९३४ |
| १९१३ | ३५ | ० | ४००० | ४०३५ |
| १९१४ | २२ | ० | ४००० | ४०२२ |
| १९१५ | ७०७० | ५२३८ | ० | १२३०८ |
| १९१६ | ४००१ | २३९ | ० | ४२४० |
| १९१७ | ० | १०३ | ० | १०३ |
| १९१८ | ० | ० | ० | ० |
| १९१९ | ० | ० | ० | ० |

विलायती व्यापाऱ्यांकडे हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांस पैसे म्हणजे सोनें पाठविणें जरूर पडलें. येथील व्यापाऱ्यांजवळ तर सोनें नाहीं. लोक सोनें पुरून अगर संचित करून ठेवतात हा आरोप खरा असता तर व्यापाऱ्यांनीं बिनबोभाट सोनें विलायतेस रवाना केलें असतें आणि सरकारही पेंचांत पडलें नसतें; पण सोनें व्यापाऱ्यांच्या हातीं लागणार नाहीं अशी चलन पद्धतीची स्थिति असल्याकारणानें, प्रसंग ओढवला म्हणजे व्यापाऱ्यांना सरकारकडे धांव मारल्याशिवाय गत्यंतर नाहीं. सरकारनेंही 'गोल्ड एक्सचेंज स्टँडर्ड रिझर्व्ह' बनवितांना परदेशीं पाठविण्याकरितां येथील व्यापाऱ्यांस आम्ही सोनें पुरवूं असें वचन दिलेलें. किंबहुना हा रिझर्व्ह स्थापण्यांत हाच प्रधान हेतु होता. असें असून १९०८ सालीं व्यापाऱ्यांना सोनें वेळेवर मिळालें नाहीं. १९०७ च्या सप्टेंबरच्या पहिल्या तारखेस एकंदर सोनें—रोकड व रोखे मिळून—सरकाराजवळ सुमारें ३०९००००० पौंड होतें. त्यापैकीं ह्या देशांत ४१००००० पौंड असून बाकीचें विलायतेंत. पण तेथेंही प्रत्यक्ष रोकड १०३००००० पौंड काय ती होती. ५२ लक्ष पौंड थोड्या मुदतीनें कर्जाऊ लावले असून १५४००००० पौंडांचे रोखे होते. १९०७ च्या आक्टोबर महिन्यांत दुष्काळ पडणार याविषयीं कांहीं शंका उरली नाहीं. याच सुमारास अमेरिकेवरही आर्थिक आपत्ति ओढवली. स्टेट सेक्रेटरीनें हुंड्या काढल्या, पण त्या कोणी विकत घेईना. नोव्हेंबर महिन्यांत २० लाख रुपयांच्या हुंड्या जेमतेम खपल्या. यापुढें सरकारी हुंड्या निघाल्याच नाहींत. सोन्याची टंचाई भासूं लागली. बँक ऑफ इंग्लंडनें व्याजाचा दर वाढविला. हुंडणावळीचा भाव सरकारी भावाच्या खालीं गेला; म्हणजे १ रुपयास १६ पेन्स मिळेनात. हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांना सोनें विलायतेस पाठविण्याकरितां पाहिजे होतें. तें येथें मिळालें असतें म्हणजे इतकी धांदल उडाली नसती. पण येथें सोनें फक्त ४१ लक्ष पौंड तें देऊन टाकण्याचें धैर्य सरकारास होईना. नंतर सरकारनें सोनें देऊं केलें. पण एका व्यक्तीस अगर संस्थेस दहा हजार पौंडापेक्षां जास्त सोनें देण्यास सरकार तयार होईना. ह्याप्रमाणें कांहीं दिवस गेले. इकडे स्टेट सेकेटरी आपला नेहमींचा खर्च कागदी चलननिधींतील सोन्यांतून भागवूं लागला. डिसेंबरपर्यंत असेंच चाललें होतें. ह्यापुढें हिंदुस्थान सरकारनें स्टेट सेक्रेटरीवर हुंड्या काढण्याचें ठरविलें. ह्या हुंड्या भराभर खपूं लागल्या. १९०८ मध्यें मार्च

11 JAN 1994

महिन्याचे सुमारास विलायतेंतील सर्व रोकड सोनें खलास झालें. यापुढें हिंदुस्थान सरकारच्या हुंड्यांचे पैसे रोखे विकून स्टेट सेक्रेटरीस द्यावे लागले. १९०८ च्या आगस्टपर्यंत एकंदर ८० लक्ष पौंडांचे रोखे विकले गेले. १९०७ च्या सप्टेंबरांत ३ कोटी ९ लक्ष पौंड सोनें होतें, तें १९०८ सप्टेंबरांत एक कोटी ११ लक्ष पौंड सोनें राहिलें. या शिवाय इंग्लंडांत याच सुमारास जें कर्ज काढिलें, त्यांपैकीं ४५ लक्ष पौंडाचा स्टेट सेक्रेटरीस हिंदुस्थानसरकारच्या हुंड्या बटावण्याच्या कामीं उपयोग करितां आला. याप्रमाणें आलेला प्रसंग कसा तरी निभावला. पण ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे, ६।७ वर्षें जमविलेला खजिना एका वर्षाच्या आपत्तिनेंच बहुतेकरिता झाला. दोन वर्षें सारखा दुष्काळ पडला तर कर्ज काढूनच परत-हुंड्या (हिंदुस्थानसरकारानें स्टेट सेक्रेटरीवर काढलेल्या) बटवण्याचा प्रसंग आला असता. हिंदुस्थानांतल्या व्यापाऱ्यांना इंग्लंडमधील व्यापाऱ्यांना पैसे देण्यास पाहिजे होते. आतां सुवर्णनिधि ह्या देशांतच असता तर येथच्या येथें येथील व्यापाऱ्यांना ताबडतोब सोनें सरकारकडून मिळालें असतें. पण सोनें विलायतेंत ठेवलें जातें. त्यामुळें सरकार येथील व्यापाऱ्यांना रुपये घेऊन सोनें देतें, एवढेंच नव्हे, तर तें सोनें विलायतेंत पोहोंचविण्याचेंही काम करितें. अर्थात् सरकार हुंड्या विकणाऱ्या पेढ्यांचें—वाहकाचें अगर आगबोटवाल्या कंपन्यांचें अशीं दोन कामें करितें. विलायतेंत सोनें ठेवून वाहतुकीच्या रूपानें नफा मिळवितें.

असो. १९०७—१९०८ च्या प्रसंगामुळें लोकांच्या तक्रारी फार झाल्या, व त्या सरकारच्या कानावरही गेल्या. सर जेम्स मेस्टन साहेबानें चेंबर्लेन-कमिशनपुढील आपल्या जबानींत ह्या तक्रारीचें यथार्थ वर्णन केलें आहे. "आपमतलबीपणानें लंडनमधील सुवर्णनिधि आम्ही फुगवितों, व निरर्थक तेथें ठेवतों, अशा तक्रारी आमच्या कानावर हमेशा येत आहेत. तसेंच गरज नसतांना रुपये पाडून आम्ही पदार्थांच्या किंमती वाढवितों, लंडनमधील व्यापाऱ्यांना हलक्या व्याजानें पैसे देतों, व हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांना कांहींच मदत करीत नाहीं. लंडनमध्यें सोनें ठेवून नुसत्या इंग्लंडचाच नव्हे तर इतर देशांचाही फायदा करीत असतों. हिंदुस्थानांतील लोकांपासून कर घेऊन ते पैसे बँक ऑफ इंग्लंडला वापरावयास देतों." इत्यादि लोकांच्या तक्रारीचें चित्र मेस्टन साहेबानें हुबेहुब रंगविलें

यांत शंका नाहीं. पण स्टेट सेक्रेटरीला अशी भीति पडली कीं, हिंदुस्थानांत सोनें ठेवल्यानें विलायतेंत सोन्याची टंचाई पडेल, आणि हिंदुस्थानाकरितांच स्टेट सेक्रेटरीला विलायतेंत वारंवार कर्ज काढावें लागतें त्यास मोठा व्यत्यय येईल. याला उत्तर सोपें आहे. कर्ज विलायतेंत काढलें पाहिजे असें कांहीं शास्त्र नाहीं. हिंदुस्थानांत सोनें पुष्कळ झालें म्हणजे येथेंही कर्ज मिळण्यास अडचण पडणार नाहीं. याप्रमाणें हिंदुस्थान सरकार व विलायत सरकार यांच्यांत वाद पडला. येथील सरकारचें म्हणणें आमच्याजवळ सोन्याचा संचय जास्ती पाहिजे. अर्थात् सरकारी हुंड्या कमी निघाल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें लंडनमध्यें रोकड सोनें अधिक ठेवावें व रोख्यांत कमी गुंतवावें. स्टेट सेक्रेटरीस या दोनही गोष्टी सर्वथैव कबूल करवत ना. चेंबर्लेन साहेब अध्यक्ष असल्यामुळें यास ' चेंबर्लेन-कमिशन ' म्हणतात. १९१३ सालीं कामाला सुरवात होऊन १९१४ सालीं या कमिशनचा रिपोर्ट बाहेर पडला. या कमिशननें आजपर्यंत चालू असलेला चलनाचा प्रकार अगदीं बरोबर आहे असा शेरा मारला. हिंदुस्थानाला सोन्याच्या नाण्याचें कारण नाहीं; सुवर्णनिधि लंडनमध्येंच पाहिजे; तो पुष्कळचं वाढविला पाहिजे. मात्र निम्मे रोकड सोनें ठेवलें म्हणजे झालें. स्टेट सेक्रेटरीनें सोन्याचे रोखे घेणें गैरवाजवी नाहीं. सुवर्णनिधीचा उपयोग हुंडणावळीचा भाव कायम राखणें हाच होय. १९०७ सालासारखा प्रसंग येईल तेव्हां हिंदुस्थान सरकारनें बिनदिक्कत स्टेट सेक्रेटरीवर हुंड्या काढाव्या; वगैरे, वगैरे. ह्या कमिशननें पूर्वस्थितविर आपल्या पसंतीचा शेरा मारला इतकेंच, चलनपद्धतीच्या धोरणांत अगर स्वरूपांत कांहींच फरक केला नाहीं. वास्तविक, कमिशनच्याऐवजीं कमिटीही नेमली असती तरी हरकत नव्हती. कमिशननें किरकोळ बाबींत फेरबदल केला एवढेंच. पण युद्धामुळें कमिशनच्या किरकोळ सूचनाही सर्वच अमलांत आल्या नाहींत.

युद्धामुळें ह्या देशांतून बाहेर माल फार गेला, त्या मानानें आयात मात्र झाली नाहीं. सबब हिंदुस्थान धनकोच्या स्थितींत होतें. करितां ह्या देशांत पुष्कळ सोनें यावयास पाहिजे होतें. पण देशाबाहेर पाठविण्याच्या अडचणीमुळें स्टेट सेक्रेटरीजवळच बरेंच सोनें राहिलें. मागें निव्वळ निर्गतीचे आंकडे दिले आहेत, त्यावरून दिसून येईल कीं, १९१४ ते १९ पर्यंत सुमारें सव्वीस कोटी पौंड किंमतीचा माल परकीयांना आम्हीं अधिक दिला,

तेव्हां उघडच आहे कीं, इतके पौंड हिंदुस्थानांत यावयास पाहिजे होते. सन १९१५ पासून सरकारी हुंड्या सुमारें ११ कोटीच्या काढल्या; हुंड्यांचा ऐवज येथें रुपयांतच मिळतो. ह्याशिवाय दोन कोटी साठ लक्ष पौंड किंमतीचें सोनें व जवळ जवळ एक कोटी किंमतीची चांदीची खासगी आयात झाली. व्यापाराची स्थिति समजण्याकरितां तपशीलवार आंकडे पुढील पृष्ठावर दिले आहेत.

यामुळें हिंदुस्थानांत सोनें यावें तितकें आलें नाहींच, पण चांदीही फार महाग झाली. १८९३ सालापर्यंत चांदीच्या भावाचे आंकडे पूर्वी दिलेच आहेत. त्याच्या पुढें दरसाल सरासरीच्या मानानें भाव कसा होता हें खालील कोष्टकावरून समजेल.

| वर्ष | एका औंसाची किंमत | वर्ष | एका औंसाची किंमत |
|---|---|---|---|
| १८९४ | ३५$\frac{५}{१६}$ | १९०७ | ३०$\frac{७}{८}$ |
| १८९५ | २८$\frac{१५}{१६}$ | १९०८ | ३०$\frac{३}{१६}$ |
| १८९६ | २९$\frac{७}{८}$ | १९०९ | २४$\frac{३}{८}$ |
| १८९७ | ३०$\frac{१}{४}$ | १९१० | २३$\frac{११}{१६}$ |
| १८९८ | २७$\frac{९}{१६}$ | १९११ | २४$\frac{५}{८}$ |
| १८९९ | २६$\frac{१५}{१६}$ | १९१२ | २४$\frac{९}{१६}$ |
| १९०० | २७$\frac{७}{१६}$ | १९१३ | २८$\frac{१}{३२}$ |
| १९०१ | २८$\frac{१}{४}$ | १९१४ | २७$\frac{९}{१६}$ |
| १९०२ | २७$\frac{३}{१६}$ | १९१५ | २५$\frac{५}{१६}$ |
| १९०३ | २४$\frac{१}{१६}$ | १९१६ | २३$\frac{११}{१६}$ |
| १९०४ | २४$\frac{३}{४}$ | १९१७ | ३१$\frac{५}{१६}$ |
| १९०५ | २६$\frac{३}{८}$ | १९१८ | ४०$\frac{७}{८}$ |
| १९०६ | २७$\frac{१३}{१६}$ | १९१९ | ४७$\frac{९}{१६}$ |

| साल | मालाची आयात | मालाची निर्गत | निव्वळ निर्गत | सरकारी हुंड्या | सोन्याची आयात | चांदीची आयात | सोन्याचांदीची बेरीज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पौं. | पौं. | पौं. | पौं. | पौं. | पौं. | पौं. |
| १९१४–१५ | ९१९५२६०० | १२१०६११०० | २९१०८५०० | ७७४८१११ | ५६३७००० | ६६७६००० | १२३१३००० |
| १९१५-१६ | ८७५६०२०० | १३१५८६८०० | ४४०२६६०० | २०३५४५१७ | ३२६७००० | ३७१७००० | ६९८४००० |
| १९१६-१७ | ९९७४८०००० | १६०५९१२०० | ६०८४३२०० | ३२९९८०९५ | २७९७००० | १४४०००० | १३५७००० |
| १९१७–१८ | १००२८००००० | १६१७००००० | ६१४२०००० | ३४८८०६८२ | १४३०६००० | ९७१००० | १५२७७००० |
| १९१८-१९ | ११२६९०००० | १६९२३०००० | ५६५४०००० | २०९४६३१४ | १५००० | ३८००० | ५३००० |
| | | | २५१९१८३०० | (अजमासानें) | २६०२२००० | ९९६२००० | ३५९८४००० |
| | | | | ११६९५७१९ | | | |

वरील भाव सरासरीचे आहेत. दरम्यानचे भाव ह्याहूनही निराळे होते. १९१५ च्या आक्टोबरमध्यें २३ पेन्स भाव होता, तो १९१९ च्या मेच्या १० व्या तारखेस ५८ पेन्सवर गेला. आतां १ औंस चांदीचा २४ पेन्स भाव असला म्हणजे एका रुपयाची किंमत ( १६५ ग्रेनांची ) जवळ जवळ नऊ पेन्स असते; आणि ५१ पेन्सप्रमाणें चांदीचा भाव असल्यास रुपयाची किंमत २१॥ पेन्स होते, हें मागें दिलेल्या कोष्टकावरून ध्यानीं येईल. आतां सरकारी सोळा पेन्सांच्या दराहून ही किंमत ५॥ पेन्सांनीं अधिक आहे. अर्थात् रुपयाच्या आंतील चांदीची किंमत अधिक, पण रुपयाची किंमत कमी, अशी स्थिति झाली. रुपये घडण्यांत सरकारचा आजपर्यंत नफा होत होता तो न होतां उलट तोटा होऊं लागला. एक रुपया घडण्यास २२ पेन्स खर्च; पण तो पाडून त्याची किंमत १६ पेन्सच येणार. ह्यामुळें हुंडणावळीचा भाव वाढविणें सरकारास भाग पडलें. असें केलें नसतें तर लोकांनीं रुपये वितळविले असते आणि चांदी विकली असती. आतां दुसरा उपाय म्हणजे रुपयांत हल्लीं १६५ ग्रेन चांदी आहे ती कमी करावयाची. पण हें लोकांना पसंत पडलें नसतें. रुपयाचा इतिहास फार जुना आहे. रुपया म्हणजे एक तोळा असा लोकांचा दृढ समज होऊन बसला आहे. शिवाय जुने सर्व रुपये माघारे घेऊन पुन्हां दुसरे रुपये पाडणें जरूर पडतें. पण सर्व रुपये माघारे घेणें फार अवघड. मेक्सिकोनें अशा प्रकारचा प्रयत्न केला होता; पण त्यांत तो देश लहान असूनही त्यास अतिशय अडचणी आल्या. इत्यादि कारणांमुळें हा उपाय अव्यवहार्य होता. तेव्हां रुपया–सोन्याचा भाव पुन्हां निश्चित करण्याकरितां एक कमिटी नेमण्यांत आली. स्मिथ साहेब ह्या कमिटीचे अध्यक्ष होते. हा रिपोर्ट १९२० मध्यें प्रसिद्ध झाला. कमिटीच्या रिपोर्टाप्रमाणें हुंडणावळीचा भाव वाढल्यानें हिंदुस्थानचें एकंदरींत हित झालें आहे. त्यामुळें हाच भाव कायम ठेवणें बरें, म्हणून १० रुपयांस एक सॉव्हरिन, अगर एका रुपयास ३००१६ ग्रेन शुद्ध सोनें, हा भाव ठरवावा; एका रुपयास दोन शिलिंग ह्यापेक्षांही चांदीचा भाव अधिक झाल्यास सरकारी हुंड्या कमी प्रमाणावर विकाव्या; चांदी खरेदी करूं नये; सोन्याचा उपयोग नाणें पाडण्याकडे करावा; स्टेट सेक्रेटरीस न विचारतां हिंदुस्थानसरकारनें दर आठवड्यास परत–हुंड्या काढून त्या विकाव्या; हुंडणावळ मिळत आहे तोंपर्यंत तरी हा क्रम चालू ठेवावा. सोन्याचें नाणें

अल्पशा प्रमाणावर सुरू करावें. मुंबईच्या टांकसाळींत लोकांनीं सोनें आणून दिल्यास त्यांस सोन्याचें नाणें पाडून द्यावें. सॉव्हरिन घेऊन रुपये देण्याची जबाबदारी सरकारनें सोडून द्यावी. चांदीचा भाव वाढल्यामुळें रुपये वितळून लोकांस चांदी परदेशीं पाठवितां येऊं नये, म्हणून चांदीच्या निर्गतीस तूर्त बंदी आहे तीच कांहीं दिवस चालू ठेवावी. कागदी चलनाचा घात्वात्मक निधि शेंकडा ४० या प्रमाणाहून कमी असतां कामा नये. हल्लीं असलेल्या सोन्याची किंमत एका रुपयास २ शिलिंगप्रमाणें करावी. कागदी चलनाच्या निधीप्रमाणें सर्व सोनें हिंदुस्थानांतच राहावें. सुवर्णपरिमाणनिधीपैकीं निम्मेपर्यंत सोनें हिंदुस्थानांत असावें. इंग्लंडांतील ह्या निधींतील सोनें ३ वर्षांपेक्षां अधिक मुदतीच्या रोख्यांत गुंतवूं नये. वगैरे, वगैरे.

हुंडणावळीचा भाव वाढल्यामुळें हिंदुस्थानचा फायदा होतो असें कमिटीनें आपलें मत दिलें आहे. त्याविषयीं अधिक खुलासा केल्याशिवाय वाचकांचा समज पडणार नाहीं. एका रुपयास पूर्वी १६ पेन्स मिळत असत, येथें आतां २४ पेन्स म्हणजे २ शिलिंग मिळूं लागले. ह्याचे आतां कसकसे परिणाम होतील ते आपण बघूं. हिंदुस्थानांतून कच्चा माल परदेशीं जातो, तेव्हां एक रुपयाचा माल पाठविला तर पूर्वी १६ पेन्स मिळत होते तेथें आतां २४ पेन्स मिळतील. अर्थात् हा आपला नफा सकृद्दर्शनीं दिसतो. पण ह्या गोष्टीची अधिक छाननी केल्यास काय निष्पन्न होतें हें बघूं. आमचा शेतकरी आपल्या देशांतील उत्पन्न आपणच विलायतेंत पाठविता व त्याची किंमतही परस्पर त्यास मिळती, तर हा नफा त्याच्या पदरांत पडला असता; पण सध्या दोन्हीपैकीं एकही गोष्ट घडत नाहीं. प्रथम स्टेट सेक्रेटरी वाटेल तितक्या हुंड्या काढतो त्यामुळें ह्या देशांत सोनें फारच कमी येतें. सोन्याच्या ऐवजीं रुपयेच आम्हांस मिळतात. अर्थात् हे रुपये पुन्हां २४ पेन्सांना एक रुपयाप्रमाणेंच मिळणार. म्हणजे आमच्या हाताला १ रुपयापेक्षां जास्त कशाचाही स्पर्श होत नाहीं. दुसरें, शेतकऱ्याजवळून माल मधले दलाल खरेदी करितात तेव्हां शेतकऱ्यास रुपयाच मिळतो. रुपयाचे २४ पेन्स घेण्याचा प्रसंग आला तर तो ह्या दलालांना ! आतां हे दलाल तर **रॅली ब्रदर्स** सारखे परकीय असतात. म्हणून निर्गत व्यापार जोंपर्यंत परकीयांच्या हातांत आहे

तोंपर्यंत शेतकऱ्यांस कांहीं नफा नसतो. आयात माल मात्र स्वस्त होतो. इंग्लंडमधून आपण माल मागितला म्हणजे त्याची किंमत आपणांस सोन्यांत द्यावी लागते. २४ पेन्साचा माल आपण विकत घेतला तर पूर्वी १॥ रुपया द्यावा लागत असे, तेथें आतां एक रुपयांत काम होईल. म्हणजे आपले आठ आणे वाचले. आणखी दुसऱ्या रीतीनें विचार करूं. हुंडणावळीचा भाव रुपयास १६ पेन्स असतां १ खंडी गहूं मी विलायतेस पाठविले. एका खंडीचा ६० रु. भाव हिंदुस्थानच्या बाजारांत असल्यामुळें मला ६० रुपये मिळाले पाहिजेत. ह्या साठ रुपयाकरितां माझे गहूं घेणाऱ्या विलायतेंतील मनुष्याला ४ पौंड खर्च करावे लागतात. आतां मी ५० वार कापड विलायतेंतून मागविलें. ५० वारांची किंमत विलायतच्या बाजारांत ४ पौंड आहे. तेव्हां मला ४ पौंड द्यावे लागणार. हे ४ पौंड घेण्यास मला ६० रुपये दिले पाहिजेत. अर्थात् एक खंडी गव्हांला ५० वार कापड हें प्रमाण पडलें. आतां हुंडणावळीचा भाव रुपयास २४ पेन्स झाला. त्यामुळें मला किती नफा तोटा होईल तें पाहूं. १ खंडी गहूं इंग्लंडांत पाठविले, व येथील बाजारभावाप्रमाणें मी ६० रुपये किंमत आकारली. आतां इंग्लिश व्यापाऱ्याजवळ रुपये नसतात. त्याच्याजवळ सोनें अगर सॉव्हरीन असतात. ते तो रुपयांचा व सॉव्हरीनचा जो भाव असेल त्याप्रमाणें देणार. अर्थात् मला त्याला आतां बदललेल्या भावाप्रमाणें ६ पौंड द्यावे लागतील. म्हणजे ज्या मालाला मला पूर्वी ४ सॉव्हरिन मिळाले होते त्याच मालाला मला आतां ६ सॉव्हरिन मिळतील. आतां उलट प्रकार बघूं. ५० वार कापड मी विलायतेहून मागितलें, तेथील भाव चार पौंड. माझ्या जवळ सोन्याचें नाणें नसल्यामुळें रुपये देऊन तें मला विकत घेतलें पाहिजे. करितां मला आतांच्या भावानें चार सॉव्हरीन घेण्यास ४० रुपयेच पडतील. पूर्वी साठ रुपये पडले होते. म्हणजे १ खंडी गहूं देऊन मला ५० वार कापड तर पूर्वीप्रमाणें आलेंच, पण शिवाय दोन सॅव्हरिन अधिक मिळाले, व २० रुपयांची बचत झाली. ह्यांत एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे, ती ही कीं, मला सॉव्हरिन घेण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. कारण सॉव्हरिन कोठेंही चालतो, व त्यांतील सोन्याची किंमतही जवळ जवळ तितकीच असते. पण विलायतेंत रुपये मात्र कोणी हातांत धरणार नाहीं. म्हणून सोन्याचा भाव उतरल्यामुळें मला दुहेरी फायदा

मिळतो. माझ्या मालाला जास्त सॉव्हरिन मिळतात व मला पूर्वीच्या इतके सॉव्हरिन खरेदी करण्यास कमी रुपये पडतात. पण ह्यामध्यें दोन गोष्टी आपण गृहीत धरल्या आहेत. विलायती व्यापाऱ्याला आमचा माल इतर देशांत मिळत नसल्यामुळें आमच्या बाजारांत आम्हीं सांगूं त्या किंमतीनें तो त्यानें विकत घेतला पाहिजे. तींच गोष्ट विलायतेंतील मालाची. पण अशी कल्पना करा कीं आपल्या दाराशीं येऊन कोणी मालाची मागणी करीत नाहीं. आपणांसच आपला माल घेऊन दुसऱ्याच्या दाराशीं जावें लागतें. अशा वेळीं त्याच्या नाण्यामध्यें तो आपणांस किंमत सांगेल. समजा, १ खंडीभर गहूं मी आपण होऊन विलायतेच्या बाजारांत विक्रीकरितां पाठविले. आतां तेथें जो भाव असेल त्याच भावानें मला माझे गहूं विकावे लागतील हें उघड आहे. हुंडणावळ वाढल्यानें मला कोणी अधिक पैसे देण्यास तयार होणार नाहीं. विलायती बाजारांत १ खंडीचा भाव ४ पौंड असला तर पूर्वीप्रमाणें आतांही मला ४ पौंडच मिळणार, ही गोष्ट खरी. पण पूर्वी ४ पौंडांबद्दल मला ६० रु. मिळत, तेथें आतां ४० रुपयेच मिळतील. अर्थात् या व्यवहारांत मला नुकसान लागलें.

त्यामुळें प्रत्यक्ष व्यापार कसा चालतो तें पाहूं. निर्यात व्यापारी ( Export Merchants ) शेतकऱ्यांजवळून माल खरेदी करतात. ह्यांत हे व्यापारी शेतकऱ्यांस रुपयेच देतात. निरनिराळ्या शेतकऱ्यांकडून थोडा थोडा माल गोळा करून तो सर्व माल ते विलायतेस पाठवितात. आतां ह्या मालाचीं हे व्यापारी जीं बिलें काढतात तीं सर्व पौंडांतच असतात. विलायतचे भाव काय आहेत तें पाहून त्याप्रमाणें ते आपल्या मालाच्या किंमती ठेवितात. हीं बिलें ( Export bills ) वटावी–पेढ्या विकत घेतात. हे पैसे ह्या पेढ्या कोठून देतात ? आयात–बिलांचे पैसे वसूल करून. त्या पैशांनीं सदर पेढ्या निर्यातबिलें विकत घेतात. विलायतेंतून जो माल इकडे येतो त्या मालावर काढलेलीं बिलें येथील शाखापेढ्यांच्या मुख्य पेढ्या विलायतेस असतात त्या विकत घेऊन ह्या देशांत आपल्या शाखांकडे पाठवितात. ह्या बिलांचे पैसे येथील शाखा वसूल करून त्यांनीं निर्यात बिलें विकत घेतात. ह्यावरून असें स्पष्ट होतें कीं, आमचा आयात निर्यात व्यापार परकीयांच्या पैशांनीं चालतो. ह्या थोड्याशा विवेचनावरून असें दिसून येईल कीं, हुंडणावळीचा भाव वाढल्यानें परदेशाहून हिंदुस्थानांत येणारा माल स्वस्त

मिळतो. निर्गत मालाला मात्र किंमत कमी येते. त्यामुळें निर्गत व्यापार कमी होतो; पण, उलट, देशांत स्वस्ताई होईल.

आतां आयात माल स्वस्त झाला तर उद्योगधंद्यांना मात्र विघ्न येतें. परदेशीय माल जितका महाग त्या मानानें येथील नवीन उद्योगधंद्यांचा विकास होण्यास अवकाश मिळतो. तथापि त्याच्या बरोबरच ह्याही गोष्टींचा विचार केला पाहिजे कीं, यंत्रसामग्री आपणास स्वस्त पडते, व एकंदर स्वस्ताई झाल्यामुळें मजुरी स्वल्प पडते. तेव्हां एकंदरींत विचार करितां हुंडणावळीचा भाव वाढल्यानें आपलें नुकसान आहे; असें म्हणतां यावयाचें नाहीं. विलायती खर्चांत ( Home Charges ) तर पुष्कळच बचत होईल. दोन कोटी खर्चांत ३० कोटी रुपये पाठवितां येत तेथें आतां २० कोटींनीं काम भागेल. पण दुसरा एक तोटा आहे. तोही लक्षांत घेतला पाहिजे. हिंदुस्थान सरकारकडे अगर विलायतेंत जें सोनें शिल्लक असेल त्याची आतां १ सॉव्हरिनला १० रुपयेप्रमाणें पुन्हां किंमत करावी लागेल. १९११ सालीं जवळ जवळ ४ कोटी पौंड सोनें अगर सोन्याचे कर्ज--रोखे सरकारजवळ होते. पूर्वीच्या दरानें ह्याची किंमत ६० कोट रुपये होती. ती आतां ४० कोट रुपयांवर आली. म्हणजे २० कोटीचें नुकसान होतें. पण त्याबरोबरच विलायतेंत काढलेलें कर्ज अशा वेळीं फेडलें तर हें नुकसान भरून येईल; अगर नुकसानच होणार नाहीं. शिलकी सोन्यानें कर्ज फेडावें व नवीन दरानें नवीन सोनें पुन्हां जमवावें म्हणजे झालें.

हुंडणावळ वाढल्यानें निर्यात व्यापारावर जो परिणाम घडतो त्याचें वर्णन वर केलें. पण निरनिराळ्या निर्यात मालावर निरनिराळा परिणाम होतो हें विसरतां कामा नये. हिंदुस्थानावांचून जो माल इतर देशांत फारसा मिळत नाहीं त्या मालाला ह्याच देशांत मागणी येते, व ह्या देशांतल्या पेठेंत त्याला जो भाव असेल तो देऊन परकी व्यापाऱ्यांना तो खरेदी करावा लागतो. ह्या खरेदीची किंमत रुपयांत ठरते. व रुपयांत ठरली नाहीं तरी आपणास जितके रुपये आले पाहिजेत असें वाटतें त्या मानानें पौडांत किंमत सांगतां येते. व त्याचा परिणाम काय होतो हें वर दर्शविलें आहेच. पण कापूस, चहा इत्यादि मालासंबंधानें निराळा प्रकार घडतो. हे जिन्नस इतर देशांतही होतात. ते देश सोन्याच्या नाण्याचे असल्यामुळें तेथें ह्या जिनसांचा जो भाव असेल त्याच्यापेक्षां हिंदुस्थानांत कोणी जास्ती देणार

नाहीं हें उघड आहे. म्हणून ह्या मालाची किंमत रुपयांत न ठरतां सोन्यांत ठरते. सोन्यांत किंमत ठरली कीं परदेशांतून ह्या देशांत सोनेंच पाठविलें पाहिजे. आतां सोन्याच्याऐवजीं रुपये घेणें आम्हांला भाग असल्यामुळें एक पौंडाच्याऐवजीं आम्हांला पूर्वी १५ रुपये मिळत होते तेथें आतां १० रुपयेच मिळणार. म्हणजे वाढत्या हुंडणावळींत येथील व्यापाऱ्यांचें नुकसान होतें.

स्टेटसेक्रेटरीनें आपल्या गरजेपुरत्या हुंड्या काढाव्या, अधिक हुंडया काढण्याची जबाबदारी त्याच्यावर नाहीं, ही गोष्ट बॅबिंग्टन कमिटीनें नमूद केली आहे. पण ह्या गोष्टीस स्टेट सेक्रेटरी कबूल होईलसें दिसत नाहीं. ह्या सरकारी हुंड्यांमुळें हिंदुस्थानांत यावयाचें सोनें विलायतेंत राहतें हें मागें सांगितलेंच आहे. पण ह्या हुंडयांचा आणखी एका तऱ्हेनें विलायती व्यापारी उपयोग करून घेतात. ह्या देशांत इंग्रजी वटावी--पेढ्या ( Exchange Banks ) आहेत त्या शाखा असून त्यांच्या मुख्य पेढ्या इंग्लंडांत व इतर देशांत आहेत. येथील शाखा निर्गत--मालाचा व्यापार करतात. म्हणजे इंग्लंडमध्यें मुख्य पेढ्यांत इंग्लिश लोकांचे पैसे असतात, त्या पैशांनीं हे पेढीवाले सरकारी हुंडया विकत घेतात व त्या येथें मुंबईंत किंवा कलकत्त्यास हजर करून हिंदुस्थान सरकारकडून त्या हुंडयांचे रुपये घेतात. ह्या रुपयांनीं ते येथील निर्यात–बिलें खरेदी करितात. म्हणजे परदेशीं माल पाठविणाऱ्या व्यापाऱ्यांचीं बिलें ( Export–Drafts) विकत घेतात व तीं विलायतेस पाठवितात. ह्याप्रमाणें निर्यात व्यापार चालतो.

म्हणजे विलायती पैशावर आमचा निर्गत व्यापार ( export trade ) चालतो. त्यामुळें या व्यापाराचा सर्व नफा विलायती व्यापाऱ्यांना मिळतो हें सांगणें नकोच. तेव्हां या सरकारी हुंड्यामुळें निर्गत व्यापाराचीं सूत्रें विलायती व्यापाऱ्यांच्या हातीं राहतात; व शिवाय सर्व सोनें विलायतेंत राहतें. आतां याच्यावर असा प्रश्न विचारण्यांत येतो कीं, ' तुम्हाला सोनें पाहिजे कशाला ? तुम्हाला रुपयेच लागणार. या देशांत जरी सोनें आलें तरी तें अखेरीस तुम्ही हिंदुस्थानसरकारकडे घेऊन जाऊन त्याचे रुपयेच मागणार. कारण, धान्य,--खरेदीस रुपयेच लागणार. ' या प्रश्नांत असें गृहीत धरलें आहे कीं, सर्व सोनें धान्य--खरेदी करण्यांतच खर्च झालें पाहिजे. पण ही चूक आहे. या सोन्यांत आमचा नफा असतो. त्या

नफ्यानें आम्ही आपली शिल्लक वाढवूं, अगर नवीन उद्योगधंदे काढूं. पैसे जास्त झाले म्हणजे धान्य जास्त पिकतें असें नाहीं. तें पिकावयाचें तितकेंच पिकणार. तेव्हां धान्य-खरेदीच्या पैशाला मर्यादा आहे. वरें, रुपये आमच्या हातांत येतात तेही फुगवलेल्या किंमतीचे. त्या रुपयांचा संग्रह करण्याच्या कामीं कांहीं उपयोग होत नाहीं. अशी कल्पना करूं कीं, एक पौंड किंमतीचें धान्य मी विकलें, त्याबद्दल माझ्या हातांत हुंडणावळीच्या भावाप्रमाणें दहा रुपये आले. पण या दहा रुपयांची खरी किंमत म्हणजे आंतील चांदीच्या हिशेबानें साडेसहा रुपयेही होत नाहीं ! मला दहा रुपये देऊन सरकार तीन चार रुपये मिळवितें ! हा एक प्रकारचा करच झाला. कारण सरकार ५।६ रुपयांची चांदी विकत घेतें, व तिचे दहा रुपये बनवून ते माझ्या पदरांत टाकितें. वरील विवेचनावरून निर्गत व्यापार एतद्देशीयांच्या हातीं असणें किती अगत्याचें आहे तें दिसून येईल.

१८९३।९४ सालीं चांदीचा भाव फारच उतरला म्हणून सरकारास अडचण उत्पन्न झाली. पुढें १९१८ सालानंतर चांदी कडाडल्यामुळें विवंचना उत्पन्न झाली. हुंडणावळीचा भाव कसा वाढत गेला हें खालील कोष्टकांत दाखविलें आहे.

| तारीख | भाव शि. पे. |
|---|---|
| १२।८।१९१९ | १—१० |
| १६।९।१९१९ | २—० |
| २३।९।१९१९ | २—० |
| २५।११।१९१९ | २—२ |
| १६।१२।१९१९ | २—४ |

करन्सी--कमिटीचा रिपोर्ट २ फेब्रुवारी १९२० रोजीं प्रसिद्ध झाला तेव्हां २ शि. ४ पेन्सांच्या आगेमागें भाव होता. तो नंतर २ शि. ९ पेन्स पर्यंत चढला. १५ रुपयांना १ सॉव्हरिन हा भाव कायम राहण्यास १ औंसास ४ शि. ३ पेन्सापेक्षां जास्ती चांदीचा भाव जातां कामा नये. जास्त झाल्यास रुपयाचा उपनाण्याचा धर्म नाहींसा होईल. रुपये वितळविणें अगर परदेशीं पाठविणें लोकांना फायद्याचें होईल. नवीन रुपये पाडावे तर सरकारास तोटा सोसूनच

पाडावे लागणार. १९१७ च्या आगष्टपर्यंत रुपये पाडण्यांत सरकारचें नुकसान नव्हतें. पण पुढें चांदीचा भाव भडकल्यामुळें सरकारचें नुकसान होऊं लागलं. इकडे सोनेंही महाग झालें. म्हणून १ रुपयास दोन शिलिंग सोनें हा दर कमिटीनें कायम केला. चांदी उतरण्याचा संभव नाहीं, असें कमिटीला वाटलें. सोनें घेऊन लोकांना रुपये देण्यांत आपला तोटा आहे असें पाहतांच सरकारी हुंड्यांचा हात स्टेटसेक्रेटरीनें आंखडून घेतला. पण पुढें कमिटीचें भविष्य लवकरच खोटें ठरलें. चांदी झपाट्यानें उतरूं लागली. रुपयाला २ शिलिंग हा दर तर सरकारनें जगजाहीर केला; व तो कायम ठेवण्याकरतां सन १८९४ सालाप्रमाणें वाटेल तें करण्यास सरकार तयार झालें. रुपयास १७।१८ पेन्सांपर्यंत गेलेला दर खेंचून २४ पेन्सांवर आणण्याची खटपट करण्याचा सरकारचा निश्चय झाला. रुपया स्वस्त झाला आणि सोनें महाग झालें. म्हणून २४ पेन्सांवर दर राहीना. तेव्हां रुपये महाग करावे आणि सोनें स्वस्त करावें हा मार्ग त्यांनीं काढला. रुपये महाग करावयाचे म्हणजे लोकांजवळचे रुपये कमी करावयाचे. हे कमी करण्याचा उपाय म्हणजे ' रिव्हर्स कौन्सिल बिल्स ' अगर परत हुंड्या काढणें, हा होय. परत हुंडी म्हणजे हिंदुस्थान सरकार स्टेटसेक्रेटरीवर हुंडी काढतें ती. अशा हुंड्यामुळें लोक हिंदुस्थान सरकारास रुपये देतात व हुंडी विकत घेतात. आणि ती हुंडी स्टेटसेक्रेटरीवर लागू करून त्याच्याकडून रुपयास २ शिलिंगप्रमाणें सोनें घेतात. अशा रीतीनें फिरतींतील रुपये कमी होतात व लोकांजवळ सोनें पुष्कळ होतें. ह्याशिवाय आपल्या शिलकेंत असलेलें सोनेंही हिंदुस्थान सरकारनें विक्रीस काढलें; हेतु हा कीं सोनें स्वस्त करून रुपये दुर्मिळ करावयाचे. करन्सी कमिटीनें ' परतहुंड्या ' काढण्याची सूचना केली होती, व तिचा सरकारनें ताबडतोब फायदा करून घेतला. आतां ह्यामध्यें नुकसान काय झालें तें बघूं. १५ रुपयांस १ पौंड ह्या दरानें आजपर्यंत जें सोनें सांचविलें होतें तें सर्व ९ रुपयांस १ पौंड ह्याप्रमाणें देऊन टाकलें. अशा रीतीनें दर पौंडाच्या मागें ६ रुपये नुकसान झालें. दर आठवड्यास २० लाख पौंड ह्याप्रमाणें कित्येक महिनेपर्यंत परत-हुंड्या विकून सरकारानें सर्व सोन्याची विल्हेवाट लावली. बरें, ह्यापासून फायदा तरी कोणाचा झाला? तर विलायती व्यापाऱ्यांचा. हिंदुस्थानांतील व्यापा-

ऱ्यांना परतहुंड्या विकत घेण्याचें कारणच नाहीं. व्यापाऱ्यांना परत-हुंड्यांची गरज केव्हां लागते ? त्यांस विलायतेस मालाचे पैसे पाठवावयाचे असतील तेव्हां. पण असे पैसे पाठविण्याची जरूरी केव्हां असते ? देशाची निर्गतीपेक्षां आयात अधिक असेल तेव्हां. पण महायुद्धामुळें ह्या देशाची निर्गत आयातापेक्षां पुष्कळच अधिक, त्यामुळें आम्हांलाच इंग्लंडमधून पैसे आले पाहिजेत. तेव्हां व्यापाऱ्याला परत-हुंड्यांची मुळींच अवश्यकता नव्हती. तर मग ह्या परत-हुंड्या कोण घेणार व त्यापासून फायदा कोणाचा होणार ? इंग्लिश व्यापाऱ्यांचा व येथें असणाऱ्या इंग्लिश लोकांचा. बाजारामध्यें १ रुपयास १५ पेन्सच मिळतात, पण सरकार २४ पेन्स देतें. इंग्लिश लोकांचीं घरें दारें विलायतेंत, तेथें त्यांना सोनें पाहिजेच; तेव्हां ही आलेली संधि कोणीही फुकट जाऊं देणार नाहीं. येथें पसरलेले रुपये सर्व गोळा करून त्यांनीं थोडक्या पैशांत सोन्याचा संचय विलायतेंत केला. शिवाय बाजारभाव व सरकारी भाव ह्यांत इतकी तफावत पडल्यावर सट्टेबाजी करण्यासही पुष्कळांस संधि मिळाली. हलक्या दरानें सरकारकडून सोनें विकत घेऊन बाजारांत अधिक दरानें विकण्यास मुळींच हरकत नव्हती. व त्याप्रमाणें लोकांनीं केलेंही. विलायतेंतील लोकांस १६ रुपयास १ तोळा सोनें मिळालें, आणि हिंदुस्थानांत तोळ्यास २२ रुपये देण्यास तयार असूनही लोकांस तें मिळेना; असा प्रकार घडला. हिंदुस्थानच्या विरुद्ध व्यापाराचा आढावा क्वचित् जात असल्यामुळें परतहुंड्या काढण्याचा प्रसंग फारसा येत नाहीं. १९०८ सालीं दुष्काळामुळें परतहुंड्या काढाव्या लागल्या, हें मागें सांगितलेंच आहे. १९१९ पर्यंत अशा परत--हुंड्यांचा तपशील खालीं दिला आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १९०८।०९ | ८०५८००० पौंड. | १९१५।१६ | ४८९३००० पौंड. |
| १९०९।१० | १५६००० ,, | १९१८।१९ | ५३१५००० ,, |
| १९१४।१५ | ८७०७००० ,, | | |

वरील हुंड्यांत तार--हुंड्यांचाही समावेश होतो. तार-हुंड्या म्हणजे हिंदुस्थान सरकार स्टेटसेक्रेटरीस हुन्डीचें सोनें देण्याबद्दल तारेनें कळवतें. ह्याला इंग्रजींत 'टेलिग्रफिक ट्रॅन्स्फर' असें म्हणतात. हुंडी टपालानें जाते. ती विलायतेस पोंचण्यास वेळ लागतो, म्हणून निकडीच्या प्रसंगीं तर तार--हुंड्या घेतात. म्हणजे हुंडीचे पैसे त्यांस ताबडतोब मिळतात.

स्टेटसेक्रेटरीसुद्धां हिंदुस्थान सरकारावर तारहुंडया काढीत असतो. तारहुंड्यांचा भाव साहजिकज जास्त असतो. असो. ह्या परतहुंड्यांमुळें ३५ कोट रुपये हिंदुस्थानचे गेले. इ. स. १९१९ सालीं १८३५०० पौंडांच्या परतहुंड्या विकल्या. त्यामुळें हिंदुस्थानचें सोनें इंग्लंडमध्यें होतें त्यापैकीं इतके पौंड सोनें कमी झालें. आतां ह्या सोन्याबद्दल ह्या देशांत सरकारास २४४२४२६३ रु. मिळाले. सन १९२० सालीं परतहुंड्या काढून पुन्हां सरकारनें ४६९३५५८५७ रुपयांस ५५३८२००० पौंड सोनें विकलें. अजमासानें दर पौण्डाला ९ रुपये भावानें हें सोनें विकलें असें होतें ! हिंदुस्थानांतल्या लोकांस २५ रु. देऊन सुद्धां तोळाभर सोनें मिळत नाहीं, पण विलायतेस त्यांचेंच सोनें ९ रुपयांस ११३.००१६ ग्रेन ( १ पौन्डांत इतकें शुद्ध सोनें असतें ) गेलेलें पाहून त्यांस स्वाभाविकच वाईट वाटतें. १८० ग्रेनांचा १ तोळा ह्या हिशोबानें पाहतां एक तोळा सोन्यास वरील दरानें १३।१४ रु. पडतात. १ रुपयास १६ पेन्स ह्याप्रमाणें विलायतेंत जमवून ठेवलेलें सोनें १९२० सालीं एक रुपयास ३४।३५ पेन्सांप्रमाणें देण्यांत आलें! अर्थात् हा परत-हुंड्यांचा भाव म्हणजे येथें सरकारला एक रुपया दिला कीं विलायतेस सुवर्णनिधींतून ३५ पेन्स मिळावयाचे. परत-हुंड्यांचे कांहीं भाव या खालीं दिले आहेत, त्यावरून ही गोष्ट चांगली लक्षांत येईल.

| तारीख | भाव | ( तारहुंड्यांचा ) |
|---|---|---|
| १२-२-२० | २ शि. | १०$\frac{२७}{३२}$ पे. |
| १९-२-२० | २ ,, | १०$\frac{७}{३२}$ ,, |
| २६-२-२० | २ ,, | १०$\frac{५}{१६}$ ,, |
| ३-३-२० | २ ,, | १०$\frac{१}{३२}$ ,, |

आतां हा कांहीं बाजारभाव नव्हता. फेब्रुवारी महिन्यांत बाजारभाव २ शि. ६ पेन्स आणि २ शि. ८ पेन्स याच्या दरम्यान होता. अर्थात् सरकार बाजारभावापेक्षां २।४ पेन्स अधिक देत असे. व अशा रीतीनें दर आठवड्यास २० लक्ष पौंडांच्या परत-हुंड्या विकण्यांत आल्या. ह्यावरून एकंदर नुकसान किती झालें असावें याची कल्पना करतां येईल.

वरील विवेचनावरून संकटाचा उद्भव सरकारी हुंड्यांत आहे असें दिसून येईल. स्टेटसेक्रेटरीनें आपल्या गरजेपेक्षां जास्त रकमेच्या हुंड्या

17 MAR 1936

सहसा काढूं नयेत. विलायतेंत सोनें न ठेवतां सोन्याचा हिंदुस्थानांत येण्याचा मार्ग खुला करावा. हिंदुस्थानांत सोन्याचें नाणें सुरू करावें. चांदीचा भाव कमजास्त होतो तसा सोन्याचा होत नाहीं. सोन्यारुप्याचा भाव ठरविण्याचा प्रयत्न करूं नये. विलायतेचा खर्च शक्य तितका कमी करावा. १० रुपयांस १ सॉव्हरिन हा भाव इतकें नुकसान होऊनही टिकला नाहीं. ह्यावरून असा उपाय दुःसाध्य आहे हें ठरतें. नुसत्या चढत्या हुंडणावळीनें किंमती खालावत नाहींत. तसें असतें तर स्वस्ताई होती तेव्हां हुंडणावळीचा भाव अधिक असावयास पाहिजे होता. पण अनुभव असा आहे कीं, १५ रुपयांस एक पौंड हा हुंडवणाळीचा दर असतांना जी स्वस्ताई होती ती अजूनही नाहीं. स्वस्ताई—महागाईचीं दुसरीं पुष्कळ कारणें असतात. निर्गत व्यापार आपल्या हातांत ठेवण्याचा आमच्या लोकांनीं प्रयत्न करावा. कारण पुष्कळ वेळां वटावी—पेढ्यांच्या ( Exchange Banks ) फायद्याकरतां स्टेट सेक्रेटरीला हुंड्या काढाव्या लागतात. सोन्याच्या आधारावर नोटींचा प्रसार वाटेल तितका करावा; पण हें सोनें मात्र हिंदुस्थानांत पाहिजे. १०० रुपयांपर्यंत रुपया हें कायदेशीर फेडीचें चलन ठरवावें; व नाणीं पाडण्याव्यतिरिक्त सर्व कामें नवीन स्थापलेल्या इंपीरिअल बँकेकडे सोंपवावीं. देशांत सोनें आहे एवढ्याच गोष्टीवर व्यापार संभाळला जातो, म्हणजे व्यापारी वादळ पुष्कळवेळां टळलें जातें. म्हणून सोनें ह्याच देशांत ठेवण्यांत यावें. ह्या गोष्टी न केल्यास कालाचा, बुद्धीचा व द्रव्याचा अपव्यय होत राहणार ह्यांत संशय नाहीं.

# १९ भारतीय चलन-पद्धति.

[ पुस्तकपरीक्षा. ]

अलीकडे मराठी वर्तमानपत्रांतून, मासिकांतून आणि स्वतंत्र ग्रंथद्वारा हिंदी चलन-पद्धतीचें सोपपत्तिक, विस्तृत व प्रमाणबद्ध विवेचन होत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. असल्या विषयावर लिहिण्याची प्रवृत्ति अपूर्व असल्यामुळें आम्हीं रा. शंकर गणेश खांडेकर यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों. कारण भारतीय चलन पद्धति ह्या सव्वाशें पृष्ठांच्या लहानशा पुस्तकांत रा. खांडेकर ह्यांनीं हिंदी चलनपद्धतीचें तात्त्विक व व्यावहारिक दृष्ट्या सांगोपांग विवेचन केलें असल्यामुळें सदर पुस्तक फारच उपयुक्त झालें आहे. त्याचप्रमाणें अद्यापि फारशा न मळलेल्या वाटेनें जाऊन रा. खांडेकर यांनीं मराठी वाङ्मयांत बिनमोल भर टाकली आहे. अपवादादाखल असलेलीं दोन तीन ठिकाणें वगळलीं तर पुस्तकाची भाषाही सुबोध आहे असेंच आम्हांस वाटतें. दुर्बोधतेचा आरोप अवास्तव आहे अशी आमची समजूत आहे. म्हणून विद्यार्थ्यांना ह्या पुस्तकाच्या वाचनानें फायदा झाल्यावांचून राहणार नाहीं असें आमचें मत आहे. परंतु इतक्या सुंदर विषयावर लिहिलेल्या पुस्तकाची छपाई तितकीच वाईट असावी, हें पाहून मात्र मनास फार विषाद वाटतो. शुद्धिपत्र देऊनही पुस्तकांत अशुद्धें इतकीं राहिलीं आहेत कीं, त्यांची यादी केली तर ती एक फर्लांगभर लांब होईल अशी भीति वाटते. वाईट छपाई, घाणेरडा कागद, आणि बेढब आकार इतक्या गोष्टी एकत्र जुळल्या कीं उत्कृष्ट लेखांचाही समाजांत प्रसार होण्यास मोठें विघ्न येतें. कोणत्या पुस्तकाला कागद कोणता वापरावा, टाईप किती मोठा असावा, पुस्तकाची जाडी लांबी रुंदी किती असावी, बाह्यांग मोहक होण्यास काय करावें इत्यादि गोष्टींचा निर्णय करणारी एकादी मध्यवर्ती संस्था स्थापून प्रकाशनाचें काम तिच्याकडे सोंपविणें सध्यां अगदीं जरूर झालें आहे.

साहित्यपरिषदेचा ह्या कामीं उपयोग करितां येण्यासारखा आहे. सारांश, भाषेच्या ओबडधोबडपणापेक्षां छपाईचाच ओबडधोबडपणा आम्हांस विशेष दुःसह वाटतो.

प्रस्तुत पुस्तकांतील विषयाकडे पाहतां, पैशाची आवश्यकता, त्याचा पूर्वेतिहास, निरनिराळ्या चलनपद्धति, नाण्यांच्या कल्पनेचा उद्भव, इत्यादि गोष्टींचा ऊहापोह रा. खांडेकर यांनीं पहिल्या भागांत करून, दुसऱ्या भागांत चलनी नोटांविषयीं सामान्य विचार प्रदर्शित केले आहेत. तिसऱ्या ते दहाव्या भागांत आधुनिक चलन-पद्धतीचें विवरण करून उपसंहारात्मक अकराव्या भागांत चालू चलनपद्धतीसंबंधानें त्यांनीं सरकारास महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. रा. खांडेकर यांनीं केलेल्या विवेचनाशीं अगर काढलेल्या अनुमानांशीं कोणाचा फारसा मतभेद होईल असें वाटत नाहीं. असो. ह्या पैशानें समाजांत फार मोठी क्रांति घडवून आणली आहे. ह्याची यथार्थ कल्पना होण्यास आज जगांतून पैसा नाहींसा केला तर काय होईल ह्याचा विचार केला म्हणजे पुरे आहे. तथापि ही गोष्ट विसरतां कामा नये कीं, गरज भासूं लागली तेव्हांच पैशाची युक्ति निघाली. ज्यावेळेस लोक मारलेल्या पशुपक्ष्यांच्या मांसानें क्षुधानिवारण करीत असत व वृक्षांच्या वल्कलांनीं थंडीपासून संरक्षण करून घेत, तेव्हां पैशाची आवश्यकता भासण्याचें कारणच नव्हतें. पण मनुष्याची बुद्धि त्याला स्वस्थ बसूं देत नाहीं. बुद्धीच्या जोरावर तो नवीन शोध लावतो; शोधांच्या योगानें नानाविध कृत्रिम पदार्थ उत्पन्न करतो; अशा अनेक पदार्थांच्या उपभोगानें मनुष्याच्या गरजा सारख्या वाढत असतात. गरजा बाढल्या कीं एकट्याच्या हातून होणें शक्य नाहीं अशा असंख्यात वस्तूंची तो अपेक्षा करूं लागतो, आणि अशा वस्तु दुसऱ्याकडून संपादन करून घेण्यासाठीं पैशाची वलति त्याला सुचते. गरजा मर्यादित असतात तोंपर्यंत अदलाबदलीनें व्यवहार करतां येतो. उदाहरणार्थ, हिमालयपर्वताच्या माथ्यावर बेगसर येथें दर जानेवारी महिन्यांत जत्रा भरे, त्यावेळीं पुष्कळ ठिकाणचे लोक तेथें जमत. त्यांत मध्यआशियांतले लोक आपणाबरोबर आणलेले लोकर, टांकणखार वगैरे जिन्नस देऊन त्या ऐवजीं स्थानिक पदार्थ घेऊन जात, असा उल्लेख प्रवासवर्णनांत सांपडतो. पण आटोक्याच्या बाहेर मनुष्याच्या गरजा गेल्या, थोडक्यांत मनुष्याचें भागेनासें झालें, म्हणजे विनिमयसाधनाचा अवलंब

करावा लागतो. हें विनिमयसाधन म्हणजेच पैसा होय. ह्यावरून स्पष्ट दिसून येईल कीं, समाजाची प्रगति झाली म्हणजेच पैसा अस्तित्वांत येतो, व पैशामुळें त्या प्रगतीचें पाऊल पुढें पडण्यास मदत होते. पण ही गोष्ट जरी खरी असली तरी पैशामुळें सामाजिक व राजकीय स्वातंत्र्य लोकांस मिळून मानवजातीचा पुष्कळ फायदा झाला ( पान १२ ), ह्या विधानांत थोडी अतिशयोक्ति आहे असें आम्हांस वाटतें. धनी व नोकर ह्यांचे संबंध पूर्वापार रूढीनें ठरलेले असत म्हणून ते गुलामगिरीचेच असले पाहिजेत असें नाहीं. पिढीजात नोकरीचा हक्क असला म्हणजे धन्यालाही त्याच्या इच्छेविरुद्ध त्याच कुळांतील मनुष्यास नोकर म्हणून पतकरावें लागतें. ह्यांत गुलामगिरी असली कदाचित् तरी ती एकपक्षी नसून उभयपक्षी आहे हें आपण विसरतां कामा नये. बरें, वतन-पद्धतींत कांहीं तोटे आहेत तसे फायदेही आहेत. वतन-पद्धतीनें समाजांत सस्निग्धता उत्पन्न होते तर माहेमाल पगार देऊन ठेवलेल्या नोकरपद्धतीनें समाज विघटित होतो. समुद्रावरील वाळूच्या कणांप्रमाणें समाजाची स्थिति होते. तसेंच पैशाचा उपयोग प्रत्येक बाबतींत व प्रत्येक ठिकाणीं आपण करूं लागलों म्हणजे पैशाचें महत्व समाजांत अनिवार वाढतें. मनुष्य पैशाचा दास बनतो. पैशावांचून पदोपदीं अडून जातें. राजेही पेंचांत पडतात, आणि अखेरीस आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून लोकांवर जुलूम करतात. तांब्याच्या एका पैशाला रुपया नाहींतर मोहोरही समजा, असे अनन्वित हुकूम सोडून ह्या आर्थिक संकटांतून पार पडून जाण्याच्या युक्त्या आजपर्यंत पुष्कळ राजांनीं केल्या आहेत. ह्याचीं उदाहरणें बुकॅनन व फेरीस्ता यांनीं दिलीं आहेत.

The value of the different coins was frequently changed by the late Sultan ( Tipu ) in a very arbitrary and oppressive manner. When he was about to pay his troops, the nominal value of each coin was raised very high and left at the standard for about ten days, during which time the soldiery were allowed to pay off their debts at the high valuation. After this the standard was reduced to the proper value.'

*'Journey to Mysore'*–**Buchanan.**

टिपू सुलतानाप्रमाणेंच महंमद तघलखही अशा वाममार्गाचा अवलंब करीत असे. पण ती हकीकत इतिहासप्रसिद्ध असल्यामुळें येथें जागा अड-

वण्याचें कारण नाहीं. तात्पर्य, पैशाचें महत्त्व व्यवहारांत फार ठेवल्यानें समाजाला दुःखही सोसावें लागतें. पैसे पुष्कळ झाले कीं पदार्थांच्या किंमती वाढतात, आणि मग सोन्यारुप्याच्या नाण्याशिवाय चालत नाहींसें होतें. पण ह्या धातूंचा पुरवठा कमी, ह्यामुळें अनर्थपरंपरा ओढवते. हल्लींच पहा, पै कोणी बंद केली नाहीं. पण महर्घतेमुळें पैचा उपयोग करण्याचा प्रसंगच येत नाहीं. जो समाज सर्वत्र पैशाचा उपयोग करीत नाहीं तो मागसलेलाच असला पाहिजे; त्याचप्रमाणें महर्घतेमुळें देशाचें कांहीं नुकसान होत नाहीं, ह्या कल्पना आतां लोकांनीं सोडून दिल्या पाहिजेत. महागाई झाली म्हणजे एकाच्या ठिकाणीं दोन पैसे मोजावे लागतात इतकेंच, हें म्हणणें खोटें आहे. महर्घतेला द्रव्याची विपुलता हें कारण खरें मानलें, तरी द्रव्याची वाढ सर्व समाजांत सारखी वांटली जात नाहीं. थोडे लोक श्रीमंत तर बहुतेक गरीबच असा प्रायः योग असतो. त्यामुळें गरीब लोकांचे महागाईच्या दिवसांत मनस्वी हाल होतात. स्वस्ताईच्या काळांत लोक फार सुखी असतात. महर्घतेनें गरीबांची फार त्रेधा उडते. पण स्वस्ताईनें श्रीमंतांस यत्किंचितही त्रास होण्याची भीति नको. ज्या समाजांत कवडीपासून रत्नापर्यंत पैसा म्हणून वापरण्याची संधि मिळते तोच समाज सुव्यवस्थित मानला पाहिजे. शुक्रनीतींत म्हटल्याप्रमाणें " यत्र यादृग्व्यवहारस्तत्र तादृक्प्रकल्पयेत् " आणि " व्यवहार्यं वराटाद्यं रत्नान्तं द्रव्यमीरितम्. " द्रव्याचा उपयोग व्यवहाराच्या योग्यतेप्रमाणें करीत जावा. पण विद्यमान समाजांत आपणांस काय दिसून येतें? कवडी तर गेलीच, परंतु तांब्याचें नाणेंही फारसें वापरण्याचा प्रसंग येत नाहीं. ह्या महागाईमुळें सुखी कोण आहेत हें दिसतेंच आहे. ही स्थिति सुधारणें सध्यां तरी दुरापास्त दिसतें. पाश्चात्यांचें अनुकरण करून यंत्राच्या साहाय्यानें आपण उद्योगधंदे चालविले आहेत. अशा धंद्यांत कोट्यवधि रुपयांचें भांडवल संकलित होतें; परस्पर लोकांकडून मिळविलेले पैसे वाटेल त्या किंमतीनें पदार्थ विकत घेऊन खर्च करण्यास धंदेवाल्या लोकांस कांहीं दिक्कत वाटत नाहीं; व ह्यामुळेंच पदार्थांच्या किंमती वाढून महागाई होते. प्रस्तुत विषयाशीं महागाईचा निकट संबंध नसल्यामुळें तत्संबंधीं अधिक लिहिणें योग्य नाहीं. पण देशांत पैसा कमजास्त होईल त्या प्रमा-

णानें सुद्धां स्वस्ताई महागाई होत असल्यामुळें पैशापासून होणाऱ्या हिताचरोबर अनहिताकडेही पाहणें अगत्याचें होतें.

असो. रा. खांडेकर यांनीं हिंदी चलनाचा इतिहास देऊन सरकारी हुंड्यांचें विवेचन केलें आहे तें सर्वांनीं लक्षपूर्वक वाचून मनन करण्यासारखें आहे. तथापि रा. खांडेकर यांनीं दुसरी आवृत्ति काढतांना ह्या आवृत्तींत राहिलेले दोष काढून टाकण्याची खबरदारी घ्यावी. पान २३ वर " १२ व्या शतकांत ज्यावेळीं मार्कोपोलोनें चीन देशाला भेट दिली " असें वाक्य आहे. येथें १३ व्या शतकांत, असें पाहिजे. मार्कोपोलो हा चीन देशांत १३ व्या शतकाच्या मध्यांत गेला होता. तसेंच पान ६२ मध्यें—१४$\frac{३७}{३२}$ व १५$\frac{२}{६}$ असे आंकडे पडले आहेत. त्यांऐवजीं १५$\frac{३७}{३२}$ आणि १५$\frac{५}{६}$ असे आंकडे पाहिजेत. शुद्धिपत्रांत नमूद न केलेले दोषच येथें निर्दिष्ट केले आहेत. " स्टेट सेक्रेटरी विलायती व्यापाऱ्यांपासून सोनें घेऊन ज्या हुंड्या **विकत घेतो** " ( पा. ७० ) ह्या वाक्यांत " विकत **देतो** " असें पाहिजे. पा. ७९ वर " बँक ऑफ् बँबेची संस्थापना १८४७ सालीं झाली " असें आहे; १८४७ च्या जागीं १८४० पाहिजे. १८४०चा कायदा ३अन्वयें मुंबई बँकेची स्थापना झाली.पा.८३·"त्याचप्रमाणें चलनी नोटांचा प्रसार ४० कोटींनीं वाढला" ह्या ठिकाणीं ४५ कोटींनीं वाढला, असें पाहिजे असें वाटतें. पान ८८ मध्यें, "नोटांचा प्रसार १९१४ पासून १९१५ पर्यंत ६६ कोटींपासून १५३ कोटी रुपयांपर्यंत वाढला" असें लिहिलें आहे. पण ही वाढ १९१५ पर्यंत झाली नसून १९१९ पर्यंत झाली. त्याचप्रमाणें ह्याच पानावर पुढें " १९१७ व १९१८ सालीं एक रुपयाची व २॥ रुपयांची नोट सुरू करण्यांत आल्या व त्यांचा प्रसार अनुक्रमें १७ कोटी ५० लक्ष व १ कोटी ६६ लक्ष रुपयांपर्यंत होता—" असें लिहिलेलें आढळतें. पण कोटींचे आकडे चुकले असावे असें वाटतें. ( By March 31, 1918, the value of one-rupee notes in circulation was Rs.33 lakhs and of Rs 2½ notes Rs. 18 lakhs. On March 31, 1919, the values were Rs. 1051 lakhs and Rs. 184 lakhs: Findlay Shirras, Page 262 ). तसेंच पान ९१ मध्यें " पण हल्लीं पाहावें तों ही संख्या ६९ कोटींपर्यंत गेलेली आहे. " ६९ च्या ऐवजीं १०० हा आंकडा पाहिजे. ( फिनले शिरास. पानें २६३, २६४ पहा. ) खालील वाक्यांत केलेल्या

विधानाच्या सत्यतेविषयीं फार संशय येतो. " ज्या व्यापाऱ्याला विलायतेंत पैसे पाठवावयाचे असतील तो हिंदुस्थान सरकाराला २४ पेन्स दरानें पैसे देऊन हुंड्या विकत घेई. व ह्या हुंड्या विकत घेऊन विलायतेंत स्टेट सेक्रेटरीकडे पाठविल्या म्हणजे त्याच हुंड्या ३० किंवा ३२ पेन्स भावानें घेऊन तो हुंड्या घेऊन येणाऱ्या इसमास चुकत्या करी. ह्याचा अर्थ असा होई कीं, जो हिंदुस्थानाचा पैसा युद्धाचे पूर्वी व युद्ध चालू असतांना १६ पेन्स दरानें विलायतेस नेला गेला तोच पैसा ह्या उलट–हुंड्या विकण्याच्या पद्धतीमुळें ३० किंवा ३२ पेन्स ह्या दरानें परत ह्या देशांत येई. " पा. १२०. आतां २४ पेन्स दरानें परत–हुंडी विकत घेतल्यावर स्टेट सेक्रेटरीस ३० अगर ३२ पेन्स देण्याचें कारण काय, हेंच आम्हांस समजत नाहीं. परत-हुंडींत जितके पौंड लिहिले असतील तितकेच स्टेट सेक्रेटरी देणार; जास्त देण्याचें कारणच नाहीं. ह्या ठिकाणीं लेखकाचा थोडा गोंधळ झाला असावा असा आम्हांस संशय येतो. बाजारभावापेक्षां परत–हुंड्यांचा भाव फायदेशीर असतो, तेव्हां लोक सरकाराकडून परत हुंड्या विकत घेतात. तेव्हां २४ पेन्स आणि ३०।३२ पेन्स हे परतहुंड्यांचेच पण निरनिराळ्या वेळचे दर होत. सोनें देतांना स्टेट सेक्रेटरीस ह्या दरांत फरक करतां येत नाहीं. वास्तविक प्रकार असा आहे कीं, करन्सी कमिटीच्या अभिप्रायाप्रमाणें हिंदुस्थानसरकारनें १ रुपयास २४ पेन्सप्रमाणें परत हुंड्या काढण्याचें धोरण निश्चित केलें. कमिटीनें अभिप्राय दिला तेव्हां बाजारभाव २८ पेन्सांवर होता. पण पुढें लवकरच भाव उतरला, तो १७।१८ पेन्सांवर आला. तथापि सरकार १ रुपयास २४ पेन्स देत होतेंच. ह्याप्रमाणें एकदां नुकसान झालें आतां १ रुपयास १७ पेन्स मिळतात; अर्थात् रुपया स्वस्त होऊन सोनें महाग झालें. सरकारचा संकल्प तर रुपया महाग करून सोनें स्वस्त करावयाचें. ह्या नादानें बाजारभाव ३०।३२ पेन्स असतांना सरकार ३४।३५ पेन्स भावानें परत हुंड्या विकूं लागलें. ह्यांतही अर्थात् सरकारचें म्हणजे प्रजेचें नुकसान झालें. आणि ३५ कोटींचा चट्टा बसला तो अशा रीतीनें बसला. जी हुंडी रुपयास २४ पेन्सप्रमाणें हिंदुस्थान सरकारनें विकली त्याच हुंडीबद्दल रुपयास ३२ पेन्स स्टेट सेक्रेटरीनें देणें शक्य नाहीं. असो. पुढील आवृत्ति वरील सारख्या दोषांनीं विकृत होऊं नये म्हणजे झालें.

ह्यानंतर ग्रंथकर्त्याचे कांहीं सिद्धांत आक्षेपार्ह वाटतात त्यांचा उल्लेख करूं. पान ८ वर रा. खांडेकर लिहितात कीं, " ज्या देशांत सोन्याचें नाणें असून सर्व वस्तूंची किंमत सोन्यानें ठरविली जाते त्या देशाला आपली आर्थिक उन्नति करून घेतां येते, असा युरोप खंडांतील राष्ट्रांचा अनुभव आहे. आमच्या मतें कार्यकारण-भावाचा हा विपर्यास आहे. देशांत व्यापार वाढला, लोक श्रीमंत झाले, यांत्रिक धंद्यांचा सर्वत्र फैलाव झाला, म्हणजे सोन्याच्या नाण्याची आवश्यकता उत्पन्न होते. मोठ्या प्रमाणावर जेथें व्यवहार होत नाहींत तेथें सोन्याची जरूरी भासत नाहीं. एकाद्या साध्या खेडेगांवांत सोन्याचें नाणें सुरू केलें तर त्यामुळें त्या खेडयाची आर्थिक उन्नति होईल असें मानण्यास कारण नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं, लोकांच्या वाढत्या महत्त्वाकांक्षा सफल होण्यास सोन्याच्या नाण्याचा वापर अपरिहार्य आहे. सोन्याचें नाणें न वापरतां रुप्याचेंच वापरलें तर आर्थिक म्हणजे सांपत्तिक उन्नति होणार नाहीं असें नाहीं. पण सोन्याच्या नाण्यानें व्यापाराला सुलभता येते., आणि काल व श्रम ह्यांचा व्यर्थ व्यय होत नाहीं. " " पैशामुळें राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य लोकांस मिळतें. " ( पा. १२ ) ह्यांत जशी अतिशयोक्ति भरली आहे, तशीच वरील विधानांत आहे असें आम्हांस वाटतें. शास्त्रीवर विषयांवर लिहिलेल्या पुस्तकांत अतिशयोक्तीचा दोष न येऊं देण्याविषयीं जपलें पाहिजे. असा मासल्याचीं विधानें युरोपियन ग्रंथकारांनीं केलीं आहेत, नाहीं असें नाहीं. तथापि तो दोषच समजला पाहिजे. अशाच मासल्याचें वाक्य पान ९ वर वाचकांना आढळेल. " हल्लीं बनावट नाणीं पाडणें अशक्यच होऊन बसलें आहे. " वर्तमानपत्रें वाचणारांना हें म्हणणें जरा अतिशयोक्तिपूर्ण वाटेल; कारण खोट्या नाण्याचे खटले हल्लींही पुष्कळ वेळां वाचण्यांत येतात.

ह्या पुस्तकांतला तिसरा दोष म्हणजे रा. खांडेकर त्यांनीं कांहीं ठिकाणीं मोकार व अर्थभंग करणारी भाषा वापरली आहे. त्याचप्रमाणें इंग्रेजीचें मराठी करतांना जितकी काळजी घ्यावी तितकी घेतली नाहीं. तें कसें हें आतां आपण पाहूं.

" तसेंच एक मोठें खातें निर्माण करण्यांत यावें ह्या खात्याचा संबंध टांकसाळ व तिचे अधिकारी यांच्याशीं असावा, व पेढ्या किंवा **सरकार** ह्यांच्याशीं बिलकूल नसावा. " पान ८०-८१ ह्यांत सरकार हा शब्द

फार व्यापक असल्यामुळें तो भ्रामक कल्पना उत्पन्न करतो. ह्याचें मूळ इंग्रेजी असें आहे:–

"This department would be entirely dissociated from banks and from the *regular executive government.*" एक्झिक्यूटिव्ह गव्हर्मेंट म्हणजे अम्मलबजावणी करणारें खातें, सरकार नव्हे. तसेंच "पुढें ही रोख्यांची किंमत वाढून १९११ सालीं १४ कोटीपर्यंत गेली; व ह्या १४ कोटींपैकीं ४ कोटीचे तारणरोखे हिंदुस्थान सरकारच्या तारणरोख्याव्यतिरिक्त असावेत असें ठरलें" (पृष्ठ ८३). ४ कोटींचे रोखे **असावेत** असें ठरलें नाहीं; **असले तरी चालतील** असें ठरलें. शिवाय 'हिंदुस्थान सरकारच्या रोख्यांव्यतिरिक्त'–म्हणजे दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राचे असल्यास चालतील असा अर्थ ध्वनित होतो. पण वास्तविक प्रकार तसा नाहीं. बाकीचे रोखे संयुक्तराष्ट्राचेच पाहिजेत. इंग्रेजींत 'Of which 4 crores might be securities of the United Kingdom' असें आहे.

पृष्ठ ८४ वर खालील वाक्यें वाचकांस आढळतील. "ह्या हुंड्यांबद्दल येथील सरकाराला आपल्या खजिन्यांतून रुपये देणें अशक्य झालें. तेव्हां स्टेट सेक्रेटरीनें येथील सरकारास चलनी नोटांप्रीत्यर्थ राखून ठेवलेल्या निधींतून पैसे देण्यास परवानगी दिली, व तितक्या किंमतीचें सोनें त्याच निधीच्या विलायतेमधील शाखेंत ठेवून दिलें." ह्यांत 'निधींतून पैसे देण्यास परवानगी दिली' हे शब्द अर्थविपर्यास करणारे आहेत. खरोखर म्हटलें म्हणजे विलायतेंतील सोन्याच्या हमीवर हिंदुस्थान सरकारास नोटा काढण्याची परवानगी मिळाली. ('Under the Gold Note Act, council drafts were sold against earmarked gold at the Bank of England belonging to the paper currency reserve and *paid for in India by notes* issued against such gold')

८९ पानावरील शेवटलें संबंध कलमच निराळ्या भाषेंत लिहिलें गेलें पाहिजे होतें, "चलनी नोटांच्या मोबदला ठेवलेल्या रकमेंतून जे रोखे विकत घेऊन ठेवलेले असतात, त्यापैकीं फक्त वीस कोटीचे रोखे हिंदुस्थान सरकारनें काढावे, व बाकीचे रोखे ब्रिटिश साम्राज्यांतील इतर सरकारांनीं काढलेले असावे. ह्यांपैकीं १० कोटीचे रोखे एका वर्षाच्या मुदतीचे असावे व बाकीच्या रोख्यांबद्दल कांहीं ठराविक मुदतीनें पैसे मिळण्यासारखे असा-

वेत; ह्या तीस कोटींपेक्षां जास्त किंमतीचे रोखेसुद्धां ब्रिटिश साम्राज्यामधील सरकारांनीं काढलेले व एका वर्षाचे आंतील मुदतीचे असावेत, व हल्लीं जी रोख्यांच्या किंमतीची मर्यादा कायद्यानें १२० कोटीपर्यंत ठरविली आहे ती कांहीं वेळपर्यंत राहूं द्यावी " ! ! आतां मूळ इंग्रजी येणेंप्रमाणें आहेः—

" As regards the fiduciary portion of the reserve, the holding of securities issued by the Government of India should be limited to 20 crores. The balance should be held in securities of other governments comprised within the British Empire and of the amount so held not more than 10 cores should have more than one year's maturity, and all should be redeemable at a fixed date. The balance of the invested portion above these 30 crores should be held in short dated securities, with not more than one year's maturity, issued by government within the British Empire. "

ह्याचा अर्थ असा कीं, कागदी चलननिधींत जे रोखे ठेवावयाचे त्यांत हिंदुस्थानसरकारनें काढलेले रोखे वीस कोटींहून अधिक असूं नयेत. बाकीचे ब्रिटिशसाम्राज्यांतील इतर सरकारांनीं काढलेले असावे, व अशा रोख्यांपैकीं सुद्धां ज्यांची मुदत भरण्यास एक वर्षाहून अधिक अवधि आहे असे रोखे १० कोटींहून जास्त असूं नयेत; आणि हे सर्वच ठराविक मुदतीचे असावेत. ह्या तीस कोटींच्या रोख्यांशिवाय बाकीचे रोखे साम्राज्यान्तर्गत कोणत्यातरी सरकारचे असून थोडक्या मुदतीचे असावेत; असे कीं, त्यांची मुदत भरण्यास एक वर्षाहून अधिक काळ असूं नये.

आणखी पहाः—" ह्या नोटांच्या प्रसाराकरितां हिंदुस्थानचे तीन किंवा जास्त विभाग करण्यांत यावे व **प्रत्येक विभागांत एक मुख्य शहर असावें व येथूनच नोटांचा प्रसार करण्यांत यावा. तीन विभागांचीं तीन मुख्य शहरें असावींत** "—वगैरे (पा. ८९). तीन विभागांचीं मुख्य शहरें वाटेल तीं ठरविण्याचा अधिकार कायद्यानें दिला नव्हता. इलाख्याच्या राजधानीचें शहर हेंच नोटा काढण्याचें व विभागाचें मुख्य शहर असलें पाहिजे, असें १८६१ च्या कायद्यानें ठरविलें ('The Presidency towns were to be the places of issue of three of the circles').

पृष्ठ ७२ मध्यें येणेंप्रमाणें मजकूर आहेः—" आपल्या जवळचें सोनें वाढविण्याकरितां सरकारनें असा ठराव केला कीं, जितकें सोनें बाहेरून

येईल तितकें **आपण सांगूं त्या दरानें विकण्यांत आलें पाहिजे.**" एवढ्या चांगल्या पुस्तकांत असें अवास्तव विधान करणें चांगलें नाहीं. एका साव्हरीनला १५ रुपये, व ७. ५३३४४ ग्रेन सोन्याला १ रुपया, ह्या ठरीव दरानें आयात सोन्याची खरेदी करण्याचा हक्क सरकारनें आपल्याकडे घेतला. " Where any gold is taken possession of in the exercise of the power conferred by sub-section (1) the Governor General in Council shall pay to the owner thereof on production of such documents as the authority making the order under sub-section (1) may require, a sum in respect of such gold calculated at the rate set out in the schedule (Ordinance No. III of 1917)."

विलायतेंतील कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनीं मद्रास सरकारला लिहिलेल्या खलित्यांत (स. १८०६) हिंदुस्थानांत मोलाचें अगर संपत्ति मोजण्याचें मुख्य परिमाण एकाच धातूचें असलें पाहिजे असें म्हटलें आहे. ("The money or coin which is to be the *principal* measure of property ought to be of one metal only). पण पृष्ठ ३८ वर हा मुख्य "मुख्य" शब्दच गळला आहे. उपनाणें (token coin) सुद्धां मोलाचें परिमाणच होय, पण तें मुख्य परिमाण नव्हे.

असो. ह्या व अशासारख्या किरकोळ गोष्टी वगळल्या असतां एकंदरींत सदरहु पुस्तक अत्यन्त उपयुक्त झालें आहे. चालू चलनपद्धतींतील मुख्य दोष म्हणजे, एवढ्या मोठ्या देशाला चलनच नाहीं! त्याचप्रमाणें ह्या देशांत जें सोनें वास्तविक रीत्या यावयाचें तें विलायतेंतच ठेवलें जातें. आमचा रुपया म्हणजे कागदी नोटच होय. तुम्ही प्रचारांत नाणें फार आणूं नका, परंतु मुख्य चलन हें खरेंखुरेंच पाहिजे; लटकें खेळांतले उपयोगी नाहीं. विकलेल्या मालाबद्दल जें ह्या देशास सोनें मिळावयाचें त्याच्या ऐवजीं रुपयाचें लटकें नाणेंच आम्हांस पत्करावें लागतें. हें नाणें कोणी वितळीत नाहीं, म्हणून अशा नाण्याचा सुकाळ होऊन त्यामुळें महर्घता होते. बरें, हें सोनें आम्हांस इंग्लंडकडून घ्यावयाचें असतें तर गोष्ट वेगळी होती. पण इतर देशांतूनच तें आम्हांस यावयाचें असतें व तें हल्लींच्या पद्धतीनें परस्पर इंग्लंडला मिळून आमच्या देशांत रुपयेच मिळतात. उदाहरणार्थ, सन १९१३।१४ सालच घ्या. ह्या सालीं हिंदुस्थानानें एकंदर

माल १६२८२१५०० पौंड किंमतीचा परदेशीं पाठविला, व हिंदुस्थानांत आलेल्या मालाची किंमत १२२१६७१०० पौंड होती. अर्थात् इतर देशांनीं आमचें देणें ४०६५४४०० पौंड निघालें. पण हें सर्व इंग्लंड खेरीज करून फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, बेलजम, रशिया इत्यादि देशांकडून नच यावयाचें होतें. कारण ह्याच सालीं संयुक्त राष्ट्राला ( इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड ) ३८२३४३०० पौंडाचा माल हिंदुस्थानानें पाठविला तर त्या राष्ट्रापासून ७८३३३१०० पौंडाचा माल विकत घेतला. म्हणजे हिंदुस्थानानें ४००९८८०० पौंड इंग्लंडला द्यावयाचे होते. हें देणें देऊन बाकीचे सुमारें ४ कोट पौंड इतर देशांनीं आम्हांस द्यावयाच. पण ह्या सालचे प्रसिद्ध झालेले आंकडे पाहिले तर १॥ कोट पौंडही हिंदुस्थानांत आले नाहींत ! ह्या अशास्त्रीय पद्धतीचें वर्णन रा. खांडेकर यांनीं फार मार्मिकपणानें केलें आहे. म्हणून मराठींतून ह्या क्लिष्ट विषयाचा परिचय करून घेणाऱ्यास ह्या पुस्तकापासून फायदा झाल्याशिवाय राहणार नाहीं. अशी आमची खात्री आहे. रा. खांडेकर यांच्या हातून उत्तरोत्तर ह्याहीपेक्षां विस्तृत ग्रंथ ह्या विषयावर लिहिले जातील अशी आशा करून हें परीक्षण आम्हीं पुरें करितों.

पुस्तके जपून वापरा

# २० 'रुपया अर्थात् आमचें चलन.

[ पुस्तकपरीक्षा. ]

अलीकडे हिंदी चलनपद्धतीकडे आमच्या विद्वानांचें लक्ष वेधून मराठींत एकामागून एक ह्या विषयांवर ग्रंथ निघूं लागले आहेत, ही गोष्ट मराठी भाषेला अत्यन्त भूषणावह आहे. रा. खांडेकर यांच्या पुस्तकाचें परीक्षण विस्तारांत होऊन फारसे दिवस लोटले नाहींत तोंच 'रुपया अर्थात् आमचें चलन' हें पुस्तक विस्ताराकडे अभिप्रायाकरतां आलेलें पाहून आम्हांस मोठा आनंद होतो. ह्या पुस्तकाचे कर्ते रा. वामन नारायण गोडबोले व विनायक हरिहर घोरपडे हे आहेत. पैकीं रा. गोडबोले हे एम्. ए. असून अजमीर कॉलेजमध्यें त्यांनीं १०।१२ वर्षें अर्थशास्त्राच्या अध्यापकाचें काम केलें आहे. त्यानंतर ते राजाराम कॉलेजांत ह्याच विषयाचे प्रोफेसर होते. 'सर्व्हंट ऑफ् इंडिया' मध्यें चालू चलनपद्धतीवर त्यांनीं जे इंग्रजी लेख प्रसिद्ध केले त्यावरून त्यांचा चलनशास्त्रावरील व्यासंग किती मोठा आहे ह्याची कल्पना होण्याजोगी आहे रा. घोरपडे हे कोल्हापूर येथील एक विद्याव्यासंगी गृहस्थ आहेत. अशा अधिकारी माणसांकडून अत्यंत अवघड समजल्या जाणाऱ्या विषयावर मराठींत ग्रंथ लिहिला जावा ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. ह्या अडीचशें पानांच्या पुस्तकांत लेखकांची विद्वत्ता, लेखनचातुर्य व अधिकार हीं पदोपदीं दृक्प्रत्ययास येतात.

ह्या पुस्तकाचीं दहा प्रकरणें असून परिशिष्टांत इंपीरियल बँकेची घटनाही सविस्तर दिलेली आहे ( १ ) पूर्वेतिहास, ( २ ) सुवर्णसंलग्नचलन, ( ३ ) हिंदुस्थानांतील धातूंचें चलन, ( ४ ) कागदाचें चलन, ( ५ ) कौन्सिल बिलें अथवा हुंड्या, ( ६ ) सुवर्णचलननिधि, नोटांचा निधि व खजिन्यांतील शिल्लक, ( ७ ) पैसा व त्याचें कार्य आणि चलनाचीं तत्त्वें, ( ८ ) हिंदुस्थानांतिल बँका व त्यांचें स्वरूप, ( ९ ) महायुद्धाच्या कालांतील फेरबदल, आणि ( १० ) गुणदोषविवेचन. ह्याप्रमाणें दश प्रकरणा-

त्मक हें पुस्तक विश्वविद्यालयांतील विद्यार्थ्यांनाही उपयुक्त वाटल्याशिवाय राहणार नाहीं असा आम्हांस पूर्ण भरंवसा वाटतो. मासिकांतील विस्तृत परीक्षणानें पुस्तकाला प्रसिद्धि मिळते व म्हणूनच आम्ही हें परीक्षण करीत आहों. कारण, असल्या विषयावर मराठींत अनेक ग्रंथ व्हावे अशी आमची इच्छा आहे. त्यामुळें मराठीची योग्यता वाढणार आहे. असो. हिंदुस्थानांतील धेडगुजरी चलनपद्धतीचें स्वरूप ह्या पुस्तकांत चांगलें व्यक्त केलें असून ह्या पद्धतीचें समर्थन करणारांचें खंडनही उत्तम तऱ्हेनें केलेलें आहे.

तुम्हीं हिंदुस्थानचा सुवर्णनिधि इंग्लंडमध्यें कां ठेवतां, असा प्रश्न केल्यास, हिंदुस्थानसरकारास रुपये पाडण्याकरतां विलायतेंत रुपें खरेदी करावें लागतें तें विकत घेण्यास सोनें पाहिजे–तें लंडनमध्येंच सुवर्णनिधि ठेवल्यानें हिंदुस्थानांतून नेण्याचा त्रास व खर्च वांचतो, हें उत्तर मिळतें. पण रुपें विलायतेंतच खरेदी कां करावें ? हिंदुस्थानांतच खरेदी करण्याचा प्रघात पाडला तर व्यापारी येथें रुपें नाहीं का आणणार ? रुप्याचें मार्केट येथेंही अस्तित्वांत येईल. व्यापारी लोक येथें रुपें आणून सरकारास विकतील.

स्टेट सेक्रेटरीच्या गरजेपेक्षां अधिक हुंड्या कां विकतां ? असें विचारलें तर असें सांगण्यांत येतें कीं, हुंड्या विकल्या नाहींत तर व्यापारी हिंदुस्थानांत पौंड पाठवितील. पण हिंदुस्थानांनील लोकांना रुपये पाहिजेत, पौंड नकोत म्हणून हे पौंड ते सरकारी तिजोरींत देऊन रुपये मागतील, व असें झालें म्हणजे ते पौंड सरकारी तिजोरींत कुजत पडतील. परंतु इंग्लंडांतील व्यापारी पौंडच पाठवितील हें गृहीत कां धरतां ? सोनें पाठविणार नाहींत कशावरून ? सोनें पाठविलें म्हणजे लोकांच्या जवळ सोनें राहील, तिजोरींत जाणार नाहीं. शिवाय येथेंही सोन्याचें नाणें सुरू केलें तर लोक सरकारकडे पौंड घेऊन कशाला जातील ? वापरांतच हे पौंड राहतील खास.

आतां सोन्याचें नाणें सुरू करा अशी टकळी लावली, कीं त्या योगानें कोट्यावधि रुपयांचें सोनें बिनव्याजी पडून राहील असा आक्षेप घेण्यांत येतो. पण सोन्याचें चलन करा म्हटलें म्हणजे वापरांत सर्व चलन सोन्याचेंच ठेवा असा आग्रह कोणीं धरला आहे ? सोन्याच्या जोरावर नोटा काढतां येणार नाहींत काय ?

इंग्लंडमध्यें सुवर्णनिधि ठेवण्याचें दुसरें कारण असें पुढें करण्यांत येतें कीं, हुंडणावळ हिंदुस्थानच्या विरुद्ध गेल्यास इकडून इंग्लंडांत पौंड पाठविणें कठीण पडेल. लोकांच्या हातांत पौंड दिले तर ते दागिने करण्याच्या कामीं त्यांचा उपयोग करतील, व इंग्लिश व्यापाऱ्यांचें कर्ज फेडण्यास जवळ कांहीं राहणार नाहीं. पण ही आपत्तीही कांहीं दुस्तर नाहीं. खासगी व्यापाऱ्यांना पौंड देऊं नका, बँकांना द्या, व त्यांच्यापासून हे पौंड आम्ही देशाच्या बाहेर पाठवूं असा करार करून घ्या.

ह्याप्रमाणें ग्रंथकर्त्यांनीं निरुत्तर खंडन केलें आहे; व त्याबद्दल मतभेद असणेंहि शक्य नाहीं. चालू सदोष चलनपद्धतीचें ग्रहण सुटण्यास सोन्याचें चलन हिंदुस्थानांत सुरू केलें पाहिजे, हा सिद्धांतही सर्वमान्य होण्याजोगा आहे. " सुवर्णचलन स्थापित झालें म्हणजे, निधि, हुंडणावळ, कौन्सिल-बिलें वगैरे सर्व ' पदार्थांचा ' आपोआप अत्यंताभाव होईल " ही गोष्ट विलायतेंतील अधिकाऱ्यांना पटेल तेव्हां खरी. कारण वचन, कायदा, ठराव सर्व कांहीं झालें; फक्त कृति नाहीं. डॉकिन्स यानीं हिंदुस्थानांत रॉयल मिंटची एक शाखा लवकरच उघडली जाईल, असें जाहीर केलें. सोन्याचें नाणें चलनांत आणण्याचा आमचा पूर्ण निश्चय आहे, अशी मेस्टन साहेबांनीं खात्री दिली. दहा रुपयांचें सोन्याचें नाणें पाडण्याचें स्टेट सेक्रेटरीनींही ठरविलें. पण ब्रिटिश ट्रेझरीनें मध्यें विघ्न आणून हिंदुस्थान सरकारच्या सर्व ठरावांवर हरताळ फांसला ! ह्या हकीकतीचें केलेलें वर्णन वाचकांस पानें ३, १५ व २६ ह्यांवर वाचावयास मिळेल.

हल्लींच्या पद्धतीनें नोटा व रुपये यांचा वापरांत सुळसुळाट झाल्यामुळें घातकी महर्घता सर्वांस कशी जाचत आहे हेंही ग्रंथकर्त्यांनीं चांगलें सांगितलें आहे. पण आमच्या मतें ह्या गोष्टीचा अधिक विस्तार करावयास पाहिजे होता. पान २२७ वर ग्रंथकार लिहितातः " हल्लींच्या मितीस एकंदर चलनांत अदमासें २५० कोटी रुपये व १७५ कोटींच्या नोटा आहेत हें पूर्वी सांगितलेंच आहे. अशा रीतीनें एकंदर चलन ४००।४२५ कोटींचें झाल्यानें व व्यापारधंदा, उद्योग व आर्थिक उत्पादन स्थिर असल्यानें रुपये जास्त व वस्तु कमी असें होऊन त्यांचें गुणोत्तर बदललें आहे. " आतां सन १९११ च्या गणतीप्रमाणें ह्या देशाची लोकसंख्या सामान्यतः ३१ कोटी होती असें धरलें तर माणशीं १४ रु. चलन पडतें.

ह्याचा अर्थ असा कीं, माणशीं २० अगर ३० रु. उत्पन्न, आणि चलन रुपये १४. सन १९०० पासून वापरांत रुपये व नोटा किती होत्या हें खालील कोष्टकावरून दिसून येईलः—

| वर्ष. | वापरीत असलेले रुपये. | | ३१ मार्च रोजीं वापरांत असलेल्या नोटा. | | नोटा रुपयांची बेरीज. | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रकम कोटींत | दर माणशीं | रकम कोटींत | दर माणशीं | रकम कोटींत | दर माणशीं |
| १९०० | १३० | ४.५ | २२ | .८ | १५२ | ५.३ |
| १९०१ | १४३ | ४.९ | २२ | .७ | १६५ | ५.६ |
| १९०२ | १३८ | ४.७ | २२ | ,, | १६० | ५.४ |
| १९०३ | १३६ | ४.६ | २५ | .९ | १६१ | ५.५ |
| १९०४ | १४४ | ४.९ | २८ | ,, | १७२ | ५.८ |
| १९०५ | १५२ | ५.२ | २८ | ,, | १८० | ६.१ |
| १९०६ | १६४ | ५.६ | ३३ | १.१ | १९७ | ६.७ |
| १९०७ | १७८ | ६.१ | ३६ | १.२ | २१४ | ७.२ |
| १९०८ | १९१ | ६.५ | ३२ | १.१ | २२३ | ७.६ |
| १९०९ | १८७ | ६.३ | ३५ | १.२ | २२२ | ७.५ |
| १९१० | १८६ | ६.३ | ४० | १.४ | २२६ | ७.७ |
| १९११ | १८४ | ५.८ | ४० | १.३ | २२४ | ७.१ |
| १९१२ | १८२ | ५.८ | ४४ | १.४ | २२६ | ७.२ |
| १९१३ | १९१ | ६.० | ४७ | १.५ | २३८ | ७.५ |
| १९१४ | १८७ | ५.९ | ५० | १.६ | २३७ | ,, |
| १९१५ | २०४ | ६.५ | ४४ | १.४ | २४८ | ७.९ |
| १९१६ | २१२ | ६.७ | ५३ | १.७ | २६५ | ८.४ |
| १९१७ | २२७ | ७.२ | ६७ | २.१ | २९४ | ९.३ |
| १९१८ | २१९ | ६.९ | ८४ | २.७ | ३०३ | ९.६ |
| १९१९ | २२८ | ७.२ | १३४ | ४.२ | ३६२ | ११.४ |

वरील कोष्टकावरून गेल्या १९ सालांत लोकांच्या वापरण्यांत कुपट चलन आलें हें उघड होतें.

दरखल ने
भोर

आतां चलन फाजील झाल्यामुळें किमती वाढल्या, अगर किंमती वाढल्यामुळें चलन वाढवावें लागलें, हें आंकड्यांवरून ठरविणें जरा धोक्याचें खरें. कारण निरनिराळ्या माणसांनीं दिलेल्या आंकडयांतच फेर असतो. तथापि आंकडयांचेंही ह्या निर्णयास साहाय्य घेतलें पाहिजे ह्यांत शंका नाहीं. म्हणून १८९० पासून १९१२ पर्यंत सालोसालचा पदार्थांच्या किंमतीचा ज्ञापक अंक ( Index number ) येथें देणें अवश्य आहे.

| साल | ज्ञापक अंक | साल | ज्ञापक अंक |
|---|---|---|---|
| १८९० | ९७ | १९०१ | ११६ |
| १८९१ | ९८ | १९०२ | १११ |
| १८९२ | १०३ | १९०३ | १०७ |
| १८९३ | १०२ | १९०४ | १०६ |
| १८९४ | १०० | १९०५ | ११६ |
| १८९५ | १०१ | १९०६ | १२९ |
| १८९६ | १०६ | १९०७ | १३३ |
| १८९७ | १२१ | १९०८ | १४३ |
| १८९८ | १०६ | १९०९ | १३२ |
| १८९९ | १०४ | १९१० | १३२ |
| १९०० | १२२ | १९११ | १३४ |
| | | १९१२ | १४१ |

सन १९१३ चे आंकडे मिळाले नाहींत. व पुढें महायुद्धानें उलथापालथ केल्यामुळें पुढच्या आंकडयांचा उपयोगही नाहीं. ह्या आंकडयांवरून असें दिसतें कीं, स. १९०० पासून १९१२ पर्यंत शेंकडा १५ किमतींमध्यें वाढ झाली व त्याच्या पूर्वीच्या १० वर्षांत १८९७ साल वगळलें तर शेंकडा ४ ही वाढ झालेली नव्हती. आतां स. १८९० सालीं रुपये व नोटा मिळून १२० कोटी रु. किमतीचें चलन वापरांत होतें तेंच स. १९१२ सालीं २१४ कोटी रु. चें झालें; म्हणजे चलनांत दुप्पटीचा फरक पडला. ( दत्त साहेबांचा रिपोर्ट ). आतां व्यापारही दुप्पटीवर वाढला असें सांगण्यांत येतें त्याचा विचार निराळा.

आतां महर्घता कोणत्या पदार्थांसंबंधानें विशेष झाली हें पुढील आंकड्यांवरून कळेल. १८९० ते १८९४ पर्यंत दर सालच्या निरनिराळ्या पदार्थांच्या किंमतीचा सरासरीचा आंकडा १०० धरून पुढील ज्ञापक अंक दिले आहेत.

| साल. | साखर. | चहा व कॉफी. | दुसरे खाद्य पदार्थ. | गळितांचीं धान्यें, तेलें व पेंड |
|---|---|---|---|---|
| १८९० | ९९ | ९५ | ९९ | ९७ |
| १८९१ | १०० | ९४ | ९७ | ९८ |
| १८९२ | ९८ | १०३ | १०१ | १०१ |
| १८९३ | १०२ | ९८ | १०३ | १०४ |
| १८९४ | १०१ | ११० | १०० | १०० |
| १८९५ | ९८ | १०० | ९४ | १०४ |
| १८९६ | ९८ | ९४ | ९९ | १०९ |
| १८९७ | १०१ | ८३ | ११० | ११४ |
| १८९८ | १०० | ७८ | ११० | १०१ |
| १८९९ | ९७ | ७१ | १०९ | १०१ |
| १९०० | १०४ | ६७ | १२० | १२२ |
| १९०१ | १०१ | ६६ | ११७ | ११८ |
| १९०२ | ९१ | ६५ | १०८ | ११४ |
| १९०३ | ९२ | ६६ | १०६ | १०० |
| १९०४ | ९६ | ६५ | १०६ | ९५ |
| १९०५ | १०५ | ६५ | ११५ | ११२ |
| १९०६ | ९९ | ६५ | १२५ | १३२ |
| १९०७ | ९९ | ७२ | १२५ | १४१ |
| १९०८ | १०६ | ६८ | १२४ | १४५ |
| १९०९ | १०९ | ७१ | १२४ | १३१ |
| १९१० | ११२ | ७९ | १३० | १४३ |
| १९११ | १०९ | ८३ | १३३ | १४९ |
| १९१२ | १११ | ८५ | १३६ | १५६ |

| साल. | कापूस. | कापड. | कातडीं व चामडीं. | धातू | कच्चा व पक्का माल, | इमारती सामान. |
|---|---|---|---|---|---|---|
| १८९० | १०२ | १०१ | ९५ | ९८ | १०० | ९९ |
| १८९१ | ९६ | ९७ | ९५ | ९८ | ९८ | ९९ |
| १८९२ | ९५ | ९५ | ९६ | १०० | ९९ | ९९ |
| १८९३ | १०५ | १०४ | १०५ | १०० | १०२ | १०१ |
| १८९४ | १०२ | १०३ | १०९ | १०४ | १०१ | १०२ |
| १८९५ | १०२ | ९९ | १२० | १०५ | १०६ | १०४ |
| १८९६ | १०२ | ९२ | १११ | १०४ | १०८ | १०७ |
| १८९७ | ९८ | ८८ | १०९ | १०५ | १०३ | १०९ |
| १८९८ | ९१ | ८४ | ११३ | १०६ | १०१ | ११२ |
| १८९९ | ८७ | ९४ | १२४ | १२२ | १०३ | ११३ |
| १९०० | १०८ | ८८ | ११५ | १३७ | ११२ | ११६ |
| १९०१ | १०४ | ८३ | ११८ | १२१ | १०७ | ११८ |
| १९०२ | १०२ | ८४ | १२६ | ११६ | १०४ | १२० |
| १९०३ | १०६ | ९३ | १३६ | ११६ | १०६ | १२२ |
| १९०४ | १२१ | ९१ | १४१ | ११३ | ११० | १२५ |
| १९०५ | ११३ | ९८ | १४८ | ११५ | ११२ | १२८ |
| १९०६ | १२१ | ९८ | १६४ | १२६ | ११८ | १३१ |
| १९०७ | १२३ | १०२ | १६१ | १३७ | १२३ | १३४ |
| १९०८ | १२१ | ८६ | १५० | १२१ | १२२ | १३६ |
| १९०९ | ११९ | ९३ | १५२ | ११६ | १२२ | १३८ |
| १९१० | १४१ | ९६ | १६४ | ११८ | १२७ | १४२ |
| १९११ | १४५ | ९५ | १५९ | ११९ | १२६ | १४६ |
| १९१२ | १३७ | ९८ | १७२ | १२६ | १३२ | १४९ |

वरील आंकड्यावरून असें दिसतें कीं, गळिताचीं धान्यें, पेंड, कातडीं, चामडीं व नंतर खाण्याचे पदार्थ ह्यांच्या किंमतींत मनस्वी वाढ झाली आहे. देशांतील जनावरें कमी झालीं, पेंड बाहेर गेली म्हणजे शेतीचा खर्च वाढतो, आणि धान्य महाग होतें. जगण्याचें साधन जें अन्न तेंच महाग झालें म्हणजे मजुरी वाढून इतर सर्व जिन्नस हळुहळू महाग होतात. म्हणून

कच्चा माल सर्वस्वी परदेशीं रवाना झाल्यानें फायदा होतोच असें नाहीं. कच्चा माल हींच ज्या देशाची संपत्ति त्या देशाला व्यापार फायदेशीर होत नाहीं. अशा देशाच्या हातांत पैसे येतात खरें, पण ते पैसे यांत्रिक अगर इतर जिन्नस—परदेशांतून आलेले—खरेदी करण्यांत खर्च होतात. हा फरक फार महत्त्वाचा असून प्रत्येक अर्थशास्त्रज्ञानें लक्षांत ठेवला पाहिजे. येथून कापूस इंग्लंडला नेऊन तेथें कापड तयार होतें. आपल्या देशाला कापडाचा पुरवठा करून जास्त काढलेला माल इंग्लंड परत ह्या देशांत पाठवितें. आतां कापडावर किंमत जी आकारणार ती कापसाला पडलेली किंमत, माल बनविण्यास लागणारा खर्च व नफा, ह्या सर्वांचा अंतर्भाव करून आकारली जाते, हें उघड आहे. तेव्हां ह्या धंद्यांत इंग्लंडचें नुकसान कोठें झालें ? कापसाला पडलेली किंमत भरून निघेल इतका माल मात्र तयार करण्याची जबाबदारी बाळगली म्हणजे झालें. आतां आपली स्थिति काय होते पहा. कापसाबद्दल आपणांस पैसे मिळाले खरे परंतु हे आलेले पैसे आपणांस कापडाकरतां द्यावे लागले. असो. ह्यापेक्षां येथें अधिक लिहिणें शक्य नाहीं. तथापि धान्याची निर्गत त्यांतल्या त्यांत फारच जाचक होते. सुपीक सालांत आलेलें धान्य २।३ सालें पुरेल इतकें असतें असें कित्येक ठिकाणीं म्हटलेलें आढळतें. पण त्यांत कांहीं तथ्य दिसत नाहीं. असें असतें तर दुष्काळाच्या सालीं आस्ट्रेलिया वगैरे परदेशांतून धान्य आणविण्याची गरज लागली नसती. व असें धान्य आणावें लागतें ह्यावरून लोकांजवळ शिल्लक धान्य नसतें असें म्हणणें भाग पडतें. संस्थानें धरून सर्व हिंदुस्थानांत दरसाल आठ कोटी टन धान्य म्हणजे दोन अब्ज चोवीस कोटी मण होतात. ह्यापेक्षां उपज जास्त होण्याचा संभव दिसत नाहीं. हें खालील आंकड्यांवरून कळून येईल.

स. १९१७।१८ सालीं धान्याच्या लागवडीची जमीन वीस कोटी सत्तर लक्ष एकर होती, व १९०८।०९ सालीं २९ कोटी ७० लक्ष होती. म्हणजे अधिक चांगली जमीन लागवडीस आणणें फारसें शक्य नाहीं. तसेंच १८९० पासून १९१२ पर्यंत धान्याच्या पिकाची मर्यादा १ अब्ज ८६ कोटी ७२ लक्ष मणांपासून २ अब्ज ४ कोटी ७ लक्ष मणांपर्यंतच कायती गेली. पण लोकसंख्या १८९१ पासून १९१२ पर्यंत २१ कोटींवरून २३ कोटींवर गेली. सारांश, लोकांच्या गरजेपेक्षां धान्याची निपज कमी होते,

व ही गोष्ट दत्तसाहेबांनीं आपल्या रिपोर्टांत सांगितलीही आहे. "In other words the requirements in food grains for internal consumption have increased in a larger proportion than the total production of food grains.' परंतु वरील हिशेबांत ब्रह्मदेश धरलेला नाहीं. आतां निर्यात माल म्हणजे धान्य मात्र दुपटीनें वाढलें. १८९० ते ९५ ह्या पांच सालांची वार्षिक सरासरी काढली तर २८८९९००० हंड्रेटवेट धान्य हिंदुस्थानांतून परदेशांत गेलें. पण १९११।१२ सालांत ६४२४०००० हं. धान्य परमुलखांत रवाना झालें. ब्रह्मदेशांतून व इतर देशांतून जें धान्य आयात होतें तें अर्धा कोटीपासून अडीच कोट हंड्रेटवेट पर्यंत असतें. ब्रह्मदेशांतून तांदूळ आले नाहींत तर हिंदुस्थानची उपासमारच होईल. आतां देशांत पिकणाऱ्या धान्यापैकीं लोकांच्या निर्वाहाला कांहीं धान्य जातें, कांहीं बी भरण्याकरतां ठेवावें लागतें व बाकीचें निर्गत होतें. सन १८९९ सालीं फॅमिन कमिशननें केलेल्या अंदाजाप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांस खाण्यास जवळजवळ ६ कोटी टन धान्य लागतें. नक्की आंकडे येणेंप्रमाणें: ५८५३५८४५ ह्यांत ४८०५८४७२माणसांचें अन्न म्हणून; ४२२३१७ ब्रियाकरतां;३१९९३१०जनावरांकरतां; ३०५४६९०वांया जातें तें. आतां सदरहू रिपोर्टांत इंग्रजी मुलखांतील २१ कोटी लोकांना ६ कोटी टन अन्न लागतें असें धरलें आहे. सध्यां सर्व हिंदुस्थानची लोकसंख्या ३१ आहे. तेव्हां वास्तविक पाहतां ९ कोटी टन धान्याची देशाला निर्वाहाकरतां जरूरी आहे. असें असून २ कोटी टन धान्य दरसाल परदेशीं जात असतें. अर्थात् ३१ कोटी लोकांना ६ कोटी टन धान्यावर निर्वाह करावा लागतो. गेल्या कौन्सिलांत हिंदुस्थान सरकार तर्फे असें सांगण्यांत आलें कीं, चालू सालीं ९ कोटी टन धान्य निपजेल असा अंदाज आहे. व त्यापैकीं १८ लक्ष धान्य पुरून उरण्यासारखें आहे. ह्या बाबतींत नक्की अजमास करणें अशक्य असतें. म्हणून १८ लक्ष टन धान्यसुद्धां देशाबाहेर जाणें चांगलें नसल्यामुळें धान्याची निर्गत कायमची बंद करण्यांत सर्वांचें हित आहे. लोकसंख्या वाढत्या प्रमाणावर असते. त्या मानानें धान्याची निपज वाढत नाहीं. स. १८७२ सालीं लोकसंख्या २० कोटी होती तर ती हल्लीं एकतीस कोटीवर आहे.

आतां इतर देशांतील महर्घतेचा धक्का हिंदुस्थानासही भोगावा लागतो असें प्रतिपादन करण्यात येतें, त्यांत किती तथ्य आहे हें खालीं दिलेल्या आंकड्यावरून समजेल.

## निरनिराळ्या देशांतील किंमतींचा [ सोन्याच्या नाण्यांत ] ज्ञापक अंक.

१८९० ते १८९४ ह्या सालांच्या किंमतींची सरासरी = १००

| | इंग्लंड. | बेल्ज्यम. | जर्मनी. | फ्रान्स. |
|---|---|---|---|---|
| १८९० | १०५ | १०१ | १०६ | १०४ |
| १८९७ | ९०. | १०० | ९० | ८७ |
| १९०४ | १०१ | ११४ | १०६ | ९९ |
| १९०६ | १०७ | १२१ | ११८ | ११० |
| १९०८ | १०४ | १२७ | ११५ | १०५ |
| १९११ | ११४ | १२७ | १३४ | १२० |
| १९१२ | १२४ | ( मिळत नाहींत ) | ( नाहींत ) | ( नाहींत ) |

| | अमेरिका. | ऑस्ट्रेलिया. | हिंदुस्थान. |
|---|---|---|---|
| १८९० | १०६ | ११७ | ११३ |
| १९९७ | ८४ | १०२ | १२० |
| १९०४ | १०६ | ९८ | ११० |
| १९०६ | ११५ | १०५ | १३४ |
| १९०८ | ११५ | १२३ | १४७ |
| १९११ | १२१ | १११ | १३९ |
| १९१२ | १२८ | १३० | १४७ |

सदरहू आंकडे मुल्हॉलच्या आंकडे ग्रंथांतून घेतले आहेत.

वरील आंकड्यावरून महायुद्धाच्या पूर्वी हिंदुस्थानांत इतर देशांच्या मानानें पाहतां स्वस्ताईच होती असें म्हटलें पाहिजे. म्हणजे इतर देशांत महर्घता झाली त्याचा हा परिणाम ह्या देशावरही झाला असें मानण्यास कांहीं जागा नाहीं.

किमती वाढण्याला दोन कारणें असतात. एक, पदार्थांचा पुरवठा मागणीपेक्षां कमी; आणि दुसरें पैसा पुष्कळ. ह्यांपैकीं चलन फाजील झालें, व तें होत राहणार, हें मागें आंकडे दिले आहेत त्यावरून सिद्ध होतेंच आहे. " चलन बेसुमार झालें व महागाई झाली. चलन पाण्यापेक्षां पातळ झालें " हें ग्रंथकर्त्यांचें विधान अगदीं बरोबर आहे पण ह्या महागाईची उत्कटता धान्यन्यूनत्वानेंही वाढली आहे असें मानण्यासही कारण आहे, असें वरील विवेचनावरून दिसून येईल. व्यापारी मोसमांत, लोकांस रुपयांचीं गरज लागते तेव्हां, सरकारास रुपये पाडणें भाग पडतें. आतां मंदीच्या दिवसांत हे सर्व रुपये परत सरकारी खजिन्यांत येत नाहींत. त्यामुळें दरसाल चलनांत भर पडत जाते. कारण रुपये कोणी वितळवीत नाहींत. त्यांत त्यांचा फायदा नाहीं. ह्यासाठीं कागदी चलननिधींतून मोसमांत सरकारानें व्यापाऱ्यांस कर्ज द्यावें, ही ग्रंथकर्त्यांची सूचना आमच्या अर्थशास्त्रज्ञांनीं व सरकारनें विचार करण्यासारखी आहे. पण हल्लीं हिंदुस्थानांत शिल्लक कोणत्याही रूपानें जास्त झाली कीं हुंड्या काढून तद्द्वारा ती विलायतेंत नेण्याच्या चालू प्रघातास अगोदर आळा बसला पाहिजे. सरकार टांकसाळींतून रुपये मनसोक्त रीतीनें काढून लोकांवर लादतें असें कोणी शहाणा मनुष्य म्हणणार नाहीं. ह्या लौकिकी भ्रमाचा निरास ग्रंथकर्त्यांनीं केला आहे. आपण सरकारकडे सॉव्हरिन, नोटा अगर कौन्सिल-बिलें घेऊन जातों तेव्हांच आपणांस रुपये देणें सरकारास भाग पडतें. लोकांजवळ सॉव्हरिन फारसे नाहींतच. दरसाल सरासरी ५ कोटींचे सॉव्हरिन मोसमाच्या दिवसांत लोक सरकारकडे आणून त्याऐवजीं रुपये घेऊन जातात. नोटाही ह्याच प्रमाणांत येतात. सरकारी हुंड्या पटविण्याकरतां मात्र दरसाल १५–१६ कोटी रुपये तरते ठेवावे लागतात. तात्पर्य, इंग्लंडांत सोन्याचा निधि ठेवल्यामुळें हें रुपयांचें चक्र सतत चालू ठेवावें लागतें, ही गोष्ट ह्या पुस्तकांत फारच उत्तम रीतीनें विशद करून सांगितली आहे. ग्रंथकर्त्याची विद्वत्ता पुस्तकांत ठिकठिकाणीं प्रत्ययास येते. आमच्या समजुतीप्रमाणें विद्वत्तेचा ठसा उठलेलें ह्या विषयावरील असें दुसरें पुस्तक पाहाण्यास मिळावयाचें नाही. या ग्रंथांत पुष्कळ अंगभूत गोष्टीचा ऊहापोह विद्वत्तापूर्वक केलेला आहे, त्या सर्वांचा येथें विचार करणें शक्य नाहीं. वाचकांनीं मुळाकडेच धांव मारिली पाहिजे. महर्घतेचा

प्रश्न सोडविणें सोपें काम नाहीं. तथापि हिंदी अर्थशास्त्रज्ञांनीं आपल्या हातांत अधिकार येईल तेव्हां धान्याच्या निर्गतीवरील प्रतिबंध उठविण्याचे ठराव पुढें न आणतां, उलट धान्य देशाबाहेर जाणार नाहीं, चलनपद्धति निर्दोष होऊन फाजील चलन होणार नाहीं, असे उपाय योजण्याचे प्रयत्न करावे. चलन गरजेपेक्षां फाजील आहे ही गोष्ट कित्येक लोक कबूल करीत नाहींत. त्यांच्या मतें उद्योगधंदे वाढल्यामुळें आहे हें चलन जरूरच आहे. १८९० सालीं व्यापाराचा शापक अंक ८५ होता तो १९१८ सालीं ४१७ वर आला. अर्थात् चौपटीहून अधिक व्यापारी घडामोड वाढल्यामुळें चलन अधिक लागलें हें कितपत खरें आहे, हें पाहणें तज्ज्ञांचें काम आहे, पण धान्य मुबलक आहे, चलन बेताचेंच आहे, मग महागाई कशानें झाली, हें नीटसें सांगतां येत नाहीं. इतर देशांकडे बोट दाखविल्यानें समाधान होत नाहीं.

असो. ह्या पुस्तकांत चुकींचीं विधानें बहुशः नाहींत ही गोष्ट विशेष आहे. तथापि कांहीं थोडीं विधानें आक्षेपार्ह आहेत त्यांचा विचार होऊन पुढल्या आवृत्तींत तीं सुधारलीं जातील अशी आम्हांस आशा आहे. पान २८ वर पौंड हें कायदेशीर फेडीचें चलन आहे असें म्हटलें आहे, तें यथार्थ नाहीं. कीन्स साहेबांनीं आपल्या पुस्तकांत ( पा. ७४ ) हींच चुकी केली आहे, व तिचेंच प्रतिबिंब ह्या पुस्तकांत उठलेलें दिसतें. आमीं अॅक्टपुरतेंच पौंड हें कायदेशीर फेडीचें चलन आहे. ( स. १८९९ चा १९ वा कायदा पहा. ) कोणत्याही माणसाला आपल्या कर्जाची फेड पौंड देऊन करतां येईलच असा नियम नाहीं. " पूर्वी रुपें व सोनें यांमधील प्रमाण १:१० असें होतें तें आतां १:१५, १:२०, १:२५ असें होऊं लागलें " ( पा. ५ ). ह्यांत ' रुपें व सोनें ' ह्यांच्याऐवजीं ' सोनें व रुपें पाहिजे. " विशेषतः नोटांची लोकप्रियताही अगदीं आधुनिक असल्यामुळें, नोटांविषयीं अविश्वास होऊन, नोटा व रुपये जमविण्याची हूल केव्हां उठेल याचा नियम नाहीं. ( पा. ११५ ). ह्यांत "नोटा" शब्द चुकून पडला आहे असें वाटतें. " नंतर चेंबरलेन कमिशननें हें घोरण पसंत करून, सोन्याचें चलन करणें हें मूर्खपणाचें आहे असें ठरविलें! सुवर्णचलनासारखें उत्क्रांतीच्या उच्च शिखरावर गेलेलें चलनच हिंदुस्थानास हितकर आहे असें ठरवून, त्यांनीं हा निधि इंग्लंडमध्यें ठेवावा असेंही

सुचविलें " ( पा. ९८ ). सोन्याचें चलन व सुवर्णचलन ह्यांत फरक नाहीं. सुवर्णचलन ह्या शब्दांच्या ठिकाणीं ' सुवर्णविनिमयप्रमाणपद्धति ' असें पाहिजे होतें. रुपयास १६ पेन्स हा भाव असला म्हणजे इंग्लिश व्यापाऱ्यांना आपले रुपये कायदेशीर रीतीनें इंग्लंडांत पाठवतां येतात, असें विधान पा. २ व १३१ वर केलेलें आढळतें. पण त्यांतील वाक्य-रचना सदोष आहे. इंग्लंडांत रुपये पाठविण्याचें मुळीं कारणच नाहीं, कां तर त्याचा उपयोग नाहीं. हिंदुस्थानांतील इंग्रजी व्यापारी रुपयांचे पौंड येथें करून ते इंग्लंडांत पाठवितात. आक्षेपविषयक भाषासरणी इंग्रेजी धर्तीवर गेलेली दिसते. एवढीं गालबोटें वगळलीं म्हणजे सर्व पुस्तक येथून तेथून धुतल्या तांदळांप्रमाणें स्वच्छ, निर्मल व उत्कृष्ट आहे असेंच म्हणावें लागतें.

# २१. समाजशास्त्र–व्याख्यानमाला.

## परीक्षण.

फर्ग्युसन कॉलेजांत अध्यापकाचें काम करीत असलेले व सर्व सुधारकचमूंत प्रत्यक्ष कृतीच्या योगानें साहजिकच अग्रेसरत्व पावलेले प्रो. गोविंद चिमणाजी भाटे ह्यांनीं अङ्गीकृत सुधारणा सुकर करण्याच्या उद्देशानें समाजशास्त्रावर मुंबईस 'सोशल सर्व्हिस लीग'च्या विद्यमानें सहा व्याख्यानें इंग्रजी भाषेत दिलीं, व नंतर लौकरच पुढें होणाऱ्या सामाजिक परिषदेंतील सदस्यांना ह्या व्याख्यानांचा लाभ मिळावा म्हणून भाषांतर करून तीं प्रसिद्ध करण्यांत आलीं. ह्याप्रमाणें प्रो. भाटे यांनीं मूळ इंग्रेजींत प्रदर्शित केलेले विचार आतां मराठींत प्रकट झाले, ह्याबद्दल निःसंशय मराठी जाणणारे लोक प्रो. साहेबांचे अत्यन्त ऋणी आहेत, ह्यांत शंका नाहीं. प्रो. भाटे यांनीं आपल्या प्रस्तावनेंत इंग्रेजी व्याख्यानांचें भाषान्तर करून तें प्रकाशित करण्यास कशा अडचणी आल्या ह्याचें सुंदर चित्र रेखाटलें आहे. पण त्यावरून यथार्थ बोध काय निघतो ह्याची अस्पष्ट कल्पनाही प्रो. साहेबांस असेल असें वाटत नाहीं. मुंबईतील ज्या तरुणतरुणींना ज्ञानसंपन्न करण्याच्या अत्यन्त श्लाघ्य उद्देशानें प्रो. साहेबांनीं ही व्याख्यानमाला गुंफण्याचे श्रम घेतले, त्या तरुणतरुणींना इंग्रेजीशिवाय दुसरी भाषा अवगत नव्हती कीं काय ? इंग्रेजी जाणणारांचें प्रो. साहेबांच्या इंग्रेजी व्याख्यानांवांचून अडलें होतें तरी कोठें ? प्रो. साहेबांनीं आपल्या तीन व्याख्यानांत समाजशास्त्राची जी माहिती दिली; ती सर्व आणि थोडी जास्तीही कोणाही इंग्रेजी जाणणारांस 'एन्सायक्लोपिडियां'तील "सोशिआलजी" ह्या शब्दाखालीं दिलेली वाचतां आली असती. अज्ञान समाजाची सुधारणा इंग्रेजी भाषेच्या द्वारें करूं पाहणारांना अपयश आल्यास त्याचें खापर समाजावर फोडण्यांत अर्थ नाहीं. इंग्रेजी भाषेंतून सर्व विषय शिकविण्याच्या सरकारी विद्याखात्याच्या पद्धतीस आपण नांवें ठेवतों आणि

तोच निन्द्य मार्ग आपण स्वतः अवलंबितों, हा आत्मघातकी प्रकार आमच्या सुशिक्षितांच्या लक्षांत अद्यापि येत नाहीं हें राष्ट्राचें दुर्भाग्य समजलें पाहिजे. प्रसंग येईल तेव्हां इंग्रजींतच लिहावयाचें व इंग्रजींतच बोलावयाचें अशी ज्यांना दुष्ट खोड लागली आहे, त्यांच्यावर समाजसुधारणेच्या उत्कण्ठेऐवजीं आत्मप्रौढीचा अशिक्षित लोकांनीं आरोप केल्यास तो अगदींच निराधार व बाष्कळ आहे असें म्हणतां येणार नाहीं. ज्या संस्थेच्या विद्यमानें प्रो. भाटे यांनीं इंग्रेजी व्याख्यानें दिलीं; त्या संस्थेनेंही आपलें नांव इंग्रेजी भाषेंतच धारण केलें आहे. नांवानें मोठें कार्य होतें. नुसतें नांव ऐकून अज्ञ जनांना संस्थेचा हेतु सहज कळतो. इंग्रेजी नांवाच्या योगानें कोणाचें किती हित होतें, ह्याचा खुलासा करून लोकांची समजूत अयोग्य आहे असें सिद्ध करण्याचें श्रेय कोणीं तरी अवश्य घ्यावें. असो. इंग्रेजी व्याख्यानानंतर तरी तीं व्याख्यानें मराठींत भाषांतर करण्याची सुबुद्धि प्रो. साहेबांस झाली ह्याबद्दल मराठी वाचक प्रो. साहेबांचे उपकार केव्हांही विसरणार नाहींत.

समाजशास्त्राची रचना अर्वाचीन काळींच झाली आहे व ह्या शास्त्राचा उदय पाश्चिमात्य राष्ट्रांतच झाला आहे, ही गोष्ट खोटी नाहीं. इतर अनेक शास्त्रांत अलीकडे झालेली प्रचण्ड प्रगति व नवीन शोध ह्यामुळेंच समाजाविषयीं कांहीं यथार्थ अनुमानें काढणें शक्य झालें आहे. साधनांच्या अभावीं प्राचीनकाळीं ह्या विषयाचें शास्त्र बनणें असंभाव्य होतें. नुसत्या तर्कानें जें कांहीं करतां येण्याजोगें होतें तें अरिस्टॉटल, प्लेटो वगैरे जुन्या पण्डितांनीं केलेलें आहे. प्रत्येक मनुष्यास समाजशास्त्राचीं मूलतत्वें अवगत असणें अवश्य आहे. इतकें तें शास्त्र मनोरंजक व बोधप्रद आहे. आमच्या माहितीप्रमाणें मराठींत समाजशास्त्रावर आजपर्यंत कोणीच कांहीं लिहिलेलें नाहीं. ह्या कारणाकरतांच प्रो. भाटे ह्यांच्या व्याख्यानांचें महत्व फार आहे. वाईट इतकेंच वाटतें कीं, ह्याहून अधिक विस्तृत ग्रन्थ लिहिण्याची बुद्धि प्रो. साहेबांस झाली नाहीं.

प्रो. भाटे ह्यांनीं एकंदर सहा व्याख्यानें दिलीं. त्यांपैकीं पहिल्या तीन व्याख्यानांत त्यांनीं युरोपखंडांत ह्या शास्त्रांच्या झालेल्या वाढीचा व त्यांतील प्रमुख प्रमेयांचा फारच त्रोटक वृत्तांत दिला असून, दुसऱ्या तीन व्याख्यानांत समाजशास्त्रदृष्ट्या हिंदुसमाजांतलि जातिभेद, विवाहपद्धति, सोवळें ओवळें, इत्यादि कांहीं चालरीतींची छाननी केली आहे.

हल्लींच्या सर्व समाजशास्त्रज्ञांनीं उत्क्रान्तितत्त्व मान्य केलें आहे ही गोष्ट प्रथम लक्षांत ठेवणें अवश्य आहे. मनुष्याची उत्पत्ति स्वतंत्रपणें झाली नसून एका विशिष्ट जातीचीं माकडेंच उत्क्रान्तितत्त्वाच्या नियमांना अनुसरून मनुष्यें बनलीं, हा डार्विनचा सिद्धान्त समाजशास्त्रवेत्त्यांनीं प्रमाणभूत धरला आहे. भूगर्भशास्त्रवेत्ते एकंदर सात युगें मानतात. ज्याकाळीं ह्या पृथ्वीवर जीवाची उत्पत्ति झाली नव्हती तें प्रथम युग; बिन-कण्यांच्या प्राण्यांचें दुसरें युग; तिसरें मत्स्ययुग; चौथें वनस्पतियुग; पांचवें सर्पयुग; सहावें सस्तन युग,—म्हणजे ह्या युगांत सस्तन प्राणी पृथ्वीवर विपुल होते; सातवें मानवयुग. साहाव्या म्हणजे सस्तन युगांत मनुष्य प्राणी ह्या पृथ्वीवर असल्याबद्दल सांप्रत सर्व शास्त्रज्ञांचें एक मत आहे. ह्या सस्तनयुगांत पृथ्वीचें स्वरूप हल्लींहून बरेंच वेगळें होतें. त्या काळीं दक्षिणयुरोप व उत्तरआफ्रिका एकमेकांस लागून होतीं. आफ्रिकेंतील साहरा वाळवंट हल्लीं जेथें आहे तेथें समुद्र होता. भूमध्यसमुद्रही लहान व उथळ होता. हिंदी महासागर व आटलांटिक महासागर ह्यांस जोडणारा साहरा समुद्र असल्यामुळें पूर्व गोलार्धाचे फक्त दोन भाग पडले. उत्तर भागांत वायव्य आफ्रिका, पश्चिम आणि दक्षिण युरोप, आणि दक्षिण आणि पूर्व आशिया, इतक्यांचा अन्तर्भाव होत होता. साहरा समुद्राच्या खालीं दक्षिण भागांत फक्त बाकी राहिलेलें आफ्रिका खंड होतें. अरबस्थान व हिंदुस्थान त्यावेळीं बेटें होतीं. युरोप खंडांतील ईशान्येकडील भाग व आशिआ खंडांतील वायव्येकडील भाग उत्तरमहासागरांत बुडालेला होता. अमेरिका खंड इंग्लंड, आइसलंड व ग्रीनलंड ह्यांच्या मार्गानें युरोपला अगदीं जवळ झालें होतें. माकडाचें मनुष्यकोटींत संक्रमण झालें तें ह्या सस्तनयुगांतील जें हिंदुस्थान बेट, आफ्रिकेचा उत्तर किनारा, आणि दक्षिण व पश्चिम युरोप, ह्या ठिकाणीं झालें असावें असें शास्त्रज्ञांचें अनुमान आहे. कारण तेथील उष्ण समशीतोष्ण हवा ह्या संक्रमणाला अनुकूल होती. येथूनच मनुष्य आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरून केप ऑफ गुडहोपला व तेथून आइसलंड व ग्रीनलंड ह्या बेटांतून अमेरिकेंत गेला. त्यानंतर पुष्कळ काळानें हिमालयांतून ईशान्य आशिया व पुढें स्कांडिनेव्हियापर्यंत त्यानें मजल मारली. बिनशेपटीचीं मनुष्यसदृश माकडें ह्या सर्व प्रांतभर संचार करीत असल्यामुळें, एकाच जोडप्यापासून पुढें मानवसृष्टि निर्माण झाली अगर निरनिराळ्या ठिकाणीं

निरनिराळ्या जोडप्यापासून स्वतंत्र मानववंश अस्तित्वांत आले, इत्यादि कल्पना करण्यास जागाच राहत नाहीं. मनुष्यसदृश माकडें समाज करून राहात असत. ह्या सहवासाच्या योगानेंच खुणांच्या ऐवजीं शब्दमूल भाषेची उत्पत्ति झाली; ह्या दोहींच्या प्रभावानें मनुष्याचा मेंदू विकसित होऊं लागला. पुढें मनुष्याच्या बुद्धिसामर्थ्यामुळें मनुष्य व मनुष्येत्तर प्राणी ह्यांत कायमचा फरक होऊन बसला. समाजशास्त्राच्या तत्त्वांचें आकलन करण्यास त्या शास्त्राचा पाया अगर आधार जें मानवशास्त्र त्याची माहिती करून घेणें जरूर आहे. ज्यांस उत्क्रान्तितत्त्व मान्य नसेल, परमेश्वरानें सृष्टींतील इतर प्राण्यांबरोबर मनुष्याचें जोडपेंही निर्माण केलें अशी ज्यांची समजूत आहे, त्यांस हल्लींच्या शास्त्रज्ञांचीं मतें सम्मत होण्याचा मुळींच संभव नाहीं. ह्या कारणास्तव अर्वाचीन समाजशास्त्रज्ञांनीं मूलभूत धरलेल्या मानवशास्त्रांतील प्रमेयांचें ज्ञान प्रो. भाटे यांनीं आपल्या वाचकांस अधिक विस्तृत रीतीनें करून द्यावयास पाहिजे होतें असें आम्हांस वाटतें. कोणत्याही सर्वसामान्य समाजशास्त्रावरील ग्रन्थांत मानवशास्त्राचें विवेचन केलेलें असतें, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. आमच्या इकडे समाजशास्त्र बहुतेकांस प्रायः अपरिचित असल्यामुळें तर उपरिनिर्दिष्ट पूर्व शास्त्राचें ज्ञान करून देणें अपरिहार्य आहे. परंतु ह्या बाबतींत प्रो. भाट्यांची समजूत कांहींशी निराळी असावी असें दिसतें, व म्हणूनच त्यांनीं हा पूर्वेतिहास गाळला असावा. ते म्हणतातः " समाज बनण्याच्या पूर्वीच्या स्वतंत्र मानवी प्राण्यांची माहिती देणें हें मानवशास्त्राचें काम आहे. आणि समाज कसा बनला हें सांगून त्यापुढील मानवी प्राण्याची माहिती देणें हें समाजशास्त्राचें काम आहे." (पान १८) ह्यावरून समाज नव्हता, पण मनुष्यप्राणी मात्र होता म्हणजे मानवी व्यक्ति इतस्ततः पृथक्पणें ह्या भूतलावर राहात असत असा एक काल होता, असा प्रो. भाटे ह्यांचा समज असावासें वाटतें. परंतु ज्या शास्त्रज्ञांच्या मतांचा त्यांनीं आपल्या व्याख्यानांत अनुवाद केला आहे, त्यांचें म्हणणें वेगळेंच आहे. " समाजशास्त्राचीं तत्त्वें " ह्या गिडिंग्ज साहेबांच्या सुप्रसिद्ध ग्रन्थांतील उतारा खालीं देतों, त्यावरून वाचकांस ह्या गोष्टीचा उलगडा करतां येईल.

"Sociology inquires whether earliest men were isolated pairs, descended perhaps from a single pair, or whether the transi-

tion from the animal to the human state was made by entire social groups. There is no evidence whatever for the theory of a single pair or for any theory of numerous isolated pairs, the progenitors of pifferent varieties of men. On the contrary there is much evidence of another kind which raises insuperable difficulties against the acceptance of such views. All the remains of primitive men show that they lived as savage men live now, in groups. The ape-like ancestor of man also must have been a social animal. Is there any reason to suppose that between the social anthropoid and the social primitive man there was intercalated a pair living out of social relations and so far differing mentally and physically from all other creatures that any society with them was impossible? If there is, it would be as well to go back to the hypothesis of special creation. For, the mental and physical differences that mark men off from other creatures are those that are created by social intercourse, and without society they could not have had a natural genesis." ( Book III, Chapter II. )

ह्याचा सारांश इतकाच कीं, गिडिंग्जसाहेबांच्या मतें, एका जोडप्यापासून अगर पृथक् पृथक् असलेल्या अनेक जोडप्यांपासून मानवजातीची उत्पत्ति झाली असें मानण्यास मुळींच पुरावा नाहीं. अव्वल माणसांचे अवशेष सांपडले आहेत त्यावरून तीं माणसें, सांप्रत जंगली लोक समाज करून राहतात त्याप्रमाणेंच पूर्वी राहात असावींत असें दिसतें. मनुष्याचा पूर्वज जो माकड तोही समाजांतच राहात होता. ज्या शारीरिक व बौद्धिक भेदांमुळें इतर प्राण्यांहून मनुष्य अगदीं निराळा प्राणी दिसतो, ते भेद सामाजिक संसर्गानेंच निर्माण झाले आहेत. समाजावांचून ह्या भेदांचें दुसरें कारण देतां येणें शक्य नाहीं.

तारुण्य संपून वृद्धावस्थेला अमुकच वेळीं प्रारंभ झाला हें सांगतां येणें ज्याप्रमाणें अशक्य, त्याप्रमाणें माकडाचें मनुष्यांत स्थित्यन्तर अमुकच वेळीं झालें हें सांगतां येणें दुर्घट आहे. यक्षिणीच्या कांडीनें कांहीं माकडाचा मनुष्य क्षणार्धांत बनलेला नाहीं. एवढ्या स्थित्यंतरास किती तरी काळ लोटला असला पाहिजे. तसेंच तोंपर्यंत उत्क्रान्तीच्या जिन्याच्या किती तरी पायऱ्या चढाव्या लागल्या असतील. ह्या संक्रमणाचा आरंभबिन्दु जर

ठरवितां येत नाहीं, तर मानवशास्त्र व समाजशास्त्र ह्यांच्या मर्यादा तरी प्रो. भाटे म्हणतात त्याप्रमाणें कशा निश्चित करतां येतील, ह्याची आम्हांस शंकाच आहे. व्यक्तिशः मनुष्याच्या बौद्धिक वाढीचा इतिहास सांगणें हें जर मानवशास्त्राचें कार्य असेल तर समाजशास्त्राच्या क्षेत्रांत थोडा तरी प्रवेश केल्यावांचून चालणार नाहीं. कारण, समाजाची प्रतिक्रिया मनुष्यावर होत असते. समाजाची घटना जशी असेल त्या मानानें मनुष्याची नैतिक, मानसिक, शारीरिक अथवा बौद्धिक वाढ होत असते. मानवशास्त्राचें कार्य इतकें व्यापक आहे असा कित्येकांचा तर आग्रह आहे.

" Anthropology is the whole history of man as fired and pervaded bv the idea of evolution. Man in evolution.–that is the subject in its full reach. Anthropology studies man as he occurs at all known times...It studies him body and soul together–as a bodily organism, sudject to conditions operating in time & space..." ( Marett'sAnthropology ) हेच साहेब पुढें म्हणतात कीं, आजपर्यंत मानवशास्त्रवेत्त्यांचें लक्ष फक्त रानटी लोकांकडे गेलें आहे. " Hitherto anthropology has devoted more of its attention to the peoples of rude—that is to say of simple culture—who are vulgarly known to us as savages. " पण ह्यापुढें प्राचीन तसेच अर्वाचीन, रानटी तसेच सुधारलेले, असे सर्व लोक मानवशास्त्राच्या कक्षेंत आले पाहिजेत. शिवाय, मानवशास्त्र काय किंवा समाजशास्त्र काय, दोनही अद्यापि प्रयोगावस्थेंतच आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. तेव्हां एवढ्यांतच मध्यें एक मोठी भिंत घालून दोनही शास्त्रें कायमचीं अलग करणें फारसें हितावह होईलसें वाटत नाहीं. व्यापक दृष्टीनें पाहिलें तर, सृष्टीच्या उत्क्रान्तीचा इतिहास सांगणें हेंच सर्व सृष्टिगत शास्त्रांचें कार्य होय. हीं सर्व शास्त्रें अन्योन्याश्रित असल्यामुळें त्यांत कायमची फारकत होणें संभवनीय नाहीं. गणितांतील सिद्धांतांप्रमाणें ह्याही शास्त्राचे सिद्धांत जेव्हां मुकर होतील, तेव्हां सोयीकरतां म्हणून प्रत्येक शास्त्राला मर्यादा घालतां आल्या तर येतील. ह्याचा अर्थ असा समजावयाचा नाहीं, कीं समाजशास्त्रांतील सर्व लहानमोठ्या प्रमेयांचा मानवशास्त्रांत उहापोह झाला पाहिजे. आमच्या म्हणण्याचा आशय इतकाच कीं, समाजशास्त्रांतलि सर्वमान्य सिद्धांत घेऊन त्यांवरून मानवशास्त्रानें आपल्या

शास्त्राची प्रगति करावी. त्याचप्रमाणें समाजशास्त्रालाही मानवशास्त्रांतील सिद्धांतांचा उपयोग करून घेणें अवश्य आहे. समाजशास्त्र व मानवशास्त्र ह्या दोहोंचा संबंध कसा असावा ह्याविषयीं प्रो. भाटे यांचें जें म्हणणें आहे तें नीट कळत नाहीं, म्हणून त्यांच्याच शब्दांत तें वाचकांस कळविणें बरें:-

" समाजशास्त्राचा मानवशास्त्राशीं कांहीं निराळा संबंध आहे. वस्तुतः हें शास्त्र फक्त मनुष्यप्राण्याविषयीं विचार करणारें आहे. पण कांहीं ग्रन्थकारांनीं याची मर्यादा वाढवून समाजशास्त्राचाही यांत समावेश केला आहे. पण माझ्या मतें तें शास्त्र अगदीं मर्यादित आहे. ह्या शास्त्राचें काम मनुष्यप्राण्याचा स्वतंत्रपणें विचार करून त्याचा पूर्वेतिहास देणें इतकेंच आहे. पृथ्वीवर मनुष्यप्राणी कसा उत्पन्न झाला आणि ऐतिहासिक कालापर्यंत त्याला कोणकोणत्या अवस्थांतून जावें लागलें हें ह्या शास्त्राच्या शोधकानीं ठरवावयाचें असून यापुढील कामगिरी समाजशास्त्राच्या शोधकांनीं करावयाची आहे. सारांश, मानवशास्त्र हा पहिला थर असून समाजशास्त्र हा त्यावरील दुसरा थर आहे. समाज बनण्याच्या पूर्वीच्या स्वतंत्र मानवी प्राण्याची माहिती देणें हें मानवशास्त्राचें काम आहे, आणि समाज कसा बनला हें सांगून त्यापुढील मानवी प्राण्याची माहिती देणें हें समाजशास्त्राचें काम आहे. अर्थातच व्यक्तिशः मनुष्याच्या शारीरिक आणि मानसिक बाढीची मीमांसा करणारें मानवशास्त्र जुनें आणि संकुचित आहे; मनुष्यप्राण्यांचा समाज बनल्यानंतर समाज आणि मनुष्य या दोहोंच्या परस्परसंबंधानें उत्पन्न होणाऱ्या नानाविध प्रश्नांची मीमांसा करणारें समाजशास्त्र नवें आणि विस्तृत असें आहे. आणि म्हणूनच कित्येक मानवशास्त्रज्ञांनीं आपल्या शास्त्राची मर्यादा वाढवून जरी त्यांत समाजशास्त्राचे प्रश्न घुसडले आहेत तरी ह्या दोन शास्त्रांचीं कार्यक्षेत्रें अगदीं भिन्न आहेत. त्यांचा असा घोंटाळा करणें बरोबर नाहीं. मानवशास्त्र ही खालची आणि समाजशास्त्र ही त्यावरील पायरी आहे. "

वरील उताऱ्यावरून एतद्विषयक अस्पष्टता कोणासही दिसून येईल. आमच्या मतें समाजशास्त्र हा मानवशास्त्राचा पुढील विस्तृत भाग आहे. हीं दोन शास्त्रें म्हणजे दोन भिन्न प्रकृतींचे थर आहेत हें म्हणणें अगदीं यथार्थ दिसत नाहीं. मानवशास्त्राच्या कार्यक्षेत्राबद्दल प्रो. भाट्यांनीं जीं विसंगत विधानें केलीं आहेत त्यांवरून ह्या बाबतींत त्यांचीं मतें अद्यापि

निश्चित नाहींत हें उघड दिसतें. ऐतिहासिक कालापर्यंत मनुष्याला कोण-कोणत्या अवस्थांतून जावें लागलें हें मानवशास्त्राच्या शोधकांनीं ठरवावयाचें आहे असें एके ठिकाणीं सांगून, लगेच, समाज बनण्याच्या पूर्वीच्या मानवप्राण्याची हकीकत देणें इतकेंच मानवशास्त्राचें काम आहे, असें प्रो. साहेब म्हणतात. आतां ऐतिहासिक कालापर्यंत मनुष्यप्राणी समाज करून राहात नव्हता असा प्रो. साहेबांचा अभिप्राय असेल तर गोष्ट निराळी. परंतु सदरहू अभिप्राय ह्या शास्त्रांतील शोधांच्या विरुद्ध आहे हें मात्र खास. मनुष्यप्राण्यांचा समाज मागाहून ऐतिहासिक कालांत झाला, तोंपर्यंत मनुष्यें ह्या पृथ्वीतलावर इतस्ततः व्यक्तिशः वास करून असत, हा जो प्रो. भाटे यांनीं आपला समज करून घेतला आहे तोच मुळीं अवास्तव आहे असें आम्हांस वाटतें. इतिहासकालीन समाज बनल्यानंतरही मानवशास्त्राचें कार्य शिल्लक राहतें हें खालीं दिलेल्या उताऱ्यावरून लक्षांत येईल.

"Each science should furnish its own subject through the whole range of living beings rendering to Anthropology an account of so much of its results as concerns man. Such results it is the office of Anthropology to collect and co-ordinate so as to elaborate as completely as may be the synopsis of man's bodily and mental nature and the theory of his whole course of life and action from his first appearance on earth."

ह्यावरून मानवशास्त्राचें कार्य प्रो. भाटे म्हणतात इतकें संकुचित करतां येईल असें वाटत नाहीं.

असो. वरील बाब खेरीज करून प्रो. भाटे यांनीं आपल्या पहिल्या तीन व्याख्यानांत समाजशास्त्राचें इतिवृत्त थोडक्यांत, स्पष्ट मुद्देसूद रीतीनें दिलें आहे. त्यावरून बिन-माहितगार माणसास अल्पकालांत व बिन-श्रमानें ह्या विषयाची पुष्कळ माहिती मिळण्यासारखी आहे. समाजशास्त्र हें नांव जरी अगदीं अर्वाचीन असलें तरी त्यांतील कांहीं सिद्धांत प्लेटो व आरिस्टाटल यांनीं आपआपल्या ग्रन्थांत निर्दिष्ट केले आहेत. कॉम्ट हा ह्या शास्त्राचा जनक समजला जातो. त्याच्यानंतर स्पेन्सरनें ह्या शास्त्रावर विस्तृत ग्रंथ लिहून तें एक लोकांचें आवडतें शास्त्र करून सोडलें. "समाजाची उत्पत्ति, वाढ आणि प्रगति ज्या नियमांना आणि सिद्धान्तांना अनुसरून होते त्यांचा शोध लावणें हें समाजशास्त्राचें कार्य होय. समाजाचें ध्येय

काय असावें हेंही सांगणें समाजशास्त्राचें काम आहे." समाजाच्या बौद्धिक बाल्यावस्थेंत सर्व कांहीं देवनिर्मित आहे अशी भावना असणें अपरिहार्य होतें. ह्याच मताचा पुरस्कार बायबलांत केला असल्यामुळें धर्मशास्त्र व समाजशास्त्र ह्यांचा परस्पर विरोध पाश्चात्य देशांत उत्पन्न झाला. धर्माचा संबंध ईश्वराशीं असतो. व ज्या धर्मांतील तत्त्वें ईश्वरप्रणीत मानलेल्या ग्रन्थांत ग्रथित केलेलीं असतात त्या धर्माचे अनुयायी त्या ग्रन्थांतील कोणताही सिद्धांत खण्ड्य असणें शक्यच नाहीं असें स्वाभाविकच मानीत असतात. त्याचा परिणाम असा होतो कीं, बुद्धीला स्वतंत्रपणें विचार करण्यास अवकाशच रहात नाहीं. परंतु प्रत्यक्ष पुराव्यानें धर्ममतें चुकीचीं आहेत असें सिद्ध झालें, म्हणजे अर्थातच तीं झुगारून देण्यास मनुष्य कचरत नाहीं. अशा रीतीनें समाजशास्त्रानें खिस्तीधर्म विकलित केला हें निर्विवाद आहे. प्रो. भाटे म्हणतातः—" मनुष्याच्या बुद्धिमत्तेची ही गुलामगिरी फार दिवस टिकली नाहीं. युरोपच्या पुनरुज्जीवनाबरोबर मानवी बुद्धीच्या गुलामगिरीचा अन्त होऊन ती स्वतंत्रपणें विहार करूं लागली. " ह्या विधानांत थोडी अतिशयोक्ति आहे असें आम्हांस वाटतें. प्रो. साहेबांनीं युरोपियन ग्रन्थकारांचीच भाषा वापरली आहे हें उघड आहे. तत्कालीन युरोपियन ग्रंथकारांना ती शोभण्यासारखी—निदान क्षम्य होती. पण प्रो. भाट्यांनीं तेच शब्द वापरणें म्हणजे अद्यापि बौद्धिक दास्य कायम आहे अशी अप्रत्यक्ष कबुली देणें होत नाहीं काय ? वस्तुतः प्रकार असा आहे कीं, एकानें दुसऱ्यास त्याच्याविरुद्ध वागूं न देतां आपल्याच मर्जीप्रमाणें वागावयास लावणें ह्यास गुलामगिरी असें म्हणतात. पण हें लक्षण प्रस्तुत विषयास कसें लागू पडतें तें आम्हांस समजत नाहीं. कोणत्याही समाजांत नेहमींच प्रबुद्ध व निर्बुद्ध असे माणसांचे दोन भाग असतात. निर्बुद्ध माणसांत विचार करण्याची ताकदच नसते. विद्वान् व विचारशील माणसें म्हणतील तेंच त्यांचें म्हणणें. त्याचप्रमाणें समाजाच्या बाल्यावस्थेंतील विद्वान् माणसें म्हणजे आतांच्या दृष्टीनें पाहिलें असतां अप्रबुद्धच ठरतात. तेव्हां त्यांनीं आपल्या दृष्टीनें जी उपपत्ति लावली ती समाजांतील बाकीच्या अप्रबुद्ध माणसांनीं मान्य केली, ह्यांत गुलामगिरीचा प्रकार कोठें घडला ? धार्मिक मतांचा त्याग करण्यास मनुष्य एकदम धजावत नाहीं ह्यांत कांहीं विशेष नाहीं; पण तीं मतें असत्य

असतील असा संशयही त्याच्या मनास कित्येक वर्षे शिवत नाहीं. त्यामुळें इतर शास्त्राचा प्रादुर्भाव होण्यास विलंब लागला. हा सर्व प्रकार उत्क्रान्ति-तत्वाला धरून व्हावयाचा तसाच झाला. पूर्वी धार्मिक गुलामगिरी होती तर सांप्रत शास्त्रीय गुलामगिरी आहे. आजपर्यंत शास्त्रसिद्ध मानलेले सिद्धांत नवीन शोधांनीं कुचकामाचे ठरले असतांही त्यांनाच चिकटून राहण्याकडे मनुष्याची कशी प्रवृत्ति असते हें ह्या स्वतंत्र विचाराच्या कालांतही अनुभवास येत असतें. धर्मग्रन्थांतील प्रमेयें प्रत्यक्ष प्रमाणांनीं मिथ्या ठरल्यावर स्वतंत्र विचारांच्या स्वैरगतीला कोठेंच अडथळा येत नाहीं हें खरें; पण त्याच्यामुळें एकानें दुसऱ्यावर जुलूम केला असें होत नाहीं. पुष्कळ लोकांस असें वाटत असतें कीं, धूर्त भिक्षुकांनीं–मग ते कोणत्याही धर्मांतले असोत–आत्मलाभसिद्धयर्थ परमेश्वराच्या कोपाचा बाऊ करून स्वतन्त्रपणें विचार करण्याचें सामर्थ्य असलेल्या लोकांवर मूर्खपणाचा मतें लादलीं. पण हा आरोप कोणत्याही पुराव्यानें शाबीत होण्यासारखा नाहीं.

समाजशास्त्र म्हणजे समाजाचें शास्त्र. मनुष्यांच्या नानाविध व्यापारांचा परिणाम समाजावर होत असतो. त्यामुळें ह्या शास्त्राला व्यापकत्व आलें आहे. नीतिशास्त्र, राजनीतिशास्त्र, सुजननशास्त्र, अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, कायदे–शास्त्र, इत्यादि सर्व शास्त्रें हीं समाजशास्त्रांत अन्तर्भूत होतात. समाजशास्त्राच्या त्या शाखा होत. उपरिनिर्दिष्ट सर्व शास्त्रें स्वतन्त्र झालीं म्हणून स्वतंत्र अशा समाजशास्त्राला कांहींच करावयाचें राहिलें नाहीं असें नाहीं. समाजशास्त्र इतर शास्त्रांची तपासणी करतें, त्यांच्या चुका दाखवितें, व सर्व शास्त्रांतील सिद्धांतांचा मेळ घालून देतें. बाकीचीं शास्त्रें म्हणजे समाजशास्त्राचा पाया होय. ह्या शास्त्रांचे नियम आगामी (deductive) पद्धतीनें न काढतां निगामी (inductive) पद्धतीनें काढीत असतात. रोमन लोकांनीं कायदे–शास्त्र व राजनीतिशास्त्र यांचा विकास केला. परंतु समाजशास्त्राचा विचार प्राचीनकालीं ग्रीक लोकांनींच केला होता. समाजाला ते इतकें महत्व देत कीं, त्यापुढें व्यक्तीचें स्वतंत्र अस्तित्वही मानण्यास ते तयार नव्हते. म्हणूनच मुलें निपजतांच तीं आईबापांकडे न ठेवतां त्यांस समाजानें आपल्या ताब्यांत घ्यावें अशीं मतें प्लेटोनें प्रतिपादन केलीं आहेत. असो. ह्याप्रमाणें प्रो. भाट्यांच्या पहिल्या व्याख्यानाचा त्रोटक सारांश दिला आहे. शेवटीं, समाजशास्त्राच्या अध्ययनाची आवश्यकताच

त्यांच्याच प्रौढ भाषेंत देऊन त्यांचें पहिलें व्याख्यान पुरें करूं. "आम्हांला पाश्चात्य शिक्षणाची जोड बहुतेक कायमचीच झाल्यामुळें, आम्हांमध्यें नवे विचार, नव्या कल्पना, नवीन भावना आणि नवी दृष्टि यांचा प्रादुर्भाव होऊन आमच्या समाजाची जुनी घडी मोडत चालली आहे. नवीन प्राप्त झालेल्या ह्या अन्तर्बाह्य सुधारणेचा ओघ इतका जबरदस्त आहे कीं, आमची इच्छा असो वा नसो, त्यामुळें आमची अन्तर्बाह्य सामाजिक परिस्थिति सारखी बदलत चालली आहे. अशा वेळीं आपणांला जर सामाजिक स्थित्यंतराचीं कारणें, नियम आणि तत्त्वें बरोबर माहित नसतील; सामाजिक ध्येय काय असावें याची जर बरोबर कल्पना नसेल; दुसऱ्या देशांत अशा प्रकारच्या स्थित्यंतराचे परिणाम काय झाले आहेत याचें जर आपण लक्षपूर्वक अवलोकन केलेलें नसेल; तर हा जबरदस्त ओघ आपणांला झपाट्यानें वाहून नेऊन आपली दिशाभूल करील आणि आपणांला भलतीकडेच नेईल. म्हणून आपण सामाजिक विषयांची सोपपत्तिक मीमांसा करणाऱ्या समाजशास्त्राचा अभ्यास विचारपूर्वक केला पाहिजे."

दुसऱ्या व्याख्यानांत प्रो. भाटे यांनीं समाजशास्त्रांतील कांहीं प्रमेयांचा निर्देश करून तिसऱ्या व्याख्यानांत त्यांनीं आजकालच्या समाजशास्त्रज्ञांच्या मतांशीं आपल्या श्रोतृवर्गाचा परिचय करून दिला आहे. प्राक्शास्त्रकालीं समाजासंबंधीं विचार करणारा पहिला पण्डित प्लेटोच होय. मनुष्यामध्यें गरजा व वासना स्वभावतःच असल्याकारणानें त्या तृप्त करून घेण्याकरितां मनुष्यांस एकवटणें भाग झालें व अशा रीतीनें समाज बनला, असें प्लेटोचें मत होतें. ह्या अर्थशास्त्रोद्भूत कल्पनेस अनुसरून श्रमविभागाच्या तत्त्वावर प्लेटोनें आपल्या काल्पनिक समाजाची रचना केली ह्यांत कांहीं विशेष नाहीं. प्लेटोनें रेखाटलेलें समाजाचें चित्र पाहून कोणालाही आपल्या चातुवर्ण्याचें स्मरण झाल्याशिवाय राहणार नाहीं. आम्हांला तर असा संशय येतो कीं, प्लेटोनें आपला समाज निव्वळ कल्पनेतून निर्माण केला नसावा. इतरत्र असलेल्या चातुर्वर्ण्यात्मक समाजाची त्यास कांहीं तरी माहिती असावी. प्रत्येक शास्त्राचा पुरस्कर्ता आपल्या विशिष्ट आवडीप्रमाणें समाजाच्या उत्पत्तीचें कारण देत असतो. व ह्या सर्वांत तत्त्वाचा अंश दिसत नाहीं असेंही नाहीं. प्लेटोचें मन अर्थशास्त्रांतील तत्त्वांनीं पछाडलें असल्यामुळें त्यानें समाजाची उपपत्ति त्या शास्त्रांतील मूलभूत सिद्धान्ताला अनुसरून लावली.

राजकीय विचारांनींच ज्यांचीं मनें भारलेलीं असतात ते राजकीय स्वरूपाची उपपत्ति देतात. निसर्गतःच पुरुषाला स्त्रीसुखाची व स्त्रीला पुरुषसुखाची इच्छा असते. ही इच्छाच समाज बनण्याला कारणीभूत होते असेंही कित्येकांचें म्हणणें आहे. तात्पर्य, समाजाच्या उत्पत्तीबद्दल अनेक तर्क करतां येतील. आरिस्टॉटलनें समाजाची पहिली पायरी कुटुम्ब धरून तदुत्तर समाजाची उत्क्रान्ति, कुटुंबाचें खेडें, खेड्याचें नगर, अशा रीतीनें कशी झाली हें दाखविलें आहे. ग्रीक लोकांना राष्ट्राची कल्पना नसल्यामुळें नगराच्या पलीकडे आरिस्टॉटलची धांव गेली नाहीं. आतां अर्थशास्त्राचा जनक जो ॲडम स्मिथ त्यानें समाजाचा विकास अगर उत्क्रान्ति कशी होत गेली हें अर्थशास्त्राच्या दृष्टीनें दाखविलें आहे. तो म्हणतो, रानटी समाज मृगयावृत्ति असतो; याच्या पुढची पायरी म्हणजे पशुपालन; ह्यानंतर लोक शेतें लावून उपजीविका करतात व कृषिवृत्ति बनतात. समाजविकासाच्या सांखळींतला शेवटचा दुवा म्हटला म्हणजे उद्यमवृत्ति होय. ह्यावरून कोणासही सहज दिसून येईल कीं, ॲडम स्मिथनें समाज कोणकोणत्या अवस्थांतून गेला असला पाहिजे हें सांगून त्या अवस्थांचा क्रम कसा लागतो हें दाखविलें. ह्या विकासवैशिष्ट्याच्या कारणांचा ऊहापोह त्यानें केला नाहीं पण त्यांत कांहीं विशेष नाहीं. कारण, समाजाच्या निरनिराळ्या अवस्थांचें वर्णन करणें म्हणजेच समाजाच्या बौद्धिक विकासाचा इतिहास देणें होय.

तथापि कॉम्टनें मनुष्याच्या बुद्धिमत्तेवर बराच भार टाकून त्या दृष्टीनें समाजाच्या उत्क्रान्तीचें वर्णन केलें आहे. त्याच्या मतें मनावर ज्ञान अवलंबून असतें आणि ज्ञान हें समाजाच्या प्रगतीला कारणीभूत असतें. खालीं दिल्याप्रमाणें शास्त्रांची परंपरा लावून मानवी बुद्धिमत्तेची वाढ कशी होत गेली ह्याचें विवेचन त्यानें केलें. ( १ )गणितशास्त्र ( २ ) ज्योतिषशास्त्र; (२) पदार्थविज्ञानशास्त्र; (४) रसायनशास्त्र; (५) जीवनशास्त्र; (६) समाजशास्त्र; आणि (७) नीतिशास्त्र ह्याप्रमाणें एकामागून एक अशीं शास्त्रें अस्तित्वांत येतात असें कॉम्टचें म्हणणें आहे. नीतिशास्त्राच्या कल्पना समाजाच्या परिणतावस्थेच्या काळीं उत्पन्न होतात. त्याचप्रमाणें समाजांतील शास्त्रीय प्रगतीवर कोणता समाज कोणत्या समाजस्थितींत आहे, हें शोधून काढतां येईल असें कॉम्टनें प्रतिपादन केलें आहे. हिंदुसमाजाला हें प्रमेय लावलें असतां तें किती फोल ठरेल; हें निराळें सांग-

ष्याची आवश्यकता नाहीं. अथवा कॉम्टच्या प्रतिपादनांत तथ्य आहे असें म्हणावयाचें असेल तर, हिंदुसमाजानें पदार्थविज्ञान, रसायन, जीवन इत्यादि शास्त्रांत चांगलीच प्रगति केली होती असें कबूल करणें भाग पडेल. कारण, नीतीच्या कल्पना हिंदुसमाजाला अपरिचित होत्या असें म्हणण्याचें धाडस कोणी करील असें वाटत नाहीं. वस्तुतः प्रकार असा दिसतो कीं, असहाय बुद्धीनें भरारी मारून जितका प्रान्त काबीज करणें शक्य होतें, तितका प्राचीनांनीं काबीज केला आहे.

भौतिक शास्त्रांतील प्रगति हें अर्वाचीन कालाचें विशिष्ट लक्षण होय. पुराणकालीन समाजांत खळबळ उत्पन्न करण्यास बुद्धिमान् माणसें कारण झालीं, तर आधुनिक कालीं विलक्षण शोधांनीं समाजांत क्रान्ति घडून येत आहे. " Among the ancients the human mind was chiefly directed to philosophical speculations in which the law seems to be perpetual oscillation, while among the moderns it has rather tended towards physical science in which the law is perpetual progress. The causes which most disturbed or accelerated the normal progress of society in antiquity were the appearance of great men, in modern times they have been the appearance of great inventions."—Leckey's *History of European Morals.*

मानवी मनाचें अन्य तऱ्हेनें पृथक्करण करून कॉम्टनें समाजाच्या दैवी, तात्त्विक आणि शास्त्रीय अशा तीन पायऱ्या कल्पिल्या आहेत. खालच्या पायरीवर समाज असतां सर्व कांहीं देवानें केलें अशी दृढ भावना बहुतेक लोकांची असते. कांहीं काळानें मनुष्य ह्या दैवी " आवरणाला " कंटाळून तें झुगारून देतो व दुसऱ्या पायरीवर चढतो. तेथें उभा असतांना त्याला कोणी विचारलें, पाणी थंड कां ? तर त्यांत शीतत्व आहे, असें तो उत्तर देतो. पुढें तोच अखेरच्या पायरीवर अधिष्ठित झाला म्हणजे " चक्षुर्वै सत्यं" अशी त्याच्या मनाची भावना होते. विष्णुपुराणांत म्हटल्याप्रमाणें—

न ह्याप्तवादा नभसो निष्पतन्ति मदासुराः ।
युक्तिमद्वचनं ग्राह्यं मयाऽन्यैश्च भवद्विधैः ॥

असें तो प्रतिपादन करतो. शास्त्रीय अवस्था ही समाजाची परिणताऽवस्था असें कॉम्टनें ठरविलें आहे.

स्पेन्सरनें समाजाला उत्क्रान्तितत्व कसें लागतें हें निराळ्या दिशेनें दाखविलें. सूक्ष्मावलोकनानें आपणांस असें आढळून येईल कीं, सजातीयत्वाकडून विजातीयत्वाकडे, अस्पष्टत्वाकडून स्पष्टत्वाकडे जाण्याची वस्तुजाताची प्रवृत्ति असते. रानटी समाजांत सर्व बाबतींत सारखेपणा दिसतो; विविधता तादृश नसते. पण तेंच सुधारलेल्या समाजाकडे पाहिलें तर तेथें विविधता प्रामुख्यानें दृग्गोचर होते. समाज हा सेंद्रिय प्राण्याप्रमाणें आहे असेंही स्पेन्सरनें आग्रहपूर्वक प्रतिपादिलें आहे.

ह्याप्रमाणें समाजाच्या वाढीची मीमांसा ज्यानें त्यानें आपआपल्या विशिष्ट मतांप्रमाणें केली आहे. प्रत्येकाचें म्हणणें खरेंच आहे. पण तें पुरें आहे असें मात्र नाहीं. स्पेन्सरच्या काळीं उत्क्रान्तितत्व सर्वसम्मत झालें, पण जडवाद जोरावला. सृष्टींतील सर्व वस्तुजात जड परमाणु व गतिदायक शक्ति या दोन तत्वांच्या एकीकरण व विभक्तीकरण या मार्गद्वयानें झालें आहे, व उत्क्रान्ति ही पदार्थांच्या परिस्थितीनें घडून आलेली आहे हेंच स्पेन्सरच्या शिकवणीचें सार होय.

ह्या सृष्टींत एकसारखी उन्नतीच होत आहे हें विधानही चुकीचें आहे. परिणतावस्थेला पोंचलेले समाज अवनतीची खालील पायरी आक्रमूं लागतात. त्याचप्रमाणें स्पेन्सरचीं प्रमेयें मनुष्याला सर्ववैव लागू पडत नाहींत. कारण परिस्थितीच्या विरुद्ध जाण्याचें अवसान व सामर्थ्य मनुष्यांत आहे. परिस्थिति आणि मनुष्यसामर्थ्य हा वाद, प्रो. भाटे यांनीं म्हटल्याप्रमाणें, दैव व पौरुषेय ह्या वादाच्या स्वरूपाचाच होय. आमच्या मतें, परिस्थिति मनुष्याला मान वांकवावयास लावते त्याचप्रमाणें मनुष्याच्या कर्तबगारीनें परिस्थितिही बदलून जाते. कारण समाजाचा उत्कर्ष समाजाच्या घटनेवर अवलंबून असतो. घटना लोकसंख्येवर अवलंबून राहते. अन्नाचीं साधनें अनुकूल प्रतिकूल असतील त्याप्रमाणें लोकसंख्या जास्त कमी होते. आणि अन्नाची वाढ मनुष्याच्या कल्पकतेवर अवलंबून असते. ह्याचें तात्पर्य असें कीं, जोंपर्यंत अन्नाची वाढ झाली नाहीं, तोंपर्यंत मनुष्य परतंत्र असतो. आणि वाढ तर अल्प काळांत होण्यासारखी नसते म्हणूनच परिस्थितीशीं टक्कर मारणाऱ्या माणसानें अगर आपणांस इष्ट असणारी परिस्थिति उत्पन्न करण्याची महत्वाकांक्षा धरणाऱ्या माणसानें आपल्या हयातींत यश संपादन करण्याची अपेक्षा करणें व्यर्थ होय. विद्यमान परिस्थितीच्या ऐवजीं

अन्य परिस्थिति निर्माण करण्यास बहुत काळ लागलाच पाहिजे. ह्यास्तव कोणत्याही समाजसुधारकानें अधीर न होतां सतत कर्म करणें हेंच त्याचें कर्तव्य होय. परिस्थितीचा अम्मल व्यक्तींवर चालतो तो प्रत्यक्ष भासमान होतो. परंतु परिस्थिति मात्र सावकाश व लपत छपत बदलत असते. कांहीं झालें तरी मनुष्याला परिस्थिति जिंकता येते व बदलतां येते ह्यांत शंका नाहीं. स्पेन्सरचा नियम मनुष्याच्या पायरीपर्यंतच लागू पडतो. ज्या परिस्थितीचा पूर्ण अंमल मनुष्येतर प्राण्यांवर चालतो ती परिस्थिति अकृत्रिम अगर प्रकृतिसिद्ध असते. पण ज्या परिस्थितीला मनुष्यास शरण जावें लागतें, ती पुष्कळ वेळां कृत्रिम म्हणजे मनुष्यानेंच बनविलेली असते. सांप्रत सामाजिक, औद्योगिक अगर राजकीय सुधारक जे प्रश्न सोडविण्यांत गर्क झाले आहेत, त्यांच्या मुळाशीं निसर्गदेवता नसून मनुष्य आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अनुकूल परिस्थितींत समाजाची प्रगति होते, तर प्रतिकूल परिस्थिति प्राप्त झाली असतां समाजाची पिछेहाट होते. नेहमीं समाजाची उत्क्रान्ति झाली पाहिजे हें म्हणणें सयुक्तिक नाहीं. समाजाची स्थिति समुद्राप्रमाणें असते. समुद्राच्या भरती ओहोटीप्रमाणें ती मागें पुढें होत असते. ज्या ध्येयाकरितां समाज अविरत परिश्रम करीत असतो तें ध्येय प्राप्त झाल्यावर तो समाज कांहीं काळानें अपक्रान्त होण्याचा संभव असतो. कारण कर्मोन्मुखता हा मनुष्याचा स्वभाव; आणि ध्येयाला पोंचलेल्या समाजांत क्रियेला तर अवकाशाचा संकोच. अशावेळीं समाजाची क्रियाशक्ति आत्मविघातक होणें अगदींच असंभाव्य नसतें.

उत्क्रान्तिशास्त्राचा मुख्य सिद्धांत असा आहे कीं, परिस्थितीला अनुरूप बनण्याचें सामर्थ्य ज्या वस्तुजातांत असेल तेंच मात्र टिकेल. बाकीच्या वस्तुजाताचा समूळ नाशच झाला पाहिजे. परंतु मनुष्याच्या संबंधानें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, इतर प्राण्यांपासून ज्या मानसिक व आत्मिक गुणांच्या योगानें मनुष्याला वैशिष्ट्य प्राप्त झालें ते गुण मनुष्यानें परिस्थितीचा अडथळा दूर करूनच संपादन केले आहेत. मनुष्यांची प्रगति परिस्थितीला विरोध करण्यानेंच झाली आहे; परिस्थितीशीं जुळतें घेण्यानें झाली नाहीं. माकड हें उत्क्रान्तीचें कार्य आहे; पण मनुष्यप्राणी हा दीर्घ प्रयत्नांचें फळ आहे. आपणांस सुखानें राहतां यावें म्हणून मनुष्य परिस्थितींत अगर नैसर्गिक स्थितींत बदल करतो; आपल्या स्वतांत बदल करीत नाहीं. बाहेर

हवा कडक असूनही आपल्या अकलेच्या जोरावर कृत्रिम उपायांनीं आपली खोली शीतल करून घेतो. थंड हवा सहन करतां यावी म्हणून इतर प्राण्यांच्या अंगावर केस असतात. परंतु मनुष्य आपल्या अंगावरचे केस टाकून देऊन इतर प्राण्यांच्या केसांचे कपडे करून ते परिधान करतो व अशा रीतीनें तो थंडीचें निवारण करतो. विरुद्ध परिस्थितींत मनुष्याच्या गुणांचा विकास होतो ह्याचें कारण तरी हेंच. विषुववृत्त व उत्तरध्रुववृत्त हीं मनुष्यानें वस्ती करण्यास स्वभावतः अनुचित असूनही मनुष्य त्या प्रदेशांत राहत आहे, व ह्यांतच मनुष्याचें कौशल्य आहे. ह्यावरून असें दिसून येईल कीं, नैसर्गिक उत्क्रान्तीचा प्रतिस्पर्धी म्हणजे मनुष्याचें कौशल्य होय. त्याचप्रमाणें परिस्थितीशीं टक्कर मारण्यास ज्यांच्यांत धमक नाहीं ते नष्ट झाले पाहिजेत हा जो उत्क्रांतिशास्त्राचा निर्णय तोही सुधारलेल्या समाजाकडे पाहिलें असतां असत्य ठरतो. निदान मनुष्यप्राणी ह्या स्वाभाविक तत्त्वाच्या विरुद्ध वागतो हें खास. अनाथांचें रक्षण करणें, व्याधिग्रस्तांना औषधोपचार करून बरें करणें, दीनांना अन्नदान करणें, निर्धनांना सधनांच्या सात्त्विक सुखाचा अल्पतः तरी आस्वाद मिळवून देणें, अज्ञानांना सज्ञान करणें, इत्यादि औदार्याचे प्रकार काय सांगतात ? सृष्टिदेवतेच्या विरुद्ध वागण्याचा मनुष्यानें विडाच उचललेला आहे असा भास होतो. राजसत्ता ही ह्याच नियमाचें द्योतक आहे. दुर्बलांचें संरक्षण करणें व लहान थोरांस सारखाच न्याय लागू करणें हेंच राजसत्तेचें प्रमुख लक्षण आहे. अर्थातच स्पेन्सरच्या मताचें खंडण त्याच्या मागून झालेल्या शास्त्रज्ञांनीं केलें आहे.

अर्वाचीन समाजवेत्त्यांच्या मताप्रमाणें समाजाची स्थिति व गति ह्या दोहोंचीं कारणें भिन्नभिन्न आहेत. म्हणून ते स्थित्यात्मक (Static) व गत्यात्मक (Dynamic) असे समाजशास्त्राचे दोन भाग पाडतात. समाज उत्पन्न कसा होतो व चालू कसा राहतो ह्याचें विवेचन प्रथम भागांत करून दुसऱ्यांत समाजांत फेरबदल कोणत्या कारणांनीं होतो ह्याचा विचार केलेला असतो. मनुष्यांत सहानुभूति, संगतिप्रियता आणि न्यायप्रियता हे गुण स्वाभाविकच असल्यामुळें समाजसंस्था निर्माण होतात व चालू राहतात, असें आधुनिक मत आहे. तथापि ह्यांत एक गोष्ट ध्यानांत घरावयाची ती ही कीं, हे सर्व गुण मनुष्यांत सहवासानेंच उत्पन्न झाले

आहेत. एकत्रवास असल्यावांचून ह्या गुणांचा प्रादुर्भाव होणार नाहीं. समाजसंस्था कशा बनत जातात हें गिडिंग्ज साहेबांच्या खालील उताऱ्याव- रून दिसून येईल. Aggregation, association, and resulting changes in the character and activity of the population are the first stage in the synthesis of social phenomena. The evolution of the social mind is the second stage The third stage is the social composition. The fourth is the social constitution सहवासानें मनुष्यांत समाजप्रियता उत्पन्न होते. नंतर लहान लहान समुदाय एकवटून मोठा समुदाय बनतो व अशा रीतीनें गांवें, शहरें, देश, तयार होतात ह्यालाच समाजरचना ( social composition ) म्हणतात. ह्यापुढें श्रमविभागाच्या तत्वावर समाजांत परस्परावलंबी पण निरनिराळे असे लोकांचे वर्ग बनतात. याला 'समाजघटना' ( social constitution ) असें नांव देत असतात.

लोकसंख्या, संपत्तीची वाढ, भिन्न परिस्थिति, लोकोत्तर विभूति आणि भिन्न भिन्न सुधारणांचा संयोग ह्या कारणांनीं समाजांत बदल होत असतो असें आधुनिक समाजवाल्यांचें म्हणणें आहे; व तें यथार्थ आहे. प्रो. भाटे यांनीं ऐतिहासिक समालोचन करून ह्या मताचें जें थोडक्यांत पण सुंदर रीतीनें पुष्टीकरण केलें आहे तें वाचण्यासारखें आहे.

समाजाकरतां व्यक्ति अगर व्यक्तीकरितां समाज ?—हा मोठा वादग्रस्त प्रश्न आहे. कांहीं समाजवादी तर कांहीं व्यक्तिवादी असे दोन पक्ष आजपर्यंत होते. व सांप्रतही नाहींत असें नाहीं. परंत सध्यां ह्या दोहोंमधील स्थिति पतकरणारे जास्त. चालू युद्धामुळें जो अनुभव येत आहे त्यामुळें तत्पूर्वकालीन विचारांत अगर सिद्धांतांत बराच फरक करावा लागेल ह्यांत शंका नाहीं. आजपर्यंत व्यक्तिस्वातंत्र्याचें निशाण इंग्लंडवर फडकत होतें. पण लष्करी चाकरी सक्तीची करून त्या देशानेंही आतां विरुद्ध पक्षाच्या सिद्धान्तास आपली मान्यता दिली आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचें फाजील स्तोम युद्धांत लवकर यश न येण्यास कारणीभूत झालें आहे, असा कित्येक लोकांचा समज आहे. पृथक्पणें राहून व्यक्तीचें चालेना म्हणून समाजसंस्था अस्तित्वांत आली हें खरें असेल, तर व्यक्तिपेक्षां समाजाचें महत्त्व अधिक मानणें भाग पडतें. समाजाच्या बाहेर राहून व्यक्तीचा नाशच होणार. समाज कसेंही करून जिवंत ठेवलाच पाहिजे. मग त्यामध्यें कितीहि

स्वार्थत्याग करावा लागला तरी तो केला पाहिजे. सेंद्रिय प्राण्यांशीं समाजाची जरी हुबेहुब तुलना करतां आली नाहीं, तरी नुसत्या व्यक्तींचा समुदाय म्हणजे समाज नव्हे. व्यक्तीचें हित व समाजाचें हित ह्यामध्यें विरोध उत्पन्न झाला असतां व्यक्तीच्या हिताकडे दुर्लक्ष करून समाजाचें हित साधण्याचा प्रयत्न करणेंच इष्ट आहे. तथापि समाजाची सामुच्चयिक प्रगति व्यक्तीच्या प्रगतीवर अवलंबून आहे हेंही विसरतां कामा नये. म्हणून समाजाचें हित कशांत आहे याचा प्रथम आपल्या मनाशीं निर्णय करून, समाज तें हित साधण्याकरतां व्यक्तीला जेवढें स्वातंत्र्य देतां येईल तेवढें देत असतो. आतां या निर्णयासंबंधानें मात्र एका समाजाचें मत दुसऱ्या समाजाच्या मताशीं जुळत नाहीं, त्यास उपाय नाहीं. कोणता निर्णय खरा आहे हें कालांतरानेंच ठरत असतें. औद्योगिकादि बाबतींत पूर्ण स्वातन्त्र्याचा पुरस्कार करणाऱ्या कांहीं मुत्सद्द्यांना आपल्या शिळ्या विचारांची शिदोरी समुद्रांत सोडून देण्याची पाळी त्यांच्या हयातींतच आली असा अनुभव आज इंग्लंडांत येत आहे. कोणत्याही देशांत कायद्याची टांकसाळ सतत चालू आहे. आणि कायदा म्हटला म्हणजे व्यक्तीच्या अनिरुद्ध स्वातंत्र्यावरच घाला होय. सांप्रत युद्धांत गुंतलेल्या देशांत प्रत्येक स्त्रीपुरुषाचा जन्म समाजाकरितां आहे असें लोक प्रतिपादन करूं लागले आहेत. ह्यावरून व्यक्तीपेक्षां समाजाचें महत्त्व अधिक आहे हें उघड होतें. सामाजिक हित कशानें होईल हाच विचार सर्व संस्था करीत असतात. व्यक्तीचें हित फक्त व्यक्ति बघते. व्यक्तीच्या हिताहिताची कोणीहि सार्वजनिक रीतीनें चर्चा करीत नाहीं. यावरून समाजाचें श्रेष्ठत्व आपोआपच सिद्ध होतें. आरंभीं जरी व्यक्तीकरितां समाज निर्माण झाला असला ( असेल तर ) तरी आज मितीस समाजाकरितां व्यक्ति जन्मास येतात असें म्हटल्यास अगदींच चुकीचें होणार नाहीं. केवळ व्यक्तिशः न्यायाच्या तत्त्वावर सर्वस्वीं भिस्त ठेवून प्रचलित रूढींत फरक करूं पाहणाऱ्या समाजसुधारकांचें, व्यक्तीहून समाजाचें महत्त्व अधिक आहे ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष होत असतें. कोणतीही नवीन रूढि पाडतांना नुसत्या व्यक्तीच्या सुखासमाधानाचा विचार अप्रस्तुत होय. असो. प्रो. भाटे यांनीं आपल्या पहिल्या तीन व्याख्यानांत समाजशास्त्राची माहिती थोडक्यांत दिल्यावर पुढल्या

तीन व्याख्यानांत हिंदुलोकांच्या चालीरीतींचें परीक्षण त्यांनीं समाजशास्त्राच्या नियमांना अनुसरून केलें आहे, त्याचा आतां विचार करूं.

आतांपर्यंत प्रो. भाटे यांच्याशीं कोणाचा विरोध होण्याचें कारण नव्हतें. कारण जुन्या नव्या समाजवाद्यांच्या मतांचें फक्त उद्घाटन त्यांनीं पहिल्या तीन व्याख्यानांत केलें. परंतु पुढील तीन व्याख्यानांत हिंदु चालीरीतींविषयीं त्यांनीं जे उद्गार काढले आहेत त्यांवरून हिंदुसमाजाशीं, हिंदुसंस्कृतीशीं, हिंदुमनाशीं, त्यांचें सूक्ष्मावलोकन व अध्ययनपूर्वक संघट्टन झालें असावें असें वाटत नाहीं. आर्यसंस्कृतीच्या इतिहासाचें अज्ञान, व अन्यसमाजाच्या त्याच समाजांतील लेखकांनीं सहानुभूतिपूर्ण लिहिलेल्या इतिहासाचें अपरिमित अध्ययन, ह्यांच्या योगानें आमच्या समाजांत असा एक वर्ग उत्पन्न झाला आहे कीं, त्यांचीं आपल्या समाजाविषयीं कांहीं विलक्षणच मतें बनलीं आहेत. समाजशास्त्राचें अध्ययन ज्यांचें वेतावेताचेंच आहे त्यांच्या ठिकाणीं असलीं मतें कदाचित् क्षम्य ठरतील, पण प्रो. भाट्यांसारख्या समाजशास्त्राचें परिशीलन करणाऱ्या गृहस्थांनीं आमच्या समाजाकडे बघतांना उपहासदृष्टीच सदा ठेवावी हें सर्वथा गैर दिसतें. पाश्चात्य समाज परिणत स्थितीला पोंचला असून तो सर्वस्वीं अनुकरणीय आहे अशी लोकांची समजूत झालेली आहे. कोणतीही संस्था निर्दोष असणें शक्य नाहीं. तेव्हां त्यांतील दोषाविष्करणानें कोणालाही राग येण्याचें कारण नाहीं. प्रत्येक समाजहितेच्छु माणसाचें तें कर्तव्यच आहे. पण त्यामुळें पूर्वजांबद्दल व पूर्वसंस्थांबद्दल अनादर बुद्धि वेळीं अवेळीं प्रदर्शित करणें कोणत्याही सभ्य व विचारशील माणसांस शोभतें असें आम्हांस वाटत नाहीं. सक्तीचें संस्कृताध्ययन हाच एक उपाय ह्या रोगास आम्हांस सुचतो. कांहीं सकेशा विधवांचें वांकडें पाऊल पडलें म्हणून सर्व विधवांनीं केशवपन केलें पाहिजे असें फरमान आमच्या ऋषींनीं सोडलें, हें प्रो. साहेबांस कोणीं सांगितलें आम्हांस ठाऊक नाहीं. ह्या असमंजस विधानावरून आमच्या सामाजिक चालीरीतींचें ऐतिहासिकरीत्या अध्ययन प्रो. भाटे यांनीं केलें असावें असें वाटत नाहीं. कलुषित दृष्टीनें पाहिलें म्हणजे चांगलेंही वाईट दिसतें. आमच्या पावित्रपणाला व सोंवळ्या ओंवळ्याला आरोग्यशास्त्राचा काडीचाही आधार नाहीं, असें व्याख्यात्यांनीं बेधडक आपल्या श्रोत्यांस सांगितलें. तेंच उलट अन्यसमाजांतील दोषही त्यांस गुणसे भासूं लागतात.

आमच्या समाजांत जातीवरून माणसाचा दर्जा ठरविला जातो, ह्याबद्दल प्रो. साहेबांस दुःख होणें स्वाभाविक आहे. पण इतर देशांत हाच दर्जा श्रीमंतीवर अवलंबून असतो ह्याचें त्यांस कसें कौतुक वाटतें हें आम्हांस समजत नाहीं.

हिंदुसमाजाच्या चार मूलभूत कल्पना म्हणून प्रो. साहेबांनीं दिल्या आहेत. कृत्रिम पवित्रपणा, ही पहिली कल्पना. शास्त्रकार समाजाला लहान अर्भकाप्रमाणें समजतात, ही दुसरी कल्पना. तिसरी कल्पना, मनुष्यांत जन्मजात विषमता आहे. आणि चौथी कल्पना ह्मणजे मायावाद आणि दैववाद. ह्या मूलभूत कल्पना कशाच्या आहेत ह्याविषयीं प्रो. भाटे ह्यांची स्वतःचींच कल्पना अद्यापि व्यक्त स्वरूप पावलेली नाहीं. आमच्या सामाजिक चाली रीतींच्या मूळाशीं ह्या कल्पना आहेत असें एके ठिकाणीं ते म्हणतात, तर इतरत्र समाजाचा पाया ह्या कल्पनांवर रचला आहे असें ते सांगतात. आतां ह्या दोहोंमध्यें महदंतर आहे हें कोणास स्पष्ट करून सांगण्याची गरज नाहीं. अगोदर कोणी एकानें आपल्याशींच कांहीं कल्पना ठरवून त्या कल्पनांना अनुसरून समाजाची उभारणी केली असें जर रा. भाटे यांचें म्हणणें असेल, तर तें निःसंशय निराधार आहे एवढेंच नव्हे, तर कार्यकारणभाव जाणणारांनीं—समाजशास्त्राचे नियम अवगत असणारांनीं—अशा प्रकारचीं मतें प्रतिपादन करणें त्यांच्या विद्वत्तेस कमीपणा आणणारें आहे असें आम्हांस वाटतें. हिंदुस्थानसारखा अफाट देश; दळणवळणाचीं साधनें अनुपलब्ध; विचारविनिमयाचे मार्ग संकुचित; अशा वेळीं होऊन गेलेल्या धर्मशास्त्रकारांनीं एवढ्या विस्तीर्ण समाजाला आपल्या मनसोक्त कल्पना ग्रहण कराव्यास लावल्या असें कोणीही शास्त्रीय दृष्टीचा माणूस म्हणणार नाहीं. परंतु जुन्याची निन्दा करणारांना हा भ्रम अद्यापि सोडवत नाहीं. आमच्या स्मृतिकारांना प्रो. भाटे यांनीं एके ठिकाणीं " संग्राहक " म्हणून यथार्थ म्हटलें आहे. तथापि पूर्वग्रहांनीं मन दूषित झालें असल्यामुळें म्हणा, अगर इतर कांहीं कारणांनीं म्हणा, ही दृष्टि त्यांनीं शेवटपर्यंत कायम ठेवली नाहीं. आपल्या ह्या प्रचंड देशभर निरनिराळ्या लोकसमूहांत सामान्यतः सारखींच धर्मबन्धनें व धर्मकल्पना आढळून येतात, ह्याचें कारण प्रचलित रीतीभातींना स्मृतिकारांनीं धर्मनियमांचें स्वरूप दिलें हें होय. त्यांनीं पूर्वीं कांहीं नव्हतें अशा ठिकाणीं नवीन कल्पनासृष्टि निर्माण केली असें नाहीं. तत्का-

लीन सर्व समाजाचे विचार त्या त्या वेळच्या संस्थांत प्रतिबिंबित झालेले असतात. खिस्ती अगर मुसलमानी धर्माचा विस्तार कितीही झाला तरी त्या त्या धर्माच्या अनुयायांमध्यें आचारविचारसादृश्य उत्पन्न करणें सुलभ असतें. एक बायबल किंवा कुराण हातांत घेतलें म्हणजे खिस्ती अगर मुसलमानी धर्मांतील आचारविचार सर्वांस अवगत होतात. वैदिक समाजाची गोष्ट ह्याहून अगदीं भिन्न आहे. शिवाय वैदिक धर्मानें आचारस्वातंत्र्य जेवढें दिलें आहे, तेवढें दुसऱ्या कोणत्याही धर्मांत नाहीं. परंतु वैदिक धर्माचें रीतसर अध्ययन नसल्यामुळें आमच्या लोकांत भलभलत्या कल्पना रूढ झाल्या आहेत. असो. प्रोफेसर भाटे यांनीं सांगितलेल्या चार मूलभूत कल्पनांवर जरी समाजाची रचना झाली नसली तरी आमच्या प्रस्तुत चालीरीतींच्या बुडाशीं सदर कल्पना आहेत हें म्हणणें कांहीं खोटें नाहीं. पण तेवढ्यामुळें त्या सर्वथा सदोष आहेत हें म्हणणें मात्र गैरशिस्त आहे. आमच्या चालीरीतींच्या समर्थनाच्या खऱ्याखोटेपणाबद्दल विचार करण्याचें प्रो. साहेबांनीं नाकारलें आहे, तेव्हां त्याविषयीं अधिक ऊहापोह करण्यांत अर्थ नाहीं. समाजांतील दोषच सांगावयाचे असतील तर ते कोणत्या समाजाचे सांगतां येणार नाहींत? पाश्चात्य समाजाचें दोषाविष्करण करण्याचें प्रो. भाटे यांच्या मनांत आल्यास त्यांस असलीं सहा व्याख्यानें देऊनही भागणार नाहीं. तथापि दोष दाखविण्यास सुद्धां समाजाचें अंतरंग समजून घ्यावें लागतें. नाहीं तर कशी फसगत होते तें पहा. ह्या मायेच्या जगांत मन-मानेल तसें वागण्यास हरकत नाहीं असें जुन्या मताचा हिंदु गृहस्थ मानतो, असे उद्गार प्रो. साहेबांच्या तोंडून कसे निघाले ह्याचें आम्हांस आश्चर्य वाटतें. अट्टल मिशनरी सुद्धां असले उद्गार काढण्यास कचरेल ह्यांत संशय नाहीं. हजारों विद्यार्थी ज्यांच्याकडून शिक्षण घेणार त्यांच्या ठिकाणीं हिंदुधर्माविषयीं अगर हिंदुसमाजाविषयीं इतकें अगाध अज्ञान वसत असावें हें पाहून कोणालाही वाईट वाटेल. एकाद्या अनधीत हिंदु गृहस्थाचे विचार म्हणजे हिंदुधर्मशास्त्रज्ञाचे अगर एकंदर समाजाचे विचार होत, ही जी प्रो. साहेबांची समजूत तीच चुकीची आहे. आम्हीं नुकतेंच एक व्याख्यान ऐकलें. त्यांत एका सरकारी डाक्टरांनीं, माझ्याकडे एक बाई माशांनीं ज्याचें तोंड भरलें आहे असें एक आपलें मूल घेऊन आली होती असें सांगून, आमच्या बायकांना मुलाच्या तोंडावरील माशा हाकलण्याचीही

अक्कल नाहीं असा सिद्धांत त्यावरून काढला ! ही बाई कोण होती हें डाक्टरसाहेबांनीं गुलदस्तांत ठेवलें तें ठीकच झालें. एकाद्या गोष्टीवरून सर्व जनतेसंबंधानें सामान्य नियम प्रस्थापूं पाहणें अगदीं गैरशिस्त होय. परंतु असली दुष्ट संवय पुष्कळांना असते. ज्याला हल्लीं आपण जुना मनुष्य समजतों तो अप्रबुद्ध असतो, त्याला प्राचीन विद्येचें बिलकूल ज्ञान नसतें ही गोष्ट रा. भाट्यांना तरी समजावयास पाहिजे होती. हल्लींची स्थिति अशी आहे कीं, ज्याला इंग्रेजी शिक्षण नाहीं तो नितान्त अज्ञानी राहिलाच पाहिजे. रा. भाटे हे अनुमान करण्याची फार घाई करतात असें आम्हांस वाटतें. त्याचप्रमाणें जुन्या पिढींतील माणसांच्या चरित्रांची त्यांस माहिती नसावी असाही संशय येतो. कारण आमच्या दातृत्वासंबंधानें ते म्हणतात कीं, 'तें बैठें आहे; म्हणजे कोणी मनुष्य आमच्याकडे आला आणि मदत मागूं लागला तर मात्र आम्हीं ती त्याला देऊं, नाहीं तर स्वस्थ बसूं.' आजकालच्या समाजाबद्दलच जर प्रो. साहेबांचें हें म्हणणें असेल तर तें खोडून काढण्याकरितां लेखणीला शीण देण्याची आमची इच्छा नाहीं. परंतु आमच्या धार्मिक कल्पनांचा हा परिणाम आहे व मागील लोकांचें दातृत्वही " बैठें " होतें असें म्हणण्याचा जर प्रो. साहेबांचा उद्देश असेल तर मात्र तें निर्विवाद मान्य करण्यास आम्हीं तयार नाहीं. पन्नास साठ वर्षांपूर्वींच्या एका सुखवस्तु गृहस्थाची गोष्ट आम्हीं ऐकिली आहे, ती येथें देतों. स्नानसंध्या आटोपल्यावर भोजनापूर्वी मारुतीच्या देवळांत जाण्याचा ह्या गृहस्थाचा नित्यनियम असे. हेतु हा कीं, देवदर्शन करून देवळांत जे कोणी प्रान्थस्थ उतरले असतील व ज्यांची भोजनाची सोय झाली नसेल, त्यांस आपल्या घरीं नेऊन भोजन घालावें. हे गृहस्थ आपल्यास गरज नसतांहि निरनिराळ्या वस्तूंचा जवळ संग्रह ठेवीत. उद्देश एवढाच कीं, कोणत्याहीवेळीं कोणालाही गरज लागल्यास आपणांस देतां यावी. गांवांत एकाद्या गरीब माणसाकडे त्याचा फार मोठ्या योग्यतेचा नातलग पाहुणा असला व ही गोष्ट सदर गृहस्थांच्या कानावर गेली म्हणजे त्यांच्या 'घरांतून न मागतां साजूक तूप वगैरे अवश्य लागणारे पदार्थ त्या माणसाकडे रवाना व्हावयाचेच. हें कृत्य रा. भाटे यांच्या " घांवत्या " दातृत्वांत यावें असें वाटतें. जुन्या लोकांच्या गोष्टी ऐकण्याचा नाद ज्याला आहे त्यास अशा गोष्टी कळणें अजूनही दुरापास्त नाहीं. परंतु हें व्हावें कसें ? हल्लींची परिस्थितीच

कांहीं विलक्षण आहे. इंग्रेजी शिकण्याच्या निमित्तानें घरांतून व गांवांतून अल्पवयांतच मुलगा बाहेर पडतो. परकी समाजांचा इतिहास शिकण्यांत व इतर ज्ञान संपादन करण्यांत एक तप घालवून पुढें नोकरींत शिरतो. ह्यामुळें आमच्या समाजाशीं एकरूप तो कधींच होत नाहीं. आमच्याच समाजाला आमचाच मनुष्य परकी होतो. आपल्या माणसांनींच समाजसुधारणेचें कंकण हातीं बांधल्यामुळें सुधारणेस विघ्नें आलीं आहेत. सामाजिक रोगाची चिकित्सा करण्यास असले लोक सर्वस्वीं नालायक आहेत. प्रो. भाटे यांचें तर्कशास्त्र किती चुकीचें असतें व हिंदुसमाजाबद्दल त्यांच्या ठिकाणीं किती अज्ञान वसत आहे याचा मासला म्हणून पान ७९ चा संबंध उताराच येथें देतों.

" तो ( जुन्या मताचा हिंदु ) आपल्या सांसारिक फायद्याकरितां हवें तें करण्यास तयार होतो. अप्रामाणिकपणासारखें नीतिदृष्ट्या अगदीं निंद्य असें आचरण करितांना त्याच्या मनाला मुळींच दिक्कत वाटत नाहीं. तो असल्या गोष्टी अगदीं उजळ माथ्यानें करीत असून आपण स्वतःला मोठा धर्मनिष्ठ समजत असतो. असलीं धर्मनिष्ठ समजलीं जाणारीं माणसें तुम्हांला आपल्या समाजांत अगदीं पदोपदीं आढळतील. तीं म्हणतातः—' आम्ही आपलीं संध्यादि नित्यकर्में आणि इतर धार्मिक विधि यथाशास्त्र करतों; तेव्हां अर्थातच मृत्यूनंतर आम्हांला स्वर्ग प्राप्त होणार. ' माझ्या लहानपणाच्या आठवणींतील एक गोष्ट मी येथें सांगतों. माझे वडील वकील असून त्यांचा ओढा सुधारणा-पक्षाकडे होता. त्यांचे एक स्नेही आणि दूरचे नातेवाईक आमच्या येथेंच कामाकरितां येत असत व आमच्या घरींच राहात असत. हे आमच्या वडिलांचे स्नेही आतांच सांगितलेल्या धार्मिक लोकांच्या वर्गांतले होते. त्यांची स्नान-संध्या कधींच टळली नाहीं. ते संध्येला बसले म्हणजे तासचे तास संध्या करीत बसत. मी त्यावेळीं लहान होतों, पण मला त्यांच्या संध्येचें चांगलें स्मरण आहे. ते संध्येंतील दोनचार नांवें तोंडानें म्हणत, आणि मध्येंच माझ्या वडिलांना ' कायहो वकील, त्या राम्या पाटलाच्या कजाचें काय झालें ? ' असें विचारीत; आणि पुनः संध्या करूं लागत. पांच चार मिनिटें संध्येंत गेलीं म्हणजे पुनः असाच दुसरा कांहीं प्रश्न माझ्या वडिलांना करीत. असली संध्या करून फायदा काय

असें जर माझ्या वडिलांनीं त्यांना विचारलें तर ते साफ सांगत कीं, मी संध्यावंदनादि कृत्यें अगदीं यथासांग पार पाडलीं आहेत तेव्हां अर्थातच मला मरणोत्तर उत्तमलोकप्राप्ति होणार. 'ह्या जगांत प्रामाणिकपणानें आणि नीतीनें न वागणाऱ्या माणसाला असलीं हीं धर्मकृत्यें स्वर्गप्राप्ति करून देण्यास समर्थ आहेत काय ?' असा प्रश्न कोणी केल्यास त्याला हे धर्मोक्त 'प्रामाणिकपणा आणि नीति वगैरे ह्या गोष्टी केवळ ऐहिक म्हणजे अर्थातच मिथ्या आहेत; परलोकार्शी ह्या दुःखमय जगांतील गोष्टींचा संबंध काडीचाही नाहीं; असल्या गोष्टींकडे लक्ष देणें म्हणजे परमार्थिक सुखाला आंचवणेंच आहे.' असा रोखठोक जबाब देणार. धार्मिक म्हणविणाऱ्या लोकांचें हें तत्वज्ञान अलीकडच्या विद्वानांना खरोखरच अश्रुतपूर्व आणि अगम्य वाटेल."

वरील उतारा वाचून प्रो. साहेबांच्या अजाणपणावद्दल कोणालाही कींव येईल. पण शिवाय आमच्या समाजाची निष्कारण निंदा केलेली ऐकून त्वेष आल्याशिवायही राहणार नाहीं. ख्रिस्ती देवालयांतून प्रार्थनेला म्हणून जाणारीं युवा युवती क्वचित् तेथेंच विवाहकार्य उरकून घेतात म्हणून सर्व ख्रिस्तीसमाजाला नांवें ठेवण्यास प्रो. साहेब तयार आहेत काय ? प्रो. साहेबांच्या अवलोकनांत जुन्या चालीचीं माणसें आलींच नाहींत. त्यांनीं प्रयत्न केल्यास अद्यापिही तीं त्यांना सांपडतील व मग त्यांच्या भ्रमाचें निरसन होईल अशी आम्हांस खात्री आहे. प्रामाणिकपणा व नीति वगैरे गोष्टी मिथ्या आहेत, तदनुसार आचरण करण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं, अशी आमच्या समाजाची समजूत आहे ही गोष्ट आम्हांला तरी आजपर्यंत अश्रुतपूर्व होती. मग प्रो. भाट्यांतारख्या "अलीकडच्या विद्वानांना" काय वाटत असेल तें वाटो.

प्रो. भाटे यांची दुसरी तकरार अशी आहे कीं, आमचे धर्मशास्त्रकार आमच्या समाजाला कधींही प्रौढ न होणाऱ्या अर्भकाप्रमाणें समजतात. ह्यांत तथ्याचा अंश किती आहे ह्याचा विचार बाजूस ठेवला तरी धर्मशास्त्रकारच बरोबर आहेत आणि प्रो. भाटे चुकत आहेत असेंच अखेरीस ठरेल असें आम्हांस वाटतें. मनुष्याच्या विचारशक्तीवर प्रो. साहेब भिस्त ठेवतात तितकी ठेवणें अयोग्य आहे असेंच अनुभवावरून दिसतें. सर्व विद्वान् प्रोफेसरांची एक वसाहत करावी आणि प्रत्येकाच्या घराच्या

एका बाजूस दारूचा पिठा आणि दुसऱ्या बाजूस वेश्यासदन ह्याप्रमाणें ह्या आपल्या नवीन नगरीची रचना करावी, आणि मग आपल्या विचारशक्तीच्या जोरावर व्यामोह टाळण्याची धमक किती प्रोफेसरांत आढळून येईल तें पहावें. "No considerable body of men is ever moved to the iust by Syllogism." Morley's *Rousseau* मनोविकारापुढें विचारशक्ति लुली पडते. लहानपणच्या शिक्षणानें आणि पूर्वजन्मींच्या संस्कारानें चांगली गोष्ट करण्याकडे एकदम ज्यांच्या मनाची प्रवृत्ति होते तेच ह्या संसारांत टिकतात. अशा लोकांचे मनोविकारच मुळीं उच्छृंखल नसतात. परंतु प्रबल मनोविकारांच्या माणसांच्या हातून केवळ विवेकानें सद्वर्तन घडणें दुरापास्त आहे. आमच्यांतील खालच्या जातींच्या लोकांत सुद्धां जी नीतिमत्ता दिसून येते त्याचें सर्व श्रेय आमच्या स्मृतिकारांना आहे. त्यांत विवेकी माणसें समाजांत थोडींच असतात. नियम हे इतरेजनाकरतांच करावे लागतात. ज्या पाश्चात्य समाजांचें अनुकरण आमच्या "विद्वानांस" करण्याची फार हौस असते त्या समाजांकडे आज पहा, म्हणजे आमच्या स्मृतिकारांचा दूरदर्शीपणा आपोआपच सिद्ध होईल. हल्लींच्या युद्धांत जिवावर बेतलें असूनही दारू पिण्याचें लोक सोडून देईनात म्हणून रशियाच्या झारसाहेबांना कायद्यानें दारू पिणें बंद करावें लागलें. अफूचें व्यसन नाहींसें करण्याकरितां चीन सरकारास उपाय योजावे लागले. प्रो. भाट्यांसारख्या मंत्र्यांचा सल्ला ऐकून उद्यां सरकार जर असें म्हणेल कीं, आम्ही प्रजेला फक्त सुशिक्षित करून तिची विचारशक्ति पूर्णपणें विकसित करूं, ह्या पलीकडे कांहीं करणार नाहीं, अपराध करील त्यास शिक्षा मात्र देऊं, तर हें म्हणणें कितपत रुचेल ? असल्या राज्यकारभारानें समाजाची प्रगति होण्याऐवजीं आमच्या मतें पिछेहाटच होईल. कालेजांतून सर्वांस सारखेंच शिक्षण मिळतें, तेव्हां सर्व सुशिक्षित माणसें नीतिमत्तेंत समान दर्जाचीं असलीं पाहिजेत, असें प्रो. भाटे यांस वाटत असेल. पण आमचा अनुभव तसा नाहीं. " अम्भोदा बहवो हि सन्ति गगने सर्वे तु नैतादृशाः ॥ " प्रो. भाटे यांनीं आपल्या चौथ्या व्याख्यानाची समाप्ति खालील शब्दांत केली आहे. " आमच्या धर्मशास्त्राचा अथवा सामाजिक नियमांचा आणि चालीरीतींचा पाया ज्या मूलभूत कल्पनांवर घालण्यांत आला आहे त्या कल्पना किती चमत्कारिक आणि समाजशास्त्रदृष्ट्या किती घातक आहेत हें आपल्या लक्षांत आलेंच

असेल. ह्या कल्पनांचा मोड करण्याकरितांच आम्हांला समाजशास्त्रसंमत तत्त्वांवर उभारलेल्या सुधारणेची फार अवश्यकता आहे. अशा सुधारणेवांचून आमच्या समाजाची वाढ आणि प्रगति होणें अशक्य आहे." आम्हीं पुष्कळ विचार केला; तथापि आमच्या चालीरीतींत कांहीं दोष असले तरी त्या चालीरीतींचे परिणाम भिन्न स्थितींत आम्हांला थोडेसे जाचक होत असले तरी त्या चालीरीतींच्या मूळाशीं असलेल्या कल्पना अगदीं चमत्कारिक व समाजशास्त्रदृष्ट्या घातक आहेत हें अद्यापिही आमच्या लक्षांत येत नाहीं. मग प्रो. साहेबांच्या श्रोत्यांची किती खातरी झाली असेल हें आम्हांस ठाऊक नाहीं.

लग्नसंस्थेच्या पायावर समाजरचना होते. कारण ऑरिस्टॉटलनें म्हटल्याप्रमाणें, समाजाचा उगम कुटुंबापासून होतो, आणि कुटुंब लग्नसंस्थेशिवाय बनत नाहीं. "Sexual association when it endures becomes marriage and results in the family: that is to say, a union of parents for the purpose of protecting their young. ('Evolution of Marriage' by *Letourman*)

ह्यावरून विवाहसंस्थेचें महत्व समाजशास्त्रांत फार आहे हें उघड आहे. म्हणून प्रो. भाटे यांनीं आपलें पांचवें व्याख्यान ह्या विषयाची चर्चा करण्यांत खर्ची घातलें आहे, आणि त्यावरून आमच्या वैवाहिक संस्था अनिष्ट आहेत असें निश्चित केलें आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या त्यांच्या कल्पनेस अनुसरून आईबापांनीं आपल्या मुलांमुलींच्या लग्नाची व्यवस्था लावणें त्यांस इष्ट वाटत नाहीं हें स्वाभाविकच आहे. परंतु व्यक्तिस्वातंत्र्याची विचारसरणी आम्हांला सम्मत नसल्यामुळें आमच्या मतें अपक्व बुद्धीच्या व क्षुब्ध मनोविकारांच्या तरुणतरुणींपासून आमच्या समाजानें हें स्वातंत्र्य काढून घेतलें हेंच योग्य झालें. त्याचप्रमाणें विधवाविवाहावर आमच्या समाजाची प्रगति अवलंबून आहे. हें म्हणणेंही हास्यास्पद आहे. पुनर्विवाहाचा प्रश्न अशा मुद्द्यावर सोडवूं पाहणें बालिशपणाचें होय. परंतु प्रो. भाटे यांनीं म्हटल्याप्रमाणें ह्या विषयांची भवति न भवति इतकी झाली आहे कीं, चर्वितचर्वण करण्याची येथें जरूरी नाहीं. त्यापेक्षां विवाहसंस्थेचा बोधप्रद इतिहास संक्षेपतः वाचकांस सांगणेंच अधिक श्रेयस्कर होईल.

प्रथमतः हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे कीं, स्त्रीपुरुषसंबंध नाहीं असा कोणत्याही प्राण्यांचा समाज आढळणार नाहीं. त्याचप्रमाणें ह्या संबंधाचे प्रकार आपणांस कल्पितां येतील ते सर्व कोणत्या ना कोणत्या तरी समाजानें आजपर्यंत अनुभवून पाहिले आहेत. रवंथ करणाऱ्या पशूंत सर्वांत सशक्त असतो तोच प्रजोत्पादन करतो. त्याची लहर लागली नाहीं तर दुसऱ्यास संधि मिळते. नाहींतर तो इतरांस हुसकावून लावतो. अर्थातच ह्या पशूंत अनेकपत्नीत्व असतें. मुंग्या आणि माशा यांच्यामध्यें बहुपतित्वाची चाल आढळून येते. बलिष्ठ बैलाप्रमाणें बलिष्ठ माशी दुसऱ्या माशांचें कांहीं चालूं देत नाहीं. रानांत एकएकट्या राहणाऱ्या हिंस्र पशूंत मात्र मनुष्यांतील एकपत्नीत्व असणें साहजिकच आहे. कुत्रा मांजर इत्यादि पाळीव मांसाहारी प्राण्यांत मात्र बहुतेक मनसोक्त संबंध होत असल्याचें दिसतें. पक्ष्यांत व माकडांतही एकपत्नीव्रत पाळतात, असें शोधकांचें म्हणणें आहे. ह्या कारणाकरितांच, मानवी समाजाच्या प्रथमावस्थेंत स्त्रीपुरुषांचा मनसोक्त व्यवहार होत असे असें जें कित्येकांचें म्हणणें होतें तें ह्यापुढें टिकत नाहीं असें अलीकडील शोधकांचें मत आहे. "The simple fact that man is a mamalian primate weakens this hypothesis in advance, since the nearest relations of man in the animal kingdom are in general polygamous and even sometimes monogamous." (*Ibid*)

एकमेकांच्या हयातीपर्यंत पतिपत्नीभावानें एकत्र राहाणें ही जी आपली एकपत्नीत्वाची कल्पना ती कांहीं मनुष्येतर प्राण्यांत आढळत नाहीं. हिंस्र पशु एकपत्नीक असतात ह्याचा अर्थ एकाच वेळीं एकाहून अधिक स्त्रियांशीं त्यांचा संबंध घडत नाहीं एवढेंच; व जो कांहीं सहवास असतो तोही अल्पकालीन असतो. शिवाय मानवी एकपत्नीव्रतांत जें आत्मसंयमन असते तें मनुष्येतर प्राण्यांत असणें संभवनीय नाहीं. कारण ज्या गुणांमुळें इतर प्राण्यांपासून मनुष्याला वैशिष्ट्य प्राप्त झालें आहे, त्या गुणांपैकीं आत्मसंयमन हा गुण आहे. मत्सरबुद्धि तीव्र असल्यामुळें कित्येक पशूंस आपली मादी घेऊन एकान्तांत वास करावा लागतो; आणि त्यामुळें कांहीं वेळ त्यांच्याकडून एकपत्नीनिष्ठा आपोआपच पाळली जाते. कांहीं पक्ष्यांत एकपत्नीधर्म आढळतो खरा; पण ते पक्षी विषयातुर फार असतात व त्यामुळें कांहीं काल एकत्र राहणें असंभवनीय नाहीं. पिलूं उडूं लागेपर्यंतच

हा सहवास असतो. तात्पर्य, पशुपक्षिकीटकादि प्राण्यांत आत्मसंयमन नसतें. निरनिराळ्या कारणांनीं अल्पकालपर्यंत पतिपत्नीभावानें ह्यांपैकीं कित्येक प्राणी राहतात हें मात्र खरें.

रानटी समाजांचा इतिहास पाहिला तर वैवाहिक बंधनाची शिथिलता व अस्थिरता निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या प्रमाणांत दिसून येते. मिंकोपीज नांवाच्या लोकांत स्त्रीपुरुष एकत्र राहतात व त्यांच्या समागमापासून झालेल्या मुलाचें अंगावरचें दूध तोडलें म्हणजे पुरुष निघून जातो आणि दुसरी बायको करतो. कांहीं रानटी समाजांत ' मोटा ' नांवाचा विवाहप्रकार आहे. ह्यांत स्त्री आपल्या—म्हणजे आईबापांच्या–घरीं आपणांस पसंत पडेल तो पुरुष आणते; इच्छेस येईल तोंपर्यंत त्याबरोबर स्त्री म्हणून व्यवहार करते; आणि नंतर त्याला रजा देऊन दुसरा पुरुष घरांत आणते. ह्या सर्व गोष्टी तिच्या नातेवाइकांच्या संमतीनें होत असतात व ह्यामध्यें कांहीं कमीपणा आहे अशीही कोणाची समजूत नसते. हवाई बेटांत एक बहिणीचा समूह दुसऱ्या भावांच्या समूहाशीं विवाहानें बद्ध होतो. ह्यांत प्रत्येक भावाचा सर्व स्त्रियांवर नवरेपणाचा सारखाच हक्क असतो. त्याचप्रमाणें प्रत्येक स्त्रीही सर्व भावांची बायको असते. अरब लोकांतील एका जातींत पुरुषाबरोबर स्त्री असा करार करते कीं, मी तुझ्याजवळ एकनिष्ठेनें आठवड्यांतून ४।५ दिवसच पत्नीव्रत पाळून राहीन. अर्थात् जे करारांत दिवस येत नसतील त्या दिवशीं त्या स्त्रीला मनसोक्त आचरण करण्यास मुभा असते. आईशीं मुलाचा, बापाचा मुलीशीं, भावाचा बहिणीशीं संबंध ज्या समाजांत घडतो अशा समाजांचीं उदाहरणें स्पेन्सरनें आपल्या ग्रंथांत दिलीं आहेत. (समाजशास्त्र, पु. दुसरें, पान २१८) प्राचीन काळीं इराणामध्यें आईबरोबर मुलानें लग्न लावण्यास धर्माचीच अनुज्ञा होती असें म्हणतात. मादागास्करमध्यें लग्नाच्या पूर्वी आया आपल्या मुलीचा कौमार्यभङ्ग करविणें आपलें कर्तव्य मानतात. सोनथाळ लोकांत विवाहाच्या अगोदर वधूवरांनीं सहा दिवस एकत्र राहिलेंच पाहिजे अशी अट असते. अमेरिकेंतील कांहीं मूळच्या जातींत पैसे उसने देतात त्याप्रमाणें आपली बायको दुसऱ्याच्या उपयोगाकरितां देणें हें नुसतें कायदेशीरच नव्हे, तर अत्यन्त श्लाघ्य समजतात. पाहुणा आला असतां यजमानानें आपली बायको त्याला विषयसेवनार्थ देणें हा विलक्षण आतिथ्याचा

प्रकार पुष्कळ प्रवासवृत्तांत नमूद केलेला आहे. खुद्द अथेन्स व रोम शहरांत ही चाल रूढ होती. केटो आणि साक्रेतीस यांनीं आपआपल्या बायका आपल्या मित्रांस दिल्याचें प्लूटार्कच्या चरित्रांत लिहिलें आहे. पुष्कळ रानटी समाजांत लग्नाच्या पूर्वी मनसोक्त व्यवहार करण्याची स्त्रियांना मोकळीक असते. आस्ट्रेलिया, पॉलिनीशिआ, वगैरे बेटांतील कांहीं लोकांचीं वर्णनें प्रवासग्रंथांत दिलीं आहेत, त्यावरून स्त्रीपुरुषांचीं मनें लज्जेनें किती अविकृत होतीं तें दिसून येईल. कांहीं लोकांत कुटुंबांतील सर्व माणसें नग्नावस्थेंत एकत्र बसून सर्व रात्र घालवतात. आस्ट्रेलियांत १४।१५ वर्षांचे मुलगे १० वर्षांच्या मुलींबरोबर उजळ माथ्यानें विषयचेष्टा करीत असतात. लग्नाच्या रात्रीं वधूनें जमलेल्या पाहुण्याकडे पाळी पाळीनें जाऊन विषयसेवन करणाऱ्या इसमाकडून आहेर घेण्याची चाल कांहीं जातींत असल्याचें हिरॉडोटसनें लिहून ठेविलें आहे. वर निर्दिष्ट केलेल्या उदाहरणांवरून लज्जा, विनय, पातिव्रत्य ह्या कल्पना स्वाभाविक नाहींत असें सिद्ध होतें. त्या कृत्रिम आहेत, म्हणजे त्यांचा उदय मनुष्यानें श्रमानें बनविलेल्या समाजाच्या विशिष्ट परिस्थितींत झाला आहे. चहाप्रमाणें आपली बायको देऊन अभ्यागताचें स्वागत करणें येथपासून तों एक पति मृत झाला असतां पुनश्च विवाह न करणें येथपर्यंत केवढी मोठी मजल समाजानें मारली आहे; किती जबरदस्त विचारक्रान्ति झाली आहे, ह्याची स्पष्ट कल्पना करतां येईल.

मनूनें सांगितलेल्या आठ प्रकारच्या विवाहांचा उल्लेख प्रो. भाटे यांनीं केला असून त्यांच्या मतें हे विवाहाचे निरनिराळे प्रकार नसून वैवाहिक परिणतीच्या त्या आठ पायऱ्या आहेत. हा समज प्रो. भाट्यांचा एकट्यांचा नसून पुष्कळांचा आहे. परंतु तो सर्वस्वीं खरा नाहीं असें आम्हांस वाटतें. वस्तुतः पाहतां पैशाच अगर राक्षस विवाह हे विवाहाचे प्रकार नसून बायका मिळविण्याचे प्रकार आहेत. स्त्रीचा संबंध पुरुषांशीं एकदां घडला—मग तो कोणत्याही रीतीनें घडेना—म्हणजे तो कायम समजावयाचा ही जी आमच्या धर्मशास्त्रकारांची कल्पना तदनुसार मनूला असल्या संबंधावर विवाहाचा शिक्का बसवावा लागला. निजलेल्या अगर मादक पदार्थांच्या सेवनानें बेशुद्ध स्थितींत असलेल्या वधूला नेऊन बलात्कारानें तिच्याशीं लग्न लावणें हा पैशाच विवाह होय. जेथें स्त्री मिळत नसेल तेथें कोणत्याही उपायानें ती मिळविणें हें साहजिक आहे. पण तेवढ्यामुळें वैवाहिक उत्का-

न्तीची ही पहिली पायरी आहे असें आम्हांस वाटत नाहीं. पुरुषांमध्यें विषयवासना निसर्गसिद्ध आहे, तशी ती स्त्रियांमध्येंही आहे. मग प्रत्येक समाजाला प्रथम पैशाच व नंतर राक्षस विवाहांच्या द्वारांतून पुढें जावें लागलें हें म्हणणें सयुक्तिक दिसत नाहीं. अन्नाकरितां प्राचीन काळीं निरनिराळे समाज भांडत, त्यांच्यांत नेहमीं युद्धें होत, हें निर्विवाद आहे. आपआपसांत लग्नें करण्याची रीत मोडली तेव्हां युद्धामध्यें पकडलेल्या बायकांशीं लग्नें लावण्याची अर्थातच रीत पडली. आमचा तर असा तर्क आहे कीं, युद्धांत पकडलेल्या बायका जेव्हां मिळूं लागल्या तेव्हांच नातेवायिकापैकीं बायका म्हणून घेण्याचें बंद पडलें असावें. तसेंच केवळ स्त्रियांकरितां तरी युद्धें होत नसतील कशावरून ? परंतु अशी कल्पना केली कीं, दोन निरनिराळे समाज सुपीक प्रदेशांत सुखानें राहात आहेत, त्यांना परस्परांशीं तंटे करण्यावें कारण नाहीं; तर ह्या दोन भिन्न समाजांत वैवाहिक संबंध सुखासमाधानानें होण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. तथापि प्राचीन काळीं युद्धाचा व लग्नाचा निकट संबंध होता ह्यांत संदेह नाहीं. आमच्या लग्नांतील कांहीं चाली ह्या संबंधाच्या निदर्शक आहेत. मराठे, कोळी, भंडारी इत्यादि जातींत वराच्या हातांत कट्यार देऊन लग्नें होत असतात. त्याचप्रमाणें लग्नानंतर वर वधूला घेऊन पितृगृहीं येतो तेव्हां गृहप्रवेश करण्याच्या पूर्वी दाराला लावलेल्या केळीच्या तोरणाचा वरानें हातांतील तरवारीनें छेद करण्याचा प्रघात कित्येक जातींत आहे. ब्राह्मणांतही कित्येक ठिकाणीं वरातीच्या वेळीं घोडीची योजना करीत असतात. ह्या सर्व रूढींवरून एकच अनुमान निघतें. खत्री जातींत तर पैशाचविवाहनिदर्शक आचार अद्यापि रूढ आहे. ह्या जातींत लग्नाच्या आदले रात्रीं—दिवसा नव्हे—बुरखा घेऊन वर वधूच्या घरीं जातो. तेथें एका खोलींत वधूची आई व आजोळचीं माणसें जमलेलीं असतात. नवरा मुलगा ह्या खोलीच्या दारावर लाथ मारतो. व मग वधूची आई मुलगी कोणी चोरली म्हणून मोठ्यानें ओरडते. ही पैशाचविवाहद्योतक रूढि ह्या जातींत इतक्या स्पष्टतेनें कशी आली हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

असें असलें तरी त्यामुळें प्रत्येक समाजांत हाच वैवाहिक प्रकार अमलांत होता असें मानण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें दैवविवाहही एका

वेळीं सरसहा प्रचारांत होता असें दिसत नाहीं. पूर्वी नैतिक कल्पनांचा उदय झाला नव्हता. लग्नापूर्वी स्त्रीला मनसोक्त व्यवहार करण्याची आडकाठी नव्हती. मुली बापाला मदत करीत. यामुळें लग्नानें होणारें नुकसान भरून काढण्याकरितां बाप मुलीचे पैसे नवऱ्याकडून घेऊं लागला. ह्यालाच आमचे स्मृतिकार आसुरविवाह म्हणतात. परंतु ज्याला पैसे देण्याचें सामर्थ्य नसेल, तो दुसऱ्याची मुलगी चोरून अगर बलात्कारानेंच आणणार. ह्यावरून राक्षस व पैशाच विवाहाचे प्रकार ह्या आसुरविवाहामुळें उद्भवतात असेंही अनुमान होतें. अर्थात् आसुरविवाहाकडे कारणसंबंध येतो. कारण कार्याच्या आधीं असतें.

रानटी समाजांत ' बळी तो कान पिळी ' ह्या न्यायानें ज्यांच्या अंगांत जबरदस्तीनें बायको मिळवून आणण्याची धमक असेल तेच समाजाचें सातत्य कायम ठेवणार. संततीच्या अभावीं दुर्बळांचा कायमचा ह्या जगांतून नायनाट होत असे. हा नैसर्गिक उत्क्रान्तितत्त्वाचा परिणाम होय. सुधारलेला समाज ह्या सृष्टिनियमांना न जुमानतां आपणच एक प्रतिसृष्टि निर्माण करतो. त्यामुळें विद्यमान समाजांत निःसत्त्वांचीं सुद्धां लग्नें होऊन ते आपल्या निःसत्त्वसंततीनें समाजांत भर घालीत असतात. पूर्वी वराच्या शारीरिक पराक्रमाकडे वधूचें लक्ष असे. पण सांप्रत वर पसंत करण्याची सवलत ज्या समाजांतील वधूंना आहे त्या समाजांतील वधू आपआपल्या स्वभावानुरूप भावी पतींची निवड करतात. हौशी व प्रभुत्वाकांक्षी स्त्रिया धनिकाला वरूं इच्छितात, तर कित्येक भावनावश कुमारी सुकुमार तरुणांना माळ घालतात. केलीसाहेब सांगतात कीं, बुद्धिश्रेष्ठ पुरुष बेअकली स्त्रियांचें पाणिग्रहण करतात व सुजाण स्त्रियांचें नवरेपण ठोंब्या पुरुषांकडे येतें, हा प्रत्यहीं अनुभव येतो. ( 'Human Evolution' by Kelly ). ह्यानुळें ठाम नियम जरी बांधतां आला नाहीं तरी इतकें म्हणतां येईल कीं, आपमतलबी स्त्रिया धनाढ्यांच्या पदरीं जातात. ह्याचा परिणाम असा होतो कीं, बायकांच्या वरपगड्यामुळें ह्या लोकांच्या हातून परोपकाराचीं कृत्यें कमी होतात; व संततीमध्येंही तो अवगुण उतरतो. तसेंच अतिदरिद्र्यांचीं लग्नें त्याच दर्जाच्या माणसांबरोबर होण्याचा विशेष संभव असल्यामुळें सर्व देश कंगालांनीं भरून जातो. आतां श्रीमंतांना संतति फारच कमी होते, तर उलट गरीबांना संततीची केव्हांच उणीव नसते. त्यामुळें

असें होतें कीं, संपत्ति थोड्या लोकांच्या हातांत राहते आणि दरिद्र्यांची संख्या वाढत असते. अर्थात् निर्धन लोकांनींच समाजाचें अखण्डत्व राखलें आहे.

लोकसंख्या वाढून निर्वाहाचीं साधनें दुर्लभ झालीं म्हणजे द्रव्यार्जनसामर्थ्य अंगांत असल्यावांचून लग्न करणें शहाणपणाचें होत नाहीं. अशा समाजस्थितींत लग्नाच्या कामीं पैशाला महत्व फार येतें. निर्धनांना अविवाहित स्थितींतच राहण्याचा प्रसंग येतो, व त्यामुळें कसे अनर्थ उद्भवणें शक्य आहे याची वाचकांना कल्पना करतां येईल. पाश्चात्य समाजांत पुष्कळसे विवाह कामवासनेला व विलासवासनेला बळी पडून घडून येतात. अशा विवाहांपासून झालेली संतति नैतिक गुणांत कमी दर्जाची असते. नमुनेदार समाजांत विवाह हा संस्कार समजला जातो व विवाहाचा उद्देश विषयतृप्ति नसून प्रजोत्पादन हा असतो. अशाकरितां लग्न झालेले स्त्रीपुरुष कौटुंबिक सुख ज्याप्रमाणें आनंदानें भोगतात त्याचप्रमाणें सांसारिक दुःखें सहन करण्यासही तीं आनंदानें तयार असतात. अशा स्त्रीपुरुषांपासून झालेल्या प्रजेचा नंबर सात्त्विक गुणांत वर लागतो. शिक्षणानें ज्यांचीं मनें सुसंस्कृत झालीं आहेत अशा स्त्रीपुरुषांचे विवाह उपरिनिर्दिष्ट उदात्त व सात्त्विक हेतु धरून होत असतील; नाहीं असें नाहीं. पण ते थोडेच असणार, शिवाय श्रीमंतांप्रमाणें शिकलेल्यांतही प्रजोत्पादनसामर्थ्य कमी असल्याचा अनुभव येतो. त्यामुळें दरिद्री आणि मूढ अशा लोकांवरच प्रजावृद्धीचें काम पडतें. प्रो. भाटयानीं गांधर्वविवाहाची प्रशंसा आपल्या व्याख्यानांत केली आहे ती आम्हांस सम्मत नसल्यामुळें, पाश्चात्य समाजांत गांधर्वविवाहाचे कोणते परिणाम घडत आहेत हें थोडें जास्त सविस्तर रीतीनें सांगावें लागलें. याच विषयांवरील केली साहेबाच्या ग्रन्थांतील उतारा खालीं देतों, त्याचें वाचकांनीं अवश्य मनन करावें:—" But the point most to be remembered in connection with this subject is that the social conditions under which we live are such as to render resistance to this particular temptation difficult. For they put obstacles in the way of marriage at the age when marriage is most imperiously demanded by nature: they furnish stimulants, alchoholic or other, which peculiarly inflame the very organs which morality would keep inactive and they put the sexes in the most continual

propinquity; for most of the amusements of a large town are shared by both sexes and stimulate the sexual provocation that it should on the contrary be the special care of intelligently contrived amusement to avoid. Indeed, it would be no exaggeratian to say that every waking hour of a youth's life in populous places, not actually engaged in toil, is occupied in a manner consciously or unconsciously to stimulate the organs which morality requires him to keep in restraint. ('Government or Human Evolution and Justice' by *Edmund Kelly.)*

प्रो. भाटे यांस आमचें एवढेंच सांगणें आहे कीं, हिंदुस्थानांतल्या लोकांना खूष करणाऱ्या एकाद्या माथेफिरूचे वरील उद्गार नाहींत. पाश्चात्य समाज आदर्शभूत धरून त्याच्याशीं आमच्या समाजाची तुलना करून चांगलें वाईट ठरविण्याची पद्धति निसंशय चुकीची आहे. हजारों वर्षांच्या अनुभवानें घालून दिलेले आचार क्षणार्धांत कुचकामाचे ठरविणें शहाणपणाचें नसून धाष्टर्याचें आहे.

वारसाचे हक्क आमच्या धर्मशास्त्रकारांनीं स्त्रियांना दिलेले नाहींत ह्यावरून स्त्रियांची योग्यता आम्ही कमी समजतों, असें प्रो. साहेबांचें म्हणणें आहे. स्त्रियांना पुरुषांप्रमाणें वारसाचा हक्क दिला नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण त्यामुळें स्त्रियांची योग्यता कमी समजली जाते, अगर त्या गुलामाप्रमाणें लेखल्या जातात हें म्हणणें खोटें आहे. स्त्रियांची प्रशंसा आमच्या पुराणग्रंथांत क्वचित् केलेली आहे, हें प्रो. साहेब कबूल करतात. पण मनूचाच आधार देऊन स्त्रियांची परवशता प्रो. भाटे त्याचप्रमाणें त्यांचे सहविचारी सिद्ध करीत असतात. आमच्या मतें मनूचा आशय आमच्या सुधारकांस समजलाच नाहीं, म्हणून मनूचीं वचनें परस्परविरुद्ध आहेत असें ते मानतात. बायकांना वारसा देणें व त्यांची योग्यता ठरविणें हया दोन गोष्टी निरनिराळ्या आहेत. स्वतंत्र मिळकत प्राप्त झाल्यानें आर्थिक स्वातंत्र्य मिळतें. पण त्याचा परिणाम नेहमींच इष्ट होतो असें नाहीं. पाश्चात्य समाजांत ह्या आर्थिक स्वातंत्र्यामुळें घटस्फोटांची संख्या वाढूं लागली. "Changing industrial conditions and a more complex social life brought about a large measure of economic independence for women and easy divorce." (*Gidding's* Principles of Sociology).

मनूनें " न स्त्री स्वातंत्र्यमर्हति " म्हणून म्हटलें आहे तें आर्थिक स्वातंत्र्य होय. पण याचा अर्थ स्त्रियांची योग्यता यामुळें कमी मानली गेली असा कोणीं करूं नये. एवढ्याकरतां " यत्र नार्यस्तु पूज्यते रमन्ते तत्र देवताः " असें त्यानें निराळें स्पष्ट म्हटलें आहे. स्त्रियांनीं स्वतंत्र राहूं नये, पुरुषाच्या आश्रयानें राहावें ही आमच्या कित्येक चालीरीतीची मूलभूतकल्पना आहे व ती अर्वाचीन पाश्चात्य समाजांकडे बोट दाखवून मूर्खपणाची ठरवूं पाहणें गैरशिस्त होय.

प्रो. भाटे यांचें शेवटचें व्याख्यान जातिभेदावर आहे. चातुर्वर्ण्यव्यवस्था नमुनेदार आहे अशी इंग्रेजी शिकलेल्यापैकींही कित्येकांची दृढ भावना आहे. दर्भंग्याचे महाराज चातुर्वर्ण्याच्या पुनरुज्जीवनासाठीं सध्या जारीनें प्रयत्न करीत आहेत. दोन्हीं बाजूंचीं मतें लोकांपुढें येऊन गेलीं आहेत तेव्हां या संबंधानें येथें आम्ही विशेष लिहूं इच्छित नाहीं. प्रो. भाटे म्हणतात, गत्यात्मक समाजाला चातुर्वर्ण्यव्यवस्था विघातक आहे. कदाचित् असेल. पण पूर्ण गतीच्या समाजाला ती हितावह आहे कीं नाहीं ह्याविषयीं प्रोफेसरसाहेबांनीं आपलें मत दिलें नाहीं. खरें पाहिलें असतां, अखेरच्या पायरीवर जाऊन पोंचलेला समाज कसा असतो ह्याचें चित्र प्रो. भाटे यांनीं मुळींच काढलें नाहीं, व हेंच त्यांच्या व्याख्यानांत मोठें वैगुण्य आम्हांस दिसतें. सामाजिक संस्था अशा पाहिजेत कीं, त्यामुळें व्यक्तीच्या 'सर्वांगीण' सुधारणेस व्यत्यय येऊं नये, असें ते वारंवार सांगत असतात. पण तेवढ्यानें काम भागण्यासारखें नाहीं व तें म्हणणें अक्षरशः खरेंही नाहीं. कोणताही समाज अजून पूर्णावस्थेला पोंचला नाहीं व कधीं पोंचेल कीं नाहीं याची शंकाच आहे. निरनिराळ्या समाजांत निरनिराळ्या परिस्थितीप्रमाणें वेगवेगळ्या गुणांची आवश्यकता असते व त्या सद्गुणांना पोषक होतील अशारीतीनें सर्व संस्था बनविण्याकडे समाजसुधारकांचें लक्ष असतें. देशाभिमानाची जेव्हां समाजाला जरूरी असते तेव्हां धैर्य हा मोठा सद्गुण मानला जाऊन लहानपणापासून मुलांमध्यें हा गुण उत्पन्न करण्याचे राष्ट्राचे प्रयत्न असतात. शांततेचा उपभोग घेणाऱ्या समाजांत धैर्य, पराक्रम हे गुण मागें पडून विनयादि दुसऱ्याच गुणांना प्राधान्य मिळतें. आजमितीस तत्वज्ञान्याला कोणी भीक घालणार नाहीं. योद्धे आणि मुत्सद्दी हेच प्रमुख पदावर आरूढ झाले आहेत. तथापि आदर्शभूत समाज सत्वगुणप्रधान

असला पाहिजे ह्याविषयीं कोणाचा मतभेद होण्याचा संभव नाहीं. पण असा समाज चिरकाल नांदण्यास सर्व जग सुधारलें पाहिजे. कारण रजोगुणी समाजाचा वेढा असल्यावर सात्त्विक समाजाचा निभाव कसा लागावा ? नीतिनिष्ठ समाजांत ओजस्वी व तेजीचीं माणसें असल्यामुळें स्वार्थमय गोष्टींस गौणस्थान मिळतें. पाश्चात्य समाज परिणतावस्थेस पोंचले नाहींत. समाजाच्या उत्कर्षामध्येंच अपकर्षाचें बीज असतें. म्हणून एकाच अवस्थेंत समाज बहुकाल राहणें शक्य दिसत नाहीं. आधिभौतिक शास्त्रांतील शोधांनीं संपन्न झालेले समाजही नीतिमान् नसतील तर लयाला जातील. नीतिमत्तेशिवाय कोणताही समाज फार दिवस तगणार नाहीं. सर्व प्राचीन समाजांत हिंदु समाज मात्र अजून जिवंत आहे. ह्याचें कारण स्मृतिकारांनीं घालून दिलेली शिस्त होय. आतां समाज जुनाट झाला, आणि विशेषतः बहुत काल शांततेंत नांदत असला, म्हणजे भिन्नभिन्न जाति स्वभावतःच उत्पन्न होतात. गिडिंग्जसाहेब म्हणतात—"Segregations due to vocation become definite class distinctions. The ruling, the priestly, the literary, the merchant, the artisan and the labouring classes do not become blended as societies grow older. They become more sharply defined. Any social reform that hopes for the interblending of classes is foredoomed to failure." धर्माच्या नांवाखालीं बौद्धांनीं जाति मोडण्याचा प्रयत्न केला तरी जाति कायम राहिल्या. ह्याचें कारण वरील उताऱ्यांत आहे. सध्यां मात्र सुधारकांचे प्रयत्न यशस्वी होण्याचा संभव आहे. कारण नोकरीशिवाय दुसरा धंदाच हल्लीं राहिला नाहीं. जाति निर्माण होण्याचें जें कारण तेंच नष्ट झाल्यावर जातिबंधनें शिथिल होणारच. शिवाय विद्यमान राजकीय परिस्थितिही जातिभेद मोडण्यास फार अनुकूल आहे. आज जातिभेद मोडले तर कांहीं कोणी रडणार नाहीं. कारण जातिभेद कायम ठेवण्यास परिस्थिति अनुकूल नाहीं. पण त्यामुळें वर्णभेद सुधारकांच्या अवकृपेला मात्र पात्र होण्याचें कारण नाहीं. प्लेटोसारख्या त्रयस्थ माणसाला सुद्धां आपल्या मनाजोगा काल्पनिक समाज बनवितांना चातुर्वर्ण्याची कल्पना सुचली, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आमच्या मतें पाश्चात्य समाजांत सुद्धां चालू युद्धासारखीं भेदभावविध्वंसक संकटें शेंपांचशें वर्षें आलीं नसतीं तर कर्मानुसार निरनिराळ्या जाति उत्पन्न झाल्या असत्या ! असो.

प्रो. भाटे यांचा व आमचा मुख्य बाबतींत मतभेद आहे. व्यक्तीची 'सर्वाङ्गीण' सुधारणा व्हावी अशी समाजरचना पाहिजे असें त्यांचें म्हणणें. आमच्या मतें समाजाच्या प्रगतीस व विकासास व्यक्तीचा उन्नति-मार्ग आड येत असेल तर व्यक्तीचें निवारण करण्याचा उपाय समाजानें जरूर योजावा. एकाद्या स्त्रीच्या अंगांत विलायतेंत जाऊन विद्यार्जन करून अक्कलहुषारीनें परत स्वदेशीं येण्याची घमक असली तरी असा सार्वत्रिक प्रचार पडला असतां समाजाचें स्थैर्य ढळेल असें वाटत असल्यास एकाद्या स्त्रीच्या बुद्धिमत्तेची परवा न करतां तिच्या स्वातंत्र्याला आळा घालणें हें समाज आपलें काम समजतो. समाजाच्या व व्यक्तीच्या हितांत विरोध येईल तेथें व्यक्ति-हित कोणी बघत नाहीं. ज्या संस्थांत खाजगी फायदा करून घेण्याकडेच सभासदांचें लक्ष विशेष असतें त्या संस्था अल्पकालांतच डबघाईस येतात, असा आपला दररोजचा अनुभव आहे. हाच नियम समाजालाही लागू आहे. व्यक्तीच्या हिताच्या दृष्टीनें समाजशास्त्राचे नियम बांधणें चुकीचें होईल, अशी आमची दृढभावना आहे. आतां मागें सांगितल्याप्रमाणें समाजाची उन्नति व्यक्तींच्या उन्नतीवर अवलंबून असल्यामुळें समाजाच्या उत्कर्षाला पोषक अशी व्यक्तींची उन्नति शक्य तेवढी करण्याचे मार्ग खुले ठेवणें समाजाचें कर्तव्य आहे. याप्रमाणें आमचा व प्रो. भाटे यांचा मतभेद असला तरी समाजशास्त्र म्हणजे काय याची थोडी बहुत कल्पना मराठी वाचकांस त्यांच्या व्याख्यानामुळें होणार आहे, यास्तव प्रो. भाटे यांचें आम्हीं अभि-नंदनच करतों. तथापि एवढें म्हटल्याशिवाय आमच्यानें राहवत नाहीं कीं, 'सोशल सर्व्हिस लीग'च्या विद्यमानें झालेल्या व्याख्यानांत समाजापेक्षां व्यक्तींचीच तळी उचलून धरणें जरा विसंगत दिसतें.

# २२. नीतिशास्त्रप्रवेश.

## पुस्तकपरीक्षा.

" Morality or moral life may be described as the renunciation of the private or exclusive self and the identification of our life with an ever-wideing sphere of spiritual life beyond us." *Caird's* Philosophy of Religion.

रा. रा. वामन मल्हार जोशी, एम्. ए. यांनीं "नीतिशास्त्रप्रवेश" नांवाचा नीतिविषयावर एक ग्रन्थ लिहून मराठी वाङ्मयाची अवर्णनीय सेवा केली आहे. मराठींत नीतिशास्त्रावर हा पहिलाच ग्रन्थ असल्यामुळें ह्या ग्रन्थाला एक प्रकारची अपूर्वता प्राप्त झाली आहे. विश्वविद्यालयाची उच्च पदवी धारण करणाऱ्या तरुणांना मराठींत शास्त्रीय अगर तात्त्विक ग्रंथ लिहिण्यास उत्साह वाटावा हें मराठी वाङ्मयाच्या भावी ऊर्जितावस्थेचें स्पष्ट द्योतक नाहीं असें कोण म्हणेल ? वामनरावजींसारखे रसज्ञ ग्रन्थकार साध्या पण भारदस्त व काव्यमय भाषेंत तत्त्वग्रंथ लिहूं लागले म्हणजे कट्टया निराशावाद्यांमध्यें सुद्धां आशेचा अंकुर प्रादुर्भूत झाल्याविना राहणार नाहीं. असो.

कार्य कोणतें व अकार्य कोणतें ह्याचा निश्चय करणें हें नीतिशास्त्राचें काम आहे. " तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ " असें म्हणून प्रत्यक्ष भगवंतांनीं सुद्धां जेथें हात टेकले तेथें ह्या कार्याकार्याचें " पंचांग " तयार करण्याचें धाडस कोणीही करणार नाहीं हें उघडच आहे. कोणतें कर्म चांगलें व कोणतें वाईट ह्याविषयीं मोठमोठ्या शहाण्यांस सुद्धां मोह पडतो, असें प्रत्यक्ष गीतेंतच भगवन्तांनीं स्पष्ट सांगितलें आहे. ह्यावरून ह्या विषयाच्या काठिन्याची थोडीबहुत कल्पना वाचकांस करतां येईल.

असें असूनही रा. जोशी यांनीं ह्या विषयांत उत्पन्न होणाऱ्या नानाविध मुद्दयांचें अगदीं सुबोध भाषेंत विवरण केलें आहे. रा. जोशी यांनीं बजावल्याप्रमाणें प्रत्येक कर्म नीतीच्या कक्षेंत येत नाहीं. बुद्धिपुरःसर आपण जीं कर्में करतों त्यांनाच नीतिदृष्ट्या चांगलीं वाईट म्हणतां येईल. बुद्धि हेंच मनुष्याचें विशिष्टत्व आहे. अन्तरिन्द्रियाचे मुख्यतः तीन भाग असून त्यांस मन ( mind ) मेधा ( Intellect ) आणि बुद्धि ( Reason ) ह्या अनुक्रमें संज्ञा आहेत. मनोविकार मनांत जागृत होतात. गणितादि शास्त्रांत पारंगतता मनुष्य मेधेच्या जोरावर प्राप्त करून घेतो. मनाला आपल्या कह्यांत ठेवणें, चांगलें वाईट दाखविणें, हें बुद्धीचें काम आहे. जनावरांत मनाचा विकास पूर्णपणें झालेला असतो, म्हणून मनुष्यांत आणि पशुपक्ष्यांत मनोविकारचें कार्य सारखेंच होतें. मेधा जनावरांत मनानंतर निर्माण झाली आहे, म्हणून पशूंतही तिचें प्रमाण थोडेंबहुत दृग्गोचर होतें. पण बुद्धीचा उदय फक्त माणसांतच झाला आहे. आपणांला बुद्धींद्रिय जर नसतें, आणि पूर्ण विकास पावलेली मेधा ( Intellect ) मात्र परमेश्वरानें दिली असती, तर आपण केवळ राक्षस बनलों असतों. मन, मेधा आणि बुद्धि ह्या तीन अवस्था व त्यांतील भिन्नता ह्या विषयाचा अभ्यास करणारानें कधींहि विसरतां कामा नये. रा. वामनराव ह्यांनीं ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष केल्याचा भास क्वचित् होतो. ( पान २२७ ) मेधेचें कार्य विद्वत्ता आहे. नीतिविषयक प्रश्नांत मेधेला अर्थातच स्थान नाहीं. म्हणून विद्वान् माणसाकडून अनीतिकारक आचार घडल्यास त्यांत आश्चर्य मानण्याचें कांहींच कारण नाहीं. भूगर्भशास्त्री, गणिती, इतिहासकार, नामांकित वकील वगैरे माणसें नीतिमान् असलींच पाहिजेत असा नियम नाहीं. वैद्यक शाळेंत जाणाऱ्या इसमाला तो ज्योतिषी नाहीं म्हणून दोष देण्याचा जसा आपणांस अधिकार नाहीं तसाच हाही प्रकार आहे. सध्यां विद्वत्तेकरितां आपण शाळेंत जातों, नीतिमान् होण्याकरितां जात नाहीं. पुष्कळ अशिक्षित माणसें नीतिमान् असतात, असा आपला अनुभव आहे. तात्पर्य, नीतीचा संबंध फक्त बुद्धीशीं आहे, मनाशीं किंवा मेधेशीं नाहीं, ही गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

मनुष्यस्वभावावरून मनुष्याचें आपण जर वर्गीकरण केलें तर आपणांस असें आढळून येईल कीं, कांहीं माणसें अशीं असतात कीं मनांत जी

गोष्ट येईल ती ते करणार, तिच्या बऱ्यावाईटपणाची कल्पनाच त्यांच्या मनाला शिवत नाहीं. अर्थात् बुद्धीन्द्रियाचा विकास त्यांच्या ठिकाणीं झालेला नसतो. पशूमध्यें व अशा माणसांत फारच थोडें अंतर असतें. म्हणून असले लोक नीतिबाह्य होत. दुसऱ्या वर्गाचे लोक असतात त्यांच्यांत बुद्धीचा विकास झालेला असतो. त्यामुळें अमुक कर्म बरें, अमुक वाईट, असें त्यांची बुद्धि त्यांस सांगत असते. मनोविकार जेव्हां प्रबल असतात, तेव्हां बुद्धीचें चालत नाहीं. मन दुर्बल असलें अथवा बुद्धि विशेष सामर्थ्यवान् असली तर बुद्धि यशस्वी होते. ह्यामुळें मनुष्य कधीं बुद्धितन्त्र तर कधीं मनस्तन्त्र असलेला आढळतो. अशा माणसांत मन आणि बुद्धि ह्यांचा सदा लढा चालत असतो. जयापजय कधीं एका बाजूला तर कधीं दुसऱ्या बाजूला अशी स्थिति असते. तिसऱ्या वर्गांतील माणसांत हा विरोध नष्ट झालेला असतो. म्हणजे मन अमनस्क होतें. बुद्धीचा पूर्ण विजय होतो. बुद्धि ज्या गोष्टीस चांगलें म्हणते तींच गोष्ट मनास करावीशी वाटते. त्यामुळें मन एकीकडे ओढतें व बुद्धि दुसरीकडे ओढते अशी तारंबळ कधींही माणसांची होत नाहीं, अशा स्थितीचें रसभरित वर्णन रा. जोशी यांनीं ३३६।३४२ ह्या पृष्ठांवर केलें आहे.

ह्या सर्व विवेचनावरून नीतीला बुद्धिप्रामाण्य आहे ही गोष्ट निर्विवाद होते. आतां बुद्धीचें आपण कां ऐकावें ? असा प्रश्न कित्येकांनीं उपस्थित केला आहे. पण त्यांत विशेष अर्थ आहे असें म्हणण्यास आम्ही तयार नाहीं. मनाला लगामीं ठेवण्याकरतांच जर परमेश्वरानें बुद्धींन्द्रिय निर्माण केलें तर बुद्धीचें आम्ही ऐकत नाहीं असें कसें म्हणतां येईल ? डोळे पाहण्याकरतां दिले असून डोळ्यांनीं आम्हीं पाहणार नाहीं असें म्हणणें समंजसपणाचें होईल काय ? जें कार्य ज्या इन्द्रियाकडून व्हावयाचें तें कार्य त्या इंद्रियाकडून घेण्याचें नाकारणें हा कोण दुराग्रह ? मनापेक्षां बुद्धि श्रेष्ठ आहे हें कोणासही अमान्य होणें शक्य नाहीं. कारण मनोवासनांवर आपलें प्रभुत्व बुद्धि गाजवूं पाहते. विकासवादाप्रमाणें सुद्धां जें इंद्रिय मागून उद्भूत होतें तें पूर्वीच्या इंन्द्रियापेक्षां श्रेष्ठ असतें. तेव्हां नीतिविषयक प्रामाण्य बुद्धीच्या ठिकाणीं संभवतें. रा. जोशी यांनीं हाच निर्णय दिला आहे. ( पा. २५६ )

पण प्रत्येकाची बुद्धि निराळी. चोराची बुद्धि त्याला चोरी करण्यास सांगते तेव्हां " कासीत्प्रमा " असा कोणीही प्रश्न विचारणारच. ह्याचें उत्तर अखेरीस ज्याची त्याची बुद्धि हेंच दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. असें समजा कीं, एका गांवामध्यें सर्व रामोशी आहेत; दुसऱ्या लोकांशीं त्यांचा कोणत्याही तऱ्हेनें संबंध आला नाहीं; आणि त्या गांवांतील प्रत्येक रामोशाची अशी प्रामाणिक समजूत आहे कीं, चोरी करणें हा आपला धर्म आहे; तर त्याबद्दल त्या रामोशांना पाप लागेल काय? अधिक संस्कृतीच्या लोकांच्या दृष्टीनें तें कृत्य अनीतीचें असेल पण ते रामोशी अनीतीच्या परिणामांनीं कधींही दूषित होणार नाहींत. त्यांच्या ठिकाणीं मनबुद्धीचा कलहच नाहीं. त्याला फार तर तुम्हीं पशु म्हणा. आणि रानटी मनुष्य पशूंहून फारसा भिन्न नसतो. बुद्धीच्या विकासाबरोबर नीतीच्या कल्पनांचाही विकास होतो म्हणून आपआपल्या बुद्धीला अनुसरून निरनिराळ्या युगांतले लोक नीतिनियम ठरवीत असतात. सारांश, बुद्धीबरोबर नीतीची वाढ होते. आतां कांहीं माणसांची बुद्धि निर्णय करण्यास असमर्थ असते. अशावेळीं तीं माणसें आपल्याहून शहाण्या माणसांकडे जाऊन त्या माणसांच्या सल्ल्याप्रमाणें वागत असतात. पण ह्याचा अर्थ इतकाच कीं, निर्णय करण्याच्या कामीं दुसऱ्याचें आपण साह्य घेतों. आपल्याला एकादें उदाहरण सुटत नसेल तर तें जसें आपण दुसऱ्यामाणसाकडून समजून घेतों त्याचप्रमाणें कार्याकार्याविषयीं संदेह उत्पन्न झाला असतां आपण दुसऱ्याचें मत घेतों तें मत आपणांस पटतें म्हणूनच आपण तदनुसार वर्तन ठेवतों. म्हणजे वस्तुतः आपण आपल्या बुद्धीप्रमाणें वागतों असेंच म्हणणें प्राप्त होतें. नीतीच्या कल्पना आपल्याच बुद्धीशिवाय बाहेरून कोणी आपणावर लादीत नाहींत. धर्मशास्त्राप्रमाणें तरी आपण कां वागतों? तर त्यांतील आज्ञा आपल्या बुद्धीला पटतात म्हणून. एखाद्या धर्मसंस्थापकानें चोरी करावी, व्यभिचार करावा, अशा प्रकारच्या आज्ञा शास्त्रांत संविष्ट केल्या तर आपण त्या भारीच मान्य करणार आहों! ज्यांची बुद्धि प्रबल असल्यामुळें स्वनिष्ठ असते ते मुळीं दुसरा काय म्हणतो याची चौकशीच करीत नाहींत. आधुनिक युरोपिअन समाजवादी ह्याच वर्गांतले आहेत. स्थितप्रज्ञांच्या मतांची त्यांना परवा नाहीं. धर्म शुद्ध बेडेपण आहे, विवाहसंबंध केवळ फसवणूक आहे. ('Institution of marriage is a system of fraud.' *DoMocracy*

*and Liberty*)' अशा प्रकारचीं मतें हल्लीं युरोपांत प्रसरण पावत आहेत. सर्व समाज ह्या मताचा झाल्यावर कोण कोणाला अनीतीचा दोष लावणार ? सारांश, नीतीचा सर्व आधार बुद्धीवरच आहे. आतां बुद्धीवर आवरण येऊं न देणें, ती अधिकाधिक सुसंस्कृत करणें, हें आपलें कर्तव्य आहे. इतर इंद्रियांचा दुरुपयोग केला असतां शरीरनाश होतो. म्हणून बुद्धीचा दुरुपयोग करून आत्मप्राप्तीचा प्रयत्न प्रत्येकानें करणें अवश्य आहे. "सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः" ह्या कालीदासोक्तींत फारच उच्चतत्त्व भरलेलें आहे. रा. जोशी यांनीं १४६ पासून १५४ पानांपर्यंत ह्या विषयाचा ऊहापोह केला आहे. मुरहेडसाहेबांनीं ह्यावर असा एक आक्षेप घेतला आहे कीं, सदसद्विवेकबुद्धि स्वतंत्र कल्पिली तर या बुद्धीचे निर्णय आत्म्यास ऐकावयास लावणें म्हणजे त्याला दास्यांत ठेवण्यासारखें आहे. हा आक्षेप अगदींच पोंचट आहे. आधीं आत्मा म्हणजे काय ? परमात्मा कधींच बद्ध नसतो हें खरें. पण जीवात्मा बद्ध आहे, व तो मुक्त होण्याकरतांच बुद्धीन्द्रिय अस्तित्वांत आलें आहे. पशुपक्ष्यांत मुक्त होण्याचा संभव तरी आहे काय ? मनुष्यांमध्यें बुद्धीमुळेंच ही शक्यता उत्पन्न झाली. त्याचप्रमाणें बुद्धि ही कांहीं देवता नाहीं. ती तशी असती तर प्रत्येक माणसाची बुद्धि प्रत्येक कालीं एकच असती. बुद्धि ही कालानुसारिणी अथवा उत्क्रान्त आहे. ह्या बुद्धिद्वारा प्रत्येकानें आपली उन्नति करून घेतली पाहिजे. म्हणूनच आम्हीं मागें म्हटलें आहे कीं, जोंपर्यंत आपण मनाचें न ऐकतां बुद्धीचें ऐकत आहों तोंपर्यंत त्या कृत्याचा दोष आपणांस लागणार नाहीं. रा. वामनराव जोशी यांचें ह्या बाबतींत जरा अस्पष्ट विवेचन झालें आहे, अशी आम्हांस शंका येते.

बुद्धिपुरःसर आपण अन्याय केला नसला तर आपणांस त्याचा दोष लागत नाहीं, हें मागें सांगितलेंच आहे. व हाच सृष्टिनियमांत व नीतिनियमांत मोठा फरक आहे, असें हक्स्ले साहेबांनीं जें म्हटलें आहे तें बरोबर आहे. विस्तवावर चुकून पाय ठेविला तरी तो भाजणारच. पण अज्ञानतः आपल्याकडून पापाचरण झालें तर आपणांस पाप लागणार नाहीं.

आपली बुद्धिच जर उत्क्रान्तीचें कार्य आहे व बुद्धीपासून नीतिकल्पनांचा उगम आहे, तर नीतिनियम हे नित्य, त्रिकालाबाधित व स्वतःसिद्ध आहेत हें कँटचें म्हणणें आक्षेपार्ह वाटतें. व्यवहारापलीकडची नीति आहे असें कँट

म्हणतो. पण व्यवहाराच्या बाहेर नीतीस जागा कोठें आहे ? नीति आणि अनीति ह्या कल्पनाच मुळीं व्यवहारांतल्या आहेत. देवाला नीतिमान् हें विशेषण लावलेलें आम्हांला तरी माहीत नाहीं. नीतिनियम त्रिकालाबाधित असते तर नीतिकल्पनांची वाढ हा शब्दप्रयोगच अस्तित्वांत आला नसता. पण नीतिकल्पनांची वाढ होत आहे ही गोष्ट बऱ्याच लोकांना संमत आहे. यज्ञांतील पशुहत्या, ख्रिस्तीधर्मांतील मदिरापान, महंमदाचें बहुभार्यात्व, व वेदांतील नियोग ( कोवांशपुत्राविधवेव देवरंमर्यं न योषा कृणु ते सधःस्थः आ. ऋ. ) या हल्लीं मानल्या जाणाऱ्या अनाचारांपासून आपण किती तरी पुढें सरसावलों आहों; असें कित्येकांचें मत आहे. यज्ञांतील पशुहत्या बंद झाली; ख्रिस्ती लोक दारूच्या ऐवजीं धर्मविधींत पाणी पिऊं लागले; एकभार्यात्वाकडे जनसमूहाचा कल निःसंशय होत चालला आहे. या सर्व गोष्टींवरून बुद्धींद्रियाची जशी वाढ होत चालली त्याप्रमाणें नीतिकल्पनाही बदलत चालल्या आहेत, हें उघड दिसून येतें. ही सर्व गोष्ट जरी संतोषदायक असली तरी नीतिदृष्ट्या आमची प्रगति विशेष झाली आहे असें म्हणण्यास कारण दिसत नाहीं. समाजाच्या बाल्यावस्थेंत कायद्यांचा अभाव असल्यामुळें नीतिबंधनांच्याच योगानें समाज सुस्थितींत राहणें शक्य असतें. राजाज्ञा आणि नीतिबंधनें यांच्या अभावीं समाज अल्पकाळही टिकणें संभवनीय दिसत नाहीं. आमच्या समजुतीनें हल्लींचे समाज नीतिबंधनांचे ऐवजीं केवळ कायद्यांच्या बंधनांनींच जीव धरून राहिले आहेत. ज्या समाजांत कायद्यांचा पूर होतो त्या समाजांत नीतिबंधनांची शिथिलता झाली आहे, असें अनुमान करण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं. मोलेंसाहेबांनीं आपल्या रूसोच्या चरित्रांत एका प्रवाशाच्या ग्रंथांतील उतारा घेतला आहे, तो आमच्या विधानास पोषक असल्यामुळें यापुढें देतोः— " I have lived with communities of Savages in South America and in the East who have no laws or law-courts but the public opinion of the village freely expressed Each man scrupulously respects the rights of his fellows and any infraction of those rights rarely or never takes place...Now although we have progressed vastly beyond the savage state in intellectual achievements, we have not advanced equally in morals. "

आधुनिक समाज अद्यापिही नीतिदृष्ट्या मागतलेलेच आहेत; मात्र हिंदुसमाजानें ह्या बाबतींत इतर सर्व समाजांच्या पुढें मजल मारली आहे. पाश्चात्य समाजांत मांसभक्षण हें निंद्य मानलें जात नाहीं. पण आमच्या इकडे अहिंसातत्त्व ब्राह्मणसमाजानें शेंकडो वर्षांपासून अमलांत आणलें आहे. स्वप्नांत केलेल्या कृत्यांचा दोष तीं बुद्धिपुरःसर न केल्यामुळें कर्त्याला लागत नाहीं असें पाश्चात्य पंडित प्रतिपादितात, पण आमच्या आर्यावर्तांत हजारों वर्षांपूर्वीच स्वप्नांतील कृत्यें हीं मनःप्रेरित असल्यामुळें पापपुण्यकारक होतात असा निर्णय विद्वानांनीं दिला आहे. स्वप्नांत दिलेलें दान जागृतावस्थेंतही आपणांस बंधनकारक आहे असें मानणारा व तदनुसार आचरण करणारा प्राणी ह्या आर्यभूवांचून इतरत्र आढळणें प्रायः अशक्यच. नाना फडणिसांची अशी आख्यायिका आहे कीं, सवाई माधवराव बुद्धिबळें खेळत असतां त्यांनीं डावाविषयीं पैज मारली. नाना जवळच होते. डाव हरला. नानांनीं लगेच रुप्याच्या ताटांत मोत्यांचा तुरा आणून समोरच्या खेळगड्याच्या स्वाधीन केला. पेशवे अल्पवयी होते, व खेळाच्या भरांत थट्टेनें त्यांनीं पैज मारली. तथापि असली उडवा उडवीची सबब पुढें न करतां नानांनीं पेशव्यांचा शब्द पुरा केला. पाश्चात्य देशांत युद्धविषयक नीतिकल्पना आतां कोठें उदय पावताहेत. पण आमच्याइकडे भारतकालीं सुद्धां ह्या कल्पना नुसत्या उदयच पावल्या नव्हत्या, तर दृढमूल झाल्या होत्या.

असो. बुद्धि हें नीतीन्द्रिय आहे म्हणून आपणांस बुद्धीचें ऐकणें भाग आहे, ही कल्पना ज्यांस मान्य नसेल त्यांस आत्म्याचें अमरत्व—अर्थात् पूर्व व पुनर्जन्म हीं मान्य केल्याशिवाय नीतिबंधनें मान्य होणें संभवनीय नाहीं. शरीराच्या नाशाबरोबर आत्मनाश होत असेल तर मीं स्वहित साधण्याचें सोडून परहित कां साधावें याचें उत्तर कोणालाही देतां येणार नाहीं. कायद्यांत सापडूं नये, लोकांत बेअब्रू होऊं नये इतकी खबरदारी घेतल्यावर वाटेल तें निंद्य कृत्य करण्यास मला कांहींच प्रत्यवाय राहात नाहीं. आत्मा अमर आहे, जीवात्मा पाशबद्ध आहे, बुद्धिद्वारा त्याला हळूहळू पाशमुक्त केला पाहिजे अशी ज्याची समजूत पटेल तोच नैतिक आचरण करण्यास प्रवृत्त होईल.

मन आणि बुद्धि यांमध्यें कलह अथवा विरोध उत्पन्न झाला असतां बुद्धीच्या आज्ञा न जुमानतां आपण मनसोक्त कर्म केलें तर तें अनीतीचें,

व मनाचें कांहीं एक चालूं न देतां बुद्धीच्या आज्ञा आपण पाळल्या तर तें नीतीचें आचरण होय, असा सिद्धांत सामान्यपणें करण्यास कांहीं हरकत नाहीं, परंतु सर्वच कर्में मनःप्रेरित नसतात ही गोष्ट ध्यानांत ठेवणें अवश्य आहे. अर्वाचीन शोधांना अनुसरून रा. जोशी आपणांस असें सांगतात कीं ( पा. १०३ ), सहज स्फूर्तीनें कर्में घडून येतात त्यावेळेस ज्ञानतंतूंची तार मेंदूकडे जातच नाहीं, तर पृष्ठवंशाकडे ती जाते. तात्पर्य, संवयीनें आंगवळणीं पडलेल्या व स्पष्ट विचाराशिवाय हातून घडणाऱ्या गोष्टी पृष्ठवंशांतून मिळालेल्या प्रेरणेनें होतात. आमच्या मतें हें जर खरें असेल तर सहज स्फूर्तीनें झालेल्या गोष्टी या नीतीच्या कक्षेंत पडतच नाहींत; म्हणून अनुकंपा, प्रेमळपणा इत्यादि गोष्टींचा नीतीशीं संबंध लावणें युक्त दिसत नाहीं. कामप्रेरणा ही सहजवृत्ति आहे, असें खुद्द रा. जोशी यांचेंही म्हणणें आहे ( पा. ९८ ). मनुष्याची नीतिमत्ता त्याच्या मूळ स्वभावावर बऱ्याच अंशांनीं अवलंबून असते, आणि हा प्रकृतिस्वभाव तर नीतिशास्त्राध्ययनानें बदलणें कठीण आहे ( पान ६१ व ४४२ ). संवयीनें व विचारानें प्रकृतीचें नियमन करणें एवढेंच आपल्या आधीन आहे; व त्यामुळेंच नीतिशिक्षणाला अत्यंत महत्त्व येतें. या शिक्षणाचा किंवा नियामक प्रयत्नांचा विशेष उपयोग इहजन्मीं झाला नाहीं तर पुढल्या जन्मीं त्याचा स्पष्ट परिणाम दिसून येतो. इहजन्मीं जी गोष्ट संपादण्याकरितां आपण प्रयत्न करीत असतों ते प्रयत्न उत्कट असल्यास ती गोष्ट पुनर्जन्मीं सिद्ध होते, व त्या प्रयत्नांचें सहज स्फूर्तींत ( Instinct ) रूपांतर होतें. रा. जोशी यांनीं बालपक्वतेचीं उदाहरणें आपल्या ग्रंथांत दिलीं आहेत त्यांवरून वरील विधानांचें प्रामाण्य बरेंच सिद्ध होतें. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका सत्रा वर्षांच्या बंगाली मुलाचे रसायनशास्त्रांतील शोध हीच गोष्ट सिद्ध करतात. पूर्वजन्म मानल्याशिवाय असल्या अलोट बुद्धीची उपपत्ति नीट लागत नाहीं. बालपरिपक्वतेचीं आणखी पुष्कळ उदाहरणें देतां येतील. टॅसो हा दहाव्या वर्षींच कविता करूं लागला; डॅन्टेनें तर आपल्या वयाच्या नवव्या वर्षींच उत्कृष्ट सॉनेट रचिलें; हारवर्ड विश्वविद्यालयांतील वुल्यम जेम्स नांवाच्या १० वर्षांच्या मुलानें आपल्या चतुर्थपरिमाणसिद्धांतांनीं मोठमोठ्या प्रोफेसरांसही थक्क करून सोडलें; क्लॉड जोसेफ हा चार वर्षांचा असतांच उत्कृष्ट चित्रें काढी. आपल्याकडे ज्ञानेश्वराचें उदाहरण प्रसिद्धच

आहे. तात्पर्य, पूर्वजन्म, पुनर्जन्म, परमेश्वराचें अस्तित्व, इत्यादि प्रकारांनीं अध्यात्मांत शिरल्याशिवाय नीतीला थारा नाहीं, हें रा. जोशी यांचें म्हणणें खरें आहे ( पा. १८८ )

नीति परिस्थितिनिर्मित आहे, परिस्थितीशीं तोंड देण्यास जीं तत्त्वें उपयोगी पडतात तीं उत्तम असेंच रा. वामनरावजींचें मत दिसतें. कालस्थल यांनीं अबाधित अशीं नीतितत्त्वें सांगतां येतील कीं नाहीं, याची शंकाच आहे. कदाचित् सांगतां आलीं तरी तीं फारच थोडीं; व व्यवहारांत त्यांचा उपयोग थोडाच. चोरी करूं नये, व्यभिचार करूं नये, असत्य बोलूं नये, ह्या पलीकडे किती सामान्य तत्त्वें सांगतां येतील ? शिवाय ह्या तत्त्वांना सुद्धां असंख्य अपवाद. चोरी करावी असें मला वाटतें, पण इतरांना तसें वाटत नाहीं, म्हणून चोरी न करणें हा सर्वमान्य नीतिसिद्धांत होऊं शकतो, असें कित्येकाचें म्हणणें आहे. नीतिशास्त्रांतील अत्यन्त महत्वाचा प्रश्न म्हणजे, मुख्य नैतिकतत्त्वाच्या संपादनार्थ आनुषंगिक अपकृत्य करावें लागलें तर तें अक्षम्य अथवा अनीतीचें होतें कीं नाहीं ? रा. बळवंतराव टिळक यांनीं गीतारहस्यांत, लोकांच्या सोईकरितां ट्रामवे लौकर व्हावी परंतु अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळें इष्ट हेतु साध्य होईना—तेव्हां ट्रामवेच्या व्यवस्थापकानें अधिकाऱ्यांस लांच देऊन मंजुरी लौकर मिळविल्याचें एक उदाहरण दिलें आहे. यांत लोकांची सोय झाली खरी, परंतु लांच देण्याचें कृत्य अनीतिकारक होतें किंवा नाहीं हा या गोष्टींतील मुख्य मुद्दा असून, रा. टिळक यांनीं हें कृत्य अनीतिकारक आहे असाच आपला अभिप्राय दिला आहे. रा. जोशी यांनीं सुद्धां रहस्यांतील हा उतारा आपल्या ग्रंथांत घेतला आहे. त्यांचें स्वतःचें मत स्पष्ट दिलेलें आढळत नाहीं. परंतु पृष्ठें ७८: ७९: ८०: यांमध्यें त्यांनीं केलेल्या विवेचनावरून रा. टिळकांहून त्यांचा अभिप्राय भिन्न असण्याचा संभव आहे. आमचें स्वतःचें मत असें आहे कीं, हें लांच देण्याचें कृत्य अनीतिकारक होत नाहीं. नीति आणि अनीति हे शब्द बुद्धीला लागतात, नुसत्या कर्माला लागत नाहींत, ही गोष्ट सर्वांस मान्यच आहे. तेव्हां आतां या लांच देणाऱ्या ट्रामवे व्यवस्थापकाच्या अंतरिंद्रियाचें पृथक्करण करणें अवश्य आहे. परंतु पृथक्करण करूनही लांच देण्याचा त्याचा हेतु अगर मानस होता असें मानण्यास जागा नाहीं. मनानें

अगर बुद्धीनें लांच देण्याची गोष्ट त्याला संमत नसतांना केवळ नाइलाजास्तव महत्कार्य साधण्याच्या प्रबळ इच्छेमुळें लांच देणें जर भाग पडलें, तर त्याचें हें कृत्य अनीतिमूलक आहे असें म्हणण्यास आम्हीं तरी निदान तयार नाहीं. स्वतःला पुष्कळ फायदा मिळावा या वासनेनेंच त्यानें लांच दिला असता तर तो या दोषास पात्र झाला असता. त्यानें लांच दिला नसता तर मात्र मूर्खत्वाचा आरोप त्याच्यावर कोणासही करतां आला असता. आपलें मन किंवा बुद्धि निंद्याचरण करण्याच्या विरुद्ध असूनही जेथें आपणांस अशा प्रकारचें आचरण करणें भाग पडतें तेथें अनीतीचा दोष लागतच नाहीं. इतरांनीं जबरदस्तीनें आपलेकडून अपकृत्य करविण्यासारखाच हा प्रकार आहे. स्पेन्सरनें म्हटल्याप्रमाणें स्तुत्य हेतूनें स्तुत्य कृत्य करण्यास जेव्हां आपण प्रवृत्त होतों तेव्हां तत्सिद्ध्यर्थ अनुरूप साधनांचा अवलंब जर आपण केला नाहीं तर आपले सत्य हेतु मनांतल्या मनांतच जिरतील. रा. जोशी यांनीं यासंबंधानें केलेलें विवेचन अपुरें, अस्पष्ट व थोडेसें दोषास्पद आहे असें आम्हांस वाटतें. (पृ० १०६, १०७). भारतामध्यें कृष्णांनीं ज्याला अनीतीचे प्रकार म्हणतां येतील अशा अनेक गोष्टी केल्याचें सर्वांस माहितच आहे. श्रीकृष्णाचें मन असल्या या बेगडी भेकड नीतीच्या बागुलबुवानें कधींच त्रस्त झालें नाहीं. तात्पर्य, मुख्य नियम असा दिसतो कीं, प्रधान सद्धेतु सफळ होण्याकरितां करावे लागणारे अनाचार हे अनाचारच नव्हत. संत घरीं आल्यावर त्यांना भोजन घालून त्यांचा संतोष साधण्याकरितां प्रत्यक्ष संतांनीं चौर्यकर्म केल्याच्या कथा 'भक्तिविजय' आणि 'संतलीलामृत' या ग्रंथांत वर्णिलेल्या आहेत. फार काय पण संतांनीं वचनभंगाचा दोष न लागावा म्हणून स्वस्त्रीलाही परपुरुषसमागमाची अनुमति दिल्याचीं उदाहरणें आहेत. युद्ध चालू असतां शत्रूकडील अत्यंत महत्त्वाची बातमी काढण्याकरितां स्त्रियांनीं पातिव्रत्यभंग केल्याचीं उदाहरणें दुर्मिळ नाहींत. "जोडे धर्म बरा जरि अनृतहि बोलोनि धर्म जोडावा ॥" असें जें मोरोपंतांनीं म्हटलें आहे त्याचाहि हाच आशय आहे. सत्यपालनापेक्षां धर्मपालन हें अधिक श्रेयस्कर. ह्याचाच अर्थ असा कीं, सत्यभाषण हें जेथें साध्य असेल तेथें असत्य बोलण्याचा दोष लागेल. परंतु तें जर साधन असेल तर असत्य भाषण दोषास्पद होणार नाहीं.

वरील सिद्धान्ताला लागूनच दुसरा असा प्रश्न उद्भवतो कीं, अन्यायाचें निरसन अन्यायानें करण्यांत कांहीं दोष आहे काय? अथवा याहीपेक्षां अधिक व्यापक भाषेंत बोलावयाचें म्हणजे, अन्यायमूलक, अन्यायप्रचुर परिस्थितींत न्यायानें नीतीनें, वागणें शक्य आहे काय? "सेतूंस्तर दुस्तरान् अक्रोधेन क्रोधं सत्येनानृतं" अशी सामवेदांत ऋचा आहे. क्रोधाचा परिहार अक्रोधानें करावा; अनृताचा सत्यानें करावा. परंतु ह्यानें आत्मोन्नति अथवा समाजहित साधेल असा नियम आहे काय? आमच्या मतें प्रतिकूल स्थितींत जसा वृक्ष जगत नाहीं, जनावर टिकत नाहीं, त्याप्रमाणेंच नीतिमान् माणूस दुष्ट लोकांत अगर समाजांत तग धरून राहील हें संभवनीय नाहीं. स्पेन्सरचाही हाच अभिप्राय आहे. " An absolutely just or perfect person could not live or act according to his nature in a tribe of cannidals. Ideal conduct suoh as ethical theory is not possible for the ideal man in the midst of men otherwise constituted. " लांच खाणारे सर्वच अधिकारी असले तर लांच न देणाऱ्या माणसांचा निभाव कसा लागणार? आगगाडीनें प्रवास करणारे लोक अशाच मार्गाचा अवलंब करून आपली सोय करून घेत नाहींत काय? नाहीं तर त्यांची दाद कशी लागावी? गेल्या मे महिन्यांत आगबोटीनें प्रवास करतांना आमच्या निदर्शनास अशीच एक गोष्ट आली आहे. न्यायाची, कायद्याची परवा करणारे लोक मागें राहतात. विरुद्धाचरण करणारे कार्य साधतात. हकस्लेनें म्हटल्याप्रमाणें " The wicked flourisheth like a green baytree while the righteous begs his bread. " बरें, कार्यभाग नाहीं तर नाहीं पण तुमच्या गुणांचें चीज तरी कोण करणार? दुष्ट लोक नीतिमान् माणसाच्या वर्तनाचा विपरीत अर्थ करतात; त्याचा सर्वत्र उपहासच होत असतो. भारतांत म्हटल्याप्रमाणें " मृदुं वै मन्यते पापो भाषमाणमशक्तिकम् ॥ " सौजन्यावर बेवकूबपणाचा शिक्का लोक मारणारच. शिवाय अनीतिमान् माणसांची इच्छा नेहमींच दुसऱ्यांनीं नीतीनें वागावें अशी असते. कारण त्यामुळें त्यांच्या अनीतीला चांगली वाव मिळते. अनीतिमान् माणसांशीं आपण नीतीनें वागलों तर परिस्थितीशीं आपण तोंड कसें देणार? " तेव्हां गेला होता कोठें राधासुता तुझा धर्म? "—अशाच भाषेंत उत्तर देण्याची आपली तयारी पाहिजे. नीति हें शास्त्र आहे. तें उच्च दर्जाचें

आहे, हेंही खरें. पण तेंही इतर शास्त्रांनीं नियन्त्रित आहेच. रस्त्यांतून मोटार रिकामी चालली आहे. मी पायानें उन्हांतून चालत आहें. मला मोटारवाल्यानें आपल्या मोटारींत घेऊन कां जाऊं नये ? त्याचें नुकसान नाहीं. माझ्या शक्तीचा व्यर्थ व्यय होत होता तो वांचला. माझ्यावर उपकार झाले. पर्यायानें जगावर उपकार झाले. माझ्या ह्या संचित शक्तीचा उपयोग जनहिताकडे होणार; आणि जनहितामध्यें मोटारवाल्याचें सुद्धां हित अर्थात् आलेंच. पण हा सिद्धांत कोणाला कधीं मान्य होईल काय ? मिळकतीवरील हक्क, स्वातंत्र्य, इत्यादि गोष्टींनीं उपरि निर्दिष्ट नीतितत्त्व आचारांत आणतां येत नाहीं.

स्पेन्सरनें म्हटल्याप्रमाणें 'Ethics is a science dealing with the conduct of associated human beings.' परमेश्वरानें ह्या पृथ्वीवर एकाच माणसाला निर्माण केलें असतें तर नीतीचा प्रश्नच उत्पन्न झाला नसता. अशा माणसाला मन तरी असतें कीं नाहीं, ह्याची आम्हांला शंकाच आहे. पण पशु पक्षी, इतर प्राणी, वनस्पति, ह्यांसहित मनुष्य ह्या पृथ्वीतलावर वास करीत आहे. स्वविषयक, समाजविषयक अथवा देशविषयक, इतर प्राणिविषयक, अशा नानाप्रकारच्या कर्तव्यांनीं मनुष्य बद्ध झालेला आहे. स्वहित व देशहित अशा दोन हितांचा विरोध आला असतां स्वहिताचा यज्ञ करून देशहित साधणें हें नैतिक कर्म होय. अशा नैतिक कर्मांचें पुण्य संपादणारीं माणसें आमच्या इकडे हातावर मोजण्याइतकींही नाहींत. इंग्लिश लोकांत ह्याच्या अगदीं उलट प्रकार आढळेल. क्लाइव्हनें बनावट कागद तयार केला खरा, पण हें पापकर्म त्यानें आपल्या लोकांकरतां केलें; स्वतःकरतां नव्हे. हिंदुस्थानांतल्या तेहतीस कोटी लोकांत एक तरी क्लाइव्ह निघण्याचा संभव आहे काय ? नानाविध कर्तव्यांमुळें कार्याकार्यनिर्णय करणें कठीण पडतें. पित्राज्ञेचा भङ्ग व मातृहत्या ह्यांपैकीं काय पतकरावें ? द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर देण्यास भीष्मांना अशाच कारणामुळें कठीण पडलें. भिन्न परिस्थितींत भिन्न भिन्न कर्तव्याला महत्व येतें. म्हणून एका विशिष्ट परिस्थितींतल्या माणसानें दुसऱ्या परिस्थितींतल्या माणसास त्याच्या कृत्याबद्दल दोष देतांना पुष्कळ विचार करणें जरूर आहे. रा. जोशी यांचें एतद्विषयक विवेचन निर्दोष आहे. ( पा. २७४ ). स्वहित आणि परहित ह्या द्वंद्वाशिवाय स्वतःचेंच पण तात्कालिक सुख व भावी सुख हें द्वंद्व मनु-

ष्याला पीडा देत असतें. अशा वेळींही तात्कालिक सुखाला लाथ मारून भावी सुखार्थ जो झटतो तो खरा महात्मा होय. सर्वांत श्रेष्ठ मनुष्य म्हटला म्हणजे पशुपक्ष्यांसही जो पीडा देत नाहीं तो. पशुपक्ष्यांसंबंधानें जर आपलें कांहीं कर्तव्य असेल तरच मांसभक्षण अनैतिक म्हणतां येईल. अनैतिक कर्मांत नंबर लावणें सोपें नाहीं. ज्या कृत्याचे परिणाम अधिक वाईट तें कृत्य अधिक निंद्य मानलें जातें. ह्या नियमानुसार कोणत्याही देशच्या लोकांनीं आपल्या देशास बुडविण्याचा प्रयत्न करणें अत्यंत निंद्य समजलें पाहिजे. त्याच्या खालोखाल परस्त्रीसंग, त्याच्यानंतर परद्रव्यहरण, ह्याप्रमाणें ह्या सोपानाची उभारणी करतां येईल. दारू पिण्यानें पिणाराची व त्याच्या कुटुंबाची साक्षात् हानि होते; देशाचें अप्रत्यक्ष नुकसान होतें. सर्वच लोक दारूबाज झाले तर देश बुडेल ही गोष्ट खरी; पण एकादुसरा मनुष्य दारूबाज निघून त्यापासून देशाचें दिसण्यांत येण्यासारखें अहित होत नाहीं. सामान्यतः कामक्रोधादि पशुसमान मनोविकार हे बुद्धितंत्र नसतील तेव्हां तत्प्रेरित कर्में अत्यन्त नीच दर्जाचीं होत ह्यांत संदेह नाहीं. पण त्या अपकृत्यांचा परिणाम समाजावर होत नसेल तर नीतिदृष्ट्या त्यांस फारसें महत्त्व नाहीं. ह्या माणसांची उपयुक्तता समाजाला नाहीं इतकेंच पण त्यांच्यापासून समाजाची प्रत्यक्ष हानि तरी होत नाहीं. उदाहरणार्थ, लोभी मनुष्य द्रव्यसंचय करील; म्हणजे तो आवश्यक कामींही खर्च करणार नाहीं. पण हा वैयक्तिक दोष आहे. असत्य भाषण हें कधींच साध्य नसतें. खोटें बोलण्याकरतांच कोणी खोटें बोलत नाहीं. असत्य भाषणानें दुसरा हेतु साध्य करून घ्यावयाचा असतो. अनैतिक कर्मांच्या पायऱ्या वर खालीं तुम्ही कशाही लावा. अखेरीस आपल्या स्वतःच्या बुद्धीचाच आश्रय करणें भाग आहे. म्हणून हें इंद्रिय मलिन होणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे. इतर इंद्रियांत व बुद्धींत फरक हा आहे कीं इतर इंद्रियांना फाजील शीण दिल्यास ती क्षीण होतात. बुद्धीचें तसें नाहीं. उपयोगानें ती अधिकाधिक तेजस्वी बनते. सत्संगति, सदाचार हीं बुद्धिशुद्धीचीं साधनें आहेत. बुद्धि जर संस्कृत करण्याचा प्रयत्न आपण केला नाहीं, आणि मेघा मात्र विकसित, तीव्र केली, तर त्याचे अनिष्ट परिणाम घडून येतात. मनुष्य राजसवृत्तीचा होतो. त्याची सात्त्विक वृत्ति नष्ट होते. तो डायोनीसिअस बनतो. ह्या जुलमी राजानें एकदां एका प्रसिद्ध गव-

याचें गाणें ऐकलें. राजेसाहेब खुष झाले व गवयास बक्षिस देण्याचें त्यांनीं जाहीर केलें. दुसरे दिवशीं तो गरीब बिचारा गवई मोठ्या उत्सुकतेनें राजाकडे बक्षिस मागण्याकरितां गेला. तेव्हां राजानें उत्तर दिलें, 'तूं काल मला गाण्यानें आनंदित केलेंस; व उलट, मीं तुला आशा उत्पन्न करून आनंदविलें. झालें. तुझ्या श्रमाचा मोबदला तुला मिळाला. आतां कांहीं तुला जास्त देण्याचें कारण नाहीं.' हल्लींच्या शिक्षणानें मनुष्यें डायोनीसिअस बनतात.

नीतिशास्त्र व्यापक, अतएव त्यावांचून तर पदोपदीं नडतें. असें असूनही सर्वांस सुलभ रीतीनें समजेल असा 'साइन बोर्ड' तयार करणें अत्यंत दुर्घट. तेव्हां ह्या विषयावर लिहावें तितकें थोडेंच. रा. जोशी यांनीं ४४७ पानें लिहूनही आपल्या ग्रंथास "नीतिशास्त्रप्रवेश" असेंच नांव दिलें आहे. अर्थातच ग्रन्थ पुरा झाला अशी त्यांची समजूत नाहीं. रा. जोशी यांनीं आपणांस नीतिशास्त्रवाटिकेच्या गेटाच्या आंत नेऊन सोडलें आहे. पुढें लवकरच ते आपणांस उद्यानगर्भात नेऊन सोडतील, व नंतर तेथील उत्कृष्ट वृक्षांचीं परिपक्व फलें चाखण्यास देतील, अशी आपण अपेक्षा करणें न्याय्यच आहे. रा. जोशी हे असा ग्रन्थ लिहिण्यास सर्वस्वीं अधिकारी पुरुष आहेत. विषयाचें पूर्ण अध्ययन, तीव्र चिकित्सक बुद्धि, समतोल मनानें विवेचन करण्याची हातोटी, भाषेचें गांभीर्य व स्पष्टता, इत्यादि गुणांमुळें त्यांचे ग्रन्थ मराठी भाषेंत उच्च दरजाचे झाल्याशिवाय राहणार नाहींत. आपल्या ग्रन्थाचें नीतिशास्त्रप्रवेश असें नामकरण करून रा. जोशी यांनीं आपल्या भावी आक्षेपकांना निःशस्त्र केलें आहे. प्रवेशग्रन्थ म्हटल्यावर विषयाची मांडणी अधिक व्यवस्थित पाहिजे होती असा दोषारोप करण्यास अवकाशच राहात नाहीं. खंडलेखनाचे दोष ह्या ग्रन्थांत आढळून येतात. पण सर्वांत मोठा दोष म्हणजे, आत्मशब्दाचा त्यांनीं केलेला दुरुपयोग, हा होय. वेदान्ताची परिभाषा न वापरतां वेदान्ताचे सिद्धान्त मण्डनार्थ किंवा खण्डणार्थ पुढें आणणें हें न्याय्य नव्हे. उदाहरण, २०७ पृष्ठावर इन्द्रियांना अगोचर अशा ज्या व्यापक आत्म्याचें त्यांनीं वर्णन केलें आहे तो सिद्ध योग्याचा आत्मा होय, परमात्मा नव्हे. ज्ञानप्रियता, सुखाभिलाष, प्रेम, रसोपभोगलालसा, हीं आत्म्याचीं अंगें म्हणणें शास्त्रीय आहे काय? (पा. २२४) "इन्द्रियें एकपट प्रबल तर आत्मा दसपट प्रबल" (२२५). येथें

मो. ग. पं. पाठक

आत्मा म्हणजे मन, बुद्धि, विचारशक्ति असांत्र अर्थ घ्यावा लागतो. " आत्म्याचा जो पूर्ण मालक झाला आहे–"( २३८ ) आत्म्याचा मालक दुसरा कोण ?

आत्म शब्दाप्रमाणें ' ज्ञान ' शब्दही रा. जोशी यांनीं मनसोक्त रीतीनें वापरला आहे. " प्रवृत्ति जर सृष्टीला इष्ट नसती तर मनुष्याला ज्ञानतन्तु देऊन ती स्वस्थ बसली असती. परंतु ज्ञान झाल्यावर या ज्ञानाचा उपयोग व्हावा म्हणून तिनें प्रवृत्तितन्तु, स्नायु वगैरे दिले आहेत. " ( ४२७ ). अशा युक्तिवादानें वेदान्त्यांना रा. जोशी आडवूं पाहतात. पण तें योग्य नव्हे. वेदान्तमतांनीं त्यांचें समाधान झालें नाहीं हें उघड दिसतच आहे; व तर्काचें प्रतिष्ठान घेऊन निभ्रांतचित्त होणें शक्यही नाहीं. पण परा व अपरा विद्येचा असा गोंधळ रा. जोशी यांनीं कां करावा समजत नाहीं. ब्रह्मज्ञान, आत्मसाक्षात्कार झाल्यावर फक्त संन्याशांना कर्म करण्याचें प्रयोजन राहत नाहीं,एवढेंच अद्वैताचें म्हणणें आहे.कर्मयोगी होण्याला संन्याशांना शिव्याशाप देण्याची जरूरी नाहीं. गृहस्थाश्रमांत राहून आत्मज्ञान होतच नाहीं असें कोणीं म्हटलें आहे ? ह्या आश्रमांत आत्मज्ञान्यानें सुद्धां लोकसंग्रह करणें हें त्याचें आश्रमकर्तव्यच आहे. नाहीं तर वस्त्रें एका आश्रमाचीं आणि आचरण दुसऱ्या आश्रमाचें, असें करणें स्वधर्म नव्हे. तें निंद्य आहे. मुक्ति ही दोघांनाही मिळणार. ती आश्रमावर अवलंबून नाहीं, ज्ञानावर आहे. रा. टिळकांप्रमाणें रा. जोशी यांनींही जनकाचें उदाहरण दिलें आहे. पण जनकानें संन्यास कधीं घेतला होता ? जनक गृहस्थाश्रमी होता. कर्म करणें त्याचें कर्तव्य होतें. निष्कामकर्मानें मुक्ति मिळते असें गीतेंत स्पष्ट आहे. हल्लीं कांहीं जो उठला तो चतुर्थाश्रमी होत नाहीं. मग संन्याशांवर ही मोहीम कां ? चुकतें आहे तें हें कीं, गृहस्थाश्रमी असून आपण आळशी माणसांप्रमाणें कर्म करीत नाहीं; व हा दोष लपविण्याकरतां कुटिल माणसाप्रमाणें वेदान्तवाक्यांचा आश्रय करतों. महाभारतांत म्हटलें आहे कीं, " द्वावेव न विराजेते विपरीतेन कर्मणा । गृहस्थश्च निरारम्भः कार्यवांश्चैव भिक्षुकः ॥ " लोकसंग्रहार्थ कर्म करणें हा ज्ञानी मनुष्याचा धर्म आहे. ( ४२६ ) असें म्हटलें तर, ब्रह्म निष्क्रिय न म्हणतां सक्रिय समजलें पाहिजे. तुम्ही आपलें ब्रह्म चाहेल तसेंच बनवा. त्यास हरकत कोण करूं शकणार ? पण वेदान्त्याचें ब्रह्म मात्र निराळें आहे. क्रिया हा त्याचा धर्म

नव्हे. बुद्धिजन्य ज्ञानाविरुद्ध वेदान्त्यांनीं बंड उभारलें, हा रा. जोशी यांचा समज ( ३७९ ) चुकीचा आहे. रा. वामनरावजींचे बन्धु उत्कृष्ट वेदान्ती असून रा. वामनरावजींनीं वेदान्त तत्त्वांचा विपर्यास करावा हें चमत्कारिक दिसतें. एके ठिकाणीं ते म्हणतातः—जनकादि जीवन्मुक्तांचा अहंकार नष्ट झाला नव्हता, पण ते पापी होते असें नव्हे (पृ.३७९) एवढ्या एका वाक्यांत किती तरी दोष आहेत. प्रथम जनकादिकांना पापी कोणत्या वेदान्त्यानें म्हटलें? जीवन्मुक्त पापपुण्यातीत असतात असें वेदान्ती म्हणत आहेत. शिवाय जीवन्मुक्त व साहंकारता ह्यांचें साहचर्य वेदान्त मान्य करतो काय? संसार अनादि आहे हें ज्याच्या बुद्धीला पटणार नाहीं त्यानें पुढें वेदान्तांत पाऊल टाकूंच नये. ह्या गृहीत गोष्टीवर वेदान्त उभारला आहे. त्याचप्रमाणें वेदान्ताचें शिखर म्हणजे जीवशिवात्म्यांचें तादात्म्य हेंही सर्वांस अभिप्रेत होणार नाहीं. दास्य आम्हांला सदैव प्रिय आहे असें ज्यांना वाटत असेल त्यांना तादात्म्यांत सुख भासणार नाहीं. म्हणूनच रा. जोशी प्रश्न करतात. ब्राम्ही स्थिति सर्व अवस्थांमध्यें श्रेष्ठ असें मानलेंच पाहिजे काय ( ३७७ )? नाहीं. हा आवडीचा प्रश्न आहे. पण ह्याच पृष्ठावर अन्नमयादि ब्रह्मांचें जें विवेचन वामनरावजींनीं केलें आहे त्यावरून " आनन्दमयोऽभ्यासात् " हें सूत्र त्यांनीं पुन्हां वाचावें असें आम्हांस वाटतें. आत्म्याचें अमरत्व, पूर्वजन्म, संसाराचें अनादित्व, ह्या गोष्टी गृहीत धरल्यावांचून कशाचाच नीट उलगडा होत नाहीं. विकासवाद व नीतिशास्त्र ह्या प्रकरणांत पूर्वजांचे नैतिक गुण अपत्यांत संक्रान्त होतात कीं नाहीं, ह्याचा रा. जोशी यांनीं ऊहापोह केला आहे. ब्राह्मणांचीं मुलें जात्याच तरतरीत असतात, पण तीं मेंदूच्या अधिक बलवत्तेमुळें नव्हे तर परिस्थतीमुळें, असा त्यांनीं निर्णय दिला आहे. पूर्वजन्म न मानणाऱ्या युरोपिअन ग्रन्थकारांच्या मताला अनुसरूनच हा निर्णय रा. जोशी यांनीं दिला आहे. उदा० जान्स्टन म्हणतो—" These and similar studies make perfectly clear the remarkable persistence of mental and moral characteristics from one generation and the next. There can be no doubt that they do persist. But the real question is are these characteristics really inherited ? On the whole it seems probable that precise mental and moral qualities are not inherited like physical characteristics. Because certain moral characteri-

stics persist from one generation to another, it does not follow that they are inherited. They may simply be developed anew in each generation under the iufluence of early environment. The " Jukes " all grew up in unfavorable environments while the members of the Edward's family all enjoyed good surroundings in their early days. In most cases it is to the influence of the early home environment rather then to that of heredity that the persistence of precise mental and moral characteristics should be ascribed. "– Johnston's *Introduction to Ethics*, page 25. वरील विचारसरणी अनुभवाच्या विरुद्ध आहे. अनुकूल परिस्थिति असूनही कांहीं माणसें निर्बुद्ध निघतात. ब्राह्मणांची बुद्धि तरतरीत याचा अर्थ प्रत्येक ब्राह्मणाची बुद्धि तरतरीत नसते. लांब कशाला, एकाच कुटुंबांतले एकाच परिस्थितींत वाढलेले मुलगे कमी अधिक बुद्धिमान् अगर नीतिमान् कां निघावे ? खरें कारण म्हणजे, पूर्वजन्मींचे संस्कार प्रत्येकाचे भिन्न भिन्न असतात. माणसाला आईबापांपासून शरीर मिळतें. नैतिक गुण प्राप्त होतात कीं नाहीं ह्याविषयीं निर्विवाद पुरावा नाहीं, म्हणून ती गोष्ट सोडून देऊं. पण त्याचे स्वतःचे पूर्वसंस्कार असतात. ह्याशिवाय रा. जोशी यांनींच बालपरिपक्वतेचीं उदाहरणें दिलीं आहेत, त्याची उपपत्ति कशी लावावयाची ? पूर्वसंस्कारांशिवाय इहजन्मींचे संस्कार माणसावर घडतात आणि अशा रीतीनें मनुष्याच्या बुद्धीची प्रगति अथवा परागति होत असते. पूर्वजन्म कबूल करण्यास जे कचरतात ते विकासवादाचा आश्रय करतात. " ज्या ब्राह्मणाचें बीज स्वभावतःच अधिक बुद्धिमत्ता उत्पन्न करणारें होतें ते ब्राह्मण जगाच्या जीवितकलहांत टिकले. " पण बीज कोणाचें ? बापाचेंच ना ? बीजामध्यें बुद्धिमत्ता उत्पन्न करण्याचें सामर्थ्य म्हणजेच Heredity होय असें आम्हांस वाटतें. मग काठेवाडांतल्या प्रोफेसरांनीं कोणत्या अर्थानें बीजादि शब्द वापरून विकासवादानें ब्राह्मणांच्या बुद्धिमत्तेची उपपत्ति लाविली आहे तें समजण्यास मार्ग नाहीं. आमच्या मतें प्रत्येकाच्या बुद्धीचा प्रत्येक जन्मीं विकास होण्यासारखा असतो. ह्याचेंच फळ बुद्धिवैचित्र्य हें होय. नुसत्या परिस्थितीवर हवाला देऊन समाधानकारक निकाल लावणें शक्य नाहीं. मनुष्यसमाजाला विकासतत्त्वें सर्वस्वीं लागू पडत नाहींत व लागू करूंही नयेत. पाशवसमाजाऐवजीं बौद्धिक अगर नैतिक समाजाचें ध्येय आपण पुढें ठेवलें पाहिजे. नीतिमत्तेनें जो श्रेष्ठ तोच समाजांत

राहण्यास लायक असा आपला बाणा पाहिजे. पण असा काल सध्यां तरी आला नाहीं. तहानंतर येईल कीं नाहीं हें पाहणें आहे.

असो. एकंदरींत मराठींत मोठ्या योग्यतेचे ग्रन्थ निर्माण होऊं लागले ह्याचा कोणासही आनंदच होईल. परिशिष्टें गाळलीं असतीं तर बरें झालें असतें. त्यामुळें ग्रन्थाची किंमतही कमी करतां आली असती. असा उत्तम ग्रन्थ लिहिल्याबद्दल आम्हीं रा. वामनराव जोशी यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों. आतां अखेरीस रा. जोशी यांस आमची इतकीच विनंती आहे कीं, त्यांनीं एथेंच न थांबतां ह्यापुढेंही विस्तृत ग्रन्थ लिहून मराठींत नीतिशास्त्रावरील ग्रन्थाची उणीव भासणार नाहीं असें करावें. कायदा आणि नीति; धर्म आणि नीति; आचार आणि नीति; परमनीति व व्यावहारिक नीति; अशा निरनिराळ्या शाखांवर स्वतन्त्र ग्रन्थरचना करून मराठी भाषेंत हा विषय पूर्णावस्थेस नेऊन पोंचवावा. व तसें करतांना महाभारताचा उपयोग विशेषतः करावा.

# वैदिक धर्म.

## लेखांक ४ था.

## शूद्रांविषयीं विवेचन.

भक्ष्याभक्ष्येषु नास्यास्ति पेयापेयेषु वै यतः।
नियमो मुनिशार्दूलास्तेनासौ साध्वितीरितम् ॥

—विष्णुपुराण.

भक्ष्याभक्ष्य, पेयापेय वगैरे कोणत्याही प्रकारच्या बन्धनापासून मुक्त असणारांना शूद्रवर्ण फार चांगला, असे उद्गार विष्णुपुराणकारांनीं काढले आहेत ते हल्लींच्या दिवसांत कोणालाही अगदींच अस्थानीं भासणार नाहींत. असो. शूद्राला ब्राह्मणांनीं पायाखालीं तुडविलें, त्याला अज्ञानांत ठेवलें, त्याला पतितासारखें वागविलें असे आरोप सांप्रत आमच्या प्राचीन ऋषींवर आणि धर्मावर वारंवार करण्यांत येतात; ह्यांत सत्याचा अंश किती आहे, ह्याचा आतां विचार करूं. प्रथमतः हें विसरतां कामा नये कीं, शूद्र हे आर्य नसून अनार्य होत. दोन भिन्न वंशाचे. एकाची संस्कृति पूर्ण विकास पावलेली तर दुसऱ्याच्या ठिकाणीं संस्कृतीचा मुळींच गंध नाहीं. प्रस्तुतकालींही सुधारलेले गौरवर्ण लोक रानटी कृष्णवर्ण लोकांना कशा रीतीनें वागवितात हें पाहिलें असतां आर्यांनीं अनार्यांचा चातुर्वर्ण्यांत समावेश केला हीच त्यांची पहिली मोठी कामगिरी समजली पाहिजे. शूद्रांच्या प्रगतीची ही पहिली पायरी होय. कारण वर्णत्व प्राप्त झाल्याबरोबर त्यांच्यावर धर्माचें थोडेंबहुत वेष्टन पडलें. "शूद्रो वर्णश्चतुर्थोऽपि वर्णत्वाद्धर्ममर्हति "( व्यास–शूद्रकमलाकर ). मागें सांगितलेंच आहे कीं, प्रत्येक वर्णाचीं आवश्यक अशीं धार्मिक कर्तव्यें निराळीं आणि उपजीविकेकरितां करावीं लागणारीं कर्तव्यें निराळीं, ह्या दोन्ही बाबतींत शूद्रांची प्रगति होण्यास आमचे ऋषि कधींही आड आले

नाहींत. व प्रगतीबरोबर समाजांत जो त्याचा दर्जा असावयाचा तोही मान्य करण्यास त्यांनीं मागें घेतलें नाहीं.

शूद्रानें आपली उपजीविका द्विजसेवा करून करावी व हाच त्याचा धर्म असा प्रथमतः नियम होता.

" शुश्रूषा शूद्रस्येतरेषां वर्णानाम् " ( आपस्तंबसूत्र. ) परंतु पुढें कारागिरीवर आपला निर्वाह करण्यास शूद्रांना सवड मिळाली. " शूद्रस्य सर्वशिल्पानि " ( विष्णुस्मृति. )

" शूद्रस्य द्विजशुश्रूषा सर्वशिल्पानि चाप्यथ "

—शंखस्मृति.

शिल्पकर्म कोणत्याच वर्णाकडे ( द्विजातीपैकीं ) नसल्यामुळें ओघानेंच तें शूद्रांकडे गेलें ह्यांत विशेष नाहीं असें कोणी म्हणतील; तर त्यांना स्मृतिकारांनींच शूद्रांना वैश्यवृत्तीचींही साधनें उपलब्ध करून दिलीं हें सांगणें अवश्य आहे. " शूद्रस्य द्विजशुश्रूषा तयाऽजीवन् वणिग्भवेत् । शिल्पैर्वा विविधैर्जीवेद्द्विजातिहितमाचरन् ॥ " ( याज्ञवल्क्य. )

" वैश्यः शूद्रः सदा कुर्यात्कृषिवाणिज्यशिल्पकान् "

—पाराशरस्मृति.

विज्ञानेश्वरांनीं देवलवचन दिलें आहे त्यावरून शूद्र त्यावेळीं सर्व धंदे करीत असत असें सिद्ध होतें. " शूद्रधर्मो द्विजातिशुश्रुषा पापवर्जनं कलत्रादिपोषणं कर्षणपशुपालनभारोद्वहनपण्यव्यवहारचित्रकर्मनृत्यगीतवेणुवीणामृदङ्गवादनादीति. " ह्यावरून शूद्रांमध्यें पुष्कळ सुधारणा झाली होती हें व्यक्त होतें.

ह्याप्रमाणें उपजीविकेचीं सर्व साधनें शूद्रांना अङ्गीकृत करण्यास प्रत्यवाय नव्हता. ह्यावरोबरच त्यांचीं धार्मिक बंधनेंही वाढलीं. शूद्राच्या ठिकाणींही नीतिमत्ता व सात्विक वृत्ति पाहिजे असें ठरलें. " क्षमा सत्यं दमः शौचं सर्वेषामविशेषतः " ( शंखस्मृति. ) इष्टापूर्ति हे द्विजांचे सामान्य धर्म. त्यांपैकीं पूर्त धर्माचा अधिकार शूद्रांना मिळाला होता. " इष्टापूर्ते द्विजातीनां सामान्ये धर्मसाधने । अधिकारी भवेच्छूद्रः पूर्तधर्मे न वैदिके ॥ " (पाराशरस्मृति.) इष्टापूर्ति म्हणजे काय हें पुढील श्लोकांवरून दिसून येईल.

" अग्निहोत्रं तपः सत्यं वेदानां चैव धारणम् । आतिथ्यं वैश्वदेवं चेष्टमित्यभिधीयते ॥ वापीकूपतडागानि देवतायतनानि च । पतितान्युद्धरेद्यस्तु स

पूर्तफलमश्नुते ॥" ह्यापुढें कांहीं स्मार्तकर्मांचाही अधिकार शूद्रांनीं मिळविला. "दानंच दद्याच्छूद्रोऽपि पाकयज्ञैर्यजेत वा। पित्रादिकं च वै सर्वं शूद्रः कुर्वीत तेन वै ॥" आणखी पुढें पहा. "ऋतुकालाभिगमनं स्वदारेषु महीपते । दया समस्तभूतेषु तितिक्षा नातिमानिता। सत्यं शौचमनायासो मङ्गलं प्रियवादिता। मैत्र्यस्पृहा तथातद्वदकार्पण्यं नरेश्वर । अनसूया च सामान्या वर्णानां कथिता गुणाः " ( विष्णुपुराण.) जितकी अधिक सुधारणा तितकीं बन्धनें अधिक, म्हणून शूद्रांची जसजशी नैतिक व धार्मिक सुधारणा होत गेली तसतसें धर्माचें जाळेंही त्यांच्याभोंवतीं अधिकच पसरत चाललें. वेदाध्ययनावांचून द्विजांचीं बहुतेक कर्में शूद्रांच्या ठिकाणींसुद्धां अपरिहार्य झालीं. कांहीं कालानंतर अध्ययनाची नसली तरि श्रवणाची मोकळीक त्यांना मिळाली.

अहिंसा सत्यवचनं दया भूतेष्वनुग्रहः । तीर्थानुसरणं दानं ब्रह्मचर्यममत्सरः ॥
देवद्विजातिशुश्रूषा गुरूणां च भृगूत्तम ।
श्रवणं सर्वधर्माणां पितृणां पूजनं तथा ॥
भक्तिश्च नृपतौ नित्यं तथा सच्छास्त्रनेत्रता ।
आनृशंस्यं तितिक्षा च तथा चास्तिक्यमेव च ॥
—आग्नेय महापुराण.

श्रवणाचा प्रतिबंध दूर झाल्यावरोबर ब्राह्मणाच्यामार्फत शूद्रानें वैदिक कर्में करण्यासही अडचण नाहीं, येथपर्यंत मजल येऊन पोंचली. ( पाराशरस्मृति. ) परकीयांच्या अमलामुळें धर्माच्या प्रगतीस जर व्यत्यय आला नसता तर वेदपठणाचाही अधिकार शूद्रांना मिळाला असता. तथापि वेदपठणाचा त्रास न ठेवतां त्यांतील ज्ञानभाण्डार आमच्या संतांनीं शूद्रांना खुलें करून दिलें. स्वतः संस्कृत पण्डित असूनही स्त्रीशूद्रांच्या कल्याणार्थ प्राकृतांत संस्कृतांतील विद्या त्यांनीं आणली. शूद्रांच्या उद्धारार्थ आज ब्राह्मणच खटपट करीत आहेत. परंपरागत, प्रगतिपर व उदार धोरण आजच्या ब्राह्मणांनीं पुढें चालू ठेवलें तर तें त्यांस भूषणावह आहे.

ह्याप्रमाणें पूर्वीचा सेवाधर्म सुटून शूद्र स्वतंत्रपणें उद्योगधंदे करूं लागले, त्यांची धर्मतःही उन्नति झाली, त्या मानानें त्यांची प्रतिष्ठाही समाजांत वाढली व ती लोकांनीं म्हणजे उच्च वर्णीयांनीं कबूल केली. " आर्यानार्ययोर्व्यतिक्षेपे कर्मणः साम्यम् "( गौतमसूत्र.) ह्या सूत्रावरील टीका बोधप्रद आहे. " आर्यः त्रैवर्णिकः अनार्यः शूद्रः तयोः कर्मणः आचारस्य व्यतिक्षेपे व्यत्यासे सति तयोः

साम्यमेव भवति । न परिचार्यपरिचारकभावः । ब्राह्मणादिरपि अनार्यकर्मा चेत् न शूद्रेण परिचरणीयः । शूद्रोऽपि आर्यकर्मा चेत् अनार्यकर्माभिः इतरैः जात्यपकर्षेण न अवमन्तव्यः ॥ " प्राचीन ग्रंथांचें अवलोकन नसल्याकारणानें सांप्रत किती निर्मूल कल्पना रूढ झाल्या आहेत हें ह्यावरून कोणासही स्पष्ट कळण्यासारखें आहे. शूद्रांची अप्रतिष्ठा केवळ ते शूद्र म्हणून आम्ही करतों हें म्हणणें निराधार आहे. शूद्र आचारसंपन्न झाले कीं वरील वर्णांच्या आदरास ते पात्र होतात. वरील टीकाकारांनीं शूद्रांचा अपमान करूं नये असें म्हटलें आहे, पण सन्मान करावा. तो आतां ब्राह्मणधर्मी झाला तेव्हां ब्राह्मणाप्रमाणें तो सेव्यही कां होऊं नये अशी कोणास शंका येईल तर त्याचेंही समाधान आमच्या पुराणकारांनीं स्पष्ट व असंदिग्ध भाषेंत केलें आहेः—

" कर्मभिः शुचिभिर्देवि शुद्धात्मा विजितेन्द्रियः॥
शूद्रोऽपि द्विजवत्सेव्य इति ब्रह्माऽब्रवीत्स्वयम् ॥
स्वभावकर्मणा चैव यश्च शूद्रोऽधितिष्ठति ।
विशुद्धः स द्विजातिभ्यो विज्ञेय इति मे मतिः ॥

—मत्स्यपुराण.

पुराणकार अर्वाचीन अशी समजूत आहे. म्हणून याज्ञवल्क्य स्मृतींतील उतारा देतों.

" विद्याकर्मवयोबन्धुवित्तैर्मान्या यथाक्रमम् ।
एतैः प्रभूतैः शूद्रोऽपि वार्धके मानमर्हति ॥ "

आणखी पुष्कळ उतारे देतां येतील; परंतु त्या सर्वांचा आशय एकच असल्यामुळें अधिक जागा अडविण्याचें विशेष प्रयोजन नाहीं. शूद्रांच्या स्थितींत कसा फरक होत गेला हें समजण्यास वरील उतारे पुरे आहेत. सर्व धंदे करण्याची त्यांना मोकळीक मिळाली. त्यांची प्रतिष्ठा वाढली, धर्माच्या बाबतींतही ते उच्च वर्णीयांच्या बरोबरीला आले. कारण वेदांतील ज्ञान त्यांस प्राप्त करून देण्याकरितां प्रत्यक्ष व्यासांनीं इतिहास—पुराणें रचलीं. " स्त्रीशूद्रद्विजबन्धूनां बालानां श्रेयसे परम् । येषां कोमलबुद्धीनां त्रयी न श्रुतिगोचरा ॥ भारतव्यपदेशेन वेदार्थमुपदिष्टवान् । चकार संहिताश्चान्या व्यासः कृपणवत्सलः ॥ प्रवृत्तः सर्वभूतानां हिताय भगवान् सदा ॥"

इंग्रजी शिक्षणामुळें अलीकडे मात्र शूद्रांविषयीं आमची सदसद्विवेकबुद्धि जागृत झाली आहे असा जो कित्येकांनीं आपला ग्रह करून घेतला आहे तो सर्वथैव निराधार दिसतो. कलियुगांत तर सर्व वर्णांचा धर्म एकच असल्यामुळें कांहींच भेद शिल्लक राहात नाहीं. " ध्यानं परं कृतयुगे त्रेतायां यज्ञ उच्यते । भजनं द्वापरे शुद्धं दानमेव कलौ युगे ॥ " (लिंगमहापुराण). कलियुगांत दान हाच मुख्य धर्म आहे. श्रौतकर्माचा सांप्रत लोपच झाला आहे, हा युगस्वभाव आहे. तेथें कोणाचाच इलाज नाहीं. " कलिस्वभाव एवैष परिहार्यो न केनचित् । कालः कर्तास्ति धर्मस्य ह्यधर्मस्य च वै पुनः ॥" ( देवी भागवत ). ह्याच पुराणांत हा परिणाम कशा रीतींनें घडून येतो हें फार सुरेख रीतीनें सांगितलेलें आहे. क्षत्रियांचा नाश होऊन परकीयांच्या ताब्यांत देश गेला म्हणजे प्रथम आचारसंकर होतो. मागल्या लेखांत सांगितल्याप्रमाणें सर्वच कृषिकार व नोकर बनतात, त्यामुळें धर्मसंकर होतो. आणि धर्मसंकर झाला कीं, वर्णसंकर ठेवलेलाच. " वृत्त ( आचार ) संकरदोषेण जायते धर्मसंकरः । धर्मस्य संकरे जाते नूनं स्याद्वर्णसंकरः ॥ एवं कलियुगे भूप सर्वधर्मविवर्जिते । स्ववर्णधर्मवार्तैषा न क्वाप्युपलभ्यते ॥ " ब्राह्मणत्वापासून च्युत होणें हाच कलिस्वभाव आहे. " भविष्यन्ति कलौ विप्रा आचारश्रुतिवर्जिताः ॥ " ( जैमिनी अश्वमेध ). आतांची वस्तुस्थिति पाहून पुराणांत मागून असलीं वाक्यें कोणी तरी घुसडून दिलीं असेंच केवळ म्हणतां येत नाहीं. एकंदर युगांची कल्पना अगर योजनाच मुळीं धर्माच्या उत्तरोत्तर होणाऱ्या अपकर्षावर बसविलेली आहे. कृतयुगांतला धर्मही त्रेतांत अविकृत राहणार नाहीं. " त्रेतायां विकृतिं यान्ति वर्णास्ते न संशयः । चातुर्वर्ण्यस्य वैकृत्याद्यान्ति दौर्बल्यमाश्रमाः ॥ विप्राः शूद्रसमाचाराः सन्ति सर्वे कलौ युगे ॥ " ( मत्स्यपुराण. ) विप्र शूद्र बनले म्हणजे कोणते परिणाम अनुभवास येतील हेंही पुराणकारांनीं ताडलें होतें. "शूद्राणामन्त्ययोनेस्तु सम्बन्धा ब्राह्मणैः सह । भवन्तीह कलौ तस्मिञ्छयनासन--भोजनैः ॥ " ( ब्रह्माण्ड पुराण. ) अशा ह्या कलियुगांत श्रौताचार बाळगणें शक्य नसेल तर निदान सद्वर्तन तरी ठेवावें म्हणजे कोणतेंही पातक लागण्याचें कारण नाहीं. आचारेन्दूमध्यें व्यासांचें म्हणून खालील वचन दिलें आहे. " श्रौतं कर्म न चेच्छक्तः कर्तुं स्मार्तं समाचरेत् । तत्राप्यशक्तः करणे सदाचारं लभेद्बुधः ॥ " हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच कीं, कलियुगांत

म्हणजे विशिष्ट परिस्थितींत द्विज व शूद्र ह्यांतील अंतर फार कमी झालें आहे, ह्या गोष्टीची जाणीव असल्यानेंच ऋषींच्या मुखांतून खालील उद्गार येणें शक्य झालें–" न योनिर्नापि संस्कारो न श्रुतिर्नच संततिः । कारणानि द्विजत्वस्य वृत्तमेव तु कारणम् ॥ सर्वाज्यं ब्राह्मणो लोके वृत्तेन तु विधीयते । वृत्ते स्थितश्च शूद्रोऽपि ब्राह्मणत्वं च गच्छति ॥ " ( महाभारत ). सारांश, आचारानें व ज्ञानानें शूद्रांची संस्कृति जसजशी होत जाईल तसतशीं जाति-भेदाचीं बन्धनेंही शिथिल झाल्याशिवाय राहणार नाहींत. आचारभेद आहे तोंपर्यंत जातिभेद कायम राहणार हें जें विधान कै. तेलंगानीं शास्त्र आणि रूढि ह्या विषयावरील व्याख्यानांत केलें आहे, त्यांतील रहस्य प्रस्तुत कालच्या सुधारकांना चांगलें समजलें नाहीं असें वाटतें. असो. वादग्रस्त विषयांत येथें शिरण्याची माझी इच्छा नाहीं. शूद्रांच्यासंबंधानें द्विजांनीं आपलें कर्तव्य किती उत्कृष्टपणें बजाविलें आहे हेंच मुख्यत्वेंकरून दाखविण्याचा हेतु आहे. ह्यावरून आमच्या पूर्वजांना ह्या बाबतींत दोष देणें अगदीं गैरवाजवी होईल.

ह्यानंतर कांहीं किरकोळ बाबींचा निर्देश करून ही लेखमाला पुरी करूं. वैदिक धर्माचा विचार करतां चातुर्वर्ण्याची बाब प्रथम पुढें येते. चार वर्ण म्हणजे चार जातीच. पूर्वी एका वर्णाचा मनुष्य दुसऱ्या वर्णांत जात असे असें कित्येकांचें मत आहे. ह्याच्या समर्थनार्थ जीं उदाहरणें प्रायः दिलीं जातात तीं भ्रामक आहेत असें वे. शा. भाऊशास्त्री लेल्यांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे असें मला वाटतें. प्रथमतः एक वर्ण असून मागून चार वर्ण झाले ही गोष्ट नाकबूल करणें शक्य दिसत नाहीं. नारदीय पुराणांत ब्रह्मदेवानें सृष्टि निर्माण केल्यानंतर कर्मानुरूप चार वर्ण झाले असें स्पष्ट सांगितलें आहे. " न विशेषोस्ति वर्णानां सर्वं ब्रह्ममयं जगत् । ब्रह्मणा पूर्व-सृष्टं हि कर्मणा वर्णतां गतम् ॥ " तसेंच मत्स्यपुराण पहा–" यथा कृतयुगे पूर्वमेकवर्णमभूत् किल " हें जरी खरें असलें तरी एकदां कां लोकसमूहाला कर्मानुरूप विशिष्टाभिधान प्राप्त झालें म्हणजे हारीतस्मृतींत म्हटल्याप्रमाणें जन्मावरच वर्णत्व मानलें जातें. " ब्राह्मण्यां ब्राह्मणेनैवमुत्पन्नो ब्राह्मणः स्मृतः ॥" आरंभीं गुणकर्माप्रमाणें वर्गीकरण केलें खरें पण पुढें वर्णविशिष्ट-त्वाला जन्मच कारण असणार. उदाहरणार्थ, ब्राह्मणाचा मुलगा घ्या. तो सज्ञान होईपर्यंत लोक त्याला ब्राह्मणच म्हणणार, तोही आपणांस

ब्राह्मण म्हणून समजणार. त्याचा पिता त्याला लहानपणीं ब्राह्मण धर्माचीच दीक्षा देणार. पुढें निर्बुद्ध असल्यामुळें कदाचित् निर्वाहाकरतां त्यानें वाण्याचें दुकान घातलें तर त्यावरोबर तोही आपणांस वैश्य समजूं लागेल, लोकही त्याला वैश्य म्हणूं लागतील हें असंभाव्य दिसतें. शिवाय विवाहादिसंबंधानें आणखी अडचणी उत्पन्न होतील, त्या निराळ्या. म्हणून ब्राह्मण क्षत्रिय, वैश्य, शूद्र हीं चार नांवें प्रचारांत आल्यावर एका वर्णांतील मनुष्य दुसऱ्या वर्णांत सहज जात असे हें म्हणणें सयुक्तिक व मनास पटण्यासारखें दिसत नाहीं. कोंकणामध्यें राहणारा तो कोंकणस्थ व देशावर राहणारा देशस्थ ही जरी मूळची उपपत्ति बरोबर असली तरी कोंकणस्थ देशावर येऊन राहिला असतां त्यास कोणी देशस्थ समजत नाहींत. नामकरणाचा हा स्वाभाविक परिणाम होतो. नामामुळें विशिष्टत्व अथवा भेद हा दृढ होतो व ऐक्यमूल गोष्टींचा विसर पडतो. वर्ण हा जन्मावर अगर गुणावर अवलंबून आहे, ह्या प्रश्नाच्या वादविवादांत वरील नैसर्गिक तत्वाला जितकें प्राधान्य दिलें पाहिजे तितकें दिलें जात नाहीं. माझ्या मतें वर्णभेद प्रथम गुणकर्मामुळेंच निर्माण झाले. तथापि पुढें लवकर कर्माची जागा जन्मानेंच पटकावली. वर्णभेद अगर जातिभेद कोणी निर्माण केला नाहीं, त्यामुळें इष्ट असो वा अनिष्ट असो तो एकदम मोडणें शक्य नाहीं. परिस्थितीमुळें मोडेल. परंतु तेवढ्यानें धर्माची हानि होईलच असा नियम नाहीं. कारण तो आचार आहे. आणि मागील लेखांत दाखविल्याप्रमाणें महाजन वागतील तोच ह्या बाबतींत धर्म समजला पाहिजे. तात्पर्य, वैदिक धर्माचें रहस्य ज्याला अवगत झालें तो आचार बदलल्यामुळें धर्महानि झाली म्हणून कधीं म्हणणार नाहीं. वैदिक धर्म व्यापक आहे. धर्माचें उच्च ध्येय सदा सारखें कृतींत उतरणार नाहीं; ह्या गोष्टीचें विस्मरण आमच्या ऋषींना झालें नव्हतें. धर्माचें तत्व समजून घेऊन ज्या स्थितींत जितकें करतां येईल तितकें करावें, आत्म्याची अवनति होऊं देऊं नये इतकेंच शास्त्रकारांचें सांगणें आहे. पुनर्विवाह करा, प्रौढविवाह करा, महारांच्या पंक्तीस बसून जेवा, आत्म्याची अवनति करून घेऊं नका म्हणजे झालें. उत्तम, परमार्थानुकूल आचार कोणता तो शास्त्रकारांनीं दाखविला आहे. कारण नसतां तो आचार बदलूं नये. पण प्रसंग आल्यास तो बदलण्यास शास्त्राची आडकाठी नाहीं. उदाहरण, एखाद्या देशांत स्त्रिया व पुरुष

17 MAR 1990

ह्यांची संख्या समसमान असली तर एका पुरुषानें एकाच स्त्रीशीं विवाह करावा हाच निर्दोष आचार होय. परंतु युद्धासारख्या कारणांनीं पुरुष मृत्युमुखीं पडल्यामुळें स्त्रियांची संख्या पुरुषांहून फारच अधिक असली तर एका पुरुषानें एकाच वेळीं एकाहून अधिक स्त्रिया करणें युक्तच आहे. नाहीं तर स्त्रियांना व्यभिचार करण्याची मोकळीक दिली पाहिजे. म्हणून धर्माधर्माच्या गोष्टी फार कठीण आहेत. व ज्ञानी माणसांनींच त्यांचा निर्णय केला पाहिजे. एवढ्याकरतांच बौद्धायन ऋषींनीं प्रायश्चित सांगणें तें परिस्थितीचा विचार करून सांगावें असा इशारा दिला आहे.

" शरीरबलमायुश्च वयः कालंच कर्मच ।
समीक्ष्य धर्मविद्बुद्धया प्रायश्चित्तानि निर्दिशेत् " ॥

हिंदु कोणाला म्हणावें ह्याविषयीं एकवाक्यता दिसत नाहीं. मला वाटतें श्रुतिप्रामाण्य ज्यास मान्य आहे त्यास हिंदु म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. अनार्यांचा चातुर्वर्ण्यांत अन्तर्भाव केलेला आहेच. इतर धर्मीयांना धर्मान्तर करून हिंदु होण्यास प्रतिबंध नसावा असें वाटतें. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांबील हिंदु युरोपखंडांत जाऊन राहिला व त्याचे आचार बदलले तरी श्रुत्युक्त धर्मावर जोंपर्यंत त्याची पूर्ण श्रद्धा आहे तोंपर्यंत त्याचें हिंदुत्व नष्ट होण्याची भीति नाहीं. श्रुतिस्मृत्युक्त धर्मावरील दृष्टि ढळूं देतां कामा नये. हिंदुधर्म जगद्व्यापि असल्यामुळें अर्थात्च सर्व हिंदूंची संस्कृति समान असणें शक्य नाहीं. ह्याकारणानेंच आमच्यामध्यें वर्णभेद अगर जातिभेद उत्पन्न झाले. समान संस्कृतीच्या लोकांत असा भेद होण्याचें कारणच राहत नाहीं. जातिभेद एका क्षणांत निर्मूल करूं पाहणाऱ्या सद्गृहस्थांनीं ह्या गोष्टीचा कितपत विचार केला आहे तें समजत नाहीं. खिस्त, महंमद, अगर बुद्ध कोणी घ्या, त्यांच्यांत आणि त्यांच्या अनुयायांत आचारसंपन्नतेच्या बाबतींत कांहीं फरक होता असें मानण्यास कारण नाहीं. परंतु द्विज आणि शूद्र ह्यांची एकत्र गांठ पडली तेव्हां दोहोंच्या आचारांत जमीनअस्मानाचें अंतर होतें. अशा वेळीं शूद्रांपासून द्विज अलग राहिले ह्यांत त्यांचा मूर्खपणा नसून शहाणपणाच होता. असो. ह्याप्रमाणें वैदिक धर्माचें स्वरूप संक्षेपतः उद्घाटित केलें आहे. त्यामुळें ह्या धर्माची श्रद्धा कमी न होतां उलट वृद्धिंगत होईल अशी आशा आहे.

---